# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# अभिजात समाजशास्त्रीय परंपरा

**(Classical Sociological Traditions)**

**समाजशास्त्र एम. ए. भाग–१ सत्र–१ SOC 01**

**समाजशास्त्र एम. ए. भाग–१ सत्र–२ SOC 03**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१४
**द्वितीय आवृत्ती :** २०१५
**तृतीय आवृत्ती :** २०१७
**सुधारित आवृत्ती :** २०१८
एम. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-536-3

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ समाजशास्त्र समन्वय समिती ■

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) जगन कराडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शैलजा माने**
  लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,
  सातारा
- **डॉ. उषा पाटील**
  महावीर महाविद्यालय,
  कोल्हापूर

| | |
|---|---|
| दूर शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **अभिजात समाजशास्त्रीय परंपरा**<br>**एम. ए. भाग–१ :**<br>Sem. I. SOC 01, Sem. II SOC 03 |

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–१ घटक क्रमांक | सत्र–२ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **श्री. पी. एस. साळुंखे**<br>के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर | १ | ३ |
| **श्री. पी. ए. घोंगडे**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,<br>ता. चंदगड, जि. कोल्हापूर | २ | २ |
| **श्री. एस. एल. मोहिते**<br>सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, ता. कराड (सातारा) | २, ३ | १, २, ४ |
| **श्री. जे. सी. घाडगे**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, पेठवडगांव,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | ३, ४ | -- |
| **श्री. मधुकर धुतुरे**<br>विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | ३ | -- |

■ **संपादक** ■

**श्री. एस. एल. मोहिते**
सेवानिवृत्त असो. प्रोफेसर,
पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागप्रमुख,
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा

# प्रस्तावना

पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी म्हणजेच एम. ए. ला जून २०१३ पासून सत्र परीक्षा सुरू झालेली आहे. सत्र १ आणि सत्र २ साठी एकूण सोळा पेपर्स अभ्यासावे लागणार आहेत. प्रथम वर्षासाठी एकूण आठ पेपर्स (सत्र १ व २ साठी) असून त्यापैकी चार आवश्यक (Compulsory) आणि चार ऐच्छिक (Elective) पेपर्स आहेत.

एम. ए. समाजशास्त्र विषयाला नियमित आणि दूर शिक्षण केंद्रामार्फत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी आवश्यक पेपर SOC-001 सत्र-१ आणि SOC-003 सत्र-२ ''अभिजात समाजशास्त्रीय परंपरा'' (Classical Sociological Traditions) याचा प्रमुख संपादक म्हणून मनःपूर्वक स्वागत करतो.

सदर आवश्यक पेपरचा प्रमुख संपादक (Chief Editor) या नात्याने सदर पेपरची ही पुस्तिका तयार करण्यासाठी विविध महाविद्यालयातील माझ्या सर्व लेखक मित्रांनी जे मोलाचे योगदान दिले आहे त्यामुळेच मला सदरची पुस्तिका संपादित करणे शक्य झाले. अशा सर्व लेखक मित्रांचे मी सुरुवातीलाच मनापासून आभार मानतो.

''अभिजात समाजशास्त्रीय परंपरा'' या आवश्यक पेपरमध्ये सत्र क्र. १ साठी चार युनिट आणि सत्र क्र. २ साठी चार युनिटचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय, त्याची ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक व बौद्धिक पार्श्वभूमी तसेच कार्ल मार्क्स, एमिल डुरखाईम, मॅक्सवेबर, विल्फ्रेडो पॅरेटो, चार्लस् कुले, जॉर्ज मीड इत्यादी पाश्चात्य समाजशास्त्रीय विचारवंतांच्या प्रमुख विचारांचा समावेश होतो आणि शेवटी अभिजात परंपरा संक्षिप्त आढावा या युनिटचा समावेश केला आहे. अर्थातच एम. ए. समाजशास्त्र विषयाला प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना या शास्त्राच्या सैद्धांतिक मांडणीचा योग्य व वास्तव असा परिचय होण्यास खूप मोलाची मदत होणार आहे असे माझे प्रामाणिक मत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागाने एम. ए. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्यासाठी स्वयं अध्ययन पुस्तिका (SIM) देण्याच्या हेतूने लेखकांची सूची तयार केली. ''अभिजात समाजशास्त्रीय परंपरा'' या पेपरच्या सत्र १ व २ साठी अनेक लेखक मित्रानी मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळेच सदरची पुस्तिका बऱ्यापैकी तयार करण्याचे अवघड काम मला पूर्ण करता आले.

शेवटी प्रमुख संपादक या नात्याने मी सर्वप्रथम मा. कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. (डॉ.) जगन कराडे, अभ्यासमंडळाचे चेअरमन डॉ. मच्छिंद्र सकटे, अभ्यासमंडळाचे सदस्य आणि समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे मी प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

संपादक

**श्री. एस. एल. मोहिते**

सेवानिवृत्त असो. प्रोफेसर,

पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागप्रमुख,

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड जि. सातारा.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### समाजशास्त्र अभ्यासमंडळ

अध्यक्ष – **रिक्त**

- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

- **डॉ. संजय हिंदुराव सनदे**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा

- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.

- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  विवेकानंद कॉलेज,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर

- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सत्र–१ | |
| १. | समाजशास्त्रीय सिद्धांताचा उगम : | १ |
| २. | कार्ल मार्क्स | २५ |
| ३. | एमिल डुरखाईम | ४७ |
| ४. | मॅक्स वेबर | ७६ |
| | सत्र–२ | |
| १. | विल्फ्रेडो पॅरेटो | १११ |
| २. | चार्लस हॉर्टन कुले | १३४ |
| ३. | जॉर्ज हर्बर्ट मीड | १५२ |
| ४. | अभिजात परंपरा : संक्षिप्त आढावा | १७३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**सत्र – १ : घटक – १**

# समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२. विषय–विवेचन

१.२.१ सामाजिक सिद्धांताचा अर्थ आणि समाजशास्त्राचा उदय होण्याअगोदरचे सामाजिक विचार

१.२.१.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

१.२.२ समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास होण्यामागे असलेली सामाजिक–राजकीय आणि आर्थिक परिस्थिती

१.२.२.२ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

१.२.३. समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय होण्यामागे असणारी वैचारिक आणि तात्त्विक परिस्थिती

१.२.३.३ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

१.३. सारांश

१.४ पारिभाषिक संज्ञा

१.५. स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६. सरावासाठीचे प्रश्न

१.७ संदर्भ सूची


## १.० उद्दिष्टे :

घटक क्र. १ मध्ये समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय कशा प्रकारे झाला हे जाणून घेत असताना, सर्वप्रथम सामाजिकशास्त्रातील सिद्धांत कशा प्रकारचे असतात हे माहित असणे गरजेचे आहे. कारण समाजशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र (Social Science) असून त्यामध्ये सैद्धांतिक मांडणी करताना अभ्यासकांनी समाजाशी निगडीत असणाऱ्या विविध घटकासंबंधी वस्तुनिष्ठ स्वरूपामध्ये समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले आहेत. म्हणून सर्वप्रथम सामाजिक सिद्धांताचा अर्थ विचारात घेणे आवश्यक आहे.

तसेच, ज्या वेळी युरोप खंडातील फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, इंग्लंड, इटली इ. सारख्या पाश्चात्य देशांमधील मानवी समाज उत्क्रांत होत असताना, ज्या स्वरूपाची सामाजिक परिस्थिती होती त्या सामाजिक

परिस्थितीमध्ये आर्थिक, राजकीय आणि सामाजिक घटनांचे योगदान कशा स्वरूपाचे होते यांचे विश्लेषण समाजशास्त्राचा उदय कशा प्रकारे झाला हे जाणून घेण्यासाठी आवश्यक आहे. समाजशास्त्राचा उदय होण्यामागची सामाजिक परिस्थिती किंवा अशास्त्रीय स्वरूपात सामाजिक विचार मांडणीतून शास्त्रीय मांडणीकडे वाटचाल करताना समाजशास्त्र कसे उदयास आले? याबद्दलचा आढावा घेण्याचा प्रयत्न या घटकामध्ये करणार आहोत.

युरोप खंडामध्ये, समाजशास्त्र उदयास आले असे ज्यावेळी म्हटले जाते, त्यावेळी त्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना त्यांच्या वेळी असणारी सामाजिक रचना (Social Setting) सिद्धांत मांडणीला कशा प्रकारे कारणीभूत ठरली याचा आढावा घेणे आवश्यक ठरते. समाजशास्त्राच्या संदर्भात जर विचार केला तर, एकूणच समाजशास्त्राचा अभ्यासविषय हा प्रामुख्याने समाजरचनेच्या अभ्यासावर आधारलेला असल्यामुळे समाजशास्त्राच्या निर्मितीमागे असलेली युरोपीय समाजरचना १९ व्या शतकामध्ये आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला कशाप्रकारे कारणीभूत ठरली याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. या कालखंडामध्ये युरोपमध्ये जी सामाजिक उलथा-पालथ होत होती तीच खऱ्या अर्थाने, समाजशास्त्राच्या उदयास कारणीभूत होती. त्यामुळे समाजशास्त्रीय विचारांचा इतिहास जाणून घेताना १७८९ मध्ये घडून आलेली फ्रेंच राज्यक्रांती, इंग्लंड मधील औद्योगिक क्रांती आणि त्यामधून उदयास आलेली भांडवलशाही व्यवस्था, समाजवादी विचारसरणी, युरोप खंडातील नागरीकरण, धार्मिक क्षेत्रात होणारे परिवर्तन आणि विज्ञानामुळे बदलणारे मानवी विचार इ. सारख्या महत्त्वपूर्ण घटनांचा परिणाम म्हणून बदलणारी सामाजिक रचना समाजशास्त्राच्या उदयाला कारणीभूत ठरणारी होती. त्यामुळे या सर्व घटकांचा सखोल आढावा घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.

समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास होण्यामागे जशी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्वरूपाची परिस्थिती कारणीभूत होती, तशी अभ्यासकांची वैचारिक (Intellectual) आणि तात्त्विक (Philosophical) मांडणीसुद्धा तितकीच महत्त्वाची ठरते. त्यामध्ये उद्‌बोधनाचा कालखंड (Enlightenment Period) आणि पुरातन विचार तसेच त्या विचारांना शास्त्रीय विचाराने केलेला विरोध कशा प्रकारचा होता? फ्रेंच विचारवंत चार्लस मॉन्टेस्क्यू (१६८९-१७५५) आणि रुसो (१७१२-१७७८) या दोन प्रमुख विचारवंतांच्या तात्त्विक मांडणीचा समाजशास्त्रीय सिद्धांतावर प्रभाव कशा प्रकारे होता? तसेच थॉमस हॉबस, लुईस बोनाल्ड यांच्या विचारांचा देखील आढावा घेणे आवश्यक ठरते. त्यानंतर फ्रेंच, जर्मनी, अमेरिका, इंग्लंड आणि इटली मधल्या कोण-कोणत्या प्रमुख समाजशास्त्रज्ञांनी आपल्या विचारातून समाजशास्त्रीय सिद्धांताच्या मांडणीमध्ये योगदान केले? यासंबंधी आपण विचार करणार आहोत.

थोडक्यात, समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय कशा प्रकारे झाला? हे माहिती करून घेत असताना, समाजशास्त्र हा विषय किंवा एक सामाजिक शास्त्रीय शाखा म्हणून विकसित होत असताना, त्याला जबाबदार असणारी सामाजिक, आर्थिक, राजकीय पार्श्वभूमी आणि वैचारिक व तात्त्विक विचारांचे असणारे योगदान जाणून घेतल्याखेरीज, समाजशास्त्र या अभ्यासशाखेचा इतिहास समजून येणार नाही. म्हणून सर्वात पहिल्या युनिटमध्ये समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय कसा झाला? हे जाणून घेवूया.

## १.१ प्रास्ताविक :

एम. ए. भाग (सत्र-१) साठी, समाजशास्त्र विषयामध्ये सक्तीचा पेपर म्हणून असलेला 'Classical Sociological Traditions' किंवा 'अभिजात समाजशास्त्रीय परंपरा' म्हणजे, युरोप खंडातील समाज

आणि संस्कृती संदर्भात १८ व्या शतकाच्या आणि १९ व्या शतकाच्या सुरुवातीचा जो कालखंड होता. त्या कालखंडामध्ये फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी आणि अमेरिका या प्रमुख युरोपियन मानवी संस्कृती आणि समाजासंबंधी ऑगस्ट कॉम्ट, स्पेन्सर, कार्ल मार्क्स, एमिल डुरखाईम, मॅक्स वेबर, जार्ज सिमेल आणि मॅनहीम सारख्या समाजशास्त्रज्ञांनी त्यांच्या समाजशास्त्रीय सिद्धांतामधून जी मांडणी केली होती, ती निर्माण होण्यामागे समाजशास्त्रीय सिद्धांत त्या वेळच्या युरोपियन मानवी समाज आणि संस्कृती बद्दल चर्चा करतात. तसेच हर्बट मीड, आल्फ्रेड शूटज आणि टालकॉट पारसन या अमेरिकन समाजशास्त्रज्ञांनी जे समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले अशा अभिजात समाजशास्त्रीय सिद्धांताचा ऐतिहासिक मागोवा घेणे गरजेचे आहे.

कांही प्रमुख समाजशास्त्रज्ञांच्या सिद्धांताचा आशय विचारात घेता, त्यांच्या वैचारिक मांडणीचा अर्थ समजून येतो. उदा.

१) We are evolving in direction of world dominated by science (Auguste Comte)

विज्ञानाचे वर्चस्व असणाऱ्या जगाकडे किंवा त्या दिशेने मानवी समाज उत्क्रांत होत चालले आहेत. (ऑगस्त कॉम्त)

२) विश्वाची वाटचाल गुंतागुंतीच्या समाजरचना आणि त्यांच्यामधील एकोपा होण्याच्या दिशेने होत आहे. (स्पेन्सर)

३) भांडवलाच्या साह्याने कामगारांचे शोषण करण्याच्या पद्धतीवर भांडवलशाहीची उभारणी झालेली असते. (कार्ल मार्क्स)

अशाप्रकारे ज्या विचारवंतानी त्यांच्या कालखंडातील मानवी समाज आणि संस्कृतीबद्दल मांडणी केली, तो कालखंड आणि त्यांचे सामाजिक चिंतन यांना समाजशास्त्रीय सिद्धांतामध्ये विशेष महत्त्व आहे. तसेच त्यांनी ज्या कालखंडात जे समाजशास्त्रीय चिंतन केले होते, त्या विचारांचा संदर्भ आजच्या समाज रचनांना देखील इतक्या प्रदीर्घ कालखंडानंतर काही प्रमाणात लागू पडतो. तसेच नंतरच्या समकालीन समाजशास्त्रीय अभ्यासकांना देखील समाजशास्त्रीय विचार मांडणीच्या पद्धतींचे ज्ञान मिळते.

समाजशास्त्रीय सिद्धांताबाबतचा ऐतिहासिक आढावा घेणे एक कठीण काम आहे. कारण कोणत्या एका निश्चित वेळेला समाजशास्त्रीय सिद्धांत उदयास आले याबद्दल स्पष्टीकरण करता येत नाही. मानवी इतिहासाच्या सुरुवातीपासून व्यक्ती विचार मांडत असताना त्यांनी त्यांच्या एकूण समाजजीवनाबद्दलचे समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले आहेत. त्यामुळे व्यापक अर्थाने १८ व्या शतकामध्ये ज्या विचारवंतानी समाजशास्त्रीय सिद्धांताची मांडणी केली त्यांच्या मांडणीवर सामाजिक आणि वैचारिक घटकांचा प्रभाव पडल्याने त्यांचे समाजशास्त्रीय सिद्धांत कसे निर्माण झाले हे जाणून घेणे आवश्यक ठरते.

आपण समाजशास्त्र हे एक विज्ञान आहे तसेच ती एक पाश्चात्य युरोप खंडातील आधुनिक विचारांची एक अभ्यासशाखा म्हणून समजत असलो तरी, समाजशास्त्राचा अभ्यास जगात इतरत्र देशात प्राचीन काळी, एका विचारवंताने केला होता. त्याचे नाव 'अबदल रहेमान-इब्न-खालदुन' होते. त्याचा जन्म दक्षिण आफ्रिकेतील 'टुनिस' या ठिकाणी २७ मे १३३२ रोजी झाला. त्याचा 'कुराण' या मुस्लीम पवित्र ग्रंथाचा अभ्यास होता. शिवाय तो गणित आणि इतिहास विषयाचा तज्ञ होता. 'टुनिस', मोरोम्को, स्पेन, 'अल्जेरिया' सारख्या देशांतील त्या वेळच्या सुलतानांना तो सल्ला देणारा राजदूत आणि वरिष्ठ अधिकारी, सल्लागार म्हणून काम करत होता. या २० वर्षाच्या सेवेत त्याने केलेल्या अनेक राजकीय कामकाजावर आधारीत लिखान केले होते. त्या लिखाणामुळे 'कायरो' येथील 'अल हजर मासक्यू विद्यापीठ कायरो' या ठिकाणी

त्याने समाज आणि समाजशास्त्र विषयावर व्याख्याने दिली होती. त्याच्या एकूण समाजशास्त्रीय अभ्यासात राज्यसंस्था, अर्थसंस्था यांच्यामधील परस्पर संबंधाचा अभ्यास आणि प्रगत व अप्रगत समाजाबद्दलच्या तुलनेचा अभ्यास केलेला आढळतो.

अशा प्रकारे समाजशास्त्राचा अभ्यास युरोप खंडाखेरीज जगात इतरत्र केला गेला होता. या बद्दलची माहिती पुढे आली. त्यामुळे समाजशास्त्रीय सिद्धांत आणि त्याचा उदय कशा प्रकारे झाला. या संबंधीचा सविस्तर तपशील या प्रकरणातून होणार आहे.

## १.२ विषय विवेचन

सदरच्या घटकाचे एकूण तीन उपघटक आहेत. पैकी पहिल्या उप-घटकामध्ये, सामाजिक सिद्धांताचा अर्थ आणि समाजशास्त्राचा उदय होण्याअगोदरचे सामाजिक विचार कशा स्वरूपाचे होते, की ज्या विचारांना शास्त्रीय मांडणीचा आधार नसल्यामुळे युरोपमधल्या ख्रिश्चन धर्मगुरुंच्या प्रभावाखाली असलेल्या समाज-व्यवस्थेला नवीन, तात्त्विक, आधुनिक शास्त्रीय विचारांकडे घेवून जाण्याचा प्रयत्न, समाजशास्त्रासारख्या वस्तुनिष्ठ विचारांच्या मांडणीतून कसा झाला. या बद्दलचा आढावा पहिल्या उपघटकांत घेणार आहोत.

नंतरच्या दुसऱ्या उप-घटकांमध्ये, समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणून जी एक वस्तुनिष्ठ शास्त्रीय माहिती, ऑगस्ट कॉम्ट, एमिल डुरखायिम, मॅक्स वेबर, जार्ज-सिमेल, कार्ल मार्क्स यासारख्या अभ्यासकांनी त्यांच्या सैधांतिक मांडणीमध्ये अभ्यासण्याचा प्रयत्न केला, त्याला कारण म्हणजे युरोप खंडामध्ये, फ्रान्समध्ये १७८९ मध्ये घडून आलेली फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिकरणाचा परिणाम म्हणून उदयास आलेली भांडवलशाही व्यवस्था, समाजवादी समाजरचनेचा विचार, महिलावादाची विचारसरणी, युरोप खंडातील वाढते नागरीकरण, विज्ञान आणि वैज्ञानिक विचारांचे वर्चस्व, धार्मिक परिवर्तन इ. सारख्या सामाजिक घटकांचा परिणाम म्हणून, समाजशास्त्रीय सिद्धांत मांडणीला कशा प्रकारे चालना मिळाली याविषयी मांडणी केली आहे.

शेवटच्या तिसऱ्या उपघटकामध्ये समाजशास्त्रीय सिद्धांताचा उगम होण्यामागे जो आणखी एक महत्त्वाचा घटक होता तो म्हणजे, त्या कालखंडातील वैचारिक आणि तात्त्विक विचारांची बैठक होय. त्यामुळे हा घटक अभ्यासताना, समाजशास्त्रीय सिद्धांताच्या निर्मितीपूर्वी जे सामाजिक चिंतन ‘तत्त्वज्ञाना’सारख्या अभ्यासशाखेतून केले जात होते ते तत्त्ववेत्ते कशा प्रकारची समाज मांडणी करत होते. आणि नंतरच्या समाजशास्त्रज्ञांनी त्या विचारांना समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्वरूप प्राप्त करून देताना, सामाजिक विचारांना वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय पाया घालून देण्याचे कार्य नंतरच्या समाजशास्त्रज्ञांनी कशा प्रकारे केले या विषयी मांडणी करणार आहोत.

### १.२.१ सामाजिक सिद्धांताचा अर्थ आणि समाजशास्त्राचा उदय होण्या अगोदरचे सामाजिक विचार

सामाजिक सिद्धांत म्हणजे काय? (What is social theory) हे जाणून घेत असताना, सिद्धांत, तत्त्व, नियम (Theory) या संबंधी अभ्यासक अनेक अर्थ मांडत असतात. त्यामुळे सिद्धांताचा नेमका अर्थ माहित नसल्यामुळे समाजशास्त्रीय सिद्धांताबद्दल काही गैरसमज निर्माण होत असतात. साधारणपणे सिद्धांत म्हणजे, ढोबळमानाने मांडलेले विधान किंवा एखाद्या सामाजिक प्रश्नांवर आपल्या मनात असलेल्या कल्पना मांडणे, अशा अर्थाने सिद्धांताबद्दल म्हटले जाते. कारण तो केवळ एक सिद्धांतच असतो. ते सामाजिक प्रश्नाचे अंतिम ‘सत्य’ किंवा ‘विधान’ (Statement or truth) नसते.

'सिद्धांत' (Theory) याचा अर्थ समजून घेताना, 'तथ्ये' (facts) या संकल्पनेचा देखील अर्थ समजून घेणे आवश्यक ठरते. उदा. 'तथ्ये' म्हणजे एखाद्या सामाजिक घटनेसंदर्भात मिळणारी 'खरी' (Truth) माहिती होय. त्यामुळे, सामाजिक घटनेबद्दलचे 'सत्य', मिळणाऱ्या 'सामाजिक तथ्यांवर' किंवा माहितीवर अवलंबून असते; तर दुसऱ्या बाजूला संशोधक ज्यावेळी एखाद्या सामाजिक घटनेबद्दल माहिती किंवा 'तथ्य' (facts) अभ्यासून त्यावर चिंतन करून अशा स्वरूपाचे सत्य (Truth) त्या सामाजिक घटनेबद्दल असू शकते असे ज्यावेळी सांगतो त्यावेळी आपल्या सिद्धांतामधून, केवळ संभाव्य स्वरूपाचे 'सत्य' काय असू शकते याचा अंदाज मांडण्याचा प्रयत्न करतो.

'समाजशास्त्र' एक वैज्ञानिक परंपरा जोपासणारे शास्त्र असल्यामुळे, या मधल्या सर्व समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारला असला तरी, सर्वच सामाजिकशास्त्राच्या अभ्यासकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन विचारात घेतलेला नाही, कारण 'मानवी वर्तन' (Human Behavior) या घटकाबद्दल, वैज्ञानिक परंपरेमधल्या अभ्यासकांनी मांडणी केली नसल्यामुळे, अवैज्ञानिक (Non-Scientific) स्वरूपाच्या सामाजिक सिद्धांतामधून 'मानवी वर्तन' हा घटक अभ्यासला गेला आहे. असे असले तरी, 'सिद्धांत' ही एक विचारधारा असते (Chain of knowledge) आणि त्यामुळे सिद्धांताला वैज्ञानिक मान्यता आणि सार्वमत मिळाल्याखेरीज तो विचार किंवा अभ्यास सिद्धांत म्हणून समाजासमोर येत नाही.

**सामाजिक सिद्धांताची प्रमुख तीन वैशिष्ट्ये :**

बहुतांशी समाजशास्त्रज्ञ, 'समाजशास्त्र' हे एक विज्ञान (Science) म्हणून ज्यावेळी सामाजिक घटनांचा अभ्यास करत आले, त्यावेळी त्यांनी त्यांच्या सैद्धांतिक मांडणीमध्ये, सामाजिक तथ्यांना (facts) अग्रक्रम दिला. म्हणून अनुभवावर आधारित माहितीचा (Empirical data) आधार घेवून ज्या वेळी समाजशास्त्रीय विचारांची मांडणी होते, त्यावेळी सिद्धांताची ओळख पुढील तीन प्रमुख वैशिष्ट्यांच्यामधून करताना त्यांचा समाजशास्त्रीय अभ्यासाशी कसा संदर्भ असतो किंवा समाजशास्त्र ज्यावेळी एखाद्या सामाजिक घटनेचा अर्थ विचारात घेताना सैद्धांतिक पातळीवर तो कसा घेतला जातो याचे स्पष्टीकरण सिद्धांताच्या वैशिष्ट्यांमधून समजून येते.

**अ) अनुभवाच्या पातळीवर सिद्ध ठरलेल्या तथ्यांवर होणारी सैद्धांतिक मांडणी**

सामाजिक शास्त्राचे किंवा बहुतांशी समाजशास्त्राचे अभ्यासक स्वतःला विज्ञानाचा अभ्यास करणारे मानत असल्याने सिद्धांताची उभारणी मुख्यता तथ्यांवर (facts) होत असते व अशा तथ्यांना अनुभवाची जोड देऊन तथ्यांची मांडणी सिद्धांतामध्ये केली जात असते. समाजशास्त्र ज्यावेळी एक विज्ञान म्हणून या घटनांचा अभ्यास करत असते त्यावेळी सिद्धांत मांडणीच्या कार्यात योग्य ते निरीक्षण आणि तथ्ये याचा आधार घेवून कार्य करते. त्याला 'संशोधन' असे म्हणतात. वैज्ञानिक संशोधन हे संशोधकाला, सर्वसामान्य विचार, श्रद्धा आणि परंपरा यापासून दूर होवून जाण्याचा प्रयत्न करत असते, तसेच एखाद्या घटनेच्या अभ्यासामागे असलेल्या कार्य-कारण भाव शोधण्याचा प्रयत्न केलेला असतो. तसेच, विशिष्ट प्रकारच्या घटना का घडून येतात या संबंधी विश्लेषण करण्याचा प्रयत्न होत असतो आणि ज्यावेळी केलेल्या विश्लेषणाची अंमलबजावणी सर्वसामान्य स्तरापर्यंत खरी ठरते, त्यावेळी त्याला सैद्धांतिक माहितीचे स्वरूप प्राप्त होते.

**ब) सैद्धांतिक मांडणीला तथ्यांचा आधार असतो**

सामाजिकशास्त्र किंवा समाजशास्त्र ज्यावेळी, विशिष्ट सामाजिक घटनांचे विश्लेषण देण्याचा प्रयत्न करते. त्यावेळी ज्या माहितीचा किंवा तथ्यांचा आधार घेवून जी विधाने अथवा सिद्धांत मांडले जातात, त्यावेळी ते शास्त्र त्याची जबाबदारी स्वीकारते. कारण ज्या स्वरूपाचे विश्लेषण किंवा विधान सामाजिकशास्त्रांच्यामधून होत असते. त्यावेळी त्याला तथ्यांचा आधार असतो.

**क) सामाजिक सिद्धांतातील माहितीचे सामान्यीकरण होत असते**

सामाजिकशास्त्रातील किंवा समाजशास्त्रातील संशोधनाद्वारे एखाद्या सामाजिक प्रश्नांवर ज्या स्वरूपाची तथ्ये किंवा माहितीचे संकलन करून माहितीची सत्य-असत्यता पडताळून जेव्हा एखादा सिद्धांत किंवा नियम (Theory) मांडला जातो, त्यावेळी त्याची प्रचिती समाजामध्ये काही प्रमाणात आढळून आल्याने तो एक सर्व साधारण नियम म्हणून मान्य होत असतो. उदा. शासनाचे चूकीचे शेतीविषयक धोरण हे शेती समस्येचे एक कारण असू शकते असे विश्लेषण ज्यावेळी केले जाते, त्यावेळी चुकीच्या आर्थिक अथवा राजकीय धोरणांचा परिणाम शेतीवर होतो असा नियम मान्य केला जातो.

**सिद्धांत म्हणजे काय?**

'विल्यम' आणि 'मॅकशेन' या अभ्यासकांनी म्हटल्याप्रमाणे, 'केवळ अभ्यासक अथवा संशोधकच सिद्धांत मांडतो असे नाही, तर सर्व सामान्य व्यक्तीसुद्धा त्यांच्या नेहमीच्या वैचारिक मांडणीतून सिद्धांत मांडत असतात. उदा. ज्यावेळी आकाशात जास्त काळे ढग मोठ्या प्रमाणात जमा होतात त्यावेळी आपण एक साधा सिद्धांत मांडतो तो म्हणजे पाऊस पडणार. परंतु पाऊस पडण्यासंबंधीच्या भूगोलातील सिद्धांतामध्ये पाण्याची वाफ, तिची बाष्पीकरण क्रिया होऊन पडणारा पाऊस हा झाला वैज्ञानिक सिद्धांत. त्यामुळे सिद्धांताबद्दलचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

**व्याख्या :**

A theory is a statement that proposes to explain or relate observed phenomena or set of concepts. Theory involves a set of interrelated arguments that seek to describe and explain cause effect relationships. A 'good theory' is one that can be supported by empirical research'.

'सिद्धांत म्हणजे, अशा स्वरूपाचे विधान की, ज्या विधानाच्या साह्याने, आपण ज्या सामाजिक घटनांचे निरीक्षण केलेले असते, किंवा त्या संबंधी असणाऱ्या ज्या वेगवेगळ्या संकल्पनांचा संच असतो, त्या संबंधी केलेले विश्लेषण होय.' तसेच, 'सिद्धांतांमध्ये, एखाद्या अभ्यासाबद्दलची परस्परसंबंधित विधानांची मांडणी करून त्याद्वारे अभ्यास विषयीच्या कार्य-कारण संबंधाचे विश्लेषण केलेले असते.' 'एक चांगला सिद्धांत म्हणजे, ज्या सिद्धांताची चाचणी किंवा पडताळा घेता येतो किंवा त्या सिद्धांताला अनुभवजन्य संशोधनाचा आधार असतो.'

'जोनाथन टर्नर' (२००३) या अभ्यासकाने, Ideas किंवा Theory संबंधात मांडणी करताना, 'Turner stated that, theory is constructed with basic elements of concepts, variables, and statements/formats. टर्नरच्या मतानुसार, ज्यावेळी एखादा सिद्धांत किंवा सामाजिक घटनेबद्दलची विचारसरणी मांडली जाते, त्यावेळी संकल्पना, चल, आणि सैद्धांतिक विधान असे मुख्य तीन घटक

असतात. उदा. ज्यावेळी आपण बाल गुन्हेगारी आणि कौटुंबिक मूल्यांची घसरण या विषयी सिद्धांत मांडतो त्यावेळी सर्व प्रथम 'बालगुन्हेगारी' आणि 'कौटुंबिक मूल्ये' या दोन संकल्पनांचे सर्वप्रथम स्पष्टीकरण दिले पाहिजे. त्यानंतर कौटुंबिक मूल्यांचे स्वरूप आणि प्रमाण, गुन्हेगारी यासंबंधीचे स्वरूप रचना आणि शेवटी या दोन संकल्पनांच्या मधील परस्पर संबंधाच्या अभ्यासातून मांडलेले सैद्धांतिक विधान किंवा सिद्धांत असतो.

**समाजशास्त्राच्या उदया आगोदरचे सामाजिक विचार**

आपल्या सभोवतालच्या विश्वासंबंधी, व्यक्तींनी केव्हा विचार करण्यास सुरुवात केली असावी आणि त्याबद्दलचे समाजशास्त्रीय सिद्धांत सर्वप्रथम केव्हा मांडले गेले यासंबंधी कांही निश्चित कालखंड सांगता येत नसला तरी, प्राचीन ग्रीक संस्कृतीमध्ये, तात्त्वीक पातळीवर विचारवंत समाजासंबंधी जी मांडणी करत होते त्याला वैज्ञानिक पद्धतीचा आधार नसल्याने ते समाजशास्त्रीय सिद्धांत समजले गेले नाहीत.

'गार्नर' या विचारवंताच्या मते, १५१३ मध्ये 'निकोलो मॅकव्हेली' यांनी प्रकाशित केलेल्या 'The Prince' नावाच्या वादग्रस्त ग्रंथामध्ये, मॅकव्हेली यांनी मानवी वर्तनासंबंधी निरीक्षण करून त्या कालखंडातील, राजे, गुलाम आणि गुलामांचा व्यापार करणारे मालक यांच्या बद्दलचा विचार मांडताना, राजाचे हक्क आणि सत्ता केवळ राज्यव्यवस्थेने तयार केलेल्या नियमावर टिकून रहात नाही, तर त्यासाठी राजाने त्यांच्याकडे असणाऱ्या अधिकाराच्या जोरावर आपल्या कृती आणि वर्तनातून ती टिकणारी पाहिजे. असा वादग्रस्त विचार मांडला; त्यामुळे गार्नर यांच्या मते, समाजशास्त्रीय सिद्धांताची सुरुवात इथून झाली असे म्हणता येईल.

**अ) थॉमस हॉबज् (१५८८-१६७९)**

हॉबज्चा जन्म ५ एप्रिल, १५८८ मध्ये इंग्लंडमधल्या 'विल्थशेयर' या ठिकाणी झाला. तो एक सामाजिक-राजकीय विचारवंत होता. शिवाय तो एक उदारमतवादी विचारसरणीचा होता. त्याच्या सामाजिक विचारामध्ये, प्रामुख्याने तो असा विचार मांडतो की, 'समाजव्यवस्था त्याची एकूण जडण-घडण करण्यामध्ये व्यक्तीची भूमिका महत्त्वाची असते. कारण समाज व्यवस्था बदलण्याचे सामर्थ्य व्यक्तींच्या मध्ये असते.

त्याच्या राजकीय विचारामध्ये, तो असा म्हणतो की, समाजातील व्यक्तींचे जीवन आणि व्यक्ती-व्यक्तींच्या मधील मानवी संबंधाची कल्पना त्या समाजात असलेल्या 'शासनसंस्थे'शिवाय आपण करू शकत नाही. थोडक्यात शासनसंस्थेशिवाय मानवी जीवन अशक्यप्राय आहे. १६५१ मध्ये त्यांनी प्रकाशित केलेला, 'Leviathan' नावांचा ग्रंथ समाजात शासनसंस्थेचे असणारे महत्त्व सांगतो. जर समाजामध्ये शासनसंस्था नसत्या तर, त्या समाजात हिंसा, हत्या, गुन्हेगारीमुळे मानवी जीवन अधिक हालाखीचे आणि अल्पकालीन ठरू शकते. 'Leviathan' या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'अवाढव्य अथवा मोठा' असा होता. त्यांच्या मते, समाजातील शासनसंस्थेचे स्वरूप हे समाजापेक्षा 'मोठे' आणि 'अवाढव्य' असते. अशाप्रकारे हॉब्ज् यांनी त्यांच्या एकूण सैद्धांतिक मांडणीमध्ये, व्यक्ती (Individual) या घटकाचे महत्त्व स्पष्ट करताना त्या समाजातील शासनसंस्थेमधील 'व्यक्ती' हा प्रमुख केंद्रस्थानी असतो हे सांगताना, शासन संस्थेने समाजातील व्यक्तींना केवळ 'पवित्र' आणि नागरिकत्वाच्या अर्थाने न पहाता त्यांचा योग्य तो उपयोग करून घेतला पाहिजे असा महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय विचार मांडला होता.

### ब) जॉन लुके (१६३२–१७०४)

जॉन लुके यांचा जन्म २९ ऑगस्ट १६३२ मध्ये, 'सोमरसेट' या ठिकाणी झाला. थॉमस हॉबज् यांनी शासन आणि समाज यांच्यामध्ये व्यक्तीला केंद्रस्थानी समजले होते, परंतु जॉन लुके यांच्या मते, व्यक्तीला मिळणारे स्वातंत्र्य किंवा अधिकार समाज आणि शासन व्यवस्थेमुळे प्राप्त होत नसून, नैसर्गिकरित्या इश्वरशक्तीमुळे मनुष्याला काही अधिकार निसर्गताच प्राप्त झालेले असतात. अशा प्रकारे हॉबज् किंवा लुके यांच्या विचारातील समानता म्हणजे, दोन्ही विचारवंत समाजातील व्यक्तीच्या स्वातंत्र्य, स्वायत्ता आणि अधिकार या बद्दल आपले मत मांडतात. 'आधुनिक राजकीय लोकशाही'मध्ये व्यक्ती स्वातंत्र्याबद्दलचे विचार आढळून येतात.

लुकेच्या मते, 'व्यक्ती जन्माला आल्यानंतर तिचा इथल्या नैसर्गिक साधन संपत्तीवर जन्मजात अधिकार प्राप्त होतो. त्यामुळे लुके यांनी, व्यक्तीने किती खाजगी संपत्ती प्राप्त करावी या विषयी उदारमतवादी विचार मांडले. लुके आणि हॉबज् यांनी समाजातील व्यक्तींच्या खाजगी मालमत्तेच्या मिळकती संबंधी विचार करताना समाजातील संपत्तीचे असमान वितरण होऊ नये यासाठी खाजगी मालमत्तेच्या मिळकतीवर मर्यादा घालतात. लुके यांनी, त्यांच्या १६९० मध्ये लिहिलेल्या 'Two Treaties of Government' ग्रंथामध्ये उदारमतवादी राजकीय विचार मांडताना व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या अधिकाराच्या बाजूने बोलताना, जे मत मांडले त्यामधून इंग्लंडमध्ये, लिबरल पार्टीचा उदय झाला. लुके यांनी शासन संस्थेला दुय्यम स्थान देत असताना व्यक्ती शासन संस्थेला जशी निर्माण करू शकते, तशी सत्तेवरून दूर करू शकते. लुके यांनी राज्यातील नागरिकांच्या हितसंबंधाचा विचार करताना मानव अधिकार, संपत्ती, आरोग्य, स्वातंत्र्य, जंगम मालमत्ता, स्थावर मालमत्ता इ. अधिकार आणि हक्क मिळवण्यासाठी न्यायसंस्थेने निपक्षपाती स्वरूपाचे कायदे करणे गरजेचे आहे. लुके यांनी मांडलेल्या सिद्धांताना सांख्यीक माहितीचा आधार नसल्याने त्यांना सामाजिक शास्त्रामध्ये वस्तुनिष्ठ सिद्धांत म्हणून मान्यता मिळत नाही. परंतु अनेक अभ्यासक लुके यांचे विचार वस्तुनिष्ठ स्वरूपाचे होते असे म्हणतात.

### क) जेन–जॅक्यूज रुसो (१७१२–१७७८)

रुसो यांचा जन्म, स्वीर्त्झलंड देशातील जिनिव्हा या ठिकाणी २९ जून, १७१२ मध्ये झाला. १८ व्या शतकामध्ये, निधर्मी आणि सनातनी विचारांना बगल देऊन रुसो यांनी जी विचारसरणी मांडली त्याचा परिणाम म्हणून फ्रेंच मधल्या राज्यक्रांतीला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यासारख्या प्रजासत्ताकवादी विचारांना चालना मिळाली. १७६२ मध्ये रुसो यांनी 'Social Contact' नांवाचा ग्रंथ लिहिला. समाज आणि व्यक्ती यांच्या मधल्या परस्पर संबंधाचे स्पष्टीकरण करताना, म्हटले आहे की, व्यक्तीच्या प्रगतीसाठी समाज जबाबदार असतो आणि व्यक्तीशिवाय समाज आपली प्रगती व उद्दिष्टे साध्य करू शकत नाही. समाज हा व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या नैतिक गुणांचा विकास करणारे साधन आहे. रुसो यांच्या मते, निसर्गतः सर्व मानवजात समान असून, व्यक्तींच्या समाधानासाठी शासनाने समान संधी निर्माण केल्या पाहिजेत. समाज म्हणून, असणारी वैशिष्ट्ये त्यानी मांडत असताना – १) समाजाची वाढ किंवा विस्तार असा असावा की, ज्यावर नियंत्रण किंवा शासन करता येईल. २) प्रत्येक व्यवसायामध्ये, सर्व व्यक्ती समान असाव्यात आणि इतरांनी दुसऱ्यांच्या कार्यात अडथळा आणू नये, ३) समाज आणि व्यक्ती यांची समान ध्येये असावीत. ४) कायद्यापेक्षा व्यक्ती श्रेष्ठ असू शकत नाही. तसेच शासनाच्या कारभारामध्ये वर्चस्व निर्माण करणारी कोणी व्यक्ती असेल तर शासनाने तिचा शोध घ्यावा. ५) ज्यावेळी समाजामध्ये नवीन लोकसंख्येची भर पडल्याने समाज रचना बदलत असते. अशावेळी नव्याने आलेल्या सभासदाना असमान अधिकार दिले जाऊ शकतात.

६) समाज हे इतर समाजाच्या आक्रमणापासून स्वतंत्र राहू शकतात. पण इतर समाजावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करू नये. ७) ज्यावेळी समाजाचा विस्तार वाढतो. त्यावेळी सनदी नोकर नियंत्रण करून, समाज चालवतात परंतु त्यांचे अधिकार मर्यादित असतात.

अशाप्रकारे रुसोला लोकशाहीवर आधारीत समाजरचना अभिप्रेत होती. परंतु व्यक्ती आपल्या स्वःहित संबंधाची जोपासना करीत असतात याची रुसोला कल्पना होती. व्यक्ती या आपले जीवन आणि स्वतःचे हितसंबंध जोपासताना तिच्या हिताआड कोणी आल्यास त्याविरुद्ध आक्रमक होत असते. सुरुवातीच्या कालखंडात ज्यावेळी मानव निसर्गाशी एकरूप होता त्या वेळी कोणत्याही सामाजिक संस्था नव्हत्या. तो एकांतवासामध्ये होता. परंतु जशी त्याला स्वअस्तित्वाची जाणीव झाली. तेव्हापासून तो सावध झाला. त्यामुळे प्राण्यांच्या तुलनेत मानवाने मिळवलेल्या ज्ञानाच्या जोरावर तो निसर्गापासून वेगळा झाला. त्यामुळे तो समाजामध्ये हळूवार प्रगती करू लागला. त्यामुळे शासनाने व्यक्तीच्या बाह्यशक्ती आणि अंतर्गत दुही पासून संरक्षण केले पाहिजे.

**उद्‌बोधनाचा कालखंड** (Age of Enlightenment)

अमेरिका आणि इंग्लंडमधल्या विचारवंतानी १८ व्या शतकात फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वी जे विचार मांडले त्या कालखंडाला उद्‌बोधनाचा कालखंड समजला जातो. या कालखंडातील विचारवंत आपण अनेक वर्षाच्या पारंपारिक विचारापासून मुक्त झालो आहोत आणि कार्य-कारण भाव, विज्ञानासारख्या विचारांने प्रेरित झालो आहोत असे मानतात. उद्‌बोधनाचा कालखंड म्हणजे ''तात्त्विक विचारापासून वैचारिक बदलाचा कालखंड होय.'' या कालखंडामध्ये अनेक पारंपारिक विचारांची जागा नवीन विचारांनी घेतली. चार्लस मॉंस्टेक्यू, गॅललिओ, न्यूटन यासारख्या विचारवंतांच्या विचारांचा उल्लेख या कालखंडामध्ये होतो.

अशा प्रकारे सामाजिक सिद्धांताचा अर्थ आणि त्या आगोदरच्या एकूण सामाजिक विचारांचा आढावा घेतल्यानंतर, नंतरच्या भागामध्ये युरोपमधील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सामाजिक जीवन समाजशास्त्रीय सिद्धांताच्या निर्मितीला कसे कारणीभूत ठरले याचा आढावा घेणार आहोत.

**१.२.१.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

* **रिकाम्या जागा भरा.**

    १) अबदल रेहमान खालदुन समाजशास्त्रज्ञ .................. देशातील होता.

    २) सैद्धांतिक मांडणीला ............ आधार असतो.

    ३) थॉमस हॉबज् ............. संस्थेचे वर्चस्व मान्य करतो.

    ४) जॉन लुके यांनी शासन आणि समाज यांच्या केंद्रस्थानी ............ स्थान दिले.

    ५) Social Contact ग्रंथ ............. यांनी लिहिला.

## १.२.२ समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास होण्यामागे असलेली सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती

जगामध्ये सर्वप्रकारच्या वैचारिक मांडणीचा इतिहास विचारात घेतला तर तो त्या काळातील असणाऱ्या सामाजिक परिस्थितीवरून तयार झालेला आढळतो. समाजशास्त्रासारख्या अभ्यास विषयाबाबत तर वरील

विधान एकदम खरे ठरते इतकेच नव्हे तर समाजशास्त्रीय अभ्यासाअंतर्गत त्यावेळच्या असणाऱ्या सामाजिक परिस्थितीला केंद्रस्थानी मानले होते. या दुसऱ्या उपघटकामध्ये आपण समाजशास्त्रीय सिद्धांताच्या निर्मितीला जबाबदार असणाऱ्या १९ व्या आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला असणाऱ्या कांही प्रमुख सामाजिक घटनांचा आढावा घेणार आहोत.

**१) राजकीय क्रांती** (Political Revolutions)

'The Age of Reason' म्हणजे आधुनिक वैज्ञानिक विचारांच्यामुळे, पारंपारिक समाजव्यवस्थेबद्दल लोक प्रश्न निर्माण करू लागले. धर्मनिरपेक्ष विचारसरणीचा परिणाम म्हणून समाजात पूर्वापार चालत आलेल्या श्रद्धा, रुढी आणि परंपरांना लोक आव्हान देऊ लागले. धर्माशी निगडीत असणाऱ्या विविध पवित्र पारंपारिक कल्पना आणि विधींची जागा विज्ञान घेवू लागले. व्यक्तीला निसर्गदत्त अधिकार असतात या विचारामधून समाजामध्ये कायदा आणि न्यायप्रणाली बद्दलची चर्चा पुढे येवू लागली. त्यामुळे राजेशाही सारख्या असणाऱ्या समाज-व्यवस्थेमध्ये केवळ राज्यालाच न्यायदानाचा पवित्र हक्क असतो हा विचार मागे पडू लागला. उद्बोधन कालखंडानंतर विशेषकरून पाश्चात्य समाजातील सामाजिक शास्त्रज्ञ आणि राजकीय क्रांतीकारक वैज्ञानिक विचारांना प्राधान्य देऊ लागले.

युरोप खंडाच्या बाबतीत तर असे दिसून येते की, जे विचार उद्बोधन कालखंडामध्ये मांडले गेले, त्यांची प्रत्यक्ष प्रचिती अमेरिकन समाजामध्ये झालेल्या स्वातंत्र्याच्या क्रांतीमधून केली गेली. त्यावेळी पहिल्यांदाच केवळ वैचारिक चर्चा न मांडता, व्यक्तींना त्यांचे हक्क देण्यात आले. अमेरिकन क्रांतीनंतर युरोपमधल्या राजवटीवर टीका होऊ लागल्या. स्वातंत्र्याची घोषणा अमेरिकन क्रांतीनंतर करताना थॉमस जेफरसन यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये उद्बोधन कालखंडामध्ये जे अपेक्षित केले होते, त्यानुसार सर्व विज्ञानवादी व्यक्ती, अनुभवजन्य आणि वस्तुनिष्ठतेचा स्वीकार करताना, सर्व मानवजात एक असून, त्यांना सुखी जीवन आणि स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. नागरिकांचे हक्क आणि लोकशाही व्यवस्थेची वाहवा करताना जेफरसन यांनी एकाधिकारशाहीवर टीका केली.

ब्रिटीश राजेशाहीवर अमेरिकन राज्यक्रांतीचा प्रत्यक्ष परिणाम दिसून येवू लागला. ब्रिटीश राजेशाहीला असे वाटू लागले की, खुल्या स्वरूपात विचार करणाऱ्या जनतेचा आवाज जास्त काळ दाबू शकत नाही, अन्यथा नागरिक राजेशाही विरुद्ध सशस्त्र उठाव करतील. फ्रान्समध्ये सुद्धा अमेरिकन राज्यक्रांतीचे पडसाद उमटू लागले होते. त्यामुळे फ्रेंच नागरिक फार काळ हुकुमशाही प्रवृत्तीच्या राज्यकारभाराखाली रहाणार नव्हते. लोकशाही विचारसरणीचा एवढा मोठा परिणाम फ्रेंच समाजावर झाला की, १७८९ मध्ये 'फ्रान्स'मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली.

त्यानंतर असे म्हटले जाऊ लागले की, फ्रेंच राज्यक्रांतीनंतर खऱ्या अर्थाने उद्बोधन कालखंड समाप्त झाला. या अगोदरच्या मांडणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे समाजातील कांही सामाजिक आणि राजकीय आंदोलकांच्या विचारांचा परिणाम म्हणूनच अशा स्वरूपाच्या क्रांत्या घडून आल्या हे सिद्ध झाले. फ्रेंच नागरिकांना फ्रेंच राज्यक्रांतीमुळे एका नवीन फ्रान्स समाजाची रचना तयार करण्याची संधी मिळाली की, ज्यामध्ये न्याय आणि वैज्ञानिक विचारांना महत्त्व दिले जाऊ लागले होते. फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम क्रांतीकारी स्वरूपाचे होते. ज्यामध्ये अनेक महत्त्वपूर्ण व्यक्ती ज्यांचा एकूण फ्रेंच समाजावर प्रभाव होता. त्या कायमस्वरूपी नष्ट झाल्या किंवा त्यांचा वध झाला. फ्रान्समध्ये १७८९ ते १७९५ या कालखंडात अनेक नविन कायदेप्रणाली अमलात आणली की, ज्यामुळे सामाजिक परिवर्तन घडून आले. फ्रेंचमधील चर्च किंवा धर्म संस्थांचा शासन व्यवस्थेमधला हस्तक्षेप कमी झाल्याने त्यांना दुय्यम स्थान मिळाले. समाजातील प्रत्येक

वर्ग कायद्यासमोर समान मानला जाऊ लागला व कुटुंबातील प्रत्येक सदस्याला कौटुंबिक मालमत्तेचा समान हक्क दिला जाऊ लागला. त्यामुळे अमेरिकन राज्यक्रांतीपेक्षा फ्रेंच राज्यक्रांतीचा परिणाम अधिक प्रभावशाली होता. फ्रेंच राज्यक्रांती नंतरच्या कालखंडात ज्यावेळी फ्रेंच समाज स्थिर-स्थावर झाला, त्यावेळी धर्मनिरपेक्ष विचारातून सार्वभौमत्व आणि समानता यासारखी मूल्ये स्वीकारण्याच्या विचारातून विचार मंथन होऊ लागले. फ्रेंच राज्यक्रांतीचा फ्रेंच समाजावर झालेला परिणाम सकारात्मक होता की, नकारात्मक होता यातून अभ्यासकांच्या मध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले. ज्यावेळी फ्रेंच राज्यक्रांतीचे इतर समाजावर सकारात्मक परिणाम झाले असे म्हटले जात होते त्यावेळी फ्रेंचक्रांती आणि युद्धामुळे फ्रान्स समाजव्यवस्था विस्कळीत झाली आहे आणि त्या समाज व्यवस्थेचा विचार करण्यासाठी म्हणून ऑगस्ट कॉम्ट आणि एमिल डुरखायिम हे प्रमुख समाजशास्त्रज्ञ पुढे आले.

**२) औद्योगिक क्रांती आणि भांडवलशाहीचा उदय**

१९ व्या शतकामध्ये आणि २० व्या शतकाच्या आरंभी पाश्चात्य समाजव्यवस्थांच्यामध्ये घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीचा सुद्धा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवू लागला होता. त्यामुळे राज्यक्रांती इतकाच हाही घटक समाजशास्त्रीय सिद्धांताला चालना देणारा महत्त्वाचा घटक ठरतो. औद्योगिक क्रांती म्हणून ज्यावेळी आपण त्याकडे बघतो, त्या वेळी त्यामध्ये अनेक प्रकारच्या सामाजिक बदलांचा समावेश होतो. परंतु प्रामुख्याने पाश्चात्य समाज मोठ्या प्रमाणात शेती व्यवसायाकडून औद्योगिकरणाकडे वाटचाल करू लागला होता. युरोपियन ग्रामीण लोकसंख्या मोठ्या प्रमाणात शेजारील शहरांकडे रोजगारीच्या संधीमुळे स्थलांतरीत होऊ लागली होती. शहरातील उद्योगांच्या मध्ये कमालीचे तांत्रिक बदल घडून येत होते. उद्योगांच्यामुळे शहरांच्या मध्ये जी आर्थिक भांडवलशाही रचना उदयास येत होती त्यामुळे नोकरशाहीचा उदय होऊन अनेकांना रोजगार संधी मिळत होत्या. या खुल्या अर्थव्यवस्थेमुळे खुली बाजारपेठ निर्माण होऊन त्या ठिकाणी उद्योगांच्यामध्ये तयार झालेल्या वस्तूंची देवाण-घेवाण वाढत होती. या प्रकारच्या अर्थव्यवस्थेमध्ये काही थोड्या लोकांना अधिक आर्थिक फायदा होत होता. तर बहुतांशी कामगारांना जास्तवेळ आणि अल्प मजुरीवर काम करावे लागत होते. त्यामुळे या आर्थिक व्यवस्थेशी आणि त्यातून निर्माण झालेल्या भांडवलशाही प्रवृत्ती विरोधात परिवर्तनवादी चळवळी निर्माण होऊ लागल्या व त्या भांडवलशाही व्यवस्थेला विरोध करून त्याना संपवण्याचा प्रयत्न करू लागल्या.

औद्योगिक क्रांती, भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि त्यांना विरोध करणाऱ्या परिवर्तनवादी चळवळीमुळे युरोपमध्ये सामाजिक चढ-उतार निर्माण होऊ लागले. त्याचा समाजशास्त्रज्ञांच्यावर मोठा परिणाम झाला. त्यावेळच्या परिस्थितीमध्ये ज्या चार प्रमुख समाजशास्त्रज्ञांची नावे पुढे आली त्यामध्ये, कार्लमार्क्स, मॅक्सवेबर, एमिल डरखायिम आणि जॉर्ज सिमेल यांचा समावेश होतो. त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये समाजात निर्माण झालेल्या समस्यांवर अभ्यास करून त्या संबंधीच्या उपाय योजना देखील सुचविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

**३) समाजवादाचा उदय** (Rise of Socialism)

ज्यावेळी भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि औद्योगिकरण यामुळे जे सामाजिक बदल घडून येत होते, त्याचवेळी 'समाजवादी' (Socialism) विचारांचा प्रभावदेखील वाढत होता. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते, औद्योगिक समस्यांवर 'समाजवाद' एक चांगला उपाय ठरू शकतो. परंतु कांही अभ्यासकांनी व्यक्तीगत आणि वैचारिक पातळीवर उघडपणे विरोध दर्शविला होता. 'कार्ल मार्क्स' हा विचारवंत मात्र भांडवलशाहीला हटवून त्या जागी समाजवादी विचार प्रणाली असावी या विचाराचा असल्याने, त्याने समाजवादी विचारांचे

समर्थन केलेले आढळते. कार्ल मार्क्स यांनी जरी समाजवादाचे समर्थन केले असले तरी, 'समाजवादी' विचाराबद्दलचा त्यांनी कोणता सिद्धांत मांडला नाही मात्र वारंवार भांडवलशाहीवर टीका केली. तसेच समाजवादी समाज रचनांची निर्मिती व्हावी या उद्देशाने त्यानी अनेक राजकीय कृती कार्यक्रमांच्या मध्ये सहभाग घेतला.

समाजशास्त्रीय सिद्धांताच्या मांडणीमध्ये कार्ल मार्क्सचे विचार नाविन्यपूर्ण स्वरूपाचे होते. मॅक्सवेबर, एमिल डुरखायिम सारख्या अभ्यासकांनी कार्ल मार्क्सच्या विचारांना विरोध केलेला होता, तरीपण त्यांच्या मते, भांडवलशाहीमुळे जरी कांही समस्या उद्‌भवल्या असल्या तरी, समाजातील सुधारणा क्रांतीच्याच माध्यमातून होऊ शकतील. या कार्ल मार्क्सच्या विचारांना त्यांचा विरोध होता. त्यामुळे भांडवलशाहीहून अधिक समाजवादी विचारसरणीबद्दल अभ्यासकांच्या मनामध्ये भितीचे वातावरण तयार झाल्याने कार्ल मार्क्स आणि त्याच्या समाजवादी विचारांना विरोध करणाऱ्या अभ्यासकांच्या मांडणीतून समाजशास्त्रीय सिद्धांत मांडले गेले.

### ४) **महिलावाद** (Feminism)

एका अर्थाने 'महिलावाद' हा एक वैचारिक दृष्टीकोन आहे. यामध्ये ज्या ठिकाणी समाजात महिलांना दुय्यम स्वरूपाचा दर्जा सर्वच ठिकाणी, सर्व परिस्थितीत देण्यात आल्यामुळे, त्या परिस्थिती विरोधात जी एक चळवळ आणि उठावाची प्रक्रिया सुरू झाली त्या विषयी 'महिलावाद' विचार मांडतो. साधारणपणे १८५० मध्ये अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रामध्ये गुलामगिरी, राजकीय हक्क, महिला शोषण, नागरिकांच्या सुधारणा इ. संदर्भात विरोध केला जात होता तेव्हापासून महिलांच्या बद्दलची माहिती मिळते. 'महिलावाद' यासंबंधीचे लिखाण करण्यामध्ये अनेक अमेरिकन महिला अभ्यासकांनी सैद्धांतिक मांडणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु पुरूषप्रधान समाजशास्त्रज्ञांच्या वर्चस्वामुळे 'महिलावादी' समाजशास्त्रीय विचार प्रकर्षाने पुढे येवू शकले नाहीत. समाजशास्त्रीय विचारांच्या मांडणीमध्ये महिलांच्यापेक्षा पुरूष समाजशास्त्रज्ञांच्या विचारांचा प्रभाव असल्याने त्यांनी महिलावादी विचारांना गंभीरपणे विचारात घेतले नाही. अशाप्रकारे, समाजशास्त्रज्ञांच्या मधील 'स्त्री-पुरूष' लिंगभेदभावाचा परिणाम म्हणून 'महिलावाद' सिद्धांत पुढे आले.

### ५) **नागरीकरण** (Urbanization)

१९ व्या आणि २० व्या शतकामध्ये ग्रामीण भागातील बहुतांशी लोकसंख्या औद्योगीकरणामुळे शहरांच्याकडे स्थलांतरीत होऊ लागली होती, कारण औद्योगीकरणामुळे शहरांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगारसंधी निर्माण होऊ लागल्या होत्या. परंतु स्थलांतरीत होणाऱ्या लोकसंख्येपुढे शहरातील वाढती लोकसंख्या विविध प्रकारचे प्रदूषण, वहातूक व दळणवळण अशा अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या होत्या. अशा प्रकारे नागरी समाजजीवन आणि त्यातून निर्माण झालेल्या शहरी समस्यांबद्दल समाजशास्त्रज्ञांना अभ्यासाबद्दलची आवड निर्माण झाली. प्रामुख्याने, अमेरिकन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर, जॉर्ज सिमेल यासारखे विचारवंत त्या प्रकारच्या अभ्यास मांडणीमध्ये पुढे आले. अमेरिकन समाजशास्त्रामध्ये शिकागो विचारसरणी (Chicago School) म्हणून, अमेरिकेतील 'शिकागो' शहराला नागरी समाजशास्त्राची प्रयोगशाळा समजून नागरीकरण आणि शहरी समस्यांबद्दल विचार मांडत होते.

### ६) **धार्मिक परिवर्तन** (Religious Change)

राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती आणि नागरीकरण यांच्यामुळे जो एक सामाजिक बदल घडून येत होता त्यामध्ये समाजातील 'धार्मिक' घटकांवर देखील त्याचा परिणाम दिसून येत होता. सुरुवातीला ज्या

समाजशास्त्रज्ञांनी 'समाजशास्त्र' विषयाबद्दल मांडणी करण्यास सुरुवात केली त्यावेळी त्यांनी देखील धर्मसंस्थेबद्दल विचार मांडले होते. कारण त्यातील कांही अभ्यासक धार्मिक विचारांचे होते. त्यामुळे त्यांनी त्यांच्या मतात धर्माबद्दल जी उद्दिष्टे होती ती मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासात बदल करून, लोकांचे रहानीमान उंचावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे इतर अभ्यासकांना समाजशास्त्रज्ञांच्या धार्मिक वैचारिक मांडणी आवडल्या नाहीत. एमिल डरखायिम, टालकॉट पारसन यासारख्या समाजशास्त्रज्ञांच्या अभ्यासात 'नैतिकता' (Morality) हा अभ्यासाचा एक घटक होता. मॅक्स वेबरच्या धार्मिक सिद्धांतामध्ये, जगातील प्रमुख धर्मांचा विचार मांडला होता. कार्ल मार्क्स यांनी देखील धर्माचा टीकात्मक अभ्यास केला होता.

**७) विज्ञान किंवा शास्त्रांची प्रगती** (Growth of Science)

ज्यावेळी समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास जोर धरू लागला होता. त्याच दरम्यान शाळा, महाविद्यालयाखेरीज, समाजामध्ये सुद्धा विज्ञानाचे महत्त्व वाढत होते. विज्ञानाच्या प्रगतीचा परिणाम म्हणून तांत्रिक प्रगती झाल्याने व्यवहारात ज्या 'तांत्रिक वस्तू' येत होत्या त्याचे एक आकर्षण समाजमनावर होत होते. त्यामुळे, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि रसायनशास्त्रासारखी शास्त्रे त्यामध्ये अधिक नावारूपाला येत होती. ऑगस्ट कॉम्ट, डुरखायिम, स्पेन्सर, जॉर्ज हर्बर्ट मीड आणि आल्फ्रेड शूज हे जरी व्यवसायाने समाजशास्त्राचे अभ्यासक असले तरी, सुरुवातीला ते विज्ञानशाखेशी संबंधित होते आणि त्यामुळे समाजशास्त्राचा देखील वैज्ञानिक पद्धतीचा समाजशास्त्रीय अभ्यासासाठीच्या वापराबद्दल इतर अभ्यासकांनी आक्षेप घेतल्याने वादाला तोंड फुटले. कांहीच्या मते, मानवी सामाजिक जीवन सर्वार्थाने वेगळे असून 'वैज्ञानिक'दृष्टीने सर्वच मानवी घटकांचा अभ्यास करणे योग्य नाही, असे मत मांडले जाऊ लागले. अशाप्रकारे समाजशास्त्र आणि विज्ञान यांच्या मधल्या परस्पर संबंधाचा परिणाम म्हणून त्या वेळच्या नियतकालिकामध्ये या विषयावर मांडणी होत होती. अशाप्रकारे सामाजिक आणि आर्थिक घटकांचा परिणाम, समाजशास्त्रीय सिद्धांताच्या मांडणीवर झाला होता.

### १.२.२.२ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

*** रिकाम्या जागा भरा.**

१) उद्बोधन कालखंडातील विचारांची प्रचिती ............... क्रांतीमध्ये आढळून आली.

२) ............. विचारांचा परिणाम म्हणून १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली.

३) कार्ल मार्क्सचे विचार युरोपमधल्या ................ चळवळीशी संबंधित होते.

४) .............. वादामध्ये महिलांच्या 'दुय्यम स्थाना'संबंधी विचार मांडले गेले.

५) अमेरिकेतील ............ शहर नागरी समाजशास्त्राच्या अभ्यासाची प्रयोगशाळा होती.

## १.२.३ समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय होण्यामागे असणारी वैचारिक आणि तात्त्विक परिस्थिती

समाजशास्त्रीय सिद्धांताचा उदय होण्यामागे असणारी वैचारिक आणि तात्त्विक परिस्थिती जाणून घेताना, युरोपमधील ज्या प्रमुख देशांच्यामध्ये सामाजिकशास्त्रांच्या सैद्धांतिक मांडणीला ज्या प्रकारची वैचारिक आणि तात्त्विक विचारांची बैठक होती ती भिन्न-भिन्न स्वरूपाची होती. सर्वप्रथम फ्रान्समध्ये उद्बोधन कालखंडाचा समाजशास्त्रीय सिद्धांताच्या मांडणीवर कसा प्रभाव पडला हे जाणून घेवूया.

**प्रबोधन कालखंड आणि परंपरावादी विचारांच्या प्रतिक्रिया**

अभ्यासकांच्या मते, ''प्रबोधन कालखंड' (Enlightenment Period) म्हणजे समाजशास्त्रीय विचारांचा विकास होण्यामागची अशी एक वैचारिक पार्श्वभूमी की, जी नंतरच्या कालखंडात समाजशास्त्राच्या झालेल्या विकास आणि प्रगतीपेक्षा अधिक गुंतागुंतीची होती.'' The enlightenment was a period of remarkable intellectual development and change in philosophical thought. 'प्रबोधन कालखंड' हा एक असा वैशिष्ट्यपूर्ण कालखंड होता की, ज्या कालखंडात वैचारिक बदल आणि तात्त्विक विचारांमध्ये परिवर्तन घडून आले. त्यामध्ये फ्रान्स तत्त्ववेत्ते चार्लस मॉन्टेस्क्यू (१६८९-१७५५), रुसो (१७१२-१७७८), यांनी मानवी समाज जीवनाबद्दल फ्रान्स समाजामध्ये अनादी कालापासून चालत आलेल्या प्रथा परंपरांना तीलांजली देऊन नविन आधुनिक विचारांची मांडणी प्रबोधन कालखंडामध्ये केली होती. त्यामुळे समाजशास्त्रीय सिद्धांतावर जो एक परिणाम घडून आला तो अधिक सकारात्मक स्वरूपाचा होता.

सतराव्या शतकातील, रेनेडिसकार्ट, थॉमस हॉबज् आणि जॉन लॉक या तत्त्ववेत्यांच्या विचारांचा आणि विज्ञानातील विचारांमुळे प्रबोधन कालखंडातील विचारवंताना चालना मिळाली. त्यांनी त्यांच्या विचारांना न डावलता वस्तुनिष्ठ विचार म्हणून मान्य केले. परंतु त्या विचारांचा प्रत्यक्ष समाजजीवनाशी कितपत संबंध जुळतो हे मात्र प्रबोधन कालखंडातील विचारवंत करू शकले नाहीत. उदा. त्यावेळच्या न्यूटन या विचारवंताच्या शास्त्रीय सिद्धांताची पडताळणी व्यावहारिक जीवनामध्ये अनुभवाला येत होती त्याप्रमाणे सामाजिक विचारांची पडताळणी देखील तशा प्रकारे करण्याचा प्रयत्न नंतरचे अभ्यासक करत होते.

थोडक्यामध्ये, प्रबोधन कालखंड म्हणजे, ज्या कालखंडात मानव त्याच्या सभोवतालच्या विश्वाबद्दलची ओळख, संशोधन आणि कार्य-कारण (Reason) जाणून करू लागला. जर आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक विश्वाबद्दलच्या अभ्यासामध्ये निसर्ग नियमांचा प्रभाव जाणवत असेल तर, त्याचवेळी आपल्या भोवती असलेल्या सामाजिक जीवनाबद्दलचे ज्ञान अथवा माहिती देखील नियमांच्या माध्यमातून घेतली पाहिजे. तरच मानवी समाजजीवन कशाप्रकारे कार्यरत असते हे समजेल आणि मग आपल्याला वैज्ञानिक विचारांवर असलेल्या मानवी जीवनाचा अधिक विकास करता येईल.

ज्यावेळी प्रबोधन कालखंडातील विचारवंत अधिक-अधिक वैज्ञानीक विचारांकडे झुकू लागले तशा त्यांनी पारंपारिक मानवी जीवनाबद्दलच्या कल्पना अमान्य केल्या. ज्यावेळी त्यांनी पारंपारिक समाजजीवनातील मानवी मूल्ये आणि सामाजिक संस्थांचा विचार केला तेव्हा त्या 'अवैज्ञानिक किंवा अयोग्य ' (Irrational) स्वरूपाच्या का आहेत याची कल्पना आली. प्रबोधन कालखंडातील विचारवंतांना वैचारिक बदल करताना अवैज्ञानिक विचारांवर प्रभुत्व संपादन करावयाचे होते.

**फ्रान्समधील धार्मिक विचारांचा प्रबोधन कालखंडाला झालेला विरोध**

प्रबोधन कालखंडातील वैज्ञानिक विचारांना फ्रान्समधील कॅथॉलिक ख्रिश्चन धार्मिक विचारांचा विरोध करण्यामध्ये लुईस्ट बोनाल्डो, जोसेफ मॅस्ली यांचा समावेश होतो. यानी केवळ प्रबोधन कालखंडाला विरोध केला नाही तर फ्रेंच राज्यक्रांतीलादेखील त्यांचा विरोध होता. कारण फ्रेंच राज्यक्रांती प्रबोधन कालखंडामुळेच निर्माण झाली असे त्यांचे मत होते. बोनाल्डच्या मते, मध्ययुगीन कालखंडाकडे आपण परत गेले पाहिजे. कारण मानवाला मानसिक स्वास्थ्य आणि समाजातील स्थैर्य हवे असेल तर सृष्टीचा कर्ता-करविता जो इश्वर असतो. त्यामुळे प्रबोधन कालखंडात ज्या 'कार्यकारण' (Reason) घटकाला महत्त्व दिले

होते त्याचे महत्त्व बोनाल्डच्या धार्मिक विचारांमध्ये नव्हते. त्यांच्या विचारांन्वये 'समाज' ही ईश्वराची निर्मिती असून त्यामध्ये मानवाने हस्तक्षेप करू नये आणि इश्वर निर्मित पवित्र समाजाला कोणतीही इजा पोहचवू नये. 'बोनाल्ड' हा पारंपारिक विचारांचा असल्याने पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्था, एकत्रकुटुंब पद्धती, राजेशाही, आणि चर्च किंवा धर्म यांच्या एकूण रचनेमध्ये बदल करण्याच्या विरोधात होता. बोनाल्ड यांच्या धार्मिक विचारांनी केवळ वैज्ञानिक विचारांना विरोध केला असे नाही तर जुने, परंपरावादी व धार्मिक विचार इत्यादीना सकारात्मक जीवनमूल्ये म्हणून स्वीकारावी असे सांगितले. परंपरा, काल्पनिक विचार, भावनात्मकता आणि धर्म हे सर्व समाजजीवनाचे घटक समजले जात होते व अशा समाजरचनेमध्ये कसलाही बदल त्यांना अपेक्षित नव्हता. त्यामुळे फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांतीला ते समाजासाठी हानीकारक घटक मानीत होते.

**फ्रान्समधील समाजशास्त्रीय विचारांचा विकास :**

प्रत्यक्षात 'समाजशास्त्र' (Sociology) ही एक स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून फ्रान्समध्ये ज्यावेळी उदयास आली त्यावेळी फ्रेंच विचारवंत क्लॉईड सेंट सायमन, ऑगस्ट कॉम्ट आणि प्रामुख्याने एमिल डरखायिम यांचे योगदान महत्त्वाचे समजले जाते.

**क्लाईड हेन्री सेंट सायमन (१७६०-१८२५)**

सेंट सायमन ऑगस्ट कॉम्टपेक्षा वयाने मोठे होते. कॉम्ट यांनी त्याचा सुरुवातीचा कालखंड सेंट-सायमनचे सेक्रेटरी म्हणून काम केले. दोघांच्या विचारामध्ये जरी समानता असली तरी, नंतर त्यांच्यामध्ये ताटातूट झाली. सायमन यांनी कार्ल मार्क्सच्या विचारांचा आणि दुसऱ्या बाजूला परंपरावादी विचारांचा (Conservative) देखील स्वीकार करताना बोनाल्ड यांच्या विचाराप्रमाणे त्यांना मध्ययुगीन कालखंडातील समाजाप्रमाणे असणारा समाज अपेक्षित नव्हता. त्यांनी वैज्ञानिक विचाराप्रमाणे परिवर्तनवादी विचार मांडताना समाजवादी विचारांना प्राधान्य दिले होते. परंतु कार्लमार्क्स इतकी विचाराची उंची सेंट सायमनला मिळवता आली नाही. सायमन यांचे अनेक विचार ऑगस्ट कॉम्टच्या विचारातून स्पष्ट होतात.

**ऑगस्ट कॉम्ट (१७९८-१८५७)**

'Sociology' ही संज्ञा सर्वप्रथम ऑगस्ट कॉम्ट यांनी मांडली. समाजशास्त्राचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास व्हावा असा विचार त्यांनी मांडला. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे विस्कळीत झालेल्या समाजव्यवस्थेबद्दल आणि प्रबोधन कालखंडातील वैचारिक मांडणीच्या पेक्षा वेगळा विचार मांडताना 'Positive Philosophy' नावाचा सिद्धांत त्यांनी मांडला. सुरुवातीला 'Social Physics' आणि नंतर १८२२ मध्ये 'Sociology' एक असे शास्त्र की जे, 'सामाजिक स्थितीशास्त्र' (Social Statics) आणि सामाजिक गतीशास्त्र (Social dynamics) म्हणून समाज संरचना आणि समाज परिवर्तनाचा अभ्यास करेल. कॉम्टच्या मते, क्रांतीद्वारे होणारा बदल हा समाजासाठी उपयुक्त नसतो तर नैसर्गिकरित्या समाज उत्क्रांत होत असतो. आणि त्यामधून बदल घडून येतात.

नंतरच्या 'Law of three stages' किंवा 'तीन अवस्थांचा नियम' या सिद्धांतामधून मानवी समाज साध्या अवस्थेतून वैज्ञानिक अवस्थेकडे कशा प्रकारे वाटचाल करतात यासंबंधी त्यांनी आपले विचार मांडले. ऑगस्ट कॉम्ट यांच्या समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये व्यक्तीपेक्षा समूहांचा अभ्यास आढळतो. त्यांच्या मते, 'समाज संरचना' (Social Structure) आणि 'सामाजिक परिवर्तन' (Social Change) या दोन्ही घटकांना

समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये महत्त्व आहे. त्यांनी समाजशास्त्रीय संशोधनाबद्दल विचार स्पष्ट करताना निरीक्षण, प्रयोगपद्धती आणि तुलनात्मक अभ्यासपद्धतींचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

**एमिल डरखायिम (१८५८–१९१७)**

डरखायिम यांनी 'समाजशास्त्र' विषयाला शैक्षणिक अभ्यासक्रमात स्थान मिळवून देत असताना फ्रान्समध्ये समाजशास्त्राचा विकास करण्यामध्ये आणि एकूणच समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास करण्यामध्ये एक महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. डरखायिम यांच्या कालखंडात फ्रान्समध्ये औद्योगिक कामगारांचे संप, सत्ताधारी वर्गामुळे होणारी सामाजिक अव्यवस्था, धर्म आणि शासन यांच्यामधील परस्परविरोधी विचारांमुळे होणारी सामाजिक अव्यवस्था होती, ज्यामुळे डरखायिम यांनी त्यांच्या समाजशास्त्रीय अभ्यासात 'Social disorder' किंवा 'समाज-व्यवस्था' म्हणून समावेश केला. त्यांच्या मते, आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये, अशा प्रकारची अव्यवस्था असू नये परंतु निर्माण झाल्यास सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून त्यामध्ये व्यवस्था आणता येते. कार्ल मार्क्स मात्र डरखायिम यांच्या सुधारणावादी (Reformist) विचारांच्या विरुद्ध असल्याने मार्क्सला समाजामध्ये 'क्रांती'च्याद्वारे बदल हवा होता. नंतरच्या कालखंडात मार्क्सच्या विचारापेक्षा डरखायिमचे सुधारणावादी विचार अधिक स्वीकारले गेल्यामुळे मार्क्सच्या विचारांना नंतर कमी महत्त्व मिळू लागले.

डरखायिम यांनी १८९५ मध्ये 'The rules of Sociological Method' नावांचा ग्रंथ लिहून त्यामध्ये आपल्या सभोवताली असलेल्या सामाजिक घटनांबद्दलची माहिती (facts) तसेच वेगवेगळ्या घटना आणि समाजरचना 'व्यक्ती'ला विशिष्ट वर्तन करण्यास भाग पाडतात. त्यामुळे समाजरचना आणि समाजरचनेचे घटक यांच्यामुळे व्यक्तीवर कसा परिणाम होतो असा अभ्यासविषय त्यांनी समाजशास्त्रामध्ये मांडला. यासाठी त्यांनी समाजशास्त्रीय संशोधन करून आपले विचार त्यांनी 'आत्महत्या' (Suicide) सारख्या सामाजिक समस्येच्या संशोधनातून सिद्ध केले. त्यांनी 'आत्महत्या' ही एक मानसिक किंवा व्यक्तीवर्तनाशी संबंधित घटना न समजता 'आत्महत्येवर' बाहेरील सामाजिक घटकांचा परिणाम असतो आणि म्हणून त्यांनी समाजातील वेगवेगळे समूह, धर्म, देश आणि विविध स्तरामध्ये असणाऱ्या व्यक्तींच्या मधल्या आत्महत्येच्या प्रमाणामध्ये भिन्नता का आढळते? किंवा त्यांच्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण कमी-जास्त का असते? यासाठी 'आत्महत्येचा' सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, समाजामध्ये बदलणारी सामाजिक तथ्ये (Social facts) हे त्या पाठीमागील कारण असते. उदा. युद्धजन्य परिस्थिती अथवा आर्थिक मंदीचा परिणाम म्हणून जी एक समाजात उदासिनता निर्माण करते, त्यामुळे आत्महत्त्येचे प्रमाण वाढते.

'The Rules of Sociological Method' या ग्रंथामध्ये त्यांनी सामाजिक तथ्यांचे प्रकार करताना (अ) अभौतिक स्वरूपाची तथ्ये (Non-material Social facts) की ज्यामध्ये मानवी संस्कृती आणि सामाजिक संस्थांचा समावेश होतो आणि (ब) भौतिक स्वरूपाची सामाजिक तथ्ये (Material Social facts) अभ्यासताना यामध्ये नोकरशाही, कायदा इ. सारख्या घटकांचा उल्लेख केला. तसेच १८९३ मध्ये त्यांनी 'The division of Labour in Society' या ग्रंथामध्ये प्रगत आणि अप्रगत समाजामध्ये असे कोणते घटक असतात की, जे समाजामध्ये ऐक्य टिकवण्याचे कार्य करतात. त्यांच्या मते, सुरुवातीच्या अप्रगत समाजामध्ये असलेल्या रूढी, प्रथा, परंपराच्यामुळे सामाजिक ऐक्य टिकून रहात होते. परंतु नंतरच्या आधुनिक गुंतागुंतीच्या समाजामध्ये श्रम विभाजनाच्या तत्त्वामुळे परस्परावलंबनातून ऐक्य टिकून राहू लागले. आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये ज्या समस्या निर्माण होतात, त्या समाजामध्ये व्यक्तींना एकत्रित ठेवण्यासाठीची

यंत्रणा सक्षम नसते. परंतु त्यासाठी 'क्रांती' (Revolution) गरजेची नसून, सुधारणावादाच्या माध्यमातून समाजामध्ये ऐक्य स्थापन करता येते.

'The Elementary forms of Religious life' या 'धर्मा'संबंधीच्या विचाराद्वारे अदिवासी धर्म हा धर्मसंस्थेचा उगम आहे, कारण त्यामध्ये आधुनिक धर्माइतकी गुंतागुंत आढळत नाही. एकूण आदिवासी समाजच धर्माबद्दल पवित्र आणि अपवित्र घटकांची चर्चा करतो. 'कुलप्रतिकवाद' (Totemism) हा आदिवासी धर्म म्हणून प्राणी, विविध वनस्पतींना प्रतिक म्हणून समजतो. अशा स्वरूपाच्या सैद्धांतिक मांडणीतून डरखायिम यांना समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये स्थान मिळाले. त्यानंतर त्यांनी १८९८ मध्ये 'Sociology' नावाचे नियतकालीक सुरू केले.

**जर्मनीतील समाजशास्त्रीय विचारांचा विकास**

जर्मनीमधील समाजशास्त्रीय विचारांचा इतिहास जाणून घेत असताना १८१८ ते १८८३ या कालखंडातील 'कार्ल मार्क्स'चे सिद्धांत, १८६४ ते १९२० या काळातील मॅक्स वेबरचे विचार आणि १८५८ ते १९१८ मधील जॉर्ज सिमेलचे विचार जाणून घ्यावे लागतात.

**१) कार्ल मार्क्सच्या सिद्धांताचे स्वरूप (१८१८–१८८३)**

जर्मन तत्त्ववेत्ता 'हेगेल' याच्या विचाराचा प्रभाव कार्ल मार्क्सच्या विचारावर होता. सर्व जर्मनीमध्ये त्या कालखंडात हेगेलचा प्रभाव सर्व विचारवंतांच्यावर होता. कारण हेगेलच्या तात्त्विक विचारांमध्ये इतिहास, राज्यशास्त्र आणि संस्कृतीचा अभ्यास समाविष्ट होता. हेगेलच्या विचारामध्ये दोन महत्त्वपूर्ण संकल्पना होत्या. त्यामध्ये 'द्वंद्वात्मवाद' (dialetic) आणि Idealism (विचारवाद) पैकी 'द्वंद्व' (Dialetic) संकल्पना अतिशय गुंतागुंतीची होती की, ज्यामध्ये प्रक्रिया (Processes), (संबंध) Relations, (गतिशीलता) Dynamics, (संघर्ष) Conflict आणि (विरोधाभास) Contradictions इ. सारख्या मानवी विश्वासंबंधी असलेल्या स्थिर संकल्पना गतीशील स्वरूपाच्या संकल्पना म्हणून अभ्यासल्या जातात. म्हणजेच, आपल्या सभोवतालचे विश्व स्थिर नसून गतीशील घटकांचे मुळे टिकून असते. कार्ल मार्क्स यांनी 'द्वंद्व' संकल्पनेचा अर्थ हेगेलेकडून घेतला असला तरी, कार्ल मार्क्स यांनी त्या संकल्पनेमधील Idea किंवा विचार या संकल्पनेवर आक्षेप घेत द्वंद्व ही संकल्पना इतर घटकांच्या संदर्भात जाणून घेत असताना, त्यांनी मानवाच्या भौतिक संस्कृतीशी असणाऱ्या आर्थिक क्रियांच्या मधील 'द्वंद्व' अभ्यासण्याचा प्रयत्न केला.

काल्पनिकता आणि त्या संबंधीचे तत्त्वज्ञान हेगेल यांनी स्पष्ट करताना वास्तवतेपेक्षा व्यक्तीचे मन आणि कल्पना यांना महत्त्व दिले होते. कांही काल्पनिक विचार मांडणाऱ्या अभ्यासकांचे मते, जरी हे वास्तव विश्व अस्तित्वात नसले, तरी मानवाची विचारप्रक्रिया किंवा कल्पना करणारा विचार चालूच राहिला असता. त्यामुळे मानवाची विचार प्रक्रिया महत्त्वाची असून त्यातून अनेक कल्पना जन्माला येतात. त्यामुळे व्यक्तीच्या कल्पना कशा विकसित होतात यावर हेगेल यांनी आपल्या अभ्यासाचे लक्ष केंद्रित केले व अशा कल्पनांना ते spirit of society म्हणत असत. थोडक्यात हेगेल यांनी कल्पनावादी दृष्टीकोनातून विश्वाच्या उत्क्रांतीचे तत्त्व मांडले. सुरुवातीला मानवाला असणाऱ्या संवेदनाच्या द्वारे तो विश्वाबद्दलचे ज्ञान करून घेत होता. उदा. दृष्टी, सुगंध, आणि सामाजिक व भौतिक विश्वाबद्दलच्या जाणीवा. त्यानंतर तो स्वतःला जाणवून घेत असताना, आपण कोण आहोत हे समजून घेवू लागला. सभोवतालचे विश्व आणि त्यामध्ये असणारे स्वतःचे स्थान या बद्दलचे मत जाणून घेताना व्यक्तींच्या मनामध्ये जो विरोधाभास निर्माण होऊ लागला त्यामुळे व्यक्ती एकूण व्यापक अशा समाजव्यवस्थेमध्ये स्वतःचे स्थान शोधू लागली. अशाप्रकारे,

हेगेल यांनी विश्वाच्या उत्क्रांतीबद्दलचा सिद्धांत स्पष्ट करताना व्यक्तीनिष्ठ दृष्टीकोनातून (Subjective) व्यक्तींच्या ठिकाणी असणाऱ्या जाणीवा किंवा 'कल्पना'मुळे परिवर्तन घडून येते व त्याचे स्वरूप इतके विशाल असते की, केवळ व्यक्ती त्याच्यावर नियंत्रण ठेवू शकते.

नंतरच्या वैचारिक मांडणीमध्ये 'लुंडविग फ्यूअरबच' या विचारवंताने हेगेलच्या 'काल्पनिक' विचारांना आव्हान देताना 'वास्तवतेबद्दलचे तत्त्वज्ञान' (Materalist Philosophy) मांडले. त्यांच्या मते, व्यक्ती आणि तिच्या मनातील कल्पना यामध्ये 'कल्पना' पासून 'व्यक्तीं'कडे (human being) जाणे आवश्यक आहे. कारण 'व्यक्ती' वास्तव आहे. हेगेलच्या विचारांवर टीका करताना 'फ्यूअरबच' यांनी धर्माचे उदाहरण दिले. त्यांच्या मते, व्यक्ती तिच्या मनामध्ये इश्वरा बद्दल कल्पना करते जिला व्यक्तीने कधीही पाहिलेले नसते. व्यक्ती आणि इश्वर यांच्या तुलनेत व्यक्ती 'इश्वराला' स्वतःपेक्षा सर्वोच्च स्थान देते, व इश्वर एक श्रेष्ठ पवित्र आणि परिपूर्ण अशी प्रतिमा आहे व आपण त्यापुढे अपरिपूर्ण, दुर्बल आणि नैतिक पातळीवर चूकीचे ठरणारे असतो. थोडक्यात व्यक्तीच्या धर्मापुढे शरण जाण्याच्या 'कल्पना'च व्यक्तीला सर्वोच्च स्थान मिळवून देतात. अशाप्रकारे 'फ्यूअरबच' यांनी धर्मासारख्या अमूर्त कल्पनेपेक्षा 'व्यक्ती' हे वास्तव कसे मोठे आहे हे त्यांनी त्यांच्या 'वास्तवतेच्या तत्त्वज्ञाना'मध्ये स्पष्ट केले.

कार्ल मार्क्स यांनी नंतर त्यांच्या विचारांमध्ये, स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करताना, हेगेलच्या 'द्वंद्व' आणि 'फ्यूअरबच' यांच्या 'वास्तवतेचे तत्त्वज्ञान' या दोन्हींच्या मधून 'द्वंद्वात्मक भौतिकवाद' (Dialectical Materalism) ही संकल्पना मांडली. तसेच हेगेल यांनी वित्त (पैसा, संपत्ती) आणि (शासन) State या दोन वास्तव तथ्यांना काल्पनिकतेच्या दृष्टीकोनातून पाहिले होते. त्यामुळे कार्ल मार्क्स यांनी हेगेल आणि 'फ्यूअरबीच' यांच्या विचारातील उणीवा दूर करताना फ्यूअरबीच यांचा 'भौतिकवादाबद्दलचा' (Materlistic) विचार केवळ धर्म संस्थेपुरता मर्यादित न ठेवता तो समाजातील अर्थिक आणि इतर घटकांशी जोडला. तसेच हेगेल आणि 'फ्यूअरबीच' यांनी केवळ त्यांचे विचार किंवा मत मांडताना व्यवहारामध्ये त्याचे कसे स्वरूप असते हे सांगितले नाही. 'The Philosophers have interpreted the world, in various ways, the point however, is to change it.' त्यामुळे कार्ल मार्क्स यांनी व्यावहारिक विश्वामध्ये व्यक्तीला कशा प्रकारचे द्वंद्व करावे लागते किंवा समाजातील वास्तव घटकांशी व्यक्तीचा संबंध येताना कसे द्वंद्व होते आणि त्यातून 'परिवर्तन' (Change) आणि क्रांतीकारी बदल (Revolutionary Change) कसा होतो याचा विचार मांडला गेला.

त्यानंतर कार्ल मार्क्स यांनी अर्थशास्त्रीय अभ्यासातील भांडवलशाहीचे स्पष्टीकरण करताना भांडवलदार आणि कामगारांचे श्रम या विषयी सिद्धांत मांडताना अतिरिक्त मूल्य सिद्धांत आणि कामगारांच्या पिळवणूकीबद्दलचे विचार महत्त्व पूर्णरित्या स्पष्ट केले. असे असले तरी, संपूर्ण विश्वामध्ये कार्ल मार्क्सच्या विचारांचा जेवढा प्रभाव पडला तेवढीच टीका देखील मार्क्सच्या एकूण वैचारिक मांडणीवर होत आली आहे.

### २) मॅक्सवेबर (१८६४ ते १९२०) यांचे समाजशास्त्रीय विचार

ज्यावेळी कार्ल मार्क्स आणि त्याच्या एकूण विचारांचा प्रभाव जर्मनीबाहेर इतरत्र जगभरामध्ये होत होता त्याच वेळी जर्मनीतील एक विचारवंत मॅक्स वेबर यांनी मात्र कार्ल मार्क्सच्या एकूण विचार-सरणीला विरोध दर्शविला होता. वास्तविक मॅक्सवेबर यांच्या विचारावर कार्ल मार्क्सच्या विचारांचा प्रभाव असला तरी, वेबरच्या मृत्यूनंतर त्याचे जे वाङ्मय प्रसिद्ध झाले त्यामध्ये कार्लमार्क्सच्या विचारांवर टीका करताना मार्क्सचा सिद्धांत केवळ एकाच कारणावर सिद्ध झाला आहे, असे मत वेबर यांनी मांडले, वास्तविक सामाजिक

घटनांना एकापेक्षा अनेक कारणे जबाबदार असतात. उदा. कार्ल मार्क्स यांनी त्यांच्या अनेक विचारांचे मूळ केवळ आर्थिक घटकाशी जोडले आहे. परंतु मॅक्स वेबरला तसे वाटत नाही.

मॅक्स वेबर यांनी मार्क्सचे वस्तुनिष्ठ विचार जरी आर्थिक घटकांच्यामुळे इतर सर्व घटक प्रभावित होतात असे दर्शवित असले तरी, कांही वेळा धर्मसंस्थेमधल्या काल्पनिक विचारांमुळे अर्थसंस्था प्रभावित होते. उदा. मॅक्स वेबर यांनी त्यांच्या ''Protestant Ethics & Spirit of Capitalism" या ग्रंथामध्ये प्रोटेस्टंट ख्रिश्चन धर्माच्या शिकवणीचा प्रभाव युरोप खंडातील भांडवलशाहीचा विकास होण्यास कसा पोषक होता हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी जगातील इतर धर्मसंस्था आणि त्यांच्या शिकवणीचे स्वरूप कसे होते आणि युरोपमधील प्रोटेस्टंट ख्रिश्चन धर्माची शिकवण इतर धर्मापेक्षा भांडवलशाहीला पोषक असल्याने, भांडवलशाही युरोपखंडातच अधिक यशस्वी कशी झाली याचे स्पष्टीकरण त्यांनी त्यांच्या धर्म सिद्धांतामध्ये दिले. तसेच सामाजिक स्तरीकरणाचे मार्क्सचे विश्लेषण वर्ग रचनेवर आधारीत करताना केवळ आर्थिक घटकांचा निकष विचारात घेतला आहे. उलट समाजातील वर्ग व्यवस्थेचे कारण सत्ता (Power) असू शकते. यावरून त्यांनी सत्तेचे प्रकार मांडले. मॅक्स वेबर यांनी अधिक विवेकशील (Rationalize) विचार मांडताना आधुनिक समाजातील नोकरशाही बद्दल विचार मांडले. त्यांच्या मते, शासन संस्थेचा नोकरशाही एक भाग असतो. अशाप्रकारे कार्ल मार्क्स यांच्या एकूण मांडणीचे स्वरूप अधिका-अधिक 'आर्थिक' घटकावरच लक्ष केंद्रित करणारे होते. याउलट वेबर यांनी सामाजिक घटनांचा अर्थ जाणून घेण्यासाठी एकापेक्षा अधिक कारणांचा संदर्भ घेवून सामाजिक घटनांचे विश्लेषण कशाप्रकारे केले जाऊ शकते यासंबंधी त्यांनी त्यांचे समाजशास्त्रीय विचार मांडले.

**३) जॉर्ज सिमेल (१८५८ ते १९१८) यांचे समाजशास्त्रीय विचार**

जॉर्ज सिमेल हे मॅक्स वेबर यांचे समकालीन होते आणि 'German Sociological Society' चे ते एक सह-संस्थापक होते. एक वैशिष्ट्यपूर्ण समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांना ओळखले जाते. १९२० ते १९३० च्या दरम्यान 'मॅक्स वेबर' आणि 'कार्ल मार्क्स' यांच्या विचारांपेक्षा जॉर्ज सिमेल यांच्या विचारांचा प्रभाव अमेरिकन समाजशास्त्रावर अधिक जलद गतीने झाला आणि त्यातून अमेरिकेतील 'शिकागो स्कूल' मधल्या Symbolic Interactionism 'सांकेतिक आंतरक्रियावादी' सिद्धांताचा उदय झाला. 'वेबर' आणि 'मार्क्स' पेक्षा 'जॉर्ज सिमेल' अमेरिकन समाजशास्त्रामध्ये अधिक प्रसिद्धीला येण्याचे कारण, ज्यावेळी वेबर, मार्क्स सारखे विचारवंत समाजातील आर्थिक संस्था, धर्म, नोकरशाही, विवेकवाद इ. सारख्या व्यापक स्तरावरील अभ्यास करीत होते त्या वेळी जॉर्ज सिमेल मात्र त्यांच्या अभ्यासाची मांडणी व्यक्तीच्या 'क्रिया आणि प्रतिक्रिया' Action आणि Interaction यासारख्या लहान पातळीवर (Micro Study) करत होते. व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांचा अभ्यास करताना त्यांनी 'संघर्ष' यासारख्या आंतरक्रियेचा अभ्यास केला होता. व्यक्ती-व्यक्तींच्या मधल्या आंतरक्रियेचा अभ्यास हा समाजशास्त्राचा एक प्रमुख अभ्यास-विषय असतो. परंतु व्यापक स्तरावर समाजात चालू असलेल्या व्यक्ती-व्यक्तींच्या मधील सर्वच आंतरक्रियांचा अभ्यास करणे शक्य नसल्याने त्यांनी आंतरक्रियेचे प्रकार मांडले. जॉर्ज सिमेल यांनी मॅक्स वेबर आणि कार्ल मार्क्स सारखे प्रचंड खंडात्मक लिखाण न करता कांही लहान विषयावर शोधनिबंध लिहिताना समाजातील दारिद्र्य, वेश्या व्यवसाय किंवा चंगळवादी प्रवृत्ती इ. सारखे छोटे विषय हाताळले. त्यांचा ''पैशाचे तत्त्वज्ञान'' (Philosophy of Money) हा ग्रंथ महत्त्वपूर्ण समजला जातो.

'Philosophy of Money' या ग्रंथामध्ये, व्यक्ती आणि संस्कृतीमधल्या परस्पर संबंधाचे स्पष्टीकरण देताना, Domination of Cultural as a whole over individual व्यक्तीजीवनावर आधुनिक

संस्कृतीचा म्हणजे पैसा, अर्थ-व्यवस्था यांचा प्रभाव वाढल्याने 'व्यक्ती'चे समाजातील स्थान व महत्त्व कमी झाले. उदा. ज्यावेळी आधुनिक समाजात उद्योगधंद्याचे तंत्रज्ञान कमालीचे विकसित होते त्यावेळी व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या कला, गुण आणि क्षमतांचे महत्त्व कमी होत जाते. त्यातून पुढे कामगार या तंत्रज्ञानाशी संघर्ष करू लागतो. परंतु त्यावर तो नियंत्रण ठेवू शकत नाही.

**ब्रिटीश समाजशास्त्राचा उदय :**

जर्मन आणि फ्रान्समधील समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास जाणून घेतल्यानंतर ब्रिटीश समाजव्यवस्थेमध्ये, त्यांच्या स्वतःच्या समाजातील वैचारिक घडामोडीचा परिणाम ब्रिटीश समाजशास्त्राच्या विकासाला कारणीभूत ठरला होता.

**१) राजकीय अर्थव्यवस्था, सुधारणावाद आणि सामाजिक उत्क्रांती**

१९ व्या शतकात इंग्लंडमधील अर्थ-व्यवस्था, सुधारणावाद आणि सामाजिक उत्क्रांतीमुळे समाजशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात झाली. लंडनमध्ये ज्या वेळी १९०३ मध्ये 'Sociological Society of London' ची स्थापना झाली. त्यावेळी 'समाजशास्त्राच्या व्याख्ये संदर्भात अभ्यासकांच्यामध्ये एकमत नव्हते. त्यातील कांही अभ्यासकांना समाजशास्त्र हे विज्ञान आहे असे वाटत नव्हते.

१७२३ ते १७९० मध्ये प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ 'ॲडम स्मिथ' यांनी त्यांच्या 'Political Economy' या ग्रंथामध्ये इंग्लंडमधील भांडवलशाही आणि त्यांचे समाजावरील परिणाम मांडले होते. त्याचा प्रभाव कार्ल मार्क्सच्या विचारांवर दिसतो. कार्ल मार्क्स यांनी भांडवलशाहीवर टीका केली होती. परंतु ॲडम स्मिथ यांच्या Political Economy या ग्रंथामध्ये त्यांनी बाजारपेठा (Market) किंवा औद्योगिक समाज एक असा घटक आहे की, जो एकूण मानवी जीवनावर प्रभाव टाकणारा आहे. त्यामुळे त्या वेळच्या ब्रिटीश समाजशास्त्रज्ञांनी भांडवलदारी ही एक सकारात्मक औद्योगिक समाज व्यवस्था म्हणून, अभ्यास करताना, तिच्या एकूण कार्यपद्धतीमधील दोष, अभ्यासकांनी संशोधनात्मक माहितीद्वारे संकलित करून शासनाला दिले पाहिजेत तरच शासन त्यावरती योग्य ते उपाय करू शकेल.

परंतु मार्क्स, वेबर, डरखायिम हे विचारवंत समाजरचनेबद्दलच्या माहितीवर म्हणजे (Social Structure) वर संशोधन करून त्याला माहिती म्हणत होते तर ब्रिटीश समाजशास्त्रज्ञ, व्यक्तीमुळे समाज रचना आकाराला येते म्हणून व्यक्ती-पातळीवर माहिती जमा करत होते. व्यापक समाज रचना समजून घेण्यासाठी व्यक्तीपातळीवर माहितीचा उपयोग करून समाजरचनेचा अभ्यास करत होते. त्यामुळे ब्रिटीश समाजशास्त्रावरती 'संख्यात्मक माहितीचा' (Stastical data) प्रभाव असल्याने Pure data किंवा facts महत्त्वाचा असून, समाजशास्त्रामध्ये त्याचा उपयोग करताना तात्त्विक किंवा सैद्धांतिक पातळीवर होणारे समाजाचे विश्लेषण टाळले पाहिजे. त्यामुळे ब्रिटीश समाजशास्त्रामध्ये संख्यात्मक, संशोधनात्मक आणि अनुभवजन्य माहितीवर विशेष भर दिलेला आढळतो. ब्रिटीश समाजशास्त्रामध्ये संशोधनातील संख्यात्मक माहितीवर ज्या वेळी अधिक भर दिला जात होता, त्या वेळी कांही अभ्यासक 'समाजातील दारिद्र्यासारख्या समस्येचा अभ्यास सामाजिक पातळीवर केला पाहिजे व त्यासाठी संख्यात्मक माहितीपेक्षा, सामाजिक दृष्टीकोनातून त्याचा अभ्यास केला पाहिजे असे मत मांडू लागले. परंतु त्यावेळीसुद्धा ब्रिटीश अभ्यासक दारिद्र्य समस्येचे कारण समाजरचनेशी संबंधित नसून त्या ठिकाणच्या व्यक्तीमध्ये असणारे दोष दारिद्र्याला कारणीभूत असतात असा विचार मांडू लागले. थोडक्यात ब्रिटीश समाजशास्त्रामध्ये व्यापक पातळीवर असलेल्या समाजरचनेपेक्षा व्यक्तीगत पातळीवर असणाऱ्या समस्या म्हणजे मद्यपान, उपेक्षा, दारिद्र्य,

अस्पृश्यता, सार्वजनिक आरोग्यासंबंधीच्या समस्या, गुन्हेगारी, दारिद्र्याची मानसिकता इ. व्यक्तीगत समस्यांवर समाजशास्त्रज्ञ अभ्यास करत होते.

अशाप्रकारे 'समाजरचनेच्या' अभ्यासाला ब्रिटीश समाजशास्त्रामध्ये गौण स्थान होते. परंतु १९ व्या शतकाच्या मध्यानंतर 'सामाजिक उत्क्रांतीच्या' विचारांना महत्त्व प्राप्त होऊ लागले. त्यानंतर १८५० मध्ये फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्ट चे विचार इंग्रजीमध्ये रूपांतर केले जाऊ लागले व कॉम्टच्या विचारातून ब्रिटीश समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक उत्क्रांतीबद्दल स्वतंत्र विचार मांडले.

**हर्बर्ट स्पेन्सर (१८२०–१९०३)**

समाजशास्त्रामध्ये 'Evolutionary Approach' म्हणजे 'उत्क्रांतीवादी दृष्टीकोन' एक असा दृष्टीकोन आहे की, ज्यामध्ये जगातील मानवी समाजरचना साध्या अवस्थेकडून गुंतागुंतीच्या अवस्थेकडे वाटचाल करताना त्यांची रचना आणि कार्यपद्धती नैसर्गिकरित्या टप्प्या–टप्प्याने बदलत असते. त्यालाच सामाजिक उत्क्रांती म्हणतात. हा विचार 'ऑगस्ट कॉम्ट पासून आला व त्याचा स्पेन्सर यांच्या विचारांवर प्रभाव झाला. परंतु कॉम्ट आणि स्पेन्सर यांच्या उत्क्रांतीवादी विचारसरणीमध्ये फरक आढळतो.

कॉम्टचे विचार अधिक परंपरावादी होते, तर स्पेन्सरचे विचार अधिक 'उदारमतवादी' स्वरूपाचे होते. कारण स्पेन्सर शासनाचा हस्तक्षेप मान्य करत नाही की जो कॉम्टच्या विचारात मान्य होता. स्पेन्सरच्या उत्क्रांतीवादी विचारावरती जीवशास्त्रज्ञ 'चार्लस डार्विन' च्या विचारांचा प्रभाव होता. ज्यामध्ये निसर्गात ज्याप्रमाणे प्राणी, वनस्पती यांची नैसर्गिक वाढ होते व अशी वाढ होताना, निसर्गातील बदलत्या परिस्थितीशी ज्याना समायोजन किंवा मिळते–जुळते घेता येते त्यांचे अस्तीत्व टिकून रहाते व जे निसर्गाशी समायोजन करू शकत नाहीत, अशा दुर्बल घटकांचा नाश होतो. याच नियमान्वये, 'समाज आणि व्यक्ती' ज्या सशक्त आहेत, त्यांचे अस्तीत्व टिकून रहाते व जे दुबळे आहेत ते नष्ट होतात. (Survival of the fittest) असा उत्क्रांतीचा नियम स्पेन्सर यांनी समाजांच्या उत्पत्ती बाबत सांगितला.

त्यानंतर स्पेन्सर यांनी समाजाची तुलना 'Organism' किंवा एक 'मानवी जीव' म्हणून करताना मानवी शरीरामध्ये ज्याप्रमाणे विविध अवयव परस्परांवर अवलंबून असतात आणि एकूण शरीरासाठी विशिष्ट कार्ये पार पाडतात, त्याप्रमाणे मानवी समाजसुद्धा विविध परस्परांवर आधारित घटकांचा असून ते सर्व घटक एकूण समाजासाठी कार्ये पार पाडतात असा एक उत्क्रांतीचा विचार मांडला. याउलट ऑगस्ट कॉम्ट यांचा 'तीन अवस्थांचा नियम' जो मानवी विकासाच्या अवस्था स्पष्ट करताना केवळ काल्पनिक विचारांवर सिद्धांताची मांडणी करतो. स्पेन्सर यांनी समाजाची उत्क्रांती स्पष्ट करताना 'Increasing Size of Society' समाजाचा वाढता आकार की, ज्यामुळे लोकसंख्या वाढते आणि त्यानुसार समाज गुंतागुंतीचा होत जाऊन समाजातील घटकांच्या कार्यामध्ये आणि रचनेमध्ये फरक पडत जातो. यावरूनच त्यांनी समाजाचे दोन प्रकार केले (अ) सैनिकी समाज, (ब) औद्योगिक समाज हे दोन समाज म्हणजे अशा स्वरूपाच्या समाजाच्या संकल्पना आहेत की, ज्या समाजातील अंतर्गत समाज रचनाभिन्न असतात. त्यामुळे सैनिकी समाज म्हणजे बंदिस्त समाज (Closed Society) व औद्योगिक समाज म्हणजे (Open Society) खुली समाजरचना कशी असते या विषयी स्पष्टीकरण केले आहे.

अशाप्रकारे, समाजशास्त्रीय विचार किंवा सिद्धांत जाणून घेत असताना फ्रेंच, जर्मनी, इंग्लंड यासारख्या प्रमुख युरोपियन देशातील ऑगस्ट कॉम्ट, कार्ल मार्क्स, मॅक्सवेबर, जॉर्ज सिमेल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या वैचारिक मांडणीचा आणि त्यांच्या तात्वीक विचारांचा प्रभाव म्हणून समाजशास्त्रीय सिद्धांताचा उगम झालेला

दिसतो. या सर्व समाजशास्त्रज्ञांनी 'मानवी समाज रचना' आणि त्यांच्या एकूण कार्य पद्धती संदर्भात 'रचनात्मक कार्यात्मक दृष्टीकोन, उत्क्रांतीवादी दृष्टीकोन किंवा मार्क्सचा संघर्षात्मक दृष्टीकोन मांडलेला होता. अशाप्रकारचे दृष्टीकोन पुढे समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणून ओळखले जाऊ लागले.

**१.२.३.३ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

⁕ **रिकाम्या जागा भरा.**

१) 'Sociology' ही संज्ञा सर्वप्रथम ............. यांनी मांडली.

२) .............. यांनी 'समाजशास्त्राला' शैक्षणिक अभ्यासक्रमात स्थान दिले.

३) 'Protestant Ethics & Spirit of Capitalism' ग्रंथ .............. यांनी लिहिला.

४) 'Philosophy of Money' हा ग्रंथ ........... विचारवंताने मांडला.

५) स्पेन्सर यांनी समाजाची तुलना ............. शी केली आहे.

## १.३ सारांश

समाजशास्त्रीय सिद्धांत किंवा एकूणच सामाजिक विचारांचा सुरुवातीचा ऐतिहासिक कालखंड जाणून घेताना, प्रामुख्याने आपण त्यांचा दोन कालखंडामध्ये आढावा घेतला. त्यामध्ये पहिला कालखंड अशा स्वरूपाचा होता की, ज्यामध्ये युरोपियन समाजातील सामाजिक घटनांचा निर्देश करताना त्यावेळच्या राजकीय क्रांतीचे स्वरूप, औद्योगिक क्रांती, भांडवलशाहीचा उगम, समाजवाद, स्त्रीवाद, नागरीकरण, धार्मिक परिवर्तन, शास्त्रशाखेचा उगम आणि त्यांचा वाढता प्रभाव इ. सारख्या प्रमुख सामाजिक घडामोडींचा परिणाम प्रामुख्याने, समाजशास्त्रीय सिद्धांताच्या निर्मितीला कशाप्रकारे कारणीभूत ठरला यासंबंधी घटकांचे विश्लेषण विचारात घेतले. त्यानंतरच्या दुसऱ्या भागामध्ये युरोपमधील विविध देशातील विचारवंताच्या वैचारिक मांडणीचा परिणाम समाजशास्त्रीय सिद्धांताच्या उदयाला कसा कारणीभूत ठरला याविषयी विश्लेषण करताना फ्रान्समधील एकूण वैचारिक आणि तात्त्विक विचारांमुळे उद्‌बोधनाचा कालखंड कसा महत्त्वपूर्ण ठरला तसेच या उद्‌बोधनात्मक कालखंडातील विचारांना परंपरावादी विचारांनी कशा प्रकारे विरोध केला या संबंधीच्या अभ्यासातून फ्रेंचमधील समाजशास्त्रीय सिद्धांताना कशी चालना मिळाली या विषयीचे विश्लेषण माहित करून घेतले. त्याचबरोबर फ्रान्समधील अगदी सुरवातीच्या कालखंडातील समाजशास्त्रज्ञांचे वैचारिक योगदान जाणून घेताना, सेंट सायमन, ऑगस्ट कॉम्ट, एमिल डुरखायिम इ. सारख्या विचारवंताच्या वैचारिक मांडणीचे स्वरूप जाणून घेतले.

त्यानंतरच्या भागामध्ये आपण जर्मन देशातील 'कार्ल मार्क्स'च्या विचारांचा परिणाम म्हणून समाजशास्त्रीय सिद्धांताना कशी चालना मिळाली व मार्क्सवादी विचारसरणी आणि त्या समवेत समाजशास्त्रीय सिद्धांत यांच्यामध्ये मार्क्सवादी विचारांचा समाजशास्त्रीय सिद्धांतावर कसा प्रभाव पडला हे जाणून घेतले. मार्क्सच्या विचारांचे मूळ, हेगेलच्या विचारांमध्ये तसेच भौतिकवादामध्ये, आणि राजकीय अर्थशास्त्रामध्ये कशा प्रकारे आढळते या विषयी माहिती घेतली. त्यानंतर जर्मन समाजशास्त्रामध्ये 'मॅक्स वेबर' या अभ्यासकाच्या विचारांचा प्रभाव कार्ल मार्क्सच्या विचारांपेक्षा अधिक प्रभावीपणे कसा पडला आणि जॉर्ज सिमेल या जर्मन विचारवंताने कशा स्वरूपाचे समाजशास्त्रीय विवेचन केले या संबंधीचा आढावा घेतला.

ब्रिटीश किंवा इंग्लंडमधील समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास जाणून घेतला. ब्रिटीशांची राजकीय अर्थव्यवस्था, सुधारणावादी विचार आणि सामाजिक उत्क्रांतीचा सिद्धांत जाणून घेतला, 'हर्बर्ट स्पेन्सर'सारख्या समाजशास्त्रज्ञाचे विचार जाणून घेतले. थोडक्यात, सामाजिक विचारांचा आढावा घेतला, 'Social Theory' किंवा Sociological Theory यांच्यामधील मूलभूत फरक समजावून घेताना; समाजशास्त्रातील सिद्धांत किंवा माहिती एकूण मानवी समाज संबंधीचे चिंतन वस्तुनिष्ठ पातळीवर करताना 'अनुभवजन्य माहितीचा' (Empirical Data) आधार घेवून समाजासंबंधीच्या विविध घटनांचे विश्लेषण कशा प्रकारे करते व सामाजिक सिद्धांत सुद्धा सर्वार्थाने मानवी जीवनाचेच विश्लेषण करीत असले तरी, त्यामध्ये विविध स्वरूपाच्या आर्थिक, राजकीय, मानसशास्त्रीय दृष्टीकोनांचा आधार घेवून घटनांचे विश्लेषण केले जाते. समाजशास्त्राचा इतिहास किंवा समाजशास्त्रीय सिद्धांताचा इतिहास म्हणजे युरोपियन समाजामध्ये ज्या एकूण सामाजिक घटना घडून गेल्या त्या घटनांसंबंधीचा वस्तुनिष्ठ पुरावा म्हणजे समाजशास्त्र होय.

## १.४ पारिभाषिक संज्ञा

१. **सामाजिक सिद्धांत** (Social Theory) : वैज्ञानिक पद्धतीने सामाजिक माहितीचा केलेला अभ्यास.

२. **उद्‌बोधनाचा कालखंड** (Enlightenment Period) : ज्या कालखंडामध्ये परंपरावादी विचारांचे विज्ञानवादी विचारांनी परिवर्तन घडवून आणले.

३. **सिद्धांत** : (Theory) वस्तुनिष्ठ तथ्यांचे विश्लेषण करून एखाद्या घटनेबद्दलचा नियम मांडणे होय.

४. **समाजशास्त्रीय सिद्धांत** (Sociology Theory) : सामाजिक घटनासंबंधीचे वस्तुनिष्ठ पातळीवर विश्लेषण करताना त्या बद्दलचा नियम मांडणे.

५. **भौतिकवाद** (Materalism) : वास्तव स्वरूपामध्ये असणाऱ्या घटनांना प्रमाण मानून घटनांचा केलेला अभ्यास.

६. **काल्पनिकवाद** (Idealism) : वैचारिक मांडणीमध्ये, काल्पनिक घटनांचा आधार घेवून किंवा कल्पना करून विचारांची केलेली मांडणी ज्या विचारांना वस्तुनिष्ठतेचा आधार नसतो.

७. **सामाजिक उत्क्रांती** (Social Evolution) : समाजाचा होणारा विविध अवस्थांच्या मधला विकास किंवा त्यांची होणारी वाढ.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.२.१.१ १) दक्षिण आफ्रिका, २) तथ्यांचा, ३) शासन, ४) व्यक्ती, ५) रुसो

१.२.२.२ १) फ्रेंच, २) लोकशाही, ३) परिवर्तनवादी, ४) महिला, ५) शिकागो

१.२.३.३ १) ऑगस्ट कॉम्ट, २) एमिल डरखायिम, ३) मॅक्स वेबर, ४) जार्ज सिमेल, ५) मानवी शरीर

## १.६ सरावासाठीचे प्रश्न

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) समाजशास्त्राच्या उदया मागच्या सामाजिक विचारांचे विश्लेषण करा.

२) समाजशास्त्रीय सिद्धांताच्या विकासाला जबाबदार असणारी सामाजिक-आर्थिक परिस्थिती विशद करा.

३) समाजशास्त्रीय सिद्धांताचा विकास होण्यामागील वैचारिक आणि तात्त्विक परिस्थिती याचा आढावा घ्या.

**ब) टीपा लिहा.**

१) सामाजिक सिद्धांताचा अर्थ

## १.७ संदर्भ सूची

१) Ritzer George, 'Classical Sociological Theory' M. C. Graw-Hill International Edition, New Delhi-1996.

२) Tim Delaney 'Contemporary Social Theory-Investigation and Applications.

❑❑❑

## सत्र–१ : घटक–२
# कार्ल मार्क्स (१८१८–१८८३)

**घटक संरचना**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय–विवेचन

२.२.१ कार्ल मार्क्सची बौद्धिक पार्श्वभूमी आणि त्याचे पद्धतीशास्त्र (द्वंद्वात्मक भौतिकशास्त्र)

२.२.१.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

२.२.२ ऐतिहासिक भौतिकवाद

२.२.२.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

२.२.३ मार्क्सचे भांडवलशाही संबंधीचे विश्लेषण – वर्ग व वर्ग संघर्ष

२.२.३.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

२.२.४ मार्क्सची अतिरीक्त मूल्य संकल्पना आणि त्याचे कामगार परात्मतेचे धोरण

२.२.४.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक संज्ञा

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर

- कार्लमार्क्सचा द्वंद्वात्मक सिंध्दात स्पष्ट करता येईल.
- कार्लमार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद समजून घेता येईल
- वर्ग सिध्दांत व वर्गसंघर्ष समजून घेता येईल.
- मार्क्सचा अतिरिक्त मूल्य सिंध्दात व कामगार परात्मतेचे धोरण समजून घेता येईल.

## २.१ प्रस्तावना :

१९ व्या शतकातील एक थोर साम्यवादी विचारवंत म्हणून कार्ल मार्क्सकडे पाहिले जाते. संपूर्ण जगातील कामगार वर्गाला एकत्र करून भांडवलशाहीविरुद्ध संघटित आवाज उठविणारा महान तत्त्ववेत्ता आणि भौतिकवादी विचारवंत (Materialistic Thinker) म्हणून कार्ल मार्क्सचा उल्लेख केला जातो. भौतिक या शब्दाचा अर्थ दृश्य अथवा डोळ्याना प्रत्यक्ष दिसणारे असा आहे.

मार्क्सच्या मते, ज्या घटना डोळ्याना दिसतात आणि ज्या घटनांचे प्रत्यक्ष निरीक्षण करता येते अथवा अनुभव घेता येतो अशा घटनांचाच मार्क्सने विचार केला आहे. मार्क्स पूर्वी हेगेल या विचारवंताने विश्वाचे मूळ चैतन्यशक्तीत आहे असे प्रतिपादन केले होते. मार्क्सला हेगेलचे तत्त्वज्ञान पटेल तेवढेच त्याने स्वीकारले. चैतन्यशक्ती अदृश्य असल्यामुळे तिचे अस्तीत्व मार्क्सने अमान्य केले. हाच मार्क्सचा भौतिकवाद होय.

कार्ल मार्क्सची बौद्धिक पार्श्वभूमी अभ्यासताना त्याचा जीवनवृत्तांत, ग्रंथसंपदा, मार्क्सच्या विचारावर इतर विचारवंतांचा पडलेला प्रभाव आणि त्याचे प्रमुख समाजशास्त्रीय विचार इत्यादींचा मागोवा घेणे अतिशय गरजेचे आहे.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ कार्ल मार्क्सची बौद्धिक पार्श्वभूमी आणि त्याचे पद्धतीशास्त्र अथवा द्वंद्वात्मक भौतिकवाद (Intellectual background and Methodology by Karl Marx)

I) **कार्ल मार्क्सचा जीवनवृत्तांत**

कार्ल मार्क्स या महान समाजशास्त्रज्ञाचा जन्म ५ मे, १८१८ रोजी जर्मनीतील ऱ्हाइन प्रांतातील 'ट्रियर' या शहरामध्ये झाला. मार्क्सचे वडील व्यवसायाने वकील असल्यामुळे आपल्या मुलाने देखील वकीलीचा व्यवसाय करून भरपूर पैसा व किर्ती मिळवावी अशी त्यांची इच्छा होती, परंतु मार्क्सला मात्र हा विचार पटला नाही.

मार्क्सने वयाच्या १७ व्या वर्षी वडिलांच्या इच्छेनुसार कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी बॉन विद्यापीठात प्रवेश घेतला. पुढे तो बर्लिन विद्यापीठात दाखल झाला इथेच त्याच्या जीवनाला क्रंतीकारक वळण मिळाले, त्याचा परिणाम म्हणजे मार्क्सने कायद्याचा अभ्यास सोडून दिला आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासावर आपले लक्ष केंद्रित केले. त्यातूनच मार्क्सने अनेक महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय विचार मांडले.

II) **कार्ल मार्क्सची ग्रंथसंपदा**

मार्क्स या जर्मन विचारवंताने जीवनाच्या सुरुवातीपासून ते आयुष्याच्या अखेरपर्यंत आपल्या विचारांच्या विकासासाठी तसेच प्रसारासाठी खूप प्रयत्न केले. विविध विषयांवर महान असे ग्रंथ लिहून त्याद्वारे आपले शास्त्रशुद्ध, स्वतंत्र, निर्भीड आणि बंडखोर विचार व्यक्त केले. जगभरातील **कामगारांचा देवदूत** असे अष्टपैलू व्यक्तीमत्त्व लाभलेला कार्ल मार्क्स आपल्या खालील विविध ग्रंथामुळे जगप्रसिद्ध झाला.

१) "Difference between the Philosophy of Democratic and Epicuts" हा Ph. D. प्रबंध.

२) जर्मन अर्थकारण व राजकारण यावर आधारित ‘ऱ्हायनिश झिटूंग’

३) जगभरातील कामगार विश्वाचे क्रांतीकारी दर्शन घडविणारा 'Holy Family'

४) एंजल्सच्या साहाय्याने ‘‘साम्यवादी जाहिरनामा’’

५) द्वंद्वात्मक भौतिकवाद व ऐतिहासिक भौतिकवाद यासंदर्भातील ‘‘तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य’’

६) भांडवलशाहीच्या शोषणाविरुद्ध कामगारानी एकत्र येऊन लढा द्यावा या क्रांतीकारी विचाराशी निगडीत ‘‘दास कॅपीटल’’ हा विश्वविख्यात ग्रंथ प्रकाशित केला.

वरील महत्त्वपूर्ण ग्रंथाद्वारे भांडवलशाही शोषणाचे खरे चित्र, वर्गसंघर्षाचा शेवट म्हणजे भांडवलदाराचा नाश व त्यासाठी क्रांतीची गरज यासारखे अत्यंत महत्त्वाचे विचार प्रकट केले.

### III) **कार्ल मार्क्सवर विविध विचारवंतांच्या विचारांचा पडलेला प्रभाव**

युरोपमध्ये भांडवलशाहीच्या विकासामुळे सरंजामदार आणि शेतमजूर यांचे संबंध अधिकच दयनीय बनले होते. यंत्र उत्पादनपद्धतीमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली. मात्र त्याचबरोबर शेतमजूरांची जागा औद्योगिक मजूर वर्गाने घेतली. सरंजामदारी व्यवस्था संपुष्टात येऊ लागली आणि तिची जागा भांडवलशाहीने घेतली. अशा परिस्थितीत मार्क्सची विचारसरणी जन्मास आली. साहजिकच कार्ल मार्क्सच्या विविध विचारांवर फ्रान्सच्या भांडवलशाही क्रांतीचा प्रभाव पडला. मार्क्सचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक तत्त्वज्ञान वरील परिस्थितीमधूनच जन्माला आले.

मार्क्सच्या क्रांतीकारी विचाराना खतपाणी घालण्यामध्ये पुढील अनेक विचारवंतांचा समावेश होतो. उदा. वेस्ट फॉलन कुटुंब, सेंट सायमन, हेगेल, फ्रेडरिक एंजेल्स, ॲडम स्मिथ, रिकार्डो इत्यादींच्या विचारामुळे तसेच त्यांच्या वैचारिक प्रभावामुळे मार्क्सची बुद्धीमत्ता अधिक विकसीत झाली.

### IV) **कार्ल मार्क्सचे प्रमुख समाजशास्त्रीय विचार**

मार्क्सपूर्वी अनेक विचारवंतांनी समाजवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु समाजवादाची म्हणावी अशी शास्त्रीय चिकित्सा केली गेली नाही. मार्क्सने मात्र समाजवादी विचाराना नवीन रूप देण्याचा प्रयत्न केला. अशा प्रयत्नामुळेच समाज संघटित करण्याचा प्रयत्न झाला. किंबहूना मार्क्सच्या समाजवादी अथवा साम्यवादी विचारसरणींमुळेच पूर्व युरोप, चीन आणि डाव्या विचारसरणीची राष्ट्रे प्रभावीत होऊन तिथे समाजवादी क्रांतीला सुरुवात झाली.

मार्क्सने आपल्या द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहसिक भौतिकवाद, वर्ग संघर्ष, अतिरिक्त मूल्य आणि कामगार परात्मतेची संकल्पना या अनेक महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय विचारांच्यामधून साम्यवादी समाज केव्हा आणि कसा निर्माण होईल यासंदर्भात अतिशय मोलाचे विचार मांडले. त्यामुळेच कार्ल मार्क्स हा जगप्रसिद्ध विचारवंत म्हणून ओळखला गेला. मार्क्सने आपल्या वरील विचारांच्या मधून अनेक गोष्टी स्पष्ट केल्या. उदा. श्रम, मूल्य आणि भौतिकता याना आधारभूत मानून श्रमाला योग्य मूल्य मिळावे अशी आग्रहाची भूमिका स्वीकारली. सामाजिक परिवर्तन हे भांडवलदार (शोषणकर्ता) आणि कामगार (शोषित) या उभय वर्गाच्या संघर्षातून घडते. अशावेळी श्रमिकानी म्हणजेच कामगारवर्गाने भांडवलशाहीविरुद्ध क्रांती करावी असा वास्तव आणि महत्त्वपूर्ण विचार मांडला.

उत्पादन संबंधातून आणि यंत्र उत्पादन पद्धतीमधून सामाजिक विचारांची निर्मिती होत असल्याने मार्क्सने आर्थिक घटकाला निर्णायक मानले. त्याचप्रमाणे आधुनिक समाजात श्रमाला किती मूल्य आहे हे आपल्या अतिरिक्त मूल्य या संकल्पनेद्वारे सांगण्याचा प्रयत्न केला.

थोडक्यात मार्क्सची बौद्धिक पार्श्वभूमी म्हणजेच त्याचे विविध महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय विचार हे वास्तवतेशी निगडीत असल्यामुळे भांडवलशाही समाजव्यवस्थेत भांडवलदारानी श्रमिकाना अथवा मजूर वर्गाला बिकट आर्थिक स्थितीतून कसे वर काढता येईल याकडे आपले लक्ष केंद्रित केले. त्यामुळेच मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, वर्गसंघर्ष सिद्धांत अतिरिक्त मूल्य आणि कामगार परात्मतेचे धोरण (अलगीकरणाचा सिद्धांत) हे सर्व विचार अतिशय महत्त्वपूर्ण म्हणून जगप्रसिद्ध झाले.

**२.२.१.१ स्वयं अध्ययन प्रश्न**

१) संपूर्ण जगातील कामगार वर्गाला एकत्र करून भांडवलशाहीविरुद्ध संघटित आवाज उठविणारा महान तत्त्ववेत्ता आणि भौतिकवादी विचारवंत म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?

२) भौतिक या शब्दाचा अर्थ कोणता आहे?

३) कार्ल मार्क्सच्या जीवनाला कोणत्या विद्यापीठामध्ये क्रांतीकारक वळण मिळाले?

४) कार्ल मार्क्सचे विचार कसे होते?

५) जगभरातील कामगारांचा देवदूत म्हणून ............... चा उल्लेख केला जातो?

६) मार्क्सचा कोणता ग्रंथ जर्मन अर्थकारण व राजकारण यावर आधारित आहे?

७) कार्ल मार्क्सचा ............. हा ग्रंथ विश्वविख्यात म्हणून ओळखला गेला.

८) मार्क्सने आपल्या दास कॅपीटल ग्रथांमध्ये कोणते महत्त्वपूर्ण विचार मांडले?

९) युरोपमध्ये ............. च्या विकासामुळे सरंजामदार आणि शेतमजूर यांचे संबंध अधिकच दयनीय बनले होते.

१०) मार्क्सच्या ................. विचारसरणीमुळेच पूर्व युरोप, चीन आणि डाव्या विचारसरणीची राष्ट्रे प्रभावित होऊन तिथे समाजवादी क्रांतीला सुरुवात झाली.

११) मार्क्सने कोणत्या तीन घटकाना आधारभूत मानून श्रमाला योग्य मूल्य मिळावे अशी आग्रहाची भूमिका स्वीकारली.

१२) कार्ल मार्क्सने कोणते प्रमुख समाजशास्त्रीय विचार मांडले?

**मार्क्सचे पध्दतीशास्त्र अथवा द्वंद्वात्मक भौतिकवाद :**

**किंवा**

**मार्क्सचा विरोध विकासवाद अथवा द्वंदात्मक भौतिकवाद** (Dialectical Meterialism)

मानव समाजाचा विकास हा विरोध-विकासावादातून होत असतो हे हेगेलचे तत्व कार्ल मार्क्सलाही मान्य आहे. परंतू अमूर्त विचारातून मूर्त वस्तूंची निर्मिती झाली हे मार्क्सला मान्य नाही. हेगेलने आपल्या द्वंदात्मक सिध्दांतामध्ये विचार किंवा आत्मा याला विशेष स्थान दिले, तर मार्क्सने विचार किंवा आत्मा हे

तत्व नाकारले. त्याऐवजी भौतिकवादाचा म्हणजेच प्रत्यक्षवादाचा स्वीकार केलेला आहे. यामूळेच मार्क्सचा विरोध विकासवाद हा हेगेलपेक्षा निराळा आहे. म्हणूनच मार्क्सने 'दास कॅपिटल' या ग्रंथात हेगेलच्या ग्रंथावर टीका करताना म्हटले आहे की, हेगेलचा द्वंद्ववाद हा मला डोक्यावर उभा असलेला आढळला. मी त्याला पायावर उभा केला. (I found the Hegelian dialectic standing on its head. I put it on its foot) याचा अर्थ आपण थोडक्यात पाहू. हेगेलच्या विरोध विकासवादाचे विश्लेषण करताना वापरलेले उदाहरण इथे लक्षात घेऊ. मार्क्सच्या मते, एखादा प्राणी अंगावर धावून आल्यानंतर मानवाने हातामध्ये दगड घेतला, तो दगड त्या प्राण्यावर भिरकावून मारला. तो प्राणी पळून गेला किंवा जखमी झाला असेल किंवा मेला असेल. या घटनेवरून मानवाच्या डोक्यात विचार चक्र सुरू झाले. याच दगडाला आकार देण्याचा विचार तयार झाला. यातूनच मानवाने दगडापासून अनेक प्रकारची अनकूचीदार शस्त्रे तयार केली. अश्मयुगाला सुरुवात झाली. मानवाने या शस्त्रांच्यासहाय्याने अजस्त्र प्राण्यापासून बचाव करून घेतला. त्यामुळे मार्क्स म्हणतो की, विरोध विकासवादाची सुरुवात मूर्ततेकडून (दगड) अमूर्ततेकडे (विचारांकडे) झालेली आहे. मार्क्सने संपूर्ण विश्व ही मूर्त वस्तू मानून त्या विश्वात घडणाऱ्या घटना या वास्तव स्वरूपाच्या आहेत असे मत मांडले आहे. मार्क्सचा विरोध विकासवाद हा भौतिक स्वरूपाचा असल्याने मूर्त किंवा भौतिक वस्तू ही मानवास विचार करण्यास प्रवृत्त करते. या भौतिक वस्तूंच्यामध्ये आघात-प्रत्याघात होऊन त्यातून नवीन वस्तूंची निर्मिती होते. मार्क्सच्या द्वंदात्मक भौतिकवादानुसार संपूर्ण सृष्टीचे मूलतत्व हे जड पदार्थ किंवा वस्तू (matter) आहे. मानवाला दिसणाऱ्या सर्व गोष्टी म्हणजेच जड पदार्थाचे जग आहे. सृष्टीचे मुलभूत तत्व हे पदार्थ आहे. यालाच भौतिकवाद असे म्हणतात. भौतिक विकास हा आंतरिक विरोधामुळे घडून येतो. सृष्टीचा विकास हा देखील आंतरिक विरोधामुळेच होत असतो. कोणत्याही वस्तूमध्ये त्याच्या विरोधी तत्वांचा समावेश असतो. या विरोधी तत्वामुळेच त्या वस्तूमध्ये परस्पर संघर्ष होऊन परिवर्तन किंवा विकासाची प्रक्रिया सुरू होते. मार्क्स म्हणतो की, प्रत्येक विचार किंवा घटनांमध्ये परस्परविरोधी विचार असतात. प्रत्येक विचाराच्या विरोधी विचार निर्माण होतो. त्याला प्रतिवाद असे म्हणतात. वाद आणि प्रतिवादातून संघर्ष होऊन सुसंवाद तयार होतो.

अन्वय, विरोधान्वय आणि समन्वय या विरोध विकासवादाचे विवेचन करताना औद्योगिक क्रांतीतून उदयास आलेल्या भांडवलशाही समाजव्यवस्थेचे सूक्ष्म निरीक्षण मार्क्सने केले. भांडवलशाही समाजव्यवस्था ही प्रचलित समाजव्यवस्था (अन्वय) असल्याने उत्पादक घटकांच्या साधनांवर भांडवलदारांची मालकी होती. हा भांडवलदार सत्तेच्या जोरावर कामगारांची पिळवणूक करू लागला. जास्तीतजास्त बंधने लादून कमीत कमी पैशात अधिक श्रम करून घेऊ लागला. उत्पादक वितरणावरही आपलेच नियंत्रण ठेऊ लागला. त्यामुळे भांडवलदाराला अधिकधिक नफा मिळू लागला. नफ्यातून पुन्हा नफा यामुळे भांडवलदार अधिक श्रीमंत होऊ लागला. पैशाच्या बळावर राजकीय सत्ता हस्तगत करू लागला. राज्यसत्तेवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नियंत्रण ठेऊ लागला. त्यामुळे कामगारांच्या श्रमाला दुय्यम किंमत देण्यात येऊ लागली. यामुळे श्रमिकांची स्थिती हालाखीची बनत गेली. भांडवलदाराच्या आर्थिक पिळवणूकीचा जो अन्याय कामगारांना सहन करावा लागला त्या भांडवलशाहीच्या विरूध्द विरोध करण्याच्या उद्देशातून कामगार वर्गात ऐक्य निर्माण करण्याचा मार्क्सने प्रयत्न केला. (विरोधान्वये) आपल्या श्रमशक्तीने व कल्पनाशक्तीतून उत्कृष्टप्रतीच्या मूर्त वस्तूंच्या निर्मितीत कामगारांची कुशलता हीच कारणीभूत असते. कारखान्याच्या उभारणीपासून ते उत्पादीत मालाच्या विक्रीपर्यंत वेगवेगळया अवस्थेत मानवाचे श्रमच कारणीभूत असतात. श्रमाशिवाय कोणत्याही वस्तूची निर्मिती होत नाही. हे मूलभूत जीवनसूत्र मार्क्सने आपल्या विचारातून स्पष्ट केले आहे.

भांडवलशाही (अन्वय) आणि कामगारांचा संघटीत लढा (विरोधान्वये) यांच्यातील परस्पर संघर्षातून उदयास येणाऱ्या नवीन समाजव्यवस्थेला वर्गविरहीत समाज (समन्वय) अशी संज्ञा मार्क्सने वापरलेली आहे. वर्गविरहीत (Classless Society) समाज हे मार्क्सचे अंतिम उद्दिष्ट आहे. (कुणी ना मालक, कुणी ना नोकर)

**द्वंद्वात्मक भौतिकवादाचे आधारभूत घटक – (**Factors of assumptions of Dialectical materialism**) - किंवा द्वंद्वात्मक भौतिकवादाची तत्त्वे आणि नियम:**

मार्क्सने भौतिकवादाची तत्त्वे व नियम खालीलप्रमाणे सांगितले–

**१. गतिशीलता**

भौतिक जग हे गतिशील आहे. पृथ्वी ही पण गतिशील आहे. मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादापासून जग किंवा कोणतीही गोष्ट स्थिर अथवा अपरिवर्तनशील राहू शकत नाही. ज्या गोष्टी आपणास स्थिर दिसतात. त्या प्रत्यक्षात स्थिर नसतात. प्रत्येक वस्तू एक तर विकासाकडे किंवा विनाशाकडे परिवर्तीत होत असते. या परिवर्तनाची गती कधी तीव्र तर कधी मंद असते. एखाद्या अखंड प्रवाहासारखी सृष्टीची गती चालूच असते. मार्क्स म्हणतो की, निसर्गाचे मनावर चांगले वाईट परिणाम होत असतात. मानव हा सुध्दा विश्वाचा एक भाग असल्याने विश्वात बदल झाला तर मानवावर सुध्दा त्याचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाही.

**२. घटना अंर्तसंबंधित आणि अंतनिर्भर असतात**

कार्ल मार्क्सने आपल्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताचा हा दुसरा नियम सांगितला. त्याच्या मते, भौतिक जगातील सगळ्याच बाबी परस्परावर अवलंबून असतात. प्रत्येक वस्तू ही दुसऱ्या वस्तुशी संबंधीत असते. उदा. पाणी. पाण्यावर सर्व प्राणीमात्राचे जीवन अवलंबून असते. परंतू पाणी सुध्दा हैड्रोजन आणि ऑक्सिजन यांच्या संयोगापासून बनलेले असते. हे सत्य कोणालाही नाकारता येत नाही. मार्क्स म्हणतो, पाण्याप्रमाणेच भौतिक जगातील आर्थिक व्यवस्थेचेही तसेच असते. आर्थिक व्यवस्था सुध्दा उत्पादक घटक, उत्पादनाची साधने व उत्पादन पध्दतींवर अवलंबून असते. ही आर्थिक व्यवस्थाच भौतिक जगातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आध्यात्मिक जीवन निश्चित करीत असते. याचाच अर्थ असा की, समाजातील अनेकविध व्यवस्था अंर्तसंबधीत व अंतनिर्भर असतात.

**३. परिवर्तनशीलता**

सृष्टी ही गतिशील असल्यामुळे ती परिवर्तनशील आहे. वेगवेगळ्या वस्तूंचा कधी ऱ्हास तर कधी विकास होत असतो. ऱ्हास किंवा विकासाचे स्वरूप म्हणजे एखाद्या वस्तूत घडून आलेले परिवर्तन हे नेहमीच साधे आणि सरळ स्वरूपाचे आहे असे नव्हे, तर ते वस्तूच्या भग्न पावण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. समाजाच्या बाबतीत असेच आहे. मार्क्सच्या मते, समाजात सुध्दा कधी प्रगती होत असते तर कधी अधोगती होत असते. समाजात निर्माण होणारी भग्नावस्था ही सामाजिक परिवर्तनाची क्रांतीकारी अवस्था असते.

**४. आंतरिक विरोधाभास**

समाज हा नेहमी विस्तारीत असतो. समाजाची विस्तारण्याची ही प्रक्रिया जशी सार्वत्रिक स्वरूपाची असते तशीच ती अखंड चालणारी प्रक्रिया असते. समाज विस्तारित असताना त्यात काही अडथळे निर्माण

होत असतात. ते विकासाला काही काळ रोखून ठेवतात. विस्तारवादी आणि विस्तारविरोधी शक्तीमध्ये संघर्ष होतो. हा संघर्ष जेंव्हा टोकाला जातो, तेंव्हा परिवर्तन घडून येते असे मार्क्स म्हणतो. या दोन शक्तीनाच मार्क्स दोन वर्ग मानतो. उत्पादन पध्दतीत बदल घडून आला की, नवीन वर्गाची शक्ती उदयाला येते, आणि संघर्षाची मुहुर्तमेढ रोवली जाते. जमीनदार-भूदास/ गुलाम, वर्तमानकाळात भांडवलदार/कामगार ज्याप्रमाणे जमीनदार नष्ट झाले त्याचप्रमाणे भांडवलदारही नष्ट होतील असे मार्क्सला वाटते.

वरील घटकांच्या अभ्यासावरून द्वंदात्मक भौतिकवाद स्पष्ट होतो. द्वंद्वात्मक भौतिकवाद सिध्दांतानुसार पदार्थ हेच विश्वाचे मूलाधार आहेत. सर्वप्रथम वस्तूचा विकास झाला व नंतर त्या वस्तुच्या अस्तित्वाविषयीची जाणीव निर्माण झाली. त्यामुळे पदार्थ मुख्य आहे, तर त्यासंबंधीची जाणीव ही दुय्यम आहे. कारण वस्तुच नसती तर जाणीवच निर्माण झाली नसती असे मार्क्स म्हणतो.

**द्वंद्वात्मक भौतिकवादावरील टीका (Criticism of Dialetical Materialism)**

१. या सिध्दांतात मार्क्सने भौतिकतेला अधिक प्राधान्य दिल्यामूळे तो एकांगी वाटतो, असे टीकाकारांचे मत आहे.

२. जड पदार्थ हे स्वत: गतिशील आणि परिवर्तनशील आहेत हा मार्क्सचा विचार योग्य नाही. कारण गतिशीलता व परिवर्तनशीलता ही फक्त चेतन घटकातच आहे असे टीकाकारांचे मत आहे.

३. सृष्टीचा संपूर्ण विकास हा केवळ द्वंद्वात्मक पध्दतीनेच होतो हे मार्क्सचे विचार मान्य होण्यासारखे नाहीत.

४. मार्क्सने आर्थिक घटकाला टोकाचे महत्व दिले आहे, हे अतिरंजित वाटते, कारण मानव जीवनाला संचलित करण्यात धर्म, आध्यात्मिकता, ईश्वर यांचाही काही वाटा आहे. पण ते मार्क्सला मान्य नाही.

### २.२.२ ऐतिहासिक भौतिकवाद (Historical Materialism or Materialistic interpretation of History) किंवा इतिहासाचे भौतिकवादी स्पष्टीकरण

ऐतिहासिक भौतिकवादाला 'इतिहासाचे भौतिकवादी स्पष्टीकरण' असेही म्हणतात. मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवाद समाजासाठी लागू केलेला आहे. मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या आधारावर इतिहासाची आर्थिक व्याख्या प्रस्तुत केली आहे. समाजाच्या ऐतिहासिक बाजूचा विचार बक्ले, फ्राईड व मार्क्स या तीन विचारवंतानी वेगवेगळया पध्दतीने केला आहे. बक्ले म्हणतो की, मानवी इतिहासात हवामानाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मानवी जीवनाचे निर्धारण (Determination) हे हवामानच करीत असते. फ्राईडच्या मते, मानवी जीवनात लैंगिक घटक हा अत्यंत महत्वाचा आहे तर कार्ल मार्क्सच्या मते, मानवी जीवन निर्धारण करण्यात **आर्थिक घटक** अत्यंत महत्वाचा आहे.

मानवाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करावी लागते. अर्थातच या गोष्टी मिळविण्यासाठी त्याला सतत निसर्गाशी संघर्ष करावा लागतो. त्याला आपले अस्तित्व कायम ठेवण्यासाठी निसर्गातून त्याला जे पाहिजे ते त्याने निर्माण किंवा उत्पादित केले पाहिजे. मार्क्स म्हणतो, मानवी जीवनात सगळयात महत्वाचा घटक म्हणजे उत्पादनपद्धत होय. समाजाची निर्मिती ही जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्याच्या प्रयत्नावर अवलंबून असते. अगदी प्राचीन काळापासून माणूस काहीतरी खाऊन जगत आला आहे. परंतू या खाण्याच्या पध्दती आणि जगण्याच्या पध्दती बदलत गेलेल्या आहेत. आदिम अवस्थेत उत्पादनाची साधने अत्यंत किरकोळ आणि साधी, सरळ होती. उत्पादनाच्या साधनांची मालकी

समुदायाच्या अधिन होती. या काळात मानवाला एक गोष्ट लक्षात आली की, समुहाच्या सहाय्याने जीवन यशस्वी होऊ शकते. मानवामानवामधील संबंध व सहकार्य वाढत गेले. निर्सगाशी अवितरणपणे सुरू असलेल्या संघर्षात मानवाला सुप्तगुणांची जाणीव होत गेली. त्यामूळे विचार व कल्पनाही बदलत गेल्या. जेंव्हा 'स्व'-अस्तित्वाची जाणीव झाली, तेंव्हा ते अस्तित्व टिकविणे हे त्या मानवाचे उद्दिष्ट बनले. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्याने इतर व्यक्तींची मदत घेतली. सामूहिक मालकीचे वैयक्तिक मालकी हक्कात रूपांतर झाले. तत्कालीन सरंजामशाही समाजव्यवस्था मालमत्तेच्या निकषावर विभाजीत होऊ लागली. शेतजमीन हे उत्पादनाचे प्रमुख केंद्र बनले. जमिनीची मालकी संपादन करणारा सरंजामदार अथवा जमिनदार भूमिहिनाच्या श्रमातून अधिक उत्पादन घेऊन आपले वर्चस्व प्रस्थापित करू लागला. भूदासांचे व गूलामांचे शोषण सुरू झाले. समाज हा नेहमी परिवर्तीत होत असतो. नंतरच्या कालखंडात वेगवेगळे शोध लागत गेले. औद्योगिक क्रांती झाली. उत्पादनाची साधने बदलली. नवे वर्ग अस्तित्वात आले. उदा. सरंजामदार- भूदासाच्या जागी भांडवलदार-कामगार आले. आर्थिक घटकांवर मालकी सांगणारा वर्ग व मालकी नसणारा वर्ग निर्माण झाला. त्यामुळे वर्गीय समाजव्यवस्थेत संघर्ष होऊ लागले.

समाजाच्या इतिहासाचा आढावा घेताना मार्क्स म्हणतो, सर्व प्रकारचे सामाजिक, राजकीय, बौध्दिक संबंध कायदेशीर आणि धार्मिक व्यवस्था एवढेच नव्हे तर इतिहासापासून उदयास आलेले आहेत. सर्व प्रकारचे सैध्दांतिक दृष्टिकोन हे सगळे काही जीवन जगण्याच्या एकंदरीत भौतिक परिस्थितीतूनच अस्तित्वात आलेले आहेत. सारांश, 'ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे मानवाच्या इतिहासातील घटनांची भौतिक आधारावर केलेली मीमांसा होय.' इतिहासाचा विकासच मूळी निरीक्षणातून येणाऱ्या अनुभवातून होत असतो. इतिहासात ज्या घटना घडलेल्या आहेत त्या सर्व मानवाच्या कर्माची फळे आहेत. इतिहास मानवी क्रियांना जन्म देत नसून मानवी क्रियाच ऐतिहासिक घटना असून तिच्यामूळे मनुष्य जीवित रहाण्याचे साधन निर्माण करतो. म्हणून मार्क्स म्हणतो की, इतिहास म्हणजे 'मानवाने त्याच्या स्वत:च्या लक्ष्य प्राप्तीसाठी केलेली क्रिया आहे. (History is the activity of man in persuit of his ends) मार्क्सने वापरलेली ऐतिहासिक भौतिकवादाची संकल्पना म्हणजे वस्तुत: ते इतिहासाचे भौतिक वस्तुंशी निगडीत स्पष्टीकरण आहे.

- **ऐतिहासिक भौतिकवाद सिद्धांताचे मुलाधार :**

जर्मन विचारवंत कार्ल मार्क्स याचा ऐतिहासिक भौतिकवाद सिद्धांत विस्तृतपणे अभ्यासताना त्याच्या या सिद्धांताचे १) उत्पादन पद्धत आणि २) उत्पादन संबंध हे जे दोन मुलाधार आढळतात त्याचे सविस्तर विश्लेषण करणे हे महत्त्वाचे आहे. कारण त्याचा वरील सिद्धांत हा या दोन मूलभूत आधारावरच आधारलेला आहे.

**१) उत्पादन पद्धत** (Mode or Method of Production) :

मार्क्सच्या मते, मानवाला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन करावे लागते. अर्थातच त्यासाठी त्याला वेगवेगळ्या उत्पादन पद्धतींचा अवलंब करावा लागतो. मानवाने आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी ज्या वेगवेगळ्या उत्पादन पद्धतींचा अवलंब केला त्यावरच ऐतिहासिक घटना अवलंबून असतात असे मार्क्सचे मत होते. थोडक्यात, भौतिक अस्तित्वच इतिहासाचा आधार असून मानवाला इतिहास घडविण्यासाठी जीवंत राहणे गरजेचे असते. त्या दृष्टीने मानवाने विविध उपकरणे निर्माण केली. संतती निर्मितीचे कार्य केले आणि हळूहळू सामाजिक जीवनातील अन्य क्षेत्रांत विकास केला.

अशा रीतीने जीवन आणि त्याच्या भौतिक गरजांचे ध्येय हीच उत्पादन पद्धत असल्याने अशी पद्धत सर्व ऐतिहासिक घटनांची जननी आहे, असे मार्क्सने प्रतिपादन केले. थोडक्यात, भौतिक अस्तित्वाच्या रक्षणासाठी आवश्यक सामग्रीचे उत्पादन हाच मानवी क्रियांचा केंद्रबिंदू असतो. त्यामुळे मानवी जीवनाचे अस्तित्व राखण्यासाठी हजारो वर्षांपासून मानवी क्रियेसारखी ऐतिहासिक घटना सतत घडत असते. त्यामुळेच मार्क्सने उत्पादन पद्धतीला ऐतिहासिक घटनांचा मौलिक आधार मानून तिच्या आधारे मानवी इतिहासाचे खालील पाच विभागात विभाजन केले.

- **मानवी इतिहासाच्या विकासाचे टप्पे किंवा अवस्था :**

**अ) आदिम युग** (Primitive Age) : मार्क्सने भौतिक उत्पादन शक्तीच्या आधारावर मानवी इतिहासाचा आदिम युग हा सर्वात प्राथमिक विभाग मानला. यामध्ये उत्पादनाच्या साधनावर संपूर्ण समाजाचा अधिकार होता. उदा. जंगलातील प्राण्यांची शिकार करून जंगलातील फळे, फुले एकत्र करून आपला उदरनिर्वाह केला जातो. थोडक्यात, या प्राथमिक युगामध्ये प्रामुख्याने उत्पादन पद्धत नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून होती.

**ब) दास्य युग** (Age of Slavery) : दास्य युग म्हणजे विकासाच्या इतिहासातील दुसरी अवस्था असून यामध्ये उत्पादनाची साधने स्वत:च्या हातामध्ये ठेवून प्रत्यक्ष उत्पादन कार्य करणाऱ्या व्यक्तींवर मालकी हक्क मिळविण्याची वृत्ती निर्माण झाली. यातून समाजात गुलाम आणि त्यांचे मालक असे दोन वर्ग उदयास आले. अर्थातच, या युगामध्ये व्यक्तिगत संपत्तीचा अतिरेक विचार विकसित होऊन बहुसंख्य जनता दास झाली, तर उत्पादन साधनांची मालकी अल्पसंख्यांक अशा मालक वर्गाकडे आली.

**क) सरंजामशाही युग** (Fedualism Age) : मार्क्सच्या मते, सरंजामशाही युगामध्ये शेतीचे महत्त्व वाढले. भूमीवर ज्या सामंतांचा अधिकार होता ते शासक झाले तर ज्यांना जमीनदारांच्या जमिनीवर अल्पशा मोबदल्यात भरपूर कष्ट करावे लागत होते ते भूमिहीन शेतमजूर शोषित झाले. यातून सरंजमादार आणि शेतमजूर असे दोन वर्ग निर्माण होऊन त्यांच्यातील संघर्षाला प्रारंभ झाला.

**ड) भांडवलशाही युग** (Capitalism Age) : सरंजामदार (सामंत) आणि शेतमजूर यांच्यातील संघर्षामुळे सरंजामशाहीचा प्रभाव कमी होत गेला आणि त्यानंतर औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात क्रांती घडून आली. अर्थात, नवीन पद्धतीने उत्पादन करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता भासू लागली. उद्योगधंद्याच्या विकासासाठी भांडवलाचे (Capital) महत्त्व वाढले आणि उत्पादन साधनांची मालकी असणारा आणि उत्पादन प्रक्रियेत केवळ शारीरिक श्रम करणारा असे अनुक्रमे भांडवलदार आणि कामगार हे दोन वर्ग उदयास आले. मार्क्सने भांडवलदारांना बुर्जूआ (Bourgeoisie) तर कामगारांना कष्टकरी वर्ग (Proletarian) असे नाव दिले. त्याने या वर्गाचा अनेक वेळा उल्लेख केला. या दोन्ही वर्गांचे परस्पर हितसंबंध हे परस्परविरोधी असल्यामुळे त्यांच्यात सतत संघर्ष होऊ लागले. मार्क्सच्या मते, सध्याचा समाज हा या युगातूनच जात आहे.

**इ) समाजवादी युग** (Socialism Age) : भांडवलशाही युगानंतर समाजवादी युग अस्तित्वात येईल, असे मार्क्सचे भाकित होते. भांडवलदार व कामगार या दोन वर्गांतील संघर्ष तीव्र होत जातील. त्यामध्ये भांडवलदारांचा नाश होऊन त्यांच्या जागी कामगारांची सत्ता अस्तित्वात येईल. अशी समाजव्यवस्था वर्गविरहीत अथवा शोषणविरहीत असेल. उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची असतील. प्रत्येक व्यक्तीला पात्रतेप्रमाणे कामाचा मोबदला मिळेल. यालाच मार्क्सने समाजवादी युग म्हणून संबोधिले. अशा

रितीने समाजवादी युग हे अंशत: प्रथम साम्यवादी युगाचे प्राथमिक स्वरूप असेल. अशी समाजव्यवस्था रशिया, युगोस्लाव्हिया या ठिकाणी पहावयास मिळते.

२) **उत्पादन संबंध :** (Production Relationships) :

मार्क्सच्या मते, उत्पादन पद्धतीप्रमाणेच उत्पादनक्षेत्रातील संबंध हा ऐतिहासिक भौतिकवादाचा दुसरा प्रमुख आधार आहे. वस्तुंचे उत्पादन करताना व्यक्तीला इतरांच्या सहकार्याची खूप जरूरी असते. मार्क्स म्हणतो, उत्पादनात मनुष्य केवळ निसर्गाबरोबरच नव्हे तर परस्पराबरोबर देखील क्रियाशील असतो. (In production men not only act on nature but also on one another) प्रत्येक उत्पादन प्रक्रियेत अंतर्भूत होणाऱ्या संलग्न व्यक्तींमध्ये परस्परसंबंध निर्माण होणे अनिवार्य असते. यातून मालक (Employer) व नोकर (Employee) असे दोन वर्ग उदयास आले. पैकी पहिल्या वर्गाकडे (मालक) सेवांचे नियोजन आणि दुसऱ्या वर्गाकडे (नोकर) सेवा करण्याचे कार्य असते. मालक वर्ग नेहमी मालक-सेवक संबंधांना कायम ठेवण्याचा प्रयत्न करतो. तसेच उत्पादन साधनांचे नियंत्रण करण्याच्या उद्देशाने तो कामगार वर्गावर एकाधिकार पद्धतीचा अवलंब करतो. अर्थातच अशावेळी त्यांच्यामध्ये वर्ग संघर्ष सुरू होतो. यातूनच पुढे सेवक वर्गामध्ये मालक वर्गाविरुद्ध क्रांती करण्याची वृत्ती वाढत जाते.

मार्क्सच्या मते, क्रांती सफल होण्यास अनुकूल सामाजिक परिस्थितीची गरज असते. त्यामुळे मानवी इतिहासाचे आकलन होण्यास उत्पादन पद्धतीमधून निर्माण झालेल्या संबंधातील तणाव विचारात घेणे अतिशय गरजेचे असते. प्रामुख्याने वैचारिक क्रांती ही उत्पादन पद्धती आणि त्यामधील संबंधातील क्रांतीमुळे घडून येते. प्रत्येक युगात शासक वर्ग (उदा. सरंजामदार, जमीनदार, भांडवलदार) बलिष्ठ असून तो शोषित वर्गावर (उदा. गुलाम, शेतमजूर, कामगार) आपले प्रभुत्व प्रस्थापित करतो. त्यामुळे समाजाचा इतिहास हा उत्पादन संबंधाचा विकास व त्यातील संघर्ष यातून निर्माण झाला असे मार्क्सने स्पष्ट केले.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, मानवाला स्वअस्तित्वासाठी भौतिक परिस्थितीने ऐतिहासिक विचारप्रवाहात जन्म देण्यास भाग पाडले. उत्पादन प्रक्रिया अथवा उत्पादन पद्धत आणि उत्पादन संबंध यांच्यातील संघर्षामुळेच ऐतिहासिक क्रांती घडून आली. ही क्रांती शोषित वर्गाकडून म्हणजे गुलाम, शेतमजूर, कामगार इत्यादींच्याकडून केली जाते. खरे पाहता ऐतिहासिक घटना शासकांच्या म्हणजे सरंजमादार, जमीनदार अथवा भांडवलदार यांच्या क्रिया-प्रक्रियांशी संबंधित नसून त्या जनसामान्यांशी संबंधित आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून जीवित राहण्यासाठी भौतिक उत्पादनात परस्परांना सहकार्य केले जाते.

मार्क्सची ऐतिहासिक भौतिकवाद ही संकल्पना एखादी ठाम मतप्रणाली नव्हे तसेच हे एखादे निश्चित सूत्र नाही तर ते एक अनुभवाधिष्ठित विज्ञान आहे. तसेच ते मार्गदर्शक तत्त्व आहे की, ज्याद्वारे निश्चित असे ऐतिहासिक अन्वेषण करता येते.

- **ऐतिहासिक भौतिकवाद सिद्धांताचे मुल्यमापन** (Evaluation of Historical Materialism) :

कार्ल मार्क्सने मानवी इतिहासाच्या विकासासंदर्भात जो ऐतिहासिक भौतिकवाद सिद्धांत स्पष्ट केला त्यावर अनेक विचारवंतांनी खालीलप्रमाणे टीका केली.

१) मार्क्सने मानव समाजात झालेले संघर्ष हे केवळ आर्थिक कारणातूनच होतात असा मांडलेला विचार चुकीचा आहे, कारण धार्मिक तसेच वांशिक कारणातून देखील संघर्ष झालेले आहेत. त्यामुळे मार्क्सचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन एकांगी वाटतो.

२) मार्क्सच्या मते, व्यक्तीमत्त्वाचा विकास हा भौतिक परिस्थितीतून होत असतो. भौतिक परिस्थितीच विशिष्ट वर्तन करण्यास प्रवृत्त करते. याला मानसशास्त्रज्ञानी विरोध दर्शविला आहे. त्यांच्या मते, व्यक्तीमत्त्व विकास हा बाल्यावस्थेपासून संस्कारमय कौटुंबिक वातावरणातून होत असतो. मार्क्सने मात्र याकडे दुर्लक्ष केले.

३) मार्क्सच्या मते, आर्थिक कारण हेच राजकीय सत्ता आणि शक्तीचे मूळ कारण आहे. परंतु केवळ आर्थिक घटकच राजकीय शक्तीचे मूळ कारण नसते अशी टीका करण्यात आली.

४) ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत परिवर्तनाची व्याख्या योग्य पद्धतीने करू शकत नाही, तसेच तो पुरेशा पुराव्यांच्या आधारे मांडण्यात आलेला नाही, अशी देखील टीका करण्यात आली.

५) मानवी समाजातील सामाजिक संबंध हे आर्थिक घटकाशिवाय सामाजिक, राजकीय, वांशिक, व्यक्तीगत आणि संस्थात्मक संबंधावर आधारलेले असतात. त्यामुळे आर्थिक संबंध आणि समाजाचा इतिहास यासंबंधीचे मार्क्सचे विवेचन हे न पटणारे आहे.

**२.२.२.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

**अ) बहुपर्यायी प्रश्न** (Objective questions)

१) कार्ल मार्क्सने समाज आणि इतिहास यासंबंधी जो सिद्धांत मांडला त्याला ........... असे म्हटले जाते.

अ) द्वंद्वात्मक भौतिकवाद ब) ऐतिहासिक भौतिकवाद

क) अलगीकरण ड) वर्ग संघर्ष

२) 'उत्पादन प्रणाली' या संकल्पनेबद्दल कोण प्रसिद्ध आहे ?

अ) मॅक्स वेबर ब) एमिल डुरखाईम क) पॅरेटो ड) कार्ल मार्क्स

३) कोणत्या जर्मन विचारवंताने इतिहासाचे भौतिकवादी स्पष्टीकरण केले ?

अ) कार्ल मार्क्स ब) मॅक्स वेबर क) ऑगस्त कॉम्त ड) हर्बर्ट स्पेन्सर

४) बक्ले या विचारवंताच्या मते, मानवी इतिहासात खालील कोणता घटक महत्त्वाचा आहे?

अ) हवामान ब) आर्थिक क) लैंगिक ड) राजकीय

५) मानवाने स्वत:च्या लक्ष्य प्राप्तीसाठी केलेली क्रिया म्हणजे ............ होय.

अ) इतिहास ब) मानवशास्त्र क) भूगोल ड) मानसशास्त्र

६) .............. कालखंडात वर्गविरहीत समाजव्यवस्था होती.

अ) आदिम ब) ग्रामीण क) शहरी ड) लष्करी

**ब) एका वाक्यात उत्तरे** (Answers in one sentences)

१) इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण कोणी केले ?

२) मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवाद सिद्धांताचे कोणते दोन मूलाधार आहेत ?

३) उत्पादन साधनावर संपूर्ण समाजाची मालकी म्हणजे कोणते युग होय ?

४) मार्क्सच्या मते, राजकीय सत्ता आणि शक्ती यांचे मूळ कारण कोणते आहे ?

५) 'दास कॅपीटल' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

### २.२.३ मार्क्सचे भांडवलशाहीसंबंधीचे विश्लेषण : वर्ग व वर्ग संघर्ष

मार्क्सने भांडवलशाहीचे विश्लेषण करताना वर्गसिद्धांत व वर्ग संघर्ष, अतिरीक्त मूल्य आणि कामगार परात्मता यासंबंधीचा आढावा घेतला.

**वर्ग आणि वर्गसंघर्ष (Class & Class struggle) –**

मार्क्सच्या एकंदरीत सामाजिक विचारांमध्ये वर्ग आणि वर्ग संघर्षासंबधीचे विचार हे महत्वपूर्ण आहेत. समाजशास्त्रीय अध्ययनात वर्ग ही संकल्पना फारच लवचिकतेने वापरली जाते. विविध स्वरूपाच्या व्यावसायिक गटांसाठी वर्ग ही संज्ञा वापरली जाते. उदा. व्यापाऱ्यांचा वर्ग, शिक्षक वर्ग, कारकुनांचा वर्ग, कामगार वर्ग इ. समाजशास्त्रीय दृष्टीने वर्ग हा एक सामाजिक गट असून गटाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात येते.

'अनेक व्यक्ती स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी एकत्र येऊन परस्परांशी आंतरक्रिया करतात, तेंव्हा त्यातून गट निर्माण होतात. वर्गाची निर्मितीसुध्दा विशिष्ट स्थितीत व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी झालेली असते.'

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. या विचाराला मार्क्सचा जरी विरोध नसला तरी त्याच्या मते, मनुष्य हा प्रामुख्याने वर्गप्रिय प्राणी आहे. याचा समाजशास्त्रीयदृष्टया अर्थ असा आहे की, मनुष्य सामाजिक जीवन जगताना कोणत्या ना कोणत्या वर्गाचा सभासद असतोच. समाजातील वर्गाच्या निर्मितीसंबंधात चर्चा करताना कार्ल मार्क्स म्हणतो की, अतिप्राचीन काळी समाजात वर्ग नव्हते. मनुष्य निसर्गातील त्याला हव्या त्या वस्तूंचा आणि साधनाचा उपयोग आपल्या गरजा भागविण्यासाठी करीत असे. निसर्गातून ज्या काही वस्तू मिळतात त्या सगळया समुदायासाठी उपयोगात आणल्या जात असत. सगळ्यांना समान वाटप करून सुखाने जगण्याची किमया प्राचीन मानवाला अवगत होती. परंतू हळूहळू मानवाच्या स्वार्थी स्वभावाने उचल घेतल्याने वाटपासंबंधी समुदायातील मतभेद सुरू झाले. यातूनच समुदायाचे विभाजन घडून आले. समुदाय जीवनाची प्रक्रिया विस्तारित झाल्याने समाज हा परस्पराविरोधी अशा शोषक आणि शोषीत वर्गात विभागला गेला. मार्क्सच्या मते, आधुनिक समाजातील वर्गाचा विचार करता त्यांच्या मिळकतीवर आधारित तीन वर्ग अस्तित्वात आले.

१. पैसा हेच भांडवल आहे असा भांडवलदार वर्ग

२. जमीनीची मालकी असणारा जमीनदार वर्ग

३. केवळ श्रमशक्ती हेच भांडवल असा कामगार/श्रमिक वर्ग

पहिल्या वर्गाचे आर्थिक उत्पन्न हे त्यांना मूळ भांडवलावर मिळणाऱ्या नफ्यावर अवलंबून असते. दुसऱ्या वर्गाचे आर्थिक उत्पन्न हे स्वमालकीच्या जमीनीत होणाऱ्या अन्नधान्योत्पादनावर अवलंबून असते तर तिसऱ्या वर्गाचे उत्पन्न हे त्यांच्या श्रमाद्वारे मिळणाऱ्या मोबदल्यावर अवलंबून असते.

समाजात वर्ग कसे तयार होतात ? याचे उत्तर देताना मार्क्स म्हणतो, वर्ग ठरविण्यासाठी व्यक्तीची मिळकत आणि मिळकतीचा उगम पाहिला जातो. मार्क्सच्या मते, वर्ग म्हणजे समाजात उत्पादन क्रियांमध्ये कार्यरत असलेल्या अशा व्यक्तींचा समूह की, जे एकसारखे कार्य करतात आणि ज्यांचा दुसऱ्या व्यक्तींशी एकसारखा संबंध आहे. तसेच ज्यांचे सामान्य हित हे समान आहे, अशा वर्गाला सामाजिक वर्ग असे म्हणतात. वर्ग विभाजनावर चर्चा करताना मार्क्स म्हणतो की, श्रम विभाजनाच्या तत्वामुळे औद्योगिक आणि व्यापारी कामगारांचे शेती कामगारांपासून विभाजन करण्यात आले. तसेच शहरी कामगारांचेही खेडयातील कामगारापासून विभाजन झाले. याचा परिणाम असा झाला की, विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांमध्ये वर्ग जाणीव निर्माण झाली. एवढेच नव्हे तर उद्योगधंदयातील कामगारांचे व्यापारी क्षेत्रात गुंतलेल्या कामगारापासून विभाजन करण्यात आले. या अशा संक्रमण काळात श्रमविभाजनाच्या तत्वानुसार विविध वर्गांचे वर्गांतर्गत विविध उपशाखात विभाजन घडून आले. हे अशा प्रकारचे विभाजन साहजिकच कामगारांच्या गटातील कामाच्या किंवा नोकरीच्या स्वरूपावरून निश्चित झाले. सारांश, मनुष्याच्या आर्थिक मिळकतीवरून किंवा उत्पन्नाच्या साधनांवरून व्यक्तीचा समाजातील वर्ग निश्चित होतो. आर्थिकदृष्ट्या सबल असलेला वर्ग सहाजिकच दुर्बल वर्गाचे शोषण करीत असतो. त्यामुळे वर्ग संघर्षाची बिजे ही आर्थिक घटकातच एकवटलेली असतात, असे मार्क्स म्हणतो.

**मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिध्दांत – (**Theory of Class Struggle by Karl Marx**) –**

कार्ल मार्क्सचा वर्ग संघर्षाचा सिध्दांत म्हणजे त्याच्या अविश्रांत परिश्रमाचा दाखला आहे. त्याने मांडलेल्या समाजशास्त्रीय विचारातील त्याचा हा सिध्दांत अत्यंत महत्वपूर्ण समजला जातो. आपल्या वर्ग संघर्षाच्या सिध्दांतात कार्ल मार्क्सने खालील गोष्टी सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. उत्पादन विकासाच्या ऐतिहासिक टप्प्यात केव्हा तरी वर्गाचे अस्तित्व निर्माण होणे अपरिहार्य आहे.

२. वर्गसंघर्ष हा कामगारांच्या हुकूमशाहीकडे वाटचाल करण्याचा मार्ग आहे.

३. कामगारांची हुकूमशाही ही समाजातील एक संध्याकाळ असून त्यातून कालांतराने वर्गाचे अस्तित्व नष्ट होऊन वर्गविरहित समाज अस्तित्वात येईल.

वर्ग निर्माण होण्यास समाजाची उत्पादन विकास प्रक्रिया कारणीभूत असते. तसेच उत्पादन वितरण व्यवस्थेतील असमानतेमुळे वर्ग संघर्ष निर्माण होतात. तुला जास्त की मला जास्त असे वाद निर्माण होऊ लागतात. यातूनच वर्गरहित समाजाची निर्मिती होते. याचे अधिक स्पष्टीकरण करताना मार्क्स म्हणतो की, समाज हा विविध वर्गात विभागला गेला असल्याने या समाजात गरीब व श्रीमंत तसेच शोषक व शोषीत अशा दोन वर्गात समाजाचे विभाजन होते. यावर्गात एकमेकांविषयी प्रेम किंवा सहकार्याची भावना निर्माण होणे अशक्यच आहे. प्रत्येक वर्गाचे हितसंबंध हे वेगवेगळे होते. शेकडो वर्षापासून मालक वर्ग हा श्रमिकांचे मग ते गुलाम, शेतमजूर, किंवा कारखान्यात कामगार वर्ग असो, त्यांचे अतिशय क्रूरतेने शोषण करीत आलेला आहे. त्यामुळे शोषीत वर्गाने स्वतंत्र आणि सुखी जीवनाच्या प्राप्तीसाठी संघर्ष करणे ही गोष्ट देखील स्वाभाविकच होती. आतापर्यंतच्या समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. हा संघर्ष कधी लपून छपून तर कधी उघड-उघड झालेला आहे. या संघर्षाचा परिणाम प्रत्येकवेळी समाजाच्या क्रांतीकारी पुर्ननिर्माणामध्ये झाला. भांडवलशाही वर्ग संघर्षाच्या निर्मितीचे आणि स्वत:च्या विनाशाचे साधन बनते. क्रांतीमध्ये शोषक वर्गाचा विनाश होतो. आणि शोषित वर्गाची हूकुमशाही निर्माण होते. सारांश, या वर्गसंघर्षामध्ये मजूरांचा विजय निश्चित आहे आणि एकवेळ अशी येईल की, उत्पादनाच्या साधनांवर

आपला सामुहिक हक्क प्रस्थापित करण्यामध्ये मजूरवर्ग यशस्वी होईल. यातूनच साम्यवादी समाजव्यवस्था अस्तित्वात येईल, असा मार्क्सचा आशावाद आहे.

कार्ल मार्क्सच्या वर्ग संघर्ष सिद्धांतामधील महत्त्वाच्या बाबी : मार्क्सच्या वर्ग संघर्ष सिद्धांतामधील महत्त्वाच्या बाबी खालीलप्रमाणे निदर्शनास येतात.

**१. कामगार वर्गाचा उदय –**

औद्योगिक क्रांतीनंतर दोन वर्ग अस्तित्वात आले. उदा. १. भांडवलदाराचा आणि २. कामगारांचा. महाकाय यंत्रे खरेदी करणे कामगारांना शक्य नव्हते. त्याचप्रमाणे अशा यंत्रांना हलविणे शक्य नव्हते. त्यामुळे कामगार यंत्राच्या ठिकाणी येऊन काम करू लागले. सगळयांची दु:खे समानच असल्यामुळे परिस्थितीची जाणीव होत गेली. यातूनच वर्ग जाणीव (Class Consciousness) निर्माण होऊ लागली.

**२. दारिद्र्यात वाढ –**

भांडवलदारी समाजव्यवस्थेत भांडवलदारांच्याकडून कामगारांची पिळवणूक मोठया प्रमाणात होऊ लागली. कामगारांना मिळणाऱ्या वेतनात त्यांच्या गरजा पूर्ण होत नसल्याने उपासमार, आजार, भूकबळी (दारिद्र्य) वाढत गेले.

**३. आर्थिक व राजकीय अधिकारांचे केंद्रिकरण –**

भांडवलदारांकडे संपत्ती आल्यामुळे त्यांना सत्तेची स्थाने प्राप्त होऊ लागली. याचा वापर करून ते कामगारांची पिळवणूक करू लागले. कामगार मात्र सत्तेपासून वंचित होत गेले. परिणामत: कामगारांच्या मनात भांडवलदार वर्गाबद्दल असंतोष तयार होत गेला.

**४. क्रांती –**

भांडवलदार संपत्तीचा व सत्तेचा वापर करून कामगारांची पिळवणूक करू लागले की, कामगार एकत्र येऊ लागतात संघर्षाला तयार होतात. यातूनच क्रांती घडून येते आणि भांडवलशाही नष्ट होऊ लागते.

**५. साम्यवादाचा उदय –**

उत्पादन प्रक्रियेत कामगारांची हुकूमशाही तयार होते. कामगारांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर संपत्ती ही समाजाच्या मालकीची होईल, वर्गव्यवस्था नष्ट होईल आणि संघर्षविरहित समाज निर्माण होईल.

**वर्गसंघर्ष सिध्दांताचे मूल्यमापन (Evalution of Marxian Class Struggle Theory) –**

१. मार्क्सचा हा सिध्दांत स्तरिकरणाचा सिध्दांत नसून तो व्यापक सामाजिक परिवर्तनाचा सिध्दांत आहे.

२. टी. बी. बाटमोर यांच्या मते, मार्क्सचा वर्ग सिध्दांत म्हणजे समाजशास्त्राला लाभलेले मुख्य योगदान आहे.

३. मार्क्सचा हा सिध्दांत वस्तुस्थिती निदर्शक आहे.

४. हा सिध्दांत केवळ संघर्षाच्या तत्वालाच अधिक महत्व देतो. म्हणून हा सिध्दांत एकांगी आणि दोषपूर्ण आहे.

५. समाजामध्ये सतत वर्गसंघर्ष असतो हे मार्क्सचे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण वाटते.

६. सामाजिक श्रेणींना आर्थिक आधारावर संघटीत वर्ग म्हणून संघर्षाची कल्पना करणे ही फार मोठी चूक आहे.

७. वर्ग संघर्षामध्ये मजूरांचाच विजय होणार आहे. परंतू हे ऐतिहासिक सत्य नाही.

८. भांडवलशाहीच्या विनाशाबाबतची मार्क्सची भविष्यवाणी खोटी ठरलेली आहे.

**२.२.३.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न –**

१) वर्ग निर्माण होण्यास ...................... प्रक्रिया कारणीभूत असते.

२) औद्योगिक क्रांतीनंतर .................... वर्ग अस्तीत्वात आले.

३) मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत हा ...................... आहे.

**२.२.४ मार्क्सची अतिरिक्त मूल्य संकल्पना आणि कामगार परात्मता (**Marx's concept of Surplus Value and Alienation) :–

भांडवलशाही विकासाच्या काळात उत्पादन–विनिमयाचे चक्र सातत्याने खंड न पडता चालूच असते. संपत्ती कशी वाढते आणि नफा कसा होतो यासारखे प्रश्न भांडवलशाहीत निर्माण झाले असले तरी उत्पादनात खंड पडत नाही, हे भांडवलशाहीचे वैशिष्ट्य समजले जाते. मार्क्सने आपल्या अतिरिक्त मूल्य सिध्दांतात भांडवलशाहीची गतिमानता कशात आहे. या प्रश्नाचे उत्तर अत्यंत मार्मिकपणे स्पष्ट केले. या त्याच्या विचारामुळे अर्थशास्त्रातील अनेक कठीण प्रश्नावर प्रकाश पडला आहे.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत माणसाचे श्रम हे सुध्दा एक विक्रेय वस्तू बनते. कारखान्यात काम करणारा मजूर हा दररोज आठ ते दहा तास काम करतो. कामाच्या मोबदल्यात कामगाराला वेतन आणि मजूरी मिळते. दुसऱ्या शब्दात मालक हे श्रमिकांची श्रमशक्ती विकत घेत असतो. उत्पादन प्रक्रियेत कामगारांच्या श्रमामुळे वस्तुनिर्मिती होते, पण भांडवलदार कामगारांच्या श्रमाचे पूर्ण मुल्य न देता अल्पसा भाग वेतन म्हणून देतो. ''कामगारांनी प्रत्यक्ष निर्माण केलेले मूल्य आणि त्यांना मिळणारे वेतन यातील फरक म्हणजे अतिरिक्त मूल्य'' होय.

अतिरिक्त मूल्याची निर्मिती कशी होते हे स्पष्ट करताना मार्क्सने कामगाराच्या श्रमाची विभागणी दोन प्रकारे केली आहे.

१. आवश्यक श्रम, २. अतिरिक्त श्रम

**१. आवश्यक श्रम –**

ज्या श्रमातून कामगाराच्या स्वत:च्या वेतनाइतके मूल्य निर्माण होते त्याला आवश्यक श्रम असे म्हणतात.

**२. अतिरिक्त श्रम –**

आवश्यक श्रमानंतर कामगाराने केलेले श्रम म्हणजे अतिरिक्त श्रम होय.

मार्क्सने भांडवलशाहीपूर्व (PreCapitalism) आणि भांडवलशाही व्यवस्थेत विनिमय पध्दत कशी होती हे स्पष्ट केले आहे. भांडवलशाही पूर्व अवस्थेत वस्तुविनिमय (Barter System) पध्दत होती. कालांतराने विनिमयासाठी पैशाचा वापर सुरू झाला. मार्क्सने वस्तू-पैसा-वस्तू याचे वर्णन सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

C - Community, M- Money, C- Commodity (C-M- C)

वस्तू देऊन पैसा मिळविणे आणि त्या पैशातून दुसरी वस्तू घेणे या व्यवहारात पैसा हे फक्त विनिमयाचे माध्यम होते. यातून अतिरिक्त मूल्य निर्माण होत नाही. भांडवलशाहीत श्रमाचे शोषण करण्यासाठी पैसा वापरला जातो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदार जो पैसा घेतो तो वस्तुच्या खरेदीसाठी नव्हे, तर गुंतविलेला पैसा परत मिळविण्यासाठी यात भांडवदार पैसे खर्चून मिळवितात. हे पुढील सूत्राने दाखविले जाते. M- C- M. भांडवलदार पैसा खर्चून वस्तू घेतो व वस्तू विकून पैसा मिळवतो, यात दुसरा M पाहिल्या M पेक्षा अधिक असला पाहिजे अशी भांडवलदाराची अपेक्षा असते. त्यामुळे दुसरा M हा M+ M असून M हा अतिरिक्त मूल्य दर्शवितो. अतिरिक्त मूल्याचा दर स्पष्ट करताना मार्क्सने गणिती पध्दतीचा वापर केलेला आहे. त्यांच्या मते, कोणत्याही वस्तूचे मूल्य तीन घटकावर अवलंबून असते.

१. स्थिर भांडवल -[C] २. बदलते भांडवल -[V] ३. अतिरिक्त भांडवल – [S]

१. स्थिर भांडवलात कारखान्याची जागा, इमारत, यंत्रसामुग्री, इंधन, कच्चा माल यांचा समावेश होतो.

२. बदलत्या भांडवलामध्ये ‘श्रम’ या घटकावरील खर्च विचारात घेतला जातो.

३. अतिरक्ति मूल्य म्हणजे कामगाराने निर्माण केलेल्या वस्तूचे मूल्य आणि कामगारांना दिलेले वेतन यातील फरक होय.

**वस्तूचे मूल्य** C+V+S -

अतिरिक्त मूल्य मिळविण्याच्या दोन पध्दती आहेत.

**निरपेक्ष अतिरिक्त मूल्य (Absolute Surplus Value) –**

‘कामाचे एकूण तास वाढवून जे अतिरिक्त मूल्य मिळविले जाते त्याला निरपेक्ष अतिरिक्त मूल्य असे म्हटले जाते.’ कामगाराला वस्तुत: उदरनिर्वाहापुरते वेतन दिले जाते. कामाचे तास वाढवून त्यांच्याकडून अधिक उत्पन्न मिळविले जाते. उदा. एक कामगार दिवसातून आठ तास काम करतो. त्याला उदरनिर्वाहापुरते वेतन दिले जाते. कामाचे तास वाढवून त्याच्याकडून अधिक उत्पन्न मिळविले जाते. त्याला उदरनिवार्हासाठी चार तास काम करणे आवश्यक आहे. एका तासला ४० रूपये मजूरी आहे असे गृहित धरले तर 8X40=320 रूपयाचे काम करतो. पण कामगाराला उदर निर्वाहासाठी चारच तास काम करणे आवश्यक आहे. म्हणजे 4X40=160 कामगाराने एका दिवसात केलेले काम – त्याच्या चरितार्थासाठी आवश्यक असणारे वेतन = कामाचे तासाचे वेतन = अतिरिक्त मूल्य 320-160=160/- त्यामुळे कामगाराने 160/- रूपयाचे अतिरिक्त मूल्य निर्माण केले. जर कामगाराकडून आणखी दोन तास जादा काम करवून घेतले तर अतिरिक्त मूल्य 160 + 80 = 240 इतके होईल. कारण चरितार्थ वेतन बदलत नाही. त्यामुळे जादाचे रू. 80/- मालकालाच मिळतात. अशाप्रकारे कामगारांची भांडवदाराकडून पिळवणूक होते.

**सापेक्ष अतिरिक्त मूल्य (Relative Surplus Value) –**

मार्क्सच्या मते, 'भांडवलदार कामाचे तास कायम ठेवतो. पण निर्वाह वेतनाइतके श्रम आणि अपेक्षित श्रम यांच्यात बदल करतो व जे ज्यादा अतिरिक्त मूल्य मिळवितो त्याला सापेक्ष अतिरिक्त मूल्य म्हणतात.' हे आपण एका उदाहरणाने लक्षात घेऊ

उदा. दिवसाकाठी आठ तासात कामगाराने काम केल्यास २०० वस्तू (नग) निर्माण करतो.

एका वस्तूची किंमत रू. १००/- आहे असे गृहित धरल्यास

उत्पादन मूल्य - २०० x १०० = २०,०००/-

कामगाराला तासाला रू. ४० मजुरी दिल्यास आठ तासाचे रू. ३२०/- होतात.

कामगाराने यंत्राचा वापर करून आठ तासात २०० ऐवजी ३०० वस्तू तयार केल्यास

३०० **x** १०० = ३०,०००/- उत्पादन मूल्य होईल.

कामगाराला मात्र रू. ३२०/- मजूरी मिळाली.

मालकाला मात्र ३०,००० - ३२० = २९,६८० इतके सापेक्ष मूल्य निर्माण होते.

यंत्रोत्पादन पध्दतीत भांडवलदार हे नेहमी बदल करतात. त्यामुळे त्यांच्या अतिरिक्त नफ्यात वाढ होत जाते. कामगारांच्या चरितार्थ उत्पन्नात मात्र वाढ होत नाही. काही वेळा कामाचे तास वाढविले जातात. परंतु त्याप्रमाणात वेतन वाढ होत नाही. त्यामुळे कामगारांचे शोषण मोठया प्रमाणात केले जाते असे मार्क्सचे मत आहे. मार्क्सच्या या सिध्दांतावर खालीलप्रमाणे टीका करण्यात आली.

१. मार्क्सने आपल्या सिध्दांतात श्रमाला अवास्तव महत्व दिले आहे. श्रमाला महत्व जरूर आहे. पण त्याचबरोबर स्थिर भांडवल, खेळते भांडवल, यंत्रसामुग्री, कच्चा माल याही गोष्टी महत्वाच्या आहेत.

२. उद्योग व्यवसायातील नफा केवळ श्रमामुळे मिळत नाही. त्यासाठी कार्यक्षम व्यवस्थापन असावे लागते. केवळ श्रमावर भर देणाऱ्या श्रमप्रधान उत्पादन व्यवस्थेत अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे तोटा होतो याचा विचार मार्क्सने आपल्या सिध्दांतात केलेला नाही.

३. मार्क्सच्यामते, श्रमावरील खर्च म्हणजे बदलते भांडवल हे अपुरे स्पष्टीकरण आहे. त्यात कच्चा माल, इंधन, श्रम यांचाही समावेश मार्क्सने करावयास पाहिजे होता.

४. भांडवलदार उद्योगाची जी जोखीम घेतात, त्याकडे मार्क्स दुर्लक्ष करतो, तो केवळ श्रमीकांचाच विचार करतो हे योग्य वाटत नाही.

मार्क्सच्या अतिरिक्त मूल्यसिध्दांतावर टीका केली जात असली तरी ती पूर्णपर्ण योग्य नाही. कारण उत्पादनातील अधिक फायदा हा श्रमिकांच्या शोषणातून मालकाला मिळतो ही गोष्ट नाकारता येत नाही. श्रमिक हे अहोरात्र कष्ट करीत असतात तर भांडवलदार मात्र ऐषआरामात व चैनीत असतात. भांडवलशाही व्यवस्थेत श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातात, तर श्रमिकांचा पाय मात्र दिवसेंदिवस खोलातच जातो आहे.

### २.२.४ मार्क्सचा परात्मवाद किंवा कामगार अलगता (Theory of Alienation) : –

भांडवलशाहीच्या विनाशासंबधीच्या विवेचनात आणि वर्ग संघर्षाच्या स्पष्टीकरणात श्रमाच्या परात्मतेसंबंधीचे उल्लेख आले आहेत. श्रमाची परात्मस्थिती ही मार्क्सच्या भांडवलशाही व्यवस्थेवर केलेल्या टीकेतील एक महत्वाची बाब आहे. त्याचप्रमाणे कामगारवर्ग भांडवलशाहीत निर्णायक लढा देण्यासाठी का तयार होतो ? यासंबधीच्या विवेचनातही श्रमाच्या परात्मतेची कल्पना महत्वाची आहे.

परात्मतेच्या कल्पनेचा जनक मार्क्स नाही. मार्क्सने ही कल्पना हेगेल व व फ्यूरबॉख यांच्या तत्वशास्त्रीय व धर्मविषयक विवेचनातून घेतलेली आहे. परात्मता ही संज्ञा इंग्रजीतील Alienation या संज्ञेची मराठी प्रतिसंज्ञा म्हणून वापरली आहे. पण Alienation हा इंग्रजी शब्दच जर्मन भाषेतील Entfrending या शब्दासाठी प्रतिशब्द म्हणून उपयोगात आलेला आहे. इंग्रजी शब्दात ज्याप्रमाणे जर्मन शब्दातील अर्थाच्या सर्व छटा येत नाहीत त्याचप्रमाणे परात्मता या शब्दात Alienation या शब्दाच्या सर्वच छटा येत नाहीत. परात्मतेचा विचार मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून करता येण्यासारखा आहे व त्या दृष्टिकोनातून परात्मतेच्या कल्पनेचा अर्थ लावताना मानसिक दूरत्वास जास्त महत्व द्यावे लागेल. एखाद्या व्यक्तीचा, स्थितीचा किंवा गोष्टीचा मनापासून वीट येणे म्हणजे त्या व्यक्ती, स्थिती वा गोष्टीपासून दूरावणेच होय. हे दूरावणे मानसिक पातळीवरील असल्याने याला मानशास्त्रीय परात्मता असे म्हणतात. मार्क्सने परात्मतेची कल्पना सामाजिक संबंध व्यवस्थेशी निगडीत वापरली आहे. तो म्हणतो की, परत्मतेची मूळे सामाजिक संबंध व्यवस्थेतच असल्यामुळे परात्मता ही एक समाजशास्त्रीय संकल्पना आहे. मार्क्सने अलगतेची संकल्पना भौतिकवादी दृष्टिकोनातून स्पष्ट केली आहे. ज्या प्रमाणात भांडवलशाहीचा विकास होत जातो त्या प्रमाणात वर्ग संघर्ष वाढत जातात. याचा गंभीर परिणाम म्हणजे एक वर्ग दुसऱ्या वर्गापासून अलिप्त/अलग होत जातो. परात्ममा म्हणजे एका विशिष्ट परिस्थितीत किंवा एक विशिष्ट समाजात मनुष्यावर अशा अटी लादल्या जातात की, मनुष्य स्वत:बद्दल अपरिचित होतो. त्याला स्वत:च्या कृतीची किंवा त्याने निर्माण केलेल्या उत्पादनाची जाण निर्माण होत नाही.

(Alienation is idea that under circumstance or in certain societies, the conditions imposed on man are such that he becomes a stanger to himself; he no longer recognizes himself in his activity or in his productions.)

भांडवलशाही व्यवस्थेत कामगारांवर काम हे लादले जाते. त्यामुळे काम करताना त्याला आनंद वाटत नाही, त्याला कामाचा आंनद मिळत नाही. त्यामुळे तो आपण केलेल्या कामाबद्दल आनंदी नाही. कारण त्याने निर्माण केलेल्या वस्तुंशी त्याचा कोणताच संबंध रहात नाही. ज्याप्रमाणे घाणीला जुंपलेल्या बैलाचा त्याने निर्माण केलेल्या तेलाशी कोणताच संबंध नसतो, त्याचप्रमाणे उद्योगधंदयातही कामगारांचा संबंध रहात नाही. परिणामी कामाबद्दल त्याला आंनद वाटत नाही. तो आपल्या शारीरिक आणि मानसिक उर्जेचा मुक्तपणे विकास करू शकत नाही. उलट शारीरिक शक्तीचे दमन करतो आणि मनाच्या इच्छेविरूध्द वागून मनाची स्थितीही खराब करून घेतो. यंत्राप्रमाणे तो काम करीत असतो. जेंव्हा तो कामावर नसतो तेंव्हा तो घरात असतो आणि जेंव्हा कामावर असतो तेंव्हा तो घरात नसतो इतकेच. त्याचे श्रम हे ऐच्छिक नसतात तर ते त्यांच्यावर सक्तीने लादले जातात. ज्यामध्ये सक्ती असते तेथे प्रेम असत नाही आणि त्यामुळेच कामगार कामापासून अलग/वेगळा होत जातो असे मार्क्स म्हणतो.

(A Labour is external to the worker, i.e. does not belong to his essential being; that in his work, therefore, he does not affirm himself but denies himself, does not feel content but unhappy, does not develop freely his physical & mental energy but

mortifies his body & ruins his mind. He is at home when he is not working, and when he is working he is not at home. His labour is therefore not voluntary, but concered, it is forced labour.)

भांडवलशाही व्यवस्थेत औद्योगिक नागरी समाजातील कामगारांच्यामध्ये परात्मतेचा भाव तीव्र स्वरूपात दिसून येतो, असे मार्क्सचे मत आहे. ही परात्मता किंवा **अलगता चार प्रकारची आढळून येते**. १. स्वत: तयार केलेल्या वस्तूपासूनची अलगता (Alienation from the objects of production) २. उत्पादन प्रक्रियेपासून अलगता (Alienation from the process of production) ३.स्वत:पासून अलगता (Alienation from himself) ४. समुदायापासून अलगता (Alienation from his community)

**१. कामगारांची वस्तूपासूनची अलगता –**

नैसर्गिक साधन संपत्ती व मानवी श्रम या दोन्ही गोष्टी एकमेकापासून भिन्न आहेत. पण दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अगदी प्राथमिक अवस्थेत मानव निसर्गाधिन जीवन जगत होता. तेंव्हा समुहात सर्वजण एकत्र रहात होते. अन्न-संकलन करीत होते. समान वाटप करून उदर निर्वाह करीत होते. पण नंतरच्या कालखंडात संकलित केलेल्या वस्तुवर व उत्पादित केलेल्या वस्तुवर स्वत:ची मालकी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू झाला. यातूनच सबल आणि अबल असे वर्ग तयार झाले. आधुनिक काळात भांडवलदार व कामगार वर्ग निर्माण झाले. या वर्गव्यवस्थेमुळे अलगतेला सुरूवात झाली. कारखान्यात निर्माण होणाऱ्या उत्पादित मालापासून अधिक फायदा हा भांडवलदाराला मिळतो. त्यामुळे श्रमाची विक्री करून कामगार बाजूला होतो व त्याचा वस्तुंशी कोणताच संबंध रहात नाही.

२. **उत्पादन प्रक्रियेपासून अलगता (**Alienation from the process from the production**)**

कारखाना उत्पादन पध्दतीमध्ये कामगार हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्याच्या असण्याशिवाय उत्पादन होऊ शकत नाही. पण भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेमध्ये यंत्र शक्तीचा वापर केला जातो. त्यामुळे कामगाराचे महत्व कमी झाले. त्याला स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मन लावून काम करावे लागते. उत्पादित मालावर त्याला कोणताही अधिकार किंवा हक्क सांगता येत नाही. सर्व अधिकार भांडवलदार वर्गाचे असतात. तो फक्त श्रम विकतो. तसेच उत्पादन साधनांचा मालक न रहाता गुलाम बनतो. जितक्या जास्त प्रमाणात कामगार उत्पादन काढतो तितक्या अधिक प्रमाणात गरीब होत जातो. तो शोषणाचा बळी ठरतो. कामाविषयी वाटणारी आत्मियता नष्ट होऊन त्याविषयी परकेपणा वाटू लागतो.

**३. स्वत:पासून अलगता (**Alienation from himself**) –**

मार्क्सच्या मते, कामगार भरपूर कष्ट करतो. पण त्याने निर्माण केलेल्या वस्तूवर त्याची मालकी असत नाही. भांडवलशाही ही एक सत्ताशाही आहे. या अर्थव्यवस्थेत क्रूरता आहे. मार्क्स म्हणतो, कामगार म्हणून मी दुसऱ्याच्या दयेवर जगतो आहे. मी काय कराव आणि कस कराव हे दुसराच ठरवितो. मी (भांडवलदाराच्या) निर्माण केलेली वस्तू माझ्या व्यक्तिमत्वाशी किंवा माझ्या इच्छा आकांक्षाशी संबंधित नाही. माझ्या जवळील सृजनशील शक्ती तीव्र विरोध करते. वस्तुत: मी निर्माण केलेली वस्तूही माझी नाहीच. आपले कष्ट आपल्यासाठी नाहीत तर ते दुसऱ्यासाठी आहेत अशी भावना कामगाराची तयार होते. यामुळे कामगाराला आपल्या स्वत:पासूनही अलग झाल्यासारखे वाटते.

४. **समाजपासून अलगता (Alienation from his community) –**

भांडवलशाहीमध्ये कष्टकरी वर्ग हा दिवसेंदिवस गरीबच होत जातो. श्रमाच्या मोबदल्यात त्याला वेतन कमी मिळते. भांडवलदाराच्या अतिरिक्त मूल्यात मात्र वाढत होत जाते. भांडवलदार कामगार वर्गाची अनेक मार्गांनी पिळवणूक करू लागतात. शेवटी संघर्षाला सुरूवात होते. अशावेळी कामगाराला काही प्रश्न भेडसावू लागतात. आपण कोणासाठी कष्ट करावयाचे ? ज्या समाजासाठी आपण राबतो तो समाजही आपली फारशी दखल घेत नाही. मग समजाचे तरी हित कशासाठी पहायचे? या विचारातून कामगार समाजपासूनही अलग होऊ लागतो.

**२.२.४.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न –**

१) आवश्यक श्रमानंतर कामगाराने केलेले श्रम म्हणजे .............................

२) भांडवलशाही व्यवस्थेत कामगारांच्या पिळवणूकीमुळे ........................ मध्ये वाढ होते.

३) मार्क्सच्यामते, मिळकतीच्या आधारावर ...................... इतके वर्ग तयार होतात.

४) उत्पादन व वितरण व्यवस्थेतील असमानतेमुळे ........... निर्माण होतात.

५) ............ अर्थव्यवस्थेत माणसाचे श्रमसुध्दा विक्रय वस्तू बनते.

६) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत माणसाचे श्रम एक ........... वस्तू बनते.

७) परात्मतेच्या कल्पनेचा अर्थ लावताना ..... दूरत्वास जास्त महत्त्व द्यावे लागेल.

## २.३ सारांश :

मानव समाजाचा विकास हा विरोध विकासवादातून होत असतो हेच मार्क्सच्या द्वंद्वात्मक सिद्धांताचे पद्धतीशास्त्र म्हणून ओळखले जाते. त्याच्या मते, जगातील प्रत्येक बदलाचे कारण हे आहे. त्याचा वर्गसंघर्ष सिद्धांत आर्थिक घटकाशी निगडीत आहे. कार्ल मार्क्सने मांडलेल्या इतिहासाचे भौतिकवादी स्पष्टीकरण या विचारामध्ये मानवी इतिहासातील घटनांची मीमांसा उत्पादन पद्धत आणि उत्पादन संबंध या दोन भौतिक आधारावर केली. उदा. समाजातील संघर्ष हे आर्थिक कारणातूनच झाले. व्यक्तीमत्त्वाचा विकास हा भौतिक परिस्थितीतूनच होतो. त्याने मानवी इतिहासाच्या विकासाचे एकूण ५ टप्पे अथवा अवस्था सांगितल्या. उदा. अ) आदिम युग, ब) दास्य युग, क) सरंजामशाही युग, ड) भांडवलशाही युग आणि इ) समाजवादी युग.

मार्क्सने आपल्या आदर्शवादी विचारामध्ये संघर्षातून समाजक्रांती घडते, सर्व घटकांच्या मुळाशी आर्थिक बाबीच असतात, कल्पनाशक्तीपेक्षा भौतिक घटक महत्त्वाचे मानले पाहिजेत, मानवी इतिहास संघर्षरूपी आहे, ''बळी तो कान पिळी'' अशी मक्तेदारी भांडवलशाही समाजात आढळून येते, असे अनेक महत्त्वाचे विचार मांडले. त्याचप्रमाणे श्रमिकाला त्याचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. श्रमिकांमध्ये जागृती व क्रांती या मार्गाने वर्गविहीन समाजाची स्थापना करता येईल, यासारखी आदर्श मते मांडली.

## २.४ पारिभाषिक संज्ञा :

- **द्वंद्वात्मक भौतिकवाद :** जगातील प्रत्येक बदलाचे कारण द्वंद्व.
- **ऐतिहासिक भौतिकवाद :** इतिहासातील घटनांची भौतिक आधारावर केलेली मिमांसा

- **वर्ग संघर्ष :** उत्पादन पद्धत आणि उत्पादन संबंध या आर्थिक रचनेशी निगडीत विचार.
- **बळी तो कान पिळी :** आर्थिकदृष्ट्या संपन्न असणारा वर्ग कमकूवत वर्गाचे शोषण करतो.
- **साम्यवादी व्यवस्था :** उतपदित साधनावर सर्वांची समान मालकी.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

२.२.१.१

१) कार्ल मार्क्सचा

२) दृश्य अथवा डोळ्याना प्रत्यक्ष दिसणारे

३) बर्लिन विद्यापीठामध्ये

४) शास्त्रशुद्ध, स्वतंत्र, निर्भिड आणि बंडखोर

५) कार्ल मार्क्सचा

६) ऱ्हायनिश झिटूंग

७) दास कॅपीटल

८) भांडवलशाहीच्या शोषणाविरुद्ध कामगारानी एकत्र येवून लढा द्यावा अथवा वर्गसंघर्षाचा शेवट म्हणजे भांडवलदारांचा नाश व त्यासाठी क्रांतीची गरज असते.

९) भांडवलशाहीच्या

१०) साम्यवादी

११) श्रम, मूल्य आणि भौतिकता

१२) द्वंद्वात्मक आणि ऐतिहासिक भौतिकवाद, वर्गसंघर्ष आणि कामगार परात्मतेचे धोरण

२.२.२.१

अ) १) ऐतिहासिक भौतिकवाद २) कार्ल मार्क्स ३) कार्ल मार्क्स

४) हवामान ५) इतिहास ६) आदिम अथवा आदिवासी.

ब) एका वाक्यात उत्तरे

१) कार्ल मार्क्स २) उत्पादन पद्धत व उत्पादन संबंध

३) साम्यवादी अथवा समाजवादी ४) आर्थिक घटक ५) कार्ल मार्क्स

२.२.३.१ १) उत्पादन विकास २) भांडवलदार व कामगार ३) वस्तुस्थिती निदर्शक

२.२.४.१ १) अतिरिक्त श्रम २) दारिद्र्य ३) तीन ४) वर्गसंघर्ष

५) भांडवलशाही ६) विक्रय ७) मानसिक

## २.६ सरावासाठीचे प्रश्न :

१) कार्ल मार्क्सने केलेले इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण (मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद) विषद करा.

२) मार्क्सने सांगितलेल्या ''मानवी इतिहासाच्या विकासाचे टप्पे किंवा अवस्था'' यावर भाष्य करा.

३) मार्क्सच्या 'ऐतिहासिक भैतिकवाद' या सिद्धांताचे मूलभूत आधार स्पष्ट करा.

४) कार्ल मार्क्सचे भांडवलशाहीसंबंधीचे विचार थोडक्यात लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


1) Aron Raymond : Main Currents in Sociological Thought (Vol. I & II)

2) Bogardus E. S. : Development of Sociological Thought.

3) Barnes H. E. : "An Introduction to the History of Sociology" Phoenix Books, The University of Chikags Press London, 1966.

4) Coser, Lewis A, "The Masters of Sociological Thought.

5) Distance Education Shivaji University, Kolhapur, Abhijat Samaj shastriya Parampara" Group E, Soc. 01 Chief Editor Prof. Mohite S. L. Marathi Medium, 2017.

6) Marulkar Vijay : Samajshastriya Vicharancha Itihas" Prachi Prakashan, Mumbai.

7) Vaidhya N. S. : "Samajshastriya Vichar Parampara" Vidhya Prakashan, Nagpur.


❑❑❑

# सत्र–१ : घटक – ३

## एमिल डुरखाईम (Emile Durkheim 1858-1917)

**घटक संरचना**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२. विषय–विवेचन

 ३.२.१ सामाजिक तथ्याचा अभ्यास किंवा सामाजिक सत्य संकल्पना (समाजशास्त्र एक शास्त्र म्हणून सामाजिक तथ्य संकल्पनेचा अभ्यास)

  ३.२.१.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

 ३.२.२ श्रमविभाजन सिध्दांत

  ३.२.२.२ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

 ३.२.३ एमिल डुरखाईमचा आत्महत्येचा सिध्दांत आणि आत्महत्त्येचे प्रमाण

  ३.२.३.३ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

 ३.२.४ धर्मविषयक सिद्धांत (डुरखाईमचे धर्मासंबंधीचे विचार) : –

  ३.२.४.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

३.३. सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा

३.५. स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६. सरावासाठीचे प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील गोष्टी साध्य होणार आहेत.

- सामाजिक सत्य आणि त्याच्या वैशिष्टयांचा अभ्यास जाणून घेता येईल.
- डुरखाईमचा श्रमविभाजन सिध्दांत आणि यांत्रिक एकता व सेंद्रिय अथवा जैवीक एकता समजून घेता येईल.
- आत्महत्या सिध्दांत समजून येईल.
- धर्म सिध्दांताचे आकलन करून घेता येईल.

## ३.१ प्रस्तावना :

ऑगस्त कॉम्तचा वारसा चालविणारा, समाजशास्त्रात वैज्ञानिक अभ्यासपध्दतीचा पुरस्कार करणारा आणि सामाजिक वर्तनाचा सत्यसंकल्पनेद्वारे विचार करणारा एक महान फ्रेंच समाजशास्त्रज्ञ म्हणून एमिल डुरखाईमकडे पाहिले जाते. कॉम्तप्रमाणेच डुरखाईम हा प्रत्यक्षवादी विचारवंत होता. त्याच्या मते, सामाजिक संघटनांचे स्वरूप अतिशय गुंतागुंतीचे असल्याने ते काल्पनिक गोष्टींच्या आधारे स्पष्ट करता येत नाही. अशावेळी वैज्ञानिक अभ्यासपध्दतीने माहिती जमा करणे आवश्यक असते. यावर डुरखाईमने अधिक भर दिला. त्यामुळेच प्रथमत: असे म्हणावे लागेल की, समाजशास्त्राला अधिक सामाजिक व शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देण्यामध्ये डुरखाईमचा सिंहाचा वाटा आहे.

**डुरखाईमचे जीवनचरित्र –**

एमिल डुरखाईमचा जन्म १५ एप्रिल, १८५८ रोजी फ्रान्समधील लॉरेन या प्रांतातील एपिनल या ठिकाणी रॅबीज कुटुंबात झाला. त्याचे घराणे ज्यू पंथीय असल्याने आणि त्याच्यावर लहानपणापासून अनेक धार्मिक संस्कार झाल्यामुळे डुरखाईमने धर्मग्रंथाचा अभ्यास करण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले. एकाआर्थी आपल्या कुटुंबाचाच वारसा पुढे चालविण्याचा निर्णय त्याच्याकडून बालवयातच घेतला गेला. वयाच्या १३ व्या वर्षी डुरखाईम एका कॅथॉलिक शिक्षिकेच्या सहवासात आल्यानंतर त्याच्यावर कॅथॉलिक विचारसरणीचा खूप प्रभाव पडला. परंतु त्याने सर्व धार्मिक विचारसरणीच्या बंधनापासून स्वत:ला सावरले. धर्माकडे तो एक सामाजिक घटना म्हणून पाहू लागला. अर्थात त्याच्यावर लहानपणापासूनच धर्माच्या शिकवणुकीचा जो प्रभाव पडलेला होता त्याचा मात्र त्याने नेहमीच आदर केला. १८७९ मध्ये डुरखाईमला **इकोल नॉर्मल सुपीरियर डि पॅरिस** या फ्रान्समधील शिक्षण क्षेत्रात आघाडीवर असलेल्या प्रतिष्ठित शिक्षण संस्थेत प्रवेश मिळाला. या शिक्षण संस्थेत त्याचा हेन्री बर्गसन (जीवनवादी तत्वज्ञ), जीन जॉरेस (समाजवादी नेता), पायरी जॅनेट (मानसशास्त्रज्ञ), गोब्लॉट (तत्वज्ञ) इ. तरूण बुध्दिमान मित्रांबरोबर परिचय झाला. ही शिक्षण संस्था म्हणजे फ्रान्समधील बुध्दीवंतांचे आगर होते. डुरखाईम हा अत्यंत अभ्यासू, तल्लख बुध्दीमत्तेचा आणि विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेला विद्यार्थी होता. त्यामुळे तेथील आपल्या मित्र कंपनीत तो '**आध्यात्मवादी**' (Metaphysician) या टोपन नावाने ओळखला जावू लागला. या शिक्षण संस्थेत पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर डुरखाईम उच्च शिक्षणासाठी जर्मनीला गेला. तेथे त्याने अर्थशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र, लोकसाहित्य, समूह मानसशास्त्र इ. विषयांचा आभ्यास केला. याच सुमारास आपल्या जीवनात आपणास काय साधावयाचे आहे या संबंधीचे त्याचे विचार स्पष्ट होत गेले. मानव समाजाचे शास्त्रशुध्द अध्ययन हेच त्याने आपले जीवित कर्तव्य मानले. १८८२ ते १८८७ या दरम्यान डुरखाईमने जर्मनीतील विविध शिक्षण संस्थांमध्ये तत्वज्ञान हा विषय शिकविला. जर्मनीतील वास्तव्याबाबत अनेक लेख लिहिले. त्यामुळे समाजातील शास्त्रांमधील तो आघाडीवरचा विचारवंत म्हणून ओळखला गेला.

जर्मनीहून फ्रान्सला परतल्यानंतर १८८७ मध्ये त्याची फ्रान्समधील बोर्डेक्स (Bordeaux) विद्यापीठात समाजशास्त्र विषयाचा प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली. याच सुमारास डुरखाईमचा विवाह ल्युसी ड्रेफ्स (Louise Dreyfus) हिच्याशी झाला. या उभयतांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन आपत्ये झाली. डुरखाईमला सुविद्य व सालस अशी पत्नी लाभल्याने त्याचे वैवाहिक जीवन सुखी–समाधानी होते. १८९३ मध्ये त्याला त्याच्या "De La Division De Travail Social" या अत्यंत दर्जेदार ग्रंथावर पीएच.डी. हा बहुमानाचा किताब मिळाला. बोर्डेक्स विद्यापिठात सुमारे ९ वर्षे प्राध्यापकाची नोकरी केल्यानंतर डुरखाईमला पदोन्नती मिळून सामाजिक विज्ञानातील Full Professorship हा दर्जा प्राप्त झाला.

फ्रान्समध्ये असे पद प्रथमत:च निर्माण केले गेले. तसेच १९९३ मध्ये डुरखाईमसाठी Science of Education & Sociology च्या अंतर्गत शिक्षणमंत्रालयाच्या आदेशाने एक खास पद निर्माण करण्यात आले. यावरून आपणास डुरखाईमचे विषयावरील प्रभुत्व आणि समाजातील प्रतिष्ठा समजू शकेल. अशा या प्रतिभासंपन्न, असाधारण बुध्दिमत्ता लाभलेल्या समाजशास्त्रज्ञाचे १५ नोव्हेंबर १९१७ रोजी निधन झाले. डुरखाईमच्या मृत्यूनंतर समाजशास्त्रातील त्याचे अपूर्ण कार्य त्याच्या सुविद्य पत्नीने पूर्ण केले.

**एमिल डुरखाईमची ग्रंथसंपदा –**

**'सामाजिक सत्य हा समाजशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय आहे,'** यावर अधिक भर देवून एमिल डुरखाईमने अनेक ग्रंथांची निर्मिती करून त्याआधारे आपले समाजशास्त्रीय विचार स्पष्ट केले. त्याने लिहिलेल्या विविध समाजशास्त्रीय ग्रंथांचा नामोल्लेख खालील प्रमाणे करता येईल.

१. १८९३ मध्ये De La Division De Travail Social या ग्रंथांवर पीएच. डी. ही बहुमानाची पदवी मिळाली. यामध्ये त्याने आर्थिक दृष्टीकोनावर भर न देता सामाजिक श्रमविभाजनाचे विस्तृत विश्लेषण केले. दोन खंडामध्ये हा ग्रंथ लिहून पहिल्या खंडात सामाजिक घटनांशी संबंधित श्रमविभाजनाची कार्ये व परिणाम विशद केले, तर दुसऱ्या खंडात श्रमविभाजनाचे स्वरूप आणि कारणे यांचा आढावा घेतला.

२. १८९५ मध्ये 'Lee Regles De La Methode Sociologique' हा पध्दती शास्त्रावरील ग्रंथ प्रकाशित केला. यामध्ये त्याने समाजशास्त्राचा अभ्यास जास्तीतजास्त वस्तुनिष्ठ व्हावा यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करावा यावर अधिक भर दिला.

३. १८९७ मध्ये 'Lee Suicide' हा आत्महत्या संबंधीचा ग्रंथ लिहून त्यामध्ये आत्महत्या ही एक सामाजिक बाब असून प्रमाणक शून्यतेमुळे व्यक्ती आत्महत्येकडे वळते यासंबंधीचे सखोल विवेचन केले.

४. १९१२ मध्ये "The Elementary Forms of Religious Life" हा धर्मासंबंधीचा ग्रंथ लिहून त्यामध्ये धर्माची निर्मिती व धर्माचा प्रभाव यासंबंधी सूक्ष्म आढावा घेतला.

वरील ग्रंथांशिवाय १८९८ मध्ये Lannrr Sociologie हे समाजशास्त्रीय विषयाचा उहापोह करणारे मासिक सुरू केले. डुरखाईमच्या मृत्यूनंतर त्याचे अपूर्ण तीन समाजशास्त्रीय ग्रंथ त्याच्या सुविद्य पत्नीने प्रकाशित केले. त्यामध्ये –

शैक्षणिक समाजशास्त्र (Education of Sociology) – १९२२

तात्विक समाजशास्त्र (Sociology of Philosophy) – १९२४

नैतिक शिक्षण (Moral Education) – १९२४

इत्यादींचा समावेश आढळतो. वरील सर्व ग्रंथ हे पॅरिस येथेच प्रकाशित होऊन ते सर्वमान्य झाले. त्याद्वारेच डुरखाईमने विविध सिध्दांत मांडल्यामुळे त्याचा याठिकाणी सखोल आढावा घेणे अतिशय गरजेचे आहे.

**डुरखाईमवरील प्रभाव –**

एमिल डुरखाईम हा फ्रेंच विचारवंत असल्याने त्याच्या जीवनावर फ्रेंच बौध्दिक इतिहासाची छाप अधिक असल्याचे आढळते. **रुसो व माँटेस्क्यू** या फ्रेंच विचारवंतांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव

डुरखाईमवर पडलेला दिसून येतो. उदा. रुसोकडून डुरखाईमला सामाजिक एकतेची (Social Solidarity) कल्पना मिळाली. सामाजिक ऐक्य आणि समाजातील घटकांचे परस्पर संबंध या विचारांना जोपासण्याचे कार्य माँटेस्क्यूच्या विचारांनी केले. त्यामुळे आपण या दोघांचे ऋणी आहोत अशी कबुली स्वत: डुरखाईमने दिली. सेंट सिमा व ऑगस्त कॉम्त यांच्या विचारांचादेखील डुरखाईमवर खूप प्रभाव पडला. कॉम्तच्या विज्ञानवादाचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणात डुरखाईमवर पडला असल्याने कोजरने कॉम्तला डुरखाईमचा गुरू असे संबोधिले. समाजशास्त्राचा पाया घालण्याचे श्रेय कॉम्तलाच द्यावयास हवे असे मत डुरखाईमने मांडले. फ्रेंच विचारवंतांच्या विचारांशिवाय जर्मन आणि ब्रिटीश विचारवंतांच्या विचारांची देखील छाप डुरखाईमवर पडल्याचे निदर्शनास येते. उदा. श्रमविभाजनावरील पुस्तक लिहिताना डुरखाईमला हर्बर्ट स्पेन्सरच्या विचारांनी मोहित केले. त्यामुळे त्याने स्पेन्सरला आपले स्फुर्तीस्थान मानले. डुरखाईमचा उत्क्रांतीवादी दृष्टीकोन स्पेन्सरच्या प्रभावातूनच व्यक्त झाला. समाजाची उत्क्रांती साध्या अवस्थेतून गुंतागुंतीकडे होत जाते हा स्पेन्सरचा विचार डुरखाईमला पटला होता. तसेच जर्मन विचारवंत विल्यम वुंड याची व्यक्तीपेक्षा समाज महत्वाचा असतो ही संकल्पना डुरखाईमच्या सामुहिक प्रतिनिधीत्व या संकल्पनेमध्ये आढळते, तर वर्तनाचे नैतिक नियम हे समाजाद्वारेच घडविले जातात हा शॅफेलचा विचार डुरखाईमला योग्य वाटला होता. मानवाचे आर्थिक वर्तन नैतिक प्रमाणकापासून अलग करणे शक्य नसते हा जर्मन अर्थशास्त्रज्ञ इमोलर याचा विचारदेखील डुरखाईमला प्रभावीत करताना आढळतो.

थोडक्यात, डुरखाईम हा त्याकाळी फ्रान्समधील अस्थिर राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीत वाढला गेल्याने या परिस्थितीचा देखील त्याच्या जीवनावर परिणाम झाला. वाढते औद्योगिकीकरण, धार्मिक प्रवृत्तीचे घराणे याचाही डुरखाईमच्या जीवनावर लहानपणापासूनच खूप प्रभाव पडला होता. त्यामुळे त्याचा सामाजिक एकता आणि समुहावरील निष्ठा इ.वर दृढ विश्वास बसला होता. त्याने आपले सर्व लक्ष समाजजीवनाच्या विधायक पैलूंवरच केंद्रित केले होते. अशारितीने डुरखाईम आणि त्याच्या जीवनावर विविध विचारवंतांच्या विचारांचा पडलेला प्रभाव विचारात घेतल्यानंतर डुरखाईमच्या समाजशास्त्रीय विचारांचा सखोल मागोवा घेणे अधिक गरजेचे वाटते. कारण त्यावरूनच आपणास डुरखाईमचे समाजशास्त्रातील योगदान अथवा दर्जेदार स्थान समजू शकते.

## ३.२ विषय विवेचन : –

### एमिल डुरखाईमचे समाजशास्त्रीय विचार (Sociological Thoughts by Emile Durkhelm)

डुरखाईमने जे काही विविध समाजशास्त्रीय विचार मांडलें त्यापैकी त्याचे प्रमुख विचार खालीलप्रमाणे आढळतात.

### ३.२.१ समाजशास्त्र एक शास्त्र म्हणून सामाजिक तथ्य संकल्पनेचा अभ्यास (सामाजिक तथ्याचा अथवा सत्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास) (सामाजिक सत्य संकल्पना) (The Study of Social Facts) किंवा डुरखाईमचे पद्धतीशास्त्र

डुरखाईम हा प्रत्यक्षवादाचा पाठीराखा असल्याने त्याने आपले पध्दतीशास्त्र विशद करताना त्यामध्ये सामाजिक सत्य शोधणे ही मध्यवर्ती कल्पना मांडण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते, जोपर्यंत सामाजिक तथ्याविषयीची कल्पना स्पष्ट होत नाही तोपर्यंत समाज विषयक विचार समजणे शक्य नसते. जर आपणास सामाजिक परिस्थितीचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करावयाचा असेल तर सामाजिक तथ्यांचा अथवा सामाजिक सत्याचा (Social Facts) अभ्यास अतिशय आवश्यक असतो. डुरखाईमने या संकल्पनेंद्वारे सामाजिक ऐक्य, श्रमविभागणी इ. विषयांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते, समाजशास्त्र हे एक

स्वतंत्र विज्ञान असल्याने त्याचा अभ्यास स्पष्ट होणे गरजेचे आहे. त्याने सामाजिक सत्य किंवा तथ्य (Social Facts) हा समाजशास्त्राचा आभ्यास विषय आहे, असे प्रतिपादन केले. त्यामुळे याठिकाणी त्याच्या सामाजिक विचारातील एक मध्यवर्ती कल्पना म्हणून सामाजिक सत्याचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

### ३.२.१.१ सामाजिक तथ्य अथवा सामाजिक सत्य म्हणजे काय ? (सामाजिक तथ्याचा अर्थ किंवा व्याख्या)

सामाजिक तथ्य अथवा सत्य या दोन शब्दांमध्ये 'सामाजिक' हा शब्द महत्वपूर्ण मानला पाहिजे व त्यानंतर सत्याचा विचार केला पाहिजे. जर हा शब्द काळजीपूर्वक वापरला गेला नाही तर त्याची निश्चित व्याप्ती स्पष्ट होवू शकत नाही. समाजात घडणाऱ्या सर्व गोष्टी सामाजिक असत नाहीत. उदा.स्वत:चे खाणे-पिणे, विश्रांती, हालचाल यांसारखे वर्तन प्रकार सामाजिक असतीलच असे नाही. परंतु जेंव्हा व्यक्तींकडून शिस्तबध्दरित्या आणि केवळ समाजहित डोळ्यांपुढे ठेवून हालचाली केल्या जातात तेंव्हा आपणास सत्य आढळून येते. उदा. व्यक्तिकडून भाऊ, पती, नागरिक, शिक्षक यासारख्या भूमिका नियमानुसार पार पाडल्या तर ते एक सत्य मानावे लागेल. डुरखाईमने याठिकाणी सामाजिक सत्य अथवा तथ्याला वस्तू मानले पाहिजे असा विचार व्यक्त करून **सामाजिक तथ्याचे नियम** खालीलप्रमाणे सांगितले.

१. सामाजिक तथ्य ही अशी एक वस्तू आहे की, जीला केवळ अनुभवाद्वारे जाणता येते, तसेच तिचे अस्तित्व मनुष्यावर आधारीत असत नाही.

२. सामाजिक तथ्यांना केवळ बाह्य स्वरूपातच पाहिले जावू शकते अथवा जाणून घेतले जावू शकते.

अशा प्रकारे सामाजिक तथ्य (सत्य) वस्तू म्हणून विचारात घेतले जात असलेमुळे त्याचा वारंवार अर्थ देखील बदलतो. त्यामुळे सामाजिक सत्य ही स्थिर संकल्पना नसून गतीशिल संकल्पना आहे असे स्पष्ट होते. जेंव्हा सामाजिक परिस्थितीत परिवर्तन घडून येते तेंव्हा सामाजिक सत्यामध्ये देखील परिवर्तन अभिप्रेत असते. या पार्श्वभूमीवर डुरखाईमने सामाजिक सत्य ही सामाजिक वास्तवता आहे असे मानून व्यक्तींच्या वर्तनावर विशिष्ट प्रकारे जे बंधन घातले जाते अशा वर्तनाला त्याने सामाजिक सत्य मानले.

**सामाजिक तथ्याची अथवा सत्याची व्याख्या –**

डुरखाईमच्या पध्दतीशास्त्रातील एक महत्वपूर्ण संकल्पना म्हणून सामाजिक सत्य अथवा सामाजिक तथ्याचा सखोल आढावा घेत असताना डुरखाईमने सामाजिक सत्याची पध्दतिशास्त्राशी संबंधित जी व्याख्या सांगितली आहे, तिचा परामर्श घेणे जरूरीचे आहे.

१. सामाजिक सत्यामध्ये क्रिया, विचार आणि अनुभव यांच्या प्रकारांचा समावेश झालेला असतो की, जे प्रकार व्यक्तिला बाह्यस्वरूपी असतात आणि आपल्या दडपणशक्तीच्या जोरावर व्यक्तिवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.

   (Social Facts consist of ways of Acting, Thinking & Filling external to individual and endowed with a power coercion by reason of which they control him - Durkheim)

२. सामाजिक सत्य हा वर्तणुकीचा असा एक दृढ झालेला अथवा न झालेला प्रकार असतो की, जो व्यक्तींवर बाह्यशक्तींद्वारे वर्तनविषयक दडपण आणू शकतो.

   (A Social fact is every way of acting fixed or not capable of exercising on the individual an external constraint.)

सामाजिक सत्याच्या वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, प्रत्येक समाजात स्वतंत्र अशी वेगळी सामाजिक तथ्ये असून त्यांचे वेगळे असे वैशिष्टय असते. समाजाशिवाय सामाजिक सत्याला आधारच असू शकत नाही. सामाजिक सत्य हे व्यक्तीसाठी बंधनाची निर्मिती करते, तसेच ते व्यक्तिगत चेतनेच्या पलिकडील असते. याचा अर्थ सामाजिक तथ्य हे वास्तव स्वरूपाचे असून ते जरी व्यक्तींनी निर्माण केलेल्या वातावरणातून निर्माण होत असले तरी कोणतीही एक व्यक्ती त्याची निर्मिती करीत नाही. थोडक्यात सामाजिक सत्याची (तथ्याची) निर्मिती समाजामध्येच होत असल्याने आणि समाजच त्याला मान्यता देंत असल्याने ते पूर्णपणे सामाजिक असते.

स्वत: मांडलेल्या सामाजिक सत्याच्या कल्पनेचे समर्थन डुरखाईमने सामाजिक तथ्याचे नियम म्हणून पुढीलप्रमाणे केलेले आहे.

१. **सामाजिक सत्य हे व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे.** राष्ट्रीय संकटप्रसंगी याचा अनुभव येतो. उदा. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये भगतसिंग, बाबू गेणू यांसारख्या अनेक स्वातंत्र्यवीरांनी देशासाठी आनंदाने बलिदान केले.

२. व्यक्तीचे वैयक्तिक व सामाजिक आचरण यामध्ये भिन्नता असते. याचा अर्थ व्यक्ती एकटी असताना तिचे वर्तन आणि समुहात असताना तिचे वर्तन यामध्ये तफावत आढळते. थोडक्यात समाजांतर्गत व्यक्ती वर्तनाचे नविन विश्व म्हणजे सामाजिक सत्य होय. या सामाजिक सत्याच्या अस्तित्वाचा परिणाम व्यक्तिच्या वर्तनावर होवून त्यामध्ये बदल होवू शकतो.

३. डुरखाईमच्या मते, सामाजिक सत्याच्या संदर्भात तिसरे प्रमाण म्हणजे, सामाजिक सत्याचे संख्यात्मक स्वरूपातील अस्तित्व हे होय. उदा. समाजातील गुन्हेगारी, घटस्फोट, आत्महत्या, वाढते जनन प्रमाण हे संख्यात्मक स्वरूपात विशद केले जाते. या वस्तूंची स्थिरता व्यक्तींच्या इच्छेवर अवलंबून असते त्यामुळे त्यांच्या स्थिरतेचे विश्लेषण भौतिकशास्त्रीय स्वरूपाचे असू शकत नाही तर ते पूर्णपणे समाजशास्त्रीय पाहिजे.

४. कोणत्याही सामाजिक सत्याची निर्मिती ही कोणतीही एक व्यक्ती करीत नसल्याने ते तीला व्यक्तीबाह्य वाटते. तसेच ते बंधनकारक असते.

५. सामाजिक सत्य ही समाजातील अशी एक सामाजिक घटना आहे की, ज्या घटनांची निर्मिती अनेक व्यक्तींकडून केली जाते. जसे ते कालबाह्य असते तसेच ते व्यक्ती नियंत्रक असते.

अशा प्रकारे डुरखाईमने सामाजिक सत्य एक वस्तू मानून त्याचा विचार व्हावा तसेच ते सामाजिक साहचर्यामधून निर्माण होत असल्याने शुध्द सामाजिक संदर्भातच ते विचारार्थ घेतले जावे असे प्रतिपादन केले. थोडक्यात जे वास्तव आहे अथवा ज्याचे वस्तुनिष्ठ निरिक्षण करता येते त्यालाच डुरखाईमने सामाजिक सत्य असे संबोधले. उदा. ईश्वर हे सामाजिक सत्य नसले तरी इश्वराशी संबंधीत पूजा-अर्चा, प्रार्थना या गोष्टी मात्र सामाजिक सत्यामध्ये मोडतात. तसेच एखाद्या विचारवंताने मांडलेला सिध्दांत धार्मिक क्रिया, लोककथा, व्यावसायिक नियम इ. ना सामाजिक सत्य असे म्हटले जाते. कारण आपण त्याचे स्वरूप समजू शकतो. शिवाय मानवी व्यवहारांवर त्याचे बंधनही येत असते. डुरखाईमच्या सामाजिक सत्य कल्पनेवरून शेवटी असे स्पष्ट होते की, सामाजिक सत्य हे मनुष्याच्या सामुहिक जाणिवेशी संबंधित असून त्याची निर्मिती व्यक्ती ऐवजी सामाजिक संबंधातून म्हणजेच समाजातून होत असते. त्यामुळे सामाजिक सत्याकडे **संघटीत सामाजिक जीवनाचे प्रतिक** म्हणून पाहिले जाते.

### ३.२.१.२ सामाजिक तथ्याची लक्षणे अथवा वैशिष्टये (Characteristics of Social Facts) –

सामाजिक तथ्याना वस्तू मानल्यानंतर भौतिक वस्तूंप्रमाणे सामाजिक सत्याची ठराविक लक्षणे आहेत काय? या संदर्भात डुरखाईमने सामाजिक सत्याची दोन ठळक लक्षणे (वैशिष्टये) आहेत असा विचार मांडला. उदा. १) बाह्यरूपता अथवा व्यक्तिबाह्यता आणि २) निर्बंध अथवा निग्रह. डुरखाईमने या ठळक लक्षणांचे सखोल विवेचन खालीलप्रमाणे केले आहे.

**१. बाह्यरूपता अथवा व्यक्तिबाह्यता (Exteriority) –**

डुरखाईमच्या मते, सामाजिक सत्याचे बाह्यरूपता अथवा व्यक्तिबाह्यता हे ठळक लक्षण असून त्याची उत्पत्ती व्यक्तिगत जाणिवेतून अथवा इच्छेमधून न होता समाजातून होत असते. त्यामुळे व्यक्तीवर अशा सामाजिक सत्याचा नेहमीच प्रभाव असल्याचे दिसून येते. उदा. ज्याप्रमाणे अग्नी, पाऊस, ऊन इ. गोष्टी मनुष्यबाह्य असतात, त्याचप्रमाणे सामाजिक **सत्यदेखील** बाह्यस्वरूपी असते. त्याच्या मते, सामाजिक सत्य हे कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता नसते. एकदा एखादी गोष्ट प्रचारात आली की, समाजामध्ये दिर्घकाळपर्यंत तिचे प्रतिबींब आढळून येते. उदा. फॅशन्स, विज्ञानाची निर्मिती अनेकांच्या बुध्दिकौशल्यामधून होत असली तरी विज्ञान हे शेवटी व्यक्तिगत क्षमतेपेक्षा श्रेष्ठ असते. या तत्वाप्रमाणेच सामाजिक सत्याची निर्मिती ही विविध व्यक्तींच्या विचारातून तसेच सहकार्यातून होत असली तरी व्यक्तीपेक्षा सामाजिक सत्य कितीतरी पटीने श्रेष्ठ असते. त्यामुळे सर्व समाज अशा सत्याचा स्विकार करीत असतो. या अर्थाने सामाजिक सत्य बाह्यस्वरूपी असून समाजातील सर्व व्यक्तींसाठी ते बंधनकारक असते.

**२. बंधन अथवा निग्रह (Constraint) –**

डुरखाईमने सामाजिक सत्याचे निर्बंध अथवा निग्रह हे दुसरे ठळक लक्षण सांगितले. त्याने हा शब्द या ठिकाणी स्थूल अर्थाने वापरलेला आहे. त्याच्या मते, सामाजिक सत्याचा व्यक्तीवर निर्बंधात्मक स्वरूपाचा प्रभाव असतो, कारण अशी सत्ये कोणत्याही व्यक्तींकडून निर्माण केलेली नसतात तर ती सामाजिक परिस्थितीचाच भाग असल्याने ती व्यक्तींवर बंधनकारक असतात. त्यामुळे त्यांचे व्यक्तिवर दडपण येते. उदा. नैतिक नियम व धार्मिक श्रध्दा इ. द्वारे मानवी वर्तन प्रकारांवर निर्बंध येत असल्याने ते सामुहिक पातळीवर आचरणात आणले जात असलेने समाजात अशा सत्याचा प्रभाव सर्वच व्यक्तिवर पडलेला आढळतो. थोडक्यात व्यक्तींना आपले सर्व व्यवहार सामाजिक अपेक्षांच्या चौकटीत राहूनच करावे लागतात. व्यक्ती समाजात राग, दु:ख, आनंद व्यक्त करतात. परंतु या गोष्टी कशा व्यक्त करावयाच्या हे सामाजिक नियमांनी अथवा निर्बंधांनी ठरलेले असते.

डुरखाईमने सामाजिक सत्य संकल्पनेची वरील दोन ठळक लक्षणे स्पष्ट करून सामाजिक सत्य हे बाह्यरुपी असते तसेच ते व्यक्तीसाठी बंधनकारक असते, असा महत्वपूर्ण विचार मांडला.

### सामाजिक सत्य अथवा तथ्य संकल्पनेचे मूल्यमापन (Evaluation of Social Facts) –

डुरखाईमच्या पध्दतीशास्त्र विचारांमधील सामाजिक सत्य ही अत्यंत महत्वाची व मुलभूत संकल्पना असून स्थिर स्वरूपाच्या समाजामध्येच तिचे अस्तित्व आढळून येते. व्यक्तीच्या सभोवतालच्या वातावरणातून सामाजिक सत्य निर्माण होते. अशा सत्याचा व्यक्तींच्या जीवनावर खूपच परिणाम होतो. त्यामुळे व्यक्तीपेक्षा सामाजिक सत्य श्रेष्ठ असते. डुरखाईमच्या मते, बदलत्या परिस्थितीनुसार सामाजिक सत्य बदलत असले तरी ते एक निश्चित स्वरुपाची वस्तू आहे यावर त्याने अधिक भर दिला. असे असले तरी डुरखाईमच्या या संकल्पनेवर अनेकांनी पुढीलप्रमाणे जी टीका केली आहे त्याचा परामर्श घेणे जरूरीचे आहे.

**झेटलीन** याच्या मते, सामाजिक सत्याबाबत डुरखाईमने स्विकारलेला दृष्टीकोन मार्क्सवादी विचारसरणीविरूध्द आहे. मार्क्सच्या मते, व्यक्ती इतिहास घडवितात पण याचा अर्थ असा नव्हे की, कोणतीही एक व्यक्ती स्वत:च्या इच्छेप्रमाणे सामाजिक सत्याची निर्मिती करू शकत नाही. त्यामुळे त्याचा हा विचार संघवादी आहे, अशी टीका केली जाते. सामाजिक सत्याच्या बाह्यरुपता आणि निर्बंध या ठळक लक्षणांवर **सोरोकीन** यानी अशी टीका केली आहे की, सर्व प्रकारच्या सामाजिक सत्याच्या अभ्यासासाठी त्याची ही संकल्पना उपयुक्त ठरत नाही. **बारनेस** या विचारवंताने सामाजिक सत्यातील निर्बंधाविषयी असे म्हटले आहे की, व्यक्ती आपले बहुतांशी कार्य कोणत्याही दबावाला बळी न पडता आपल्या इच्छेप्रमाणे करीत असते. **रेमंड ॲरॉन** या समाजशास्त्रज्ञाच्या मते, डुरखाईमने सामाजिक सत्याच्या विवेचनात निर्बंध अथवा निग्रह (constraint) या शब्दाचा वापर दोषपूर्ण पध्दतीने केला आहे. त्यामुळे निर्बंध हेच सामाजिक घटनांचे सार आहे काय? असा संभ्रम निर्माण होतो.

डुरखाईमच्या सामाजिक सत्य संकल्पनेवर अनेक विचारवंतांनी वरीलप्रमाणे टीका केली असली तरी, त्याची ही संकल्पना अगदीच निरर्थक नाही. उलट समाजशास्त्रावरील मध्यवर्ती संकल्पना म्हणून ती आजही विचारात घेतली जाते. वस्तुनिष्ठ निरीक्षणासाठी सामाजिक सत्य संकल्पना अतिशय महत्वपूर्ण असल्याचे निदर्शनास येते. कारण शेवटी तो एक सामाजिक वास्तवतेचाच प्रकार आहे. डुरखाईमने त्या आधारेच आपले सामाजिक एकता, श्रमविभाजन, आत्महत्या, धर्म यासंबंधीचे महत्वपूर्ण सिध्दांत विशद केले आहेत. यावरून आपणास डुरखाईमच्या पध्दतीशास्त्रामधील सामाजिक सत्य या संकल्पनेचे महत्व पटू शकेल.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

१. सामाजिक सत्याचे अस्तीत्व वैयक्तिक ज्ञानाच्या पलीकडे का असते ?

२. डुरखाईमने सामाजिक सत्याची कोणती वैशिष्ट्ये सांगितली ?

३. व्यक्तीला सामाजिक सत्यामध्ये सहभागी का व्हावे लागते ?

४. सामाजिक सत्याचे डुरखाईमने कोणते नियम सांगितले ?

५. सामाजिक सत्यास वस्तू म्हणून संबोधण्याची गरज का आहे ?

### ३.२.२ एमिल डुरखाईमचा श्रमविभाजन सिध्दांत (Division of Labour) : –

एमिल डुरखाईम या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने जे अनेक समाजशास्त्रीय विचार मांडले त्यामध्ये त्याचा श्रमविभाजनासंबंधीचा विचार अतिशय महत्वपूर्ण समजला जातो. १८९३ मध्ये "De La Division De travail social" हा ग्रंथ दोन विभागांमध्ये लिहून या ग्रंथाच्या दुसऱ्या विभागात डुरखाईमने श्रमविभाजनासंबंधीचा विचार अतिशय प्रभावीपणे मांडला. डुरखाईमचा श्रमविभाजनासंबंधीचा विचार म्हणजे समाजशास्त्राला मिळालेली एक मोलाची देणगीच समजली जाते. श्रमविभाजनावरील विद्वत्तापूर्ण प्रबंधावरच डुरखाईमला पॅरिस विद्यापीठाने डॉक्टरेट ही बहुमानाची पदवी दिली. या ग्रंथामध्ये त्याने श्रमविभाजनाचे विस्तृत विश्लेषण करताना आर्थिक दृष्टिकोनावर भर न देता सामाजिक दृष्टिने श्रमविभाजनाची निर्मिती, महत्व व परिणाम विषद करण्याचा प्रयत्न केला. डुरखाईमपूर्वी ॲडम स्मिथ, जे.एस.मिल, हर्बर्ट स्पेन्सर इ. विचारवंतांनी श्रमविभाजनासंबंधी आपली मते मांडली होती. या सर्वांनी आर्थिक पैलूवर भर दिला होता. परंतु डुरखाईमने समाजातील नैतिकता आणि कायदा यासंदर्भात आपला श्रमविभाजन विषयक विचार सखोलपणे मांडण्याचा प्रयत्न केला. **समाजव्यवस्थेचा एक प्रमुख आधार** या दृष्टीने त्याने श्रमविभाजन

प्रक्रियेचे विश्लेषण केले. श्रमविभाजनासंबंधीचा डुरखाईमचा विचार उपयुक्ततावादी विचारांपेक्षा वेगळा आहे. उपयुक्ततावादी विचारवंतांच्या मते, श्रमविभाजन हे मनुष्याच्या उच्च जीवन जगण्याच्या प्रवृत्तीतून निर्माण होते, याउलट डुरखाईमच्या मते, उत्पादनात समाजाचे सुख साठविलेले असते त्यामुळे श्रमविभाजनाशिवाय समाजाच्या विकासाची कल्पना करता येणार नाही.

डुरखाईमने आपल्या Social Division of Labour या ग्रंथाच्या दुसऱ्या भागामध्ये श्रमविभाजनासंबंधीचा विचार विकसीत करून समाजामध्ये त्या विचारांची सामाजिक कारणे आणि परिणाम कोणते आहेत? यासंबंधी सखोल विश्लेषण केलेले आहे. त्याच्या मते, भौतिक परिवर्तन, नैतिक बदल आणि लोकसंख्येतील प्रचंड वाढ इ. मुळे श्रमविभाजनविषयक विचार अस्तित्वात आले. जीवनसंघर्षात वाढ झाल्याने यांत्रिक स्वरूपातील एकतेची जागा सामाजिक अथवा सेंद्रिय एकतेने घेतली. डुरखाईमने श्रमविभाजनासंबंधीचा विचार मांडताना समाजाचे प्राचिन आणि आधुनिक स्वरूप याचा तुलनात्मक आढावा घेण्याचा प्रयत्न केला.

**प्राचीन अथवा अविकसित समाज (Ancient OR Un Developed Society) –**

डुरखाईमच्या मते, प्राचीन समाजात श्रमविभाजन हे लिंग भेदावर आधारीत म्हणजेच स्त्री–पुरूष भेदावर अवलंबून होते. या समाजात पुरूषांना शिकार, खाद्यसंकलन तर स्त्रियांना घरकाम, बालसंगोपन, पालनपोषण इ. जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत होत्या. या समाजात कमी लोकसंख्या, मर्यादीत गरजा आणि कुटुंब व सामाजिक गटांचे स्वयंपूर्ण स्वरूप अशी परिस्थिती असलेने श्रमविभाजनाची विशेष आवश्यकता वाटत नाही. उदा. आदिवासी, वन्य अथवा निरक्षर समाज अशा समाजात व्यक्ती–व्यक्तींमध्ये फारसा फरक असत नाही. आर्थिक कार्य अत्यंत मर्यादीत तसेच सामुहिक स्वरूपाचे होते. उपभोगापुरते उत्पादन घेतले जात असल्याने कामाचे वाटप किंवा श्रमविभाजन होत नव्हते. अशा समाजात श्रमविभाजनाचा अभाव असलेने विशेषीकरणाचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. डुरखाईमच्या मते, प्राचीन समाज हा व्यक्तींच्यामधील समानतेमुळे एकसंध होता. व्यक्तींच्या इच्छा या समाजाच्या इच्छेशी एकरूप झालेल्या असल्याने या समाजात **एकता ही जनमतावर** अधिष्ठीत अशा स्वरूपाची असते. त्यामुळे अशा समाजाचा **यांत्रिक एकतेशी** संबंध असतो, असे मत मांडले.

**आधुनिक अथवा विकसीत समाज (Developed Society) –**

डुरखाईमच्या मते, आधुनिक अथवा विकसीत समाजामधील श्रमविभाजन हे गुंतागुंतीचे तसेच व्यापक स्वरूपाचे असते. जसजशा व्यक्तींच्या गरजा वाढल्या, गरजा पूर्ण करण्याची साधने अपुरी पडू लागली आणि वस्तूंची मागणी वाढू लागली तसतसे व्यक्तींचे आर्थिक जीवनदेखील बदलले. या सर्वांचा परिणाम सामाजिक विभाजनावर होवू लागला. प्रत्येकजण एकमेकांच्या गरजपूर्तीसाठी उत्पादनात सहभागी होवू लागला. व्यक्तींना एकमेकांच्या सहकार्याची आवश्यकता वाटू लागली. त्यामुळे त्यांच्यात परस्परांवलंबन भावना वाढीस लागली. प्रत्येकाला विशेष प्रकारचे काम अथवा भूमिका पार पाडणे क्रमप्राप्त झाले. अर्थातच अशा समाजात श्रमविभाजन वाढू लागले आणि विशेषीकरणालाही गती प्राप्त झाली. एकूणच आधुनिक समाजात श्रमविभाजनाचे स्वरूप गुंतागुंतीचे निर्माण झाले. अशावेळी एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचा आधार बनू लागली. लोकांमध्ये विविधतेतून एकात्मता अस्तित्वात येवू लागली. उदा. भारत देश. सर्व लोक ारताचे नागरिक आहेत आणि यादृष्टीने ते सर्व एकात्म आहेत. डुरखाईमने अशा एकतेस **जैविक अथवा सेंद्रिय एकता** (Organic Solidarity) हे नाव दिले. डुरखाईमच्या मते, अशा समाजात अधिक लोकसंख्या असल्याने लोकसंख्या वाढीबरोबर समाजातील श्रमविभाजन देखील वाढत जाते.

थोडक्यात, डुरखाईमने श्रमविभाजनासंबंधीचा विचार मांडताना प्राचीन व आधुनिक समाजाचा जो वरीलप्रमाणे आढावा घेतला त्यावरून असे स्पष्ट होते की, प्राचीन समाजात श्रम विभाजनाचे स्वरूप अतिशय साधे होते. हा समाज जास्तीत जास्त साधा व स्वयंपूर्ण असल्याने व्यक्तींमध्ये यांत्रिक एकात्मता होती. याउलट आधुनिक समाजात (उदा. शहरी समाज) प्रत्येकाला विशेष प्रकारचे काम इतरांच्या सहकार्याने करावे लागत असल्याने श्रमविभाजनाचे तत्व गुंतागुंतीचे निर्माण झाले. श्रमविभाजन केवळ आर्थिक क्षेत्रापुरते मर्यादीत नसते तर समाजातील प्रत्येक क्षेत्रावर त्याचा प्रभाव असलेला दिसतो. लोकांच्या कार्यवाटपाचा आढावा घेणारा सिध्दांत म्हणून श्रमविभाजन विचाराकडे पाहिले जाते.

**श्रमविभाजनाची निर्मिती आणि कारणे –**

**(श्रमविभाजनाच्या उदयास कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी)**

डुरखाईमने आपला श्रमविभाजनासंबंधीचा विचार सखोलपणे मांडताना त्याच्या निर्मितीबाबत असे म्हटले आहे की, सुख प्राप्तीच्या कल्पनेतून श्रमविभाजनाची निर्मिती झाली नसून ती विकासमय सामाजिक परिवर्तनातून झाली. लोकांच्या गरजांमध्ये जशी वाढ होत जाते त्याप्रमाणात त्यांच्या पूर्ततेसंबंधी श्रमाचे विभाजन होत जाते. त्यातूनच विशेषीकरण आणि औद्योगिक संघर्षाची (उदा. यंत्र उत्पादन पध्दत) निर्मिती होते. त्याच्या मते, श्रमविभाजनाच्या उदयास १. लोकसंख्येची घनता २. समाजाचा आकार आणि ३. समाजाची नैतिक पातळी या तीन गोष्टी कारणीभूत झालेल्या आहेत.

**लोकसंख्येची घनता** याचा अर्थ एखाद्या विशिष्ट प्रदेशावर असलेले लोकसंख्येचे प्रमाण होय. **समाजाचा आकार** याचा अर्थ एका समुहातील लोकांची संख्या आणि **नैतिक पातळी** याचा अर्थ त्यांच्यामधील परस्पर संपर्काचे प्रमाण होय. जेंव्हा लोकसंख्या कमी अथवा मर्यादीत होती (उदा. प्राचीन समाज) तेंव्हा श्रमविभाजनाची फारशी आवश्यकता वाटत नव्हती. कारण अशा समाजात लोकांच्या गरजा मर्यादीत असतात. तसेच हा समाज बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण होता. परंतु जेंव्हा मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पादनाची गरज वाटू लागली (उदा: शहरी समाज) तेंव्हा श्रमविभाजन तत्वाची निर्मिती करणे गरजेचे असते, असे डुरखाईम म्हणतो. अशा समाजात गरजपूर्तीची साधने प्राप्त करण्यासाठी लोकांमध्ये स्पर्धा आणि संघर्ष सुरू होतो. त्याचा परिणाम म्हणजे समाजात अशांतता व अस्थिरता वाढत जाते. अशावेळी समाजातील अशांतता कमी करून सामाजिक स्थीरता निर्माण करण्यासाठी आणि व्यक्तींमध्ये सामाजिक समतोल राखण्यासाठी श्रमविभाजनाची निर्मिती करणे अतिशय गरजेचे असते, असे डुरखाईमने आपले मत मांडले.

**श्रमविभाजनाचे सामाजिक फायदे (Social Merits of Division of Labour) –**

डुरखाईमने आपल्या श्रमविभाजन सिध्दांतामध्ये केवळ श्रमविभाजनाच्या उदयास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचाच विचार केला असे नाही, तर त्याने या तत्वाचे खालीलप्रमाणे अनेक सामाजिक परिणाम अथवा फायदे विषद केले.

१. श्रमविभाजनातून **विशेषीकरणाची वाढ** होते. या ठिकाणी प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट प्रकारचे कार्य करावे लागते. सातत्याने एकाच प्रकारचे कार्य करावे लागत असल्याने त्या व्यक्तीला आपल्या कार्याशी किंवा भूमिकेशी निगडीत सर्व ज्ञान हळूहळू प्राप्त होते. पुढे ती व्यक्ती आपल्या कार्यामध्ये विशेष तज्ञ म्हणून ओळखली जाते. उदा. यंत्र उत्पादनामधील कार्यकारी अधिकारी, पर्यवेक्षक, साखळी अधिकारी अथवा प्रशिक्षीत कामगार इ. व्यक्ती आपल्या कार्यात विशेष तज्ञ म्हणून ओळखल्या जातात.

२. श्रमविभाजनामुळे समाजात व्यक्तींच्या ठिकाणी सहकार्य, परस्परावलंबन आणि **एकात्म भावनेची वाढ** होत जाते. हा श्रमविभाजनाचा सर्वात महत्वपूर्ण सामाजिक परिणाम दिसून येतो. समाज प्रगतीच्या दृष्टीने याची नेहमीच आवश्यकता भासते.

३. आधुनिक समाजात श्रमविभाजनामुळे व्यक्तींना आपले **व्यक्तीमत्व विकसीत करण्याची संधी** प्राप्त झाल्याचे दिसून येते. जेंव्हा व्यक्तीला स्वत:च्या वैशिष्टयांचा अथवा गुणांचा विकास करून घेण्याची संधी मिळते तेंव्हा तो एक श्रमविभाजनाचा सामाजिक फायदाच समजला जातो.

४. श्रमविभाजनामुळे व्यक्तींमध्ये **नैतिक कर्तव्याची भावना वाढीस** लागल्याचे दिसून येते. समाजमान्य नियमाप्रमाणे जीवन जगावे असे एक प्रकारचे नैतिक दडपण व्यक्तीवर असते. त्यामुळे आपण आपले कर्तव्य समाजासाठी निष्ठापूर्वक पार पाडले पाहिजे, ही भावना व्यक्तींमध्ये वाढत जाते.

५. श्रमविभाजनामुळे जरी व्यक्तीगत व सामाजिक भेद वाढत जात असले तरी याठिकाणी व्यक्तींकडून स्वत:च्या स्वार्थाबरोबर **समाजकल्याणाचा विचार** देखील केला जातो. त्यामुळे श्रमविभाजनाचा हा एक सामाजिक फायदाच समजला जातो.

६. श्रमविभाजन म्हणजे केवळ भौतिक संपन्नतेचे साधन नसून वस्तुत: श्रमविभाजनामुळे परस्पर सहकार्य, सामाजिक एकता आणि **सामंजस्य भावना वाढविण्यास मदत** होते. त्यामुळेच सध्याच्या संमिश्र समाजरचनेत हे श्रमविभाजनाचे सर्वात महत्वपूर्ण सामाजिक फायदे ठरतात.

७. श्रमविभाजन ही एक **गतिशील प्रक्रिया** असल्यामुळे यातून विशेषीकरणाची वाढ होत असते. एकाआर्थी त्यामुळे समाजाच्या प्रगतीला हातभार लागतो. समाजात सतत नवनवीन गोष्टींची भर पडत जाते की, ज्यामुळे प्रगतीचा मार्ग खुला होत जातो.

अशा रितीने डुरखाईमने आपला श्रमविभाजनाबाबतचा विचार व्यक्त करताना ती एक गतीशिल प्रक्रिया असून समाज व्यवस्थेचा प्रमुख आधार आहे, असे मत मांडले. तसेच या प्रक्रियेत समाज विकास आणि मानवी उत्पादन शक्तीची योग्यता यांचा समन्वय पहावयास मिळतो, असे म्हटले आहे. डुरखाईमच्या श्रमविभाजन विचारावर अनेक विचारवंतांनी आपली मते पुढीलप्रमाणे मांडली आहेत याचाही या ठिकाणी आवर्जून उल्लेख करणे गरजेचे आहे. कारण त्यावरून आपणास हा विचार अधिक स्पष्टपणे समजू शकेल. उदा. एच.इ. बारनेस याच्या मते, डुरखाईमचे श्रमविभाजनाबाबतचे विवेचन सामाजिक उत्क्रांतीचे स्वरूप व त्याची कारणे यांचे स्पष्टीकरण करणारे आहे. ॲरॉनच्या मते, श्रमविभाजनात व्यक्ती व गट यांच्यातील संबंध स्पष्ट करणे हाच या सिध्दांताच्या विवेचनाचा मुख्य गाभा आहे. झेटलीनच्या मते, डुरखाईमचा श्रम विभाजनाबाबतचा विचार समाजात उच्च पातळीवरील जैविक ऐक्यभाव कसा निर्माण होतो हे सिध्द करून दाखवतो. बाकनेसच्या मते, हा सिध्दांत व्यक्तींमध्ये परस्पर सहकार्य व सामंजस्य वाढविण्यास मदत करतो यावरून आपणास डुरखाईमचा श्रमविभाजनाबाबतचा वरील विचार म्हणजे **समाजशास्त्राला मिळालेली एक महत्वपूर्ण देणगीच आहे** असे म्हणता येईल. श्रमविभाजन हे नैसगिक नियमानुसार घडत जाते आणि त्यातून संपूर्ण समाजाचे नियंत्रण होत जाते. त्यामुळे डुरखाईमने या संकल्पनेकडे **समाजाचा प्रमुख आधार** या दृष्टीकोनातून पाहिले. त्याच्या मते, श्रमविभाजनाशिवाय समाजाच्या विकासाची कल्पनाच करणे अशक्य असते. या प्रक्रियेमधूनच व्यक्तीची सर्जनशक्ती व तिची योग्यता यांचा समन्वय साधता येतो. यावरून आपणास डुरखाईमच्या श्रमविभाजन सिध्दांताचे महत्व पटू शकेल.

**सामाजिक ऐक्य अथवा सामाजिक एकता (Social Solidarity) – श्रमविभाजनाचे प्रकार**

एमिल डुरखाईमने '**डी ला डिव्हीजन डी ट्राव्हल सोशल**' या आपल्या श्रमविभाजनासंबंधीच्या ग्रंथामधील प्रथम भागामध्ये सामाजिक एकतेचा विचार मांडला. डुरखाईमपूर्वी सामाजिक ऐक्याबद्दल प्लेटो, ॲरिस्टॉटल, ॲडम स्मिथ, सेंट सायमन, ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर इ. सामाजिक विचारवंतांनी आपले मतप्रदर्शन केले होते, परंतु डुरखाईमने सामाजिक एकतेबद्दलचा विचार वैज्ञानिक आधारावर मांडण्याचा प्रयत्न केला. समाजाकडे समाजातील एकता, नियमबध्दता आणि त्याचा जीवनावरील परिणाम इ. दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न केला. तसेच श्रमविभाजनातून अस्तित्वात येणाऱ्या सामाजिक आणि नैतिक परिवर्तनावर लक्ष केंद्रित करून सामाजिक एकतेवर विचार मांडला.

डूरखाईमच्या मते, समाजामध्ये जो बदल घडून येतो अथवा समाजात जी एकता आढळते त्याचे रुपांतर यांत्रिक एकतेकडून सेंद्रिय एकतेकडे होत जाते. यावरून डुरखाईमने सामाजिक एकतेचे यांत्रिक व सेंद्रिय एकता हे दोन प्रकार आढळतात असे मत मांडले. या दोन्ही प्रकारांचा सखोल अभ्यास म्हणजेच त्याच्या सामाजिक एकता या विचाराचे सविस्तर विश्लेषण होय. डुरखाईमने सामाजिक एकतेबद्दलचा विचार खालीलप्रमाणे मांडला आहे.

**१. यांत्रिक एकता (Mechanical Solidarity) –**

'ज्या समाजात व्यक्तींच्या भावना, मूल्ये आणि श्रध्दा समान असतात. अशा समाजात निर्माण होणाऱ्या एकतेला यांत्रिक एकता अथवा यांत्रिक ऐक्यभाव असे म्हटले जाते.' उदा: प्राचीन समाज असे समाज एकसंध असतात. तेथे व्यक्तीगत भावनेपेक्षा सामुहिक भावना महत्वपूर्ण समजली जाते. व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे सामुहिक व्यक्तीमत्वामध्येच समाविष्ट केले जाते. समान भाषा व समान धर्म इ.मुळे अशी एकता अस्तित्वात येते. या संदर्भात डुरखाईमने **आदिवासी अथवा प्राचीन समाजाचे** उदाहरण दिले आहे. त्याच्या मते, प्राचीन अथवा आदिवासी समाजात यांत्रिक एकता अधिक आढळते, असे समाज प्रथम निर्माण होतात. व्यक्तिचे परस्परसंबंध घनिष्ट स्वरूपाचे असतात. या समाजात प्रथम सामुहिक जाणिव व त्यानंतर स्वत:च्या अस्तित्वाची जाणिव असे वातावरण असल्याने व्यक्तींमध्ये यांत्रिक स्वरूपाची एकता असते, असे डुरखाईमने मत मांडले.

डुरखाईमने आदिवासी समाजाला '**श्रमविभाजनाची प्रारंभीक अवस्था**' मानून या समाजात यांत्रिक स्वरूपाची एकता ही साम्य अथवा साधर्म्यावर आधारीत असते असे सांगीतले. हा समाज अतिशय साधे जीवन जगतो. खाद्यसंकलन, लहान आकार, निरक्षरता, उपभोगापुरते उत्पादन, रुढी-परंपरा व धर्माचा जीवनावर प्रभाव, सभासदांच्या मर्यादीत गरजा, घनिष्ठ परस्परसंबंध, आचार-विचारांमध्ये समानता आणि समान सामाजिक मूल्ये इ. मुळे या समाजातील एकता यांत्रिक स्वरूपाची असते. ही एकता साम्यावर आधारीत असल्याने तिला **साम्यनिष्ठ एकता** असे संबोधतात.

प्राचीन समाजात एकता ही जनमतावर आधारीत असून व्यक्तींवर अनेक मानसिक व नैतिक बंधने होती. व्यक्ती पूर्णपणे या बंधनांना बांधलेली असते. त्यामुळे व्यक्तींना स्वत:बरोबर समुहांचे हितसंबंध जपण्यासाठी सतत प्रयत्नशील रहावे लागते. लोकांचे सामाजिक व आर्थिक जीवन समानतेवर आधारीत असल्याने अशा समाजात व्यक्तींमध्ये साधर्म्य आढळते. अर्थातच त्यामुळे अशा समाजव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात यांत्रिक एकता आढळून येते.

थोडक्यात आदिवासी समाज हा साधा असल्याने या समाजात श्रमविभाजनाचे स्वरूपदेखील साधेच

आढळते. व्यक्तीचे व्यक्तीमत्व व्यक्तीगत न राहता सामाजिक स्वरूपाचे बनते. याचा अर्थ अशा समाजात वैयक्तिक भावनेपेक्षा सामुहिक भावना अधिक प्रभावी असल्याने व्यक्ती आपल्या समाजाबरोबर एखाद्या यंत्राप्रमाणे यंत्रबद्ध झालेली असते. अशा समाजात व्यक्तीचे सामुहिक इच्छेविरूध्दचे वर्तन हे गुन्हा म्हणून मानले जाते. ज्यावेळी व्यक्तीकडून सामुहिक भावनांचे उल्लंघन केले जाते त्यावेळी अशा व्यक्तीला दंड केला जातो. समाजाचे सांघिक स्वरूप अबाधित राखण्यासाठी म्हणजे यांत्रिक एकतेसाठी **दमनात्मक कायदा** (Retributive Law) आवश्यक असतो, असे मत मांडले. अर्थातच असा प्राथमिक समाज सामाजिक एकतेला बाधा येईल असे व्यक्तीचे वर्तन दडपून टाकण्याचा प्रयत्न करतो. या संदर्भात झेटलीन या विचारवंताने असे म्हटले आहे की, सामान्य हितसंबंधांना बाधा आणणारी कोणतीही कृती समुहाच्या एकतेला धोका निर्माण करते त्यामुळे अशा व्यक्तीस शिक्षा करणे योग्यच असते.

डुरखाईमच्या श्रमविभाजनासंबंधीच्या यांत्रिक एकतेविषयी शेवटी असे निदर्शनास येते की, **समानतेतून अस्तित्वात आलेली** सामाजिक एकात्मता ही यांत्रिक एकात्मता या संज्ञेस पात्र ठरते. या समाजात श्रमविभाजनाचे तत्व साधे होते. त्यांच्यातील एकता साम्यावर आधारीत असल्याने ती यांत्रिक स्वरूपाची होती. ऐतिहासिकदृष्ट्या यांत्रिक एकता असणारे समाज प्रथम निर्माण होतात. त्यामुळेच डुरखाईमने सामाजिक विचार मांडताना यांत्रिक एकतेचा प्रथम उल्लेख केला.

### २. सेंद्रिय अथवा जैविक एकता (Organic Solidarity) –

डुरखाईमने सामाजिक एकतेचे विश्लेषण करताना सेंद्रिय अथवा जैविक एकता हा दुसरा प्रकार विशद केला. त्याच्या मते, ''जेव्हा समाजाची रचना गुंतागुंतीची बनते तेंव्हा करारात्मक संबंधांना महत्व दिले जाते, सामुहिक जाणिवेचा प्रभाव कमी होवून स्वतंत्रपणे विचार केले जातात आणि गरजांच्या पूर्ततेसाठी व्यक्तीमधील परस्परावलंबन वाढीस लागते, अशा वेळी उदयास येणाऱ्या एकतेला सेंद्रिय एकता असे म्हणतात.'' उदा. आधुनिक, प्रगत अथवा औद्योगिक समाज. आदिवासी समाजाच्या तुलनेत आधुनिक समाजात श्रमविभाजन हे अतिशय गुंतागुंतीचे व विकसीत झालेले असते. समाजातील संपर्क माध्यमात वाढ झाल्यामुळे विविध ठिकाणच्या व्यक्ती एकत्रित येवून एकमेकांच्या सहकार्याने जीवन जगतात. समाजापेक्षा व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेले असते. व्यक्तिविभीन्नतेमुळे व्यक्तिवादास चालना मिळते तसेच या समाजात व्यक्तीचे कार्य आणि तिचे व्यक्तिमत्व यामध्ये भिन्नता आढळते आणि समाजांतर्गत परस्पर संबंधाचे प्रमाण वाढते. अशावेळी समाजात **विविधता अथवा विषमता** आढळून येते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपला भारत देश. या देशात अनेक जातीधर्माचे, वंशाचे अथवा भाषेचे लोक वास्तव्य करीत असले व त्यांच्यामध्ये जरी विविधता आढळत असली तरी या सर्व व्यक्ती भारताच्या नागरिक असलेने त्यांच्यामध्ये एकात्म भावना आढळते यालाच डुरखाईमने सेंद्रिय एकता असे संबोधले. अशी **एकता विविधतेतून निर्माण** होते.

सेंद्रिय एकतेसंबंधी सखोल विवेचन करताना डुरखाईमने असा विचार मांडला आहे की, जेथे प्रत्येक व्यक्तिला तिचे स्वतंत्र अस्तित्व आणि कार्य असेल तेथे सामुहिक मन हे व्यक्तिगत मनाला वेगळे अस्तित्व निर्माण करून देते, तसेच व्यक्तिचे निश्चित कार्य ठरवून देते. अशा वेळी सेंद्रिय एकता उदयास येते. अशी एकता आधुनिक मानव समाजात आढळते. या समाजात प्रत्येक शरीर अवयवाची रचना, कार्ये वेगवेगळी असून जसजसे हे अवयव अधिक स्वतंत्र होत जातात, तसतशी शरीराची एकता वाढत जाते, यालाच डुरखाईमने जैविक एकता असे नाव दिले. सोरोकिनच्या मते, प्राचीन समाजात एकता ही जनमतावर आधारीत होती. परंतु आधुनिक समाजात एकता **विषमतेवर आधारीत** श्रमविभाजनातून निर्माण झाली.

आधुनिक समाजात कार्याच्या पूर्ततेसाठी विभिन्न जातीधर्माच्या व्यक्ती एकत्र येतात तेंव्हा अशा समाजाचा आकार मोठा बनतो. गरजांच्या पूर्ततेसाठी परस्पर सहकार्याची आवश्यकता भासते. दुर्मीळ साधनांवर मालकी मिळविण्यासाठी लोकांच्यामध्ये स्पर्धा सुरू होते. जेव्हा स्पर्धेचे प्रमाण वाढते तेव्हा सामाजिक भिन्नता अस्तित्वात येते. अशी भिन्नता व्यक्तिस्वातंत्र्यासाठी अतिशय आवश्यक असते. अर्थात अशा विभिन्नतेवर आधारीत असणाऱ्या समाजात सामाजिक एकता निर्माण करण्यासाठी नव्या बंधनांची आवश्यकता असते. श्रमविभाजनाच्या अंतर्गत प्रत्येक व्यक्ती जेव्हा विशेष प्रकारचे कार्य करते तेंव्हा प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता व्हावी असे वाटते यातूनच व्यक्तींमध्ये परस्परांना सहकार्य करण्याची भावना वाढीस लागते, असे सहकार्य श्रमविभाजन अथवा कामाची वाटणी यामधून वाढीस लागते. यालाच डुरखाईमने सेंद्रिय एकता असे म्हटले आहे. मानवी शरीरामध्ये देखील प्रत्येक अवयवाचे निश्चित असे कार्य असून ते दुसऱ्या शरीर अवयवावर आधारित असते यालाच डुरखाईम जैविक एकता असे संबोधितो.

अशा प्रकारे डुरखाईमने विषद केलेल्या सामाजिक एकतेच्या सेंद्रिय एकता या दुसऱ्या प्रकारामध्ये व्यक्तिचे व्यक्तिमत्व जरी एकमेकांहून भिन्न असले तरी एकमेकांच्या गरजांच्या पुर्ततेसाठी व्यक्तिंना एकत्र येणे आवश्यक असते. जेंव्हा विभिन्न विचार, विभिन्न दृष्टिकोन आणि भिन्न व्यवसाय असणाऱ्या व्यक्ति एकत्र येतात तेंव्हा त्यांच्यामध्ये वेगवेगळे भेद आढळतात. अशावेळी सामान्य हितसंबंधांची जोपासना करण्याची आवश्यकता भासते. **भरपाई स्वरूपाचा कायदा** (Restitutive Law) करून व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करता येते, असे डुरखाईम म्हणतो. याचा अर्थ, विभेदावर आधारित असणाऱ्या समाजात सामाजिक एकता निर्माण करण्यासाठी गुन्हेगार व्यक्तिला शिक्षा न करता आपण केलेल्या गुन्ह्यामुळे समाजाचे झालेले नुकसान भरून काढणे हे भरपाई स्वरुपाच्या कायद्याचे महत्वपूर्ण कार्य मानले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

१. डुरखाईमच्या सामाजिक एकतेचे दोन प्रकार कोणते ?

२. डुरखाईमच्या मते, समाजाची वाढ होण्याची कोणती कारणे आहेत ?

३. प्राचीन समाजात मोठ्या प्रमाणात कोणती एकता आढळते ?

४. आधुनिक अथवा प्रगत समाजात कोणती एकता आढळते ?

५. प्राचीन समाजात सांघिक एकता राखण्यासाठी कोणता कायदा आवश्यक असतो ?

६. आधुनिक समाजात मनुष्याचा कामाशी असणारा संबंध कोणत्या प्रकारचा असतो?

७. श्रमविभाजनातून अस्तीत्वात येणाऱ्या कोणत्या बाबींकडे डुरखाईमने आपले लक्ष केंद्रीत केले?

### ३.२.३ एमिल डुरखाईमचा आत्महत्येचा सिध्दांत (Emile Durkheims Theory of Suicide) :

डुरखाईमने १८९७ मध्ये 'Lee Suicide' हा आत्महत्येसंबंधी विवेचन करणारा ग्रंथ लिहून त्यामध्ये **आत्महत्या ही एक सामाजिक घटना असून ती विघटनातून निर्माण होते,** असा महत्वपूर्ण विचार मांडला. डुरखाईमचा हा सिध्दांत त्याच्या पध्दतीशास्त्रीय भूमिकेचे समर्थन करणारा मानला जातो. डुरखाईमपूर्वी अनेक विचारवंतांनी आत्महत्या ही नैराश्य, दारिद्र्य, बेकारी, शारीरिक आजार, मानसिक विकृती आणि असफल प्रेमसंबंध इ. कारणाने केली जाते, असे मत मांडले होते. तर डुरखाईमने ही सर्व कारणे व्यक्तिगत आहेत

असे मानून आत्महत्या ही सामाजिक घटना कशी आहे ? या संबंधी खालीलप्रमाणे सखोल आढावा घेतला.

डुरखाईमने आत्महत्येसंबंधी वरील सर्व कारणे अमान्य करून स्वत: लिहिलेल्या 'Lee Suicide' या आत्महत्येसंबंधीच्या ग्रंथामध्ये असे मत मांडले आहे की, आत्महत्या ही प्रथमत: एक सामाजिक घटना अथवा बाब असून उपयुक्ततावादी सामूहिक जीवनाच्या विघटनातून ती निर्माण होते. गरीबी, आजार, अयशस्वी प्रेम, जीवनातील नैराश्य यांसारखी कारणे आत्महत्येचे योग्य स्पष्टीकरण करू शकत नाहीत. समाजातील काही व्यक्ती वरील कारणांमुळे आत्महत्या करताना आढळत असल्या तरी डुरखाईमने या कारणांना वास्तवतेचा आधार नसतो असा विचार मांडला. त्याच्या मते, आत्महत्या हे एक **सामाजिक सत्य** (Social Fact) असल्यामुळे आत्महत्येचे विश्लेषण सामाजिक कारणांच्या संदर्भातच केले पाहिजे. आजच्या उद्योगप्रधान समाजव्यवस्थेत नीतिमत्तेचा ऱ्हास, व्यक्तिस्वातंत्र्याची वाढ, असंतुलित सामाजिक संबंध आणि समाजरचनेतील बदल इत्यादींमुळे समाज विघटित होतो. अर्थातच, अशा समाजातील व्यक्तींकडून आत्महत्येचा मार्ग अनुसरला जातो असे मत मांडले. त्यामुळेच डुरखाईमच्या विवेचनाला समाजशास्त्रीय बैठक असल्याचे दिसून येते. त्याचा हा विचार श्रमविभाजनाच्या विचारांशी निगडीत आहे.

आधुनिक समाजात कामाचे विभाजन झाल्यामुळे विशेषीकरण, व्यक्तिस्वातंत्र्य, विभेदीकरण या गोष्टी सामाजिक हिताच्या दृष्टीने उपयुक्त ठरणाऱ्या असल्या तरी आजच्या संमिश्र समाजरचना असलेल्या समाजात आत्महत्या ही सामाजिक कारणातूनच घडते, यावर डुरुखाईमचा अधिक विश्वास आहे. ज्या व्यक्तींना प्राप्त परिस्थितीत समायोजन साधता येत नाही अथवा सामाजिक कर्तव्याबाबत उदासीनता आढळते तेव्हा त्यांच्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढलेले दिसून येते, त्याच्या मते, इतर कोणत्याही कारणांपेक्षा सामाजिक कारणच आत्महत्येला अधिक जबाबदार असते. या पार्श्वभूमीवर तो आत्महत्येकडे एक सामाजिक सत्य म्हणून पाहतो. त्याचा हा सिद्धांत सखोलपणे अभ्यासण्यासाठी आत्महत्येची व्याख्या, कारणे, प्रकार व प्रमाण इत्यांदींचे विवेचन करावे लागेल.

**आत्महत्येची व्याख्या –**

डुरखाईमने आत्महत्येची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

''ज्या कृतीचा शेवट आत्मनाश किंवा मृत्यूमध्ये होतो अशी व्यक्तींकडून घडणारी होकारात्मक, नकारात्मक किंवा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कृती म्हणजे आत्महत्या होय.''

उदा. स्वत:च्या हाताने पिस्तुलाचा चाप ओढून मृत्युला सामोरे जाणे, स्वत:ला गळफास लावून घेणे (होकारात्मक आत्महत्या), बोट पाण्यात बुडत असताना स्वत:ही बुडून मरणे अथवा आग लागलेल्या घरात बसून राहणे (नकारात्मक आत्महत्या) इत्यादी उदाहरणांवरून असे स्पष्ट होते की, जेव्हा व्यक्ती जीवन जगत असताना असमर्थ बनते अथवा व्यक्तीच्या जीवनात वैफल्यग्रस्त परिस्थिती निर्माण होते, तेव्हा ती आत्महत्येचा मार्ग अवलंबते. समाजशास्त्रीयदृष्ट्या आत्महत्येसंबंधी डुरखाईम असे म्हणतो की, समाजात एकात्मतेचा ऱ्हास होऊ लागला असता अस्थिर परिस्थिती निर्माण होते. अशा वेळी व्यक्तींना प्राप्त परिस्थितीत समायोजन साधणे शक्य होत नाही. परिणामत: व्यक्ती आत्महत्येचा मार्ग अवलंबतात. याशिवाय शत्रूला शरण जाण्याऐवजी आत्मबलिदान करणे, मृत पतीच्या जळत्या चितेवर स्वत:ला जाळून घेणे, आमरण उपोषण करणे यांसारखी उदाहरणे डुरखाईमच्या व्याख्येप्रमाणे आत्महत्या या सदरामध्ये मोडतात. थोडक्यात, ज्या मृत्यूभोवती त्यागाचे वलय असते अशा मृत्यूचा आत्महत्या यामध्ये समावेश होतो. यांवरून असे निर्देशनास येते की, डुरखाईमचा आत्महत्येचा विचार नेहमीच्या विचारांहून वेगळा आहे. आत्महत्येचे स्पष्टीरण सामाजिक परिस्थितीच्या संदर्भातच केले पाहिजे यावर डुरखाईमने अधिक भर दिल्याचे दिसून येते.

**आत्महत्येस जबाबदार असणारी कारणे अथवा घटक (Responsible Factors or Causes of suicide) –**

डुरखाईम आपला आत्महत्येचा सिध्दांत मांडताना **आत्महत्या हे एक सामाजिक सत्य आहे,** असे मानतो. त्यामुळे त्याने आत्महत्येचे विश्लेषण सामाजिक कारणांच्या संदर्भातच करणे आवश्यक आहे, असा विचार मांडला. तसेच समाजातील आत्महत्येच्या प्रमाणावर त्या समाजातील परिस्थितीचे प्रतिबिब पडलेले असल्यामुळे आत्महत्येचे स्पष्टीकरण सामाजिक परिस्थितीच्या संदर्भातच केले पाहिजे यावर अधिक भर दिला. आत्महत्या ही एक सामाजिक घटना मानली तर या घटनेला एकापेक्षा अनेक कारणे जबाबदार असल्याचे दिसून येते. जोपर्यंत गरजा व साधने यांचा मेळ बसत नाही तोपर्यंत व्यक्ती सुखी असत नाहीत. दु:खी व्यक्ती आत्महत्येचा मार्ग जवळ करतात. आजच्या औद्योगिक समाजात मोठया प्रमाणात सामाजिक रचनेत बदल, सामाजिक एकतेचा व नीतीमत्तेचा ऱ्हास, व्यक्तिस्वातंत्र्यांची वाढ, असंतुलित सामाजिक संबंध आणि व्यक्तिवादी विचारसरणी यांसारखी सामाजिक कारणे आत्महत्येला जबाबदार असतात, असे डुरखाईमचे मत आहे. त्यामुळे त्याने आत्महत्या ही सामाजिक कारणांतूनच घडते असे ठामपणे सांगितले.

डुरखाईमने आत्महत्या प्रवृत्तीस जबाबदार असणाऱ्या विविध कारणांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

**१. औद्योगिकीकरण व नैतिक मूल्यांचा ऱ्हास –**

डुरखाईमच्या मते, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या आधुनिक समाजामध्ये मोठया प्रमाणात औद्योगिक विकास (औद्योगिकीकरण) झालेला आढळतो. अर्थात, वाढत्या औद्योगिक विकासामुळे नैतिक मूल्यांचा ऱ्हास होऊन सामाजिक विघटनाला चालना मिळते. असे विघटन आत्महत्येचे मूलभूत कारण ठरते. जर समाजाला नियंत्रित करावयाचे असेल तर समाजावर म्हणजेच व्यक्तींवर नैतिक व आर्थिक स्वरूपाची बंधने असली पाहिजेत. डुरखाईमच्या मते, जो समाज विघटीत अवस्थेत असतो तेथे सामाजिक नियंत्रणशक्ती कमी होते आणि मनूष्य जास्तीतजास्त अनैतिक बनत जातो. अशा वेळी प्रथम व्यक्तिविघटन घडून येते व त्यानंतर सामाजिक विघटनास गती मिळते. असे सामाजिक विघटन आत्महत्येचे कारण ठरते, या संदर्भात **जॉर्ज सिम्पसन** यांनी असे प्रतिपादन केले आहे की, सर्व मानवजातीस धार्मिक, आर्थिक अथवा व्यावसायिक अशी नियंत्रणे मूलभूत अशीच आहेत. अशी नियंत्रणे नसतील तर समाज अस्थिर बनेल.

नियंत्रणाअभावी मानव अनैतिक बनत जातो. व्यक्तिविघटनाला सुरूवात होते आणि त्यातूनच पूढे आत्महत्येचा मार्ग अवलंबिला जातो.

**२. कुटुंबाचे दुर्लक्ष –**

डुरखाईमच्या मते, औद्योगिक विकास आणि नैतिक मुल्यांचा ऱ्हास या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्या सामाजिक कारणांबरोबर व्यक्तीकडे कुटुंबाचे दुर्लक्ष हे सामाजिक कारणदेखील महत्वपूर्ण समजले जाते. व्यक्तीवर जेव्हा कुटुंबाचा प्रभाव योग्य रीतीने पडत नाही, तेव्हा अशा व्यक्ती आत्महत्या प्रवृत्तीचा स्वीकार करू लागतात. उदा. ज्या कुटुंबातील व्यक्तींना कौटुंबिक प्रेम, जिव्हाळा, सहकार्य इत्यादी गोष्टी मिळत नाहीत अशा व्यक्ती दु:खी असतात. ज्यांचा विवाह लवकर होत नाही, ज्या व्यक्ती घटस्फोटित असतात अथवा ज्यांना लवकर वैधव्य आलेले असते अशा व्यक्तीदेखील नैराश्येपोटी आत्महत्येकडे वळतात.

**३. प्राप्त परिस्थितीत समायोजन साधण्याची अशक्यता –**

डुरखाईमने आत्महत्या प्रवृत्तीला जबाबदार असणारे वरील सामाजिक कारण सर्वात महत्वपूर्ण मानले. त्याच्या मते, प्राचीन काळापासून ते आत्तापर्यंत प्रत्येक मानवसमाज प्राप्त परिस्थितीत समायोजन साधण्यासाठी परिवर्तित झाल्याचे दिसून येते. आत्महत्या ही एक सामाजिक घटना असल्याने ज्या व्यक्तींना वाहत्या प्रवाहाबरोबर जाऊन व्यवस्थित जीवन जगता येत नाही अशा व्यक्ती जीवनामध्ये निराश बनतात. याचा अर्थ, जेव्हा समाजात काही बदल घडून येतात तेव्हा ज्या व्यक्तीना अशा प्राप्त परिस्थितीत समायोजन साधणे शक्य होत नाही अशावेळी त्यांच्याकडून आत्महत्या करून जीवन संपविण्याचा मार्ग अवलंबिला जातो.

**४. असाधारण वैवाहिक संबंध –**

डुरखाईमच्या मते, आत्महत्या प्रवृत्तीला असाधारण वैवाहिक संबंध हे कारणदेखील जबाबदार असते. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांबरोबरच कामेच्छा तृप्ती ही प्रत्येक व्यक्तीची आवश्यक गरज असून तिची पूर्तता समाजमान्य मार्गाने म्हणजेच विवाहाद्वारे केली जाते. समाजातील ज्या व्यक्तींची लैंगिक गरज समाजमान्य मार्गाने वेळेवर पूर्ण होत नाही अशा व्यक्ती जीवनामध्ये निराश होतात. कालांतराने त्यांच्यामध्ये मानसिक विकृती वाढते जाते. याचाच अर्थ, ज्यांची ही गरज पूर्ण होत नाही अशा व्यक्तीमध्ये अधिक प्रमाणात आत्महत्या घडून येण्याची शक्यता असते. आजच्या औद्योगिकप्रधान समाजामध्ये वरील कारणांमुळे व्यक्तींकडून आत्महत्या केली जात असल्याची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतात.

**५. सामाजिक एकतेचा ऱ्हास –**

डुरखाईमच्या मते, आत्महत्या आणि सामाजिक एकतेचा ऱ्हास या दोन्ही घटना एकमेकांशी अतिशय संबंधित असतात. मानव हा एक सामाजिक प्राणी असल्याने त्याला नेहमी एकमेकांच्या सानिध्यात राहणे आवडते. यातूनच समाजात सामाजिक एकतेचा विकास होत असल्याचे आढळून येते. परंतु जेव्हा श्रमविभाजन व विशेषीकरण इत्यादींमुळे समाजरचना बदलते तेव्हा व्यक्तींना प्राप्त परिस्थितीत समायोजन साधण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब करावा लागतो. मात्र, त्यामुळे समाजामध्ये विभिन्नता निर्माण होते, तसेच स्पर्धा व संघर्षाची भावना वाढीस लागते. त्यातूनच सामाजिक समतोलत्व बिघडल्याचे आढळून येते. समाजात अस्थिर परिस्थिती निर्माण होते. थोडक्यात, सामाजिक एकतेच्या ऱ्हासामुळे असमर्थ ठरणाऱ्या, निराश झालेल्या अथवा दु:खी बनलेल्या व्यक्ती आत्महत्येचा मार्ग जवळ करतात.

अशा प्रकारे एमिल डुरखाईम या फ्रेंच विचारवंताने इतर कोणत्याही कारणांपेक्षा आत्महत्येला वरील विविध सामाजिक कारणेच अधिक प्रमाणात जबाबदार असतात असे मत मांडले. आधुनिक समाजाने विकासासाठी औद्योगिकीकरण, श्रमविभाजन, विशेषीकरण, नवीन मूल्ये इत्यादी मार्गांचा अवलंब केला, परंतु त्यामूळे सामाजिक एकता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला. प्रमाणकशून्यतेमूळे वर्तनविषयक नियमांची चौकट बिघडू लागली. अशा वेळी व्यक्ती आत्महत्येचा मार्ग जवळ करू लागल्या. डुरखाईमने आत्महत्या प्रवृत्तीला वरील कारण कारणीभूत ठरत असले तरी व्यक्तीवर त्या त्या घटकांचा प्रभाव कितपत पडतो, यावर आत्महत्येचे सामाजिक स्वरूप आधारलेले असते असे प्रांजळ मत मांडले.

**आत्महत्येचे प्रमाण :** (Suicide Rate)

डुरखाईमने **आत्महत्येचे मूळ कारण सामाजिक विघटन** हेच आहे असे ठामपणे सांगितले. आणि मानव

समाजातील आत्महत्येचे प्रमाण विशद करण्यासाठी त्याने विविध मानव समूहांचा अभ्यास करून पुढील निष्कर्ष काढले. उदा. १) स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आढळते, कारण स्त्रियांपेक्षा पुरुषांचा संबंध सामाजिक जीवनाशी अधिक प्रमाणात असतो. २) हिवाळा, पावसाळा या ऋतूंऐवजी उन्हाळ्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आढळते कारण ऋतूमानाचा परिणाम आर्थिक परिस्थितीवर अधिक होतो. ३) खेड्यांपेक्षा शहरांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आढळते, कारण शहरात विभिन्न जातीधर्माच्या व्यक्ती बहुसंख्येने तेथे राहतात. या ठिकाणी सामाजिक मूल्यांचे अध:पतन अधिक होत असते. ४) कॅथॉलिकांपेक्षा प्रॉटेस्टंट धर्मीयांमध्ये आत्महत्या अधिक घडतात, कारण प्रॉटेरस्टंट धर्म हा व्यक्तिगत स्वातंत्र्यांवर अधिक भर देतो. या धर्मात व्यक्तिवादाला अधिक महत्त्व असल्याने व्यक्तीमध्ये अधिक प्रमाणात अपयश येण्याची शक्यता असते. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढण्यास मदत होते. डुरखाईमने आत्महत्येकडे एक सामाजिक सत्य म्हणून पाहिले आणि या प्रवृत्तीची कारणमीमांसा समाजशास्त्रीय आधारावरच केली असे दिसून येते.

**आत्महत्येचे वर्गीकरण किंवा प्रकार (Classification or Types of Suicide) –**

डुरखाईमने आत्महत्येचे वर्गीकरण किंवा प्रकार पाडताना आत्महत्या ही प्रामुख्याने एक सामाजिक घटना अथवा सामाजिक सत्य आहे असे मत मांडले आणि खालीलप्रमाणे आत्महत्येचे प्रमुख प्रकार सांगितले. १. आत्मकेंद्रीत आत्महत्या, २. परार्थवादी आत्महत्या ३. प्रमाणकशून्य आत्महत्या आणि ४. दैववादी आत्महत्या

**१. आत्मकेंद्रीत अथवा अहंवादी आत्महत्या (Egoistic Suicide) –**

डुरखाईमच्या मते, आत्महत्येच्या या प्रकारामध्ये व्यक्ती समाजात न मिसळता स्वत:मध्येच गुंग राहते. स्वत:ला समाजापासून वेगळे समजते. आपणास कोणाचाच आधार नाही अशी व्यक्तीची भावना निर्माण होते.अशा परिस्थितीत व्यक्ती आणि समूह यांच्यातील एकात्मतेचे संबंध संपुष्टात येतात. व्यक्तीच्या इच्छेवर समाजाचे कसलेही बंधन नसते. अशी व्यक्ती समाजापासून दुरावलेली (दुर्लक्षिलेली) असल्यामूळे शेवटी एकाकी जीवनाचा अंत करावयास प्रवृत्त होते. आत्मकेंद्रीत किंवा अहंवादी आत्महत्येच्या प्रकारातील व्यक्ती केवळ स्वत:चाच विचार करतात. इतरांचा विचार करण्याची त्यांना सवड नसते. अशा व्यक्ती स्वत:ला हीन अथवा उपेक्षित समजतात, त्यामुळे त्यांच्यामध्ये एक प्रकारची अहंगंडाची किंवा अहंभावाची भावना निर्माण होते. यातूनच त्यांच्यामध्ये आत्महत्या करून जीवन संपविण्याची भावना वाढीस लागते. डुरखाईमने आत्महत्येच्या आत्मकेंद्रीत या प्रकाराची पुढील अनेक उदाहरणांवरून सविस्तर चर्चा केली. उदा. १. सामूहिक नियंत्रणाच्या अभावामूळे कॅथॉलिक धर्मपंथीयाच्या मानाने, प्रॉटेस्टंट धर्मपंथीयांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक असते, कारण कॅथॉलिक धर्मात व्यक्तीच्या आचार–विचारांवर अनेक बंधने असतात. त्यामानाने प्रॉटेस्टंट धर्मात व्यक्तींना बरेच स्वातंत्र्य असते. व्यक्तिवादाला अधिक महत्त्व दिले जात असल्याने यशापेशा अपयश येण्याची अधिक संभावना असते. २. अपत्य असणाऱ्यांपेक्षा अपत्य नसणाऱ्या व्यक्तींमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक असते, कारण विवाहितांना कुटुबांत एकत्रित बांधून ठेवणारा अपत्य (संतती) हा महत्त्वाचा दुवा समजला जातो. अपत्यहीन दांपत्याचा विचार केला तर पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये हे प्रमाण अधिक असते.

जेव्हा व्यक्तींमध्ये समाजाकडून आपला अनादर होत आहे अथवा आपणास मुद्दाम दुखविले जात आहे अशी भावना निर्माण होते, तेव्हा दुर्लक्षित जीवनापासून स्वत:ला वाचविण्यासाठी व्यक्ती आत्महत्येचा अवलंब करतात. याचा अर्थ, आपल्याविषयी कुटुंबांमध्ये कोणालाच सहानुभूती नाही अथवा आपणास कोणी

वाली नाही अशी व्यक्तीची भावना होते किंवा कौटुंबिक परिस्थिती ही व्यक्तीच्या अहंवादाला अपमानकारक ठरते, अशा वेळी संबंधित व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते.

डुरखाईमच्या मते, समाजातील प्रत्येक व्यक्ती आपला अहंकार जपण्याचा प्रयत्न करते. हा अहंकार स्तुतीने सुखावतो आणि निंदेने दुखावतो. एकात्म समाजात व्यक्तीच्या अहंकारावर विविध सामाजिक नियमांव्दारे काही बंधने घातली जातात, भावनात्मक सहानुभूती दाखविली जाते, अर्थातच, या ठिकाणी आत्महत्येचे प्रमाण कमी असते. याउलट विघटित समाजात व्यक्तीचा अहंकार दुखावला जात असल्याने अहंकाररूपी घोडा चौफेर उधळतो. त्याचा परिणाम म्हणजे व्यक्ती समाजापासून दूर जाते आणि आत्महत्येचा मार्ग जवळ करू लागते. आधुनिक समाजात आत्मकेंद्रीत अथव अहंवादी आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. कारण हा समाज व्यक्तिवाद, स्वार्थीवृत्ती आणि व्यक्तिनिरपेक्षसंबंध इत्यादींवर आधारलेला आहे. अशा समाजात पतीकडून पत्नीची, वडिलांकडून मुलाची आणि मालकाकडून नोकराची उपेक्षा केली जाते.हीच अहंपणाची भावना व्यक्तीला संपविण्यास कारणीभूत ठरते.

### २. परार्थवादी किंवा परहितवादी आत्महत्या (Altruistic Suicide) –

'परार्थवादी आत्महत्या म्हणजे दुसऱ्याच्या हितासाठी केलेली आत्महत्या होय.' या प्रकारात व्यक्तींपेक्षा समाजातील विशिष्ट घटकाला अधिक महत्त्व प्राप्त होते. जेव्हा व्यक्तींवर पूर्णत: गटाचे वर्चस्व असते, तेव्हा व्यक्ती स्वत:चा जीव वाचविण्यापेक्षा समाजासाठी आत्मसमर्पण (बलिदान) करते, त्यास **परार्थवादी किंवा परहितवादी आत्महत्या** असे म्हटले जाते. उदा. राष्ट्रासाठी सैनिकांचे बलिदान, पतीच्या निधनानंतर त्याच्या चितेवर जाळून घेणाऱ्या स्त्रीचे शत्रूला शरण जाण्यापेक्षा जोहार करणाऱ्या रजपूत स्त्रियांचे बलिदान इ.

डुरखाईमच्या मते, परार्थवादी आत्महत्येमध्ये व्यक्तींपेक्षा समूह श्रेष्ठ मानला जातो. त्यामूळे या प्रकारामध्ये **समाजहितासाठी व्यक्तीचा बळी** अशी कल्पना डुरखाईमने मांडली. समाजहितासाठी जपानी लोक अनेक प्रसंगी परार्थवादी आत्महत्या करणे पसंत करतात. आत्महत्येच्या या प्रकारात स्वइच्छेपेक्षा समूह अथवा **गट निष्ठा** अतिशय महत्त्वाची मानली जाते. मानसशास्त्रीयदृष्ट्या समाजाच्या एकतेसाठी व्यक्तीने स्वत:च्या सर्वस्वाचा त्याग करून बलिदान करणे, ही व्यक्तीची जबाबदारी मानली जाते. डुरखाईमच्या मते, प्राचीन अथवा अविकसित समाजात व्यक्ती मनानेच अशी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होते. आत्महत्येच्या या प्रकारामध्ये व्यक्ती पूर्णपणे समूहरूप होत असल्याने समूहाचा मानसन्मान तो व्यक्तीचा मानसन्मान अशी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे केवळ समूहहितासाठी व्यक्ती सर्व प्रकारचा त्याग करण्यास तयार होते. गटाची अप्रतिष्ठा अथवा अवमान ही गोष्टच व्यक्तीला सहन होत नाही. सैनिकांमध्ये अशी आत्महत्या अधिक प्रमाणात आढळते. **टालकॉट पार्सन्सच्या मते,** परार्थवादी आत्महत्या ही सामाजिक दबाव आणि सामाजिक एकात्मतेचा प्रभाव यातून निर्माण होत असते. याचा अर्थ, परार्थवादी आत्महत्येमध्ये स्वहितापेक्षा गटाशी बांधीलकी हा विचार श्रेष्ठ समजून व्यक्तीने आपल्या जीवनाचा त्याग करणे हे अनिवार्य मानले. उदा. भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये भगतसिंग, बाबू गेनू, चाफेकर बंधू इत्यादींचे बलिदान परार्थवादी आत्महत्येत मोडते. अशा प्रकारची आत्महत्या केलेल्या व्यक्तींचा लोकांकडून मरणोत्तर गौरव केला जातो.

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, ज्यांच्याकडून समाजासाठी नि:स्वार्थी भावनेने स्वत:च्या सर्वस्वाचा त्याग करून आपले जीवन समर्पित केले जाते, तेव्हा अशा बलिदानास परार्थवादी किंवा परहितवादी आत्महत्या (Altruistic Suicide) असे संबोधले जाते. आत्महत्येच्या या प्रकाराला सामाजिक, नैतिक व धार्मिक मान्यता असते. व्यक्तींकडून केवळ समूह हितसंबंधांना जपण्यासाठी आत्महत्येचा हा प्रकार

स्वेच्छेने स्वीकारला जातो. त्यामुळेच व्यक्ती स्वत:चे हित किंवा स्वतंत्र व्यक्तिमत्व विसरून सर्व काही समाजासाठीच, अशी व्यक्तीची भावना बनते. यातूनच केवळ समाजहितासाठी व्यक्ती आत्महत्या करावयास प्रवृत्त होते.

**३. प्रमाणकशुन्य अथवा निराशावादी आत्महत्या** (Anomic Suicide) –

'डुरखाईमच्या मते, जेव्हा समाजामध्ये आकस्मिक किंवा अचानक बदल घडून येतात आणि व्यक्तींना अशा बदलाशी समायोजन साधता येत नाही, तेव्हा त्यांच्याकडून प्रमाणकशून्य आत्महत्येचा मार्ग अवलंबिला जातो.' उदा. व्यापारातील मंदी, दिवाळखोरी, आकस्मिकरित्या आलेले दारिद्र्य अथवा श्रीमंती यांसारख्या अचानकपणे घडणाऱ्या बदलांमुळे व्यक्तींच्या जीवनाची चाकोरीबद्ध चौकटच ढासळते. जुनी परिस्थिती व्यक्तींवर नियंत्रण ठेवण्यास अपुरी पडते आणि नवीन परिस्थिती व्यक्तींवर नियंत्रण ठेवू शकेल अशी नियमने अस्तित्वात नसल्याने एक प्रकारची पोकळी निर्माण होते, यालाच प्रमाणकशून्यता असे म्हटले जाते. डुरखाईमने आत्महत्येच्या या प्रकाराचे **आधुनिक औद्योगिक समाज** हे उदाहरण दिले आहे. हा समाज स्पर्धात्मक असल्याने प्रगतीसाठी प्रत्येकाची सतत धडपड सुरू असते. बऱ्याच वेळा धंद्यांमध्ये तोटा होतो, जीवनात अपयश येते, आकस्मिकरित्या भीक मागण्याची वेळ येते, अशा वेळी व्यक्तींच्या पदरी निराशा आल्याने मनोधैर्य खचून जाते. अचानक आर्थिक संकट कोसळले तर जेथे मोहरा वेचल्या तेथे गोवऱ्या वेचण्याची तयारी नसते. परिणामत: व्यक्तिपुढे आत्महत्या करून जीवन संपविणे हाच एक मार्ग उरतो. कोजर व रोजंबर्ग यांनी प्रमाणकशून्य आत्महत्या म्हणजे सामाजिक मानदंडाचा अभाव अथवा नीतिमत्तेची पोकळी अशी व्याख्या केली आहे.

डुरखाईमने प्रमाणकशून्य आत्महत्येचे सखोल विवेचन करताना असे म्हटले आहे की, समाजिक मूल्ये, प्रमाणके किंवा नियमने यांच्या प्रभावाबद्दल आणि पालनाबद्दल समाजात जेव्हा एकवाक्यता राहत नाही, तेव्हा सामाजिक नियंत्रणाला धक्का पोहचतो. अशी विकृत सामाजिक परिस्थितीच आत्महत्येला कारणीभूत ठरते. ज्या व्यक्तींना अशा बदलत्या परिस्थितीशी समायोजन साधता येत नाही त्यांचे जीवन प्रमाणकशून्य दिसू लागते. अशी प्रमाणकशून्यताच व्यक्तीला आत्मनाश करण्यासाठी प्रवृत्त करते. गरिबीप्रमाणे अचानक धनलाभ झाला तर व्यक्तीच्या इच्छा प्रमाणाबाहेर जातात. व्यक्तींच्या वाढत्या इच्छांवर नैतिक शक्तीच नियंत्रण ठेवू शकते. परंतु काही वेळा समाजात अशी परिस्थिती निर्माण होते की, त्यामुळे सामूहिक शक्तीचा प्रभाव कमी होऊन प्रमाणकशून्य परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. उदा. एकदम झालेल्या धनलाभामुळे इच्छा-अकांक्षांवर मर्यादा राहत नाहीत, नैराश्याचे प्रमाण वाढते व आत्महत्येला पोषक प्रेरणा निर्माण होते. तसेच पती-पत्नींमधील घटस्फोटांमुळे उभयतांचे कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होते, जीवनात नैराश्य येते आणि आत्महत्येला पोषक वातावरण तयार होते.

डुरखाईमने प्रमाणशून्यतेमधून निर्माण होणाऱ्या आत्महत्या या सामाजिक नियंत्रणाच्या अभावाचे कारण असतात असे स्पष्ट मत मांडले. त्याच्या मते, सामाजिक नियंत्रण जेवढे शिथिल तेवढी प्रमाणकशून्यता वाढत जाते. अचानकपणे बदललेल्या परिस्थितीशी ज्या व्यक्तींना सामावून घेणे शक्य होत नाही अशा व्यक्ती आत्महत्येचा मार्ग स्वीकारू लागतात.

डुरखाईमने असेहि म्हटले आहे की, उद्दीष्टांची वाढती पातळी आणि साधनांचा अभाव अशा परिस्थितीत व्यक्तींचा सामाजिक नीतीनियम आणि वर्तन नियंत्रित करणारी प्रमाणके यांच्यावरील विश्वास संपुष्टात येतो की, ज्यामुळे व्यक्ती आत्महत्येकडे वळू लागतात.

### ४. दैववादी आत्महत्या (Fatalistic Suicide) –

आत्महत्येच्या या प्रकारात व्यक्ती स्वत:च्या जीवनामध्ये आलेल्या अपयशाचे खापर (दोष) दुसऱ्याच्या माथी फोडते आणि निराशेपोटी स्वत:चे जीवन संपविते. या पार्श्वभूमीवर एमिल डुरखाईमने दैववादी आत्महत्येची व्यख्या खालीलप्रमाणे सांगितली आहे.

'जेंव्हा व्यक्ती स्वत:च्या जीवनातील अपयश हे नशीब किंवा दैव यामुळे येते असे मानते आणि निराशेपोटी आत्महत्या करते त्या प्रकाराला दैववादी आत्महत्या असे म्हटले जाते.' उदा. सर्वांगीण प्रगतीसाठी मनापासून प्रयत्न करून अथवा प्रयत्न न करता अपयश आल्यास देवांवर विश्वास ठेवून आत्महत्या केली जाते.

थोडक्यात, अज्ञानी अथवा रूढीप्रिय समाजामध्ये आत्महत्येचा हा प्रकार अधिक प्रमाणात आढळून येतो. सध्याच्या संमिश्र समाजामध्येदेखील काही प्रमाणात दैववादी आत्महत्या घडून येत असल्याचे निदर्शनास येते, प्राप्त परिस्थितीत समायोजन साधता न येणे याचा संबंध आपले दैव अथवा नशिबाशी जोडला जातो आणि निराशेपोटी आत्महत्या केली जाते.

आत्महत्येच्या वरील सर्व प्रकारांचा परामर्श घेतल्यानंतर डुरखाईम अशा निष्कर्षाप्रत पोहोचतो की, समाजाच्या विभिन्न अवस्थेत वेगवेगळया आत्महत्या घडून येत असतात. आत्महत्येचे स्त्रोत व्यक्तीवर यांत्रिक स्वरूपात प्रभाव टाकतात. अर्थात, समाजातील सर्वच व्यक्ती आत्महत्या विचाराला बळी पडत नाहीत. ज्यांना बदलत्या परिस्थितीत समायोजन साधणे शक्य होत नाही अशाच व्यक्ती आत्महत्येचा मार्ग अवलंबितात.

### आत्महत्या सिद्धांताचे मूल्यमापन (Evaluation of Suicide Theory) –

डुरखाईमने विशद केलेल्या 'आत्महत्या' या सिद्धांताचे वरील विवेचन विचारात घेता असे स्पष्ट होते की, त्याने आत्महत्या प्रवृत्तीस सामाजिक परिस्थिती कशी जबाबदार असते हे पटवून दिले. व्यक्तिगत कारणांपेक्षा सामाजिक कारणांचाच यामध्ये आढावा घेतला जातो, कारण आत्महत्या ही जरी व्यक्तीगत बाब असली तरी व्यक्तीच्या मनात आत्महत्येला पोषक अशा प्रेरणा निर्माण होण्यास सामाजिक परिस्थितीच कारणीभूत ठरते. उदा. आधुनिक समाजात मोठ्या प्रमाणात प्रमाणकशून्यता, वर्ग संघर्ष, समाजिक विषमता अथवा सामाजिक एकात्मतेचा अभाव आढळून येतो. या सर्व कारणांमुळे व्यक्तीचा समतोल ढासळतो.ज्यांना प्राप्त परिस्थितीत समायोजन साधणे शक्य नसते अशा व्यक्ती आत्महत्येचा मार्ग अवलंबितात. त्यामुळे डुरखाईमने आत्महत्या प्रवृत्तीस सामाजिक परिस्थितीच कारणीभूत असते, यावर अधिक भर देऊन आपला वरील सिद्धांत मांडला. ही प्रवृत्ती कमी करण्यासाठी त्याने संयम व शिस्त हा मार्ग सुचविला; असे असले तरी त्याच्या या सिद्धांतावर अनेकांनी टीकादेखील केली. उदा. (१) डुरखाईमने आत्महत्ये संबंधीचा विचार केवळ मध्यम व उच्च वर्गातील समाजासंबंधीच केलेला आहे. त्याच्या मते, जेथे सर्व सुखे आहेत. तेथे व्यक्ती बेफिकीर होतात आणि आत्महत्येचा विचार करतात. (२) सुख व अमर्यादित भौतिक संपत्ती आणि आत्महत्या यासंबंधीचा डुरखाईमचा वरील विचार लक्षात घेतला तर असे निदर्शनास येते की, डुरखाईम अप्रत्यक्षपणे सामाजिक विषमतेचे समर्थन करतो. (३) अनुकरण हे आत्महत्येचे कारण होऊ शकत नाही. हे जर आत्महत्येचे कारण असेल तर जेथे आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे त्या भागाजवळील समाजात ते अधिक दिसायला हवे, परंतु प्रत्यक्षात तसे दिसत नाही.

अशा प्रकारे आपणास डुरखाईमच्या आत्महत्या सिद्धांताचे वरीलप्रमाणे मूल्यमापन करता येईल. जरी या सिद्धांतावर टीका करण्यात आली असली तरी शेवटी असा निष्कर्ष काढता येईल की, डुरखाईमने भूतकाळाचा आधार घेऊन वर्तमानकाळाशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला. तसेच, प्रचलित सामाजिक परिस्थिती आत्महत्येस कशी जबाबदार असते हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे डुरखाईमचे आत्महत्येसंबधीचे विचार टीकास्पद असले तरी ते प्राप्त परिस्थितीत अतिशय महत्वपूर्ण समजले जातात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१. डुरखाईमने आत्महत्येसंबंधी विवेचन करणारा कोणता ग्रंथ लिहिला ?

२. डुरखाईमच्या मते, आत्महत्या ही कोणती घटना असून ती केव्हा केली जाते ?

३. डुरखाईमने आत्महत्येचे किती व कोणते प्रकार सांगितले ?

४. परहितवादी आत्महत्या म्हणजे काय ?

५. डुरखाईमने आत्मकेंद्रीत आत्महत्येची कोणती उदाहरणे सांगितली आहेत ?

**३.२.४ धर्मविषयक सिद्धांत (डुरखाईमचे धर्मासंबंधीचे विचार) : –**

एमिल डुरखाईमने १९१२ मध्ये "The Elementary Forms of Religious Life" हा ग्रंथ लिहून त्यामध्ये धर्मासंबंधीचे सखोल विवेचन करताना धर्माचे स्वरूप, धर्माची निर्मिती, त्याचा समाजजीवनावरील प्रभाव आणि धर्माची कार्ये इत्यादींचा आढावा घेतला. धर्म म्हणजे **सामूहिक प्रतिनिधित्त्वाचा अंश** तसेच ते एक सामाजिक सत्य असून ती एक सामाजिक घटनाच आहे असा प्रमुख विचार मांडला. धर्मविषयक सिद्धांतामध्ये डुरखाईमने **समाज हीच देवता** आहे असे मानून धर्मातील पूजाअर्चा, होमहवन, ईश्वरभक्ती या सर्व कल्पनांना फाटा दिला. त्याचप्रमाणे एडवर्ड टायलर, मॅक्स मूल्लर, फ्रेझर इत्यादी विचारवंतांचे धर्मविषयक विचार अशास्त्रीय होते असे मानून त्या विचारांचे खंडन केले. उदा. 'दिव्य प्राण्यावरील श्रद्धा म्हणजे धर्म (Religion is the Belief in Super Natural Beings) हे एडवर्ड टायलरचे मत खोडून काढले. तसेच, निसर्गातील प्रत्येक वस्तूत आत्मा किंवा दैवशक्ती आहे, हा मॅक्स मूल्लरचा विचारदेखील खोडून काढला आणि आपला धर्मविषयक सिद्धांत मांडताना धर्माचे स्वरूप, (व्याख्या) धर्माची निर्मिती आणि त्याची कार्यात्मक भूमिका यासंबंधी विवेचन केले. त्याचा खालीलप्रमाणे आढावा घेता येईल.

**धर्माची व्याख्या अथवा स्वरूप** –

एमिल डुरखाईमने धर्माची व्याख्या पुढीलप्रमाणे केली, ''धर्म म्हणजे पवित्र वस्तूच्या संदर्भातील श्रद्धा आणि प्रथा यांची एकात्म पद्धत आहे. अशा समान श्रद्धा आणि प्रथांवर विश्वास ठेवणाऱ्या सर्व व्यक्ती एका समान नैतिक समुदायात परस्परसंबंधातून बांधल्या जातात. धर्माच्या विकासासाठी श्रद्धा व प्रथांची आवश्यकता असते.'' या व्याख्येवरून डुरखाईम असे सूचित करतो की, धर्म म्हणजे **सामूहिक प्रतिनिधित्वाचा एक भाग** असून धर्मामुळे व्यक्तीला समाजात निश्चित असा दर्जा प्राप्त होतो. सामाजिक आदर्शांची निर्मिती धर्माकडून केली जाते. त्याचप्रमाणे धर्मं हा मानवसमाजावर विविध श्रध्दा आणि प्रथा इत्यादींव्दारे नियंत्रण ठेवून सामाजिक ऐक्य वाढविण्यास मदत करतो. त्यामुळे डुरखाईमने धर्मांचा उल्लेख एक **आवश्यक व मूलभूत अशी सामाजिक संस्था** असा केला आहे. त्याने धर्माचा वस्तूनिष्ठ दृष्टीने इतका व्यापक अभ्यास केला की, त्यातून धर्माचे समाजशास्त्र (Sociology of Religion) उदयास आले.

थोडक्यात, धर्माकडून समाजातील विविध आदर्शांची निर्मिती केली जाते तसेच सर्वांच्या इच्छा–आकांक्षांचे प्रतिनिधित्व केले जाते. उदा. सण, उत्सव, यात्रा, समारंभ इत्यादींमधून धर्म प्रकट होत असतो. धर्म ही केवळ सामाजिक बाब नसून ते समाजाचे ईश्वरीय रूप आहे. अशा प्रकारे डुरखाईमने आपल्या धर्माच्या व्याख्येवरून धर्माचे स्वरूप विशद केले.

**धर्माची उत्पत्ती आणि प्रचलित धर्मविषयक विचारांचे खंडन –**

डुरखाईमने आपला धर्मविषयक सिध्दांत मांडताना धर्माची व्याख्या अथवा स्वरूप स्पष्ट केल्यानंतर धर्माच्या उत्पत्तीसंबंधी मांडलेल्या प्रचलित विचारांचे खंडन करून स्वत:चा धर्मविषयक दृष्टीकोन सविस्तरपणे मांडला. उदा.१) एडवर्ड टायलरचा सर्वात्मवाद (Animism) आणि २) मॅक्स मूल्लरचा निसर्गवाद या विचारांचे खंडन केले. (Naturism) सर्वात्मवादानुसार निसर्गातील प्रत्येक वस्तूत आत्मा किंवा दैवीशक्ती आहे, असे मानून आत्म्याची पूजा हेच धर्माचे मूळ स्वरूप समजण्यात आले. तर निसर्गवादानुसार निसर्गातील शक्तीची पूजा हेच धर्माचे मूळ स्वरूप मानले गेले. डुरखाईमला हे दोन्ही विचार मान्य नव्हते, कारण या दोन्ही विचारांमध्ये अथवा सिध्दांतामध्ये धर्माचे स्वरूप हे आत्मा आणि निसर्गातील शक्ती अशा काल्पनिक गोष्टींच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे डुरखाईमने पूर्वी मांडण्यात आलेल्या धर्मविषयक विचारांचे खंडन करून ते विचार अशास्त्रीय व अपुऱ्या ज्ञानावर कसे आधारित होते हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने आपल्या धर्मविषयक सिध्दांताची मांडणी करताना धर्माचे विभाजन, समाजजीवनावर धर्माचा प्रभाव आणि धर्माची कार्ये इत्यादींचे सखोल विवेचन केले आहे.

**डुरखाईमच्या धर्मविषयक संकल्पनेचे विश्लेषण (Analysis of Religious Concept by Durkheim) –**

डुरखाईमच्या मते, सामूहिक जीवनातील सर्व वस्तू किंवा घटनांची विभागणी ही दोन मुख्य प्रकारांत होत असते. हे दोन प्रकार म्हणजे **पावित्र्य आणि अपावित्र्याची कल्पना** होय. त्याच्या मते, पावित्र्याची कल्पना (Sacred Concept) हा धर्माचा मूलाधार आहे. परंतु याचा अर्थ, धर्माने ठरविलेली प्रत्येक पवित्र वस्तू अलौकिक किंवा अतिमानवी असते असे मात्र नाही. धार्मिक श्रध्दा, विधी, सण समारंभ इत्यादीद्वारे पवित्र व अपवित्र अशा वस्तूंच्या संबंधीची माहिती सामूहिक पध्दतीने दिली जाते. या सर्व गोष्टी काल्पनिक असल्याने त्यांना वास्तवतेचा आधार नाही असे मत मांडले. असे असले तरी धर्माचा जास्तीतजास्त भाग पवित्र वस्तूंशी संबंधित असतो. उदा. धर्मांचे चिन्ह. थोडक्यात, पवित्र वस्तूमागे सामूहिक भावनेचा अविष्कार पाहावयास मिळतो. डुरखाईमच्या मते, व्यक्ती पवित्र वस्तूंचा आदर राखतात, तसेच त्यांच्या आधीन होतात. अशा आदर्श गोष्टींचे नेहमी पालन करण्याचा व्यक्तींकडून प्रयत्न केला जातो. या संदर्भात डुरखाईमने कोणताही धर्म हा पावित्र्याशी संबंधित असतो असे मत मांडले. पवित्र गोष्टीतून मानव व समाजकल्याण अभिप्रेत असते, म्हणूनच त्याने पवित्र वस्तूंशी संबंधित गोष्टींना धर्म मानले.

पवित्र वस्तू अथवा पावित्र्याची कल्पना याबरोबरच धर्मविषयक संकल्पना मांडताना डुरखाईमने अपावित्र्याची कल्पना (Profane Concept) अथवा अपवित्र वस्तू कोणत्या, याविषयी पूढील मत मांडले. ज्या वस्तू साधनभूत मानल्या गेल्या असुन ज्यांचा आर्थिकदृष्ट्या विचार केला जातो, त्यास अपिवत्र वस्तू असे म्हटले जाते. उदा. सर्व आर्थिक क्रिया अथवा अपवित्र वस्तू म्हणजे वाईट अथवा अधर्माशी संबंधित असणारे वर्तन होय. **पार्सनच्या मते,** पवित्र आणि अपवित्र हे केवळ वस्तूंचे विभाजन नसून ते दृष्टीकोणाचे विभाजन आहे, पवित्र वस्तूंचा साधन म्हणून उपयोग करता येत नाही, मात्र धार्मिकदृष्ट्या त्यांना अधिक महत्त्व असल्याने अपवित्र वस्तूपासून वेगळे ठेवलेले असते.

अशा प्रकारे डुरखाईमने धर्माचे विश्लेषण पवित्र व अपवित्र वस्तू अथवा घटनांच्या संदर्भात केले. याशिवाय, धर्मामध्ये श्रध्दा (Belief) आणि संस्कार किंवा विधी (Rituals) या दोन पैलूंचा विचार मांडला. त्याच्या मते, हे दोन्ही पैलू परस्परपूरक आहेत. श्रध्दा ही पवित्र वस्तूंशी संबंधित असते तर संस्कार हा पवित्र वस्तूंच्या अनुरोधाने केलेल्या क्रियेशी संबंधित असतो. यादृष्टीने धर्म म्हणजे **विश्वास आणि त्यासंबंधी क्रियांची एक व्यवस्थित पध्दत** आहे असे म्हणता येते.चांगले विचार यांचे मिश्रण म्हणजे धर्म होय. डुरखाईमच्या मते, आधुनिक काळातील धर्माची उत्पत्ती आदिवासी समाजात आढळणाऱ्या विविध प्रथांमधून झाली असल्याने त्या प्रथांचा आढावा घेणे आवश्यक आहे. यासाठी डुरखाईमने ऑस्ट्रेलियातील **अरूंटा** (Arunta) जमातीचा अभ्यास केला. या जमातीच्या आचार-विचारांतून मौलिक स्वरूपाची माहिती धर्मसंबंधाने प्राप्त होते. या जमातीमधील लोक सण-समारंभाच्या निमित्ताने एकत्र येतात. समूहात एकत्र आल्यामुळे आचार-विचारांत समानता येते. त्यांच्यातील संघटितपणामुळे त्यांना नवीन चेतना मिळते. अशा सामूहिक शक्तीपुढे सर्वांना नतमस्तक व्हावे लागते. यातूनच समूह श्रेष्ठता वाढत जाते. समूहाविषयी व्यक्तींच्या मनात भीती व आदरयुक्त भावना जागृत होते. त्यालाच डुरखाईमने धर्म प्रतीक अथवा धार्मिक अदभुती असे मानून त्यानुसार धर्माविषयीची धारणा स्पष्ट करता येते असे मत मांडले. अर्थातच, त्यासाठी त्याने आदिम समाजातील विविध कुलांचा, त्यातील विविध कुलचिन्हांचा, तसेच कुलदेववादाचे विश्लेषण (Totemism) इत्यादींचा आढावा घेतला. त्यावरून या समाजात अनेक कुले (Clans) असून प्रत्येक कुलाचे निश्चित असे कुलप्रतीक असते (Clan Symbol) (उदा. एखादा दगड, एखाद्या प्राण्याचे अथवा पक्षाचे चित्र,लाकडाचे तुकडे इ.) आणि अशा कुलप्रतीकास पावित्र्य प्राप्त होऊन व्यक्तीच्या मनामध्ये त्याबद्दल आदराची भावना निर्माण होते. यादृष्टीने कुलदेववादाकडे (Totemism) पाहिले पाहिजे असे डुरखाईमचे मत होते.

थोडक्यात, कुलदेव (Totem) म्हणून ज्याच्यावर श्रद्धा असते त्यापासून आपली व आपल्या कुलाची निर्मिती झाली असावी, त्यामुळे त्याला पवित्र मानण्याची प्रथा रूढ झाली. त्यातूनच धर्माची निर्मिती झाली असे डुरखाईमला वाटते. कुलप्रतीक अथवा कुलचिन्ह हे एक प्रकारे समूहजीवनाचे चिन्ह मानले जाते. कुलदेववादाच्या आधारावरच पवित्र आणि अपवित्र वस्तूमध्ये भेद निर्माण झाला. सर्व धर्माचे मूळ हे कुलदेववादातच सापडते असे त्याचे मत होते. त्यावरून त्याने 'कुलदेववाद म्हणजे सर्व धर्मांचे प्राथमिक रूप असून ते एखाद्या समूहाच्या सामूहिक प्रतिनिधित्वाचे प्रतीक असते.' असा विचार प्रकट केला. या संदर्भात सोरोकिन याने असे म्हटले आहे की, समाज स्वत:च धर्माचा मूळ स्त्रोत आहे. धार्मिक कल्पना आणि अन्य काहीही नसून केवळ समाजाची प्रतीके आहेत. पवित्र किंवा ईश्वर समाजाचे मानवारोपित स्वरूपच आहे. धर्माचे भरीव सामाजिक कार्य म्हणजे समाजिक एकतेची उत्पत्ती, त्याची पुनर्स्थापना आणि सातत्य टिकविणे हे आहे. यावरून असे स्पष्ट होते की, धर्म हा व्यक्तिविशिष्ट असत नाही तर समाज हाच धर्माचा आधार असतो. यातूनच धर्मावर विश्वास असणाऱ्यांचा एक नैतिक समूह निर्माण झालेला दिसून येतो.

**धर्माची कार्ये किंवा (भूमिका) (Functions or Role of Religion) -**

धर्म ही एक सामाजिक बाब अथवा घटना असल्यामुळे डुरखाईमने धर्म संकल्पनेचे सखोल विवेचन करताना धर्माची विविध कार्ये सविस्तरपणे स्पष्ट केली आहेत. त्याच्या मते, या कार्याच्या अनुषंगाने धर्मामूळे मानवी जीवनाचे पवित्र आणि अपवित्र असे दोन भाग पडतात. **पवित्र गोष्टींचे पावित्र्य राखणे आणि अपवित्र कार्यापासून बाजूला राहणे** अशी धर्माची शिकवण असल्याने एक प्रकारे धर्म सामूहिक आदर्शांची निर्मिती करून व्यक्तींना एकत्र आणण्याचे महत्वपूर्ण कार्य करतो असे डुरखाईमचे मत आहे. या पार्श्वभूमिवर

डुरखाईमने धर्माची खालील प्रमुख **चार** सामाजिक कार्ये सांगितली आहेत.

१. शिस्त लावणे. (धर्माच्या नियमांचे पालन करणे)

२. एकात्मता निर्माण करणे. (धार्मिक समारंभाच्या निमित्ताने एकत्र येणे)

३. समाजात दृढता निर्माण करणे. (समाजाच्या रूढीपरंपरांचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतर होत राहते)

४. भावनांवर नियंत्रण ठेवणे. (विधायक कार्यास प्रेरणा आणि अपवित्र कार्यापासून दूर राहण्याची अनुज्ञा.) यावरून असे स्पष्ट होते की, धर्म हा व्यक्तींमध्ये सामूहिक आदर्शांची निर्मिती करून चांगले - वाईट, पवित्र-अपवित्र यासंबधीचे मार्गदर्शन करतो. समाजातील व्यक्तीमध्ये धार्मिक समारंभाच्या निमित्ताने एकात्मता राखली जात असल्यामुळे आजदेखील ही संस्था शाश्वत स्वरूपात टिकून राहिली असे डुरखाईमंचे मत आहे. त्यामुळेच त्याने धर्माला समाजाचे ईश्वरीय रूप मानले. धर्म हा सामाजिक एकतेचे कार्य करित असल्याने डुरखाईमने धर्माला एक सामाजिक सत्य म्हणून संबोधले.

**डुरखाईमच्या धर्माविषयक विचाराचे मूल्यमापन (Evalution of Rellgious thought by Durkheim) -**

डुरखाईमने आपला धर्मविषयक सिद्धांत मांडताना धर्माचा मूळ आधार समाजच आहे, असे मत मांडले. धर्माकडून आदर्श समाजाची निर्मिती केली जाते हे तत्व सिद्ध करून दाखविले. हे मान्य करूनदेखील त्याच्या या सिद्धांतावर अनेकांनी विविध अशी टिका केली. उदा:- (१) अलेक्झांडर गोल्डन वाईंजर याच्या मते, डुरखाईमचा धर्मविषयक विचार सिद्धांत म्हणून कितीही महत्वाचा असला तरी तो अगदीच एकतर्फी आणि मनाला न पटणारा आहे. जीवन अनुभवाचे पवित्र आणि अपवित्र स्वरूपात केलेले वर्गीकरण सबल नसून अविकसित समाजाप्रमाणे ते आधुनिक समाजाला लावणे योग्य नाही. (२) मार्क्सच्या मते, सामाजिक जाणीव ही समाजातील संबंधाच्या स्थित्यंतरासाठी मूलभूत व आवश्यक अशी एक बाब आहे. तर **डुरखाईमच्या मते,** ती समाजातील एक स्थिर स्वरूपाची शक्ती आहे. (३) ईश्वर ही कल्पना समाजाच्या कल्पनेबरोबर आहे ही गोष्ट सर्वांना मान्य होत नाही कारण समाज आणि ईश्वर ही एकच कल्पना नसून व्यवहारात आपण त्या दोन स्वतंत्र कल्पना मानतो. कोणतीही धार्मिक व्यक्ती समाजाला ईश्वर समजून त्याची पूजा करताना आढळत नाही.

डुरखाईमच्या धर्माविषयक सिद्धांतावर जरी वरीलप्रमाणे टीका करण्यात आलेली असली तरी, त्याच्या या सिद्धांताचे महत्व नाकारता येत नाही. आदर्श समाज हा धर्माकडूनच स्थापन केला जातो. हा महत्वपूर्ण विचार डुरखाईमने प्रथमत: मांडला. त्यामुळे त्याचा हा सिद्धांत म्हणजे खरोखर समाजशास्त्राला त्याने दिलेली मोलाची देणगीच आहे असे मानले जाते. हा सिद्धांत आधुनिक समाजात चांगलेच मूळ धरू लागलेला आहे. कारण आजचा धर्म म्हणजे समाजाच्या कल्याणाचा विचार होय.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ४**

१. एमिल डुरखाईमने धर्माशी निगडीत कोणता ग्रंथ लिहिला ?

२. डुरखाईमने धर्मविषयक सिध्दांतामध्ये कोणत्या कल्पनाना फाटा दिला ?

३. डुरखाईमने धर्माची व्याख्या कशी केली आहे ?

४. डुरखाईमच्या मते, धर्माच्या विकासासाठी कोणती गोष्ट आवश्यक आहे ?

५. डुरखाईमने धर्माचा मुलाधार कोणता सांगितला ?

६. डुरखाईमने कुलचिन्हाचा संबंध कशाशी जोडला आहे ?

## ३.३ सारांश (डुरखाईमच्या समाजशास्त्रीय विचारांचे मूल्यमापन) (Evalution of Sociological Thoughts by Durkhelm)

एमिल डुरखाईम या फ्रेंच विचारवंताने सामाजिक सत्य, श्रमविभाजन, यांत्रिक व सेंद्रिय एकता, आत्महत्या आणि धर्माविषयक सिद्धांत यांसारखे अतिशय महत्वपूर्ण असे समाजशास्त्रीय विचार मांडले. त्याने आपल्या समाजशास्त्रीय लिखाणात सामाजिक विश्लेषणाची प्रत्यक्षवादी शास्त्रीय पद्धत निर्माण केली. सामाजिक घटनांची निर्मिती होण्यासाठी समाज हेच मूलभूत कारण आहे, यावर भर देवून वैज्ञानिक अभ्यास पद्धतीला समाजशास्त्रीय गाभा मानला. सामाजिक घटनांचा अभ्यास वास्तववादी दृष्टीकोनातून करणारा विचारवंत म्हणून डुरखाईमकडे पाहिले जाते. असा अभ्यास करताना काय आहे? याच्याऐवजी काय पाहिजे? याला त्याने अधिक महत्व देऊन आपले विविध समाजशास्त्रीय विचार मांडले. त्यामुळेच आधुनिक समाजशास्त्राला स्वतंत्र स्थान व वस्तुनिष्ठतेचा दर्जा प्राप्त झाला, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्याचे सामाजिक सत्य, श्रमविभाजन, आत्महत्या, आणि धर्मासंबंधीचे विचार, हे प्रत्यक्ष निरीक्षण आणि वास्तववादी माहिती गोळा करून त्या आधाराने मांडलेले आहेत. त्यावरून आपणास डुरखाईमच्या समाजशास्त्रीय विचारांची उंची किती होती हे समजू शकते. खऱ्या अर्थाने, डुरखाईमने आपल्या विचारांच्या माध्यमातून समाजशास्त्राला विज्ञानाच्या पायावर उभे करण्यामध्ये अतिशय महत्वाची भूमिका पार पाडली असे अंतिम विधान करता येईल.

## ३.४ पारिभाषिक शब्द किंवा संज्ञा : –

Introspection - आत्मपरीक्षण करणे

Constraining - निर्बंध

Conjecture - अनुमान

Solidarity - एकता

Normlessness - निर्णय न घेता येणे

Associational - संबंधित

Reductionist - गुंतागुंतीच्या गोष्टींचे सोपे पृथःकरण

Personified - निर्जिव वस्तुत मानवाचे गुण असणे

Transcendental- तत्वज्ञानापलीकडील अथवा अलौकिक अनुभव

Dissolution - विसर्जन

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

१. कारण या प्रक्रियेचा संबंध व्यक्तीगत आत्मपरीक्षणाशी नाही, जर आपणास ज्ञान मिळवावयाचे असेल तर आपणास मनाच्या बाहेर जावून विचार करावा लागेल.

२. डुरखाईमने सामाजिक सत्याची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगितली.

   १. सामाजिक तथ्ये समाजात बाह्यरूप असतात.

   २. ती व्यक्तीवर निर्बंध म्हणून असतात.

   ३. ती समाजात विखुरलेली असतात.

   ४. निसर्गाशी संबंधित असतात.

३. व्यक्तीला सामाजिक सत्यामध्ये सहभागी व्हावे लागते कारण त्यामुळे वस्तुनिष्ठता समजते तसेच त्याचा अर्थ समजून घेता येतो.

४. डुरखाईमने सामाजिक सत्याचे खालील नियम सांगितले.

उदा. १. सामाजिक सत्य हे वस्तू म्हणून विचारात घेतले पाहिजे.

   २. सामाजिक सत्याचे निरीक्षण व्यक्तीगत प्रकटीकरणाच्या पलीकडील असते.

   ३. विशिष्ट मानसिक दृष्टीकोन गृहीत धरून वस्तूनिष्ठपणे निरीक्षण करणे.

   ४. घटनांशी संबंधित तथ्यांचे बाह्य वैशिष्टयानुसार पूर्वस्पष्टीकरण करणे.

   ५. पूर्वसंकल्पनांचे निर्मूलन करणे.

   ६. व्यक्तीगत मतप्रणाली आणि सामाजिक सत्य यांचा स्वतंत्र विचार करणे.

५. सामाजिक सत्यास वस्तू म्हणून संबोधण्याची गरज असते कारण त्यामुळे निश्चित व स्पष्ट स्वरूपात सत्य प्रकट करणे शक्य होईल.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

१. यांत्रिक एकता व जैविक एकता (प्राचीन व प्रगत समाज)

२. सामाजिक संघटनेत अथवा गुंतागुंतीत अनेक निर्बंध असतात. समाजाचे सुख उत्पादनात साठविलेले असते.

३. प्राचीन समाजात मोठया प्रमाणात यांत्रिक एकता आढळते.

४. प्रगत समाजात जैविक किंवा सेंद्रिय एकता आढळते.

५. दमनात्मक कायदा आवश्यक असतो.

६. आधुनिक समाजात मनुष्याचा कामाशी असणारा संबंध हा आर्थिक वेतन मिळविण्याचा व सक्तीचा संबंध असा असतो.

७. श्रमविभाजनातून अस्तित्वात येणाऱ्या सामाजिक आणि नैतिक परिवर्तनावर डुरखाईमने आपले लक्ष केंद्रित केले.

**स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे -३**

१. 'Lee Suicide'

२. आत्महत्या ही सामाजिक घटना असून प्राप्त परिस्थितीत समयोजन साधता येत नाही अशा वेळी व्यक्ती आत्महत्या करते.

३. चार प्रकार उदा. १) परहितवादी २) आत्मकेंद्रीत, ३) प्रमाणक शून्य ४) दैववादी

४. दुसऱ्याच्या हितासाठी केलेली आत्महत्या म्हणजे परहितवादी आत्महत्या होय.

५. कॅथॉलिक पंथापेक्षा प्रॉटेस्टंट पंथात अधिक प्रमाण, अपत्य नसणाऱ्या व्यक्ती, विधवा अथवा घटस्फोटित स्त्रिया यांच्यामध्ये आत्मकेंद्रित आत्महत्या अधिक प्रमाणात आढळते.

**स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे -४**

१. 'The Elementary Forms of Religious life'

२. धर्मातील पूजा-अर्चा, होम हवन, ईश्वर भक्ती या कल्पनांना डुरखाईमने आपल्या धर्मविषयक सिंध्दांतात फाटा दिला.

३. पवित्र वस्तूंच्या संदर्भातील श्रध्दा व प्रथा यांची एकात्म पध्दत म्हणजे धर्म होय.

४. धर्माच्या विकासासाठी श्रध्दा व प्रथा यांची आवश्यकता असते.

५. डुरखाईमने पावित्र्याची कल्पना हा धर्माचा मुलाधार सांगितला.

६. कुलचिन्हांचा संबंध गुढ किंवा पवित्र शक्तीशी जोडला आहे.

## ३.६ सरावासाठी प्रश्न (सराव किंवा गृहपाठ) :

१. सामाजिक सत्य अथवा तथ्य यांच्या वैशिष्ट्यांवर टीप लिहा.

२. डुरखाईमच्या श्रमविभाजन सिध्दांताचे फायदे लिहा.

३. डुरखाईमने सांगितलेले आत्महत्येचे प्रकार विशद करा.

४. डुरखाईमच्या धर्मविषयक सिध्दांताची सखोल चर्चा करा.

## ३.७ अधिक वाचनासाठीची पुस्तके (Reference Books) : -


1. Aron, Raymond - Main currents in Sociological Thought (vol I & II)
2. Barnes H.E. : 'An Introduction to the History of Sociology' Phoenix Books. The University of Chikago Press London, 1996.
3. Bogardus E.S. : Development of Sociological thought
4. Beteille Andre - Sociology : Essays on Approach & Method

5. Coser, Lewis A : The Masters of Sociological Thought
6. Fletcher R : The Making of Sociological ( Vol I & II)
7. George Ritzer : Classical Sociology Theory
8. Mohite / Salunkhe - Samajshastriya Vicharvant - Phadake Prakashan, Kolhapur
9. Marulkar - Samajshastriya Vicharancha Itihas, Prachi Prakashan, Mumbai.
10. Vaidhya N.S. - Samajasjastriya Vichar Parampara - Vidhya Prakashan, Nagpur.

❐ ❐ ❐

सत्र–१ : घटक–४

# मॅक्स वेबर (Max Weber)

**घटक संरचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२. विषय–विवेचन

४.२.१ वेबरची बौद्धिक पार्श्वभूमी आणि त्याचे पद्धतीशास्त्र

समाजशास्त्रीय : एक अन्वेशणात्मक शास्त्र

अ) सामाजिक आकलन Verstehen

ब) आदर्श प्रारूप Ideal Types

४.२.१.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

४.२.२ सामाजिक क्रिया : संकल्पना आणि प्रकार

४.२.२.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

४.२.३ प्रोटेस्टंट नैतिकता आणि भांडवलशाहीचा आत्मा यासंबंधीचा सिद्धांत

४.२.३.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

४.२.४ वेबरचा अधिकाराचा सिध्दांत : 'सत्ता' आणि 'अधिकार' प्रकार

४.२.४.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

४.३ पारिभाषिक शब्दाचे अर्थ

४.४ सारांश

४.५ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ चिंतन आणि कार्ये

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये (Objectives):

या युनिटच्या अभ्यासानंतर आपण खालील बाबींसंबंधी ज्ञान मिळवण्यात यशस्वी होऊ.

- मॅक्स वेबरचा पध्दतीशास्त्रीय दृष्टीकोण, समाजशास्त्र एक अन्वेशणात्मक शास्त्र - अ) सामाजिक आकलनाच्या पध्दती (Verstehen) आणि त्याची ब) आदर्श प्रारूपबाबतची संकल्पना.
- मॅक्स वेबरची सामाजिक क्रियेची संकल्पना त्याने सामाजिक क्रियेची केलेली व्याख्या, क्रिया आणि सामाजिक क्रिया या दोहोंतील स्पष्ट केलेला फरक आणि मॅक्स वेबरने विशद केलेले सामाजिक क्रियेचे प्रकार.
- मॅक्स वेबरचे ज्ञानाच्या समाजशास्त्रातील सर्वात मौल्यवान योगदान म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो ते त्याचे धर्माच्या समाजशास्त्राविषयीचे विचार, ज्यातून आपण त्याचे प्रोटेस्टंट नैतिकता हाच भांडवलशाहीचा आत्मा का व कसा आहे याविषयीचे स्पष्टीकरण समजून घेणार आहोत. यामध्ये त्याने निर्मीलेले आधुनिक भांडवलशाहीचे आदर्श प्रारूप, आधुनिक भांडवलशाहीची पाच मूलभूत तत्वे, भांडवलशाहीच्या विकासासाठी प्रोटेस्टंटवादाने दिलेल्या सात देणग्या या सर्वांबाबतचे ज्ञान त्याच्या ''प्रॉरुटेटंट इथिक्स दि स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिजम'' या सिध्दांताच्या अभ्यासातून आपण मिळवणार आहोत.
- मॅक्स वेबरने सत्तेची अगर अधिकाराची व्याख्या नेमकी कशी केली आहे, याबरोबरच त्याने अधिकाराचे परंपरेवर आधारित किंवा परंपराधिष्ठित अधिकार, चमत्कार घडवून आणण्याच्या व्यक्तिच्या क्षमतेतून प्राप्त झालेला चमतकृतीजन्य अगर दैवीगुणाधिष्ठित अधिकार आणि तर्क व कायदा यावर आधारित कायदाधिष्ठित अधिकार याप्रकारे अधिकाराच्या आदर्श प्रारूपांचे केलेले विवेचन अभ्यासणार आहोत.

## ४.१ प्रास्ताविक (Introduction) :

यापूर्वीच्या या पुस्तकातील तीन युनिटमध्ये तुम्ही समाजशास्त्रीय सिध्दांताच्या उगमापाठीमागच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि बौध्दिक शक्तींचा परिचय करून घेतला आहे ज्यामध्ये समाजशास्त्राच्या उदयापूर्वीच्या सामाजिक विचारांचा आढावा घेतल्यानंतर समाजशास्त्रिय सिध्दांताच्या विकासातील सामाजिक आर्थिक शक्ती व बौध्दिक आणि तत्वज्ञानविषयक शक्ती यांचे सविस्तर अध्ययन केले आहे. त्यानंतर समाजशास्त्रीय सिध्दांताच्या बांधणीत मोलाची भर घालणाऱ्या समाजशास्त्राला शास्त्राचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी आपल्या सिध्दांतांची मांडणी करणाऱ्या कार्ल मार्क्स आणि एमिल डुरखाईम या दोन समाजशास्त्रज्ञांच्या योगदानाचा सविस्तर अभ्यास केला आहे. या युनिटमध्येदेखील आपण समाजशात्राच्या विकासात भर घालणाऱ्या व समाजशास्त्रीय विचारांना एक नवे वळण देणाऱ्या मॅक्स वेबर या जर्मन समाजशास्त्रज्ञाच्या सैध्दांतिक योगदानाचा अभ्यास करणार आहोत. या युनिटमध्ये आपण समाजशास्त्राच्या पध्दतीशास्त्राविषयीच्या विचारांचा आढावा घेताना वेबरने मांडलेली सामाजिक अवलोकनाची (अन्वेषणाची) पध्दती आणि त्याची आदर्श प्रारूपविषयीची संकल्पना, सामाजिक क्रियेचा सिध्दांत, 'धर्माच्या समाजशास्त्रा' बाबतचे विचार स्पष्ट करताना त्याने मांडलेले प्रोटेस्टंट नैतिकता व भांडवलीशाहीचा आत्मा याबाबतचे विचार, तसेच त्याने मांडलेला अधिकाराचा सिध्दांत आणि त्याने

विशद केलेले अधिकाराचे प्रकार याबाबींचा सविस्तर अभ्यास करणार आहोत. सर्व विचारांच्या सहाय्यानेच आपण मॅक्स वेबरचे समाजशास्त्राच्या सैध्दांतिक विकासातील योगदान निश्चित करणार आहोत.

प्रथम आपण मॅक्स वेबरचे जीवन, त्याच्यावर पडलेला प्रभाव आणि त्याने केलेली वांडमय निर्मिती याचा थोडक्यात आढावा घेणार आहोत . कारण कोणत्याही विचारवंताची वैचारिक बैठक ही त्याच्या जीवनात घडलेल्या घटना, संपर्कात आलेली माणसे व त्या काळातील त्या समाजाची सामाजिक, राजकिय, आर्थिक व धार्मिक परिस्थिती यांचाच परिपाक असतो .

**मॅक्स वेबरची ग्रंथसंपदा –**

मॅक्स वेबर हा अत्यंत कुशाग्र बुध्दीमत्ता आणि अभ्यासू असा अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा समाजशास्त्रज्ञ होता हे त्याच्या विपूल अशा लिखाणावरून सहजपणे लक्षात येते. हिडेलबर्ग विद्यापीठ व परिसर हे त्याच्या या सर्व लेखन कार्याचे स्फुर्तीस्थान असून त्याचे बरेचसे लिखान हे निबंधाच्या स्वरूपात असल्याचे आढळते. त्याने जर्मन भाषेत अनेक पुस्तके लिहिली आहेत आणि आतापर्यंत त्याच्या अनेक पुस्तकांचे इंग्रजी भाषेत भाषांतरही उपलब्ध झाले आहे. यापैकी काही महत्वाची पुस्तके खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. 'द मेथॉडॉलॉजी ऑफ सोशल सायन्सेस' (The Methodology of Social Sciences) –**

हे जर्मन भाषेत त्याने लिहिलेले पुस्तक नंतर इंग्रजीत भाषांतरित झालेल्या या पुस्तकातील त्याचे समाजशास्त्राच्या पध्दतीशास्त्राबाबतचे विचार सर्वत्र गाजलेले आहेत. या पुस्तकामध्ये त्याने कोणत्याही सामाजिक शास्त्राचा अभ्यास हा विशिष्ट पध्दतीनेच होणे का गरजेचे आहे व त्यावरच सामाजिक शास्त्रांच्या संशोधन क्षेत्रातील निष्कर्ष हे अधिकाधिक अचूक ठरतील हे विशद केले आहे.

**२. प्रोटेस्टंट इथिक्स अॅण्ड दि स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम (Protestant Ethics and the Spirit of Capitalism) -**

१९०५ साली प्रकाशीत झालेले मॅक्स वेबरचे हे पुस्तक म्हणजे ज्ञानाच्या समाजशास्त्रातील त्याचे सर्वात महत्वाचे योगदान मानले जाते. स्वत: प्रोटेस्टंट पंथिय कुटुंबात जन्मलेल्या वेबरला काही कौटुंबिक अनुभवातून व्यक्ती वर्तनातील नैतिकतेची आवश्यकता भासली व त्यातूनच या पुस्तकाचा जन्म झाला असून या पुस्तकात त्याने भांडवलशाही आणि प्रोटेस्टंटिझम यांच्यातील संबंधांचे ऐतिहासीक पुराव्यांच्या सहाय्याने स्पष्टीकरण केले आहे.

**३. धर्माचे समाजशास्त्र (Sociology of Religion) –**

आपल्या प्रोटेस्टंटिझमच्या अभ्यासाच्या आवडीतूनच त्याला भारतातील व चीनमधील धर्मांच्या अभ्यासाची प्रेरणा मिळाली होती. दोन्ही देशांतील धर्मावर त्याने लिखाण केले पण ते पूर्ण होऊ शकले नाही. त्याचे हे लिखाण 'अ) द रिलिजन ऑफ इंडिया (The Relogion of India) ब) द रिलिजन ऑफ चायना कन्फयूएनिझम अॅण्ड ताओयिझम (The Relogion of China, Confucianism and Taoism) व क) 'अॅनशियंट ज्युडाइझम' (The Ancient Judaism) या तीन खंडात प्रकाशित झाले आहे.

### ४. अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र (Economy and Sociology) –

मॅक्स वेबरच्या मृत्यूनंतरच हे प्रकाशित झालेले त्याचे काम असून यात त्याने त्याच्या समकालीन समाजशास्त्रज्ञांच्या निबंधांचे संकलन केले होते. पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर वेबर त्याच्या अंतिम पुस्तकाच्या लिखानाच्या तयारीला लागला होता. प्राचीन जगातील शेती उत्पादनाचे परस्पर संबंध, सामान्य अर्थशास्त्रीय इतिहास, समकालीन युरोप व जर्मनीतील पूर्वप्रांतातील आर्थिक परिस्थितीचा शोध अशा अनेक विषयांवरील त्याच्या लिखानाचे संकलन या पुस्तकात करण्यात आले आहे. या लेखांचे टालकॉट पार्सन्स यांनी इंग्रजी भाषेत भाषांतर करून १९४७ साली "The Theory of Social and Economic Organization' या ग्रंथरूपाने प्रकाशित केले.

### ५. समाजशास्त्रावरील निबंध (Essays on Sociology) –

समाजशास्त्रामधील मॅक्स वेबरच्या महत्वपूर्ण लिखाणांचा यात समावेश आहे.

### ६. **दि सिटी** (The City) **१९५८** –

या महत्वपूर्ण पुस्तकांबरोबरच वेबरने समकालीन राजकीय परिस्थितीवर असंख्य वृतपत्रीय लेख, अनेक टाचणे आणि पेपर प्रसिध्द केले होते. त्याने जर्मन सामाजिकशास्त्र नियतकालीकातही आपले असंख्य अभ्यासपूर्ण निबंध व लेख प्रसिध्द केले होते.

### मॅक्स वेबरवरील प्रभाव –

**वे**बर हा मूळत: अभ्यासू आणि स्वयंभू असा विचारवंत होता. आपल्या विद्यापीठीय शिक्षणाला सुरुवात करण्यापूर्वीच तो त्याच्या वाचनाच्या आवडीमुळे होमर, सिसिरो, गटे, स्पिनोंझा, कान्ट अशा तत्वज्ञांच्या विचारांशी अभिमुख झाला होता. त्याच्याकडून निर्माण झालेल्या बहुसंख्य वांडमयावर जर्मनितील तत्कालीन बौध्दिक आणि राजकीय वातावरणाचा प्रभाव पडला होता. या काळात जर्मनीत शास्त्रीय पध्दतींचा वापर सामाजिक शास्त्रांत केला जाऊ शकतो का? या विषयी आदर्शवादी तत्वज्ञानात्मक चर्चा सुरू होती. वेबरने सामाजिक शास्त्रांतही शास्त्रीय पध्दतीचा आणि सामान्यीकरणाचा अवलंब केला जाऊ शकतो असेच मत मांडले होते. त्याच्यावर विल्हेनरोशर, इलोमर, वॅगनर, ब्रेन्टोना, डिल्थी, रिकार्ट, निश्ते अशा अनेक विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव पडल्याचे स्पष्टपणे जाणवते. कार्ल मार्क्सच्या विचारांचाही त्याच्यावर प्रभाव होता पण त्याने त्याच्या आर्थिक निर्णायकवादाच्या सिध्दांतावर त्यातील उणिवा दाखवून देऊन टिका केली असल्याचे आढळून येते.

याबरोबरच स्वत:च्या घरातील कौटुंबिक वातावरण, जर्मनीतील तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती, प्रोटेस्टंट व कॅथॉलिक धर्मपंथातील संघर्ष, पहिले महायुध्द, राष्ट्रवादी विचारसरणी आणि भांडवलशाही प्रधान समाजव्यवस्था या सर्वांच्या प्रभावातून खास वेबरची अशी एक विचारप्रणाली निर्मांण झाल्याचे दिसून येते. अशा विचारसरणीने समाजशास्त्रीय विचारांच्या विकासाला एक स्वतंत्र वळण दिल्याचे व समाजशास्त्राच्या इतिहासात स्वत:चे एक अढळ स्थान निर्माण केल्याचे मान्य करावे लागते.

## ४.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) : –

समाजशास्त्राच्या वैचारिक विश्वात 'आकलनात्मक (आन्वेशनात्मक) समाजशास्त्र' या संकल्पनेची मौल्यवान भर घालणारा समाजशास्त्रज्ञ म्हणून वेबरला ओळखले जाते. आपल्या बौध्दिक क्षमता व विचारांतील स्वतंत्रतेमुळे वेबरने आधुनिक समाजशास्त्रात स्वत:चे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. सर्व सामाजिक घटनांचा अत्यत पध्दतशीरपणे अभ्यास करून सामाजिक परिस्थिती आणि सामाजिक घटना यांच्यातील सहसंबंध व्यापक प्रमाणात स्पष्ट करण्याचा प्रयत्न त्याने केला होता. तो एक न्यायाधिश, अर्थतज्ञ, तत्वज्ञ आणि इतिहासतज्ञ होता याबाबत दुमत नाही पण तो मुलत: समाजशास्त्रज्ञ होता हे ही तितकेच सत्य आहे याची प्रचिती आपणास त्याने मांडलेल्या पुढील सिध्दांतातून येणार आहे. म्हणूनच आपण आता त्याच्या विविध सिध्दांतांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

### ४.२.१ मॅक्सवेबरची बौद्धिक पार्श्वभूमी आणि त्याचे पध्दतीशास्त्र :–

या युनिटमध्ये आपणास समाजशास्त्राच्या विकासाला एक वेगळी ऊंची प्राप्त करून देणाऱ्या समाजशास्त्रज्ञाच्या योगदानाचा म्हणजेच त्याच्या बौद्धिक पार्श्वभूमिचा विचार आपण करणार आहोत. समाजशास्त्राला शास्त्राचा दर्जा मिळवून देण्यातील या विचारवंताच्या समाजशास्त्रातील योगदानाचा आढावा घेण्यापूर्वी या विचारवंताच्या जीवनातील चढऊतारांचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेणे अत्यंत गरजेचे आहे. कारण व्यक्तीकडून मांडण्यात येत असलेल्या विचारांवर त्याच्या जीवनात घडून गेलेल्या चढऊतारांचा प्रभाव निश्चितपणे पडत असतो. यासाठीच आपणास सर्वप्रथम मॅक्स वेबरच्या जीवनवृत्तांचा संक्षिप्त स्वरूपात आढावा पुढीलप्रमाणे पाहणे गरजेचे ठरते.

मॅक्स वेबरचा जन्म २१ एप्रिल १८६४ रोजी जर्मनीमधील एरफर्ट या शहरात एका श्रीमंत प्रोटस्टंट पंथाच्या कुटुंबात झाला. सुरुवातीला सरकारी नोकरीत असलेले त्याचे वडील नंतरच्या काळात राजकारणात शिरले. ते बर्लिन शहराचे नगरपिता तसेच जर्मनीतील नॅशनल लिबरल पार्टीचे पुढारी होते. कांही काळासाठी ते जर्मन पार्लमेंटचे सदस्यही होते. सुखासिन असलेल्या वेबरच्या वडिलांच्या घरी ते राजकारणात असल्यामुळे अनेक राजकीय लोक येत असत परिणामी अगदी लहान वयापासूनच वेबरचा विविध राजकीय विचारवंतांच्या विचारांशी परिचय होत गेला व प्रभावही पडत गेला. वडील राजकारणी असले तरी त्याची आई मात्र अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. त्याच्या आईवडीलांचे कधीच परस्परांशी पटले नाही. परिणामी सतत सुरू असलेल्या गृहकलहामुळे तो अल्पावधीतच एकलकोंडा बनत गेला आणि यावर उपार म्हणून त्याने स्वतःला वाचनात गुंतवून घ्यायला सुरुवात केली.

वयाच्या आठव्या वर्षी त्याने कायद्याचा अभ्यास करण्याच्या हेतूने हेडेलबर्ग विद्यापीठात प्रवेश घेतला. येथे कायद्याच्या अध्ययनाबरोबरच त्याने तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, इतिहास याविषयांचेदेखील अध्ययन केले. तेथील तीन वर्षांचे अध्ययन पूर्ण केल्यानंतर तो सैन्यामध्ये भरती झाला. स्ट्रान्सबर्गला असताना तो त्याच्या मावशी व तिच्या यजमानांच्या प्रभावाखाली आला. मावशीच्या यजमानांच्या विचारांचा वेबरच्या बौद्धिक विकासावर विशेष प्रभाव पडला. परिणामी त्याच्या जीवनात प्रचंड परिवर्तन घडून आले. त्याच्या आईने जरी त्याच्यात धार्मिक वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला असला तरी त्याच्यावर त्याचा काहीच परिणाम झाला नव्हता पण मावशीच्या यजमानांच्यामुळे त्याच्यात धर्म व धार्मिक ग्रंथांविषयी ओढ निर्माण झाली. परिणामी

त्याचा स्वच्छंदीपणा कमी झाला. त्याला जीवनातील नैतिक शिस्तीचे महत्त्व उमगले व त्याने त्याचा स्विकारही केला.

सैन्यातील आपली नोकरी संपल्यानंतर तो परत आपल्या मूळ बर्लिन शहरात परत आला व त्याने बर्लिन विद्यापीठात पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला. येथे तो मॉमसेन या इतिहासकाराशी वैचारिकदृष्ट्या जोडला गेला. १८८८ साली त्याने 'हिस्ट्री ऑफ कमर्शियल सोसायटीज इन मिडल एसेज' हा प्रबंध सादर करून पीएचडी पदवी संपादन केली व लगेचच १८९१ साली 'रोमन ॲग्रेरियन हिस्ट्री' हा संशोधन ग्रंथ पोस्ट डॉक्टरेटसाठी लिहिला. परिणामी त्याची बर्लिन विद्यापीठातच अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती झाली. १८९३ मध्ये त्याचा विवाह मॅरिअनी श्निटगर हीच्याशी झाला व त्याच वर्षी त्याची फ्रीबर्ग विद्यापीठात अर्थशास्त्र विभागात नियुक्तीही झाली. पण तो त्याच्या वैवाहिक जीवनात समाधानी नव्हता. ''राष्ट्रीय स्थिती आणि आर्थिक धोरण'' या विषयावर त्याने दिलेल्या व्याख्यानांमुळे त्याची तीव्र राष्ट्रभक्ती व उत्कट बुद्धमत्ता सर्वांना दिसून आली. परिणामी त्याला १८९६ मध्ये हेडेलबर्ग विद्यापीठात अर्थशास्त्राचा प्राध्यापक म्हणून निमंत्रित करण्यात आले येथे तो जॉर्ज जलिनेक, अर्न्स्ट ट्रल्टश अशा बुद्धीवंतांच्या संपर्कात आला. या विद्यापीठात त्याला एक बुद्धीवंत म्हणून विशेष ख्यातीही मिळाली. जुलै १८९७ मध्ये त्याचे आईवडील त्याच्याकडे रहायला आल्यानंतर पितापुत्रात झालेल्या भांडणाच्या परिणामी त्याने वडिलांना आपल्या घरातून हाकलून काढले व एक महिन्यातच त्याच्या वडिलांचा मृत्यू झाला. या घटनेचा त्याच्या मनावर एवढा परिणाम झाला की, तो मनोविकृतीच्या आजाराला बळी पडला. तो सुमारे पाच वर्षे या विकाराने ग्रासला होता. १९०३ साली त्याच्या बौद्धिक स्थितीत सुधारणा झाली व त्याने 'Social Reform and Social Politics' नावाच्या नियतकालिकाच्या संपादनाचे कार्य सुरू केले. १९०४ मध्ये त्याने 'जर्मनीची सामाजिक संरचना' या विषयावर व्याख्यान दिले. यानंतर त्याचे सुमारे तीन वर्षे अमेरिकेतच वास्तव्य होते. या कालावधीत अमेरिकन समाजजीवनाचा त्याच्यावर प्रभाव पडला व येथेच त्याला प्रोटेस्टंट आचारसंहितेचे भांडवलशाहीच्या विकासातील योगदान व नोकरशाही या संकल्पना सुचल्या. १९१० मध्ये त्याने सहकाऱ्यांच्या सहाय्याने 'जर्मन सोशियॉलॉजिकल सोसायटीची स्थापना केली. १९१९ साली त्याला म्यूनीच विद्यापीठाने व्याख्याने देण्यासाठी निमंत्रीत केले. येथे त्याने दिलेली ''विज्ञान एक व्यवसाय व राजकारण एक व्यवसाय'' ही व्याख्याने खूप गाजली. १९१८ ते १९२० या कालावधीत त्याने वृत्तपत्रात जर्मनीतील राजकीय घडामोडींवर विविध लेख, निबंध व निवेदने प्रसिद्ध केली. 'डच डेमोक्रॅटिक पक्षाचा तो संस्थापक सदस्य होता. अशा या थोर समाजशास्त्रज्ञाचा १४ जून १९२० रोजी न्युमोनियाच्या आजाराने अंत झाला.

रेमंड ॲरॉन यांनी त्यांच्या 'मेन करंटस इन सोशियालॉजिकल थॉट' या ग्रंथात त्याचे वर्णन ''माझ्यासाठी तरी मॅक्स वेबर हा सर्व श्रेष्ठ समाजशास्त्रज्ञ आहे. मी तर असे म्हणेन की, तोच एक समाजशास्त्रज्ञ आहे.'' या शब्दात मॅक्स वेबरच्या समाजशास्त्रीय योगदानाचे मूल्यमापन केले आहे. यावरून आपणास एक समाजशास्त्रज्ञ म्हणून मॅक्स वेबरच्या असलेल्या स्थानाची कल्पना येते.

**मॅक्स वेबरचे पद्धतीशास्त्र :** वेबरच्या काळात नैसर्गिक शास्त्र हे वैज्ञानिक पद्धतीवर आधारीत आहे. पण सामाजिक विज्ञानात मात्र वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करणे अशक्य आहे अशी जर्मनीत चर्चा होती. वेबरच्या कालावधीत जर्मनीत कॉम्त या प्रसिद्ध विचारवंताच्या मतानुसार नैसर्गिक शास्त्रे व सामाजिकशास्त्रे पूर्णतः वेगवेगळी आहेत. एका विभागातील नियम दुसऱ्या विभागातील शास्त्रांना लागूच करता येत नाहीत. नैसर्गिक शास्त्रे वस्तूनिष्ठ असून सामाजिक शास्त्रांचा मात्र वस्तूनिष्ठ पद्धतीने अभ्यास करणे शक्य नाही.

मानवाला लाभलेली स्वतंत्र इच्छा यामध्ये बाधा निर्माण करतात. नैसर्गिक शास्त्रांमध्ये सामान्य नियम सहजपणे मांडणे शक्य आहे पण सामाजिकशास्त्रांत असे सामान्य नियम मांडता येत नाहीत. पण याला विरोध करताना मॅक्स वेबरने असे प्रतिपादन केले की, ज्या पद्धतीचा अवलंब नैसर्गिक विज्ञानात केला जातो त्याच पद्धतीचा अवलंब करून सामाजिक विज्ञनांमध्ये अध्ययन करणे शक्य आहे. याबाबत स्पष्टीकरण करताना त्याने असे मत मांडले की जरी या दोन्ही शास्त्रात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करणे शक्य असले तरी या दोन्ही शास्त्रांत भेद आहेत कारण समाज हा वस्तूंचे मूल्य आणि मान्यतांचा संबंध स्थापन करतो. परिणामी त्याने सामाजिक विज्ञानात मूल्ये आणि मान्यतांच्या अध्ययनास विशेष महत्त्व दिले. कारण जोपर्यंत आपण हे अध्ययन करण्याच्या प्रणालीचा विकास करत नाही तोपर्यंत सामाजिक जीवन समजून घेणे शक्य नाही असे विचार त्याने मांडले. सामाजिक जीवनामध्ये नैसर्गिक विज्ञानाप्रमाणे आढळणाऱ्या कार्यकारण संबंधांना समजून घेण्यासाठी वेबरने तुलनात्मक पद्धती विकसित केली. त्याच्या मतानुसार सामाजिक विज्ञानामध्येही 'सामान्य सैद्धांतिक नियमांचा' शोध लावला जाणे शक्य आहे. हे शक्य झाले तर नैसर्गिक विज्ञानांप्रमाणेच सामाजिक विज्ञानांना देखील विज्ञान म्हणणे भाग पडेल. यासाठी त्याने सामाजिक विज्ञानात 'सामान्य नियमांची निर्मिती करण्याचे कार्य हाती घेतले. आणि यासाठीच आदर्श प्रारुपाची कल्पना त्याने विशद केली.

वेबरचे असे मत नव्हे की 'आमचे अध्ययन आदर्शात्मक असेल तरच आमचा निष्कर्ष हा मूल्यांकात्मक निर्णयावर आधारीत असेल. वेबरने हे स्पष्ट केले की, सामाजिक शास्त्रज्ञांना मूल्यांच्या अध्ययनाबाबत जागरूक असले पाहिजे. त्याला मूल्यांकात्मक निर्णय मांडायचे नसतात तर घटनांचे आणि मूल्यांचे वस्तूनिष्ठ अध्ययन करायचे असते. म्हणूनच सामाजिक शास्त्रज्ञाला निःपक्ष आणि मूल्यांपासून मूक्त असले पाहिजे. थोडक्यात सामाजिकशास्त्रांमध्ये मूल्यांचे व मान्यतांचे अध्ययन केले जात असले तरी ते वस्तूनिष्ठ असले पाहिजे.

इ.एस. बोगार्डस यांनी वेबरच्या पद्धतीशास्त्राविषयी असे मत मांडले की, 'वेबरच्या पद्धतीशास्त्रामध्ये त्याचे असे योगदान आहे की, त्याने सामाजिक घटनांच्या अध्ययनात वैज्ञानिक दृष्टीकोण आणि मूल्यात्मक निर्णय यामध्ये भेद केला. मानवी संबंधांचे अध्ययन करताना या दोन्हीं पद्धतींना एकत्रित करता कामा नये. यावर त्याने विशेष भर दिला. त्याने आपल्या पद्धतीशास्त्रामध्ये समाजशास्त्राचा एक विज्ञान म्हणून विकास करण्याच्या दृष्टीने पाया घातला. वेबरच्या मते, 'एका संस्कृतीकरीता लागू करण्यात आलेले सामान्यीकरण दुसऱ्या संस्कृतीकरीता लागू करता येणार नाही. उदाहरणार्थ भांडवलशाही आणि प्रोटेस्टंट पंथावरील सामान्यीकरण हे पाश्चात्य सभ्यता व संस्कृतीच्या संदर्भात वेगळे करून चालणार नाही. परिणामी वेबरच्या पद्धतीशास्त्रात संभाव्यतेच्या सिद्धांताचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**समाजशास्त्रात पद्धतीशास्त्राचा उपयोग** : सामाजिक शास्त्रात पद्धतीशास्त्राचा उपयोग केला पाहिजे याबाबत वेबरने आपले मत पुढीलप्रमाणे मांडले आहे. 'सर्व काहींचे अध्ययन म्हणजे काहीच नाहीचे अध्ययन होय. वास्तविक संशोधक काहीच करू शकत नाही याचे खरे कारण म्हणजे सर्व काहीचे अध्ययन करून तो जे काही प्रस्तूत करतो त्यात वैज्ञानिकता असू शकत नाही.' परिणामी त्याने याबाबीवर भर दिला की सामाजिक घटनांमधील अशा कांही आदर्श प्रारूपांना निवडावे की ज्यांच्या आधारे संपूर्ण घटनांच्या संदर्भात वास्तविक ज्ञान प्राप्त होऊ शकेल. यावरून हेच स्पष्ट होते की, वेबरने सामाजिक विज्ञानाला एका व्यवस्थित विज्ञानाचे स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी पद्धतीशास्त्राचा विकास करण्यावर भर दिला आहे.

वेबरच्या पद्धतीशास्त्रात पुढील गोष्टी महत्त्वाच्या आहेत. १. विज्ञान 'काय आहे' याच्याशी संबंधीत असून काय असायला पाहिजे याच्याशी विज्ञानाचा काहीही संबंध नाही. २. सामाजिक जीवनाच्या आधारभूत कार्यकालामध्ये आढळून येणाऱ्या घटनांचा क्रम आणि त्याची क्रियाशीलता व परिणामांची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करणे. ३. मूल्यांकनात्मक निर्णयापासून अलिप्तता ठेवून सार्वभौमिक वैचारीक विचार करणे. ४. गैर-आदर्शात्मक किंवा प्रामाणिक आधारावर मानवी संबंधांच्या ऐतिहासीक विकासाची वैशिष्ट्ये व विभेदीत बाजूंचे अध्ययन करणे. ५. वेगवेगळ्या सांस्कृतिक तत्त्वाच्या आंतरक्रियांची व्याख्या करणे. अशा प्रकारे समाजशास्त्रास विज्ञानाचे स्वरूप मिळवून देण्याच्या हेतूने पद्धतीशास्त्राचा विकास करण्याचा प्रयत्न वेबरने केला.

**आदर्श प्रारूपाची कल्पना** (Ideal Types) **:** वेबरच्या मतानुसार समाजशास्त्रज्ञाला आपले अभ्युपगम मांडण्यासाठी आदर्श प्रारूपांची निर्मिती करणे गरजेचे आहे. त्याच्या मते, 'प्रत्येक सामाजिक क्रिया एक आदर्श आहे. या आदर्शाचे एक प्रारूप असले पाहिजे. जेंव्हा आपण एखादी व्यक्ती धर्मात्मा आहे असे म्हणतो तेंव्हा धर्मात्म्याचा काय अर्थ अभिप्रेत असतो. 'धर्मात्मा' हे एक आदर्श आहे. आपल्या मनात त्याविषयी एक प्रारूप असले पाहिजे. त्या प्रारूपानुसार एखादी व्यक्ती आढळली तर आपण तिला धर्मात्मा म्हणू शकतो. यालाच आदर्श प्रारूप म्हणतात. वेबरच्या मते, प्रत्येक वस्तू अगर व्यक्तीचेदेखील आदर्श प्रारूप असू शकते. तसे पाहता आपले ज्ञान हे देखील एक आदर्श प्रारूपाची व्याख्याच आहे. वेबरने याबाबीवर विशेष भर दिला की समाजशास्त्रज्ञाने अभ्यूपगमाची निर्मिती करण्यासाठी 'आदर्श गोष्टींची निवड केली पाहिजे. परंतु तो पुढे हे स्पष्ट करतो की, आदर्श प्रारूप हे सामान्य प्रारूप नाही किंवा ते आदर्शात्मकही नाही. तर वास्तविकतेच्या आधारावर कांही विशिष्ठ तत्त्वांची विचारपूर्वक निवड आणि संयोग म्हणजे आदर्श प्रारूप होय.

आदर्श शब्दाचा संबंध कोणत्याही प्रकारच्या मूल्यांकनाशी नाही ही बाब वेबरने सातत्याने स्पष्ट केली आहे. विश्लेषणासाठी संशोधक कोणत्याही घटनेबाबतचे आदर्श प्रारूप निर्माण करू शकतो. मग ती घटना वेश्या अगर धार्मिक व्यक्तीबाबतची देखील असू शकते. थोडक्यात आदर्श प्रारूपे ही सामान्य किंवा आदर्शात्मक नसतात तर ती वास्तविकतेच्या कांही विशिष्ट तत्त्वांची जाणीवपूर्वक निवड करून व संयोगाद्वारे त्यांची निर्मिती करता येते. याचाच अर्थ असा की वास्तविक तथ्यांचे तार्किकतेच्या आधारावर संकल्पनांच्या स्वरूपात केलेले स्पष्टीकरण म्हणजे आदर्श प्रारूप होय.

आदर्श प्रारूपाची संकल्पना विकसित करून वेबरने कोणतीही नवीन गोष्ट प्रसूत केली नाही तर त्याने केवळ इतर सामाजिक विज्ञानापेक्षा या संकल्पनेस अधिक स्पष्ट व यथार्थ स्वरूपात मांडले. या तार्किक आधारावर मानवी क्रियांच्या कार्य कारण संबंधांचे अधिक यथार्थ व योग्य पद्धतीने अध्ययन व स्पष्टीकरण शक्य होते. सामाजिक शास्त्रज्ञांनी अध्ययनात केवळ अशाच संकल्पनांचा वापर केला पाहिजे की, ज्याद्वारे तर्कसंगत पद्धतीने नियंत्रित आणि शंकाविरहीत व प्रयोगसिद्ध अध्ययन होऊ शकेल. वैज्ञानिक पद्धतीच्या दृष्टीने आदर्श प्रारूपाची संकल्पना महत्त्वाची आहे कारण त्याशिवाय सामाजिक क्रियांचे अध्ययन शक्य होणार नाही.

अशा प्रकारे या युनिटच्या पहिल्या विभागात आपण मॅक्स वेबर यांच्या बौद्धीक पार्श्वभूमीचे अवलोकन करताना त्याच्या जीवनात घडून गेलेल्या विविध घटना, तो ज्या लोकांच्या संपर्कात आला त्यांच्या

विचारांचा त्याच्या बौद्धीक विकासावर पडलेला प्रभाव, त्याने समाजशास्त्राला विज्ञानाचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी मांडलेले त्याचे पद्धतीशास्त्राबाबतचे विचार आणि ते कसे वास्तवात आणावयाचे यासाठी त्याने विकसित केलेली आदर्श प्रारूपाची संकल्पना या बाबींचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**समाजशास्त्र : एक अन्वेशणात्मक शास्त्र –**

मॅक्स वेबरच्या मतानुसार, समाजशास्त्र हे सामाजिक क्रियांची स्पष्टीकरणात्मक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करते. पर्यायाने समाजशास्त्राचा अर्थ जर आपणास समजून घ्यावयाचा असेल तर सामांन्य जाणीव व स्पष्टीकरणात्मक जाणीव यातील नेमका फरक समजून घेणे गरजेचे बनते. वेबरने त्याच्या विचारांच्या मांडणीत स्पष्टीकरणात्मक जाणीवेच्या चर्चेवर अधिक भर दिला आहे. त्याच्या मताप्रमाणे सर्वसामांन्य प्रकारचे स्पष्टीकरण हा स्पष्टीकरणाचा असा प्रकार की, जो समाजातील बहुसंख्य सदस्यांना मांन्य असतो व शुध्द स्वरूपाचे स्पष्टीकरण ज्यात परिस्थितीचे संपूर्ण आकलन झाल्यानंतर व्यक्ती स्वत:च्या बुध्दीने अशा स्पष्टीकरणाचा स्विकार करते. वेबर पुढे हे ही स्पष्ट करतो की, समाजशास्त्राने सामाजिक क्रियांचे अध्ययन शुध्द प्रकारच्या स्पष्टीकरणाच्या सहाय्यानेच केले पाहिजे. समाजशास्त्राला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी वेबरला 'काय पाहिजे' ला 'काय आहे' यापासून अलग करण्यासाठीचा लढा वैचारिक पातळीवर लढावा लागला होता. याचाच अर्थ असा की, समाजशास्त्राने स्वत:ला जाणीवपूर्वक अवास्तवापासून दूर ठेवून वास्तवतेच्या मार्गाने मार्गक्रमन केल्यास या शास्त्राला संशोधनाचे निष्कर्ष मूल्य निर्णय शक्तीच्या साहाय्याने सार्वत्रिक अशा वैज्ञानिक पृथकरणाच्या आधारे स्पष्ट करता येतील. याचाच अर्थ असा की, समाजशास्त्राचा अभ्यास हा जर वैज्ञानिक पायावर उभा असेल तर त्यापासून काढलेले निष्कर्ष बरेच बिनचूक ठरू शकतील. यासाठीच वेबरने सामाजिक आकलनाच्या किंवा स्पष्टीकरणाच्या पध्दतीबाबतचे आपले विचार मांडले असून त्याचा आढावा आपण घेणार आहोत.

**सामाजिक आकलनाच्या पध्दती (Verstehen or Methods of Understanding) –**

आपल्या सामाजिक आकलनाच्या किंवा स्पष्टीकरणाच्या पध्दतीबाबत विचार मांडताना वेबर म्हणतो की, प्रत्येक माणसाच्या क्रिया किंवा वर्तना पाठीमागे कोणता ना कोणता उद्देश असतोच किंवा काहीतरी उद्देश नजरेसमोर ठेवूनच व्यक्तीकडून कोणतीही क्रिया अगर वर्तन घडत असते. माणसाच्या काही क्रिया अगर वर्तनामागचे उद्देश स्पष्ट असतात पण इतर काहीं क्रिया अगर वर्तनाच्या संदर्भात मात्र त्याचे त्यामागचे उद्देश निश्‍चित करणे कठीण असते. जोपर्यंत मानवी वर्तन अगर क्रियां आणि त्यामागचे उद्देश आपल्याला समजत नाहीत तोपर्यंत सामाजिक परिस्थितीबाबतचे आकलन आपणास करता येत नाही. 'सामाजिक परिस्थितीबाबतचे आकलन म्हणजे व्यक्ती ज्या सामाजिक कौटुंबिक परिस्थितीत जीवन जगत असते त्या परिस्थितीची जाणीव व्यक्तीला असणे होय.' उदा. अत्यंत गरिबीत जीवन जगणाऱ्या व्यक्ती आपल्या जीवनातील आकांक्षा मर्यादित ठेवतात व त्यानुसार आपला वर्तनाचा मार्गही निश्‍चित करतात. म्हणूनच सामाजिक आकलनात मानवी वर्तन किंवा क्रिया आणि त्यांचे उद्देश यांच्या वैज्ञानिक विश्लेषणाचा समावेश करावा लागतो.

वेबरच्या मतानुसार आकलनाचे **दोन** निश्‍चित मुलाधार खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. संयुक्तिक आकलन (Rational Understanding) वेबरच्या मतानुसार, या आकलन प्रकाराचे परत अ) तर्कशुध्द आणि ब) गणित विषयक असे दोन उपविभाग करता येतात.

२. संवेगी अंतर्ज्ञानी आकलन (Emotional Empathic Understanding) यालाच ‘कलात्मक मर्मज्ञ’ असे दुसरे नाव देता येईल.

वेबरने वर मांडलेल्या दोन प्रकारच्या सामाजिक आकलनाच्या पध्दतीविषयीचे स्पष्टीकरण आपण पुढीलप्रमाणे करू शकतो –

**१. संयुक्तिक आकलन (Rational Understanding)** –

आकलनाची ही पध्दती आपणास अशावेळी साध्य होऊ शकते की, जेंव्हा मानवी क्रिया मालिकेमागील क्रियाशील उद्देशांचा अर्थ आपल्याला स्पष्टपणे समजेल याचाच अर्थ असा की, मानवी क्रियातील आशय, उद्देश समजल्याविना मानवी क्रियांचे संयुक्तिक आकलन आपल्याला करताच येणार नाही. वेबरच्या मतानुसार आकलनाचा अर्थ जेंव्हा तर्कशुध्द आणि गणिती सिध्दांताच्या सहाय्याने व्यक्त केला जातो तेंव्हाच तो संयुक्तिक आकलन ठरतो. गणिती अगर तर्कशुध्द सिध्दांतामुळे मानवी क्रियांचा अर्थ सहज, जलद आणि स्पष्टपणे आपणास समजू शकतो. उदा. जेंव्हा एखादी व्यक्ती ४ x ४ = १६ हे गणितातील सूत्र सांगते तेंव्हा ती तिची आकलन शक्ती परिपूर्ण व स्पष्ट झाली आहे हेच स्पष्ट करते. किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या युवकाने याबरोबरच संगणकाबाबतचे ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आणि महाविद्यालयीन शिक्षणानंतर संगणकाच्या क्षेत्रात आपले करियर निर्माण केले तर यावरून आपण सहजगत्या हे समजू शकतो की, सध्याच्या संगणक युगात आपला निभाव लागावा म्हणून महाविद्यालयीन शिक्षणाच्याबरोबरीने विद्यार्थ्याने संगणकाचे ज्ञानही आत्मसात केले. थोडक्यात, संयुक्तिक आकलनाचा अर्थ असा की, जी व्यक्ती आपल्या उद्देशाचे सर्वप्रथम निश्चितीकरण करते व त्याच्या पूर्ततेसाठी निश्चित योजना आखून मार्गक्रमण करते त्यालाच संयुक्तिक आकलन क्रिया असे म्हणता येते.

**२. अंतर्ज्ञानी आकलन (Empathic Understanding)** –

अंतर्ज्ञानी आकलन याचा अर्थ असा होतो की, जेंव्हा एखादी व्यक्ती एखादी क्रिया करते तेंव्हा त्यातील भावनात्मक संदर्भ आपल्या लक्षात येतो व सहानुभूतीच्या सहाय्याने आपण त्या विशिष्ट भावनेशी असणारा आपला सहभाग प्रकट करतो. मानवाकडून घडणाऱ्या अनेक क्रिया अशा असतात की, ज्यांचे बौध्दिकतेच्या पातळीवरील आकलन आत्मसात होत नाही. अशा वर्तनाच्या आकलनासाठी अंतर्ज्ञान हा एकमेव मार्ग होय. उदा. एखाद्या व्यक्तीने गुन्हेगारी वर्तन केले असेल तर त्याचे आकलन केवळ बौध्दिकतेच्या पातळीवर होणे शक्य नसते, अशावेळी त्या व्यक्तीशी संबंधित इतर माहिती संकलित केली जाते. त्याने कोणत्या परिस्थितीत असे वर्तन केले ती परिस्थिती समजून घेतली जाते. अशा परिस्थितीत असताना आपणाकडून कसे वर्तन घडले असते याचा अंदाज घेण्यासाठी आपल्याला त्याच्या स्थानी कल्पून कल्पनेतच त्याने केलेल्या गुन्हेगारी वर्तनासारखे वर्तन करण्याचे कल्पनाचित्र रंगवतो. अशा वेळी आपली सर्व सहानुभूती त्याला असते व त्या व्यक्तीने गुन्हेगारी वर्तन केले असले तरी ती आपणास गुन्हेगार वाटत नाही. थोडक्यात, एखाद्या व्यक्तीने केलेल्या विशिष्ट कृत्याचे आकलन होण्यासाठी आपण त्या व्यक्तीची कल्पनेत जागा घेतो व त्या विशिष्ट परिस्थितीत आपण असे वर्तन कसे केले असते याबाबतचा अंदाज घेऊन त्या व्यक्तीला सहानुभूती दर्शवितो.

आकलनाच्या या दोन पध्दतींचे सविस्तर वर्णन केल्यानंतर वेबर पुढे हे ही स्पष्ट करतो की, मानवी वर्तनाचे अगर क्रियांचे विश्लेषण करण्यासाठी या दोन पैकी कोणती पध्दती वापरावयाची हे मुख्यत:

व्यक्तीने केलेल्या वर्तनाचे स्वरूप व वर्तनाच्या वेळची विशिष्ट परिस्थिती यावर अवलंबून असते. तो पुढे हे ही विशद करतो की, मानवी क्रिया अगर वर्तनाचे स्पष्टीकरण करण्याची आपली कृती ही आपण कल्पनाशक्तीच्या जोरावर इतर व्यक्तींच्या मनाचा कितपत शोध घेऊ यावर त्याबरोबरच उत्सुकता, प्रेम, द्वेष, राग, मत्सर इत्यादींद्वारे आपणास येणाऱ्या संवेगात्मक अनुभूतिवर अवलंबून असते. असे संवेगात्मक वर्तन असंयुक्तिक असते. मानवाकडून असंयुक्तीक वर्तन का घडते याचे स्पष्टीकरण देताना वेबर असे मत मांडतो की, जेंव्हा व्यक्ती तिला दिलेल्या उद्देशाची संयुक्तिक साधनांच्या सहाय्याने पूर्ती करण्यात अपयशी ठरते तेंव्हा व्यक्तीचे वर्तन नक्कीच असंयुक्तिक बनते.

मॅक्स वेबरच्या मतानुसार, आपण नेहमीच तर्कशुध्द आकलन प्रकाराचा स्विकार करणे आवश्यक असून असंयुक्तिक वर्तन टाळणे आवश्यक आहे. यासाठीच वेबरने समाजशास्त्रात 'प्रकार व्यवस्था' पध्दतीची सुरूवात केली. एवढेच नव्हे तर त्याने मानवी वर्तनाचे स्पष्टीकरण प्रकार व्यवस्थेच्या सहाय्यानेच करण्यात यावे असेही मत मांडले. त्याच्या मतानुसार शुध्द संयुक्तिक 'क्रियांची रचना' ही समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने एक 'आदर्श प्रकारची' रचना असून त्यामुळे आकलनात स्पष्टता येते.

**मॅक्स वेबरचे आकलनाचे प्रकार (Max Weber's types of Understanding or Verstehen)**

मॅक्स वेबरने आकलनाचे दोन प्रकार खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१. प्रत्यक्ष निरीक्षणात्मक आकलन (The Direct Observational Understanding)-**

प्रत्यक्ष निरीक्षणात्मक आकलन हे इतरांच्या दृश्य वर्तनाच्या वास्तविक ज्ञानावर आधारित असते. यामध्ये व्यक्तीच्या शाब्दिक बोलीचा पण आधार घेता येतो. थोडक्यात, व्यक्ती बोलते कशी, चालते कशी अशा बाबींचे निरीक्षण केल्यावर तिच्या वर्तनाचे आकलन होते. उदा. विद्यापीठीय परिक्षांच्या अगोदर अभ्यासात गर्क झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष निरीक्षणातून आपल्याला त्यांच्या वर्तनाचे आकलन होते. एखादा विद्यार्थी अत्यंत आज्ञाधारक आहे हे आपल्याला त्याच्या एकूण वागण्याचे व बोलण्याचे निरीक्षण केले असता स्पष्ट करता येते.

**२. स्पष्टीकरणात्मक आकलन (The Explanatory Understanding) –**

आपण जेंव्हा व्यक्तीच्या वर्तनाचे आकलन त्यामागील प्रेरणांच्या संकल्पनांच्या सहाय्याने करतो तेंव्हा त्याला स्प्ष्टीकरणात्मक आकलन म्हणतात. या प्रकारच्या आकलनात विशिष्ट व्यक्तीकडून विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट क्षणी विशिष्ट प्रकारचे वर्तन का घडते हे समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. दंगलींच्यावेळी जमावात समाविष्ट झालेल्या व्यक्तींकडून जाळपोळ अगर लुटालूट का केली जाते. अशा प्रकारच्या वर्तनाचे एकमेव स्पष्टीकरण आहे जमावाची प्रेरणा. मानवाच्या विविध प्रेरणांचे आकलन झाले की मानवाच्या वर्तनाचे आकलन सहज शक्य होते. म्हणूनच अशा आकलनाला 'मानवी वर्तनाचे प्रेरणात्मक आकलन असे संबोधण्यास हरकत नाही, असे वेबरचे मत होते. पण याबरोबरच वेबर आपल्याला हा ही इशारा देतो की, मानवी क्रियांसंबंधित प्रेरणात्मक परिस्थितीचे पृथकरण करताना आपल्याला फार जागरूक राहिले पाहिजे. कारण अशा विश्लेषणात जर आपल्याकडून एखादी चूक झाली तर मानवी वर्तनाचे आकलन चूकीचे ठरू शकते. मानवी वर्तनामागची प्रेरणा आंतरिक असते त्यामुळे त्याबाबत निश्चित निदान

करणे अवघड आहे, असे असले तरी याच ठिकाणी आपली खरी कसोटी आहे हे ही आपण विसरता कामा नये.

या सर्व बाबीवरून वेबरच्या सामाजिक आकलनाबाबतच्या विचारांचे आकलन तुम्हाला झाले असेल. या विचारांच्या मांडणीच्या सहाय्याने वेबरने समाजशास्त्राला शास्त्रीय दर्जा कसा प्राप्त करून देता येईल किंवा समाजशास्त्राच्या सामाजिक क्रियांच्या अध्ययनासाठी कोणत्या पध्दतीचा वापर अभ्यासकांनी करणे का आवश्यक आहे हे स्पष्ट केले आहे. त्याने मांडलेले सामाजिक आकलनाविषयीचे वरील विचार हे समाजशास्त्राच्या विकासातील एक मैलाचा दगडच ठरले आहेत.

**आदर्श प्रारूप अथवा नमुना (Ideal Types)**

मॅक्स वेबरला 'आदर्श प्रारूपाची' संकल्पना पध्दतीशास्त्राविषयीचे विचार मांडताना सुचली असून या संकल्पनेची सविस्तर चर्चा त्याने आपल्या 'मेथॉडॉलॉजिकल ट्रीटीज' या पुस्तकात केली असल्याचे आढळते. टालकॉट पार्सन्स यांनी आदर्श प्रारूपाची वेबरची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे की, कोणतीही वैज्ञानिक संकल्पना पूर्णपणे वास्तवाला स्पष्ट करण्यास सहाय्यभूत ठरत नाही. याबाबतीत इतिहासाचे अभ्यासक अगर समाजशास्त्रज्ञ विशाल वास्तवातील काही घटनांची आपल्या संशोधनासाठी निवड करतात. पण यापैकी कोणत्या भागांची निवड अभ्यासासाठी करावी याबाबत कोणतीही निश्चित पध्दती अस्तित्वात नाही. थोडक्यात संशोधकाला संशोधन करत असताना काही बाबी विचारात घ्याव्या लागतात तर काही बाबी टाळाव्या लागतात. प्रामुख्याने सामाजिक संशोधक जेंव्हा आपल्या संशोधनासाठी संकल्पनाचे साधन निवडतो तेंव्हा त्याला सहजासहजी पेचात पकडता येते. जेंव्हा त्याच्याकडून निवडलेल्या संकल्पना सर्वसामांन्य असतात तेंव्हादेखील त्यांच्याबाबतच्या विवेचनात त्याच्याकडून काही बाबी निसटलेल्या असतात. उदा. जेंव्हा आपण आर्थिक दृष्टीकोणातून भांडवलशाहीबाबत चर्चा करतो तेंव्हा नकळत आपल्याकडून सामाजिक व राजकीय घटकांकडे दुर्लक्ष होते. याचाच परिणाम म्हणून भांडवलशाहीचे वास्तव स्वरूप विशद करण्यात आपण अपयशी ठरतो. शिवाय सर्वच सामाजिक शास्त्रांचे क्षेत्र इतके व्यापक बनले आहे की, कोणत्याही घटनेचा सर्वांग व परिपूर्ण अभ्यास करणे संशोधकाला शक्यच होत नाही. अशा संशोधनात कोणती तरी उणीव राहतेच. परिणामी टिकाकार सहजगत्या संशोधकाला पेचात पकडण्यात यशस्वी होतात. मॅक्स वेबरच्या मतानुसार त्याने मांडलेली ही आदर्श प्रारूपची संकल्पना अशा पेचातून सुटण्याचा एक मार्ग ठरू शकते.

मॅक्स वेबरच्या मतानुसार, आदर्श प्रारूपे ही संशोधकाच्या दृष्टीने कोणत्याही साकार घटनेतील समानता किंवा भिन्नता मोजण्याचे साधन होय. आदर्श प्रारूप आपल्यासाठी तुलनात्मक अभ्यासासाठी मुलभूत पध्दतींची तजवीज करतात. तशीच ती प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या घटनेच्या वैयक्तिक वैशिष्टयांऐवजी एखाद्या दुसऱ्या दृष्टीकोनावर एकतर्फी भर देऊन तयार केली जातात. परिणामी एखाद्या घटनेबाबतची आदर्श प्रारूपे ही दुसऱ्या घटनेबाबत आदर्श अगर योग्य ठरतीलच असे नाही. वेबरने आदर्श प्रारूपाची काही उदाहरणेही दिली आहेत. ज्यामध्ये चर्च, धार्मिक संप्रदाय, इसाई संप्रदाय यांचा उल्लेख करता येतो.

रेमंड एरॉ यांच्या मते, आदर्श प्रारूपाची निर्मिती अशासाठी केली जाते की, आपण कार्यकारणाची व्यवस्थित व्याख्या करू शकू अशी आदर्श प्रारूपे आपल्याला ऐतिहासिक तथ्ये समजून घ्यायला मार्गदर्शक ठरू शकतात. पण ही ऐतिहासिक तथ्ये संपूर्ण नव्हे तर आंशिक स्वरूपाची असतात.

**आदर्श प्रारूपाची वैशिष्टये –**

मॅक्स वेबरने आदर्श प्रारूपाची संकल्पना तुलनात्मक अध्ययनासाठी मांडलेली आहे हे स्पष्ट होते. धर्माच्या आपल्या अध्ययनात वेबरने जगातील ज्या पाच धर्मांचे अध्ययन केले आहे याची पध्दती आदर्श प्रारूपच आहे. याबरोबरच वेबरने मांडलेली अध्ययनपध्दती ही देखील आदर्श प्रारूपाचेच उदाहरण आहे. आता आपण आदर्श प्रारूपच्या महत्वपूर्ण वैशिष्टयांचे आकलन खालीलप्रमाणे करून घेऊ –

**१. आदर्श प्रारूपात जी वैशिष्टये समाविष्ट केली आहेत ती सामाजिक वास्तवात असायलाच पाहिजेत असे नाही –**

वेबरच्या मते, आदर्श प्रारूपात ज्या वैशिष्टांची मांडणी केली आहे ती वास्तविक विश्वात असायला पाहिजेतच असे नाही. असेही होण्याची शक्यता आहे की, आदर्श प्रारूपातील काही वैशिष्टये वास्तवात आढळतील तर काही आढळणारही नाहीत. उदा. भांडवलशाहीबाबतच्या आदर्श प्रारूपामध्ये आपण कितीतरी वैशिष्टये समाविष्ट करू शकतो. पण जेंव्हा आपण अमेरिका अगर भारतातील वास्तवातील भांडवलशाहीचे संशोधन करू तेंव्हा भांडवलशाहीच्या आदर्श प्रारूपातील वैशिष्टयांपैकी काही वैशिष्टये आपल्याला आढळणार नाहीत. वेबरने आदर्श प्रारूपांना वास्तवापासून भिन्न असे अस्तित्व यासाठीच दिले आहे की, कोणत्याही समाजशास्त्रज्ञाला संपूर्ण वास्तविकता जाणून घेणे शक्य नाही. ज्या एका विशिष्ट समाजात व कालावधीत संशोधक वावरतो त्याच्याशी संबंधित अशीच आदर्श प्रारूपे त्याच्याकडून मांडली जातात.

**२. आदर्श प्रारूप एक तार्किक आराखडा (बल्यू प्रिंट) असते –**

मॅक्स वेबरने आदर्श प्रारूपाचे हे दुसरे वैशिष्ट्य सांगितले. त्याच्या मते, ज्या समस्येच्या अध्ययनासाठी आदर्श प्रारूप तयार केले जाते ते दुसरे काही नसून संशोधकाने स्वत:च्या ताकिकतेच्या आधारावर तयार केलेले ते एक काल्पनिक किंवा मानसचित्रच असते. सामाजिक वास्तवात सातत्याने बदल होत असतो त्यामध्ये सातत्याने चढउताराची आवर्तने सुरू असतात. पण आदर्श प्रारूपात अशा चढउतारांचा समावेश असत नाही. उदा. वेबरने 'प्रोटेस्टंट नैतिकता भांडवलशाहीचा आत्मा' असे भांडवलशाहीचे आदर्श प्रारूप निर्माण केले होते. पण वेबरकालीन भारतातील हिंदू धर्मात भांडवलशाहीच्या निमितीसाठीचे असे आधार नव्हते. आज मात्र भारतातील भांडवलशाही व धर्माची संकल्पना याबातीत बरेच बदल झाले आहेत. आदर्श प्रारूपाची निर्मिती तार्किक कार्यकारणानुसार केली जाते तर वास्तविकता सातत्याने परिवर्तनशील असते. थोडक्यात परिस्थितीत समाजातील वास्तविकता नव्हे तर संशोधकाचा तर्क हाच आदर्श प्रारूपाचा आधार असतो.

**३. आदर्श प्रारूपाचा नैतिक आदर्शांशी सबंध असत नाही –**

सर्वसामांन्यपणे आपण आदर्श याचा अर्थ अनुकरणिय अगर नैतिक आदर्श असा घेतो. आपल्या मते, असे आदर्श अनुकरणीय असतात. जेंव्हा आपण प्रभू रामचंद्रांना आदर्श पुरूष मानतो तेंव्हा ते

आपल्यादृष्टीने अनुकरनिय ठरतात. वेबरच्या मते, आदर्श प्रारूपात अशी अनुकरणियता नसते. येथे आदर्श याचा अर्थ तर्काच्या कोणत्यातरी एका टोकाशी असतो.

**४. आदर्श प्रारूप मूल्ये नसतात –**

आदर्श प्रारूपांना वेबर केवळ यासाठीच आदर्श म्हणतो की, ज्यामध्ये संशोधकाची मूल्ये उपस्थित नसतात. जेंव्हा आपण हिंदू धर्माच्या अध्ययनासाठी आदर्श प्रारूप निर्माण करू तेंव्हा यात केवळ एका सामाजिक संस्थेचे अध्ययन समाविष्ट असेल. संशोधकाच्या दृष्टीने हिंदू धर्मातील चांगल्या अगर वाईट तत्वाचा अगर हिंदू धर्मात काय असावे अगर नसावे याविषयीच्या संशोधकाच्या मूल्यांचा समावेश आदर्श प्रारूपात असत नाही.

**५. आदर्श प्रारूप अभ्युपगमात्मक असतात –**

लेविस कोझर यांच्या मताप्रमाणे, आदर्श प्रारूपाचे अभ्युपगमात्मक स्वरूप हे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. हे स्पष्टच आहे, की आदर्श प्रारूप हे वास्तविकतेचे यथार्थ स्पष्टीकरण नाही. आदर्श प्रारूप हे संशोधकाच्या संशोधन क्षेत्राविषयीच्या मूल्यांच्या प्रतिस्थापनेशी संबंधित असतात. याचाच अर्थ असा की, आदर्श प्रारूप हे वास्तविकतेबाबत संशोधकाने मांडलेले एक मानसचित्रच असते की, जे त्याला त्याच्या अध्ययनात मार्गदर्शक ठरते.

**६. आदर्श प्रारूप हे सत्य अगर असत्यही असत नाही –**

वेबरने असे कोठेही म्हंटलेले नाही की, आदर्श प्रारूपाचा हेतू ज्ञानाच्या बोधाशी जोडलेला असतो आणि अशी आदर्श प्रारूपे एका पूर्ण वैज्ञानिक वास्तविकतेला जन्म देतात. आदर्श प्रारूपांची निर्मिती केवळ यासाठीच केली जाते की, ज्या संशोधन समस्येचे अध्ययन संशोधकाला करायचे असते तिच्याविषयी कोणतीही अडचण न येता त्याला माहिति मिळवता यावी. याबाबतीत सत्यता हीच आहे की, संशोधकाच्या अध्ययनात त्याने निर्माण केलेले आदर्श प्रारूप कितपत सहाय्यभूत ठरते. जर अभ्युपगम याबाबतीत कमी पडत असेल तर संशोधकाकडून नव्या आदर्श प्रारूपाची मांडणी केली जाते. परिणामी आदर्श प्रारूप हे सत्यही असत नाही किंवा असत्यही असत नाही तर ते संशोधनाच्या प्रक्रियेतील एक साधन म्हणून त्याचा वापर संशोधकाला करावयाचा असतो.

**७. आदर्श प्रारूपे समाजातील वास्तविकतेशी जोडलेली असतात –**

आदर्श प्रारूपे कितपत उपयुक्त आहेत आणि कितपत उपयुक्त नाहीत याचा संबंध संबंधित समाजातील वास्तविकतेशी जोडला गेलेला असतो. जर संशोधनाचा उद्देश सातत्यशील असेल म्हणजेच तो दीर्घकालिन असेल तर संशोधकाने त्यासाठी सुरूवातीला मांडलेली आदर्श प्रारूपे काही कालावधीनंतर उपयुक्त ठरणार नाहीत. काळाच्या ओघात समाजात होणाऱ्या परिवर्तनामुळे सामाजिक वास्तविकतेत परिवर्तन घडून येते व त्याला उपयुक्त ठरतील अशा आदर्श प्रारूपांची निर्मिती संशोधकाला करावी लागते.

**८. एकाच सामाजिक वास्तवाचा अभ्यास करण्यासाठी अनेक आदर्श प्रारूपांची निर्मिती करावी लागते –**

जेंव्हा सामाजिक संशोधकाचा आपण संशोधन करत असलेल्या घटना अगर समस्येच्या सर्व पैलूंचे योग्य पध्दतीने अध्ययन करणे हा हेतू असतो तेंव्हा तो अशा अध्ययनासाठी अनेक आदर्श प्रारूपे निर्माण

करू शकतो. एकाच घटनेच्या सर्वांगिण अध्ययनासाठी संशोधकाला अनेक आदर्श प्रारूपे मांडावी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उदा. संशोधकाला हिंदू धर्मसंस्थेचे अध्ययन करावयाचे असेल तर तो या धर्माच्या जातीय संकल्पनांचा वापर करून एका आदर्श प्रारूपाची निर्मिती करू शकेल. याबरोबरच वैदिक काळातील हिंदू धर्माविषयी उत्तर वैदिक काळातील स्वातंत्र्यपूर्व अगर आधुनिक काळातील हिंदू धर्माविषयी अशा असंख्य आदर्श प्रारूपांची निर्मिती त्याला करता येईल. याचाच अर्थ असा की, संशोधन क्षेत्राचा जितका व्यापक विचार संशोधक करेल तितकी आदर्श प्रारूपे संशोधकाला निर्माण करता येतील.

**९. आदर्श प्रारूपे ही सामाजिक वास्तवाच्या निकट पोहचणारी असतात –**

ज्याचा आपण सामाजिक वास्तवता असा उल्लेख करतो त्यामध्ये विविधता समाविष्ट असते. संशोधक कधीही सामाजिक विविधतेला सर्व बाजूंनी समजून घेऊ शकत नाही. परिणामी त्याचे वास्तवाबाबतचे ज्ञान आंशिक स्वरूपाचेच असते. या परिस्थितीत तो जेंव्हा आदर्श प्रारूपाची मांडणी करतो तेंव्हा त्याच्या सामाजिक वास्तविकतेबाबतच्या मूल्यांचा प्रभाव त्यावर निश्चित पडतो. अशा प्रकारे ज्या आंशिक वास्तवतेला आपण समजू शकतो ती हुबेहुब वास्तवाचे आकलन असत नाही. पण एका अर्थाने वास्तवाच्या आसपास पोहचणारे असते.

**१०. आदर्श प्रारूपाची भूमिका सुगम्यता** (Intelligibility) **वाढविणे ही असते –**

सामाजिक घटना अगर प्रघटनांबाबतचे संशोधकाचे ज्ञान अगर माहिती परिपूर्ण असत नाही तर तार्किकतेच्या आधारावर संशोधक आदर्श प्रारूपची निर्मिती करत असतो अशावेळी प्रघटनांबाबतची सुगम्यता वाढण्यास मदत होते. उदा. जर आपण मध्ययुगिन काळात युरोपात आढळणाऱ्या शिल्पकारी व्यवस्थेला जाणून घेणार असू तर आपण शिल्पकारी व्यवस्थेच्या सामान्य लक्षणांच्या आधारावर आदर्श प्रारूपाची निर्मिती करू शकू व त्याची तुलना वास्तवातील शिल्पकारी व्यवस्थेशी करू. अशा तुलनेच्या सहाय्याने आपले संशोधन आपल्याला मध्ययुगिन काळातील समाजात शिल्पकारी व्यवस्था नेमकी कशी होती व त्यात आधुनिक काळातील भांडवलशाहीची काही वैशिष्टये आढळतात का याचा बोध घेता येईल. यानंतर आपणास शिल्पकारी व्यवस्थेबाबत कार्यकारण संबंधाच्या आधारावर विश्लेषण करणे शक्य होईल.

**११. आदर्श प्रारूप हे प्रघटनेच्या स्पष्ट अभिव्यक्तीचे साधन आहे –**

काही समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासतज्ञ वेबरच्या आदर्श प्रारूपाच्या संकल्पनेला वास्तवतेचा अजिबात लवलेश नाही म्हणून विरोध करतात. त्यांच्या मतानुसार, आदर्श प्रारूपात केवळ संशोधकाच्या गृहितांचा समावेश असतो. पण असे जर असेल तर वेबरनंतर इतका दीर्घ कालावधी लोटून गेला तरी संशोधकांकडून वेबरने मांडलेल्या 'अधिकारी तंत्र अगर अधिकाराची संकल्पना' या आदर्श प्रारूपांचे अध्ययन का केले जाते. इतकेच नव्हे तर वेबरने त्याच्या अधिकारी तंत्राविषयीच्या संकल्पनेत जे मांडले आहे ते केवळ आदर्श प्रारूपच आहे हे सत्य मानून आजही आपण त्याचे अध्ययन का करतो. या सर्वाचा मतिथार्थ इतकाच की, आदर्श प्रारूपे ही प्रघटनेच्या स्पष्ट अभिव्यक्तीचे साधन असतात.

वेबर स्वत: आदर्श प्रारूपाच्या संकल्पनेतील त्रुटींविषयी जाणत होता. त्याने आदर्श प्रारूपच्या साहाय्याने केवळ सामाजिक वास्तविकतेला जाण्याच्या योग्य मार्गाची रूपरेषा विशद केली. त्याच्यावर टिका करणाऱ्या संशोधकानाही वेबरने आदर्श प्रारूपच्या संकल्पनेत सुधारणा करण्यास अगर यापेक्षा

शास्त्रिय पध्दत मांडण्यास सांगितले होते. आदर्श प्रारूपाच्या वैशिष्टयांचे वरीलप्रमाणे अध्ययन केल्यानंतर आपण वेबरने स्पष्ट केलेल्या आदर्श प्रारूपाचे प्रकार या विषयीचे विचार समजून घेणार आहोत.

**आदर्श प्रारूपाचे प्रकार –**

वेबरच्या मते, प्रत्येक आदर्श प्रारूपात कोणत्या ना कोणत्या पातळीवर अमूर्तीकरण अवश्य असते आणि हे अमूर्तिकरण ऐतिहासिक विशिष्टता, सामाजिक वास्तविकता आणि शुध्द स्वरूपातील ताकिकतेच्या पातळीवरील अमूर्तिकरण असते. सामाजिक वास्तविकतेला समजून घेण्यासाठी वेबरने ज्या आदर्श प्रारूपांची निर्मिती केली त्यांचे स्पष्टीकरण **लेविस कोझर** यांनी खालील तीन प्रकारांत केले आहे.

**१. ऐतिहासिक तपशिलाची आदर्श प्रारूपे –**

वेबरद्वारे निर्माण करण्यात आलेल्या आदर्श प्रारूपांपैकी काही आदर्श प्रारूपे ही अशा प्रकारची आहेत की, ज्यांचा संबंध ऐतिहासिक विशिष्टता आणि सांस्कृतिक क्षेत्राशी जोडता येतो. युरोपाच्या इतिहासात कितीतरी ऐतिहासिक घटना घडल्या. फ्रान्सची राज्य क्रांती, सामंत युगाचा अस्त, पहिले महायुध्द अशा विविध घटनांनी युरोपात प्रचंड उलथापालथ झाली होती. वेबर यांच्यावर मात्र या बदलांचा फारसा प्रभाव पडला नव्हता. पण त्यांची युरोपच्या सांस्कृतिक क्षेत्रात घडणाऱ्या काही बाबींविषयी आदर्श प्रारूप निर्माण केली होती. वेबरच्या आदर्श प्रारूपावर चर्चा करताना रेमंड ॲरा असे मत मांडतात की, ऐतिहासिक तपशीलाच्या आदर्श प्रारूपांमध्ये वेबरने मांडलेली 'आधुनिक भांडवलशाही' आणि 'प्रोटेस्टंट नैतिकता' व 'पाश्चात्य शहर' या आदर्श प्रारूपांचा समावेश होत असून ही आदर्श प्रारूपे एकाबाजूला पृथ्वीवरील पुनर्रचनेचा स्पष्ट विचार मांडतात तर दुसऱ्या बाजूला विशिष्ट ऐतिहासिक वास्तविकतेचा विचार स्पष्ट करतात. परिणामी ऐतिहासिक तपशीलाच्या आदर्श प्रारूपांमार्फत काही प्रमाणात पुनर्रचनेचे कार्य करतात. साध्या शब्दात स्पष्ट करावयाचे झाल्यास असेही म्हणता येते की, इतिहासाच्या आधारावर समाजशास्त्रज्ञ आजच्या समाजासाठीची आदर्श प्रारूपे मांडतात.

**२. सामाजिक वास्तवतेचे अमूर्त घटक स्पष्ट करणारी आदर्श प्रारूपे –**

या प्रकारच्या आदर्श प्रारूपात वेबरने मांडलेल्या प्रामुख्याने 'नोकरशाही किंवा 'सरंजामशाही' यांचा समावेश करता येतो. वेबरच्या समकालीन युरोपात एक निश्चित सामाजिक वास्तवता होती. औद्योगिक क्रांती झाल्यामुळे औद्योगिक संघटनांना व्यवस्थित चालवण्यासाठी अधिकारी तंत्राची गरज निर्माण झाली होती. तर यावेळी युरोपमध्ये सामंतशाही व्यवस्था होती. पश्चिम युरोपात १२ व्या शतकापासून सुरू असलेली सामंतशाही १४ व्या शतकापर्यंत सुरू राहिली. याऊलट पूर्व युराप किंवा रशियात सामंतशाही १६ व्या शतकात उदयाला आली होती. अशा प्रकारे सामंतशाही हे युरापचे सामाजिक वास्तव होते. या सामाजिक वास्तविकतेचे अमूर्तीकरण वेबरने सामंतशाहीच्या त्याच्या आदर्श प्रारूपात केले होते.

**३. विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची संयुक्तिक पुनर्रचना करणारी आदर्श प्रारूपे –**

वेबरने स्पष्ट केल्याप्रमाणे या तिसऱ्या प्रकारची आदर्श प्रारूपे ही मानवाच्या विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची संयुक्तिकरित्या पुनर्रचना करण्याचे कार्य करतात. वेबरच्या मतानुसार, अशी प्रारूपे आर्थिक क्षेत्रातील सर्व योजना शुध्द आर्थिक विषयाच्या अधिन राहून कसे वर्तन करावे याबाबतच्या वर्तनाच्या

पुर्नरचनेचे स्पष्टीकरण करण्याचे कार्य करतात. थोडक्यात या प्रकारच्या आदर्श प्रारूपांकडून मानवाच्या आर्थिक क्रियांचे निश्चितीकरण केले जाते.

थोडक्यात, आदर्श प्रारूपे ही, वेबरने मांडलेली एक महत्वपूर्ण संकल्पना असून ती समाज आणि विज्ञान यांना एकत्र बांधणारा एक महत्वाचा दूवा आहे. तसेच यांच्या सहाय्याने संशोधकाला ऐतिहासिक घटना किंवा घटनाक्रमाचे सुव्यवस्थित आकलन होऊ शकते आणि या आधारेच इतिहास व समाजशास्त्र यांच्यातील परस्परावलंबन आदर्श प्रारूपामुळे स्पष्ट होते.

**४.२.१.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –**

१. मॅक्स वेबर यांनी सामाजिक पध्दतीशास्त्राविषयीचे आपले विचार कोणत्या ग्रंथात मांडले आहेत ?

------------------------------------------

------------------------------------------

२. मॅक्स वेबरनी विशद केलेले सामाजिक आकलनाचे दोन प्रकार कोणते ?

------------------------------------------

------------------------------------------

३. वेबरने केलेली संयुक्तिक आकलनाची व्याख्या लिहा ?

------------------------------------------

------------------------------------------

४. अंतर्ज्ञानी आकलन म्हणजे काय?

------------------------------------------

------------------------------------------

५. मॅक्स वेबरने केलेली आदर्श प्रारूपची व्याख्या लिहा ?

------------------------------------------

------------------------------------------

६. आदर्श प्रारूपाचे मॅक्स वेबरने सांगितलेली कोणतीही तीन वैशिष्टये लिहा ?

------------------------------------------

------------------------------------------

७. आदर्श प्रारूपाचे कोणते प्रकार मॅक्स वेबरने सांगितले आहेत?

------------------------------------------

------------------------------------------

८. मॅक्स वेबरने मांडलेल्या आदर्श प्रारूपाची उदाहरणे लिहा ?

-------------------------------------------

-------------------------------------------

### ४.२.२ **मॅक्स वेबरचा सामाजिक क्रियेचा सिध्दांत** (Theory of Social Action by Max-Weber)

**प्रास्ताविक –**

मॅक्स वेबरच्या सामाजिक विचारांमध्ये त्याच्या सामाजिक क्रियेच्या सिध्दांताला एक वेगळेच स्थान लाभलेले दिसून येते. आपल्या समाजशास्त्राच्या अभ्यास विषयावर चर्चा करताना मॅक्स वेबरला सामाजिक क्रियेची संकल्पना सुचली असावी. समाजशास्त्राची व्याख्या करताना तो म्हणतो, समाजशास्त्र हे असे एक शास्त्र आहे की, ज्यात सामाजिक क्रियेच्या अर्थासंबंधी जाणीव निर्माण केली जाते की, ज्यामुळे सामाजिक क्रियेचा अभ्यास आणि परिणाम यासंबंधात कायिक स्पष्टीकरण देणे शक्य होते. किंवा ''सामाजिक क्रियांचा अर्थ स्पष्ट करून त्यांच्या अभ्यासासंबंधी आणि परिणामांसंबंधी जाणीव निर्माण करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय'' अशी एका वाक्यात वेबरची समाजशास्त्राची व्याख्या स्पष्ट करता येते.

मॅक्स वेबरने मांडलेली सामाजिक क्रियेची संकल्पना त्याच्या सर्व समाजशास्त्रीय विचारांतील मध्यवर्ती संकल्पना आहे. सामाजिक क्रियेची व्याख्या करताना तो म्हणतो. व्यक्ती किंवा व्यक्तिसमूहाकडून केली जाणारी क्रिया अशाच वेळी सामाजिक क्रिया समजावी की, जेंव्हा तिच्याशी प्रतिकात्मक किंवा अर्थपूर्ण संबंध आलेला असतो आणि तिच्यावर इतरांचा परिणाम होऊन त्यानुसार तिचे स्वरूप बदलत जाते.

('Action is social in so far as, by virtue of the subjective meaning attached to it by the individual (or individuals) it takes account of the behaviour others and thereby oriented in its course') दुसऱ्या शब्दात त्याच्या मते, ''सामाजिक क्रिया म्हणजे एखाद्या व्यक्तीकडून घडणारी अशी क्रिया की, जी दुसऱ्या व्यक्तीच्या क्रिया आणि वर्तनाने प्रभावित झालेली असते आणि त्यानुसार त्या क्रियेच्या दिशेत बदल झालेला असतो.'' अशा प्रकारे हे स्पष्ट होते की, आपण अशाच क्रियांना सामाजिक क्रिया म्हणू शकतो की, ज्या दुसऱ्या व्यक्तीच्या क्रियांमुळे प्रभावित, मार्गदर्शित अगर निश्चित झालेल्या असतात. अशा प्रकारे सामाजिक क्रियेची व्याख्या केल्यानंतर वेबरने सामाजिक क्रियांच्या निश्चितीसाठी चार कसोटया स्पष्ट केल्या आहेत त्यांचाच उल्लेख सामाजिक क्रियेची **वैशिष्टये** असाही केला जातो त्यांचा आढावा आपणास खालीलप्रमाणे घेता येईल.

**सामाजिक क्रियेची वैशिष्ट्ये**

**१. सामाजिक क्रिया अन्य व्यक्तीच्या भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळातील क्रियांशी संबंधीत असतात –**

सामाजिक क्रिया की, ज्यात कर्त्याच्या क्रियेतील अपयश आणि निष्क्रियता समाविष्ट होतात. इतरांच्या भूत, वर्तमान अगर भविष्यकालीन वर्तनातून आकारास येतात. अशाप्रकारे हे स्पष्ट होते की, क्रियेला सामाजिक क्रिया असे तोपर्यंत म्हणता येत नाही जोपर्यंत तिचा दुसऱ्याच्या वर्तमान, भूत अगर भविष्यातील अपेक्षित वर्तनाशी संबंध असत नाही. उदा. पूर्वी केलेल्या एखाद्या क्रियेचा बदला घेण्यासाठी

एखाद्याने दुसऱ्यावर केलेला हल्ला हा भूतकालीन घटनेचाच परिपाक असतो. याबरोबरच एखाद्या पदवीच्या वर्गात प्राध्यापक काही प्रश्नांची उत्तरे लिहून देत असतील व विद्यार्थी लिहून घेत असतील तर ती क्रिया वर्तमानाशी संबंधीत असते. त्याचप्रमाणे भविष्यात आपल्या कोर्सची परीक्षा देण्यासाठी तुम्ही तयारी करण्याची जी क्रिया करणार आहात ती भविष्यकालीन सुरक्षिततेसाठीची क्रिया ठरते. वेबर हे ही स्पष्ट करतो की, या सर्व क्रिया घडत असताना संपर्कात येणारी दुसरी व्यक्ती कायम आपल्या ओळखीची असेलच असे नाही. पण दुसऱ्या कर्त्याच्या क्रियातच आपल्या क्रियांचा उदय होत असतो. थोडक्यात सामाजिक जीवन जगत असताना आपला अनेक लोकांशी संबंध येतो व त्यातूनच कळत नकळत आपण इतरांच्या क्रियाशी मिळत्याजुळत्या क्रिया करतो. या सर्व क्रिया सामाजिक क्रिया या संज्ञेस पात्र ठरतात.

**२. सामाजिक क्रिया या अन्य व्यक्तींच्या क्रियांशी संबंधीत असतात –**

वेबरच्या मते, कोणतीही क्रिया सामाजिक क्रिया ठरत नाही जोपर्यंत ती अन्य व्यक्तीच्या क्रियांशी संबंधीत असत नाही. व्यक्तीची प्रत्येक क्रिया मग ती अगदी उघड स्वरूपाची असली तरी सामाजिक क्रिया असतेच असे नाही. या संदर्भात स्पष्टीकरण देताना वेबर म्हणतो की, कर्त्याची क्रिया ही जर निर्जीव किंवा अमानवीय वस्तूंच्या संदर्भात असेल तर ती क्रिया असामाजिक क्रिया असते. उदा. मनुष्याचे धार्मिक वर्तन किंवा धार्मिक क्रिया या केवळ चिंतनाच्या अगर वैयक्तिक असतील तर त्यांना सामाजिक क्रिया म्हणता येत नाही. कारण अशा क्रियांत इतर व्यक्तीचा संबंध येत नाही. याप्रमाणेच निर्जीव घटकाच्या संदर्भात होणाऱ्या क्रियातूनदेखील सामाजिक क्रिया उदयाला येत नाहीत. कारण येथेही दुसऱ्या घटकाकडून प्रतिसाद मिळत नसतो.

**३. सामाजिक क्रियांत मानवी संपर्काबरोबरच विचारांची व शब्दांची देवाण घेवाण होणे आवश्यक आहे**

सामाजिक क्रियेबाबत ही तिसरी महत्वाची कसोटी आहे. मानवामानवातील प्रत्येक क्रिया ही सामाजिक स्वरूपाची असत नाही. एखाद्या दुर्घटनेतून परस्परांना वाचवण्याच्या हेतूने केलेली क्रियादेखील सामाजिक क्रिया असत नाही. उदा. दोन सायकलस्वारांनी टक्कर होताना परस्परांची ओळख नसताना देखील परस्परांना वाचवण्याचा प्रयत्न करताना केलेली क्रिया सामाजिक क्रिया ठरत नाही. कारण अशा क्रियेत सामाजिकता नसते तर स्वत:ला होणाऱ्या दुखापतीपासून संरक्षण मिळवणे हाच हेतू असतो. पण अशा टक्करीनंतर जर त्यांच्यात वादावादी व भांडण झाले तर ती मात्र सामाजिक क्रिया बनते. किंवा एखाद्या स्मगलरने पोलिस जीपला टक्कर दिली व त्यात काही जणांचा मृत्यू झाला अगर काही जखमी झाले तर मात्र ती सामाजिक क्रिया बनते.

**४. अनेक व्यक्तीकडून केली जाणारी एकसारखी क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे –**

सामाजिक क्रिया या अनेक व्यक्तींनी केलेल्या एकसारख्या क्रियाशी किंवा इतरांनी प्रभावित केल्यामुळे घडलेल्या क्रियेशी कोणतेही साधर्म्य दर्शवीत नाहीत. याचे स्पष्टीकरण देताना वेबरने पुढील उदाहरण दिले आहे. शहरातील गजबजलेल्या रस्त्याने लोकांची येजा चाललेली असते. एवढयात पाऊस येतो. बहुसंख्य लोक आपल्याजवळील छत्र्या उघडतात. वेबर पुढे स्पष्ट करतो की, पाऊस आल्यावर लोकांची छत्र्या उघडण्याची क्रिया ही समान असली तरी ती सामाजिक क्रिया नाही कारण ती परस्परसंबंधातून उदयाला आलेली नाही. याबरोबरच वर्तमानपत्रातील एखाद्या नेत्याचे भाषण वाचल्यानंतर जर आपणास राग आला आणि तुमचा राग इतरांच्या दृष्टीने अर्थशून्य असेल तर ती क्रिया स्वाभाविक

मानावी लागेल ती सामाजिक क्रिया नव्हे. याबरोबरच इतर व्यक्तींच्या क्रियेचे कोणताही हेतू न बाळगता केवळ अनुकरण म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे. समजा तुम्ही एखाद्या मुलाला आपल्या महाविद्यालयात जवळच्या रस्त्याने जाताना पाहिले व तुम्ही आणि इतरही त्याचे अनुकरण जवळच्या मार्गाने महाविद्यालयात जाऊ लागला तर या क्रियेत सामाजिकता नाही तर केवळ मुलांची सोय आहे कारण येथे परस्पर प्रभावाचा अभाव आढळतो. पण जेंव्हा परंपरा, रूढी या संदर्भात आपण इतरांचे अनुकरण करतो तेंव्हा त्यात सामाजिकता महत्वाची मानली जाते. परंपरा, रूढींचे पालन करत असताना व्यक्ती स्वत:पेक्षा समाजाचाच अधिक विचार करत असते. थोडक्यात, 'व्यक्तीच्या ज्या क्रिया अन्य व्यक्तींना तशाच क्रिया करण्यास प्रभावित करतात तेंव्हा त्यांना सामाजिक क्रिया म्हणतात' आणि समाजशास्त्र केवळ अशाच सामाजिक क्रियांच्या अध्ययनाशी संबंधीत आहे.

सारांश, वरील सर्व उदाहरणावरून हे स्पष्ट होते की, मॅक्स वेबरच्या मतानुसार सामाजिक क्रिया म्हणजे केवळ अशाच क्रिया की, ज्या अन्य व्यक्तीच्या भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळातील क्रियांशी संबंधीत असतात. तसेच त्या अन्य व्यक्तींच्या क्रियांशी संबंधीत असतात. ज्या क्रियांत मानवी संपर्काबरोबरच विचारांची व शब्दांची देवाण घेवाण होणे आवश्यक असते आणि अनेक व्यक्तीकडून केली जाणारी एकसारखी क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे. अशाप्रकारे सामाजिक क्रियांच्या कसोट्यांचा अगर वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यानंतर आपण मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेच्या केलेल्या वर्गीकरणाचा विचार करणार आहोत.

**सामाजिक क्रियांचे प्रकार –**

सामाजिक क्रियांचा अभ्यास हाच समाजशास्त्राचा अभ्यासविषय असल्याचे स्पष्ट केल्यानंतर आणि सामाजिक क्रियांची व्याख्या केल्यानंतर मॅक्स वेबरने सामाजिक क्रियांतील अर्थपूर्ण अभिमुखतेच्या आधारावर त्यांचे **चार प्रकार** स्पष्ट केले आहेत ते खालीलप्रमाणे :

१. बुध्दीप्रामाण्यवादी सामाजिक क्रिया

२. मूल्याभिमुख सामाजिक क्रिया

३. संवेगात्मक सामाजिक क्रिया

४. परंपरावादी सामाजिक क्रिया

**१. बुध्दीप्रामाण्यवादी किंवा तार्किक सामाजिक क्रिया** (Rationalistic Social Action)

मॅक्स वेबर यांच्या मतानुसार, मानवी क्रियेला बुध्दीप्रामाण्यवादी क्रिया ही संज्ञा अशावेळीच आपणास देता येते की, जेव्हा व्यक्ती जाणीवपूर्वक आपली उपलब्ध साधने आणि साध्ये यांच्यात योजनापूर्वकरित्या समायोजन प्रस्थापित करून क्रिया करते. उदा. समजा एखाद्या व्यक्तीला नवा कारखाना सुरू करावयाचा आहे अशी व्यक्ती प्रथम आपण उत्पादित करावयाच्या मालाचे स्वरूप निश्चित करते. नंतर बाजारपेठेत आपल्या उत्पादित मालाला किती मागणी येईल तसेच उत्पादित मालाच्या वितरणाचे मार्ग कोणते या सर्व बाबींचा सखोल विचार करते. वेबर पुढे असे स्पष्ट करतात की, ज्यावेळी व्यक्ती स्वत:च्या अधिकाधिक फायद्याचा विचार करून आणि कारखान्यातील कामगारांच्या कार्यक्षमतेचा विचार करून निर्णय घेत असेल तर तिची ही क्रिया बुध्दीप्रामाण्यवादी क्रिया ठरते.

२. **मूल्याभिमुख सामाजिक क्रिया** (Valuational Social Action) –

सामाजिक क्रियांचा हा दुसरा प्रकार असून अशा क्रियांत व्यक्तीवर मूल्यांचे नियंत्रण असते. अशा क्रियेत व्यक्तीच्या सौंदर्यात्मक, धार्मिक किंवा नैतिक वर्तणुकीचा समावेश होतो की, जे वर्तन समाजाने कोणत्याही संयुक्तिक कारणाविना स्विकारलेले असते. या संदर्भात अधिक स्पष्टिकरण करताना वेबर म्हणतात की, आपण मूल्याभिमुख क्रिया करतो कारण आपणाकडून अशा प्रकारच्या क्रिया घडाव्यात आणि धार्मिक व नैतिक आदर्श टिकून रहावेत अशी समाजातील व्यक्तींकडून अपेक्षा केली जाते. अशा स्वरूपाच्या क्रियांमध्ये अंतिम मूल्यासंबंधी प्रश्न न विचारता त्यांना मान्यता दिली जाते किंवा व्यक्तीने विशिष्ट प्रकारे वर्तन केलेच पाहिजे असे गृहीत धरले जाते. उदा. आपण दररोज परमेश्वराची प्रार्थना करण्याने अगर चर्चला नियमित भेट देण्यामुळे आपला नेमका काय फायदा होणार हे आपणास माहिती नसते तरीदेखील आपण अशा क्रिया करतो कारण त्यामुळे मूल्यांचे रक्षण होईल व या मूल्यांमुळे आपल्याला एकतर मोक्ष प्राप्त होईल नाही तर परमेश्वरावर असणारे आपले प्रेम अगर श्रध्दा व्यक्त करता येईल अशी आपली श्रध्दा असते. सारांश, विशिष्ट क्रिया आपण का करतो? त्याचा फायदा काय? अशा प्रश्नांची उत्तरे माहिती नसतानादेखील आपण ज्या क्रिया करतच असतो अशा क्रियांना मूल्याभिमुख सामाजिक क्रिया असे म्हणतात. केवळ समाजमांन्य मूल्यांचे रक्षण करण्यासाठी हिंदूंकडून विविध सणांवेळी केल्या जाणाऱ्या मूल्याभिमुख क्रिया स्पष्ट करता येतील. उदा. संक्रातील तिळगूळच का वाटावयाचे किंवा दसऱ्याला आपटयाची पाने 'सोने' म्हणून का वाटायची यांची उत्तरे सापडलेली नसून देखील केवळ समाजमान्य मूल्ये टिकून राहिली पाहिजेत आणि समाजसदस्यांनी आपल्याला नावे ठेवू नये म्हणून अशा क्रिया आपण करतच असतो.

३. **भावनात्मक किंवा संवेगात्मक सामाजिक क्रिया** (Emotional or Affective Social Action) –

भावनात्मक किंवा संवेगात्मक क्रिया म्हणजे आपले भावनाप्रधान वर्तन होय. दुसऱ्याच्या आपल्याविषयीच्या प्रेम, द्वेष, मत्सर अगर शत्रूत्वाच्या क्रियांना असलेला आपला प्रतिसाद म्हणजे संवेगात्मक क्रिया होय. अशा प्रकारे वर्तन करत असताना कित्येक वेळा आपले वर्तन भावनातिरेकी स्वरूपाचे अगर असमंजसपणाचे अगर असंयुक्तिक असते. काही वेळा तर ही भावनातिरेकता इतकी पराकोटीला पोहोचलेली असते की त्यावेळी घडणाऱ्या आपल्या वर्तनाचा व्यक्तीला नंतर पश्चातापही होतो. रागाच्या भरात आपल्याकडून घडलेल्या वर्तनाबद्दल व्यक्ती नंतर शरमिंदा होतात. सारांश, भावनेच्या आहारी गेल्यानंतर व्यक्तिकडून होणाऱ्या क्रिया म्हणजे संवेगात्मक क्रिया होय.

४. **परंपराधिष्ठित किंवा परंपरावादी सामाजिक क्रिया** (Traditional Social Action) –

मॅक्स वेबरने विशद केलेला हा सामाजिक क्रियेचा चौथा प्रकार आहे. त्यांच्या मताप्रमाणे, परंपरावादी क्रिया म्हणजे अशा क्रिया की, ज्या सामाजिक प्रथांच्या साहाय्याने प्राचीन काळापासून आजपर्यंत अनेक व्यक्तींद्वारे परत परत केल्या जात आहेत. अशा प्रकारच्या क्रिया इतरांकडून केल्या जातात म्हणून व्यक्तीकडूनही केल्या जातात. कित्येकदा विशिष्ट क्रिया करण्याचे समाजाचे असणारे दडपण व्यक्तीला क्रिया करायला भाग पाडते. प्रामुख्याने समाजाच्या रूढी, प्रथा, परंपरा यांचे पालन करण्याचे दडपण समाज व्यक्तीवर टाकत असतो. इतर व्यक्तींकडून एका विशिष्ट पध्दतीने क्रिया करण्यामुळे आपणही तशाच प्रकारची क्रिया सहजगत्या करतो. उदा. परंपरांचे पालन करण्यासाठी महाराष्ट्रातील गणेशोत्सव अगर

महिलांकडून केला जाणारा वटसावित्री पोर्णिमा उपवास, श्रावण सोमवार उपवास या परंपरागत क्रियाच आहेत. सारांश, समाजमान्य परंपरा व प्रथा यांचे रक्षण करण्यासाठी व्यक्तीकडून जी क्रिया केली जाते तिला परंपरागत क्रिया असे म्हणतात.

थोडक्यात, मॅक्स वेबरने अशा प्रकारे समाजशास्त्राच्या अभ्यासाचा सामाजिक क्रिया हाच केंद्रबिदू असल्याचे स्पष्ट करून सामाजिक क्रियांचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे. त्यांनी सामाजिक क्रियांचे केलेले वर्गीकरण परिपूर्ण नाही. कारण एखादी विशिष्ट क्रिया वरिलपैकी दोन प्रकारांत समाविष्ट होऊ शकते. अशी टिका त्यांच्या या सिध्दांतावर केली जाते. अर्थात त्यांनी विशद केलेले सामाजिक क्रियेचे प्रकार हे सामाजिक क्रियांची चार आदर्श प्रारूपेच आहेत. त्यांना केवळ वर्गीकरणाच्या पातळीवरच समजून घेता येते.

**४.२.२.२ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

१. मॅक्स वेबर यांनी सांगितलेली सामाजिक क्रियेची व्याख्या द्या.

---------------------------------------------

---------------------------------------------

२. मॅक्स वेबरनी विशद केलेली सामाजिक क्रियेची वैशिष्टये लिहा.

---------------------------------------------

---------------------------------------------

३. बुध्दीप्रामांण्यवादी क्रियेची वेबरने केलेली व्याख्या लिहा.

---------------------------------------------

---------------------------------------------

४. मूल्याभिमुख सामाजिक क्रियेचा अर्थ विशद करा.

---------------------------------------------

---------------------------------------------

५. परंपरावादी सामाजिक क्रियेचे उदाहरण द्या.

---------------------------------------------

---------------------------------------------

## ४.२.३ प्रोटेस्टंट नैतिकता आणि भांडवलशाहीचा आत्मा (Protestant Ethics and Spirit of Capitalism) किंवा वेबरचे धर्माचे समाजशास्त्र

मॅक्स वेबरचे ज्ञानाच्या समाजशास्त्रातील सर्वात मौल्यवान योगदान म्हणजे त्याचे धर्माच्या समाजशास्त्राबाबतचे विचार होय. समुदायाच्या अनुभविक नैतिक तत्वांचा आणि त्या समुदायातील आर्थिक व्यवस्थांचा परस्परांशी कमालीचा निकटचा संबंध असतो असे वेबरचे मत होते. त्यानेसुध्दा कार्ल

मार्क्सप्रमाणे समाजजीवनातील आर्थिक घटकाचे महत्व मान्य केले होते पण जितक्या प्रमाणात मार्क्सच्या तत्वज्ञानात आर्थिक घटकास सामाजिक परिवर्तनासंदर्भात जे महत्व देण्यात आले आहे ते वेबरला मान्य नव्हते. वेबरचे धर्माच्या समाजशास्त्रासंबंधीचे विचार हे मार्क्सने प्रतिपादन केलेल्या एकतर्फी सिध्दांताला दिलेले उत्तर किंवा आव्हानच आहे. मार्क्सने आर्थिक घटकांत कला, साहित्य, सामाजिक व राजकीय विचार, विज्ञान, तत्वज्ञान आणि धर्म या सर्व घटकांना महत्व असते असे म्हंटले असले तरी वेबरला ते पूर्णपणे मान्य नव्हते. मॅक्स वेबरच्या मतानुसार नीतीशास्त्र, विविध विचारप्रणाली आणि आर्थिक व्यवस्था या एकमेकांवर प्रभाव पाडत असतात आणि समाजातील नैतिक तत्वे ही आर्थिक बदलांचा पाया तयार करतात. मार्क्सप्रमाणे वेबरने काही विशिष्ट घटकांनाच आर्थिक परिवर्तनासंबंधी महत्व दिले नसून सगळया प्रकारच्या घटकांना सारखेच महत्व असते आणि हे घटक परस्परसंबंधीत असतात असे प्रतिपादन केले आहे. मार्क्सच्या सामाजिक परिवर्तनासंबंधीच्या विचारांत केवळ आर्थिक घटकांनाच महत्व दिले आहे. काही टिकाकारांच्या मते, केवळ एकाच घटकाला सामाजिक परिवर्तनात महत्वाचे स्थान देणारे मार्क्सचे विचार हे एकांगी स्वरूपाचे असून वेबरने सर्वच घटकांना महत्व दिल्यामुळे त्यांचे विचार मात्र परिपूर्ण आहेत.

वेबर हा वैज्ञानिक पध्दतीचा चिकित्सक असा अभ्यासक होता आणि त्याने एकांगी स्वरूपाच्या सिध्दांताचा जाणीवपूर्वक त्याग केला होता. धर्माच्या समाजशास्त्रासंबंधी त्याने मांडलेली **तत्वे** खालीलप्रमाणे –

१. धर्म आणि आर्थिक घटना या परस्परसंबंधीत असून त्या एकमेकांवर अवलंबून असतात म्हणजेच दोन्हींचा एकमेकांवर प्रभाव पडतो.

२. वेबरच्या मते, कोणताही एकांगी दृष्टीकोण हा अवैज्ञानिक असतो आणि म्हणूनच चुकीच्या युक्तीवादामुळे आपली फसगत होणार नाही याची खबरदारी आपण घेणे आवश्यक असते. वेबरच्या मतानुसार, ज्याप्रमाणे इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण विश्वसनीय आणि अगदी बिनचूक असू शकत नाही त्याचप्रमाणे सर्व सामाजिक घटनांचे मूळ धर्म असतो असे समजून चालणे सुध्दा विश्वसनीय व बरोबर नाही. हे दोन्ही घटक परस्परावलंबी आहेत इतकेच नव्हे तर या दोन घटकांशिवाय आणखी कित्येक घटक मानवी समाजाचे अस्तित्व व उत्त्क्रांती यामध्ये समाविष्ट असतात.

३. वेबरच्या मते, पध्दतीशास्त्राच्या दृष्टीने आपणास कोणत्याही एका घटकाची 'परिवर्तनशील' घटक म्हणून निवड करणे शक्य आहे. यानुसार मॅक्स वेबरने धार्मिक घटकाची एक परिवर्तनशील घटक म्हणून निवड करून त्याच्या सहाय्याने या घटकांचा आर्थिक आणि इतर सामाजिक घटकांवर होणाऱ्या परिणामांचे परिक्षण केले आहे.

४. मॅक्स वेबरने धर्माच्या समाजशास्त्रात 'आदर्श प्रारूपांचा अभ्यास केला आहे.

मॅक्स वेबरने धर्माची परिवर्तनशील घटक म्हणून निवड करून धर्माचा आर्थिक जीवनावर पडणारा प्रभाव विशद करण्यासाठी 'धर्माचे आर्थिक नीतीशास्त्र' ही संज्ञा मांडली. या संज्ञेत त्याने विविध धर्मातील ईश्वरविषयक तत्वांचा समावेश न करता वर्तनाच्या अनुभविक पध्दतींचा समावेश केला आहे. त्याला असेही आढळून आले की, आर्थिक नीतीशास्त्र आणि धार्मिकशास्त्र एकमेकांपासून वेगळे नसून त्यांच्यात परस्पर संबंध निर्माण झालेले असतात. इतकेच नव्हे तर वर्तनाच्या व्यवहार्य पध्दतीसाठी धार्मिक

घटकांशिवाय इतर काही घटकही महत्वाची भूमिका पार पाडत असतात. म्हणून तो म्हणतो की, वर्तनाला चालना अगर वळण देणारा धर्म हा एकच घटक नसतो तर इतर घटकही त्यात समाविष्ट झालेले असतात.

आपला सिध्दांत निर्दोष होण्यासाठी वेबरने जगातील प्रसिध्द सहा थर्मातील आर्थिक नीतींतत्वांची निवड केली. ते धर्म खालीलप्रमाणे -

१) कन्फ्युसियानिझम, २) हिंदू, ३) बौध्द, ४) इस्लाम, ५) खिश्चन आणि ६) ज्यू . या सहा धर्मातील आर्थिक नीतीतत्वाचे स्वरूप आणि त्यांचा त्या त्या धर्माच्या अनुयांयांच्या आर्थिक व सामाजिक संघटनावर पडलेला प्रभाव त्याने स्पष्ट केला. प्रा. आर. के. मुखर्जी यांच्या मताप्रमाणे, वेबरच्या धर्माच्या समाजशास्त्रातील चिंतनाचा सर्वात महत्वाचा अभ्यास म्हणजे त्याने विशद केलेले 'प्रोटेस्टंटवाद आणि भांडवलवाद' यामधील सहसंबंध हा होय. म्हणूनच आपण त्याच्या याविषयीच्या विचारांचा आढावा येथून पुढे घेणार आहोत.

**प्रोटेस्टंटवाद आणि भांडवलवाद –**

आपल्या या विभागाच्या अभ्यासातून मॅक्स वेबरने हे दाखवून दिले आहे की, प्रोटेस्टंटवादात असे काही तरी आहे की, ज्याने आर्थिक नियमन व्यवस्था निर्माण करण्यास मदत केली आहे जिला आपण भांडवलवाद म्हणून ओळखतो आणि प्रोटेस्टंटवादातील याच परिवर्तनाने भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या विकासाला प्रत्यक्ष चालना दिली आहे. प्रोटेस्टंटवाद आणि भांडवलशाहीतील हा ऐतिहासिक सहसंबंध विशद करण्यासाठी वेबरने या दोहोंमधील आदर्श प्रारूपांचा आधार घेतला आहे.

**आधुनिक भांडवलशाहीची तीन प्रमुख वैशिष्टये** खालीलप्रमाणे -

१) उद्योग

२) व्यवसाय आणि

३) व्यापार

आधुनिक भांडवलशाहीत या तिन्ही घटकांचे तार्किकतेवर आणि वैज्ञानिक आधारावर जास्तीत जास्त प्रमाणात संघटन करण्यात आलेले असते.

**आधुनिक भांडवलशाहीची पाच मूलभूत तत्वे –** मॅक्स वेबरने विशद केलेली आधुनिक भांडवलशाहीची पाच मूलभूत तत्वे खालीलप्रमाणे -

१. खाजगी मालमत्तेचे जास्तीत जास्त संपादन हे या संपूर्ण व्यवस्थेतील महत्वाचे तत्व आहे.

२. उत्पादित मालासाठी संघटित बाजारपेठांची व्यवस्था -

३. जास्तीतजास्त लोकांना कामाला लावून मोठया मिल्स व कारखान्यांच्या सहाय्याने उत्पादन

४. जास्तीत जास्त नफा मिळविणे आणि

५. श्रमविभाजन व विशेषीकरणाच्या सहाय्याने कामात जास्तीत जास्त कार्यक्षमता निर्माण करणे.

मॅक्स वेबरच्या मतानुसार 'काम हेच जीवन' आणि 'कार्यक्षमता हीच संपत्ती' ही आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेची महत्वाची तत्वे आहेत. याप्रमाणेच व्यावसायिक नीतीतत्वांचाही या व्यवस्थेत अंतर्भाव आहे. जी माणसे त्यांच्या कामात कार्यक्षम आहेत त्यांना अधिक पैसा आणि अधिक मान मिळतो आणि जी याबाबतीत मागे पडतात ती माणसे गरीबच राहतात व त्यांना मानही मिळत नाही. इतकेच नव्हे तर अकार्यक्षम आणि अप्रचलीत आहे ते नष्ट होणार आहे हाच 'भांडवलशाहीचा आत्मा' किंवा 'आदर्श प्रारूप' आहे, असे मॅक्स वेबरने प्रतिपादन केले आहे.

पण या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की, अशा प्रकारची आर्थिक व्यवस्था कोणत्या शक्तीमुळे शक्य होते अगर टिकवून ठेवली जाते? वेबरच्या मतानुसार ही शक्ती म्हणजेच प्रोटेस्टंटवादातील आर्थिक नीतीतत्वे होत. वेबरला ही आर्थिक नीतीतत्वे बेंजामिन फ्रँकलीन यांच्या आत्मचरित्रात आढळून आली आहेत. बेंजामीन फ्रँकलीन यांना आधुनिक भांडवलशाहीचा पाया घालणाऱ्या पैकी एक अगर आधुनिक भांडवलशाहीचा अगदी सुरुवातीचा प्रतिनिधी म्हणून ओळखले जाते. फ्रँकलीन यांनी आपल्या आत्मचरित्रात जे श्रीमंत होऊ इच्छितात अशा तरूण उद्योजकांना श्रीमंत बनण्याच्या काही युक्त्या सांगितल्या आहेत. यापैकी काही युक्त्यांची आदर्श प्रारूप म्हणून वेबरने निवड केली आहे. ती **आर्थिक नीतीतत्वे** खालीलप्रमाणे –

१. वेळ हेच धन अगर संपत्ती आहे.

२. धनाद्वारेच धनाची वृध्दी होते.

३. एक पैसा वाचवणे म्हणजे एक पैसा मिळविणे होय.

४. प्रामाणिकपणा हे उत्तम व्यवहार चातुर्याचे लक्षण आहे.

५. कोणत्याही व्यवसायासाठी काळजीपूर्वक हिशेब ठेवणे आवश्यक आहे.

६. कोणत्याही क्षेत्रातील व्यवसायात यश मिळविण्यासाठी व्यवस्थित आचरण, प्रामाणिकपणा, परिश्रम, कार्यकुशलता, सतर्कता, खरेपणा, एकनिष्ठा ही आवश्यक तत्वे आहेत.

७. लवकर झोपून लवकर उठण्याच्या सवयीमुळे माणूस आरोग्यसंपन्न, धनवान आणि हुशार बनतो.

या सर्व आर्थिक नीतीतत्वामध्ये असणारे समान ध्येय शोधून काढण्याचा आपण प्रयत्न केला तर ही सर्व आर्थिक नीतीतत्वे एकाच विशिष्ट मुद्दयावर भर देताना आपणास आढळून येतात आणि तो मुद्दा म्हणजे काम हीच पूजा आहे आणि आपण सर्वांनी किमान जास्तीत जास्त काम करून पुरेसा पैसा मिळविण्या इतपत आणि पैसा साठवून ठेवण्याइतके शहाणे असले पाहिजे. असे हुशारीने केलेले कामच व्यक्ती आणि समाजाला आरोग्यसंपन्नता आणि धनसंपत्ती मिळवून देईल. म्हणूनच वेबरच्या मतानुसार आधुनिक भांडवलशाही या नीतीविना केवळ अशक्य आहे.

**प्रोटेस्टंटवादाने आधुनिक भांडवलशाहीला दिलेल्या सात देणग्या –**

**१. काम हाच सदगुण –**

आधुनिक भांडवलशाही आणि प्रोटेस्टंटवाद या दोहोंमध्ये सबंध निश्चित करताना वेबरने हे स्पष्ट केले की, 'काम हाच सदगुण' आहे ही प्रोटेस्टंटवदामधील महत्त्वाची कल्पना आहे. कॅथॉलिक नीतीतत्वाना

याची ओळख नाही. कॅथॉलिकांमध्ये अशी दंतकथा आहे की, ॲडॅम आणि ईव्ह यांनी ज्ञानवृक्षाला लागलेले फळ गृहण केल्यामुळे त्यांना स्वर्ग सोडून जाण्यास सांगितले आणि त्या दोघांनाही शिक्षा दिली की, ईथून पुढे ईव्ह आणि तिच्या मूलींना प्रसुतीसमयी वेदना सहन कराव्या लागतील आणि ॲडॅम आणि त्याच्या मूलांना घाम गाळून अन्न मिळवावे लागेल, अशा प्रकारे कॅथॉलिकांमध्ये काम हा सद्गुण नसून ती एक शिक्षा आहे. प्रोटेस्टंट नीतीतत्वांमध्ये मात्र काम ही अशी गोष्ट आहे, की प्रत्येकाने स्वत:साठी केली पाहिजे, अशी गोष्ट आहे की जी चांगली आहे आणि यापेक्षाही महत्वाचे म्हणजे काम ही अशी गोष्ट आहे की, जी परमेश्वराच्या वैभवात भर घालते, म्हणूनच काम हाच सद्गुण आहे ही प्रोटेस्टंटवादाने भांडवलशाहीला दिलेली पहिली देणगी ठरते.

### २. व्यावसायिक नीतितत्वे –

प्रोटेस्टंटवादाने भांडवलशाहीचा विकास प्रभावित करणारी दिलेली दुसरी देणगी म्हणजे 'व्यवसायाची नीतितत्वे' अगर 'उद्योगाची' संकल्पना होय. या व्यावसायिक नीतितत्वांचा कॅल्व्हिनवादाशी संबंध आहे. ज्यात हे स्पष्ट केले आहे की, व्यक्तीच्या मृत्यूनंतर प्रत्येक आत्म्याला एक तर स्वर्गात किंवा नरकात जावे लागणार आहे. व्यक्तीने जन्मभर केलेले कोणतेही काम त्याच्या नशिबात बदल घडवून आणू शकत नाही. पण जीवन जगत असताना व्यक्तीला अशी काही चिन्हे दिसून येतात की, त्यावरून आपला आत्मा स्वर्गात जाणार की नरकात या विषयी तिला अंदाज येऊ शकतो. जर मानवाने त्याच्या कामात यश मिळविले अगर उपजीविकेत यशस्वी झाला तर हे एक सुचिन्ह आहे की, जे त्याच्या अंतिम नशिबाची कल्पना देऊ शकते. अशा नीतीतत्वाच्या सहाय्याने प्रत्येक व्यक्तीवर त्याने आपल्या उद्योगामध्ये सतत कार्यमग्न राहून अधिकाधिक यश संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा प्रभाव पाडला गेला. प्रत्येकाने आपल्या वाटयाला आलेले काम व्यवस्थितरित्या आणि यशस्वीपणे करणे हा परमेश्वरी ईच्छेचा गौरव करण्याचे साधन आहे. उदा. चर्चला नियमित भेट दिल्यामुळे अगर यात्रांमूळे मोक्षाची प्राप्ती होणार नाही तर आपल्या वाटयाला आलेले काम व्यवस्थितरित्या करण्यानेच मोक्ष मिळणार आहे. एखादी व्यक्ती आपल्या धर्माचे पालन चर्चप्रमाणेच आपल्या कामाच्या ठिकाणीही करू शकते.अशा प्रकारची व्यावसायिक नीतितत्वे प्रोटेस्टंटवादाने भांडवलशाहीच्या विकासासाठी दिलेली दुसरी देणगी ठरतात.

### ३. कर्जावर व्याज घेण्यास दिलेली मान्यता –

प्रोटेस्टंटवादाने भांडवलशाहीला दिलेली तिसरी देणगी म्हणजे कर्जावर व्याज घेण्यास दिलेली परवानगी होय. पूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे बेंजामिन फ्रँकलिन यांनी धनाद्वारे धनाची वृध्दी होते असे तत्व मांडले होते. याचाच अर्थ असा होतो की, आपण आपला पैसा काहीतरी म्हणजेच व्याज मिळविण्याच्या हेतूने गुंतवू शकतो. प्रोटेस्टंटांचा गुरू कॅल्व्हिन यांनी कर्जावर व्याज मिळविण्याला परमेश्वराची मान्यता आहे असे सांगितले. तो म्हणतो, आता पैसा व्याजावर गुंतवता येईल; त्यामुळे भांडवल जमा होईल; आता सहजगत्या पैसा व्याजाने घेता येईल. या सर्व बाबी भांडवलशाहीच्या विकासाला सहाय्यभूत ठरल्या.

### ४. अतिमद्यसेवनावर बंदी –

प्रोटेस्टंटवादाने अतिमद्यपानावर बंदी घालून मितपानाचे उदात्तीकरण केले ही प्रोटेस्टंटवादाकडून भांडवलशाहीला मिळालेली चौथी महत्वाची देणगी आहे. यामुळे लोकांमधील आळशीपणा कमी होऊन

कामाच्या ठिकाणची त्यांची कार्यक्षमता वाढली. सामान्यपणे यंत्रांवर काम करणाऱ्या लोकांच्यासाठी अशा प्रकारची अतिमद्यसेवनावरील बंदी अत्यंत हितकारक आहे.

**५. अतिसुट्ट्या घेण्याला विरोध –**

कामामुळे परमेश्वराच्या गौरवात भर पडत असल्यामुळे प्रोटेस्टंटवादात कॅथॉलिकांप्रमाणे अति सुट्ट्या घेण्याला विरोध केला आहे. प्रोटेस्टंटांसाठी काम हीच पूजा आहे. भांडवलशाही व्यवस्थेलाही अधिकाधिक काम आणि कमीत कमी सुट्ट्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहेत. यामुळे माणसाचे कामाचे तास वाढले इतकेच नव्हे तर भांडवालाचा पुरेपूर वापर होऊ शकला.

**६. साक्षरता व शिक्षणाला चालना –**

प्रोटेस्टंटवादाने साक्षरता व शिक्षणाला दिलेल्या प्रोत्साहनामुळे सर्वसामान्यांच्या शिक्षणात आणि साक्षरतेत वाढ झाली. परिणामी कुशल लोकांची संख्याही वाढली.

**७. सर्वसंगपरित्याग –**

प्रोटेस्टंटवादाने लोकांना संपत्ती गोळा करण्याला परवानगी दिली पण तिचा वापर मौजमजेसाठी करण्याला विरोध केला. परिणामी भांडवलाच्या संचयाला चालना मिळाली.

वेबरच्या मतानुसार अशा प्रकारे प्रोटेस्टंटवाद आणि त्यामधील आर्थिक नीतितत्वांनी भांडवलशाहीच्या उदयाला आणि विकासासाठी एक सकारात्मक शक्ती म्हणून सहाय्य केल्याचे दिसून येते. पण याचा अर्थ असा नव्हे की, प्रोटस्टंटवाद आणि त्यातील आर्थिक नीतितत्वे हा भांडवलशाहीच्या उदयामागील एकमेव घटक नसून इतरही अनेक घटकांनी भांडवलशाहीच्या विकासाच्या प्रक्रियेत आपआपले योगदान दिले आहे. वेबरनी भांडवलशाहीच्या उत्क्रांतीचे परिक्षण करून आपल्या विचारांच्या पूष्टयर्थ आपणासमोर इतिहासातील काही तथ्येही मांडली आहेत. त्यांनी हे दाखवून दिले आहे की, प्रोटेस्टंटवादी विचारसरणी सर्वमान्य असलेल्या राष्ट्रांत (उदा. इंग्लंड व अमेरिका.) भांडवलशाहीचा उच्चतम विकास झाला आहे. याऊलट इटली, स्पेन यासारख्या राष्ट्रांना याबाबत फारसे यश लाभलेले नाही कारण या राष्ट्रांत कॅथॉलिक नीतितत्वांचा प्रभाव आहे.

आपल्या प्रोटेस्टंटवाद व भांडवलशाही यांच्यातील संबंधांच्या अभ्यासानंतर मॅक्स वेबरने आपल्या अभ्यासाचे लक्ष जगातील इतर धर्म व भांडवलशाही यांच्यातील संबंधांकडे वळविले. आर्थिक व्यवस्थेवर धर्माचा कसा प्रभाव पडतो हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी हिंदू धर्माचे परिक्षण केले आहे. भारतात भांडवलशाहीचा विकास झाला नाही कारण, हिंदू नीतीतत्वांनी ऐहिक विश्वाला अजिबातच महत्व दिलेले नाही. हिंदूवादानुसार जग हे मायाजाळ आहे. याप्रमाणेच हिंदू धर्मातील जातीव्यवस्था हा ही भांडवलशाहीच्या विकासातील एक मोठा अडथळा आहे. अशा प्रकारे आपणास अर्थव्यवस्थेच्या निश्चितीमधील धर्माचे महत्व स्पष्ट करता येते. चीनमध्येसुध्दा तेथील धार्मिक वातावरणामुळे भांडवलशाहीचा विकास झाला नाही कारण, चीनी धार्मिक पर्यावरणाने भौतिक प्रगतीपेक्षा शांत जीवनालाच महत्वाचे स्थान दिले होते.

### ४.२.३.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २

१. आपल्या धर्माच्या समाजशास्त्राच्या स्पष्टीकरणासाठी मॅक्स वेबरने कोणत्या धर्मांचा अभ्यास केला आहे?

-----------------------------------------

-----------------------------------------

२. मॅक्स वेबरच्या मतानुसार आधुनिक भांडवलशाहीची तीन महत्वाची वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

-----------------------------------------

-----------------------------------------

३. मॅक्स वेबरने बेजांमिन फ्रँकलीन यांनी दिलेल्या सूचनांपैकी निवडलेल्या कोणत्याही तीन सूचना लिहा?

-----------------------------------------

-----------------------------------------

४. वेबरच्या मतानुसार प्रोटेस्टंटवादाने भांडवलशाहीला दिलेली पहिली देणगी कोणती ?

-----------------------------------------

-----------------------------------------

५. कर्जावर व्याजाची आकारणी करण्याला कोणी परवानगी दिली ?

-----------------------------------------

-----------------------------------------

### ४.३.४ वेबरचा अधिकाराचा सिध्दांत : 'सत्ता' आणि 'अधिकार' किंवा सत्तेचे प्रकार

(Weber's Theory of Authority : 'Power' and Authority: Types of Authority)

वेबरने आपल्या 'राजकारणाचे समाजशास्त्र' यामध्ये प्रभुत्व किंवा सत्ता याचे सविस्तर वर्णन केले आहे. वेबरने काही लोक सत्तेवर आपला अधिकार का सांगतात ? आणि त्यांना इतरांकडून आपल्या आज्ञांचे पालन करवून घेण्याचा कायदेशीर अधिकार त्यांना लाभला आहे असे का वाटते ? या बाबीचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्यांनी आदर्श प्रारूपांचा एक परिक्षणात्मक साधन म्हणून वापर केला आहे. या आधारावरच त्यांने सत्तेचे प्रकारही विशद केले आहेत.

विना शासित, शासकाचे आस्तित्वच राहत नाही. जर शासित असतील व ते शासकाच्या आदेशांचे पालन करत असतील तर निश्चितच त्यांच्यात एक प्रकारचे संबंध असतात. वेबरच्या सत्तेच्या संकल्पनेचे अधिक स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न रेनहार्ड बॅण्डिक्स यांनी केला असून त्यांच्या मतानुसार, कोणत्याही प्रकारच्या सत्तेसाठी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक असते –

१. एक व्यक्ती जी शासन करते अगर आदेश देते.

२. एक व्यक्ती अगर एक समूह ज्याला आदेश दिले जातात अगर ज्याच्यावर शासन केले जाते.

३. शासकाची ही ईच्छा असते की, आपण शोसिताच्या सर्व व्यवहारांवर नियंत्रण ठेवावे.

४. शासकाने दिलेल्या आदेशांचे पालन वस्तुनिष्ठरित्या होत आहे. याचे पुरावे मिळणे आवश्यक आहे.

वेबर च्यामते, ''सत्ता अगर अधिकार म्हणजे एखाद्या निश्चित आज्ञेचे पालन केले जाण्याची शक्यता होय.'' अशी शक्यता विविध हेतूंवर आधारीत असते. तसेच एखाद्याच्या अंगी असणाऱ्या दैवी गुणांवरील विश्वास, काही वेळा परंपरा अगर प्रथांमुळे लाभलेली मांन्यता अगर कायद्याने किंवा संयुक्ततेवरील विश्वासाने मिळालेली मांन्यता ही सत्ता अगर अधिकाराची उगमस्थाने आहेत.

वेबरचे 'राजकारणाचे समाजशास्त्र' हे त्याच्या अधिकाराच्या अगर सत्तेच्या परिक्षणावर आधारीत आहे. त्याच्या मताप्रमाणे, सर्व सत्ता ही अंतिमत: ताकदीवर आधारलेली असते. कोणत्याही सामाजिक अगर राजकीय व्यवस्थेसाठी ही सत्ता कायदेशीर आहे अशी मांन्यता मिळावी लागते. वेबरने हे स्पष्ट केले आहे की, समाजातील ही सत्ता तीन मूलभूत मार्गांनी कायदेशीर असल्याचे निश्चित करता येते. हेच सत्तेचे तीन प्रकार आहेत. ज्यांमध्ये परंपराधिष्ठीत, चमत्कृतीजन्य अगर दैवी गुणाधिष्ठित आणि कायदाधिष्ठित अगर संयुक्तिक सत्ता यांचा समावेश होतो. वेबरने या तीन प्रकारच्या सत्ता म्हणजे सत्तेच्या सैध्दांतिक अभ्यासाठी मांडलेली तीन आदर्श प्रारूपेच आहेत यावर भर दिला आहे.

या तीनही सत्ता प्रकारांबाबतचे संकल्पनात्मक स्पष्टीकरण देताना वेबरने हे स्पष्ट केले आहे की, परंपराधिष्ठित सत्ता ही समाजात प्रचलित असलेल्या परंपरांच्या पावित्र्यावरील श्रध्दा आणि त्यांचे पालन करून घेण्यासाठी परंपरेने निर्धारित केलेली व्यक्ती अगर व्यक्ती समूह यांच्या परंपराधिष्ठित न्यायतेवर आधारलेली असते. चमतकृतीजन्य अगर दैवी गुणाधिष्ठित सत्ता ही एखाद्या व्यक्तीला लाभलेल्या असामांन्य आणि अद्वितीय गुणांवर आणि त्यांनी दिलेल्या आज्ञांच्या न्यायतेवर आधारलेली असते. तर कायदाधिष्ठित सत्ता ही वेबरच्या शब्दात जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आलेला आदेश आणि त्या आदेशाद्वारे सूचना देण्यासाठी निश्चित करण्यात आलेली व्यक्ती अगर व्यक्ती समूह यावर आधारित असते.

मॅक्स वेबरने विशद केलेल्या या तीन प्रकारच्या सत्तांचे अधिकार स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

**१. परंपराधिष्ठित सत्ता** (Traditional Authority) –

ही सत्ता सामाजिक आदेशांच्या पवित्रतेवरील श्रध्दा आणि परंपरांनी दिलेला विशेष अधिकार अगर हक्क यावर आधारीत असते. वेबरने कुलपतिसत्तेस या सत्ताप्रकाराचे विशुध्द स्वरूप मानले आहे. यामध्ये विविध स्तरातील लोक सांप्रदायिक संबंधांनी एकत्र आलेले असतात. सत्ता स्थानावर असणारी व्यक्ती जीला लॉर्ड म्हणून संबोधले जाते ती इतरांवर सत्ता गाजवत असते. इतर लोक लॉर्डच्या आज्ञांचे पालन करतात कारण त्याच्या सत्तेला परंपरांनी मांन्यता दिलेली असते. इतकेच नव्हे तर त्याच्या आज्ञांदेखील परंपरांनीच निश्चित केलेल्या असतात. उदा. भारतात ब्राम्हणांना परंपरेने सर्वोच्य सत्ता लाभली होती. याबरोबरच पितृसत्ताक कुटुंबात पित्याला परंपरेनेच सत्ता लाभलेली असते आणि ही सत्ता पित्यानंतर त्याच्या मोठया मुलाकडे हस्तांतरित होत असते. अशा प्रकारे परंपराधिष्ठित सत्ता म्हणजे अशी सत्ता की,

**'जी केवळ परंपरांनी निश्चित केली जाते.'** समाजाचा अशा परंपरांवर विश्वास असतो पण कायद्याने या सत्तेची न्यायता सिध्द करता येत नाही.

२. **चमतकृतीजन्य अगर दैवी गुणाधिष्ठित सत्ता** (Charismatic Authority) –

मॅक्स वेबरने विशद केलेला हा सत्तेचा दुसरा आदर्श प्रकार आहे. चमजकृतीजन्य अगर दैवी गुणाधिष्ठित सत्ता ही पूर्णपणे **वैयक्तिक स्वरूपाची सत्ता** असून नेत्याच्या अलौकिक सामर्थ्यावर अनुयायांचा असलेला विश्वास हा या सत्तेचा मुख्य आधार आहे. अशा सर्वस्वी वैयक्तिक व आत्मनिष्ठ स्वरूपाच्या सत्तेचे अवैयक्तिक रूपांतर होऊन चमतकृतीजन्य अगर दैवी गुणाधिष्ठित सत्ता अस्तित्वात येते. काही व्यक्तिंच्या अंगी असामांन्य, अलौकिक गुण असतात किंवा आध्यात्मिक चमत्कार घडविण्याचे असणारे सामर्थ्य, मन आणि वाणी यांचे विलक्षण सामर्थ्य असते यावर ही सत्ता आधारलेली असते. आपल्याजवळ असलेल्या अशा गुणांचा विकास व्यक्तिकडून अशा प्रकारे केला जातो की, आपोआपच तिच्याकडे इतर व्यक्ती आकर्षित होतात, नम्र होतात व त्या व्यक्तीने दिलेल्या आज्ञांचे पालन करू लागतात. उदा. एखादा धर्मगुरू, युध्दातील नेता, आणि राजकीय नेता ही या सत्ता प्रकाराची विशुध्द रूपे आहेत. या सत्ता प्रकारात आदेश देणारा नेता असतो व इतरांकडून त्याच्या आदेशांचे तंतोतंत पालन केले जाते. परंपरा अगर कायद्याच्या न्यायतत्वामुळे नव्हे तर या नेत्याच्या अंगी असणाऱ्या अलौकिक गुणांमुळेच त्याच्या आज्ञांचे पालन इतरांकडून होत असते. म्हणूनच जोपर्यंत असे अलौकिक गुण त्या व्यक्तींच्या अंगी असतात किंवा जोपर्यंत चमत्कार घडवून आणण्याची त्यांच्याकडे क्षमता आहे असा लोकांचा विश्वास असतो तोपर्यंत लोक त्याच्या आज्ञांचे पालन करत असतात. अशा प्रकारची चमतकृतीजन्य सत्ता लाभलेली अनेक उदाहरणे आपणास समाजात आढळून येतात. उदा. येशू खिस्त, गौतम बुध्द, संत नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, भगवान महावीर, शिवाजी महाराज आणि महात्मा गांधी यांच्या चमत्कृतीजन्य सत्तेला त्या काळातील लोकांनी मांन्यता दिली होती. सध्याच्या काळातही सत्य साईबाबा, आचार्य रजनीश, आसारामबापू, पांडूरंगशास्त्री आठवले इतकेच नव्हे तर बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या अनुयायांनी त्यांच्या चमत्कृतीजन्य सत्तेला मांन्यता दिल्याचे आढळून येते. सारांश, चमत्कृतीजन्य सत्ता ही व्यक्तीच्या अंगी असलेल्या अलौकिक व असामांन्य गुणांवर आधारलेली असते व जोपर्यंत त्यांच्या अंगी या शक्ती आहेत असा त्यांच्या अनुयायांचा विश्वास असतो तोपर्यंत ते अशा नेत्यांच्या आज्ञांचे पालन करत असतात.

३. **कायदाधिष्ठित किंवा वैधानिक सत्ता** (Legal Authority) –

सत्तेचा हा तिसरा प्रकार असून या सत्तेला असलेल्या **कायदेशीर मान्यतेवर तो आधारित** असतो. नोकरशाहीकडून या सत्ताप्रकाराच्या विशुध्द स्वरूपाचे प्रतिनिधित्व केले जाते. यामधील मूळ कल्पना अशी आहे की, औपचारिक पध्दतींचा वापर करून कायदे निर्माण केले जातात अगर बदलले जातात. अशास्वरूपाचे कायदे करणारे कार्यकारी मंडळ हे एकतर लोकांकडून निवडले जाते अगर नियुक्त केले जाते आणि त्यांना संयुक्तिक संघटन म्हंटले जाते. अशा संघटनांमध्ये आढळणारी आज्ञाधारकता ही कोणत्याही एखाद्या व्यक्तीमुळे निर्माण होत नसते तर लागू करण्यात आलेल्या कायदा आणि नियमांमुळे निर्माण झालेली असते. अशा प्रकारच्या आदेशांमध्ये हे निश्चित केलेले असते की, कोणी, कोणाच्या व कोणत्या आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे. सत्तास्थानावर असलेल्या व्यक्तीला देखील एखादा आदेश देताना

नियमांचे पालन करावे लागते. असे नियम आणि कायदे अमूर्त नियमांच्या स्वरूपात असतात. या सत्ताप्रकाराचे स्पष्टीकरण करताना वेबर पुढे हे स्पष्ट करतात की, अशा ठिकाणी नियुक्त करण्यात आलेला अधिकारी हा त्याच्या क्षेत्रातील प्रशिक्षीत तज्ञ असतो. त्याला त्याच्या श्रेणीतील स्थानानुसार निश्चित पगार दिला जातो. प्रशासनात कार्यरत असलेल्या विविध **अधिकारी व्यक्ती** ही या सत्ताप्रकाराची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

मॅक्स वेबरच्या सत्तेच्या प्रकारांवरील दृष्टीकोणाचे स्पष्टीकरण करताना लेव्हिस ए.कोझर यांनी त्यांच्या 'मास्टर्स ऑफ सोशिऑलॉजिकल थॉट' या पुस्तकात असे मत मांडले आहे की, वेबरने सत्तेच्या विशुध्द प्रकारांचे स्पष्टीकरण केले आहे. पण त्याला याची जाणीव होती की, प्रत्यक्षात सत्तेच्या न्यायतेबाबत बऱ्याच वेळा संमिश्रता आढळून येते. जरी हिटलरला लाभलेली सत्ता ही त्याच्या अंगी असलेल्या अलौकिक गुणांमुळे लाभल्यासारखे वाटत असली तरी त्याला जर्मन कायद्यातील काही घटकांचे आणि जर्मनीतील लोक परंपरांचे पाठबळही लाभले होते.

**४.२.४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –**

१. मॅक्स वेबरने स्पष्ट केलेल्या आदर्श सत्ता प्रकारांची नावे लिहा.

-------------------------------------------

-------------------------------------------

२. पारंपारिक सत्ता संकल्पनेचा वेबरने दिलेला अर्थ लिहा.

-------------------------------------------

-------------------------------------------

३. मॅक्स वेबरने विशद केलेल्या चमत्कृतीजन्य सत्ताप्रकाराच्या विशुध्द स्वरूपाची उदाहरणे लिहा.

-------------------------------------------

-------------------------------------------

४. कायदाधिष्ठित सत्ताप्रकाराचे विशुध्द स्वरूपातील प्रातिनिधीक उदाहरण कोणते ते लिहा.

-------------------------------------------

-------------------------------------------

## ४.३ पारिभाषिक शब्दांचा अर्थ : (GLOSSARY)

- **सामाजिक क्रिया :** व्यक्तिकडून केली जाणारी अशी क्रिया सामाजिक क्रिया समजावी की, जेंव्हा तिच्याशी प्रतिकात्मक किंवा अर्थपूर्ण संबंध आलेला असतो आणि तिच्यावर इतरांचा परिणाम होऊन त्यानुसार तिचे स्वरूप बदलत जाते.
- **बुध्दीप्रामाण्यवादी क्रिया :** बुध्दीप्रामाण्यवादी क्रिया म्हणजे अशी क्रिया की, जेव्हा व्यक्ती जाणीवपूर्वक आपली उपलब्ध साधने आणि साध्ये यांच्यात योजनापूर्वकरित्या समायोजन प्रस्थापित करून क्रिया करते.

- **मूल्याभिमुख क्रिया :** मूल्याभिमुख सामाजिक क्रिया म्हणजे अशा क्रिया की, ज्यांमध्ये व्यक्तीच्या सौंदर्यात्मक, धार्मिक किंवा नैतिक वर्तणुकीचा समावेश होतो आणि जे वर्तन समाजाने कोणत्याही संयुक्तिक कारणाविना स्विकारलेले असते.
- **संवेगात्मक क्रिया :** संवेगात्मक क्रिया म्हणजे आपले भावनाप्रधान वर्तन होय.
- **परंपरावादी क्रिया :** परंपरावादी क्रिया म्हणजे सामाजिक प्रथांवर आधारित क्रिया होय.
- **सत्ता :** सत्ता अगर अधिकार म्हणजे एखाद्या निश्चित आज्ञेचे पालन केले जाण्याची शक्यता होय.
- **पारंपारिक सत्ता :** जी सत्ता परंपरेने दिली जाते तिला पारंपारिक सत्ता म्हणतात.
- **चमत्कृतीजन्य सत्ता :** एखाद्या व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या अलौकिक गुणांमुळे समाजसदस्यांकडून त्यांना बहाल केली जाणारी सत्ता म्हणजे चमत्कृतीजन्य सत्ता होय.
- **कायदाधिष्ठित सत्ता :** कायदा अगर नियम यांच्या आधारे एखाद्या व्यक्तीला जाणीवपूर्वक देण्यात आलेली सत्ता म्हणजे कायदाधिष्ठित सत्ता होय.

## ४.४ सारांश (LET US SUM UP) : -

या युनिटमध्ये आपण मॅक्स वेबरच्या समाजशास्त्रातील योगदानाचा त्याच्या विविध सिध्दांताच्या आणि विचारांच्या सहाय्याने आढावा घेतला असून त्यावरून त्याने समाजशास्त्रीय विचारांच्या इतिहासात मानाचे स्थान पटकावल्याचे स्पष्ट होते. मॅक्स वेबरच्या मताप्रमाणे समाजशास्त्र हे असे एक शास्त्र आहे की, ज्यात सामाजिक क्रियेच्या अर्थासंबंधी जाणीव निर्माण केली जाते की, ज्यामुळे सामाजिक क्रियेचा अभ्यास आणि परिणाम यासंबंधात कायिक स्पष्टीकरण देणे शक्य होते. समाजशास्त्राची अशा शब्दांत व्याख्या केल्यानंतर वेबरने सामाजिक क्रियांची व्याख्या करून त्यांचे चार प्रकारात वर्गीकरण केले आहे ते चार प्रकार म्हणजे  बुध्दीप्रामांण्यवादी क्रिया, मूल्याभिमुख क्रिया, संवेगात्मक क्रिया व परंपरावादी क्रिया होत.

मॅक्स वेबरचे ज्ञानाच्या समाजशास्त्रातील सर्वात मौल्यवान योगदान म्हणजे त्याचे धर्माच्या समाजशास्त्राबाबतचे विचार हे होय. धर्माच्या समाजशास्त्राविषयीचे विचार मांडण्यासाठी त्याने जगातील १) कन्फ्युसियानिझम, २) हिंदू, ३) बौध्द, ४) इस्लाम, ५) खिश्चन आणि ६) ज्यू या सहा धर्मांचा अभ्यास केला. आधुनिक भांडवलशाहीच्या विकासातील प्रोटेस्टंटवादाच्या भूमिकेचे परिक्षण करत असताना त्याने आधुनिक  भांडवलशाहीच्या आदर्श प्रारूपाची निर्मिती केली आणि ज्यांनी आधुनिक  भांडवलशाहीच्या विकासासाठी योग्य पार्श्वभूमी तयार केली अशा प्रोटेस्टंटवादातील आर्थिक तत्वांची मांडणी केली. याविषयीच्या आपल्या विवेचनात त्याने प्रोटेस्टंवादाकडून आधुनिक  भांडवलशाहीला मिळालेल्या सात देणग्या स्पष्ट केल्या आणि या आधारावरच '**प्रोटेस्टंटवाद हाच भांडवलशाहीचा आत्मा आहे.**' असे मत मांडले.

मॅक्स वेबरच्या मतानुसार, सत्ता म्हणजे एखाद्या आदेशाचे निश्चितपणे पालन केले जाण्याची शक्यता होय. अशी आज्ञापालनता अनेक हेतूंवर आधारलेली असते. अशा प्रकारे सत्ता या संकल्पनेची व्याख्या

केल्यानंतर वेबरने सत्तेचे १) पारंपारिक सत्ता, २) चमत्कृतीजन्य सत्ता आणि ३) कायदाधिष्ठित सत्ता या तीन प्रकारांचे सविस्तर वर्णन केले आहे. वेबरने विशद केलेले हे सत्तेचे प्रकार विशुध्द स्वरूपातील असून प्रत्यक्षात समाजात सत्तेच्या न्यायतेला एकाच वेळी एकापेक्षा अधिक घटकांचे पाठबळ लाभल्याचे दिसून येते. वेबरलाही याची पूर्ण जाणीव होती.

## ४.५ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे : (ANSWERS TO CHECKYOUR PROGRESS)

**४.२.१.१**

१. मॅक्स वेबर यांनी सामाजिक पध्दतीशास्त्राविषयीचे आपले विचार 'द मेथॉडॉलॉजी ऑफ सोशल सायन्सेस' ग्रंथात मांडले आहेत.

२. मॅक्स वेबरनी विशद केलेले सामाजिक आकलनाचे संयुक्तिक आकलन व अंतर्ज्ञानी आकलन हे दोन प्रकार विशद केले आहेत.

३. वेबर यांच्या मते, संयुक्तिक आकलन म्हणजे अशा प्रकारचे आकलन की, जेंव्हा मानवी क्रिया मालिकेमागील क्रियाशील उद्देशांचा अर्थ आपल्याला स्पष्टपणे समजेल.

४. अंतर्ज्ञानी आकलन याचा अर्थ असा होतो की, जेंव्हा एखादी व्यक्ती एखादी क्रिया करते तेंव्हा त्यातील भावनात्मक संदर्भ आपल्या लक्षात येतो व सहानुभूतीच्या सहाय्याने आपण त्या विशिष्ट भावनेशी असणारा आपला सहभाग प्रकट करतो.

५. मॅक्स वेबरच्या मतानुसार आदर्श प्रारूप ही संशोधकाच्या दृष्टीने कोणत्याही साकार घटनेतील समानता किंवा भिन्नता मोजण्याचे साधन होय.

६. आदर्श प्रारूपाची मॅक्स वेबरने सांगितलेली वैशिष्टये १) आदर्श प्रारूपात जी वैशिष्टये संमिलत केली आहेत ती सामाजिक वास्तवात असायलाच पाहिजेत असे नाही. २) आदर्श प्रारूप हा एक तार्किक आराखडा असतो. ३) आदर्श प्रारूपचा नैतिक आदर्शांशी सबंध असत नाही. ४) आदर्श प्रारूपे ही मूल्ये नसतात ५) आदर्श प्रारूप अभ्युपगमात्मक असतात. ६) आदर्श प्रारूपे ही सत्य अगर असत्यही असत नाहीत. ७) आदर्श प्रारूपे समाजातील वास्तविकतेशी जोडलेली असतात. ८) एकाच सामाजिक वास्तवाचा अभ्यास करण्यासाठी अनेक आदर्श प्रारूपांची निर्मिती करावी लागते. ९) आदर्श प्रारूपे सामाजिक वास्तवाच्या निकट पोहचणारी असतात. १०) आदर्श प्रारूपाची भूमिका सुगम्यता (Intelligibility) वाढविणे ही असते. ११) आदर्श प्रारूप हे प्रघटनेच्या स्पष्ट अभिव्यक्तीचे साधन आहे.

७. आदर्श प्रारूपाचे मॅक्स वेबरने सांगितलेले प्रकार १) ऐतिहासिक तपशिलाची आदर्श प्रारूपे २) सामाजिक वास्तवतेचे अमूर्त घटक स्पष्ट करणारी आदर्श प्रारूपे ३) विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची संयुक्तिक पुनर्रचना करणारी आदर्श प्रारूपे हे आहेत.

८. मॅक्स वेबरने मांडलेल्या आदर्श प्रारूपामध्ये आधुनिक भांडवलशाही, प्रोटेस्टंट नैतिकता, अधिकारी तंत्र, चर्च, धार्मिक संप्रदाय, इसाई संप्रदाय यांचा समावेश करता येतो.

४.२.२.२

१. वेबर यांच्या मते, व्यक्ति किंवा व्यक्तिसमूहाकडून केली जाणारी क्रिया अशाच वेळी सामाजिक क्रिया समजावी की, जेंव्हा तिच्याशी प्रतिकात्मक किंवा अर्थपूर्ण संबंध आलेला असतो आणि तिच्यावर इतरांचा परिणाम होऊन त्यानुसार तिचे स्वरूप बदलत जाते.

२. सामाजिक क्रियेची मॅक्स वेबरने सांगितलेली वैशिष्टये – १) सामाजिक क्रिया या अन्य व्यक्तीच्या भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळातील क्रियांशी संबंधीत असतात, २) सामाजिक क्रियामध्ये मानवी संपर्काबरोबरच विचारांची व शब्दांची देवाण घेवाण होणे आवश्यक आहे. आणि ३) अनेक व्यक्तीकडून केली जाणारी एकसारखी क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे.

३. मॅक्स वेबर यांच्या मतानुसार, मानवी क्रियेला बुध्दीप्रामाण्यवादी क्रिया ही संज्ञा अशावेळीच आपणास देता येते की, जेव्हा व्यक्ती जाणीवपूर्वक आपली उपलब्ध साधने आणि साध्ये यांच्यात योजनापूर्वकरित्या समायोजन प्रस्थापित करून क्रिया करते.

४. मूल्याभिमुख सामाजिक क्रिया म्हणजे अशा क्रिया की, ज्यांमध्ये व्यक्तीच्या सौंदर्यात्मक, धार्मिक किंवा नैतिक वर्तणुकीचा समावेश होतो की, जे वर्तन समाजाने कोणत्याही संयुक्तिक कारणाविना स्विकारलेले असते.

५. महाराष्ट्रातील गणेशोत्सव अगर महिलांकडून केला जाणारा वटसावित्री पार्णिमा उपवास ही परंपरागत क्रियेची उदाहरणे आहेत.

४.२.३.३

१. धर्माच्या समाजशात्राविषयीचे विचार मांडण्यासाठी मॅक्स वेबर यांनी जगातील १) कन्फ्युसियानिझम, २) हिंदू, ३) बौध्द, ४) इस्लाम, ५) खिश्चन आणि ६) ज्यू या सहा धर्मांचा अभ्यास केला.

२. आधुनिक भांडवलशाहीची तीन प्रमुख वैशिष्टये म्हणजे १) उद्योग, २) व्यवसाय आणि ३) व्यापार होय.

३. बेंजामिन फ्रँकलीन यांनी तरूण उद्योजकांना दिलेल्या आणि मॅक्स वेबरने आर्थिक नीतितत्वे म्हणून स्विकारलेल्या सूचनांपैकी खालीलपैकी कोणत्याही तीन सूचना सांगता येतील १) वेळ हेच धन अगर संपत्ती आहे. २) धनाद्वारेच धनाची वृध्दी होते. ३) एक पैसा वाचवणे म्हणजे एक पैसा मिळविणे होय. ४) प्रामाणिकपणा हे उत्तम व्यवहार चातुर्याचे लक्षण आहे. ५) कोणत्याही व्यवसायासाठी काळजीपूर्वक हिशेब ठेवणे आवश्यक आहे. ६) कोणत्याही क्षेत्रातील व्यवसायात यश मिळविण्यासाठी व्यवस्थित आचरण, प्रामाणिकपणा, परिश्रम, कार्यकुशलता, सतर्कता, खरेपणा, एकनिष्ठा ही आवश्यक तत्वे आहेत. ७) लवकर झोपून लवकर उठण्याच्या सवयीमुळे माणूस आरोग्यसंपन्न, धनवान आणि हुशार बनतो.

४. मॅक्स वेबर यांच्यामते, प्रोटेस्टंटवादाने आधुनिक भांडवलशाहीला दिलेली पहिली देणगी म्हणजे ‘काम हाच सदगुण होय.’

५. दिलेल्या कर्जावर व्याज घेण्याला कॅल्व्हीनने परवानगी दिली होती.

४.२.४.४

१. मॅक्स वेबरने सत्तेच्या आदर्श प्रकारांचे १) परंपराधिष्ठित सत्ता, २) दैवीगुणाधिष्ठित सत्ता व ३) कायदाधिष्ठित सत्ता हे तीन प्रकार सांगितले आहेत.

२. परंपराधिष्ठित सत्तेचा संकल्पनात्मक अर्थ परंपराधिष्ठित सत्ता ही समाजात प्रचलित असलेल्या परंपरांच्या पावित्र्यावरील श्रध्दा आणि त्यांचे पालन करून घेण्यासाठी परंपरेने निर्धारित केलेली व्यक्ती अगर व्यक्ती समूह यांच्या परंपराधिष्ठित न्यायतेवर आधारलेली असते. असा आहे.

३. मॅक्स वेबरने एखादा धर्मगुरू, युध्दातील नेता, आणि राजकीय नेता ही दैवीगुणाधिष्ठित सत्ता प्रकाराची विशुध्द रूपे आहेत असे म्हंटले आहे.

४. कायदाधिष्ठित सत्ताप्रकारचे विशुध्द रूप म्हणजे नोकरशाही होय.

## ४.६ सरावासाठी प्रश्न (EXERCISE/ HOME ASSIGNMENT) : -

१. सध्याच्या ‘भारतातील औद्योगिकरणाच्या प्रक्रियेतील हिंदू धर्माची भूमिका’ यावर एक टिपण तयार करा.

२. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील दैवीगुणाधिष्ठित सत्ता लाभलेल्या नेतृत्वावर निबंध लिहा.

## ४.७ चिंतन आणि कार्य (REFLECTION AND ACTION) : -

१. तुमच्या जवळ असलेल्या औद्योगिक वसाहतीतील एखाद्या आधुनिक उद्योगाला भेट देऊन त्यातील नोकरशाही यंत्रणेची वैशिष्टये समजून घ्या.

२. तुम्ही तुमच्या अवतीभोवती राहणाऱ्या एखाद्या दैविगुणाधिष्ठित नेतृत्वाला जाणता का? जाणत असाल तर त्याची वैशिष्टये विशद करा.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके (SUGGESTED READINGS) :


1. Coser, Lewis A.: *Masters of Sociological Thought Ideas in Historical and Social Context*, Rawat Publications, Jaipur, 1996
2. Abraham M. Francis: *Modern Sociological Theory, An Introduction,* Oxford University Press, 1999.
3. Sharma R.N. and Sharma R.K.: *History of Social Thought,* Media Promoters and Publishers PVT. Ltd, Bombay, 2003
4. Singh K.: *History of social Thought,*
5. Rao C.N. Shankar: *Sociology Primary Principles,* S. Chand & Company Ltd. New Delhi, 2000.
6. Mukerjee R.N. and Ghoshal Arunansu: *Social Thought From Comte to Mukerjee',* Vivek Publication, Delhi .

७. वैद्य नी.स. - समाजशास्त्रीय विचार परंपरा, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निमिती मंडळ, नागपूर, १९८१

८. कुलकर्णी पी.के. - सामाजिक विचार प्रवाह, मंगेश प्रकाशन, १९८९

९. कुलकर्णी पी. के. - प्रगत समाजशास्त्रीय सिध्दांत, मंगेश प्रकाशन, १९९७

१०. मोहिते एस. एल. व साळुंखे पी.एस. - समाजशास्त्रीय विचारवंत, फडके प्रकाशन, २००९.


❒ ❒ ❒

## सत्र – २ : घटक – १

# विल्फ्रेडो पॅरेटो (१८४८–१९२३)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२. विषय–विवेचन

१.२.१ विल्फ्रेडो पॅरेटोची बौद्धिक पार्श्वभूमी : पॅरेटोची समाजविषयक संकल्पना आणि समाजशास्त्रासंबंधीचे विचार

१.२.१.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

१.२.२ तार्किक व अतार्किक क्रिया

१.२.२.२ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

१.२.३ अवशिष्ट आणि भ्रम किंवा युक्तीवाद यासंबंधीचे पॅरेटोचे विचार

१.२.३.३ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

१.२.४ श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांत

१.२.४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.३ सारांश (पॅरेटोच्या प्रमुख समाजशास्त्रीय विचारांचे मूल्यमापन)

१.४ पारिभाषिक संज्ञा

१.५. स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६. सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे :

एम. ए. भाग–१ समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांचा ''अभिजात समाजशास्त्रीय परंपरा'' (Classical Sociological Traditions) हा सक्तीचा पेपर असून यामध्ये आपणास सत्र क्र. २ साठी घटक क्र. १ मध्ये विल्फ्रेडो पॅरेटो या इटालियन समाजशास्त्रज्ञाच्या विविध महत्त्वपूर्ण विचारांचा सविस्तर अभ्यास करावयाचा आहे.

विल्फ्रेडो पॅरेटो या विचारवंताचे सत्र क्र. २ साठी आपणास खालील विचार अभ्यासावयाचे आहेत. उदा. अ) पॅरेटोची समाजविषयक संकल्पना आणि त्याचे समाजशास्त्रासंबंधीचे विचार ब) पॅरेटोची तार्किक व

अतार्किक क्रियेसंबंधीची संकल्पना अथवा तर्कसंगत आणि तर्कविसंगत मानवी कृती क) अवशिष्ट आणि भ्रम किंवा युक्तीवाद यासंबंधीचे पॅरेटोचे विचार आणि त्याचा ड) श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांत इत्यादीवर विस्तृतपणे विवेचन करावयाचे आहे.

## १.१ प्रास्ताविक :

विल्फ्रेडो पॅरेटो हा समाजशास्त्रज्ञ तर होताच परंतु समाजशास्त्रज्ञ होण्यापूर्वी तो अर्थशास्त्रज्ञ म्हणून देखील नावारूपाला आलेला होता. त्यामुळे अर्थशास्त्रज्ञांच्या रांगेमध्ये देखील त्याने मानाची जागा पटकावलेली होती. पॅरेटोने निर्माण केलेले एकूण शास्त्रीय वांगमय अतिशय काटेकोर, अभिजात आणि ज्ञानाच्या नव्या प्रांतामध्ये प्रवेश करणारे म्हणून ओळखण्यात आले. साहजिकच त्याच्या लेखनाचा परिणाम इटालियन आणि फ्रेंच सामाजिक विचारावर झालेला दिसून येतो. अर्थातच त्याच्या लिखाणातून फॅसिझमची तात्त्विक बैठक तयार झाली, त्यामुळेच विल्फ्रेडो पॅरेटोकडे '**फॅसिझमचा पाठीराखा**' म्हणून पाहिले जाते.

पॅरेटोने जे विविध समाजशास्त्रीय विचार मांडले त्यामध्ये त्याच्या खालील विचारांचा सखोल मागोवा या घटक क्रमांक १ मध्ये घ्यावयाचा आहे. उदा. पॅरेटोची समाजविषयक संकल्पना आणि त्याचे समाजशास्त्रासंबंधीचे विचार, पॅरेटोची तार्किक किंवा तर्कसंगत आणि अतार्किक किंवा तर्कविसंगत क्रियेची संकल्पना, पॅरेटोचा अवशिष्ट आणि भ्रम किंवा युक्तीवाद सिद्धांत तसेच त्याचा श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांत याबद्दलचा आढावा घेण्याचा प्रयत्न या घटकामध्ये करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

विल्फ्रेडो पॅरेटोपूर्वी जे जे शास्त्रज्ञ होऊन गेले त्या सर्वांची अध्ययन पद्धत वैज्ञानिक स्वरूपाची नव्हती, तर ते सर्वजण केवळ तात्त्विक विचारवंत म्हणून ओळखण्यात आले होते. ही उणीव भरून काढण्यासाठी पॅरेटोने यथार्थ व पूर्णतः वैज्ञानिक पद्धतीचे प्रतिपादन केले. त्याने आपल्या समाजशास्त्राला तार्किक-प्रयोगात्मक विज्ञान (Logico-Experimental Science) असे नाव दिले. त्यामुळे अनेकानी समाजशास्त्रामध्ये पॅरेटोचे नाव वरच्या क्रमांकावर घेतले.

पॅरेटोचे वैज्ञानिक समाजशास्त्र हे अनुभवांच्या आधारावर सामाजिक घटनांचा अभ्यास करते, घटनांचा शोध घेते, निरीक्षण करते आणि घटनांच्यामधील समानतेच्या आधारावर समाजशास्त्रीय नियमांचे प्रतिपादन करते. त्याच्या मते, विज्ञानाप्रमाणेच समाजशास्त्रात देखील परिणामांची चर्चा न करता तार्किक-प्रयोगात्मक पद्धतीचा अवलंब केला पाहिजे, अशा अभ्यासाने सत्याची पातळी गाठता येऊ शकते.

### १.२.१ विफ्रेडो पॅरेटोची बौद्धिक पार्श्वभूमी आणि त्याची 'समाज' संकल्पना व समाजशास्त्रासंबंधीची मते (Intellectual Background by Vilfredo Parato and his conception of society and sociology)

पॅरेटोची वैचारिक पार्श्वभूमी खालीलप्रमाणे निदर्शनास येते. इटालियन समाजशास्त्रज्ञ विल्फ्रेडो पॅरेटोचा जन्म १५ जुलै १८४८ मध्ये फ्रान्स येथील पॅरीस याठिकाणी झाला. वडील इटालियन तर आई फ्रेंच होती. तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे त्याचे वडील फ्रान्समध्ये स्थलांतरीत झाले. परिस्थिती बदलताच ते इटलीत परतले आणि फ्रान्समध्ये राहू लागले.

विल्फ्रेडो पॅरेटोचे प्राथमिक शिक्षण फ्रान्समध्ये तर पुढील शिक्षण इटलीत झाले. गणित व भौतिकशास्त्र हे त्याचे आवडते विषय होते. त्यामुळे तो इंजिनियरिंगचा व्यवसाय करू लागला. पॅरेटो हा मुक्त व्यापाराचा

पुरस्कर्ता होता तसेच तो उदारमतवादी प्रवृत्तीचा असल्याने त्याच्यावर सरकारचा रोष झाला. परिणामतः सरकारने पॅरेटोच्या भाषणावर आणि लेखनावर बंदी घातली.

वडीलांच्या निधनानंतर पॅरेटोने आपली नोकरी सोडून मजुरांचे वेतन, सरकारचे अधिकार, मुक्त व्यापार या आपल्या आवडत्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केले. १८९७ पासून विल्फ्रेडो पॅरेटो समाजशास्त्र विषयाचा प्राध्यापक बनला. त्याच्या मते, सर्व सामाजिक घटना ह्या परस्पर संबंधित असून प्रत्येक घटनेचा अभ्यास तिच्या मुळाशी असलेल्या अनेक कारणांचा विचार करूनच करावा लागतो.

विल्फ्रेडो पॅरेटो हा फॅसिझमचा पुरस्कर्ता असल्याने त्याच्या विचारावर पुढील अनेक विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव पडला. उदा. चार्लस् डार्विन आणि हर्बर्ट स्पेन्सरचा सामाजिक उत्क्रांतीवादी विचार, मायकेव्हॅलीचा ''बळी तो कान पिळी'' अथवा अल्पसंख्यांक बहुसंख्यांकावर अधिकार गाजवितात. यातूनच पॅरेटोचा श्रेष्ठीजन सिद्धांत जन्माला आला. तसेच पॅरेटोच्या विचारांवर कार्ल मार्क्सचा वर्ग संघर्ष सिद्धांत, ऑगस्ट कॉम्तचा विज्ञानवादी विचार, हर्बर्ट स्पेन्सरची विभिन्नत्वाची कल्पना यासारखे विचार खूप परिणामकारक ठरले. पॅरेटोच्या मते, समाजशास्त्र हे प्रत्यक्षानुसारी विज्ञान (Positive Science) व्हावयास पाहिजे तसेच हे शास्त्र तार्किक व प्रयोगात्मक तत्वावर आधारित असले पाहिजे अशी महत्त्वपूर्ण भूमिका पॅरेटोने स्वीकारली. परिणामतः त्याच्या सर्व सिद्धांतामध्ये वरील विचारांचा अनुभव आपणास सतत येत राहतो.

❊ **पॅरेटोची समाजविषयक संकल्पना** (Conception of Society by Vilfredo Parato)

पॅरेटोने जे अनेक महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय विचार मांडले त्यामध्ये त्याच्या 'समाज' विषयक संकल्पनेचा खालीलप्रमाणे आढावा घेता येईल.

अनेक समाजशास्त्रज्ञानी 'समाज' म्हणजे काय? यासंदर्भात विविध मते मांडली आहेत. उदा. ऑगस्त कॉम्तच्या मते, समाजाचा जन्म हा कुटुंबाच्या विकासातूनच झाला. स्पेन्सरच्या मते, समाज म्हणजे एक सावयवी अशी व्यवस्था असून स्पेन्सरने समाजाला शरीरधारी प्राणी मानले. चार्लस् कुलेने समाज ही एक मानसिक 'स्व'नी गुंफली गेलेली व्यवस्था असून प्रत्येक व्यक्ती अशा समाजात दुसऱ्याच्या मनाविषयी कल्पना करते अथवा आरशामध्ये स्वतःचे रूप इतरांच्या मनाप्रमाणेच पाहत असते.

पॅरेटोने मात्र आपली 'समाज'विषयक संकल्पना वरील विचारवंतांच्या विचारापेक्षा खालीलप्रमाणे वेगळी अशी मांडली. पॅरेटोच्या मते, ''समाज ही एक व्यवस्था असून (Social System) कोणताही सामाजिक समूह हा समाजव्यवस्थेच्या स्वरूपात अस्तित्वात येतो, तसेच मानव समूहात समाजामुळेच सामाजिक संतुलन निर्माण होत जाते. तसेच समाजाच्या संघटनात्मक आणि विघटनात्मक प्रक्रियेमुळे ते टिकून राहते. या दोन्ही प्रक्रियांचे बल समान राहिले म्हणजेच या दोन्ही शक्ती तुल्यबळ असतील तरच समाजाचे अस्तित्व टिकून राहते. त्यालाच सामाजिक संतुलन (Social equilibrium) असे म्हणतात. अशा सामाजिक संतुलनाच्या स्वरूपातच खऱ्या समाजाचे स्वरूप समजणे शक्य आहे. या पार्श्वभूमीवरच विल्फ्रेडो पॅरेटोने समाज ही एक समतोल व्यवस्था आहे असे वेगळे आणि महत्त्वपूर्ण मत मांडले.''

अशाप्रकारे पॅरेटोने अनेक समाजशास्त्रज्ञांच्या मतांचा विचार करून त्यातील उणीवा दाखविल्या. ऑगस्ट कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर आणि चार्लस कूले यापैकी कोणाच्याही मताला पॅरेटो मान्यता देत नाही. उलट पॅरेटोने समाजाची रचना आणि कार्ये हीच समाजात संतुलन निर्माण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका वटवतात. त्यामुळे समाजाचे अस्तित्व टिकून राहणे शक्य होते असे मत मांडले.

**पॅरेटोचे 'समाजशास्त्रा'संबंधीचे विचार** (Pareto's views on Sociology)

विल्फ्रेडो पॅरेटोची वैचारिक पार्श्वभूमी अभ्यासताना त्याच्या लेखनाचा परिणाम इटालियन आणि फ्रेंच सामाजिक विचारांवर कसा झाला? तसेच फॅसिझमचा पाठीराखा म्हणून पॅरेटोचे नाव संपूर्ण जगभर कसे गाजले ? याचीही प्रचिती येते. पॅरेटोच्या वैचारिक पार्श्वभूमीचा आढावा घेत असताना त्याची 'समाज'विषयक संकल्पना अभ्यासणे जसे महत्त्वपूर्ण आहे त्याहीपेक्षा पॅरेटोची समाजशास्त्राची संकल्पना अथवा पॅरोटोचे 'समाजशास्त्रा'संबंधीचे विचार अभ्यासल्यानंतर पॅरेटोच्या अफाट व्यक्तीमत्त्वाची कल्पना येते.

पॅरेटोने आपल्या "Treatise on general Sociology" या ग्रंथामध्ये समाजशास्त्रासंबंधीचे विचार मांडले, पुढे याच ग्रंथाचे नाव "Mind and Society" (मन आणि समाज) असे ठेवण्यात आले. पॅरेटोच्या एकूण चिंतनाचे सार तसेच समाजशास्त्रासंबंधीचे विचार याच ग्रंथात विस्तारपूर्वक पहावयास मिळतात. या ग्रंथामधील सर्वात प्रथम संकल्पना ''समाजशास्त्र व त्याचे स्वरूप' ही मानली जाते.

पॅरेटोने आपल्या ''समाजशास्त्रा'' संबंधीच्या विचाराचा सविस्तर मागोवा खालीलप्रमाणे घेतला आहे. समाजशास्त्राच्या स्वरूपाविषयी त्याच्या काळातील आणि त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या विचारवंतांच्यापेक्षा पॅरेटोने वेगळे विचार मांडले आहेत. त्याच्या मते, पूर्वीच्या विचारवंतानी समाजशास्त्राविषयी मांडलेले विचार हे बरेचसे काल्पनिक अथवा तात्त्विक स्वरूपाचे आहेत त्यापैकी कोणीही सामाजिक घटनांचा विचार वैज्ञानिकपद्धतीने केलेला नाही. पॅरेटोने मात्र वैज्ञानिक दृष्टीकोनातून सामाजिक घटनांचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला. त्याने समाजशास्त्राला विज्ञानाचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. इतर शास्त्राप्रमाणे समाजशास्त्रात निरीक्षण आणि प्रयोगपद्धतीचा वापर करता येतो असे पॅरेटोचे मत होते. त्यामुळेच पॅरेटोने समाजशास्त्राचा उल्लेख ''तार्किक प्रयोगात्मक विज्ञान'' (Logico-Experimental Science) असा केला आहे.

पॅरेटोच्या मते, समाजशास्त्राचा मुख्य उद्देश हा निरीक्षण आणि प्रयोग याच्या आधारे विविध घटनांच्या मधील साम्य शोधणे आणि त्याद्वारे काही सामान्य स्वरूपाचे नियम मांडणे हा असतो. त्याच्या मते, ''समाजशास्त्राची उभारणी ही तथ्यांच्या अभ्यासावर आणि निरीक्षणावर आधारित झालेली असल्यामुळे समाजशास्त्रात कल्पना किंवा भावनांवर आधारित निष्कर्षांना स्थान नसते. सामाजिक परिस्थितीत जसे बदल होतील अथवा जशी नवीन तथ्ये अस्तित्वात येतील तसतशी पूर्वीच्या निष्कर्षामध्ये सुधारणा केली जाईल अथवा बदल केले जातील.''

**समाजशास्त्राची वैशिष्ट्ये :**

विल्फ्रेडो पॅरेटोच्या मते, समाजशास्त्र हे एक विज्ञान असल्याने इतर विज्ञानाप्रमाणे समाजशास्त्राची खालील अनेक वैशिष्ट्ये निदर्शनास येतात.

उदा. १) समाजशास्त्रामध्ये प्रत्येक निष्कर्ष हा वास्तवतेवर आधारित असतो. त्यात कोणतीही गोष्ट गृहीत धरली जात नाही. उदा. गरीबी किंवा दारिद्र्य आणि गुन्हेगारीची प्रवृत्ती.

२) समाजशास्त्रात 'काय आहे'? याचा अभ्यास केला जातो. 'काय असावे'? याचा अभ्यास केला जात नाही. उदा. भारतातील रूढीपरंपरांचा पगडा आणि वाढते जननप्रमाण.

३) समाजशास्त्राचा प्रमुख हेतू हा विविध सामाजिक घटनांचा अभ्यास करून त्या घटनांच्यामधील कार्यकारण संबंध स्पष्ट करणे हा आहे. सामाजिक नियोजन करणे हा समाजशास्त्राचा हेतू नसतो. उदा. वाढते औद्योगीकरण आणि हवेचे प्रदूषण.

अशारीतीने पॅरेटोचे समाजशास्त्र हे अनुभवाच्या आधारावर सामाजिक घटनांचा अभ्यास करते, घटनांचा शोध घेते, घटनांचे निरीक्षण करते आणि शेवटी घटनांच्यामधील समानतेच्या आधारावर समाजशास्त्रीय नियमांचे प्रतिपादन करते. पॅरेटोच्या वरील विचारांचा भर हा अनुभव आणि निरीक्षण या दोन घटकावर असून इतर विज्ञानाप्रमाणेच समाजशास्त्रात परिणामाची चर्चा न करता तार्किक व प्रयोगात्मक पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. त्याच्या मते, आजपर्यंत प्रतिपादन करण्यात आलेले समाजशास्त्रीय सिद्धांत हे आध्यात्मिक व नैतीक भावना समाविष्ट असलेले असल्यामुळे ते अतार्किक होते, वास्तवापासून दूर होते. तसेच ते धार्मिक व नैतीक मूल्यांच्यावर आधारित होते.

याऊलट पॅरेटोच्या समाजशास्त्रामध्ये अनुमान, कल्पना, अंधश्रद्धा आणि तात्त्विक सिद्धांत याना स्थान नसून त्याच्या समाजशास्त्राचा प्रत्येक नियम हा पूर्णपणे वस्तुनिष्ठ तथ्यावर आधारलेला आहे. त्यामुळे समाजशास्त्रात कोणताही निर्णय किंवा निष्कर्ष अंतीम राहणार नाही. सामाजिक तथ्ये व घटना यामध्ये एक अंतःसंबंध व अंतःनिर्भरता असते. त्यामुळेच पॅरेटोने सामाजिक तथ्ये व घटना यातील परस्परसंबंध स्पष्टपणे स्वीकारले आहेत.

विल्फ्रेडो पॅरेटोने इ.स. १८८९ ते १८९३ या कालावधीमध्ये वरील महत्त्वपूर्ण विचाराखेरीज मजुरांचे वेतन, सरकारचे अधिकार आणि उदारमतवादी व्यापारी धोरण इ. विषयावर अनेक लेख लिहिले. या सर्व विषयांचा त्याने सर्वस्पर्शी अभ्यास केल्याने समाजशास्त्रीय विचारामध्ये पॅरेटोकडून फार मोलाची भर घालण्यात आल्याचे दिसून येते.

**१.२.१.१ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

१) मुक्त व्यापाराचा पुरस्कर्ता, उदारमतवादी प्रवृत्तीचा विचारवंत आणि फॅसिझमचा पाठीराखा म्हणून कोणत्या इटालियन समाजशास्त्रज्ञाचा उल्लेख केला जातो?

२) पॅरेटोच्या मते, समाजशास्त्र हे कोणते विज्ञान व्हावयास पाहिजे?

३) 'समाज ही एक व्यवस्था असून कोणताही सामाजिक समूह समाजव्यवस्थेच्या स्वरूपात अस्तित्वात येतो' असा विचार कोणी मांडला?

४) पॅरेटोच्या मते, समाज संतुलन म्हणजे काय?

५) पॅरेटोने आपल्या कोणत्या ग्रंथामध्ये समाजशास्त्रासंबंधीचे विचार मांडले? पुढे याच ग्रंथाचे नाव काय ठेवण्यात आले?

६) पॅरेटोने सामाजिक घटनांचा विचार कोणत्या दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला?

७) पॅरेटोने समाजशास्त्राचा उल्लेख कसा केला?

८) पॅरेटोच्या मते, समाजशास्त्राची उभारणी कशाच्या आधारावर झालेली आहे?

९) समाजशास्त्रामध्ये प्रत्येक निष्कर्ष हा वास्तवतेवर आधारित असतो असा विचार कोणी मांडला?

१०) पॅरेटोच्या समाजशास्त्रासंबंधीच्या विचारामध्ये कशाला स्थान देण्यात आले नाही?

### १.२.२ तार्किक व अतार्किक क्रिया (तर्कसंगत व तर्कविसंगत क्रिया) (Logical and Nonlogical Action) :

विल्फ्रेडो पॅरेटो या इटालियन समाजशास्त्रज्ञाने मानवी सामाजिक वर्तनाचे तर्कसंगत व तर्कविसंगत असे दोन प्रकार विशद करून त्यासंबंधी आपले महत्वपूर्ण विचार मांडले. यालाच पॅरेटोची 'तार्किक व अतार्किक क्रियेसंबंधीची संकल्पना' असे म्हटले जाते. त्याच्यामते, बहुधा मानवी वर्तन हे तर्कसंगत असते. परंतु मानवाकडून ते वस्तुनिष्ठ असल्याचा भास निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. पॅरोटोचे मनुष्याच्या क्रियांचे तार्किक व अतार्किक क्रिया हे वर्गीकरण अतिशय महत्वाचे असून **तर्कसंगत कृती या वस्तुनिष्ठ** असतात, तर **तर्कविसंगत कृती या व्यक्तिनिष्ठ** स्वरुपाच्या असतात त्यामुळे या दोन क्रियांतील फरक समजावून घेण्यापूर्वी त्याचे स्वरूप माहित करून घेणे आवश्यक आहे. पॅरेटोने दर्शविलेले तर्कसंगत व तर्कविसंगत हे दोन मूलभूत प्रकार म्हणजे त्याच्या विचारावरील प्रत्यक्षवादी विचारसरणीच्या प्रभावाचे द्योतक आहेत. त्याच्या मते, प्रत्येक क्रियेला अथवा तथ्याला दोन बाजू असतात. पहिली बाजू म्हणजे त्या तथ्याची वास्तविकता व दुसरी बाजू म्हणजे त्या तथ्याचे स्वरूप ही होय. वास्तविकतेमध्ये त्या क्रियेच्या वास्तविक अस्तित्वाचा विचार होतो, तर तथ्याच्या स्वरूपामध्ये ती क्रिया किंवा व्यक्ती कशी दिसते याचा विचार होतो. पॅरेटोने पहिल्या प्रकाराला वस्तूनिष्ठ तर दुसऱ्या प्रकाराला आत्मनिष्ठ असे म्हटले आहे.

**१. तार्किक/तर्कसंगत/वस्तूनिष्ठ क्रिया (Logical Actions ) –**

पॅरेटोने तार्किक क्रियेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''ज्या क्रिया अनुभव व तर्कसंगतीवर आधारलेल्या असतात आणि ज्यामध्ये साध्य व साधने यात योग्य संगती आढळून येते त्यांना तार्किक/तर्कसंगत किंवा वस्तूनिष्ठ क्रिया असे म्हटले जाते.'' अथवा ज्या क्रियेमध्ये क्रियेच्या उद्दिष्टास अनुरूप असे साधन किंवा साधने वापरली जातात ती क्रिया अथवा मानवी वर्तन तर्कसंगत असते असे म्हणता येईल. उदा. प्रयोगशाळेत प्रयोग करणाऱ्या वैज्ञानिकाची कृती ही वस्तूनिष्ठ असते. त्यामुळे अशा क्रियेचा समावेश तार्किक अथवा तर्कसंगत क्रियेमध्ये होत असतो.

थोडक्यात तार्किक किंवा तर्कसंगत क्रिया या वैज्ञानिक ज्ञानावर आधारित असून त्यांची यथार्थता पडताळून पाहता येते. उदा. धुळीचा कण डोळयात जाऊ नये म्हणून व्यक्ती डोळे मिटतात. वैज्ञानिकाला अशा क्रियेचा प्रयोगजन्य अनुभव घेता येतो. अशा क्रियेमध्ये अथवा मानवी वर्तनामध्ये कल्पना आणि भावना यांना वाव नसतो. यामध्ये उद्दिष्ठ व साधने यात तार्किक सुसंगती आढळून येते. तसेच वस्तूनिष्ठत्व आणि आत्मनिष्ठत्व याचा समन्वय साधलेला असतो. उदा. सर्प दिसल्याबरोबर व्यक्ती बाजूला जातात अथवा शत्रूची मेणाची प्रतिमा करून ती अग्नीमध्ये टाकून देणे या उदाहरणाव्दारे साधन व साध्य यांच्यातील संबंध तर्काला पटणारा असल्यामुळे असे वर्तन तर्कसंगत/वस्तूनिष्ठ अथवा तार्किक आहे, असे म्हणता येईल.

शेवटी असे निदर्शनास येते की, तार्किक क्रिया वैज्ञानिक ज्ञानावर आधारित असल्याने त्यांचे निरीक्षण करता येते. अशा क्रियांचा उगम बुध्दी व तर्कातुन होत असतो. व्यवहारामध्ये मात्र मानवी वर्तनाचे ज्ञान मर्यादित मिळत असल्याने ते पुढे तर्कविसंगत ठरण्याची शक्यता अधिक असते. शेवटी पॅरेटो असे सूचित करतो की, व्यक्तीच्या प्रत्येक क्रियेला दोन बाजू असतात, पहिली उद्दिष्टाची म्हणजेच साध्याची बाजू होय आणि दुसरी साधनाची बाजू होय. प्रत्येक क्रियेच्या मुळाशी कोणते तरी उद्दिष्ट असते आणि त्याच्या पूर्ततेसाठी व्यक्ती विशिष्ट उपायांचा अवलंब करते. यामध्ये प्रयोगजन्य साधनांचा अवलंब केल्यास ती क्रिया तार्किक समजावी असे पॅरेटोने आपले मत व्यक्त केले. यावरून तार्किक **क्रिया तर्कसंगती** व प्रयोग यावर आधारित असल्याचे दिसून येते.

## २. अतार्किक/तर्कविसंगत/व्यक्तिनिष्ठ क्रिया (Nonlogical Actions) –

पॅरेटोच्या मते, तार्किक क्रियांच्या अगदी उलट अतार्किक क्रिया असतात. जगात सर्वकाळी व सर्व ठिकाणी अतार्किक (तर्कविसंगत) क्रियांचे प्रमाण अधिक दिसून येते. यामध्ये आत्मनिष्ठत्वाला स्थान नसते. तसेच अशा क्रिया निरीक्षण व प्रयोगाच्या आधारे सिध्द करता येत नाहीत. त्यांना बुध्दी व तर्काचा आधार नसतो. तरीदेखील प्रत्येक मानवी समाजात अशा तर्कविसंगत क्रियांचे प्राबल्य अधिक आढळते. यांची निर्मिती मानसिक व भावनात्मक घटकांमुळेच झालेली दिसते. त्यामुळे अशा क्रिया वास्तवतेच्या कसोटीवर पडताळून पाहता येत नाहीत अथवा त्यांची कारणमीमांसा देता येत नाही. उदा. परमेश्वर आहे परंतु त्याचे अस्तित्व सिध्द करता येत नाही.

पॅरेटोने अतार्किक अथवा तर्कविसंगत क्रिया (वर्तन) कशाला म्हणतात? या विषयी पुढीलप्रमाणे तिची व्याख्या सांगितली. 'ज्या क्रिया वर्तन अथवा कृतीच्या बाबतीत वस्तूनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोणातून साधन आणि साध्य यामध्ये एकरूपता आढळत नाही अशा क्रियांना तर्कविसंगत क्रिया असे म्हटले जाते.' किंवा व्यक्तींच्या ज्या क्रियांचे कोणत्याही प्रकारचे तर्कसंगत स्पष्टीकरण देता येत नाही, त्या मानवी क्रियांना तर्कविसंगत क्रिया (Non-logical Actions) अशी संज्ञा दिली जाते. उदा. पूजा-अर्चा, परमेश्वराच्या नावावर केल्या जाणाऱ्या यात्रा, नरबळी अथवा पशुबळी, बुवाबाजी, धार्मिक कर्मकांड, आदिम समाजातील निषेध नियम, परमेश्वराची आज्ञा व मांसाहार वर्ज्य करण्याची क्रिया इत्यादी उदाहरणांवरून तर्कविसंगत क्रियांचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल.

विल्फ्रेडो पॅरेटोच्या तर्कविसंगत क्रियेच्या वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, तर्कविसंगत क्रियांना बुध्दी व तर्काचा आधार नसतो. कोणत्याही समाजात अशा क्रिया अधिक प्रमाणात आढळतात. किंबहुना मानवसमाजात अशा क्रियांचे वर्चस्व अधिक प्रमाणात दिसून येते. व्यक्तींकडून जेव्हा तर्कसंगत क्रिया करण्यामध्ये असमर्थता दाखविली जाते, तेव्हा तर्कविसंगत वर्तनाचे समर्थन करण्यात येते. अशा क्रिया वास्तवतेच्या कसोटीवर (प्रत्यक्ष प्रयोग करून) पडताळून पाहता येत नसल्याने त्यांचा संबंध अवास्तवतेशी असल्याचे दिसून येते. उदा. परमेश्वराचे अस्तित्व सर्वमान्य असूनही ते सिध्द करता न येणे.

थोडक्यात, अतार्किक किंवा तर्कविसंगत क्रियांची निर्मिती ही मुख्यत्वे मानसिक व भावनात्मक घटकामुळे झालेली असते. जगात सर्व ठिकाणी अशा क्रियांची संख्या अधिक प्रमाणात दिसून येते. एवढेच नव्हे तर, व्यक्तीच्या हातून घडलेल्या अतार्किक क्रियांना तार्किक समजून त्यांचे समर्थनही करण्यात येते. उदा. डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी समाजात जे निषेध नियम (Tabos) आढळतात त्यांचे समर्थन केले जाते.अशा निषेध नियमांना त्यांच्या समाजाची मान्यता असली तरी त्यांना बुध्दीचा व तर्काचा आधार नसतो. अनेक वेळेला व्यक्ती तर्कसंगत क्रिया करण्यास असमर्थ ठरते, तेव्हा तिच्याकडून तर्कविसंगत वर्तनाचे समर्थन केले जाते. मानवाचे बहुतेक वर्तन तर्कविसंगत असते. परंतु व्यवहारात मात्र ते तर्कसंगत कसे आहे ते दाखविण्याचा व्यक्तीचा सदैव प्रयत्न सुरू असतो. उदा. हिंदु समाजात गाईचे मांस भक्षण करणे निषिध्द मानले जाते. अशा वर्तनावर या समाजाची बंदी असते. अशा तऱ्हेची बंदी ही विशिष्ट प्रकारच्या मानसिक परिस्थितीमुळे अस्तित्वात आलेली असते. परंतु व्यक्ती याचे समर्थन वेगळ्याच प्रकारे करतात. गाईचे मांस भक्षण करू नये ही परमेश्वराची आज्ञा आहे. यामुळे असे वर्तन केले जात नाही, असे स्पष्टीकरण देण्यात येते. या विचारात कसलीही तर्कशुध्दता नसते. अशा निर्बंधांची वैज्ञानिक पध्दतीने तपासणी देखील करता येत नाही.

पॅरेटोने तर्कविसंगत क्रियांच्यासंबंधी शेवटी असे म्हटले आहे की, अशा क्रियांची निर्मिती ही मुख्यत्वे

मानसिक व भावनात्मक घटकांमुळे झालेली असते. अशा क्रियांमध्ये आत्मनिष्ठत्वाला स्थान नसते. तसेच त्या निरीक्षण व प्रयोगाच्या आधारे सिध्द करता येत नाही. कोणत्याही समाजात तर्कविसंगत क्रियांचा अधिक प्रभाव दिसून येतो. असे तर्कविसंगत वर्तन अवास्तवतेशी संबंधित असल्याने (उदा. परमेश्वराचे अस्तित्व) ते पडताळून पाहता येत नाही.

**तार्किक व अतार्किक क्रियेमधील फरक :**

पॅरेटोने तर्कसंगत (तार्किक) आणि तर्कविसंगत (अतार्किक) क्रियांच्यासंबंधी वरीलप्रमाणे विवेचन करून दोहोंमध्ये जो महत्त्वपूर्ण **फरक** आढळून येतो त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेतला आहे.

१. तार्किक क्रिंयाचा उगम हा बुध्दी अथवा तर्कातून होतो. याउलट अतार्किक क्रियांचा उगम मानसिक व भावनात्मक घटकांतून होतो.

२. तर्कसंगत कृती अथवा क्रिया वस्तूनिष्ठ असतात, तर तर्कविसंगत कृती व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या असतात.

३. तार्किक क्रियांपेक्षा कोणत्याही समाजात अतार्किक क्रियांचा प्रभाव अधिक जाणवतो.

४. मानवी वर्तन बहुधा तर्कविसंगत असते. (उदा. परमेश्वराची आज्ञा आणि मांसाहार वर्ज्य) परंतु ते तर्कसंगत असल्याचा भास निर्माण करण्याचा मानवी प्रयत्न सदैव चालू असतो.

५. घटनेचे प्रत्यक्ष रूप वास्तव असते. परंतु व्यक्तीला समजलेले रूप व्यक्तिनिष्ठ असते. उदा. प्रयोगशाळेत प्रयोग करणाऱ्या वैज्ञानिकांची कृती वस्तूनिष्ठ अथवा वास्तव असते, तर जादूटोणा करणाऱ्याची कृती व्यक्तिनिष्ठ असते.

६. व्यवहारात मानवी वर्तन तर्कसंगत कसे आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु प्रत्यक्षात मानवी वर्तन तर्कविसंगत असल्याचे दिसून येते. उदा. मनातील हेतू साध्य होण्यासाठी देवाची पूजा- अर्चा केली जाते, नवस केला जातो. परंतु प्रत्यक्षात परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करता येत नाही.

पॅरेटोने तार्किक व अतार्किक क्रियांच्यामध्ये आढळून येणारा फरक विशद केल्यानंतर शेवटी असे प्रतिपादन केले आहे की, सामाजिक घटनांचे वास्तव स्वरूप समजावून घ्यावयाचे असेल तर तर्कसंगत क्रियांचाच अभ्यास करणे अधिक गरजेचे व उपयुक्त आहे. कारण या क्रियांना विज्ञाननिष्ठतेचा दर्जा प्राप्त झालेला असतो. त्यांची यथार्थता पडताळून पाहता येते. यामध्ये कल्पना आणि भावना यांना वाव नसतो. वैज्ञानिकाला त्याचा प्रयोगजन्य अनुभव घेता येतो. वस्तुनिष्ठत्व आणि आत्मनिष्ठत्व यांचा समन्वय साधता येतो. उदा. साप दिसल्याबरोबर बाजूला जाणे अथवा डोळ्यात धुळीचे कण जावू नयेत म्हणून डोळे मिटणे. त्यामुळेच पॅरेटोने तर्कविसंगत क्रियांऐवजी तर्कसंगत क्रियांचाच अभ्यास उपयुक्त असतो यावर अधिक भर दिला आहे.

तार्किक व अतार्किक क्रियांचे वरीलप्रमाणे सखोल विवेचन करून पॅरेटोने शेवटी असे विधान केले आहे की, मानवी वर्तनाची सर्व उद्दिष्टये वैज्ञानिक पध्दतीने (तर्कसंगत) निश्चित करणे अशक्य असते. तसेच केवळ बुध्दीवादावर आधारीत समाजव्यवस्था निर्माण करणे अशक्य आहे. अशावेळी मानवी वर्तनाला योग्य दिशा देण्यासाठी सांकेतिक घटकांची (तर्कविसंगत क्रिया) मदत घेणे आवश्यक असते. परमेश्वराची आज्ञा व मांसाहार, कार्यसिध्दीसाठी नवस प्रथा, आणि धर्मासंबंधी आढळणारे कर्मकांडविधी यांसारख्या तर्कविसंगत

कृती निरुपयोगी असतात, हे पॅरेटोला मान्य नाही. त्याच्या मते, तर्कविसंगत कृती, वर्तनप्रकार अथवा क्रिया देखील समाजाला अतिशय उपयुक्त असतात, त्यामुळे अनेक स्पष्ट न होणाऱ्या गोष्टींचे स्पष्टीकरण देता येते. तसेच व्यक्तींना तर्क विसंगत क्रियांमुळे अधिक प्रमाणात मानसिक समाधान मिळू शकते म्हणून पॅरेटो असे म्हणतो की, सामाजिक घटनांचे खरे स्वरुप समजावून घेणेसाठी मानवी तर्कसंगत व तर्कविसंगत या दोन्ही वर्तन प्रकार किंवा क्रियांचा आभ्यास करणे गरजेचे आहे.

### १.२.२.२ स्वयं- अध्ययनासाठीचे प्रश्न -

**अ. बहुपर्यायी प्रश्न -**

१. तार्किक क्रियांचा संबंध हा प्रामुख्याने कशाशी संबंधित असतो ?

अ) वैज्ञानिक प्रयोग पध्दती ब) धार्मिक श्रध्दा

क) मानवी सवयी ड) वरीलपैकी एकही नाही

२. अतार्किक क्रियांचा संबंध हा प्रामुख्याने कशाशी संबंधित असतो ?

अ) वैज्ञानिक प्रयोगपध्दती ब) निरीक्षण

क) मानवी भाव-भावना ड) वरीलपैकी एकही नाही

३. खालीलपैकी कोणत्या विषयामध्ये पॅरेटो यांना आवड होती ?

अ) इतिहास ब) अर्थशास्त्र

क) मानसशास्त्र ड) वरीलपैकी एकही नाही

४. पॅरेटो याच्या मते, बहुतांशी समाजशास्त्रीय सिध्दांताचे स्वरुप कसे होते ?

अ) तार्किक स्वरुपाचे ब) उदारमतवादी

क) अतार्किक स्वरुपाचे ड) वरीलपैकी एकही नाही

५. पॅरेटो यांच्या मते, अर्थशास्त्रीय अभ्यासात खालीलपैकी कोणत्या घटकाला वगळले आहे?

अ) उत्पादन पध्दती ब) औद्योगिकरण

क) आयात-निर्यात ड) मानवी वर्तन

### १.२.३ पॅरेटोचा अवशिष्ट सिध्दांत (Theory of Residues by Pareto) : -

विल्फ्रेडो पॅरेटोने आपल्या 'Trattato d, Sociologia General' या ग्रंथामध्ये अवशिष्ट व भ्रम किंवा युक्तीवाद म्हणजेच Residues and Derivation यासंबंधी सविस्तर विवेचन केले आहे. त्यासाठी त्याने विविध पध्दतींचा उपयोग केला आहे. त्याच्या मते, सामाजिक व्यवस्थेत कायमपणे संतुलन राखण्यासाठी मानवी व्यवहारांच्या दोन बाजू आधारभूत असतात. उदा १. अपेक्षाकृत क्रिया अथवा वर्तन आणि २. परिवर्तनशिल क्रिया अथवा वर्तन या दोहोंपैकी समाजातील संतुलन कायम ठेवण्यासाठी अपेक्षाकृत क्रिया अधिक उपयुक्त ठरतात. बहुतांशी मानवी वर्तनाच्या मुळाशी काही अंतरिक प्रेरणा (Drives) असून त्या तुलनात्मकदृष्टया अधिक स्थिर असल्याने समाज संतुलन टिकून राहण्यास मदत होते. अशा प्रेरणांना पॅरेटोने अवशिष्ट असे म्हटले आहे.

**अवशिष्टांचा अर्थ किंवा व्याख्या –**

अनेक टीकाकारांनी अवशिष्टांचा अर्थ अनेक प्रकारे लावला आहे. परंतु पॅरेटोने केलेले विवेचन विचारात घेता, 'अवशिष्ट म्हणजे मूलप्रवृत्ती किंवा भावना नव्हे तर भावनांची अभिव्यक्ती (Expression of Feelings) होय.' ज्याप्रमाणे उष्णता वाढली असता तापमापक यंत्रात पारा वर चढू लागतो त्याचप्रमाणे भावनातून अवशिष्टांची अभिव्यक्ती होवू लागते. (The Residues are the manifestations of instinct and sentiments as the elevation of mercury in a thermometer is the manifestation of a rise in the temprature) पॅरेटोने मानवी क्रियांचे अथवा व्यवहारांचे जे दोन वर्ग (बाजू) पाडले आहेत, त्यामध्ये अतार्किक क्रियांचा समावेश अवशिष्टात होवू शकतो असा विचार मांडला.

पॅरेटोच्या मते या अवशिष्टांमध्ये कोणतीही तर्कनिष्ठता किंवा बुध्दिवाद नसतो तर ते अतार्किक असून स्थिर प्रवृत्तीचे असतात. तसेच ते जीवनातील प्रत्येक क्रियेवर आपला प्रभाव टाकतात.

**अवशिष्टांची वैशिष्ट्ये (Charactristics of Residues) –**

वरील व्याख्येच्या आधारे अवशिष्ट संकल्पनेची खालील काही प्रमुख वैशिष्ट्ये अथवा लक्षणे दिसून येतात.

१. अवशिष्ट घटक म्हणजे सहज प्रवृत्ती अथवा भावना नव्हेत, मात्र ते अशा भावनांवर आधारित असतात.

२. अवशिष्ट हे मानवी क्रिया आणि मानवी वर्तनातील सर्वसामान्य घटक तत्वांचे (प्रेरणांचे) प्रतिनिधीत्व करतात.

३. अवशिष्ट म्हणजे मानवी स्वभावातील स्थिर घटक असून त्यांच्याकडून मानवी वर्तनाचे संचलन केले जाते.

४. अवशिष्ट हे अतार्किक म्हणजेच तर्क विसंगत असतात, त्यामुळे त्याचे तर्कनिष्ट किंवा बुध्दिनिष्ठ स्पष्टिकरण देता येत नाही.

५. अवशिष्टांमुळे समाजाचे संतुलन कायम ठेवण्यास बरेच सहाय्य होते. परिस्थितीनुसार अवशिष्टात परिवर्तन होत असते.

**अवशिष्टांचे वर्गीकरण किंवा प्रकार ( Classification or types of Residues)**

पॅरेटोपूर्वी होवून गेलेल्या अनेक अभ्यासकांनी अवशिष्टांचे विविध प्रकार विशद केले होते. मात्र त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून विचार केलेला नव्हता. पॅरेटोने मात्र अवशिष्टांचे वैज्ञानिकदृष्टया स्पष्टीकरण करताना खालील **प्रमुख सहा** प्रकारांत वर्णन केले आहे, ते प्रकार असे –

**१. एकीकरणात्मक अवशिष्ट (Residues of Combinations) –**

पॅरेटोच्या मते, 'ज्या प्रेरणांमुळे समाजातील परस्पर समान व परस्परविरोधी घटक एकत्र येतात, अशा अवशिष्टांना एकीकरणात्मक अवशिष्ट असे म्हटले जाते.' समान अवशिष्टांचे उदाहरण म्हणजे शुभगोष्ट पाहिली असता शुभ होते, असे मानने. उदा. भारद्वाजपक्षाचे दर्शन झाले असता शुभदायक घटना घडतात असे मानले जाते. याउलट संपत्ती दिसली तर ते दारिद्रय येण्याचे लक्षण मानले जाते. आदिवासींच्यामध्ये गवत पेटवून धूर

केला असता पाऊस पडतो असा विश्वास आहे. अशा गोष्टी पूर्णतः काल्पनिक असतात. मात्र त्या वास्तव असल्याचा आभास निर्माण केला जातो. त्यामुळे या सर्व क्रिया तर्कविसंगत असतात. थोडक्यात हा अवशिष्ट प्रकार श्रद्धेवर किंवा अंधविश्वासावर आधारीत असल्याने त्याला बुध्दीचा आधार नसतो.

**२. समुहाच्या स्थायीभावाचे अवशिष्ट (Residues of Persistance of Agrigate) –**

'ज्या प्रेरणांमुळे समाजातील अनेक व्यक्ती एकत्र येतात किंवा प्रयत्नपूर्वक समुहाची निर्मिती करतात, अशा अवशिष्टांना समुहाच्या स्थायीभावाचे अवशिष्ट असे म्हटले जाते.' अशा अवशिष्टांमुळे व्यक्ती–व्यक्तींच्यामध्ये परस्परसंबंध किंवा मानव व त्यांच्या श्रध्दा यातील परस्पर संबंध टिकून राहतात. असे अवशिष्ट एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. तसेच त्यांच्याविषयी समाजात मान व आदर असतो. उदा. भारतामध्ये पूर्वज स्मृती कायम राहण्यासाठी केला जाणारा श्राध्द विधी अथवा पितृ पंधरवडा. थोडक्यात असे अवशिष्ट समूहाची एकता व स्थैर्य टिकवून ठेवण्यास मदत करतात. समाजाच्या स्थिरतेच्या दृष्टीने हा अवशिष्ट प्रकार अतिशय महत्वपूर्ण असतो.

**३. सामाजिकतेसंबंधी अवशिष्ट (Residues reguarding Sociability) –**

अवशिष्टांच्या या तिसऱ्या प्रकारात मनुष्य प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रुपांतर करण्याच्या संदर्भातील घटकांचा समावेश होतो, असे अवशिष्ट समाजात व्यक्तीना सामाजिक अपेक्षेनुसार वर्तन करण्याचे शिक्षण देतात. एकप्रकारे त्यामुळे व्यक्तींच्या वर्तनाला शिस्त लागते. यासंदर्भात पॅरेटोने असे सूचीत केले आहे की, समूहातील व्यक्तींचा प्रयत्न हा ऐक्य निर्माण करण्याचा असतो. अशा अवशिष्टांमुळे व्यक्ती समाजानुरूप आपले व्यवहार पार पाडीत असते. तसेच समाजाच्या मूल्यांना मान देवून त्यांचे पालन करते. उदा. दया, प्रेम, त्याग ही या अवशिष्ट प्रकाराची उदाहरणे आहेत.

**४. बाह्य क्रियाद्वारे भावनांची अभिव्यक्ती करणारे अवशिष्ट (Residues of the Manifestation of Sentiments through External and exterior Acts)**

मनुष्य आपल्या मनातील इच्छा व्यक्त करण्यासाठी काही बाह्य क्रिया करत असतो. ही एक सहजप्रवृत्ती असून समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी तिचे अस्तित्व जाणवते. उदा. राष्ट्रभक्ती अथवा देशप्रेम, सामन्यातील विजयानंतर फटाके वाजविणे यांसारख्या बाह्य कृतीव्दारे व्यक्ती आपल्या भावना व्यक्त करतात. अशा कृती विविध समाजात वेगवेगळया प्रकारे आढळून येतात. सामाजिक जीवनात अशा अवशिष्टांना फार महत्त्व असते.

**५. व्यक्तिमत्वाचे संघटन करणारे अवशिष्ट (Residues of the Integrity of Personality) –**

या अवशिष्टांमुळे व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्वाचा योग्य विकास करण्यासाठी अनेक गुणांचे संघटन करते. व्यक्तिमत्वाचे भिन्न घटक असून ते विखुरलेले असतात. त्यांना पुन्हा संघटीत करण्याचे कार्य या अवशिष्टांमुळे होते. योग्य अयोग्य ठरविणे व त्यांची अभिव्यक्ती करणे हा या अवशिष्टांचा परिणाम होय. समाज विघटन घडू न देण्याची आणि समाजाला नैतिक पतनापासून वाचविण्याची उपयुक्त क्रिया याच अवशिष्टांमुळे होत असल्याने हा प्रकार अतिशय महत्वपूर्ण समजला जातो.

**६ कामप्रवृत्ती सुचक अवशिष्ट (Sexual Residues) –**

अवशिष्टाच्या या प्रकारात काम वासनेच्या संदर्भातील भावना व विचार यांचा सामावेश होतो. कामेच्छातृप्तीच्या बाबतीत प्रत्येक समाजात कोणते तरी नियम, निषेध व प्रतिबंध असतात. उदा. प्रत्येकाने

आपापल्या जाती धर्मातून वैवाहिक जीवन साथीदाराची निवड करून लैंगिक गरजेची पूर्तता करावी, विवाहपूर्व आणि विवाहबाह्य लैंगिक संबंध असू नयेत. यासारख्या नियमांमुळे समाजात व्यभिचार माजत नाही. प्रत्येक समाजात लैंगिक संबंधाचे नियंत्रण करण्यासाठी अनेक बंधने अस्तित्वात असून औरसतेची तत्त्व कल्पना याच भावनांशी निगडित आहे. हा अवशिष्ट प्रकार सर्व समाजात नेहमीच अस्तित्वात असतो. परंतु त्याचे स्वरूप सर्वत्र सारखे असेल असे मात्र म्हणता येत नाही.

पॅरेटोच्या मते, वरील सर्व अवशिष्ट प्रकार सर्व मानवसमाजात आढळून येतात. कोणत्याही सामाजिक व्यवस्थेचे ते स्थिर घटक असल्याने समाजव्यवस्था टिकून राहण्यास मदत होते. त्यांच्याकडून मानवी व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते. व्यक्तिमत्वाचा विकास करण्यास आणि व्यक्तीचे समाजीकरण घडवून आणण्यास अवशिष्टांकडून साहाय्य केले जात असल्याने त्यांची नेहमीच आवश्यकता भासते. हे सर्व अवशिष्ट प्रत्येक समाजात अस्तित्वात असले तरी प्रत्येक समाजात त्याचे प्रमाण सारखे नसते. मात्र समाज नियंत्रणाच्या कार्यासाठी आणि समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी या सर्व अवशिष्ट प्रकारांची सातत्याने गरज भासते. स्थल–कालानुसार अथवा परिस्थितीनुसार या अवशिष्टात परिवर्तन होत असते असाही विचार पॅरेटोने मांडला आहे. त्यामुळे पॅरेटोचा समाजपरिवर्तनाचा सिंध्दात याच अवशिष्टांच्या संकल्पनेमुळे प्रभावित झाल्याचे निदर्शनास येते.

**पॅरेटोचे अवशिष्ट संकल्पनेचे समीक्षण (Evalution of Pareto Conceptof Residues) –**

पॅरेटोची अवशिष्ट संकल्पना म्हणजे समाजशास्त्राला मिळालेले एक महत्वाचे योगदान आहे. पॅरेटोने वापरलेली अवशिष्ट ही संज्ञा मानवाच्या ठिकाणी सदैव असलेल्या प्रेरणेला उद्देशूनच आहे. परंतू या प्रेरणा शारिरिक, नैसर्गिक किंवा सामाजिक प्रक्रियेचे परिणाम असतात याबद्दल त्याने कोणतेच विवेचन केले नाही. तसेच वेगवेगळया अवशिष्टांतील परस्परसंबंधदेखील स्पष्ट केले नाहीत.

बोगार्डस्ने पॅरेटोच्या अवशिष्ट संकल्पनेबाबत असे म्हटले आहे की, पॅरेटोचे अवशिष्ट प्रकार म्हणजे साध्या भाषेत भावना किंवा मूलप्रवृत्ती होत. सोरोकिनच्या मते, पॅरेटोने प्रतिपादन केलेले अविशष्ट प्रकार हे व्यक्तिमत्वाला अथवा समूहाला विशेष आकार देतात.व्यक्ती व समाजाला प्रभावित करतात. त्यावरून शेवटी असे म्हणता येईल की, पॅरेटोची अवशिष्ट संकल्पना म्हणजे समाजशास्त्रातील एक अतिशय महत्वपूर्ण असा विचार होय.

**विल्फ्रेडो पॅरेटोचा भ्रम अथवा युक्तिवाद सिध्दांत (Theory of Derivation by Vilfredo Pareto)**

समाजामध्ये राहून आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता करताना मानवाला अनेक प्रकारच्या कृती अथवा कार्ये पार पाडावी लागतात. व्यक्तीला आपली कृती किंवा वर्तन नेहमीच योग्य वाटते. मग ते तर्कसंगत, विवेकपूर्ण अथवा सुसंगत असो किंवा नसो. अशा परिस्थितीत आपली स्वत:ची कृती कशी योग्य आहे किंवा होती याचे समर्थन संबंधित व्यक्तीकडून केले जाते. यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला जातो. व्यक्तीकडून अशा प्रकारचे जे प्रयत्न चालू असतात, त्यांना उद्देशून पॅरेटोने भ्रम (भ्रांत) अथवा युक्तिवाद ही संज्ञा वापरली. या युक्तिवादात अनेक घटकांचा समावेश होतो. उदा. स्वत:चा अहंपणा, स्वगौरव, स्वभावना इ. व्यक्तीकडून स्वत:च्या योग्य अयोग्य कृतीबाबत दिली जाणारी स्पष्टीकरणे ही बहुधा काल्पनिक स्वरूपाची असतात. बऱ्याच प्रमाणात ती तर्कविसंगत व परिवर्तनशील असतात. तरीदेखील इतर व्यक्ती अशा युक्तीवादावरच विश्वास ठेवतात. पॅरेटोच्या मते, जगातील अनेक थोर माणसांनी आपल्या विविध कृत्यांचे समर्थन करताना भ्रम किंवा युक्तिवादाचा अवलंब केला आहे. तसेच विविध समाजशास्त्रज्ञांनी प्रगती,

संघटना, समाजवाद, राष्ट्रवाद इत्यादींविषयी स्पष्ट केलेल्या संकल्पना अशा युक्तिवादावरच आधारलेल्या आहेत.

**युक्तिवाद किंवा भ्रम संकल्पनेचा अर्थ (Meaning of the Concept of Derivation) –**

पॅरेटोने भ्रम अथवा युक्तिवाद संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपण जे कार्य करतो ते योग्यच वाटते. भले ते अयोग्य असले तरी स्वतःच्या अहंकारामुळे अशा कार्यासंबंधी अनेक युक्तिवाद (तर्क) करून व्यक्तीकडून त्याचे समर्थन केले जाते. त्याच्या मते, 'भावना व मूलप्रवृत्तीच्या वर्तनातील अभिव्यक्तींशी संबंधित असणारे समर्थन म्हणजे भ्रम किंवा युक्तिवाद होय.' वैज्ञानिक संशोधनात असे भ्रम किंवा युक्तिवाद काल्पनिक असल्याने अवशिष्टांच्या तुलनेत ते अस्थिर असतात. पॅरेटोपूर्वी होऊन गेलेल्या अभ्यासकांनी राजकीय, आर्थिक, सामाजिक अथवा इतर क्षेत्रात मांडलेले अनेक सिध्दांत भ्रम किंवा युक्तिवादावर आधारित होते. त्यामुळे अशा सिध्दांताव्दारे वास्तवतेचे ज्ञान मिळत नाही. उदा. प्रगती, ऐक्य, समानता या गोष्टी युक्तिवादावर (Derivation) आधारित असल्याने त्यांना वैज्ञानिक सत्य असे म्हणता येणार नाही. तरीदेखील समाजाच्या दृष्टीने असे युक्तिवाद पूर्णतः निरूपयोगी असतात असे नाही. समाजाचे ऐक्य टिकविण्यास त्यांची मदत झाल्याचे दिसून येते. एखाद्या व्यक्तीला आपल्या कार्याचे औचित्य सिध्द करण्याची गरज भासते. अशा वेळी व्यक्तीकडून युक्तिवादाचे साहाय्य घेऊन आपले कार्य अथवा वर्तन प्रकार कसा उचित आहे हे सिध्द करण्यासाठी विविध प्रकारचे तर्क केले जातात.

फेअरचाईल्डच्या मते, युक्तिवाद हे व्यक्तीकडून केल्या जाणाऱ्या क्रियांचे व्यापक क्षेत्र असून त्याच्या आधारे व्यक्ती आपल्या स्वतःच्या चुकीच्या वर्तनाच्या बाबतीत स्वत:चे समर्थन करते आणि इतरांशी तशी खात्री करून देण्याचा प्रयत्न करते. बहुतेक व्यक्तींमध्ये अशी सवय असून आपली क्रिया तर्कसंगत आहे अशी स्वत:ची आणि स्वतःच्या मित्रांची खात्री करून देण्याची वृत्ती आढळते. अर्थात व्यक्तीच्या अशा प्रतिपादनामध्ये कोणत्याही प्रकारची तर्कसंगती नसते. तसेच त्यांच्या समर्थनाला अनुभवाचा आधार नसतो. तरीदेखील इतर व्यक्ती अशा व्यक्तीवर विश्वास ठेवतात. कारण अशा कृतींचे समर्थन करणारी व्यक्ती भावनांचा आधार घेते. त्यामुळे इतर व्यक्तींचा अशा युक्तिवादावर विश्वास बसतो.

पॅरेटोने आपल्या भ्रम किंवा युक्तिवाद संकल्पनेचे वरीलप्रमाणे विवेचन करून शेवटी असे प्रतिपादान केले आहे की, एखाद्या शास्त्रीय सिध्दांतापेक्षा युक्तिवादाला समाजमान्यता लवकरात लवकर मिळते, कारण अशा युक्तिवादामध्ये भावनांना आवाहन केलेले असते. व्यक्तींच्या वर्तनावर अशा युक्तिवादाचा फार मोठा परिणाम होत असल्याचे दिसून येते. पॅरेटोच्या मते, उत्क्रांती, विकास, धार्मिक एकता, समाजवाद इत्यादी संकल्पना युक्तिवादावर आधारित असून त्याव्दारे मानवी स्वभावाचे खरे दर्शन घडून येते हे मान्य करावेच लागेल. उदा. परमेश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी एखादा केलेला धार्मिक विधी अथवा कर्मकांड.

**युक्तिवाद अथवा भ्रमाची वैशिष्टये (Characteristics of Derivations) –**

वरील विवेचनावरून युक्तिवादाची पुढील वैशिष्टये निदर्शनास येतात.

१. युक्तिवादाचा संबंध अवशिष्टाशी (अवशेष) असून अवशिष्टामुळे ज्या क्रिया घडून येतात, त्यांचे समर्थन युक्तिवादाच्या आधारे केले जाते.

२. समाजातील व्यक्ती युक्तिवादाचा भावनांच्या अधिष्ठानामुळे स्वीकार करतात.

३. ज्याप्रमाणे अवशिष्ट म्हणजे भावना व मनोविकार यांची अभिव्यक्ती असते असे मानले जाते, त्याचप्रमाणे युक्तिवादालादेखील अवशिष्टाची अभिव्यक्ती म्हणून ओळखले जाते.

४. युक्तिवादाव्दारे व्यक्ती एखाद्या चुकीच्या कृतीचे समर्थन करतात त्यासाठी ध्येयवाद, नैतिकता, इत्यादींचा आधार घेतला जातो.

५. युक्तिवाद हे अवशिष्टापेक्षाही अधिक अस्थिर, लवचीक व परिवर्तनशील असतात.

**युक्तिवादाचे प्रकार (Types of Derivations) -**

विल्फ्रेडो पॅरेटोने युक्तिवादाचे खालील प्रमुख **चार प्रकार** सांगितले आहेत. ते असे –

**१. निश्चित स्वरूपाचे युक्तिवाद (Affirmative Derivations) –**

पॅरेटोच्या मते, या युक्तिवादात निश्चित स्वरूपाची विधाने केली जातात. अर्थात अशी विधाने अनुभवाने किंवा प्रयोगाने सिध्द करता येत नाहीत. परंतु त्यामध्ये लोकांच्या मनाला हेलावून टाकण्याचे सामर्थ्य असल्याने ती अतिशय प्रभावी असतात. उदा. निवडणूकीच्या काळात राजकीय पुढाऱ्यांच्याकडून दिली जाणारी आश्वासने अथवा केल्या जाणाऱ्या घोषणा या पूर्णतः असत्य असल्या तरी कालांतराने त्या सत्य वाटू लागतात. कधीकधी असल्या निश्चयात्मक विधांनाना यथार्थ किंवा काल्पनिक तथ्याची जोड दिली जाते. त्यामुळे त्यांचा प्रभाव अधिकच वाढतो. मात्र अशा विधानांचे परिक्षण करता येत नाही.

**२. अधिकारदर्शक युक्तीवाद (Authorative Derivations) –**

समाजातील सर्व व्यक्तींना सर्व क्षेत्राचे ज्ञान नसते तरीदेखील एखाद्या व्यक्तीला काही कारणांमुळे विशिष्ट क्षेत्रात महत्वाचे अधिकारस्थान प्राप्त झालेले असते. त्यामुळे अशा संबंधित व्यक्तीला अधिकार वाणीने बोलता येते. अशा अधिकारांमुळे या व्यक्तीची प्रतिमा उंचावते. सहाजिकच सर्वांच्याकडून अशा व्यक्तीचे विचार तर्कसंगत, वैज्ञानिक, अनुभवजन्य असोत अथवा नसोत ते व्यक्तीच्या प्रतिष्ठेमुळेच मान्य केले जातात. या युक्तीवादाला अधिकारदर्शक युक्तीवाद असे म्हटले जाते. उदा. राजकीय क्षेत्रातील व्यक्ती धार्मिक विषयावरदेखील अधिकारवाणीने बोलते. गीतेत म्हटले आहे, ज्ञानेश्वर माऊली असे म्हणतात, तुकाराम महाराजांनी असे सांगितले यांसारख्या विधानांचा वापर अधिकारप्राप्त व्यक्ती लोकांच्यावर छाप पाडण्यासाठी सर्रासपणे करताना आढळतात.

**३. भावनाजन्य युक्तीवाद (According with Sentiment Derivations) –**

विशिष्ट भावनेतून निर्माण झालेला युक्तीवाद म्हणजे भावनाजन्य युक्तीवाद होय. सहाजिकच असे युक्तीवाद भावनेवर आधारीत असल्याने अशा युक्तीवादावर इतरांचा विश्वास बसतो. उदा स्वार्थीपणे वागणारी व्यक्ती आपले वर्तन स्वार्थी आहे असे न म्हणता ते राष्ट्रहिताचे कसे आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करते. त्यातूनच समाजाचा अशा व्यक्तीवर दृढ विश्वास बसतो. थोडक्यात भावनाजन्य युक्तीवादाच्या मुळाशी बुध्दीवाद नसला तरी त्यातील भावनांचे आवेग लोकांना भुरळ पाडतात. त्यांचा युक्तीवाद प्रभावी ठरून तो लोकांना मान्य होवू लागतो.

**४. शाब्दिक युक्तीवाद (Verbals Proofs Derivations) –**

या युक्तीवादामध्ये एखादी गोष्ट स्पष्ट करण्यासाठी शाब्दिक कसरत केली जाते. जे काही म्हटले जाते त्याला वास्तवतेचा अथवा तर्काचा आधार नसतो. केवळ प्रभावी शब्दांचा आधार घेवून असले युक्तीवाद

केले जातात. उदा. लोकशाही शासन व्यवस्थेत सामान्यजनांच्या हिताचा विचार केला जातो. गरिबी हटाओ, गरिबांना मोफत घरकुल योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज अशी गोंडस शाब्दिक विधाने केली जातात. त्यादृष्टीने एखादी गोष्ट सिध्दही केली जाते.

पॅरेटोने विषद केलेल्या युक्तीवाद अथवा भ्रम संकल्पनेच्या वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, या संकल्पनेशी निगडीत सर्व विधाने काल्पनिक स्वरूपाची असतात. त्यांना वास्तवतेचा आधार नसतो. याचा अर्थ समाजाच्या दृष्टीने ती पूर्णत: निरुपयोगी असतात, असे नव्हे. याबाबत पॅरेटोने असे सूचित केले आहे की, अनेक युक्तीवादामुळे समाजाचे ऐक्य टिकवण्यास मदत झाली आहे. प्रत्येक तर्कविसंगत विधान किंवा अंधश्रध्दा निरूपयोगी असते असे म्हणता येत नाही. समाजाला युक्तीवादाची गरज भासतच असते.

पॅरेटो शेवटी असे विधान करतो की, सर्व समाजशास्त्रीय विचारवंतांचे सर्व सिध्दांत हे युक्तीवाद निर्मित आहेत. उदा. मानवतेचा धर्म, विकास संकल्पना, उत्क्रांती, समाजवाद इ. संकल्पना युक्तीवादावर आधारलेल्या आहेत. त्यामुळे पॅरेटो असे म्हणतो की, युक्तीवाद संकल्पना मानवी स्वभावांचे खरे दर्शन घडवते. त्यामुळे सहाजिकच या संकल्पनेकडे समाजशास्त्रातील एक महत्वाचे योगदान म्हणून पाहिले जाते.

**अवशिष्ट व युक्तीवाद यांचा परस्पर संबंध (Relationship between Residues & Derivations)**

पॅरेटोच्या मते, अवशिष्ट आणि युक्तीवाद (भ्रम) यांचा अन्योन्य असा आंतरिक संबंध आहे. सर्व समाजात अवशिष्ट आढळतात. मात्र त्यांचे प्रमाण भिन्न असते. अवशिष्टांचा समाजावर नेहमीच प्रभाव उमटत असून त्यातून भिन्न आदर्शवादाचा व विचार संप्रदायाचा जन्म होतो. अवशिष्टांच्या तुलनेत युक्तीवादाचा प्रभाव कमी असतो. कारण याच्याशी निगडीत सर्व विधाने काल्पनिक स्वरुपाची असल्याने त्यांना वास्तवतेचा आधार नसतो. तरीदेखील युक्तीवादामुळे समाजाचे ऐक्य टिकवण्यास मदत होत असल्याने त्याची गरज भासतेच. यावरुन पॅरेटो शेवटी असे सूचीत करतो की, अवशिष्ट आणि युक्तीवाद हे मानवी सामाजिक क्रिया आणि वर्तन प्रभावीत करतात. त्यामुळे ते दोन्हीही टीकून आहेत. पॅरेटोने या दोहोंना समाजव्यवस्थेचे परस्परावलंबी घटक मानून समाजव्यवस्थेचे संतुलन कायम राखण्यासाठी त्यांचा नेहमीच उपयोग होतो, असे विधान केले.

**१.२.३.३ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

१. विल्फ्रेडो पॅरेटोने आपल्या कोणत्या ग्रंथामध्ये अवशिष्ट सिद्धांतासंबंधी सविस्तर विवेचन केले?

२. अवशिष्ट म्हणजे काय?

३. समाजाचे संतुलन कायम ठेवण्यास बरेच सहाय्य कशामुळे होते?

४. पॅरेटोने अवशिष्टाचे किती प्रकार सांगितले?

५. सामाजिकतेसंबंधीच्या अवशिष्ट प्रकारात कशाचा समावेश होतो?

६. भ्रम किंवा युक्तीवाद म्हणजे काय?

७. विल्फ्रेडो पॅरेटोने भ्रम किंवा युक्तीवादाचे किती व कोणते प्रकार सांगितले?

८. पॅरेटोच्या मते शास्त्रीय सिद्धांतापेक्षा युक्तीवादाला लवकरात लवकर समाजमान्यता का मिळते?

९. अवशिष्टापेक्षा युक्तीवाद कशा स्वरूपाचे असतात?

१०. समाजशास्त्रीय विचारवंतांचे सर्व सिद्धांत कसे आहेत, उदा. मानवतेचा धर्म, समाजवाद, विकास संकल्पना.

### १.२.४ पॅरेटोचा श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांत (The Circulation of Elites Theory by Pareto)

विल्फ्रेडो पॅरेटोचा श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांत हा सर्वात महत्त्वपूर्ण असा समाजशास्त्रीय विचार म्हणून मानला जातो. कोणत्याही समाजामध्ये विविध गुणधर्माच्या व्यक्ती अथवा कर्तृत्वाच्या व्यक्ती आढळून येतात. त्यानुसार समाजात वेगवेगळे स्तर निर्माण झालेले दिसून येतात. स्थूलमानाने समाज हा उच्च व कनिष्ठ अशा दोन गटात विभाजीत झाल्याचे आढळते. यातील उच्च वर्ग हा शक्तिमान तसेच समर्थ असल्याने या वर्गाकडे समाजाच्या नियंत्रणाची सुत्रे केंद्रित झालेली असतात. या वर्गाकडे धन, सामर्थ्य, चातुर्य, कौशल्य यासारंख्या गोष्टी अधिक प्रमाणात असतात, अशी समाजाची धारणा असते. सामान्यपणे हा वर्ग सत्ताधारी असतो, व समाजावर तो आपली अधिसत्ता गाजवितो. या दृष्टीने विचार करता, प्रत्येक मानवी समाजात या उच्च सामाजिक वर्गाचे प्रभुत्व आढळून येते. याचा सरळ अर्थ अशा उच्च वर्गाकडे समाजातील सत्ता व अधिकार एकवटलेले असतात. अशा सत्ता व अधिकार प्राप्त वर्गाच्या संदर्भात पॅरेटोने श्रेष्ठीजन किंवा अभिजात वर्ग (Elite Class) ही संज्ञा वापरली.

वरील विवेचन विचारात घेता असे स्पष्ट होते की, 'श्रेष्ठीजन म्हणजे प्रत्येक क्षेत्रात स्वतच्या गुणांच्या जोरावर यशस्वी झालेल्या आणि व्यवसायिक श्रेणीव्यवस्थेत उच्च स्थान प्राप्त केलेल्या व्यक्तींचा गट होय.' पॅरेटोने श्रेष्ठीजन या संज्ञेला कोणताही नैतिक अर्थ दिलेला नसल्यामुळे व्यापारी, कलाकार, राजकारणी, बुद्धीमान व्यक्ती, धनीक, प्रसिद्ध मल्ल, चांगले खेळाडू अथवा संशोधक यासर्वांचा सामावेश श्रेष्ठीजन या सदरात होतो.

पॅरेटोने श्रेष्ठीजनांचे दोन प्रकार पाडले. १) सत्ताधिश अथवा शासक श्रेष्ठीजन आणि २)सत्ताविहिन अथवा सामान्य सत्ताधिश शासक श्रेष्ठीजनांचा प्रशासनात व अर्थकारणात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खूपच प्रभाव असतो. तर सत्ताविहीन किंवा सामान्य श्रेष्ठीजनांचा राजकारण व अर्थकारणात प्रभाव नसतो.

पॅरेटोच्या या श्रेष्ठीजन कल्पनेत काही वेळा संदिग्धता आढळते. कारण काही वेळा तो श्रेष्ठीजन म्हणजे स्वतच्या गुणांच्या जोरावर श्रेष्ठ स्थान प्राप्त करून घेतलेल्या व्यक्ती असे म्हणतो, तर काही वेळेला ज्यांना श्रेष्ठत्व चिकटवले आहे अशा व्यक्ती म्हणजे 'श्रेष्ठीजन' असेही म्हणताना तो आढळतों. याचा अर्थ, समाजात ज्याच्या अंगी आवश्यक पात्रता नाही अशांना श्रेष्ठीजन म्हणून ओळखले जाते, तर या उलट अंगी गुणवत्ता असताना देखील काहींचा श्रेष्ठीजन म्हणून उल्लेख केला जात नाही. थोडक्यात, कोणतीही गुणवत्ता नसताना देखील संपत्ती व घराण्याची प्रतिष्ठा यामुळे व्यक्तीला सत्ताधिश श्रेष्ठीजनांच्या पंक्तीस नेवून बसविले जाते. उदा. राजे, अमीर, उमराव, धनिक, जमिनदार, कारखानदार, मोठे व्यापारी इ. खरे पाहता, अशा व्यक्तींचा श्रेष्ठीजन या पदावर काहीच अधिकार नाही. अंगी गुण नसणाऱ्या व्यक्तींना देखिल सामाजात श्रेष्ठीजन म्हणून स्थान मिळू शकते हे लक्षात घेवून पॅरेटोने मुक्त समाज रचनेचा आणि सामाजिक गतिशिलतेचा पुरस्कार केला. त्याच्यामते, मुक्तसमाजरचनेत व्यक्तींना एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत जाता येते. याचा फायदा म्हणजे श्रेष्ठीजन स्थानी नेहमी कर्तुत्ववान अथवा गुणवान व्यक्तीच येवू शकतील. हे असे घडून येईल, ते दर्शविण्यासाठी पॅरेटोने जी कल्पना मांडली, तिला 'श्रेष्ठीजन अभसरण कल्पना' (The Circulation of elites) असे म्हटले जाते.

पॅरेटोच्या मते, ज्या बौद्धीक, शारीरीक आणि नैतिक गुणधर्माच्या जोरावर श्रेष्ठीजन वर्ग निर्माण होत

असतो, तो कायमच श्रेष्ठीजन म्हणून राहत नाही. याचा अर्थ हे गुणधर्म कमी झाले की, अशा व्यक्तींचे श्रेष्ठजनत्व संपुष्टात येते. याउलट समाजात जो कनिष्ठ वर्ग म्हणून ओळखला जातो, अशा वर्गामध्ये वरील गुणधर्म निर्माण झाले की, आपोआप असा कनिष्ठ वर्ग देखिल श्रेष्ठीजन वर्ग म्हणून ओळखला जातो. समाजात अशी वरखाली जाण्यायेण्याची प्रक्रिया सतत चालू असते. या प्रक्रियेलाच पॅरेटोने 'श्रेष्ठीजन अभिसरणाची प्रक्रिया' (The Circulation of Elites) असे नांव दिले.

श्रेष्ठीजन अभिसरण प्रक्रियेच्या वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, सामाजिक स्तरिकरणातील कोणताही वर्ग नेहमीच स्थिर असलेला आढळत नाही. विशेषतः श्रेष्ठीजन वर्ग नेहमी अस्थिर असतो. आपल्या जीवनातील यश – अपयशानुसार समाजातील वर्गावर्गात हे अभिसरण सातत्याने चालू असल्याचे दिसून येते. पॅरेटोच्या मते, अशी वर्गव्यवस्था लवचिक असल्यामुळे समाजात अभिसरणाची प्रक्रिया अखंडपणे चालू असते. मात्र ती प्रत्येक समाजात एकसारखी आढळत नसते तर तिची तिव्रता भिन्न भिन्न स्वरूपाची असते. तरीदेखील हे अभिसरण अनिवार्यपणे होतच असते.

**श्रेष्ठीजन अभिसरण प्रक्रियेची कारणे –**

पॅरेटोने श्रेष्ठीजन अभिसरण प्रक्रियेची तीन प्रमुख कारणे सांगितली की, ज्यामुळे समाजात अशी प्रक्रिया सतत चालू असल्याचे दिसून येते.

**१. लवचीक व मुक्त वर्गव्यवस्था –**

पॅरेटोच्या मते, मुक्त अथवा खुल्या वर्गव्यवस्थेत व्यक्तींना त्यांच्या गुणवत्तेनुसार उच्च किंवा कनिष्ठ स्थान प्राप्त होत असते. याचा अर्थ आशा व्यवस्थेत स्वत:चा विकास करून घेण्याची संधी प्राप्त होते. ज्यांच्याजवळ आत्मोन्नतीचे गुणधर्म असतात, ते आपोआप श्रेष्ठीजन वर्गात जातात. आणि ज्यांच्यातील गुणांची अधोगती होत जाते. ते आपल्या विनाशाला कारणीभूत ठरतात. स्वत:चे थडगे स्वत:च खोदतात. थोडक्यात कोणताही श्रेष्ठीजन वर्ग स्थिर किंवा कायमस्वरूपात कधीच नसतो. त्यामुळे लवचिक अथवा खुल्या वर्गव्यवस्थेत श्रेष्ठीजन अभिसरण प्रक्रिया आढळून येते.

**२. श्रेष्ठीजन वर्गातील अधिकाऱ्याकडे सत्ता –**

पॅरोटोच्या मते, श्रेष्ठीजन वर्गातील अधिकाऱ्याकडे सत्ता आल्याने असा वर्ग सत्ताधिश म्हणून ओळखला जातो. समाजातील असा वर्ग उच्च, शक्तिमान व समर्थ असल्याने त्याच्याकडे समाजाच्या नियंत्रणाची सूत्रे केंद्रित झालेली असतात. सहाजिकच असा वर्ग समाजावर आपली अधिसत्ता गाजवीत असतो. त्याच्याकडे असणारी सत्ता संपुष्टात आली की, अशा अधिकाराचे पतन होते. यालाच पॅरेटो श्रेष्ठीजन अभिसरण कल्पना असे म्हणतो.

**३. कनिष्ठ वर्गातील कुशल व्यक्ती गुणांच्या जोरावर श्रेष्ठ वर्गात जातात –**

पॅरेटोने अभिसरण प्रक्रियेची कारणीमांसा विशद करताना कनिष्ठ वर्गातील कुशल व्यक्ती आपल्या अंगी असणाऱ्या गुणांच्या जोरावर श्रेष्ठ वर्गात जातात. असा विचार व्यक्त केला. याचा अर्थ, व्यक्ती कनिष्ठ वर्गातील असली परंतू तिच्या अंगी जर चांगले गुण असतील तर तिला मुक्त वर्गव्यवस्थेत सत्ताधिश श्रेष्ठीजन बनण्याची संधी प्राप्त होते.

थोडक्यात, सामाजिक परिस्थितीनुसार समाजात चढउतार होत असतात. त्याचा परिणाम श्रेष्ठीजन वर्गावर होत असतो. जोपर्यंत परिस्थिती अनुकूल असते तोपर्यंत समाजावर श्रेष्ठीजन वर्गाचे प्रभुत्व असते.

जेव्हा नवीन शक्तीचा उदय होतो तेव्हा एक श्रेंष्ठीजन वर्ग संपुष्टात येवून त्याची जागा दुसरा श्रेष्ठीजन वर्ग घेतो. त्यामुळे कोणताही श्रेष्ठीजन वर्ग कायमस्वरूपात श्रेष्ठीजन राहील याची खात्री नसते. मात्र समाजात कोणतातरी श्रेष्ठीजन वर्ग नेहमीच अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

**अभिसरण प्रक्रिया (Circulation Process ) –**

'श्रेष्ठीजन वर्गाचे पतन अथवा सामान्य वर्गाचे श्रेष्ठीजनात रूपांतर होणे ही प्रक्रिया प्रत्येक समाजात चालू असते. त्यालाच पॅरेटोने अभिसरण प्रक्रिया अथवा सामाजिक गतिमानतेची प्रक्रिया असे संबोधले.' अशा अभिसरण प्रक्रियेमूळे ज्यांच्या अधिकारांना अथवा प्रतिष्ठेला धोका निर्माण होतो. अशा व्यक्ती अभिसरण प्रक्रिया रोखण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी प्रसंगी बळाचा अथवा सामर्थ्याचा वापर करतात. परंतू या गोष्टीने श्रेष्ठीजन वर्गाचे अस्तित्वच धोक्यात येते कारण सत्तेला अथवा अधिकाराला चिकटून राहण्याची त्यांची वृत्ती सर्वसामान्यांना मान्य नसते. अशा वृत्तीचा सामान्यांच्याकडून निषेध केला जातो. त्यांचे श्रेष्ठीजनत्वच संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला जातो. याचा अर्थ श्रेष्ठीजन वर्ग हा स्वतःच्या नाशाला स्वतःच कारणीभूत ठरतो. स्वतःचे थडगे तो स्वतःच खोदत असतो. या पार्श्वभूमीवर पॅरेटोने असे म्हटले आहे की, **इतिहास हा बड्या कुलीन लोकांचे कबरस्थान असतो.** (History is a grave yard of aristocracies) या संदर्भात पॅरेटोने घराणेशाही, भारतीय समाजातील जाती, प्रथा इत्यादींची उदाहरणे दिली आहेत. जेव्हा श्रेष्ठीजन वर्ग स्वतःची प्रतिष्ठा जपण्याचा आटोकाट प्रयत्न करताना अनुवंशीकतेला चिकटून राहण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा कालांतराने नवीन श्रेष्ठीजन वर्ग उदयास येतो. सहाजिकच जुना वर्ग संपुष्टात येतो. यालाच पॅरेटोने 'श्रेष्ठीजन वर्ग अभिसरण प्रक्रिया' असे नाव दिले.

पॅरेटो आपल्या श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांतासंबंधी असे विधान करतो की, समाजाला श्रेष्ठीजनपदी गुणसंपन्न अथवा सामर्थ्यवान व्यक्ती मिळण्यासाठी नेहमीच श्रेष्ठीजनांचे अभिसरण होणे अतिशय गरजेचे असते. त्याच्यामते, समाजात सुरुवातीच्या काळात उच्च पदावर येणाऱ्या व्यक्ती या गुणवान असतात. त्या स्वतच्या गुणांच्या जोरावर उच्च पदावर आलेल्या असतात. साहाजिकच त्यांच्याकडून अशा उच्च पदाची प्रतिष्ठा जोपसण्याचा काटेकोर प्रयत्न केला जातो. परंतू कालांतराने अशी पदे अनुवंशिक होतात. व्यक्तीच्या अंगी असणारे चांगले गूण हळूहळू कमी होतात. त्या जागी येण्याचा कनिष्ठ वर्गातील व्यक्तींकडून प्रयत्न केला जातो. त्यामुळे अशा वर्गात नित्य अभिसरण सुरू असते.

समाजातील शासक (सत्ताधिश) आणि अशासक (सत्ताविहीन) श्रेष्ठीजनांनी आपल्या वर्गाचे दरवाजे बंद केले अथवा कनिष्ठ वर्गातील गुणी व्यक्तींच्या गुणांना वाव दिला नाही, किंवा त्यांना उच्चपदे भुषविण्यास विरोध केला तर समाजाचा समतोल बिघडेल. म्हणून पॅरेटोने असे म्हटले आहे की, जोपर्यंत सत्ताधीश श्रेष्ठीजनांकडून सत्ताविहीन अथवा कनिष्ठ वर्गातील गुणसंपन्न व्यक्तींना आपल्या मध्ये सामावून घेतले जात नाही, तोपर्यंत राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात असमतोल राहील. कनिष्ठ वर्गातील गुणसंपन्न व्यक्ती संघर्ष मार्गाचा अवलंब करतील, सर्व बळानिशी श्रेष्ठीजनांची मिरासदारी संपवतील व शेवटी अपात्र श्रेष्ठीजनांच्या जागी पात्र असे श्रेष्ठीजन येतील. हे कसे घडून येईल हे दर्शविण्यासाठी पॅरेटोने आपला वरील श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांत (Theory of Circulation of Elite) मांडला. त्यानुसार मानव समाजात सुरुवातीला योद्धे, पुरोहित, आणि वैश्य इ. चे वर्चस्व होते. या तीन वर्गामधूनच श्रेष्ठीजन वर्ग अस्तित्वात येत होते. कालांतराने अंगच्या गुणांऐवजी जन्म, संपत्ती, घराणे यांना जास्त महत्व प्राप्त झाले, याचा परिणाम म्हणजे श्रेष्ठीजनांमध्ये अपात्र व्यक्तींची भरती झाली. समाजाची सत्ता अशा अपात्र व्यक्तींच्या हातात गेली तर समाज व्यवस्था कोलमडून पडेल. म्हणून पॅरेटो असे सुचीत करतो की, मुक्त समाजरचनेसाठी बहुजन

समाजातील अपात्र व्यक्तींची हकालपट्टी करून त्यांच्या जागी सत्ताविहीन वर्गातील पात्र व्यक्तींची नियुक्ती करणे हेच योग्य आहे. यामुळेच पॅरेटोला, **'मुक्त समाजरचनेचा कट्टर पुरस्कर्ता'** म्हणून ओळखले जाते.

पॅरेटोच्या श्रेष्ठीजन अभिसरण सिद्धांतांच्या वरील सखोल विवेचनावरून त्यामध्ये खालील प्रमाणे काही ठळक गोष्टी आढळून येतात.

१. पॅरेटोने प्रारंभी समाजाचे उच्च वर्ग व कनिष्ठ वर्ग असे दोन वर्गात विभाजन केले. पहिल्या वर्गात व्यक्ती बुद्धी, चारित्र्य व कौशल्य इ. विशेष गुणांनी संपन्न असल्याने या वर्गातील व्यक्तींना त्याने श्रेष्ठीजन वर्ग मानले.

२. पॅरेटोच्या मते, श्रेष्ठीजनवर्गात नेहमी अभिसरण सुरू असते. अशा वर्गाचे पतन झाले की, तोच कनिष्ठ बनतो. त्याचे अभिसरण गुणपतनावर आधारित असते.

३. पॅरेटो असेहि म्हणतो की, समाजात उच्च वर्ग असो किंवा कनिष्ठ वर्ग असो त्यातील उच्च वर्ग गुणांच्या पतनामुळे कनिष्ठ वर्गात जातो आणि कनिष्ठ वर्ग गुण संपादन करून उच्च वर्गाचे स्थान बळकावतो. याला पॅरेटोने 'उर्ध्वगामी व अधोगामी वक्र' (Upward & Downward Cycle) असे संबोधले.

४. उर्ध्वगमन व अधोगमन हा विकासक्रम प्रत्येक काळी व प्रत्येक समाजात आढळून येतो. भारतातील जातीव्यवस्थेला देखील हेच तत्व लागू आहे.

५. समाजातील श्रेष्ठीजन अभिसरण परिवर्तनशीलता लक्षात घेऊन पॅरेटो असे सूचित करतो की, इतिहास म्हणजे कुलीन वर्गाची स्मशानभूमी आहे. याचा अर्थ जेंव्हा समाजातील उच्च वर्गात कनिष्ठ वर्गाला नियंत्रण करण्याची शक्ती रहात नाही तेंव्हा अभिजात वर्गाची संख्या कमी होते. आणि त्याची जागा कनिष्ठ वर्गातून वर आलेले लोक भरून काढतात. साहजिकच श्रेष्ठीजन वर्गात सतत परिवर्तनशिलता सुरू असल्याचे दिसून येते.

पॅरेटोचा श्रेष्ठीजन अभिसरण सिध्दांत म्हणजे समाजशास्त्रातील त्याचा अत्यंत महत्वपूर्ण विचार मानला जातो. त्याची श्रेष्ठीजन ही संज्ञा जरी संदिग्ध स्वरुपाची वाटत असली तरी त्याने एका निश्चित अर्थाने हा शब्द प्रयोग वापरल्याचे दिसून येते. त्याला नैतिक अधिष्ठान नसले तरी कोझरच्या मते, सुरूवातीस असणारे सैनिक, धर्मगुरू व व्यापारी यांसारखे श्रेष्ठीजन मुक्तवर्ग रचनेमुळे अथवा अभिसरण प्रक्रियेमुळे संपुष्टात आले. बोगार्डस्च्या मते, वर्तमानकाळातील तथाकथित श्रेष्ठीजन सरकार लवकरच संपुष्टात येईल आणि त्यातून नवीन शक्तिशाली श्रेष्ठीजन वर्गाची निर्मिती होईल. हा वर्ग अर्थातच खालच्या वर्गातून अभिसरण प्रक्रियेद्वारा आलेला असेल.

सध्याच्या काळाचा विचार करता, पॅरेटोचा श्रेष्ठीजन अभिसरण सिध्दांत हा भारतासारख्या देशात वेगळया दृष्टीने अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येते. उदा. भारतात सध्या सत्तेला चिकटून राहण्याची वृत्ती वाढत असल्याचे दिसून येते. प्रसंगी अशा व्यक्तींना देखील खाली खेचण्याची वृत्ती सर्वसामान्यांच्यामध्ये निर्माण झाल्याने भारतात राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात श्रेष्ठीजन अभिसरण प्रक्रिया सुरू असल्याचे आढळून येते. यासंदर्भात पॅरेटोच्या वरील सिध्दांताला सामाजिक परिवर्तनाचा चक्रिय सिध्दांत असेही संबोधले जाते.

### १.२.४.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न –

**अ. बहुपर्यायी प्रश्न**

१. खालीलपैकी कोणत्या घटकांचे विश्लेषण पॅरेटो यांनी श्रेष्ठजनांच्या सत्ता अभिसरण सिध्दांतामध्ये केले आहे ?

अ) मानवी वर्तन ब) सामाजिक स्तरीकरण

क) सामाजिक नियंत्रणाचे स्वरुप ड) वरीलपैकी एकही नाही

२. श्रेष्ठजन (Elites) ही संज्ञा कशाशी संबंधित आहे ?

अ) ज्या–त्या क्षेत्रात पात्र आणि सामर्थवान असणारी व्यक्ती

ब) कनिष्ठ वर्गातील व्यक्ती क) मध्यम वर्गातील व्यक्ती ड)वरीलपैकी एकही नाही

३. खालीलपैकी कोण राजकीय क्षेत्राशी सबंधित श्रेष्ठजन आहे ?

अ) सर्वसामान्य व्यक्ती ब) मतदाता

क) सरकारी कर्मचारी ड) वरीलपैकी एकही नाही

४. पॅरेटोच्या मते, कोणत्या स्वरुपाच्या समाज व्यवस्थेत श्रेष्ठजन (Elites) आपल्या बौध्दीक पात्रतेवर पद संपादन करु शकतो ?

अ) अमेरिकन समाज ब) मागासलेला समाज

क) अदिवासी समाज ड) मुक्त समाज

५. श्रेष्ठजनांच्या सत्ता अभिसरणातून खालीलपैकी कोणते उद्दिष्ठ साध्य होते ?

अ) समाज कल्याण ब) शिस्त

क) सामाजिक संतुलन ड) वरीलपैकी एकही नाही

## १.३ सारांश

**पॅरेटोच्या विचारांचे मूल्यांकन –**

विल्फ्रेडो पॅरेटो या इटालियन विचारवंताने समाजविषयक संकल्पना आणि समाजशास्त्र, तर्कसंगत व तक्रविसंगत मानवी क्रिया, अवशिष्ट व युक्तिवाद सिद्धांत आणि श्रेष्ठीजन अभिसरणाचा सिद्धांत यासंबंधी जे विचार मांडले, त्या विचारांबाबत विचारवंतांमध्ये मतभेद आढळून येतात. काहींनी पॅरेटोचे विचार टाकाऊ स्वरूपाचे आहेत असे मत मांडले. उदा. पॅरेटोचा श्रेष्ठीजन अभिसरण विचार म्हणजे हुकूमशाही प्रवृत्तीचा पुरस्कार करणारा विचार होय. तसेच तो अविशिष्ट व युक्तिवाद संकल्पनेतील फरक सिद्ध करण्यात अपयशी ठरला, यासंबधी तो अनेक ठिकाणी गोंधळलेला दिसतो, अशी टीका करण्यात आली. असे असले तरी पॅरेटोच्या वरील विविध विचारांचे मूल्यांकन करताना आपणास हे विचार समाजशास्त्रीय दृष्ट्या महत्वपूर्ण वाटतात. उदा. पॅरेटो समाजशास्त्राचा अभ्यास वास्तव दृष्टीकोनातूनच केला पाहिजे असे आग्रहपूर्वक सांगतो. या संदर्भात त्याने समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना समाज कसा असावा? याचा विचार करण्यापेक्षा तो कसा

आहे? याकडे प्रथम लक्ष द्या असा संदेश दिला. याचा अर्थ **अवास्तवतेकडे दुर्लक्ष करून वास्तवतेला महत्व द्या** असे सांगितले. तसेच मानवी वर्तनाचा अभ्यास करताना तर्कसंगत वर्तनाच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष केंद्रित करा. त्यासाठी निरीक्षण व प्रयोग पद्धतीचा अवलंब केल्यास अचूक निष्कर्ष मिळू शकतील यावर भर दिला. पॅरेटोचे समाजशास्त्रा-संबंधीचे वरील विचार म्हणजे एक प्रकारे त्याच्या विज्ञाननिष्ठेचे प्रतिकच मानले जाते. सहाजिकच त्यामुळे पॅरेटोचे विचार टाकाऊ होते, असे मुळीच म्हणता येणार नाही.

पॅरेटोच्या वरील सर्व विचारांचे मूल्यमापन करताना **कोझरने** असे म्हटले आहे की, पॅरेटो हा समाजव्यवस्था, तिची घटकतत्वे व त्यांच्यातील परस्परसंबंध आणि परस्परावलंबन इत्यादींबाबत स्पष्ट विचार मांडणारा पहिला विचारवंत म्हणून ओळखला जातो. **रेमंड अॅरो** असे विधान करतो की, पॅरेटोला आपल्या काही विचारांमध्ये सुस्वरूपता आणता आली नसली तरी समाजशास्त्रीय विचारांमध्ये मात्र त्याने नवीन दालन खोलले हे नाकारून चालणार नाही. **पार्सन्सने** या संदर्भात असा विचार मांडला आहे की, पॅरेटोच्या समाजशास्त्रीय विचारामध्ये काही प्रमाणात विसंगती आढळत असली तरी त्यानेच प्राचीन प्रत्यक्षवादाची कोसळणारी इमारत तिची पुर्नबांधणी करून टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला. यातच त्याच्या विचाराचे यश सामावलेले दिसून येते.

पॅरेटोने विशद केलेल्या वरील विविध विचारांचा टीकात्मक आढावा विचारात घेता शेवटी असे म्हणता येईल की, पॅरेटोने समाजातील वास्तवतेला अधिक महत्व दिले आहे, तर्कविसंगत मानवी वर्तन न अभ्यासता तर्कसंगत वर्तनच विचारात घ्या असा सल्ला दिला. तसेच प्रत्येक अभ्यासकाने समाजाचा अभ्यास करताना कल्पना साम्राज्यात रममाण न होता वास्तवतेवर अधिक भर द्यावा असा महत्वपूर्ण विचार मांडला, त्यामुळेच त्याच्या विविध विचारांना समाजशास्त्रीयदृष्ट्या अनन्यसाधारण महत्व निर्माण झाल्याचे दिसून येते.

## १.४ पारिभाषीक संज्ञा

- **तार्किक प्रयोगात्मक विज्ञान** - यथार्थ व पूर्णतः वैज्ञानिक पद्धतीचे प्रतिपादन
- **सामाजिक संतुलन** - संघटनात्मक व विघटनात्मक प्रक्रियेचा प्रभाव
- **तार्किक क्रिया** - ज्या ठिकाणी विचार किंवा घटनांची मांडणी वास्तव माहितीवर होत असते, अशी क्रिया.
- **व्यक्तिवर्तनातील अवशिष्ट घटक** (Residues) - व्यक्ती वर्तनाशी निगडीत असणाऱ्या नैसर्गिक उपजत - प्रवृत्ती
- **भ्रम किंवा युक्तीवाद** (Derivation) - व्यक्तीच्या मनामध्ये असणाऱ्या विचारांचे होणारे प्रकटीकरण
- **श्रेष्ठजन** (Elite) -विविध क्षेत्रात असणाऱ्या पात्र आणि सामर्थ्यवान व्यक्ती की, ज्यांना त्या क्षेत्रातील फायदे अधिक मिळतात.
- **संतुलन** - समाज व्यवस्थेमधील योग्य वितरण - व्यवस्था.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं अध्ययन प्रश्न –१.२.१.१ ची उत्तरे**

  १. विल्फ्रेडो पॅरेटो  २. प्रत्यक्षानुसारी विज्ञान  ३. विल्फ्रेडो पॅरेटो

  ४. समाजातील संघटनात्मक आणि विघटनात्मक प्रक्रिया तुल्यबळ असणे.

  ५. Treatise on general Sociology, Mind & Societ

  ६. वैज्ञानिक दृष्टीकोणातून  ७. तार्किक प्रयोगात्मक विज्ञान

  ८. तथ्यांच्या अभ्यासावर व निरीक्षणावर  ९. विल्फ्रेडो पॅरेटो

  १०. अनुमान, कल्पना, अंधःश्रद्धा आणि तात्त्विक सिद्धांत

- **स्वयं अध्ययन प्रश्न –१.२.२.२ ची उत्तरे**

  १. वैज्ञानिक प्रयोग पध्दती  २. मानवी भाव-भावना

  ३. अर्थशास्त्र  ४. अतार्किक स्वरुपाचे

  ५. मानवी वर्तन

- **स्वयं अध्ययन प्रश्न –१.२.३.३ ची उत्तरे**

  १. "Trattatod, Sociologia General"

  २. ''अवशिष्ट म्हणजे मूळ प्रवृत्ती किंवा भावना नव्हे तर भावनांची अभिव्यक्ती होय.''

  ३. अवशिष्टामुळे  ४. सहा प्रकार

  ५. मनुष्य प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करण्याच्या संदर्भातील घटकांचा समावेश होतो.

  ६. ''भावना व मूळ प्रवृत्तीच्या वर्तनातील अभिव्यक्तीशी संबंधित असणारे समर्थन म्हणजे भ्रम किंवा युक्तीवाद होय.''

  ७. चार प्रकार उदा. निश्चित स्वरूपाचे अधिकारदर्शक, भावनाजन्म आणि शाब्दिक युक्तीवाद.

  ८. युक्तीवादामध्ये भावनाना आवाहन केलेले असते तसेच व्यक्तींच्या वर्तनावर युक्तीवादाचा फार मोठा परिणाम होत असतो.

  ९. युक्तीवाद हे अधिक अस्थिर, काल्पनिक, लवचिक व परिवर्तनशील.

  १०. सर्व समाजशास्त्रीय विचारवंतांचे सर्व सिद्धांत युक्तीवाद निर्मित आहेत.

- **स्वयं अध्ययन प्रश्न –१.२.४.४ ची उत्तरे**

  १. सामाजिक स्तरीकरण  २. ज्या-त्या क्षेत्रातील पात्र आणि सामर्थ्यवान व्यक्ती

  ३. सरकारी कर्मचारी  ४. मुक्त समाज  ५. सामाजिक संतुलन

## १.६ सरावासाठी प्रश्न

१. तार्किक आणि अतार्किक क्रियांच्या मधील फरक जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

२. समाजशास्त्रातील सिद्धांताची पाहणी करून त्याची अतार्किक स्वरूपात कशी मांडणी केली आहे हे तपासून पहा.

३. भारतीय समाज व्यवस्थेची इतर समाज-व्यवस्थेशी तुलना करून आपला भारतीय समाज विविध वर्ग आणि समूहांच्या मध्ये कसा विभागला आहे हे पहा.

४. तुमच्या ठिकाणच्या स्थानिक ग्रामपंचायती, नगर पालिका यांची रचना जाणून घेण्याचा प्रयत्न करा आणि त्यामध्ये कोणत्या व्यक्ती राज्य कारभार सांभाळतात याचे निरीक्षण करा.

५. कोणत्याही एका सामाजिक घटनेचे स्पष्टीकरण भावनेशिवाय करता येते का? ते पहा. आणि मानवी वर्तनाच्या हस्तक्षेपाखेरीज घटनांचे स्पष्टीकरण करता येवू शकते का? हे जाणून घ्या.

६. विविध अभ्यासकांनी पॅरेटोच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण ज्या पुस्तकामध्ये केले आहे त्या पुस्तकांचा संदर्भ घ्या.

७. परीक्षेच्या दृष्टीकोनातून खालील प्रश्नांची तयारी करा.

   १. पॅरेटो यांनी दिलेल्या तार्किक आणि अतार्किक क्रिया स्पष्ट करा.

   २. पॅरेटो यांचा अवशिष्ट आणि भ्रम किंवा युक्तिवाद सिध्दांत विशद करा.

   ३. पॅरेटो यांचा 'श्रेष्ठीजन सत्ता अभिसरण सिध्दांत' यावर भाष्य करा.

   ४. टिपा लिहा.

      अ) पॅरेटोची तार्किक अथवा तर्कसंगत क्रिया

      ब) पॅरेटोची अतार्किक अथवा तर्क विसंगत क्रिया

      क) अवशिष्ट सिध्दांत

      ड) मानवी विचारांचा उगम अथवा युक्तिवाद सिध्दांत

      इ) पॅरेटोचा श्रेष्ठीजन अभिसरण सिध्दांत

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


1. Coser Lewis A. Masters of Sociological Thought - Ideas in historical and social context. Rawat Publication, Second edition, New Delhi

2. Jayapalan N. Sociological Theories. Atlantic Publishers and distributors, New Delhi

3. Ritzer George (1996) Classical Sociological Theory, New york : The Mc Growhill, Compasnise, Ine


❑❑❑

# सत्र–२ : घटक – २
# चार्लस् हॉर्टन कुले (१८६४–१९२९)

**घटक संरचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय–विवेचन

२.२.१ चार्लस कुलेंची बौद्धिक पार्श्वभूमी

२.२.१.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.२.२ चार्लस कुले यांचे 'व्यक्ती आणि समाज' यासंबंधीचे विचार

२.२.२.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.२.३ कुले यांचे 'स्व' संबंधीचे विचार अथवा कुलेंचा प्रतिबिंबित स्वत्व संकल्पना सिद्धांत

२.२.३.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.२.४ कुले यांचे प्राथमिक समूहासंबंधीचे अथवा गटासंबंधीचे विचार

२.२.४.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.३ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.४ सारांश

२.५ सरावासाठी प्रश्न

२.६ क्षेत्रीय कार्ये

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास

- कुलेचे व्यक्ती आणि समाज यामधील संबंध स्पष्ट करता येतील.
- कुलेनी मांडलेल्या 'स्व'/ प्रतिबिंबीत 'स्व' ची कल्पना स्पष्ट करता येईल.
- कुलेनी प्राथमिक समुहासंबंधी मांडलेले विचार समजून घेता येतील.

## २.१ प्रस्तावना

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ सी. एच. कुले यांनी मांडलेल्या अनेक सामाजिक विचारांपैकी 'समाजविषयक सिध्दांत' हा अतिशय महत्वपूर्ण म्हणून ओळखला जातो. व्यक्ति आणि समाज हे दोन स्वतंत्र घटक नसून ते दोन्हीही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत (Two sides of a same coin). त्यांना एकमेकांपासून स्वतंत्र करताच येत नाही त्या दोघांचेही अस्तित्व एकमेकावर अवलंबून आहे, असे कुलेचे मत आहे. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या 'स्व'चा विकास हा समाजातच होत असतो. 'स्व' च्या विकासातून व्यक्तीचे व्यक्तिमत्व विकसित होत जाते. या 'स्व' च्या विकासात प्राथमिक गटाचा वाटा महत्वपूर्ण आहे. समाज कोणत्याही प्रकाराचा असो (आदिम, ग्रामीण, शहरी, अतिविकसीत) त्यामध्ये प्राथमिक गटांचे अस्तित्व हे असतेच. प्रत्येक व्यक्तीच्या विकासामध्ये प्राथमिक गट हे अत्यंत महत्वाची भूमिका बजावीत असतात. त्यामुळे समाजजीवनात व व्यक्ती जीवनातही प्राथमिक गटांना अनन्य साधारण महत्व आहे. प्राथमिक गटामध्ये कुटुंब, शेजार आणि सवंगडी (मित्र) यांचा कुलेने प्रामुख्याने उल्लेख केलेला आहे. यासंबंधी कुलेचे सविस्तर विचार आपण पुढे पाहणार आहोत.

### २.२.१ चार्लस् हॉर्टन कुलेची बौद्धिक पार्श्वभूमी (Charles Horton Cooley-A) (Intellectual background)

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ चार्लस् कुले यांची बौद्धिक पार्श्वभूमी अभ्यासत असताना प्रामुख्याने कुले यांचे प्रमुख आणि महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय विचार विस्तारपूर्वक अभ्यासणे आवश्यक आहे. कुले यांनी सामाजिक घटनांचे विश्लेषण मानसिक दृष्टीकोणातून केले आहे. त्यामुळे सामाजिक विचार विश्वामध्ये चार्लस् कुले यांचे स्थान अद्वितीय आहे असेच म्हणावे लागेल.

कुले यांच्या सामाजिक चिंतनातील महत्त्वपूर्ण विचार खालीलप्रमाणे सांगता येतील. उदा. व्यक्ती आणि समाज या दोन परस्पर विरोधी अशा बाबी नाहीत तर त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. याचा अर्थ व्यक्तीशिवाय समाज आणि समाजाशिवाय व्यक्ती स्वतंत्र करताच येत नाहीत. त्या दाहोंचे अस्तित्व एकमेकावर अवलंबून आहे. व्यक्तीच्या 'स्व'चा विकास हा समाजामध्येच होत असतो. या विकासामध्ये कुटुंबासारख्या प्राथमिक गटाचा अथवा समूहाचा वाटा महत्त्वपूर्ण असतो. या विचाराशिवाय कुले यांनी 'स्व' प्रतिबिंबित संकल्पना या विचारावर देखील विस्ताराने आढावा घेण्याचा प्रयत्न केला. बौद्धिक पार्श्वभूमीमध्ये हे सर्व विचार अभ्यासणे आवश्यक आहे.

**विषय विवेचन**

I) **चार्लस् हॉर्टन कुलेचा जीवनवृत्तांत**

चार्लस् कुले हे अमेरिकन विचारवंत असून त्यांचा जन्म इ. स. १८६४ मध्ये झाला. त्यांनी अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण घेतले. परंतु प्रत्यक्षात त्यांना इतिहास, अर्थशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयात विशेष रस होता. इ.स. १८९० मध्ये मिशिगन विद्यापीठात अर्थशास्त्र व समाजशास्त्र विषयाचा अभ्यास करताना त्यांनी या विद्यापीठाला ''वाहतुकीचा सिद्धांत'' (Theory of Transportation) हा पीएच.डी. चा सिद्धांत सादर केला, त्यांनी 'स्व'ची निर्मिती अथवा 'स्वत्व' आणि त्याचा विकास या विषयावर सखोल असा अभ्यास केला. त्यातूनच त्यांचा ''स्व प्रतिबिंबित संकल्पना'' Looking Glass Self Concept हा विचार सर्व जगभर प्रचलित झाला. इ.स. १९२९ मध्ये कुलेचे निधन झाले.

II) **चार्लस् कुलेची ग्रंथसंपदा**

चार्लस् कुलेनी खालील विविध महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लिखान करून त्याद्वारे आपले समाजशास्त्रीय विचार स्पष्ट केले.

उदा. वाहतुकीचा सिद्धांत, सामाजिक संघटन, सामाजिक प्रक्रिया, मानवी वर्तन आणि समाजरचना, समाजशास्त्रीय सिद्धांत आणि सामाजिक संशोधन यासारख्या ग्रंथामधून 'स्व'ची निर्मिती आणि विकास प्राथमिक गट अथवा समूह, समाजविषयीचा जैविक दृष्टिकोण, समाजशास्त्रीय पद्धती, याबाबतचे विविध प्रकारचे विचार मांडले.

III) **चार्लस् कुले यांच्यावर विविध विचारवंतांचा पडलेला प्रभाव**

चार्लस् कुलेच्या विविध समाजशास्त्रीय विचारांवर विल्यम जेम्स, चार्लस् डार्विन, ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पन्सर, लेस्टर वॉर्ड, शॅफेल, इमर्सन व गेट, गिडींग्ज इत्यादी विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

IV) **चार्लस् कुलेंचे प्रमुख समाजशास्त्रीय विचार**

या घटकामध्ये **कुलेंची बौद्धिक पार्श्वभूमी** अभ्यासताना त्यांच्या खालील विविध महत्त्वपूर्ण विचारांचा मागोवा घ्यावा लागेल. कुले यांचे समाजशास्त्रीय विचारामधील योगदान अतिशय महत्त्वाचे समजले जाते.

उदा. **अ) कुले यांचे 'व्यक्ती आणि समाज' यासंबंधीचे विचार** (Cooley's Views on relation between Individual & Society)

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ चार्लस् हॉर्टन कुले यांनी आपल्या "Human nature and Social Order", या ग्रंथामध्ये व्यक्तीचे 'स्वत्व' आणि 'सामाजिक प्रक्रिया' यांच्यातील परस्परसंबंधांवर चर्चा केली. कुलेंच्या मते, व्यक्ती आणि समाज हे दोन्ही घटक भिन्न नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. व्यक्ती आणि समाजाला स्वतंत्र अस्तित्व नाही. दोहोतील संबंध सेंद्रिय स्वरूपाचे आहेत. समाज ही एक मानसिक 'स्व' नी गुंफलेली व्यवस्था असून अशा समाजात वावरताना प्रत्येक व्यक्तीमध्ये अनेक प्रकारचे संबंध प्रस्थापित होत असतात. व्यक्ती आणि समाज या दोहोनाही समान महत्त्व आहे.

थोडक्यात व्यक्तीशिवाय समाजाचे अस्तित्व नाही तसेच समाजाशिवाय व्यक्तीची कल्पनाच अशक्य आहे.

**ब) चार्लस् कुले यांची स्व प्रतिबिंबित संकल्पना ('स्व' संबंधीचे नियम)** (Looking glass self concept)

चार्लस् कुलेंची बौद्धिक पार्श्वभूमि विचारात घेत असताना त्यांची 'स्वप्रतिबिंबित संकल्पना' हा विचार सर्वात महत्त्वपूर्ण समजला जातो. कुलेंच्या मते 'स्व'ची जडणघडण ही तिचा समाजातील इतरांच्याबरोबर जो संबंध येतो त्याच्यावर अवलंबून असते. याचा अर्थ व्यक्तीच्या मनात स्वतःविषयीच्या ज्या कल्पना निर्माण झालेल्या असतात त्यांचे प्रतिबिंबीत रूप अशी व्यक्ती दुसऱ्यांच्यामध्ये पाहत असते आणि त्यानुसार आपले मत बनविते. अशा अनुभवामधून व्यक्तीचा 'स्व' विकसीत होत जातो. अर्थात ही संकल्पना परस्परांच्या आंतरक्रियेतून उदयास येते, यासाठी कुले यांनी 'स्व'ची तुलना आरशाबरोबर केली. त्यामुळे त्यांचा 'स्व' विषयक सिद्धांत 'दर्पणात्मा' किंवा 'प्रतिबिंबित स्व' या नावाने प्रसिद्ध आहे.

थोडक्यात, कुले यांच्या मते, आपल्यविषयी इतरांच्या कल्पना सुसंगत असल्यास आपले 'स्वत्व' विकसीत होत जाते. अन्यथा त्यामध्ये अडथळा निर्माण होतो. 'स्व'च्या विकासात कुटुंबासारखा प्राथमिक गट किंवा समूह अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतो.

**क) प्राथमिक गट किंवा समूहासंबंधीचे कुलेंचे विचार** (Cooley's thoughts on Primary Group)

समाजशास्त्रामध्ये प्राथमिक गटाबद्दलचा विचार सर्वप्रथम चार्लस् कुले यांनी इ.स. १९०९ मध्ये आपल्या ''सामाजिक संघटन'' (Social Organization) या ग्रंथामध्ये मांडला. कुलेंच्या मते 'ज्या गटातील सदस्यांचे संबंध अतिशय घनिष्ठ, समोरासमोरचे आणि दीर्घकाळ टिकणारे असतात. त्यानाच प्राथमिक गट किंवा समूह असे संबोधिले जाते.'' कुलेनी अशा गटामध्ये कुटुंब, शेजारी तसेच एखाद्या खेड्यातील सवंगडी इत्यादींचा समावेश होतो असे म्हटले आहे.

थोडक्यात, प्राथमिक गट अथवा समूह हे व्यक्तींच्यामध्ये मानसिक व भावनिक ऐक्य निर्माण करतात. अशा गटामध्ये व्यक्तीगत हितापेक्षा इतरांच्या हिताचा अधिक विचार केला जातो. व्यक्ती 'स्व'च्या विचाराऐवजी 'आम्ही' चा विचार करते. लोकांना भावनिक व मानसिकदृष्ट्या एकत्र जोडण्याचा प्रयत्न अशा गटाकडून केला जातो. एका अर्थी कुटुंबासारखा प्राथमिक समूह ''मानवाचे सामाजिक प्राण्यांमध्ये रूपांतर करतो'' इ. त्यामुळेच प्राचीन काळापासून आतापर्यंतच्या प्रत्येक मानव समाजामध्ये प्राथमिक गटाना अनन्यसाधारण महत्त्व निर्माण झाल्याचे दिसून येते.

थोडक्यात चार्लस कुलेंच्या मते, प्राथमिक गट हे व्यक्तीमत्त्व विकास, कार्यक्षमतेत वाढ, मानसिक सुरक्षितता, सामाजिक नियंत्रण, सामाजिक भूमिकांचे ज्ञान यासारखी 'व्यक्तीगत व सामाजिक' कार्ये पार पाडतात. त्यामुळेच कुलेनी कुटुंबासारख्या प्राथमिक गटाला ''सामाजिक स्वरूपाचे धडे देणारी संस्कारमय शाळा'' म्हणून संबोधिले.

**२.२.१.१ स्वयं अध्ययन प्रश्न**

१) चार्लस् कुले यांनी सामाजिक घटनांचे विश्लेषण कोणत्या दृष्टीकोणातून केले आहे?

२) व्यक्ती आणि समाज या दोन परस्परविरोधी बाबी नाहीत तर त्या ''एकाच नाण्याच्या दोन बाजू' आहेत असे कोणी म्हटले आहे?

३) व्यक्तीच्या 'स्व' विकासामध्ये कोणत्या गटाचा अथवा समूहाचा वाटा महत्त्वपूर्ण असतो?

४) कुलेनी आपल्या पीएच.डी.चा प्रबंध कोणत्या विषयावर लिहिला?

५) कुलेची 'स्व'ची निर्मिती आणि 'स्व'चा विकास यासंदर्भातील अतिशय महत्त्वपूर्ण संकल्पना कोणती?

६) कुलेच्या मते, 'स्व' ची जडणघडण कशी होते?

७) कुलेनी प्राथमिक गटाबद्दलचा विचार आपल्या कोणत्या ग्रंथामध्ये मांडला?

८) कुलेंच्या मते, प्राथमिक गटामध्ये कोणाचा समावेश होतो?

९) कुटुंबासारख्या प्राथमिक गटामध्ये व्याप्ती कशाचा विचार करते?

१०) कुलेनी कुटुंबासारख्या प्राथमिक गटाला काय म्हणून संबोधिले?

### २.२.२ चार्लस कुले यांचे 'व्यक्ती आणि समाज' यासंबंधीचे विचार : –

अमेरिकन समाजशस्त्रज्ञ चार्लस कुले यांनी Human Nature and Social order हे पुस्तक १९०२ साली प्रकाशित केले. यामध्ये त्यानी व्यक्तिगत 'स्वत्व' आणि सामाजिक प्रक्रिया यांच्यातील परस्परसंबंधावर चर्चा केली आहे. त्यानंतर १९०९ साली Social Organization हे दुसरे पुस्तक प्रसिध्द केले. यापुस्तकात प्राथमिक गटासंबंधीचे सखोल विचार मांडले व १९१८ साली 'Social Process' हे पुस्तक प्रसिध्द केले. या ग्रंथात समाजात ज्या विविध प्रकारच्या प्रक्रिया घडून येतात त्यांचे पृथ्थकरण करण्याचा प्रयत्न केला. वरील तिन्ही ग्रंथाचे प्रमुख सुत्र म्हणजे 'व्यक्ती आणि समाज' हे दोन्ही घटक वरवर पाहता भिन्न वाटत असले तरी ते भिन्न नसून **एकाच नाण्याच्या दोन बाजू** आहेत. या दोन्ही बाजू एकाच वेळी जन्माला आल्या आणि विकसित झाल्या आहेत.

कुले असे म्हणतात की, व्यक्तीचे जीवन कोणत्याही पध्दतीने पृथक स्वरूपात अभ्यासले जाऊ शकत नाही. एवढेच नव्हे तर ते समजावूनही घेता येत नाही. कुले समाजाकडे सर्वसमावेशक दृष्टिकोणातून पाहतात. समाजासंबंधी एकांगी विचार मांडणाऱ्या विचारवंताना व त्यांच्या सिध्दांताना त्यांनी विरोध केलेला आहे. व्यक्ती आणि समाजातील संबंधाविषयी कुलेनी मूलभूत स्वरूपाचे विचार मांडलेले आहेत. काही विचारवंतानी व्यक्तीला अधिक महत्व दिले तर काहींनी समाजाला, पण कुलेनी मात्र या दोन्हींमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. कुले म्हणतात की, व्यक्ती किंवा समाजाला स्वतंत्र अस्तित्व नाही. (Cooley did not believe that either individual or society had an independent existence) या दोन्हीमधील संबंध हे सेंद्रिय स्वरूपाचे आहेत. ते म्हणतात की, आपले जीवन हे एक मानवी समस्यांचाच एक भाग आहे. मानवी जीवनाचे खरेखुरे ज्ञान करून घ्यावयाचे असेल तर मानवीजीवनाच्या अभिन्नत्वाचा विचार केला पाहिजे. मानवी जीवनाचे खंड पाडले तर जीवन नि:सारी व अर्थहिन होऊन जाईल. समाज ही एक मानसिक 'स्व' नी गुंफली गेलेली व्यवस्था असून अशा समाजात प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या मनाविषयी कल्पना करीत असते. समाजात वावरताना व्यक्तीमध्ये विविध प्रकारचे संबंध प्रस्थापित होत असतात. समाजातील व्यक्ती परस्परांच्या मनाचे मूल्याकंन करीत असतात. कुले म्हणतात की, समाज म्हणजे जीव आहे. याचा अर्थ समाजातील सजीव आणि सतत वाढणाऱ्या घटकामधील परस्परसंबंधांची गुंतागुंतीची प्रक्रिया म्हणजे समाज होय. प्रत्येक समाजात अनेक भाग असतात. ते

एकमेकाला जोडले गेलेले असतात. एका भागावर परिणाम झाला तर त्याचा दुसऱ्या भागावरही परिणाम होतो. व्यक्ती आणि समाज हे वेगवेगळे नसून एकच आहेत. व्यक्ती आणि समाज या दोघानाही समान महत्व आहे. या दोन्हीपैकी एकाला वगळून दुसऱ्याचा विचार करता येणार नाही. व्यक्तीशिवाय समाजाचे अस्तित्व नाही तर समाजाशिवाय व्यक्तीची कल्पनाच अशक्य आहे. व्यक्ती आणि समाज यामधील संबंध लष्कर आणि सैनिकांसारखे, किंवा वर्ग आणि विद्यार्थी यासारखे आहेत. कुलेंच्या मते, व्यक्ती आणि समाजामध्ये कोणताही मूलभूत फरक नाही. दोन्हीही परस्परावलंबी व परस्परसंबंधीत (Interdependent & interrelated) आहेत. मानवी शरीरामध्ये ज्याप्रमाणे अनेक अवयवांचे (नाक, हात, कान, डोळे, धड, पाय) अस्तित्व हे एकत्रित असल्यामुळे मानवी शरीर तयार होते. शरीराचा एखादा भाग (उदा. हात) एकदा तुटला तर त्याला काही अर्थ रहात नाही त्याचप्रमाणे समाजातदेखील व्यक्तींचे परस्परसंबंध आढळून येतात.

कुलेनी समाजविषयक विचार मांडताना व्यक्ती आणि समाजातील अभिन्नत्व सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विचारांना केवळ सैंध्दातिक मूल्यच आहे असे नव्हे तर व्यावहारिक मूल्यही आहे. शेवटी कुले म्हणतात, जर केवळ समाजाला महत्व दिले तर व्यक्ती स्वातंत्र्याचे उल्लंघन होईल आणि मानवी व्यक्तिमत्वाच्या विकासात अडथळे निर्माण होतील आणि दुसऱ्या बाजूला केवळ व्यक्तीला अतिरिक्त महत्व दिले तर समाजात बेबंदशाही निर्माण होईल. म्हणून या दोन्ही घटकातील टोकाची भूमिका टाळून त्यामध्ये सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सारांश, समाज हा एक विभिन्न सामाजिक प्रक्रियांचे पूंज आहे. याचा अर्थ समाजाची सामाजिक प्रक्रियात्मक एकसंघता ही शरीराच्या एकसंघतेसारखी आहे. समाजात आर्थिक, राजकीय, धार्मिक अशा अनेक प्रक्रिया कार्य करीत असतात. या पार्श्वभूमीवर कुलेने समाजाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी त्याचा एकत्रित अभ्यास केला पाहिजे असे स्पष्ट मत मांडले आहे.

### २.२.२.१ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न

**चूक की बरोबर ते सांगा**

१. चार्लस कुले हे एक जर्मन शास्त्रज्ञ आहेत.

२. चार्लस कुले यांच्यावर विल्यम जेम्स यांच्या विचाराचा प्रभाव आहे.

३. व्यक्ती आणि समाज हे दोन्ही स्वतंत्र घटक आहेत.

४. कुलेंच्या समाज विचारांवर सेंद्रिय सिध्दांताचा प्रभाव आढळून येतो.

५. समाज ही एक विभिन्न सामाजिक प्रक्रियांचे पूंज आहे.

## २.२.३ कुले यांचे 'स्व' संबंधीचे विचार अथवा कुलेंचा प्रतिबिंबित स्वत्व संकल्पना सिद्धांत (Human Nature or Concept of Rise of the Self Concept of Looking glass)

चार्लस कुले यांच्या मानवी स्वभाव आणि 'स्व'च्या विकासाच्या सिध्दांतालाच ''प्रतिबिंबीत स्वत्वाची संकल्पना'' असे देखील संबोधिले जाते. मानवी स्वभाव किंवा 'स्व'च्या विकासाचा सिध्दांत कुलेनी Human Nature and Social order (१९०२) या ग्रंथात मांडलेला आहे. कुलेच्या प्राथमिक गटाच्या संकल्पनेइतकीच प्रतिबिंबीत 'स्व'ची संकल्पना महत्वपूर्ण असून यामध्ये व्यक्तीच्या मनोव्यापाराचाच आढावा

घेतलेला आहे. कुले म्हणतात की, 'स्व' च्या विकासाची संकल्पना लक्षात घेतल्याशिवाय आपण व्यक्ती आणि समाजाच्या पारस्पारिक घनिष्ठ संबंधांना समजू शकत नाही. कुले असे स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, मानवी स्वभाव हा समाजाच्या इतर सदस्यांच्या अनुभवाद्वारा प्राप्त सवयीचा परिणाम आहे. कोणतीही व्यक्ती जेंव्हा दुसऱ्या व्यक्तींच्या संपर्कात येते तेंव्हा या व्यक्तीला अनेकप्रकारचे अनुभव येतात. याच अनुभवाच्या आधारावर त्यांच्या सवयींचा विकास होत असतो. अशा परिस्थितीमध्ये आपण मानवी स्वभावाला समाजापासून वेगळे करू शकत नाही.

चार्लस कुलेचा असा विश्वास होता की, आपल्या किंवा स्वत:च्या संबंधीचे ज्ञान तेव्हाच होईल जेव्हा ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तींच्या संपर्कात येईल आणि त्यांच्या सवयी, विचार, मनोवृत्ती आणि विश्वास इ. चा परिचय होईल. समाज आणि इतर व्यक्तींच्या संपर्कात आल्याशिवाय 'स्व' चे ज्ञान होऊ शकत नाही. ज्यावेळी व्यक्ती दुसऱ्यांच्या संपर्कात येते आणि त्यांचे विचार, अनुभव, तसेच मनोवृत्तीला समजून घेते, तेंव्हाच ती व्यक्ती आपल्या 'स्व' च्या संदर्भात आपली कल्पना तयार करते. व्यक्तीच्या मनाच्या घडणीतील किंवा 'स्व' च्या निर्मितीमधील घटकतत्वे म्हणून व्यक्तीचा ज्यांच्याशी संपर्क येतो अशा सर्व सामाजिक व भौतिक वस्तूंचा उल्लेख करता येईल. 'स्व' व समाज यांचा जन्म एकाचवेळी होतो. ते उभयोत्पन्न आहेत, किंवा जुळयांप्रमाणे आहेत. जलप्रवाहातील प्रवाह व जलबिंदू यांचे जसे नाते आहे तसेच समाज आणि व्यक्तीचे आहे. पाऊस पडत असताना थेंबाला स्वतंत्र अस्तित्व असते. पण जेंव्हा ते थेंब जमीनीवर पडतात आणि असे असंख्य थेंब जमीनीवर पडल्यानंतर त्यांचा प्रवाह तयार होतो तेंव्हा थेंबाला स्वतंत्र अस्तित्व रहात नाही. ते प्रवाहमय बनून जातात. त्याचप्रमाणे व्यक्तीला एक व्यक्ती म्हणून एका अर्थाने स्वतंत्र अस्तित्व आहे. पण समाजात वावरताना ती समाजाचा एक भाग बनून जाते. व्यक्तीचाच फक्त विचार करताना सोयीचे व्हावे म्हणून आपण व्यक्तीच्या सामाजिक स्वरूपाकडे दुर्लक्ष करून व्यक्तींना समाजापेक्षा निराळे मानतो ऐवढेच. परंतू व्यक्तींना समाजप्रवाहापासून दूर न जाऊ देण्याची समाज जी खबरदारी घेतो यातच व्यक्तीची सलगता दिसून येते. कुलेचा युक्तिवाद असा आहे की, व्यक्तीचा 'स्व' हा तिच्या इतरांशी होणाऱ्या पारस्पारिक क्रियांचाच परिपाक किंवा परिणाम आहे. म्हणूनच 'स्व' च्या विकासाची पध्दत द्वंद्वात्मक आहे. 'स्व' च्या विकासात एकमेकांच्याविषयी निर्माण होणाऱ्या कल्पनांच्या आदानप्रदान क्रियेस निर्णायक महत्व आहे. आपण काय आहोत या विषयी व्यक्तीस होणारी जाणीव, दुसऱ्याच्या आपल्या विषयीच्या काय कल्पना आहेत यासंबंधी व्यक्तीने बांधलेल्या अंदाजाचे प्रतिबिंब होय. आपल्या सभोवतालच्या व आपल्याशी संपर्कात येणाऱ्या व्यक्तींच्या आपल्या विषयीच्या मतामधून किंवा कल्पनेतूनच आपली आपल्या 'स्व' विषयीची धारणा उत्पन्न होत असते. 'तू', 'तो' किंवा 'ते' या शब्दांना अर्थ असल्याखेरीज 'मी' या शब्दास काहीच अर्थ रहात नाही. 'स्व' च्या प्रतिबिंबात्मक स्वरूपाचे स्पष्टीकरण करण्यासाठी कुलेने व्यक्तीची तुलना आरशाबरोबर केली आहे. 'स्व' हा आरसास्वरूपी आहे. आरशात ज्याप्रमाणे त्यापुढे येणाऱ्या गोंष्टीचे प्रतिबिंब पडते त्याचप्रमाणे इतरांच्या व्यक्तीविषयी असलेल्या कल्पनांचे प्रतिबिंबीत रूप म्हणजे व्यक्तीचे स्वत्व होय. कुलेने म्हटल्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती दुसऱ्यासाठी एक आरसा असते व त्यात दुसऱ्या व्यक्ती प्रतिबिंबीत होत असतात.

स्वत:चा पोशाख करताना, भांग पाडताना व इतर अनेक प्रसंगी आरशासमोर उभे राहून आपले रूप न्याहळणारी व्यक्ती कपडे, टाय, भांगाची ठेवण हया तिच्याच गोष्टी तिला कितपत खुलून/उठून दिसतात हे पाहत असते. जर या गोष्टी स्वत:च्या आवडीप्रमाणे असतील तर व्यक्तीला आनंद होतो, किंवा जर तशा नसतील तर त्याला दु:ख होते. 'स्व' चे ही असेच आहे. माझ्याविषयी इतरांच्या मनात काय कल्पना आहेत (विशेषत: रितीभाती, बोलणे, वागणे, चारित्र्य, कृती इ.) हे जाणून घेण्याचा प्रयत्न व्यक्ती करीत असते. जर

या कल्पना व्यक्तींच्या मनातील कल्पनेशी सुसंगत असतील तर व्यक्तीला आनंद वाटतो. जर विसंगत असतील तर दु:ख होते. उदा. 'मी' चारित्र्यवान आहे अशी माझी स्वत:विषयीची कल्पना असेल, तर एखाद्या व्यक्तीने चारित्र्यावर शिंतोडे उडविले, यासंबंधीची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली तर व्यक्तीला प्रंचड वेदना होतात. या वेदना सहन न झाल्यामुळे व्यक्ती काहीवेळा टोकाची भूमिका घेते. (नुकत्याच एका चॅनेलवरील 'राखी का इन्साफ' कार्यक्रमात राखी सांवतने केलेले आरोप सहन न झाल्यामुळे एका व्यक्तीने आत्महत्या केल्याची बातमी वाचलेली आहेच.)

प्रतिबिंबीत स्वत्वासंबंधी कुलेने मांडलेल्या कल्पनांचे विश्लेषण केल्यास असे आढळून येते की, कुलेच्या कल्पनेत तीन घटक तत्वांचा संगम झालेला आहे. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. दुसऱ्या व्यक्तीच्या नजरेत आपण कसे दिसतो यासंबंधी व्यक्तीने केलेली कल्पना किंवा दुसऱ्या व्यक्ती कोणत्या दृष्टीने पहातात यासंबंधी व्यक्ती जो विचार करते तो प्रतिबिंबीत 'स्व'त्वाच्या कल्पनेतील घटक आहे. उदा. 'अ' ही व्यक्ती 'ब' ला सांगते, तुमचं काम व्हायचं असेल तर 'क' कडे जा. पण त्याला माझ्याकडून ('अ' कडून) आलेलो आहे असे सांगू नका. याचा अर्थ असा की, 'अ' विषयी 'क' चे मत चांगले नाही. म्हणजेच 'अ' ला असे वाटते की, 'क' च्या नजरेत आपली प्रतिमा चांगली नाही.

२. दुसऱ्यांना आपण जसे दिसतो त्याच्या आधारावर इतरांचा आपल्याविषयी असणारा अभिप्राय किंवा आपल्या दिसण्यावरून इतरांनी आपल्याविषयी बनविलेले मत अमूकअमूक प्रकारचे आहे असा व्यक्तीने घेतलेला काल्पनिक निर्णय. उदा. 'तो' पोलीस अधिकारी खूपच कडक आहे. त्यामुळेच वडाप रिक्षा बंद आहेत किंवा ते शिक्षक खूप कडक आहेत, त्यामूळे त्यांच्या सूपरव्हीजनला कॉपी करणे अवघड आहे.

३. 'स्व' विषयक भावना ही प्रतिबिंबीत स्वत्वाच्या कल्पनेतील तिसरा महत्वाचा घटक आहे. इतरांचे आपणाविषयी अमूक प्रकारचे मत आहे असे कळाले की, बरेचदा आपणास आपला अभिमान वाटतो. उदा. 'अ' हा एक सरळमार्गी अधिकारी आहे. तो कधीही कोणत्या कामाबद्दल लाच घेत नाही. तो वेळेबाबत खूपच काटेकोर आहे. अशी आपल्या विषयी इतरांची मते असतील तर आपले मत सुखावते.

प्रा.चार्लस कुलेने या संदर्भात जे विवेचन केले आहे त्यानुसार आशय संप्रेषण (Communicative) सामाजिक प्रक्रियेतून 'स्व' ची निर्मिती झाली. आशय संप्रेषणाच्या द्वारा 'स्व' हा व्यक्तीच्या जाणीवेच्या प्रथम स्थानी येतो. कुलेच्या मते. १. एका व्यक्तीच्या दुसऱ्या व्यक्तीच्या स्वत्व विषयीच्या कल्पना २. व्यक्तीच्या स्वत:विषयीच्या कल्पना ३. दुसऱ्या व्यक्तीचा आपल्या 'स्व' वर होणारा परिणाम ४. आपल्या 'स्व' चा इतर व्यक्तीवर होणारा परिणाम इ. चा आपल्या संप्रेषणाच्या आधारे अभ्यास करता येतो.

आशयसंप्रेषण म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तीमध्ये विचारांची आणि आचारांची देवाणघेवाण होय. आशय संप्रेषण ही कुलेच्या सामाजिक विचारव्यवस्थेतील अत्यंत मुलभूत स्वरूपाची संज्ञा समजली जाते. मी माझे विचार दुसऱ्या व्यक्तीला ज्या प्रमाणे सांगू शकतो तसेच दुसऱ्या व्यक्तीचे विचार सुध्दा मी ऐकू शकतो असा आशय संप्रेषणचा अर्थ आहे. कुले म्हणतात, खरोखर मानवी संबंधाचे अस्तित्व आणि मानवी संबंधाचा विकास हा आशय संप्रेषणाच्या यंत्रणेवरच अवलंबून असतो. आशय संप्रेषण हे मानवी मनाचा विकास घडवून आणणारे एक प्रमूख साधन आहे. आशय संप्रेषणात सूचना आणि अनुकरण यांचा समावेश

झालेला असतो. व्यक्तीमत्व विकासात एका बाजूने अनुभव तर दुसऱ्या बाजूने आशय संप्रेषण महत्वाचे कार्य पार पाडीत असतात. आशय संप्रेषणाचे आकलन होण्यासाठी एक काल्पनिक उदाहरण कुलेने दिलेले आहे. यातील मूळ नावे बदलून आकलनासाठी भारतीय नावे घेतलेली आहेत.

उदा. राम आणि शाम हे दोघे मित्र आहेत. रामने एक सूट खरेदी केलेला आहे तर शामने जीनपँट व टी शर्ट खरेदी केलेला आहे. या दोन मित्राचा 'स्व' विकास कसा झाला असावा हे कुलेने अत्यंत सुंदर शब्दात मांडलेले आहे.

१. खरा राम कोण आहे, हे परमेश्वरालाच माहित.

२. 'राम' ची स्वत:विषयीची कल्पना – सूट परिधान केल्यावर स्वत:ला आरशात न्याहळताना 'वाह! मी सूटमध्ये खूपच चांगला दिसतो.

३. शामने आपल्याविषयी करून घेतलेल्या कल्पनेबद्दल 'राम'ला असे वाटते की, शामला देखील मी या सूटमध्ये चांगला दिसतो.

४. आपल्या दिसण्याविषयीच्या शामच्या कल्पनेच्या आधारे 'शाम' ने आपल्याविषयी काय मत बनविले आहे किंवा शाम आपल्याविषयी काय विचार करीत आहे यासंबधी 'राम' विचार करतो. रामला वाटते की, मी सूटमध्ये चांगला दिसतो असे मला वाटत असल्याने मला 'ग' ची बाधा झाली आहे, असे शामला वाटत असेल का ?

५. रामला स्वत:विषयी काय वाटते यासंबधी शामची कल्पना. शामला वाटते की, सूट घातल्यामुळे आपण चांगले किंवा स्मार्ट दिसतो असे रामला वाटत आहे.

सारांश, रामचा 'स्व' चा विकास असा पाच भिन्न अवस्थांमधून होतो. नवीन जीनपँट व टीशर्ट परिधान करणाऱ्या शामचाही 'स्व' चा विकास अशाच पध्दतीने समजून घेता येईल.

मानसिक, 'स्व'च्या विणल्या जाणाऱ्या धाग्यामधून व त्यांच्या पारस्पारिक क्रियांमधूनच समाज साकारत जातो, असे कुलेचे म्हणणे आहे. (Society is interweaving & interworking of mental selves plural of self) एकमेकांविषयीच्या स्वत्वाविषयी व इतराविषयीच्या कल्पना करण्याचा हा खेळ कालांतराने मोठा क्लीष्ट आणि गुंतागुंतीचा होत जातो. यासाठी प्रा. चार्लस कुलेनी दिलेले उदाहरण वैशिष्टपूर्ण आहे. बुध्दीबळाच्या खेळात एकमेकांसमोर पट मांडून परस्परासमोर बसलेल्या बुध्दिबळपटूच्या मनात एकमेकाच्या चालीविषयी जसा सतत विचार व त्या दृष्टिने पूर्व तयारी चाललेली असते, तसेच आंतरक्रिया करणाऱ्या दोन व त्यापेक्षा जास्त व्यक्तीचे असते. म्हणजे व्यक्तीच्या संपर्कात येणाऱ्या इतर व्यक्तीविषयी देखील आपल्या मनात सतत विचार सुरू असतात. व्यक्ती व्यक्तीत सतत होणाऱ्या इतर आंतरक्रियांमुळे व परस्पराविषयी त्यांच्या समजुतीचे व त्यांनी परस्परासंबंधी केलेल्या मूल्यांकनाची देवाण-घेवाण होत राहिल्यामुळे अनेक निरनिराळ्या दृष्टिकोनातून सुसंवादित्व निर्माण होत असते. समाज मनोविश्वात अंतर्भूत होऊन व्यक्तीच्या स्वत्वाचाच एक भाग होणे हा व्यक्ती-व्यक्तीमधील आंतरक्रियांचाच परिणाम होय.

सारांश, व्यक्ती आपल्या मनाच्या आरशात स्वत:चे प्रतिबिंब जसे पहाते, तसेच त्याच आरशात ती इतर व्यक्तीचेही प्रतिबिंब पहात असते. यालाच 'स्वत्व' (Self) असे म्हणतात. या स्वत्वासाठीच व्यक्ती इतरांशी सामाजिक संबंध प्रस्थापित करते. ज्या व्यक्तीद्वारे व्यक्तीच्या स्वत्वाला धक्का पोहचतो, अशा

ठिकाणी व्यक्ती संबंध टाळते. परंतु जिथे स्वत्व जोपासले जाते तिथे व्यक्ती संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते.

**२.२.३.१ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न**

**गाळलेल्या जागा भरा.**

१. प्रा. चार्लस कुले यांनी 'स्व' संबंधीचे विचार ................................ या ग्रंथातून मांडले आहेत.

२. 'स्व' च्या प्रतिबिंबित स्पष्टीकरणासाठी कुलेनी 'स्व' ची तुलना ............................... बरोबर केली आहे.

३. .......................... आणि .......................... हे दोन्हीही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

४. ......................... या सामाजिक प्रक्रियेतूनच 'स्व' ची निर्मिती होते.

५. 'स्व' संबंधीच्या विकासात मुख्यत: .......................... घटक आहेत.

## २.२.४ कुले यांचे प्राथमिक समूहासंबधीचे अथवा गटासंबंधीचे विचार : (Prof. C.H. Cooley's views on Primary Group)

प्राथमिक गटासंबंधी चार्लस् कुलेंनी जे विचार मांडले त्यामुळे ते समाजशास्त्रामध्ये कमालीचे मान्यताप्राप्त विचारवंत म्हणून प्रसिध्दीस आले. १९०९ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'सामाजिक संघटन' (Social Organization) या ग्रंथात चार्लस कुलेनी प्राथमिक गटाची संकल्पना मांडली. मानव हा गट करून रहाणारा प्राणी आहे, तो एकाचवेळी निरनिराळया गटांमधून जीवन व्यतीत करीत असतो. त्यामुळे व्यक्ती ज्या विविध गटात वावरते आणि आपले जीवन व्यतीत करते त्यापैकी कोणत्या गटांना व्यक्ती व समाज यांच्यामध्ये एकरूपता आणि अभिन्नता निर्माण करण्याच्यादृष्टिने निर्णायक महत्व आहे यासंबंधीच्या चिंतनातून प्राथामिक गटाची संकल्पना निर्माण झालेली आहे. समाजाबाबतच्या सेंद्रियवादी दृष्टिकोणाचा प्राथमिक गटाची कल्पना हा एक परिणाम आहे असे म्हणता येईल.

प्राथमिक गट हे एकात्मता निर्माण करणारे एक तत्व आहे. या गटाच्या माध्यमातून व्यक्ती व समाज यांच्यामधील वेगळेपणा नष्ट होतो. उदा. पाणी ज्याप्रमाणे दोन वेगवेगळया पदार्थांना एकरूप करते, त्याचप्रमाणे प्राथमिक गटामूळेच व्यक्ती व समाज एकरूप होत असतात. कुलेच्या मते, 'प्राथमिक गट म्हणजे असा गट होय की, ज्यामध्ये घनिष्ट, व्यक्तीगत आणि जवळीकतेचे संबंध असतात. अशा प्रकारच्या गटामध्ये मित्रमंडळी, कुंटुंबातील लोक आणि दररोज भेटणाऱ्या लोकांचा समोवश होतो.'

**प्राथामिक गटासंबंधी चार्लस कुलेनी केलेली व्याख्या –**

''प्राथमिक गट म्हणजे असे गट की, ज्यामध्ये व्यक्तींचे परस्परांशी समारोसमोरचे आणि सहकार्याचे संबंध असतात. हे गट अनेक अर्थांनी प्राथमिक असतात. मुख्यत्वेकरून व्यक्तीचे आदर्श आणि व्यक्तीचा सामाजिक स्वभाव घडविण्याच्यादृष्टिने त्यांना मुलभूत महत्व असते.''

(By Primary Group mean those characterized by intimate face to face contact & cooperation. They are primary in several senses, but chiefly in that they are fundamental in forming the social nature & ideals of the individuals.)

व्यक्तीचे आदर्श व व्यक्तीचा स्वभाव घडविण्यात या गटांना मूलभूत महत्व असल्यामुळे कुलेने त्यांना प्राथामिक गट मानले आहे. घनिष्ट साहचर्याचे व्यक्तीवर जे मानसशास्त्रीय परिणाम होतात त्यांना प्राथामिक गटांच्या स्वरूपाच्यादृष्टीने बरेच महत्व आहे. या साहचर्यामुळेच व्यक्तीमधील वेगळेपणाची भावना नष्ट होते. व्यक्ती गटाशी पूर्णपणे एकरूप होते. गटाची उद्दिष्टे आणि व्यक्तिगत जीवन हे गटाच्या जीवनाशी पूर्णपणे समरस होते. त्यामुळे प्राथमिक गटांमधून 'मी' ची जागा 'आम्ही' या शब्दाने घेतली जाते असे कुलेनी प्रतिपादन केले आहे. प्राथमिक गटात सुध्दा व्यक्तीच्या परस्पर संबंधात स्पर्धा, संघर्ष, असतात. कुंटुंबातील सदस्यामध्ये सुध्दा भांडणे होतात. स्पर्धा, तणाव, स्वार्थी प्रवृत्ती प्राथमिक गटात प्रकर्षाने आढळून येतात. असे असले तरी या गटातील सदस्यांची संख्या मर्यादित असल्यामुळे त्यांचे संबंध हे समोरासमोरचे आणि अतिशय घनिष्ठ स्वरूपाचे असतात. उद्देशामध्ये समानता असून सदस्यांमध्ये सहानुभुती, सहकार्य आणि आपुलकीची भावना असते.

मानवी समाजातील फक्त पुढील तीनच उदाहरणांचा प्राथमिक गट म्हणून उल्लेख करता येईल.

१) कुटूंब (Family) २) संगत किंवा सवंगडी (Pear/Play group) ३) शेजार (Neighbourhood)

वरील तीनही प्राथमिक गट विशेष महत्वपूर्ण आहेत. हे गट महत्वाचे असण्याची कुलेनी पुढील कारणे सांगितलेली आहेत.

१. प्राथमिक गट हे सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत. कारण सर्वच समाजात आणि सर्वच काळात या गटांचे अस्तित्व आढळते.

२. दुसरे कारण म्हणजे व्यक्तीच्या एकूण व्यक्तिमत्वाच्या विकास प्रक्रियेवर प्रभाव पाडण्याचे प्राथमिक आणि मुलभूत स्वरूपाचे कार्य हा गट पार पाडीत असतो. कुलेच्या मते, प्राथमिक गट हा अनेक कारणामूळे प्राथामिक मानला जाऊ शकतो. परंतु या गटाला प्राथामिक मानण्याचे मुख्य कारण म्हणजे व्यक्तीचा सामाजिक स्वभाव आणि आदर्शांची निर्मिती करण्यामध्ये हे गट मौलिक आणि मूलभूत आहेत. या गटांना प्राथामिक याकरितादेखील मानले जाते की, वेळ आणि महत्व या दोन्हींच्यादृष्टिने हे गट सर्वप्रथम आहेत.

कुले म्हणतात की, **कुटूंब** हा सर्वच बाजूने प्राथमिक गट आहे. तो सगळीकडे म्हणजे सार्वत्रिक आहे. व्यक्तीचा जन्म हा कुटुंबातच होतो. आणि कुटुंबातच प्रत्येकाचे बालपण घालविले जाते. मूल लहान असताना सामाजिक दृष्टिने ते एका कोऱ्या पाटीसारखे असते. कुणाशी कसे बोलावे? काय बोलावे? कसे वागावे? रूढी, परंपरा, आदर्श याबद्दल त्याला काहीच ज्ञान नसते. त्याला कुटुंबातील व्यक्ती ज्याप्रमाणे सांगतील त्याप्रमाणे ते वागते. मुलाच्या व्यक्तिमत्वावर वाढत्या वयाबरोबर कुटुंबातील सदस्यांच्या वर्तनाचा प्रभाव तयार होतो. कुटुंबातील इतर सदस्यांच्या वर्तनाचे अनुकरण करीत सामाजिक वर्तन शिकत जाते. त्यामुळे मुलाला समाजीकरणाचे शिक्षण देण्याचे काम कुटुंबच करीत असते. लेव्हीस कोझर म्हणतात की, कुटुंब हे प्राथमिक गटाचे **केंद्रस्थान** आहे.

मुल थोडे मोठे झाल्यानंतर त्याचा संबंध आजूबाजूला राहणाऱ्या मुलांबरोबर येत असतो. समवयस्क आणि समविचाराची मूले हळूहळू खेळाच्या निमित्ताने एकत्र येऊ लागतात. या मित्रासोबत खेळत असताना मूल इतर मूलांच्या अभिवृत्ती, अभिरूची, आणि क्रियांशी समायोजन साधण्याचे धडे घेत असते. क्रिडागटांचा प्रभाव मुलांचे व्यक्तिमत्व घडविण्यावर पडतो. कुलेच्या मते, मूले विशेषत: मुलगे हे त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षी किंवा त्यासुमारास आपल्या मित्रासोबत जास्त रममाण होतात. इतकेच नव्हे तर त्यांच्या आकांक्षा, त्यांची प्रतिष्ठा आणि त्यांची सहानभूती ही बहुधा कुटुंबापेक्षा मित्रमंडळीशी जास्त निगडीत असते.

**शेजारी** हा प्राथमिक गट देखील सार्वत्रिक स्वरूपाचा आहे. मानव हा एक समुह करून रहाणारा प्राणी आहे. त्यामुळे शेजारी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. दोन वेगवेगळ्या कुटुंबातील लोकांमध्ये पारस्पारिक संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य शेजारी या प्राथमिक गटाने केलेले आहे. कुटुंबातील सदस्यांनंतर शेजाऱ्यांशी संबंध येतो. शेजाऱ्यांच्या वर्तनाचादेखील मुलांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पडत असतो. काही आधुनिक समाजशास्त्रज्ञांच्या मते, औद्योगिकरणाच्या व शहरीकरणाच्या जगात 'शेजारी' या प्राथमिक गटाचे असलेले महत्व कमी होत चालले आहे. परंतु आजही शेजारी या घटकाचा मुलांच्या जडणघडणीमध्ये विशेष प्रभाव दिसून येतो.

सर्वांग परिपूर्ण अनुभव हे व्यक्तीला प्राथमिक गटातच प्राप्त होत असतात. हे अनुभव मोठया परिश्रमाद्वारे प्राप्त होत असल्यामुळे ते अपरिवर्तनीय असतात. त्याचप्रमाणे हे अनुभव मनाच्या खोलवर भागापर्यंत पोहचलेले असतात. त्यामुळे प्राथमिक गट व्यक्तीच्या जीवनात एक प्रेरक शक्ती निर्माण करतात. कुले म्हणतात की, जगात वंश, जात, धर्म, भाषा, भूप्रदेश इत्यादीच्या आधारावर विविध गट अस्तित्वात आहेत. त्यांच्यात विविध प्रकारची असमानता आढळते, तरी देखील या विविध प्रकारच्या गटात एका बाबतीत साम्य आढळते ते म्हणजे सर्व गटातील व्यक्तींच्या मूलभूत वर्तनात आणि भावनांच्यामध्ये सारखेपणा आहे. व्यक्तीच्या **'स्व' ची** जाणीव प्रामुख्याने प्राथमिक गटाद्वारेच होत असते. सामाजिक जीवन जगण्यासाठी लागणारी पूर्वतयारी प्राथमिक गटातच व्यक्तीकडून करवून घेतली जाते. धार्मिक श्रध्दा, रूढी, परंपरा, सामाजिक आदर्श, भाषा इ. विषयाबाबतचे आवश्यक आणि योग्यज्ञान व्यक्तीला देऊन समाजासाठी आवश्यक असलेले नवीन सदस्य देण्याचे कार्य प्राथमिक गटच करीत असतात. कुले असेही म्हणतात की, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्राथमिक गट अतिशय महत्वाची भूमिका पार पाडतात.

**प्राथामिक गटाची किंवा संबंधाची वैशिष्टे** (Characteristics of Primary Groups)

प्रा. चार्लस कुले यांच्या प्राथमिक गटावर चर्चा करताना प्रा. किंग्जले डेव्हीस यांनी त्यांच्या Human Society या ग्रंथात प्राथमिक गटाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

१. **उद्देशातील समानता –** (Identily of Ends)

प्राथमिक गटातील सर्व सभासदांचे उद्देश कधीही वेगवेगळे असू शकत नाहीत. सर्वांच्या उद्देशात समानता असते. सर्व सभासदांची इच्छा, मनोवृत्ती, आणि ध्येये ही एकाच प्रकारची असतात. गटाची जी काही ध्येये असतात ती पूर्ण करण्यासाठी सर्व सभासद सदस्य आपापल्या दृष्टीने प्रयत्नशील असतात. आई-वडील, मुले, भाऊ यासारख्या नातेसंबंधात सभासदांच्या उद्देशात कमालीची समानता असते. कुटुंबात मुलांचा आनंद हाच आईचा आनंद असतो. यालाच 'आम्ही' पणाची भावना (We feeling) असे म्हणतात. संघातील सर्व खेळाडू सामना जिंकण्यासाठीच खेळत असतात. सामना जिंकल्यानंतरचा आनंद हा सर्व खेळाडूंचा असतो. तो एकटया कर्णधाराचा नसतो. सुखदु:खात सहभागी होण्याची वृत्ती ही प्राथमिक गटात असते.

२. **जवळीकता अथवा –समोरासमोरचे संबंध** – (Intimate and face to face relationship)

प्राथमिक गटातील सदस्यांचे संबंध हे वैयक्तिक स्वरूपाचे असतात. येथे प्रत्येक व्यक्तिला विशेष स्थान प्राप्त झालेले असते. त्या विशेष स्थानी तीच व्यक्ती पाहिजे. दुसरी कोणतीही व्यक्ती ते स्थान घेऊ शकणार नाही. उदा. एखाद्या उच्चपदस्थ व्यक्तीची **आई** भले ती अडाणी असेल आई ही आईच असते. तिची जागा दुसरी कोणतीही स्त्री घेऊ शकत नाही. याचाच अर्थ असा की, प्राथमिक गटातील सर्व सदस्यांचे परस्परांशी असलेले संबंध व्यक्तीगत पातळीवरील असतात. गटातील एका व्यक्तीची जागा दुसरी व्यक्ती घेऊ शकत नाही.

३. **स्वयंसाध्यरूपी संबंध** – (Sponstaneous Relationship)

प्राथमिक गटातील सदस्यांचे संबंध हे अकृत्रिम अथवा नैसर्गीक स्वरूपाचे असतात. या संबंधामधून आपल्याला काही मिळवायचे आहे किंवा फायदा होणार आहे म्हणून प्रस्थापित केले जात नाहीत. जसे आई वडील हे मुलांचे संगोपन करतात, त्यांना प्रेम देतात ते काही फायदा होणार आहे म्हणून नव्हे. मित्रत्वामध्येदेखील नफा तोट्याचा हिशोब नसतो. प्राथमिक गटात आत्मीयतेची भावना असते. नि:स्वार्थ, त्याग हा महत्वाचा निकष प्राथमिक गटासाठी असतो. प्राथमिक गटातील संबंध हे डॉक्टर आणि औषध विक्री प्रतिनिधी **(Medical representalive)** यासारखे औपचारिक नसतात तर अनौपचारिक असतात. या गटात सामाजिक शिष्टाचाराला फारसे महत्व नसते.

४. **वैयक्तिक स्वरूपाचे संबंध (Personal Relationship)**

प्राथमिक समुहात प्रत्येक व्यक्तीचे विशेष असे स्थान असते. त्या विशिष्ट स्थानी फक्त ती व्यक्तीच असते, तिची जागा दुसरी कोणतीही व्यक्ती घेऊ शकत नाही. जसे 'आई' ही मुलाच्या दृष्टीकोणातून आईच असते. दुसरी कोणतीही स्त्री आई होऊ शकत नाही किंवा दुसरा कोणताही मुलगा हा त्या स्त्रीचा मुलगा होऊ शकत नाही. जी गोष्ट आई आणि मूल या बाबतीत सत्य आहे तीच गोष्ट कुटुंबातील इतर सदस्यांच्या बाबतीतही सत्य आहे.

५. **प्राथमिक संबंधात 'आम्ही'पणाची भावना असते. (We feeling)**

प्राथमिक गटातील सदस्यांमध्ये 'आम्हीपणाची भावना' (We feeling) तीव्र स्वरूपाची असते. या गटातील सदस्यांच्या इच्छा, मनोवृत्ती, ध्येय इ. मध्ये साम्यता असते. त्यांच्यात एकमेकांविषयीची आपूलकी, प्रेम, जिव्हाळा, सुख, दु:ख हे सारखे असते.

६. **प्राथमिक संबंध हे परिपूर्ण व सर्वसामवेशक असतात. (Inclusive relationship)**

प्राथमिक गटात घडणाऱ्या प्रत्येक घटनेशी प्रत्येक व्यक्तीचा संबंध असतो. तसेच या गटातील प्रत्येक व्यक्तीला गटातील दुसऱ्यांच्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे ज्ञान असते. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनात सर्वांगांनी रस घेत असते. कोणतेही आई वडील आपला मुलगा चांगला घडावा यासाठी सर्वप्रकारचे प्रयत्न करीत असतात. त्याला शाळेला पाठवितात, संस्कार वर्गाला, कराटे, गायन, क्रिकेट शिकण्यासाठी पाठवितात. त्याचे मित्र कोण आहेत ? ते दररोज कुठे जातात ? तो कुठे चुकतो ? त्याने काय केले पाहिजे ? अशा अनेक गोष्टींमध्ये रस घेतात. सारांश प्राथमिक संबंध अपूर्ण आणि एकाकी स्वरूपाचे नसून ते परिणूर्ण आणि सर्वसमावेशक असतात.

## ७. प्राथमिक संबंध हे स्वयंस्फूर्त असतात. (Instinct value)

प्राथमिक गटातील सदस्यांमध्ये जे संबंध निर्माण होतात ते अकृत्रिम व नैसर्गिक असतात, ते आपोआप तयार होत असतात तसेच ते स्वंयप्रेरित असतात. ते पूर्वनियोजित व करारपूर्ण नसतात तर ते होकारात्मक असतात, नकारात्मक नसतात. या संबंधाची निर्मिती हृदयातून होत असते. त्यामुळे ते स्वंयस्फुर्त, अंत:प्रेरणेवर अवलंबून असतात. मुलावर प्रेम कसे करावे हे काही कोणत्याही काळातील आईला शिकवावे लागलेले नाही.

## ८. प्राथमिक संबंध हे प्रभावी व नियंत्रणात्मक असतात (Strong controlling)

प्राथमिक गटात प्रत्येक व्यक्तीवर गटाचे नियंत्रण असते. व्यक्तीच्या वर्तनावर आई-वडील, भाऊ, बहिण, इतर नातेवाईक, मित्र यांचे प्रभावी नियंत्रण असते. हे नियंत्रण जरी जाचक वाटत असले तरी ते भविष्याच्या दृष्टीकोणातून हितकारक असते. प्राथमिक संबंध हे साध्य स्वरूपी आहेत ते साधन स्वरूपी नाहीत त्यामुळे प्रत्येक व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्याचे काम प्राथमिक गटातील सदस्य करीत असतात. व्यक्ती कितीही मोठी असली तरी आपल्या आई वडीलांना बरे वाटणार नाही, आई रागावेल, आईच्या डोळ्यात अश्रु येतील, तीला दु:ख होईल म्हणून एखादी अयोग्य पद्धती करण्याचे टाळीत असते. म्हणूनच कुले म्हणतात की, प्राथमिक गटा इतके प्रभावी नियंत्रण दुसरी कोणतीही संस्था निर्माण करू शकलेली नाही.

## प्राथमिक गटाचे महत्व अथवा कार्ये (Importance or Functions of Primary Groups) : -

प्रा. चार्लस कुले यांनी प्राथमिक गटावर चर्चा करताना असे म्हटले आहे की, प्राथमिक गट हे व्यक्तीच्या आणि समाजाच्या दृष्टीने अनेक महत्वाची कार्ये पार पाडीत असतात. प्राथमिक गटाच्या कार्यावर सविस्तर चर्चा केल्यास प्राथमिक गटाचे महत्व, उपयुक्तता किंवा आवश्यकता लक्षात येईल. व्यक्ती आणि समाजासाठी प्राथमिक गटाकडून खालील महत्वपूर्ण कार्ये पार पाडली जातात.

## १. व्यक्ती विकासाचे साधन -

व्यक्तीच्या विकासात प्राथमिक गटाचे कार्य इतर सर्व गटांपेक्षा फारच महत्वाचे आहे. इतर मानवेतर प्राण्यापेक्षा मानवाकडे अधिक शारीरिक गुणवैशिष्ट्ये प्राप्त झालेली आहेत. उदा. विकसित जीभ, मेंदू, हातापायांच्या बोटाची रचना, ताठपाठीचा कणा इ. इतर मानवेतर प्राणीही समूह करून रहातात, मानवही समूह करून राहतो. पण राहण्यामध्ये फरक आहे. इतर मानवेतर प्राणी वर्षानुवर्षे निसर्गावर आधारित जीवन जगतात. पण मानव मात्र रहाण्यासाठी घर बांधतो, एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी भाषेचा वापर करतो, (आशय संप्रेषण) समुहात अनेक गोष्टी शिकतो. या अनेक गोष्टी शिकविण्याचे काम प्रामुख्याने प्राथमिक गटच करीत असतात. चांगल्या सवयी, सामाजिक आदर्श, आत्मसन्मान, प्रामाणिकता, नैतिकता, समायोजन क्षमता इ. गुणांची ओळख व्यक्तीला प्राथमिक गटातच करून दिली जाते. व हे सर्व गुण आत्मसात करावे यासाठी खास प्रयत्न प्राथमिक गटातर्फेच केले जातात. व्यक्तीला आपली खरी ओळख प्राथमिक गटातच होत असते. समाजातील इतर गटांमधून स्वार्थासाठी खोटी स्तुती केली जाते. पण प्राथमिक समूहात मात्र व्यक्तीचे गुण दोष इतर सदस्यांकडून स्पष्टपणे सांगितले जातात. त्यामुळे आपण कसे आहोत हे व्यक्तीला कळते. व्यक्तीचे निर्दोष व्यक्तिमत्व कसे तयार होईल यासाठी इतर सदस्य प्रयत्नशील असतात. म्हणूनच कुले म्हणतात की, प्राथमिक गट हे व्यक्ती विकासाचे खरे साधन आहे.

## २. कार्यक्षमतेत वाढ –

प्रा. चार्लस कुलेनी असे ठामपणे नमुद केले आहे की, व्यक्तीला त्याच्या मनासारखे काम मिळाल्यास व्यक्ती अधिक रस घेऊन उत्साहाने काम करते. कोणतीही व्यक्ती मनापासून आवाडणारे कामच चांगल्यापध्दतीने करीत असते. व्यक्तीच्या आवडी निवडी ओळखण्याचे काम प्राथमिक गटच करीत असतात. व्यक्तीच्या चांगल्या गुणांना वाव देण्याचे काम प्राथमिक गटाकडून केले जाते. उदा. मुलाला खेळामध्ये गती चांगली असेल तर आई वडीलांकडून प्रोत्साहन मिळते. मुलगा उत्कृष्ट खेळाडू होऊ शकतो. सचिन तेंडूलकरने क्रिकेटमध्ये जो इतिहास निर्माण केलेला आहे तो आईवडील व भावाच्या प्रेरणेमूळेच हे विसरून चालणार नाही. असे कार्य प्रत्येक कुटुंबातून आपापल्यापरिने सूरू असते. सारांश व्यक्तीच्या इच्छा–आकांक्षाची कदर करून त्यांना योग्य वाव देण्याचे व पर्यायाने तिच्या कार्यक्षमतेत वाढ करण्याचे महत्वपूर्ण कार्य प्राथमिक गटाद्वारेच पार पाडले जात असते.

## ३. मानसिक समाधान प्राप्त करून देणे –

कोणत्याही व्यक्तीला यशस्वी जीवन जगण्यासाठी मानसिक समाधानाची कमालीची आवश्यकता असते. सत्ता, संपत्ती, ऐष, आराम आहे म्हणजे माणूस सुखी असेलच असे नाही सत्ता आणि संपत्ती इतकेच मानसिक समाधानाला व्यक्तीच्या जीवनात महत्व आहे. प्रत्येक व्यक्ती जे काम करीत असते त्याबद्दल कोणीतरी तीचे कौतुक करावे, शाबासकीची थाप पाठीवर मारावी असे वाटत असते. कौतुकामुळे मन सुखावते. हे सुख आपण पैशात मोजू शकत नाही. हे मानसिक समाधान प्राथमिक गटातूनच मिळत असते. व्यक्तीच्या सुख दुःखात प्राथमिक गटातील सदस्यच सहभागी होत असतात. म्हणूनच असे म्हणतात, सुख दुणावते ते कुंटुबात, दुःख उणावते ते कुटूंबातच. कुले म्हणतात की, ज्या व्यक्तीला बालपणात आईवडीलांच्या प्रेमाचा आणि स्नेहपूर्वक सहवासाचा लाभ होत नसतो अशा व्यक्ती सदैव दुःखी असतातच असे नाही पण त्या कमालीच्या दुर्देवी असतात तसेच त्या पूर्णपणे असमाधानी असतात. अशा व्यक्ती कधी–कधी अनैतिक वर्तनाकडे वळतात. थोडक्यात ज्याप्रमाणे पिकाला खत व पाण्याची आवश्यकता असते त्याचप्रमाणे मानवाच्या प्रगतीसाठी मानसिक आधार, मानसिक सुरक्षितता व मानसिक समाधान आवश्यक असते. आपल्यासाठी अश्रू ढाळणारे कोणीतरी आहेत, सुखदुःखात वाटेकरी होणारे आहेत हे पाहून व्यक्तीला एकप्रकारचे मानसिक समाधान मिळते. सारांश व्यक्तींना मानसिक समाधान प्राप्त करून देण्याचे अत्यंत महत्वपुर्ण कार्य हा प्राथमिक गट पार पाडीत असतो.

## ४. सामाजिक नियंत्रणाचे एक प्रभावी साधन म्हणून असणारे महत्व –

प्रा. चार्लस कुलेच्या मते, प्राथमिक गट हे सामाजिक नियंत्रणाचे एक अनौपचारिक साधन आहे. सामाजिक नियंत्रण याचा अर्थ व्यक्तीच्या गैरमार्गी किंवा समाजबाह्य वर्तनावर नियंत्रण ठेवणे होय. प्राथमिक गटातील सर्व व्यक्ती परस्परांचे कल्याण व्हावे म्हणून प्रयत्न करीत असतात. जीवन जगत असताना काहीवेळा चुका होत असतात. या चुका व्यक्तीला प्राथमिक गटाकडून लक्षात आणून दिल्या जातात, व परत व्यक्तीने अशा चुका करू नये म्हणुन या व्यक्तीवर प्राथमिक गटामार्फत योग्य संस्कार केले जातात. स्नेह, सहकार्य, त्याग, निःस्वार्थपणा, जिव्हाळा, वात्सल्य या भावनेनी ओसंडून वाहणारा हा प्राथमिक गट व्यक्तीच्या दृष्टीने कमालीचा महत्वाचा असतो. वडीलधाऱ्या माणसांबद्दल आदरयुक्त दरारा इतर व्यक्तीत असतो. म्हणून मोठया वडीलधाऱ्या माणसांच्या सुचनांचे उल्लंघन करण्याचे नैतिक साहस साधारण माणसात नसते.

सारांश, व्यक्तीने समाजात यशस्वी जीवन जगण्यासाठी प्राथमिक गट सर्वांगिण स्वरूपाचे कार्य करीत असतो. त्यामुळेच प्राथमिक गटाचे महत्व समाज आणि व्यक्तीच्या दृष्टीने कमालीचे उपयुक्त असते. इतर कोणतेही गट अनौपचारिक स्वरूपाचे कार्य व्यक्तीसाठी करीत नाहीत पण प्राथमिक गट मात्र प्रामुख्याने अनौपाचारिक स्वरूपाचे कार्य करीत असतो.

**२.२.४.१ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न**

**खालील विधाने चुक की बरोबर ते सांगा.**

१. प्रा. चार्लस कुले यांनी प्राथमिक गटासंबंधीचे विचार 'सामाजिक संघटन' (Social Organization) या पुस्तकात मांडले आहेत.

२. प्राथमिक गटातील सदस्यांचे संबंध हे समोरासमोरचे नसतात.

३. प्राथमिक गटात आम्हीपणाची भावना असते.

४. प्राथमिक संबंध हे अवैयक्तिक स्वरूपाचे असतात.

५. प्राथमिक गट व्यक्तीवर प्रभावी नियंत्रण प्रस्थापित करतात.

## २.३ स्वयं:अध्ययनाची उत्तरे

**२.२.१.१ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) मानसिक

२) चार्लस हॉर्टन कुले

३) कुटुंबासारख्या प्राथमिक गटाचा किंवा समूहाचा

४) वाहतुकीचा सिद्धांत (Theory of Transportation)

५) 'स्व' प्रतिबिंबित संकल्पना

६) व्यक्तीचा समाजातील इतरांच्या बरोबर येणारा संबंध

७) ''सामाजिक संघटन''

८) कुटुंब, शेजारी, खेळातील सवंगडी

९) 'स्व' ऐवजी 'आम्ही' चा

१०) ''सामाजिक स्वरूपाचे धडे देणारी संस्कारमय शाळा''

**२.२.२.१ स्वयं:अध्ययन प्रश्नाची उत्तरे –**

अ. १. चूक २. बरोबर. ३. चूक. ४. बरोबर. ५. बरोबर

**२.२.३.१ स्वयं:अध्ययन प्रश्नाची उत्तरे**

ब. १. Human Nature and the social order- २. आरशाशी.

३. व्यक्ती आणि समाज. ४. आशय संप्रेषण. ५. तीन

**२.२.४.१ स्वयं:अध्ययन प्रश्नाची उत्तरे**

क. १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. चूक ५. बरोबर

## २.४ सारांश : –

प्रा. चार्लस कुले यांनी समाजशास्त्रात मांडलेले विचार हे अत्यंत मूलगामी स्वरूपाचे आहेत. व्यक्तीशिवाय समाज अस्तित्वात येत नाही आणि समाजाशिवाय व्यक्तीला अर्थ नाही. **व्यक्ती आणि समाज** या दोन्हीही **एकाच नाण्याच्या दोन बाजू** आहेत. त्यांना एकमेकांपासून स्वतंत्र करता येत नाही. समाजासंबंधी एकांगी विचार मांडणाऱ्या विचारवंतांना त्यांनी विरोध केला आहे. कुलेंनी व्यक्ती आणि समाज यांना दोन स्वंतत्र घटक मानून अभ्यास करण्याऐवजी त्या दोन्हीमध्ये समन्वय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी जीवनाचे खरेखूरे ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर मानवी जीवनाच्या अभिन्नत्वाचाच विचार केला पाहिजे असे कुले म्हणतात. समाज हा एक विभिन्न सामाजिक प्रक्रियांचे पूंज आहे.

प्रा.चार्लस कुलेंनी 'स्व' संबंधाचे वरीलप्रमाणे विचार मांडले. 'स्व' म्हणजे व्यक्तीच्या मनोव्यापाराचा अभ्यास आहे. व्यक्तिच्या 'स्व' च्या विकासाठी समाजाची नितांत आवश्यकता आहे. व्यक्तीला दुसऱ्याच्या संपर्कात आल्याशिवाय 'स्व' चे ज्ञान होऊ शकत नाही. ज्यावेळी व्यक्ती दुसऱ्याच्या संपर्कात येते आणि त्यांचा विचार, अनुभव तसेच मनोवृत्तीला समजून घेते, तेव्हाच ती व्यक्ती आपल्या 'स्व' च्या संदर्भात आपली कल्पना तयार करते. 'स्व' आणि समाज यांचा जन्म एकाच वेळी होतो. थोडक्यात 'स्व' आणि समाज यांच्यामधील संबंध हा पावसाचा जलबिंदू व जलप्रवाहासारखा आहे. 'स्व' च्या विकासाचे विश्लेषण कुलेंनी तीन घटकतत्वाच्या आधारे केले आहे. आशय संप्रेषणच्या आधारेच 'स्व' चा विकास होतो. त्यामुळे आशय संप्रेषणाला समाजात अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

प्राथमिक समुहासंबंधीचे विचार सर्वप्रथम कूलेनी मांडले. जिथे व्यक्तींचे समोरासमोरचे संबंध येतात. तसेच ते सहकार्यात्मक स्वरूपाचे असतात तिथे प्राथमिक समूह निर्माण होतात. व्यक्तीच्या 'स्व' च्या विकासात प्राथमिक गटांना महत्व आहे. कुटुंब, सवंगडी व शेजार हे प्राथमिक समूह आहेत. प्राथमिक संबंध हे साध्य स्वरूप नसून साधन स्वरूप असतात, ते स्वयंसाध्यरूपी असतात, तसेच ते पूर्णपणे वैयक्तिक स्वरूपाचे असतात. प्राथमिक संबंधाना समाजिकरणाचे तसेच व्यक्तिविकासाचे साधन म्हणून, व्यक्तीचे मानसिक समाधान करण्याच्या दृष्टीकोणातून, व कार्यक्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीकोणातून असणारे महत्व वादातीत आहे.

## २.५ सरावासाठी प्रश्न

१. प्रा. चार्लस कुलेंच्या 'व्यक्ती आणि समाज' यासंबंधीच्या विचाराची चर्चा करा.

२. प्रा. चार्लस कुलेचे 'स्व' संबंधीचे विचार स्पष्ट करा.

३. चार्लस कुले यांचे प्राथमिक गटासंबंधीचे विचार विशद करा.

४. प्राथमिक गटाचे व्यक्तीविकासाच्या दृष्टीकोणतून असणारे महत्व स्पष्ट करा.

## २.६ क्षेत्रीय कार्ये

१. आपल्या परिसरातील एखाद्या बालवाडीला भेट देऊन मुलांच्या व्यक्तीमत्व विकासाचा अभ्यास करा.

२. एखाद्या खेळाडूची मुलाखत घ्या. त्याच्या विकासात कुटूंबाचा कितपत वाटा आहे, हे अभ्यासा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१. सामाजिक विचार प्रवाह – श्री मंगेश प्रकाशन, नागपूर. लेखक. पी. के. कुलकर्णी.

२. सामाजशास्त्रीय विचारवंत – कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद – लेखक. डॉ. दा. धो. काचोळे.

३. अभिजात समाजशास्त्रीय विचार – श्री. साईनाथ प्रकाशन – लेखक. डॉ. प्रदीप आगलावे.

४. समाजशास्त्रीय विचारवंत – फडके प्रकाशन – लेखक. प्रा. एस्. एल. मोहिते व प्रा. पी. एस्. सांळुखे.

५. समाजशास्त्रीय विचारवंत – लेखक प्रा. नी. स. वैद्य.

६. Modern Sociological Theory - Oxford uni. Press. Author- Abraham, M Francis.

७. History of social Thought - Promoters and Author Shama R N and Sharma R K

❒ ❒ ❒

# सत्र–२ : घटक–३
# जॉर्ज हर्बर्ट मीड (१८६३–१९३१)

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२. विषय–विवेचन

३.२.१ बौद्धिक पार्श्वभूमी

३.२.१.१ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

३.२.२ सामाजिक वर्तनवाद

३.२.२.२ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

३.२.३ व्यक्तीच्या कृती, हावभाव, वैशिष्ट्यपूर्ण संकेत

३.२.३.३ स्वयं:अध्ययनासाठीचे प्रश्न

३.२.४ मन, स्वःत्व आणि समाज याबद्दलचे विश्लेषण

३.२.४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक संज्ञा

३.५ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सराव

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे :

समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये, ज्याप्रमाणे समाज संरचनेचा अभ्यास केला जातो, त्या प्रमाणेच व्यक्ती–व्यक्तींच्यामधील आंतरक्रियांचा देखील अभ्यास केला जातो. तसे पहाता, व्यक्ती व्यक्तीच्या आंतरक्रियांचा अभ्यास हा मानसशास्त्रीय अभ्यासाचा एक घटक असू शकतो. परंतु समाजशास्त्राच्या अभ्यासात व्यक्ती वर्तनाचा अभ्यास होण्याच्या दृष्टीकोनातून आंतरक्रियांच्या अभ्यासाला देखील तितकेच समान महत्व दिले जाते. समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये, चार्लस कुले, जॉर्ज हर्बर्ट मीड, डब्ल्यू. आय. थॉमस, ब्ल्यूमर गॉफमन या सारख्या अभ्यासकांनी स्थापित केलेल्या 'सांकेतिक आंतरक्रियावादी' सैंध्दांतिक दृष्टीकोनाच्या आधारे व्यक्ती व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेचा अभ्यास केला जातो. त्यासाठी आता आपण युनिट नं. ३ मध्ये सांकेतिक आंतरक्रियावादी दृष्टीकोनाचा मीड यांनी केलेला अभ्यास जाणून घेणार आहोत. ज्या वेळी मीड

यांचा 'सांकेतिक आंतरक्रियावादी दृष्टीकोना अंतर्गत असणारा' 'सामाजिक वर्तन वादाचा' अर्थ जाणून घेवू त्या वेळी आपण प्रामुख्याने –

१. मानसशास्त्राच्या अभ्यासातील 'वर्तनवादा' च्या दृष्टीकोनाचा प्रभाव मीड यांच्या विचारावर कशा प्रकारे आढळून येतो हे जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

२. त्याचप्रमाणे, सामाजिक आंतरक्रियांच्या अभ्यासामध्ये व्यक्तींच्या पद्धती, हावभाव आणि इतर महत्त्वपूर्ण हालचालींचा कशा प्रकारे उपयोग आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींच्याकडून होत असतो ते समजून घेणार आहोत.

३. तसेच या युनिट मधील शेवटच्या उप-घटका मध्ये मीडच्या 'सांकेतिक आंतरक्रियावादी दृष्टीकोनाअंतर्गत, व्यक्ती-व्यक्तीमधील आंतरक्रियेच्या अभ्यासामध्ये, व्यक्तीचे 'मन' 'स्व:त्व' आणि 'समाज' या घटकांचा प्रभाव कशा प्रकारे असतो हे जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## ३.१ प्रस्तावना :

'सामाजिक आंतरक्रियावादी' हा सैध्दांतिक दृष्टीकोन असून यामध्ये प्रामुख्याने व्यक्ती आणि समाज यांच्या मधील परस्पर संबंधांचा अभ्यास करत असताना या दोन घटकांचा परस्परांवर होणारा प्रभाव देखील विचारात घेतला जातो. समाज या घटकामुळे व्यक्तीचे वर्तन कशा प्रकारे निश्चीत होत असते, आणि त्याच वेळी दुसऱ्या बाजूला व्यक्ती वर्तनाचा परिणाम म्हणून समाज आणि समाजातील परिवर्तन कशा प्रकारे घडून येत असते या विषयी अभ्यास होतो. व्यक्तीचे व्यक्तीमत्व आणि समाज यांचा जरी परस्पर संबंध असला तरी, हे दोन्ही घटक समाजामध्ये स्वतंत्रपणे कशा प्रकारे निर्माण होत असतात? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सामान्यता अशा स्वरूपाचे अभ्यास हे सूक्ष्म समाज-शास्त्रीय सिध्दांता अंतर्गत येतात. समाजशास्त्रीय अभ्यासाअंतर्गत येणाऱ्या व्यापक समाजरचना आणि त्यांच्यामधील उत्क्रांती व वर्ग-संघर्ष यासारख्या सामाजिक प्रक्रिया आणि समाज व्यवस्थांचे स्वरूप विचारात घेवून अभ्यास करण्याऐवजी समाजातील व्यक्ती व्यक्तींच्यामध्ये घडून येणाऱ्या आंतरक्रियेची प्रक्रिया आणि त्याचा समाज व व्यक्ती या घटकांवर घडून येणारा परिणाम अभ्यासण्याकडे अभ्यासकांचा कल दिसून येवू लागला

जॉर्ज हर्बर्ट मीड हे अमेरिकेतील शिकागो विद्यापीठामध्ये १८९४ ते १९३१ या काळात तत्वज्ञान विषय शिकवत होते. मीड यांचे समाजशास्त्रीय विचार हे त्यांच्या "Mind, Self and Society" या ग्रंथातील अभ्यासातून आलेले आहेत. अनेक काळापासून त्यांनी आपले विचार या ग्रंथामध्ये संग्रहित करून ठेवले होते. त्यामुळे त्यावेळच्या समाजशास्त्रीय विचारवंतामध्ये मीडचा प्रभाव आढळून येतो.

मीड यांचा जन्म २७ फ्रेबुवारी १८६३ मध्ये दक्षिणेच्या हॅडली मॅशूट (Hadely Massachusetts) या ठिकाणी झाला. त्यांचा प्रामुख्याने तत्वज्ञान आणि सामाजिक मानसशास्त्राच्या अभ्यासाशी संबंध आला. मीड यांनी अमेरिकेतील हार्डवर्ड विद्यापीठातून आपले पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर १८९१ मध्ये मिशिगन विद्यापीठामध्ये ते शिक्षक म्हणून काम करू लागले. मीड हे एक अभ्यासक आणि अध्यापक म्हणून काम पहात असताना, ते शिकागोमधल्या राजकीय सुधारणा चळवळीमध्ये सहभागी होते. त्यांचा मृत्यू २६ एप्रिल, १९३१ रोजी झाला.

जॉर्ज हर्बर्ट मीड यांचे विचार प्रामुख्याने विल्यम जोन्स, जॉन डयुई आणि चार्लस कुले या सारख्या विचारवंताच्या मुळे प्रभावित झाले होते. या विचारवंतानीच सुरुवातीला Mind, self and Society या सारख्या संकल्पनांची मांडणी करण्यास सुरुवात केली, तीच नंतर मीड यांच्या प्रमुख अभ्यासाचे केंद्र झाले.

आता आपण मीड यांच्या तीन प्रमुख विचारांचा अभ्यास करणार आहोत. पहिल्या उप-घटकांमध्ये आपण त्यांचा सामाजिक वर्तनवादाचा दृष्टीकोन जाणून घेणार आहोत. त्यानंतरच्या दुसऱ्या उप-घटकांमध्ये आपण व्यक्ती व्यक्तींच्या मध्ये घडून येणाऱ्या आंतर क्रियांचे स्वरूप जाणून घेत असताना व्यक्तीच्या कृती (Act) हावभाव (Gestures) आणि इतर महत्वपूर्ण हालचाली (Significant symbols) या संकल्पना समजून घेणार आहोत व शेवटी तिसऱ्या उप घटकांमध्ये मीड यांनी 'Mind, self and society' या संदर्भात महत्त्वपूर्ण मांडलेल्या विचांराचा अर्थ समजून घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन :

१९ व्या शतकाच्या अखेरीला अनेक अभ्यासकांनी समाज संरचनेच्या अभ्यासाऐवजी आपले लक्ष समाजातील व्यक्ती-व्यक्तींच्यामधील आंतक्रियेच्या अभ्यासावर केंद्रित केले. अशा स्वरूपाचा बदल ज्या सामाजिक आंतरक्रियावादी दृष्टीकोनामध्ये केला जात होता त्या दृष्टीकोनाला सामाजिक मानसशास्त्रीय अभ्यासाचा दृष्टीकोन म्हणून ओळखले गेले. समाज संरचना आणि त्या संबंधीच्या विचारांची मांडणी करण्याऐवजी सामाजिक आंतरक्रियावादी दृष्टीकोनाच्या अभ्यासातून व्यक्ती वर्तनाचे निश्चीत असे स्वरूप अभ्यासताना व्यक्तीचे मानसिक वर्तन आणि वर्तनाबद्दलची वैशीष्टे अभ्यासण्यावर विशेष भर दिला जाऊ लागला. तसेच या दृष्टीकोनामध्ये व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियांचे स्वरूप, त्यांचे बदलते स्वरूप आणि सामाजिक संबंधांचा अभ्यास विचारात घेत असताना, व्यक्ती व्यक्तीच्या मधील आंतरक्रिया (Interaction) हा अभ्यासाचा केंद्रबिंदू समजण्यात आला.

### ३.२.१ जॉर्ज मीडची बौद्धिक पार्श्वभूमी

मुख्यता अमेरिकन समाजशास्त्राच्या अभ्यासाची 'सांकेतिक आंतरक्रियावाद' (Symbolic Interactionism) एक अभ्यासशाखा आहे. ही अभ्यासशाखा विकसित करण्यामध्ये ज्या प्रमुख अमेरिकन अभ्यासकांनी योगदान केले त्यामध्ये जॉन ज्यू., विल्यम थॉमस आणि जॉर्ज हर्बर्ट मीड यांचा समावेश होतो.

जॉर्ज हर्बर्ट मीड यांचा जन्म २७ फेब्रु. १८६३ रोजी दक्षिण हेडली, मॅच्यूसेट या ठिकाणी झाला. ते तत्त्वज्ञानाचे अभ्यासक होते व त्यांनी 'सामाजिक मानसशास्त्रा'च्या (Social Psychology) अभ्यासासाठी आपले विचार मांडले. १८८३ मध्ये ऑबरिलिन महाविद्यालयातून त्यांनी पदवी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी १८८७ मध्ये, हार्डवर्ड विद्यापीठातून पदवी अभ्यासक्रम सुरू केला. २६ एप्रिल १९३१ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

'सांकेतिक आंतरक्रियावाद' (Symbolic Interactionism) हा समाजशास्त्राच्या अभ्यासातील एक दृष्टीकोन आहे. यामध्ये त्यांनी, समाजातील व्यक्ती-व्यक्तींच्यामध्ये घडून येणाऱ्या 'आंतरक्रियांचा' (Interaction) अभ्यास करताना व्यक्तींच्याकडून आंतरक्रियांना कसा अर्थ प्राप्त होतो या विषयीचा अभ्यास केला.

*** 'हर्बर्ट मीड'चा सामाजिक वर्तनवाद किंवा सांकेतिक आंतरक्रियावाद**

हर्बर्ट मीड यांनी १९३४ मध्ये लिहिलेल्या 'Mind, Self आणि Society' या त्यांच्या ग्रंथामध्ये, सांकेतिक आंतरक्रिया वादाचा अर्थ खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

''व्यक्तीगत अनुभवाच्या आधारे वर्तनाचा अभ्यास म्हणजे सांकेतिक आंतरक्रियावाद होय.''

## ✻ सांकेतिक आंतरक्रिया वादाचा इतिहास किंवा विकास

'सांकेतिक आंतरक्रियावाद' ही संज्ञा सर्वप्रथम 'हर्बर्ट ब्ल्यूमर' या अभ्यासकाने 'हर्बर्ट मीड' यांच्या समवेत राहून केली होती. 'समाजशास्त्र' आणि सामाजिक मानसशास्त्राचा अभ्यास विषय जाणून घेण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला आहे. यादृष्टीकोनाची वैचारिक पार्श्वभूमी जाणून घेताना पुढील घटकांचा विचार केला जातो.

### अ) डार्वीनचा 'उत्क्रांतीवादाचा' 'आंतरक्रियावादा'वरील परिणाम

डार्वीनच्या, Expression of the emotions in man & Animals' या ग्रंथामध्ये त्यांनी प्राण्यांच्या बरोबरीनेच मानवाच्या ठिकाणी असणाऱ्या जाणीवा आणि संवेदना यामधून भावनाचा उगम होत असतो असे मत मांडले. मानवाचे वर्तन हे मानसिकतेशी संबंधित असते असे डार्विनचे मत होते. परंतु हर्बर्ट मीड यांच्या मते, व्यक्तींच्या भावना व्यक्तीच्या वर्तन प्रकारातून प्रकट होत असतात. अशा प्रकारे हर्बर्ट मीडच्या विचारांवर आणि अमेरिकन समाजशास्त्राच्या 'कार्य-कारण वाद' (Pragmatism) विचारांना डार्वीनचा विचार चालना देणारा होता. मानवी वर्तनाचा संबंध भावनांशी असतो या डार्वीनच्या विचाराचे खंडन करताना मानवी वर्तन हे व्यक्ती ज्या सामाजिक पर्यावरणामध्ये असते त्या मधल्या व्यक्ती-व्यक्तींच्या परस्परसंबंधातून आकाराला येते. व्यक्तीच्या सभोवतालचे पर्यावरण आणि त्याला अनुसरून व्यक्ती-व्यक्तींच्या मध्ये ज्यावेळी आंतरक्रिया होतात, त्यावेळी व्यक्ती सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीशी मिळते-जुळते घेवून आंतरक्रिया करतात. त्यावेळी नविन मानवी वर्तन प्रकारांशी मानव नव्याने मिळते-जुळते घेत असतो.

### ब) स्कॉटलंडमधील 'नैतिकवादी' विचारांचा आंतरक्रियावादावरील परिणाम

ॲडम फर्ग्युसन, हेन्री होम्स, डेव्हिड ह्यूम, आणि ॲडम स्मिथ या स्कॉटीश नैतिकवादी अभ्यासकांनी व्यक्तीच्या मनाचा (Mind) आणि व्यक्तीच्या स्वःत्वाचा (Self) विचार मांडताना हे दोन्ही सामाजिक घटक असून व्यक्ती-व्यक्तींच्या मधल्या आंतरक्रियातून त्यांना महत्त्व प्राप्त होते.

### क) जर्मनीमधील काल्पनिक वादाचा 'आंतरक्रियावादा'वरील परिणाम

जर्मनीमधील 'काल्पनिकवादी' विचारवंत म्हणून असणारे, गॉटलिबफिच, फ्रेड्रिक रोलिंग आणि हेगेल या विचारवंताचा प्रभाव 'हर्बर्ट मीड' यांच्या विचारावर दिसून येतो. त्यांच्या मते, मानव हा आपले विश्व स्वतः निर्माण करतो आणि तो स्वतःच्या बुद्धीने घटनांचा अर्थ निर्माण करत असतो. आपण ज्या विश्वामध्ये वास्तव्य करून आहे, त्या विश्वाची निर्मिती ही आपल्याकडूनच झाली आहे. तसेच विल्यम जेम्स या अभ्यासकांने मांडलेली subject-object ची प्रक्रिया सांकेतिक आंतरक्रिया वादाला उपयुक्त ठरली. या प्रक्रियेमध्ये व्यक्तींच्या भावना, जाणीवा, संवेदना अशा काही नसतात. उलट व्यक्तींच्या विचारांना चालना देणारी उद्दिष्ट्ये महत्त्वाची असतात. म्हणून विचार आणि उद्दिष्ट्ये (Subject & object) हे परस्परावलंबी असतात. उद्दिष्टांशिवाय विचार असू शकत नाहीत किंवा विचारांशिवाय उद्दिष्टे ठरू शकत नाहीत. या परस्पर संबंधाचा विचार हर्बर्ट मीड यांना व्यक्तीच्या स्वःत्वाबद्दलचा विचार मांडताना झाला. प्रामुख्याने जर्मनीमधील अभ्यासकांचा अभ्यास करताना, हर्बट मीड यांच्या विचारांवरती प्रामुख्याने 'न्युलिहेम उंड' यांच्या 'भाषा' आणि 'हावभाव' विषयाच्या सिद्धांताचा विशेष प्रभाव झाला. 'उंड' यांनी 'व्यक्तींच्या हावभावा'चा संबंध हा व्यक्तींच्या भावनांशी नसून त्याला सामाजिक घटक जबाबदार असतात असा विचार मांडला. सामाजिक आंतरक्रियांच्या वेळी व्यक्ती-व्यक्तींच्या मधील भाषा हे संभाषणाचे माध्यम असते. त्यामधूनच व्यक्तीच्या स्वःत्वाचा विकास होतो. त्यामुळे व्यक्तींचे हावभाव जाणून घेण्यासाठी, सामाजिक आशय महत्त्वाचा घटक

ठरतो. हेगेल यांनी व्यक्तीच्या ठिकाणी असणाऱ्या जाणीवा, भावना आणि संवेदना यांच्या मध्ये परस्पर द्वंद्व असते असा विचार मांडला. व्यक्तींच्या ठिकाणी असणाऱ्या क्षमतेमुळे विश्वाची निर्मिती झालेली आहे. व्यक्तीला तिचा सामाजिक विकास तिच्या सभोवताली असणाऱ्या समाजाशी संघर्ष करून करावा लागतो. त्यामुळे सांकेतिक आंतरक्रियावादी विचारांना चालना देण्यामध्ये व्यक्ती आणि समाज यांच्यातील आंतरक्रिया कशा उपयुक्त ठरल्या हे दिसून येते. कारण व्यक्ती अगोदरच असलेल्या समाजामुळे व्यक्तीला समाजाशी द्वंद्व करताना आंतरक्रिया कराव्या लागल्या व त्यातूनच पुढे व्यक्ती-व्यक्तींच्या मधल्या 'आंतरक्रिया'मधून समाजजीवन आकाराला आले.

### ❊ कार्य-कारण वादाचा सांकेतिक आंतरक्रिया वादावरील परिणाम

अमेरिकेतील 'कार्य-कारणवादी' विचारांचा प्रभाव 'हर्बर्ट मीड' यांच्या सांकेतिक आंतरक्रियावादी विचारांवर झालेला आढळतो. 'कार्यकारण-वाद' हा एकमेव असा प्रमुख विचार होता की, ज्याचा सर्वात जास्त प्रभाव आढळून येतो. 'Pragmatism' किंवा कार्य-कारण विचारांप्रमाणे 'True reality does not exist out there in the real world it is actively created as we act toward the world.' आपल्या सभोवताली दिसणाऱ्या वास्तव विश्वामध्ये ज्या कांही मानवी घटना घडून येतात त्या घटना संबंधीच्या केवळ बाह्य रूपावरून घटनेची सत्यता समजून येत नसते, उलट घटनेत सहभागी असणाऱ्या व्यक्ती अतिशय चाणाक्षपणे घटनांना स्वरूप देण्याचा प्रयत्न करतात, ज्यामधून आपण सर्व एक अर्थ लक्षात घेवून त्याप्रमाणे वर्तन करण्याचा प्रयत्न करतो.

'कार्य-कारणवादी विचारांचा अमेरिकेमध्ये विकास करण्यामध्ये हर्बर्ट मीड यांनी मोठे योगदान केले. त्यांनी जॉन ड्यू, विल्यम जेम्स, आणि जेम्स बाल्डविन यांच्या सहकार्याने हा विचार पुढे आणला. हर्बर्ट मीड यांच्या मते, कार्यकारणवादी विचार म्हणजे अमेरिकन समाजाचा तो सभाविक गुणधर्म आहे. तसेच अमेरिकेची होणारी शास्त्राची प्रगती हे त्याचे एक उदाहरण आहे. शास्त्रामध्ये वैज्ञानिकतेवर आधारित माहितीला महत्त्व देताना तात्त्विक किंवा दैववादी स्वरूपाच्या हलक्या प्रतीच्या श्रद्धांना महत्त्व दिले जात नाही. कार्य-कारण वाद हा 'परिपूर्ण सत्य' (Absolute Truths) या संकल्पनेचा स्वीकार करत नाही. त्यामुळे आपले सर्व प्रकारचे विचार कल्पना या केवळ विशिष्ट काळासाठीचे विचार असतात ज्यामधून पुढील संशोधनाद्वारे आपण जुने विचार नव्याने मांडत असतो. त्यामुळे एखाद्या घटनेसंबंधीचे सत्य हे व्यक्ती तिच्या सभोवतालच्या परिस्थितीमधून निश्चित करते त्यामुळे नेमके सत्य आणि व्यक्तींच्या जाणीवा यामुळे सत्य हे व्यक्तीच्या एकूण वर्तनावर अवलंबून असते.

कार्य-कारण वादामध्ये व्यक्ती एखाद्या घटनेचा अर्थ जाणून घेते आणि नंतर आपली प्रतिक्रिया देत असते. व्यक्तीचे वेग-वेगळ्या प्रसंगीचे वर्तन हे प्रसंगाचे स्वरूप आणि कारणांवरून ठरत असते. त्यामुळे व्यक्ती इतरांशी वर्तन करताना घटनेमागील स्थल, काल आणि घटनेतील सहभागी व्यक्तींच्या वर्तनाचा अंदाज घेवून आपल्या वर्तनाची दिशा ठरवते. व्यक्तींच्या कृती (Acts) या सामाजिक स्वरूपाच्या असतात हा मीड यांचा विचार त्यांचे सहकारी 'जॉन ड्यू' यांच्या पासून आला आहे. Social Psychology च्या अभ्यासामध्ये हे दोन्ही अभ्यासक परस्परांना पूरक होते. त्यांच्या मते, व्यक्ती आपल्या बहुतांशी कृती करताना सभोवतालच्या सामजिक परिस्थितीशी मिळते-जुळते घेण्याचा प्रयत्न करून परिस्थितीवर मात करत असते.

## ✲ वर्तनवादाचा मीडच्या विचारसरणीवरील परिणाम

हर्बर्ट मीड हे स्वतःला 'वर्तनवादी' (Behaviorism) विचारांचे समजत होते. या विचारानुसार व्यक्तीचे 'वर्तन' हा अभ्यासाचा एक प्रमुख घटक विचारात घेतला जातो. 'हर्बर्ट मीड' यांच्या आगोदरचे अभ्यासक मानवी वर्तनाचा अभ्यास करताना 'वर्तन' हे व्यक्तीच्या मानसिक किंवा त्यांच्या जवळ असणाऱ्या अंतर्गत संवेदनामुळे घडून येत असते असा विचार मांडत होते. हर्बर्ट मीड यांनी सुद्धा व्यक्तीच्या अंतर्गत संवेदना (Covert) वर्तनाला जबाबदार असतात हे मान्य केले होते. परंतु मानवी वर्तन प्रभावीत होण्याला प्रत्यक्ष निरक्षणातून ज्या घटनांचा प्रभाव व्यक्तींच्या अंतर्मनावर होतो असे 'बाह्य वर्तन' (Covert) सुद्धा त्यांनी विचारात घेतले होते. त्यामुळे व्यक्तीचे वर्तन निश्चित करण्यामागे व्यक्तींच्या मानसिक घटकाबरोबरच (Covert) बाह्य घटकांचा (overt) देखील प्रभाव व्यक्तीच्या वर्तनावर होत असतो.

## ✲ विल्यम जेम्सच्या 'स्वःत्व' (Self) संकल्पनेचा प्रभाव

हार्डवर्ड विद्यापीठातील विचारवंत विल्यम जेम्स (१८४२-१९१०) एक मानसशास्त्राचे तज्ञ होते की, ज्यांनी स्वःत्व (Self) संकल्पनेचा सखोल अभ्यास केला होता. त्यामुळे हर्बर्ट मीड यांच्या सामाजिक मानसशास्त्र आणि सांकेतिक आंतरक्रियावादी विचारांवर मुख्यता विल्यम जेम्स यांच्या 'स्वःत्वा'च्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. जेम्स यांनी त्यांच्या Principles of Psychology या ग्रंथामध्ये व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधाचा अर्थ समजावून घेतला आहे. त्यांनी व्यक्तीच्या वर्तनासंबंधीचा अभ्यास करताना व्यक्तींच्या मधल्या जीवशास्त्रीय कारणांच्या पेक्षा, व्यक्ती आपल्या असणाऱ्या सवयींच्या (Habits) मधून आपले वर्तन निर्धारित करीत असतात. व्यक्ती आपल्या सवयी जस-जशा बदलत जाते त्यानुसार व्यक्तीचे वर्तन देखील बदलत असते. नव-नवीन सवयी व्यक्ती आत्मसात करीत राहिल्याने, तिच्या स्वभावामध्ये बदल घडत जातात.

विल्यम जेम्स यांनी व्यक्तींच्या ठिकाणी असणाऱ्या 'जाणीवा' (Consciouness) आणि व्यक्तीकडून होणारे कार्य यामधून व्यक्तींच्या स्वःत्वाची संकल्पना मांडली. त्यांच्या मते 'मी' (I or me) या मधून व्यक्तीचे स्वःत्व प्रकट होत असते. तसेच स्वःत्वाचा अनुभवजन्य पुरावा पाहिजे असेल तर आपल्याकडून होणाऱ्या भावना, कृती, स्वःताबद्दलची कल्पना, विचार इ. चा संदर्भ देता येईल. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती या नियमाप्रमाणे स्वःत्वाचे असंख्य प्रकार असू शकतात. कारण सर्वच व्यक्ती एकसारखे वर्तन करणाऱ्या नसतात. अशाप्रकारे, Social Self किंवा सामाजिक स्वत्व ही जेम्स यांची संकल्पना हर्बर्ट मीड यांना सांकेतिक आंतरक्रियावादामध्ये उपयुक्त ठरली. सामाजिक स्वःत्व म्हणजे व्यक्तीचे स्वत्व हे सामाजिक परिस्थितीमुळे आकाराला येते हा विचार महत्त्वाचा ठरतो.

## ✲ कूलेंच्या 'स्वःत्वाच्या' संकल्पनेचा 'हर्बर्ट मीड' च्या विचारांवरील प्रभाव

कूलेच्या मते, 'मानवी स्वःत्व' हे मानवा सभोवताली असणाऱ्या पर्यावरणातून तयार होते. 'स्वःत्वाची' प्रक्रिया ही आपल्या सभोवताली असणाऱ्या सामाजिक पर्यावरणामुळे चालू असते. त्यामुळे त्या ठिकाणच्या व्यक्ती, आपले व्यक्तीमत्त्व इतर व्यक्तींच्या मध्ये कसे असावे, यासाठी म्हणून इतर व्यक्तींच्या मनामध्ये आपली प्रतिमा कशी असणार अथवा असावी याचे भान प्रत्येक व्यक्तीला रहाते. त्यामुळे व्यक्ती आपल्या वर्तनामध्ये आवश्यक इतके बदल करवून घेत असते. समाजातील व्यक्ती समाजाला अपेक्षित असणाऱ्या वर्तनाप्रमाणे वर्तन करीत असतात. त्यामुळे व्यक्ती स्वतःच्या इच्छेप्रमाणे वर्तन करीत नाहीत किंवा व्यक्तीकडे असणाऱ्या संवेदना, भावना किंवा तिच्या प्रवृत्ती वर्तनाला चालना देणारे घटक नसतात. उदा.

धार्मिक स्थळांच्या ठिकाणी किंवा मंदिरामध्ये असभ्य अथवा अश्लील वर्तन अमान्य असते, या संबंधीचे वर्तन व्यक्तीला देण्यामागे 'समाज' या घटकाचे योगदान असते, कारण तशा स्वरूपाच्या वर्तनाला समाज कसा अमान्यता देतो याबद्दलचे होणारे सामाजीकरण व्यक्तीचे स्वःत्व घडवित असते. 'सामाजिक स्वःत्व' व्यक्ती-व्यक्तींच्यामधील आंतरक्रियातून विकसित होते. कारण इतर व्यक्तींच्या बरोबर आपले संवाद किंवा आंतरक्रिया होत असताना, प्रत्येक व्यक्ती आपले मूल्यमापन, आपले वर्तन तपासून घेतात. त्यामुळे स्वःत्व हा वस्तुनिष्ठ आणि त्याच वेळी व्यक्तीनिष्ठ अभ्यास ठरत असतो. कूलेच्या मते, 'स्वःत्वाला' स्वतंत्र वेगळे स्थान असू शकत नाही. 'There is no sense of I' ... without its correlative sense of your or he or they. 'I' किंवा 'मी' ला स्वतंत्र स्थान असू शकत नाही. शिवाय जोपर्यंत 'मी' चा संबंध तो (He) किंवा 'they' (ते) इतरांशी प्रस्थापित होत नाही. जोपर्यंत व्यक्तीच्या स्वःत्वाला किंवा तिच्या अस्तित्वाला इतरांकडून प्रतिसाद मिळत नाही तोपर्यंत त्याला अर्थ नसतो. थोडक्यात कूलेच्या मते, एखाद्या व्यक्तीच्या कृतीला (Act) उदा. परिक्षेतील यश आणि त्या यशाचे महत्त्व आणि कौतुक जोपर्यंत कुटुंबातील इतर सदस्यांकडून होत नाही तोपर्यंत यश मिळवणाऱ्या व्यक्तीला तिच्या कृतीबद्दल समाधान मिळत नाही. कूले यांनी समाजशास्त्रामध्ये 'Looking glass self' ही संकल्पना मांडली.

## ❊ सामाजिक आंतरक्रियावादी दृष्टीकोनाचा अर्थ

'सांकेतिक आंतरक्रियावाद' (Symbolic Interactionism) ही अमेरिकन समाजशास्त्राची एक अभ्यासशाखा आहे. जी जॉन ज्यू., विल्यम थॉमस आणि हर्बर्ट मीड यांनी मांडली. यामध्ये, व्यक्तीच्या सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास करताना आंतरक्रियांमध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती कशाप्रकारे त्या आंतरक्रियांना अर्थ प्राप्त करून देतात या विषयी अभ्यास केला जातो. त्यामुळे या अभ्यासामध्ये समाजातील व्यापक स्वरूपावर घडून येणाऱ्या सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासापेक्षा सूक्ष्म पातळीवरच्या व्यक्ती-व्यक्तींच्या मधल्या आंतरक्रियांचा अभ्यास महत्त्वाचा असतो. जॉर्ज हर्बर्ट मीड यांना प्रामुख्याने या अभ्यासाचे प्रमुख समजले जाते. त्यांचे या संबंधी असणारे विचार पुढीलप्रमाणे-

## ❊ आंतरक्रियांच्या मधील व्यक्तीचे संकेत (Symbols)

हर्बर्ट मीड यांनी आपले विचार सामाजिक दृष्टीकोनातून स्पष्ट करताना समाजामध्ये व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियांमध्ये संकेत (symbols) म्हणून भाषा (Language) हा घटक असतो. या घटकाला एक वस्तू म्हणून न पहाता त्याला विशिष्ट अर्थ असतो. कारण 'भाषेच्या' माध्यमातून आंतरलिपेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती परस्परांना प्रतिसाद देतात. उदा. 'खुर्ची' (Chair) ही एक केवळ वस्तू म्हणून व्यक्ती त्याला ओळखत असल्या तरी, ते एक बसण्यासाठीचे साधन आहे हा संकेत त्या पाठीमागे असतो. तो व्यक्तीला 'खुर्ची' (Chair) या शब्दातून अर्थबोध झालेला असतो. भाषेमुळे व्यक्तीला आपले पर्यावरण किंवा एकूण सामाजिक जीवन आंतरक्रियांच्या साह्याने चालवता येते. भाषेअभावी व्यक्ती-व्यक्तींच्या मधल्या आंतरक्रिया अशक्य होतात त्यामुळे मानवी समाज अस्तित्वात येवू शकत नाही. व्यक्ती वांशिक किंवा आपोआप इतरांशी संपर्क करू शकत नाहीत. त्यासाठी त्यांना 'भाषा' विकसित करून परस्परांच्या मधील आंतर-क्रियांच्या साह्याने सभोवतालच्या घटनेचा अर्थ जाणून घ्यावा लागतो.

## ❊ आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींच्या भूमिका (Role-taking)

समाजातील व्यक्ती-व्यक्तींच्या मधल्या आंतरक्रियेचा अर्थ समजून येण्यासाठी आंतर-क्रियांच्या मध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती भाषेसारख्या संकेताचा उपयोग करून परस्परांना जरी प्रतिसाद देत असल्या तरी

एका व्यक्तीला दुसरी व्यक्ती कोणत्या अर्थाने तिच्याशी संपर्क करत आहे. किंवा तिचा उद्देश काय आहे. हे समजण्यासाठी तिला विशिष्ट भूमिका पार पाडावी लागते. उदा. समोरच्या व्यक्तीकडून होणारे हातवारे किंवा चेहऱ्यावरील उदासिनता, संताप, उत्साह, दुःख जाणून घेतल्यानंतर दुसरी व्यक्ती त्याप्रमाणे आपली भूमिका निश्चित करते. त्यामुळे व्यक्ती-व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेचा अर्थ जाणून घेण्यासाठी त्यामधल्या व्यक्ती कशा प्रकारच्या भूमिका घेतात हे पहाणे आवश्यक असते.

**※ स्वःत्वाचा विकास**

आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती कशाप्रकारे भूमिका आत्मसात करतात आणि त्यातून त्यांच्या 'स्वःत्वाचा' (Self) विकास होतो. इतरांच्या ठिकाणी स्वःताला ठेवून व्यक्ती आपले मूल्यमापन करते. ज्यावेळी व्यक्ती स्वःतापासून दूर होऊन इतरांच्या माध्यमातून स्वःताकडे पहाते त्यावेळी ती स्वःताला एक 'वस्तू' (object) समजून मूल्यमापन करते. अशाप्रकारे व्यक्तीला इतरांच्याकडून निरीक्षण करून घ्यावे लागते. त्यामुळे 'स्वःत्व' (self) ही संकल्पना आणि तिचा विकास हा व्यक्ती इतरांसमवेत आंतरक्रिया करताना कशाप्रकारे आपली भूमिका साकारते यावर अवलंबून असते. प्रत्येक मानवी समाजाची संस्कृती भिन्न-भिन्न असल्याने मानवी संस्कृतीप्रमाणे व्यक्ती आप-आपल्या भूमिका आणि वर्तन आत्मसात करतात. त्यामुळे व्यक्तींच्या समाजातील भूमिका आणि वर्तन हे कायमस्वरूपी स्थिर नसून ते सातत्याने बदलणारे असते.

**※ व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध**

ज्याप्रमाणे व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रिया मधून मानवी समाजाला आकार प्राप्त होत असतो. व्यक्ती ज्यावेळी स्वतःच्या वर्तनाला दिशा देण्याचा प्रयत्न करते त्यावेळी ती समाजामध्ये असणाऱ्या आपल्या सहकार्याच्या प्रवृत्तीपासून प्रभावित होऊन तसेच समूहाच्या इच्छा-आकांक्षाचे स्वरूप जाणून घेवून वर्तन निर्धारीत करते. व्यक्ती आणि समाज परस्परसंबंधित असल्याने त्या परस्परापासून स्वतंत्र विकास करू शकत नाहीत. व्यक्तीला मनुष्यत्व हे केवळ समाजामुळेच मिळू शकते. व्यक्तीचे 'स्वःत्व' समाजात विकसित झाले तरच व्यक्ती विचार करू शकते. व्यक्ती आपले स्थान किंवा भूमिका इतरांच्या माध्यमातून घेते त्यावेळी तिच्याकडे सहकार्याचे गुण येतात. भाषेसारख्या माध्यमातून व्यक्ती-व्यक्तींच्या मधल्या आंतरक्रिया घडून आल्याखेरीज समाज निर्माण होऊ शकत नाही.

अशाप्रकारे हर्बर्ट मीड यांच्या वैचारिक पार्श्वभूमीसंदर्भात विचार करताना, सामाजिक मानसशास्त्राचा (Social Psychology) प्रभाव आणि 'सांकेतिक आंतरक्रियावादी' विचार (Symbolic Interactionism) कशाप्रकारे प्रभावी ठरले हे समजून येते. त्यांच्या एकूण वैचारिक मांडणीमध्ये 'व्यक्ती वर्तन' आणि व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियांचा अभ्यास करताना सामाजिक घटकांचे महत्त्व कशाप्रकारे असते. हे त्यांनी स्पष्ट केले. व्यक्ती आणि समाज यांच्यामधल्या परस्परसंबंधाचे स्वरूप स्पष्ट करताना, हे दोन्ही घटक कशाप्रकारे परस्परावलंबी आहेत व ते एकमेकापासून स्वतंत्र का राहू शकत नाहीत, या बद्दलची सविस्तर मांडणी त्यांच्या अभ्यासातून दिसून येते.

**३.२.१.१ रिकाम्या जागा भरा**

१) हर्बर्ट मीड यांनी ......... ग्रंथ लिहिला.

२) Principles of Psychology हा ग्रंथ ............... यांनी लिहिला.

३) Looking glass-self संकल्पना …………… यांनी मांडली.

४) ………… हा व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियेतील सांकेतिक घटक असतो.

५) मानवी आंतरक्रिया आणि ………….. हा हर्बर्ट मीड यांचा प्रमुख अभ्यास विषय होता.

### **३.२.२ सामाजिक वर्तनवाद** (Social Behaviouram) **:**

जॉर्ज हर्बर्ट मीड हे एक सामाजिक मानसशास्त्राचे अभ्यासक होते आणि त्यांच्या विचारावर मानसशास्त्राच्या अभ्यासातील वर्तनवादाचा विशेष प्रभाव आढळून येतो. मीड यांनी व्यापक अर्थाने वर्तनवादाचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, 'वर्तनवाद म्हणजे व्यक्तीला तिच्या व्यक्तीगत अनुभवातुन आलेल्या अनुभवांचा तिच्या वर्तनातून अभ्यास करण्याचा दृष्टीकोन होय.' अशा स्वरूपाच्या अभ्यासाचा दृष्टीकोन आणि त्याचा वापर मीड यांच्या कालखंडातील वॅटसन आणि इतर काही अभ्यासकांनी उपयोगात आणलेला होता. वॅटसन यांनी मानवी वर्तनाच्या अभ्यासासाठी या दृष्टीकोनाचा अवलंब करत असताना व्यक्तीजवळ असणाऱ्या मानवी संवेदना आणि जाणीवांचा (Human Conciousness) मात्र स्वीकार केलेला नव्हता. मीड यांच्या मते, वॅटसन यांचा वर्तनवादी विचारांचा दृष्टीकोन हा केवळ व्यक्तीला येणाऱ्या अनुभवापुरता मर्यादित होता, परंतु व्यक्तीला येणारे अनुभव तिच्या अंतर्गत असणाऱ्या मानसिक घटकांशी कशा प्रकारे संबंधित असतात या बाबत मात्र त्याचे स्पष्टकीरण आढळून येत नाही. त्यामुळे मीड यांचे असे मत होते की, वर्तनवादी प्रक्रियांचा देखील अभ्यास करता येवू शकतो. म्हणून मीड यांना 'सामाजिक वर्तनवादी विचारवंत' असे संबोधिले जाते.

मीड यांनी व्यक्तीच्या मनाचा अभ्यास न करता, व्यक्ती ज्या वेगवेगळ्या सामाजिक कृती करतात त्या कृतीवर (Act) आपल्या अभ्यासाचे लक्ष केंद्रित केले. वर्तनावादी अभ्यासकांच्या मते, व्यक्तींच्या कृती (Act) म्हणजे एका व्यक्तीला दूसऱ्या व्यक्तीकडून मिळणारा प्रतिसाद अथवा प्रोत्साहन (Stimuli) होय. व्यक्तींच्या वेगवेगळया कृती घडून येणासाठी तिच्या सभोवतालची सामाजिक परिस्थिती कारणीभूत असते व्यक्तीकडून होणाऱ्या कृतीचा संबंध हा आपल्या मनाशी किंवा अंतर्गत 'मन' (Mind) या घटकांशी असतो या बद्दल दूमत असण्याचे काहीच कारण नाही असे मीड यांचे देखील मत होते. परंतु वर्तनवादी दृष्टीकोनांच्या माध्यमातून 'मन' ही संकल्पना विचारात न धरता त्या संबंधीच्या मानवी कृतीचा अभ्यास करणे शक्य आहे.

मीड यांच्या मते, मानवी समाजाचे विश्लेषण करणारा प्रमुख घटक व्यक्तींच्या कृती किंवा सामाजिक कृती हा असतो. त्यामुळे सामाजिक मानसशास्त्राच्या अभ्यासात प्रामुख्याने व्यक्ती वर्तनाचा अभ्यास, हा व्यक्ती-व्यक्तींच्या मध्ये घडून येणाऱ्या आंतर क्रियांच्या अभ्यासातून केला पाहिजे. व्यक्तींच्या सामाजिक कृती म्हणजे, सामान्यता दोन भिन्न कार्यक्षेत्रातील व्यक्तींच्या मध्ये घडून योणारा एक व्यवहार असतो. असा व्यवहार काही वेळा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या मधला देखील असू शकतो. अशा आंतर क्रियांच्या अभ्यासामध्ये अभ्यासाचे केंद्र मात्र व्यक्ती वर्तनाचा अभ्यास हे असते. वर्तनावादी दृष्टीकोनातून मीड यांनी सामाजिक मानसशास्त्राचा अभ्यास स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, व्यक्ती-व्यक्तीच्या मधील आंतरक्रियांचा अभ्यास करताना त्याचा प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारावर अभ्यास करणे आणि आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींच्या कृती जाणून घेणे हा अभ्यासाचा प्रमुख घटक असतो.

मीड यांच्या सामाजिक वर्तनवादी विचारामध्ये व्यक्तींच्या कृती अथवा वर्तन हा जरी अभ्यासाचा प्रमुख घटक असला तरी, अशा कृती अभ्यासताना वर्तनाच्या 'उघड' आणि 'बंदिस्त' (Overt and Covert)

बाजूंचा अभ्यास महत्त्वाचा मानला गेलेला आहे. व्यक्ती वर्तनाशी संबंधित सर्व प्रकारच्या पारंपारिक, सनातनवादी व मानसिक वर्तनाशी संबंधीत व्यक्तींचा अभ्यास करताना व्यक्ती इतरांशी ज्या वेळी संवाद करते त्या वेळी तिची असणारी सावधानता, तिचा दृष्टीकोन, तिच्या मनातील विविध कल्पना, भावना इ. घटकांचा एक वर्तन म्हणून अभ्यास केला जातो. थोडक्यात व्यक्तीच्या वर्तनाशी संबंधित सर्व मानवी कृतींचा संबंध जोडला जातो. मीड यांनी मानवी वर्तन आणि मानवेत्तर प्राण्यांच्या मधील अभ्यास करताना भाषा या घटकांवरून दोन्हींच्या मधील फरक स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, मानवी आंतरक्रिया घडून येण्याचे भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे.

**✷ वॅटसन आणि मीड यांच्या वर्तनवादी विचारातील फरक**

चार्लस मॉरीस यांनी जॉर्ज मीड यांच्या 'Mind, self and Society' या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये, मीड आणि वॅटसन यांच्या मधील वर्तनवादी विचारासंदर्भात असणारा फरक स्पष्ट केला आहे.

१. मीड यांच्या मते, वॅटसन यांचा वर्तनासंबधीचा दृष्टीकोन हा एकदम सोप्या पध्दतीचा होता. त्यामुळे त्या दृष्टीकोनामध्ये सामाजिक आशयाची कमतरता दिसून येते, अशी टीका केली आहे. अर्थात मीड यांना व्यापक अशा सामाजिक पातळीवरील, व्यक्ती वर्तनासारख्या लहान घटकांचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते

२. वॅटसन यांनी त्यांच्या वर्तनवादामध्ये व्यक्तीच्या मानसिक प्रक्रियेचा अभ्यास समाविष्ट केलेला नाही. त्यांच्या वर्तनवादामध्ये व्यक्तीच्या वर्तनाशी संबंधित व्यक्तीकडे असणारी ‘जाणीव’ (Conciousness) याचा व्यक्तीच्या मानसिक प्रक्रियेवर कसा परिणाम होतो या विचाराचा अभाव दिसून येतो. त्यामुळे मीड यांच्या मते, सामाजिक वर्तनवादी हा एक वर्तनवाद विचारांचाच भाग असला तरी तो वॅटसन यांच्या वर्तनवादा सारखा नाही की, ज्या मध्ये केवळ बाह्य स्वरूपात मानवी कृतीचे निरीक्षण केले आहे. मीड यांनी वॅटसन यांचा वर्तनवादी विचार व्यापक अर्थाने अभ्यासताना आंतरक्रियांमध्ये समाविष्ट असणाऱ्या व्यक्तीवर्तनांचे स्पष्टीकरण एक मानसिक प्रक्रिया म्हणून केले आहे.

३. वॅटसन यांनी, व्यक्तीवर्तनाच्या अभ्यासामध्ये ‘मन’ या घटकाला विशेष महत्व न देता व्यक्तींच्या वर्तनाच्या कृती अभ्यासण्याचा प्रयत्न केला होता. या उलट मीड यांनी, व्यक्ती वर्तन हा आपल्या अभ्यासाचा प्रमुख घटक मानून ‘व्यक्ती’ या घटकाला विशेष स्थान दिल्यामूळे त्यांना सांकेतिक आंतरक्रियावादी विचारवंत म्हणून ओळखले जाऊ लागले.

**३.२.२.१ स्वयं:अध्ययनसाठीचे प्रश्न :**

**✷ योग्य जोडया जुळवा –**

| | ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|---|
| १) | सामाजिक मानसशास्त्रज्ञ | १) व्यक्ती जाणीवा |
| २) | मानवी आंतरक्रिया | २) अभ्यास दृष्टीकोन |
| ३) | प्राण्यांच्या आंतरक्रियामध्ये वापर नसतो | ३) मीड |
| ४) | मानवी आंतरक्रियेत वापरला जातो | ४) भाषा |
| ५) | वर्तनवाद | ५) सामाजिक कृती |

### ३.२.३ व्यक्तीच्या कृती, हावभाव आणि महत्त्वपूर्ण हालचाली : –

मीड यांच्या "Mind, self and society" या ग्रंथामध्ये प्रामुख्याने सामाजिक घटकांवर चर्चा केली आहे. सामाजिक मानसशास्त्राच्या अभ्यासात 'व्यक्ती' या घटकापेक्षा 'समाज' या घटकाला अग्रक्रम दिलेला आहे. त्यामुळे व्यक्ती घटकांचे विश्लेषण समाजाच्या दृष्टीकोनातून स्पष्ट करताना मीड यांनी व्यक्ती घटकाला दुय्यम स्थान दिलेले आहे. सामाजिक समुहांना अग्रक्रम किंवा प्रथम स्थान देत असताना आपल्या स्व:त्वाचा विकास हा समूहाच्या माध्यमातूनच होत असतो असे म्हटंले आहे.

**अ) व्यक्तीच्या कृती** (The Act) –

मीड यांनी त्यांच्या सिध्दांतामध्ये व्यक्तीच्या कृतीला महत्त्वाचे स्थान दिले आहे. मीड यांनी वर्तनवादी सिध्दांताचा आधार घेत असताना व्यक्तींच्या अंतर्गत मनात असणाऱ्या जैविक प्रेरणा (Stimuli) किंवा एखाद्या घटनेला प्रतिसाद देण्याची मानवी प्रवृत्ती या घटकांवर आपल्या अभ्यासाचे लक्ष केंद्रित केलेले आढळते. मीड यांच्या मते, व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या प्रेरणा या अचानकपणे किंवा आपोआप घडून येणाऱ्या नसतात तर त्या सर्व प्रेरणांचा व्यक्तीच्या वर्तनाशी संबंध असतो. यालाच मीड यांनी व्यक्तीच्या कृती असे संबोधिले.

**✹ व्यक्तींच्या कृती आणि त्यांच्या वेगवेगळया अवस्था –**

मीड यांनी व्यक्तींच्या कृतीचा अभ्यास करताना चार प्रमुख अशा परस्परसंबंधित मानवी कृतींचा शोध घेतला आहे. त्यांच्या मते, मानवी कृतीचा अभ्यास करताना, ज्या चार कृतींचा उल्लेख केलेला आहे, त्या कृती परस्पर पूरक स्वरूपाच्या आहेत. शिवाय त्या मानव आणि मानवेत्तर प्राण्यांच्या मध्ये देखील आढळून येतात.

**१. प्रेरणा किंवा प्रबळ इच्छा –**

या प्रकारच्या मानवी कृती म्हणजे व्यक्तीला तात्काळ स्वरूपात एखादी गोष्ट हवी–हवीसी वाटते किंवा त्या संबंधी तिच्या मध्ये प्रबळ इच्छा जागृत होत असल्याने ती पूर्ण करण्याच्या उद्देशाने व्यक्ती काही कृती करतात. उदा. भूक (Hunger) लागल्यानंतर मानव आणि मानवेत्तर प्राण्यांच्यामध्ये ती पूर्ण करण्याच्या उद्देशाने कृती घडून येत असतात. परंतु निर्माण झालेली भूक पूर्ण करण्याच्या पध्दती मध्ये प्राणी तात्काळ हव्या त्या पध्दतीने पूर्ण करतात, या उलट मानव मात्र भूक लागली तरी त्याची पूर्तता लगेच करावी की नंतर या बद्दल विचार करतो. तसेच मानव भूतकाळ आणि भविष्य काळाचा विचार करून भूके संबंधीच्या कृतीचे नियोजन करतो. कारण जे अन्न खाल्ल्याने त्याला भूतकाळात त्रास झाला असेल तर तो ते खाणार नाही किंवा ते खाल्यानंतर पुढे त्रास होणार असेल तर त्याचा तो विचार करेल. तसेच मानवाची भूक ही कृती त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणाशी संबंधित असते.

**२. पाहणे किंवा आकलन करणे –**

मानवी कृतीचा दुसरा टप्पा म्हणजे पाहणे किंवा आकलन करणे होय. या प्रकारच्या कृती करताना मानव त्याला झालेल्या प्रबळ इच्छा किंवा प्रेरणा (उदा. भूक) पूर्ण करण्याच्या उद्देशाने उपलब्ध असणारे वेगवेगळे मार्ग कोणते आहेत याचा शोध घेतो. मानवाजवळ पचनेंद्रिये असल्या कारणाने तो त्याच्या साह्याने अन्नाची प्रत कशी आहे हे जाणू शकतो. त्यामूळे भूक भागविण्या पूर्वी तो त्याची शह–निशा करूनच खात्री पटल्यानंतर तो अन्न ग्रहण करतो. केवळ भूकेची प्रबळ इच्छा झाली म्हणून कोणत्याही पध्दतीने मानव

त्याची पूर्तता करीत नसतो. व्यक्तीच्या दैनंदीन जीवनामध्ये अनेक प्रकारच्या प्रबळ इच्छा किंवा प्रेरणा असतात.

**३. हाताळणी करणे किंवा कसोटी घेणे. –**

मानवी कृतीचा हा तिसरा प्रकार असून या मानवी कृती मध्ये ज्याप्रकारच्या घटनांचे आकलन किंवा पहाणी केलेली असते, त्याचा प्रत्यक्ष वापर करण्यापूर्वी मानव त्याची हाताळणी किंवा कसोटी घेण्याची कृती करतो. प्राण्यांच्या तूलनेत मानवामध्ये या प्रकारच्या कृती अधिक प्रगत स्वरूपाच्या आढळतात. या प्रकारच्या कृतीमुळेच मानव तात्काळ एखाद्या प्रबळ इच्छेला उत्तर देत नाही. उदा. भूकेसारखी निर्माण होणारी प्रबळ ईच्छा तो तात्काळ पूर्ण करीत नाही. त्या पूर्ण करण्यासबंधीचे सर्व संदर्भ विचारात घेवून खाण्यालायक अन्न असेल तरच तो पुढची कृती करतो. प्राण्यांच्या संदर्भात मात्र अशा कृतीचा अभाव दिसतो. मानव मात्र जे अन्न खाणार आहे त्याचा मागचा पूढचा संदर्भ आणि अनुभव विचारात घेवून त्याबद्दल खात्री करूनच तो पुढची कृती करतो. म्हणजेच मानव ज्या प्रकारचे अन्न घेणार आहे त्या बद्दल त्याच्या ठिकाणी असणाऱ्या वेगवेळ्या संदर्भाचा उपयोग करून झाल्यानंतरच तो पुढचा निर्णय घेतो.

**४. अंतिम कृती अथवा कार्यवाही –**

या प्रकारच्या मानवी कृती मध्ये, मानव सर्व प्रकारच्या कसोटया आणि शहनिशा झाल्यानंतर त्याची प्रत्यक्ष कार्यवाही किंवा अंतीम कृती म्हणजे तो आपली भूक पूर्ण करतो. थोडक्यात प्रबळ इच्छा किंवा निर्माण होणारी प्रेरणा याला तो अंतीम कृती किंवा कार्यवाही मानतो. मानव आणि मानवेत्तर प्राणी हे दोन्ही वेगवेगळया प्रकारचे अन्न पदार्थ खात असले तरी मानवाजवळ असणाऱ्या अन्न पदार्था बाबतच्या वेगवेगळया कसोट्या मूळे तो प्राण्यांच्या तुलनेत चांगल्या प्रकारचे अन्न पदार्थ खाऊ शकतो. कारण मानवाजवळ तशा प्रकारचा मागचा–पुढचा पुर्वानुभव असतो. प्राण्यांच्या बाबतीत मात्र चाचणी पध्दतीचा अवलंब करून अन्न पदार्थ ग्रहण केला जातो. मानवाच्या तुलनेत प्राण्यांची ही चाचणी पध्दत अप्रगत दिसते. कारण प्राण्यांच्या या चाचणी पध्दती मध्ये एखादा अन्न–पदार्थ खाल्याने प्राण्यांचा मृत्यू देखील होऊ शकतो.

**ब) हावभाव** (Gesture)

कृतीचा संबंध हा केवळ एकट्या व्यक्तीशी येतो, तर सामाजिक कृतीचा संबंध हा दोन किंवा त्या पेक्षा अधिक व्यक्तीशी येतो. सामान्यता ज्या वेळी दोन व्यक्तीच्या मध्ये सामाजिक अंतरक्रिया घडून येते त्यावेळी त्या व्यक्ती विशिष्ट हावभावाचा उपयोग करून सबंध निर्माण करतात. हावभाव या संबंधीची व्याख्या करताना मीड यांनी असे म्हटले आहे की, ''ज्या वेळी दोन व्यक्तीच्या मध्ये अंतरक्रिया घडून येते त्या वेळी दूसऱ्या व्यक्तीच्या प्रतिसादाला उत्तर देण्यासाठी पहिली व्यक्ती विशिष्ट हालचालीद्वारे किंवा हावभावाचा वापर करून तिच्यांशी संबंध प्रस्थापित करते.'' थोडक्यात मानव आणि मानवेत्तर प्राणी यांच्यातील आंतरक्रिया घडून येत असताना नैसर्गिकरित्या काही हालचाली अथवा हावभाव परस्परांच्या क्रिया–प्रतिक्रियातून निर्माण होत असतात. उदा. एखाद्या कुत्र्याच्या भुंकण्यामुळे इतर कुत्री त्याचे अनुकरण करताना दिसतात. मानवाच्या बाबतीत मात्र तो काहीवेळा अवास्तव प्रकारचे हावभाव करताना दिसतो. मीड यांनी मुष्टीयुद्द आणि तलवारीच्या खेळांचे उदाहरण देऊन त्या मध्ये खेळाडू कशा प्रकारचे हावभाव आणि हालचाली करतात याचे स्पष्टीकरण केले आहे. भाषा या घटकांवरच मानवी आंतरक्रिया निर्भर असते. भाषेचा चढ उतार करण्याचे हावभाव हे मानवी आंतरक्रियेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. आवाजातील चढ उतार

आणि शारीरिक हालचाली या दोन्हींचा मानवी आंतरक्रियेत उपयोग होतो. मानवी आंतरक्रियेमध्ये शारीरिक हालचाली पेक्षा आवाजातील चढ उतारावरती मानवाचे पूर्ण नियंत्रण असते.

**क) इतर महत्त्वाच्या हालचाली** (Other Activities)

इतर महत्त्वाच्या हालचाली हा मानवी आंतरक्रियेत उपयोगात आणला जाणारा एक प्रकारचा हावभावच असतो. परंतु तो केवळ मानव प्राण्यांच्या संबंधातच शक्य असतो. व्यक्ती विशिष्ट हावभाव करताना काही महत्त्वाच्या हालचाली करतात, परंतु अशा स्वरूपाच्या महत्त्वाच्या हालचालीचे स्वरूप हे आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्ती कोण आहेत? आणि त्या परस्परांना कशा स्वरूपाचा प्रतिसाद देत आहेत? या वरून ते निश्चीत होत असते. ज्यावेळी आपल्या समोरच्या व्यक्तीला शारीरिक हालचाली किंवा हावभाव करून देखील एखादी गोष्ट समजत नसेल तर त्या वेळी विशिष्ट स्वरूपाच्या हालचाली करून आपले मत पटवून देण्याचा प्रयत्न चालू असतो. त्यामूळे आवाज हाच इतर महत्त्वाच्या हालचालीमध्ये प्रमुख असतो. परंतु सर्वच प्रक्रारचे आवाज त्यामध्ये समाविष्ट होत नाहीत. सर्व प्रकारच्या आवाजाच्या माध्यमातून होणाऱ्या हालचालींना आपण भाषा असे म्हणतो. भाषेसारख्या माध्यमातूनच आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींना परस्परांचे विचार कळून येतात.

**✷ मानवी हावभावांचे कार्य –**

मीड यांनी मानवी हावभावांचे आंतरक्रियांमध्ये असणारे स्थान स्पष्ट केल्या नंतर त्यांच्या कार्याचे विश्लेषण देखील त्यांनी केले आहे. मीड यांच्या मते, ज्या दोन व्यक्तींच्या मध्ये आंतरक्रिया घडून येत असते त्यावेळी त्यांच्या मध्ये समन्वय निर्माण करण्याचे कार्य हावभाव करीत असतात. ज्या एखाद्या विशिष्ट सामाजिक आंतरक्रियांमध्ये ज्या हेतूने दोन व्यक्ती परस्परांशी संवाद करीत असतात, त्या वेळी त्या परस्थितीला अनुसरून समन्वय घडवून आणण्याचे कार्य हावभाव करीत असतात.

दोन व्यक्तींच्या आंतरक्रिये दरम्यान ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला दूसऱ्या व्यक्तीबद्दल असमाधान किंवा इतर काही संतापजनक प्रतिक्रिया द्यावयाच्या असतात त्यावेळी शारीरिक कृतींच्या ऐवजी भाषेचे हावभाव परिणामकारक ठरतात. तसेच, आंतरक्रियेच्या दरम्यान व्यक्तीच्या मनाशी निगडीत अनेक प्रकारच्या कृती किंवा हावभाव आंतरक्रियेमध्ये महत्त्वाची कार्ये पार पाडीत असतात. खऱ्या अर्थाने, मानवी आंतरक्रियांच्या संदर्भात भाषेसारख्या हावभावामूळेच मानवी विचाराची प्रक्रिया ही मानवाबाबतच शक्य असते. आंतरक्रियेदरम्यान भाषेच्या माध्यमातून संवाद आणि त्यानूसार व्यक्तीचे वर्तन या सर्व घटना व्यक्तीच्या विचारप्रक्रियेमूळेच शक्य होत असतात. म्हणून मीड यांच्या मते, मानवाची विचार करण्याची प्रक्रिया ही मानसिक नसून ती मानवी वर्तनाशी निगडीत आहे.

व्यक्तींच्या हालचाली आणि हावभावाममुळेच मानवी आंतरक्रिया घडून येणे शक्य असते. केवळ हाभावामुळेच मानवी आंतरक्रिया घडून येत नाहीत तर त्यामध्ये व्यक्तींच्या इतर काही महत्वाच्या हालचाली देखील कारणी भूत असतात. त्यामुळेच मीड यांच्या विचारामध्ये व्यक्तींच्या हावभावाखेरीज व्यक्तींच्या इतर सर्व हालचालीच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे. थोडक्यात मीड यांचे मानवी आंतरक्रिये संदर्भातील विचार जाणून घेत असताना मानवी हालचालीचा अभ्यास म्हणून मानवी आंतक्रियेत भाषेचा होणारा वापर विशेष महत्त्वाचा समजला जातो. तसेच आंतरक्रिये दरम्यान व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीला विचारात घेवून होणारे हावभाव देखील, आंतरक्रियेच्या अभ्यासात महत्त्वाचे समजले जातात.

### ३.२.३.१ स्वयं:अध्ययनसाठीचे प्रश्न : –

**✷ मोकळ्या जागा भरा –**

१. व्यक्तीच्या प्रबळ इच्छेसारख्या कृतीत ...................... चा समावेश होतो.

२. ....................... च्या मानवी कृती मध्ये शोध घेवून कृती होते.

३. हाताळणी किंवा कसोटीच्या कृती मध्ये मानव हा वस्तूचे ............................. करतो.

४. ........................... हा सामाजिक कृती मधील मूलभूत घटक आहे.

५. महत्त्वाच्या हालचाली केवळ .................. मध्ये आढळतात.

### ३.२.४ मन, स्व:त्व आणि समाज यासंबंधीचे विश्लेषण (Analysis of Mind, Self and Society)

अमेरिकेत विज्ञानवादाचा पुरस्कार करणाऱ्या अभ्यासकांच्या मध्ये मीड यांचे नाव अगक्रमाने घेतले जात होते. मीड हे एक अत्यंत सर्व साधारण विचारवंत होते. त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे प्रमाण देखील कमी होते. तात्विक स्वरूपात विचार मांडणाऱ्या अभ्यासकांमध्ये मीड यांचे स्थान महत्त्वाचे होते. त्यांनी विल्यम जेम्स आणि जॉन डयुई यासारख्या विचारवंतानी अभ्यासलेल्या मन, स्व:त्व आणि समाज या संकल्पनांचा विस्ताराने अभ्यास केला.

मीड यांच्या मरणोत्तर प्रसिध्द झोलेल्या त्यांच्या 'Mind, self and society' या ग्रंथामध्ये मानवी मन, मानवी स्व:त्व आणि समाज या संकल्पनांची मांडणी करून मीड यांनी वरील सिद्धांत मांडलेला आहे. तसेच सामाजिक मानसशास्त्र अभ्यासविषयावर लिहलेल्या कांही शोध निबंधामध्ये देखील या सिध्दांताबद्दलची माहिती आढळते. मीड यांनी त्यांच्या सिध्दांतामध्ये मानवी मन किंवा मानवी स्व:त्व यासारख्या संकल्पनाची मांडणी एक प्रक्रिया म्हणून करत असताना सामाजिक संरचनेच्या अथवा सामाजिक आशयाच्या दृष्टीने, त्याचा विचार केलेला नाही. त्यामूळे मीड यांना प्रक्रियांचा अभ्यास करणारे अभ्यासक (Process of Phiolosopher) म्हणून संबोधले जाते.

**अ) मन –**

'मन' या संकल्पनेवरील बहूतांशी विचार मीड यांनी व्यक्तीमध्ये मनाचा विकास कशा पध्दतीने होतो? या संदर्भात मांडले आहेत. त्यांच्या मते, बाल्यावस्थेत आपल्या मध्ये समाज अथवा सामाजिक 'स्वत्व' याबद्दलचे विचार नसतात. मीड यांनी आपल्या बाल्यावस्थेत सवंगडया समवेत खेळल्या जाणाऱ्या विविध क्रिडा प्रकारांच्या मधून आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या विशिष्ट हावभाव आणि हालचालींमधून व्यक्तीच्या मनाचा विकास होत असतो, असे म्हंटले आहे.

मीड यांनी त्यांच्या स्वत:च्या वैचारिक मांडणी मधून मानवी स्वभावाचा अभ्यास केलेला आहे व त्यातून त्यांनी समाजिक जीवना संबंधीच्या सिध्दांतांची मांडणी केली आहे. सर्व प्रथम मीड यांनी व्यक्तीच्या मनाचा विकास, सामाजिक जीवन आणि समाज संरचना या तीन घटकांचा व्यक्ती-व्यक्तींच्यामध्ये घडून येणाऱ्या आंतरक्रियेशी कसा संबंध असतो हे स्पष्ट केले आहे.

मीड यांनी वरील सिध्दांताची मांडणी करण्यापूर्वी, दोन गृहीतके मांडली होती.

१. मीड यांच्या मते, निर्सगताच मानव हा जैविक दृष्ट्या कमकूवत असणारा प्राणी असल्याने, त्याला स्वतःचे अस्तीव टिकवण्यासाठी सामूहिक जीवन जगत असताना परस्परांना सहकार्य करण्याची सवय असते.

२. व्यक्ती ज्या समूहाची घटक असते, त्या समूहातील सदस्यांशी समन्वय आणि सहकार्य करण्यासाठी व्यक्ती व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेची मदत होत असते.

आपल्या मानसिक प्रक्रियेशी संबंधित मीड यांनी अनेक संकल्पनांचा उपयोग केला आहे. मीड यांच्या मते, व्यक्तीजवळ असणारे बुध्दी–चातुर्य म्हणजे मानसकि प्रक्रिया नव्हे तर बौध्दीक चातुर्य म्हणजे व्यक्ती ज्या वेळी एखादी सामाजिक कृती करत असताना ज्या स्वरूपाचा परस्पर समन्वय करते त्याला त्यानी बौध्दिक चातुर्य म्हटले आहे अशा बौध्दिक चातुर्याचा वापर मानव आणि मानवेत्तर प्राणी यांच्या मध्ये नेहमी केला जातो. मीड यांच्यामते, मानवेत्तर प्राणी आणि मानव या दोन्हींमध्ये महत्त्वाचा फरक म्हणजे मानव बौध्दीक चातूर्याचा वापर करताना विशिष्ट अशा हावभावाचा आधार घेत असतो. तसा आधार मानवत्तेर प्राणी घेत नाही.

मीड यांनी आपल्या मानसिक प्रक्रियेच्या तीन अवस्था सांगितल्या.

१. **योग्य नियोजन :** व्यक्ती वेगवेगळ्या परीस्थितीमध्ये परीस्थितीनुसार प्रतिसाद देण्या पूर्वी आपल्या मनावर नियंत्रण ठेवत असताना त्या संबंधी **योग्य नियोजन** करते. तसेच व्यक्ती ज्या एखाद्या सामाजिक आंतरक्रियेत समाविष्ट असते त्या आंतक्रियेशी सबंधित एका पेक्षा अधिक मार्गाचा अवलंब करून त्यावर मार्ग शोधत असते.

२. **स्वमुल्यांकन :** व्यक्ती, स्व:ताच्या एखाद्या प्रतिक्रिये बाबत **स्वमुल्यांकन** करू शकते किंवा एखाद्या प्रतिसादाबाबत स्व:ताशी संवाद करून त्याची चाचणी करून घेत असते. परंतू मानवेत्तर प्राण्यांच्या संदर्भात अशा प्रकारची प्रक्रिया आढळत नसल्याने त्यांच्या मध्ये चाचणी आणि परिक्षण पध्दतीचा अवलंब होतो.

३. **पर्यायी प्रेरणांचा आधार :** व्यक्ती व्यक्तींच्या आंतरक्रिया घडून येत असताना, प्रत्येक व्यक्ती जवळ एका पेक्षा अधिक स्वरूपाच्या आंतरिक प्रेरणा असतात. त्यामुळे कोणत्याही एका आंतरिक प्रेरणेचा आधार न घेता **पर्यायी प्रेरणांचा आधार** घेवून **व्यक्ती** आंतरक्रियेशी समायोजन साधण्याचा प्रयत्न करतात. या उलट मानवत्तेर प्राण्यामध्ये केवळ कृती किंवा हालचालींचा उपयोग होत असतो.

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, सामाजिक आंतरक्रिया म्हणजे व्यक्ती व्यक्तींच्या मध्ये घडून येणाऱ्या परस्परक्रिया की, ज्यामध्ये व्यक्तींना आपल्या स्वत:च्या अस्तीत्वाबद्दलची जाणीव असते. 'स्व' अस्तित्वाबद्दलची जाणीव म्हणजे त्याचा संबंध आपल्या मेंदूशी नसतो तर तो आपल्या सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीशी असतो, म्हणजेच वस्तूनिष्ठ सामाजिक जीवनाशी असतो.

मीड यांच्या मते, व्यक्तीजवळ असणाऱ्या स्वत: बद्दलच्या अस्तीत्त्वाची जाणीव विचारात घेता, व्यक्तीचे 'मन' म्हणजे एक वस्तू नसून ती एक प्रक्रिया आहे, आणि त्याद्वारे व्यक्ती अंतर्गत संवाद प्रस्थपित करते. त्यामुळे 'मन' ही एक सामाजिक घटना असून तिचा उदय आणि विकास सामाजिक प्रक्रियेतच होत असतो. व्यक्तीचे सामाजिक महत्व हे व्यक्ती जवळ असणाऱ्या 'मना'मुळे आहे. व्यक्तीच्या विचार प्रक्रियेत मनाचा सहभाग असतो की, ज्याद्वारे व्यक्तीला समस्या सोडवण्यास त्याची मदत होत असते. व्यक्ती

सभोवतालचे सामाजिक जीवन हे अनेक स्वरूपाच्या सामाजिक प्रश्नांनी आकाराला आलेले असते, त्यामुळे व्यक्ती आपल्याजवळ असणाऱ्या मनाचा उपयोग करून ते प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करते आणि व्यक्तीला चांगल्या स्वरूपाचे राहणीमान मिळवून देत असते.

**ब) स्वत्त्वाची प्रक्रिया –**

'स्वत्व' ही देखील एक प्रकारची प्रक्रिया असून तिचा विकास व्यक्ती–व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेतून होत असतो. मानवत्तेर प्राणी आणि जन्माला आलेल्या बालकांमध्ये अशा स्वरूपाचे स्वत्व आढळत नाही. आपल्या सामाजिक कृती आणि सामाजिक संबंधाशी स्वत्वाचा विकास निगडीत असतो, मीडच्या मते, सामाजिकते शिवाय स्व:त्वाची कल्पनाच करू शकत नाही. परंतु ज्या वेळी स्व:त्वाचा व्यक्तीमध्ये विकास होतो. त्या वेळी व्यक्ती सामाजिक संपर्काशिवाय देखील राहू शकते.

आपल्या मनाशी स्व:त्वाचा परस्पर संबंध आढळतो. ज्या वेळी आपल्या मनाचा विकास होतो, त्यावेळी तो सामाजिक स्वत्वाच्या माध्यमातून समजून येतो. त्यामुळे मन आणि स्व:त्व परस्परापासून भिन्न असत नाहीत. **स्वत्व ही एक मानसिक प्रक्रियाच** आहे. परंतु मीड यांच्या मते ती एक **सामाजिक प्रक्रिया** आहे.

जर व्यक्तीला आपल्या स्व:त्वाबद्दल जाणून घ्यावयाचे असेल तर, त्या व्यक्तीने स्वतः पासून अलग होऊन आपल्या स्वत: बद्दलच्या वर्तनाचा अभ्यास केला पाहिजे म्हणजेच आपण आपल्या अभ्यासाचा घटक होऊन स्व:त्व जाणून घेवू शकतो. ज्या प्रमाणे रोजच्या दैनंदिन व्यवहारात प्रत्येक व्यक्ती स्व:त्वा बद्दलचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करते तशा इतर व्यक्ती सुध्दा अशा प्रकारचा प्रयोग करीत असतात. व्यक्ती प्रत्यक्षापणे स्वत:च्या वर्तनाचा अभ्यास करू शकत नाहीत. त्यामुळे प्रत्येकाला स्व:त्व बद्दलचे ज्ञान हे दुसऱ्या व्यक्तीच्या दृष्टीकोनातून जाणून घेता येते.

आपल्या बाल्याअवस्थेमधल्या अवस्थांचा आधार घेवून मीड यांनी स्व:त्व बद्दलचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे केले आहे. उदा. ज्या लहान वयात आपण विशिष्ट प्रकारच्या क्रिडा प्रकारांमध्ये सवंगडया सोबत खेळ खेळत असतो त्या वेळी मुले आपल्या प्रवृत्ती इतर सवंगडयांच्या भूमिकेतून आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात. त्यानंतर विशिष्ट वयोगटात क्रिडा प्रकाराच्या माध्यमातून आपल्या स्व:त्वाचा परिणूर्ण विकास झालेला दिसतो. बाल्यावस्थेमध्ये खेळ खेळताना मुले इतर मुलांच्या दृष्टीकोनातून आपली भूमिका साकारतात नंतरच्या वयोगटात क्रीडा प्रकारामधून इतरांच्या दृष्टिकोनातून त्यांना विशिष्ट भूमिका देखील पार पाडावी लागते.

मीड यांनी स्वत्वाचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून विचार केलेला आहे. व्यक्तीगत दृष्टीकोनातून स्व:त्वाचा विचार केला तर, स्व:त्वा मुळे व्यक्तीला व्यापक अशा समाजातील एक कार्यक्षम व्यक्ती म्हणून स्थान मिळवून देण्यामध्ये स्व:त्वाचा उपयोग होतो. एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीमध्ये व्यक्तीला काय करणे अपेक्षित आहे या बद्दलचे ज्ञान सामाजिक स्व:त्वाच्या माध्यमातून मिळते. साधारणत: प्रत्येक व्यक्ती, ती ज्या समूहाची सदस्य असते त्या समूहाच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या भूमिकेतूनच आपले वर्तन करीत असते. स्व:त्वामूळे व्यक्ती आणि समाज यांच्यामध्ये समन्वय निर्माण होण्यास मदत होत असते. कारण व्यक्तीचे समाजातील स्थान हे तिच्या समूहावरूनच निश्चीत होते.

**✷ स्व:त्वाच्या अवस्था –**

मीड यांनी स्व:त्वाच्या दोन अवस्था स्पष्ट केल्या आहेत. त्या पैकी एक म्हणजे 'मी' (I) आणि दुसरी (me) 'आपण'. मीड यांच्या मते, स्व:त्व ही एक सामाजिक प्रक्रिया आहे व ती या दोन अवस्था मधून जात असते. मीड यांनी सर्व प्रथम (I) 'मी' या संकल्पनेचे विश्लेषण केले आहे.

१. 'मी' हा सामाजिक स्व:त्वाच्या प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहे.

२. आपल्या 'मी' मध्येच आपली महत्त्वाची सामाजिक मूल्ये सामावलेली असतात.

३. 'मी' हा एक असा घटक आहे की, ज्या द्वारे आपण स्व:त्वा बद्दल जाणून घेवू शकतो.

४. 'मी' या घटकामुळे आपल्या निश्चीत अशा व्यक्तीमत्वाचा विकास करवून घेता येतो.

मीड यांच्या मते, ऐतिहासिक दृष्टीकोनातून पाहिले असता आदिम काळातील व्यक्तींच्या मध्ये 'मी' आणि 'आपण' या स्व:त्वाचा प्रभाव दिसतो, तर याउलट आधूनिक समाजातील व्यक्तींच्या मध्ये 'स्व' किंवा मी या स्व:त्वाचा प्रभाव आढळतो. 'मी' या स्व:त्वामधून समाजाचा व्यक्तीवर असणारा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे (me) या स्व:त्वामधुन (I) किंवा 'मी' सारख्या स्व:त्वावर सामाजिक नियंत्रणासारख्या संकल्पनेचा प्रभाव दिसून येतो. ज्या वेळी 'मी' या 'आपण' संकल्पनेशी प्रतिक्रिया होते त्या वेळी साममूहिक कृती च्या विरोधात मी आपले स्थान ओळखण्याचा प्रयत्न करतो. थोडक्यात 'मी' किंवा 'आपण' या स्व:त्वाचा विकास इतरांच्या अनुकरणातून होत असतो.

**क) 'समाज'**

मीड यानी सर्वात वरच्या पातळीवर 'समाज' ही संकल्पना वापरताना आपल्या मनाचा आणि स्व:त्वाचा विकास करण्यामध्ये समाज जास्त उपयूक्त असतो, असे मत मांडले. त्यामुळे मन आणि स्व:त्व या अगोदर 'समाज' या घटकांचे स्थान सर्वात वरचे आहे. मीड यांच्या मते, संघटित स्वरूपात व्यक्तींनी 'मी' किंवा आपण या स्व:त्वाच्या प्रकारातून दिलेल्या प्रतिक्रिया म्हणजे समाज होय. समाज हा व्यक्ती समवेत जाताना तो तिच्यावर नियंत्रण देखील ठेवीत असतो. समाज हा व्यक्तीला स्व:मुल्यांकन करण्यास देखील प्रवृत्त करतो. अशा प्रकारे मीड यांच्या मन, स्व:त्व आणि समाज या संध्दांतामध्ये सुक्ष्म पातळीवरील घटकांचा विचार होत असताना 'समाज' यासारख्या व्यापक घटकांवर कमी प्रमाणात लक्ष दिले आहे.

थोडक्यात मीड यांनी व्यक्तीच्या वर्तनाचा सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यास केला असता एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीमध्ये व्यक्तीवर्तन त्या समाजातील परिस्थितीनुसार वैशीष्ट्यपूर्ण स्वरूपाचे आढळते. त्यालाच आपण व्यक्तीचे संस्थात्मक वर्तन म्हणतो. मीड यांच्या मते, जो पर्यत व्यक्ती ज्या समुदायाचा घटक असते त्या समुदायाशी एकरूप होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीच्या अस्तीत्वाला किंवा तिच्या एकूण व्यक्तीमत्वाला महत्व प्राप्त होत नसते.

अशा प्रकारे मीड यांनी व्यक्ती जवळ असणाऱ्या सामाजिक जाणीवांचा उगम हा ती व्यक्ती ज्या समाजाचा घटक असते त्याच्याशी कसा असतो या संबंधाचा विचार 'मन', स्वत्व आणि समाज या सिद्धांत मांडणीमधून केलेला दिसतो.

### ३.२.४.१ स्वयं : अध्ययनासाठीचे प्रश्न : –

**योग्य जोड्या जुळवा.**

| अ.क्र | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १) | मन, स्वत्व आणि समाजाचा सिध्दांत | १) समाज |
| २) | प्राणी समाज | २) सामाजिक प्रक्रिया |
| ३) | मन आणि स्व:त्वाला मदत | ३) 'I' आणि 'me' (आपण) |
| ४) | मन | ४) जॉर्ज हर्बर्ट मीड |
| ५) | स्वत्वाच्या अवस्था | ५) स्व:त्वाचा अभाव असतो |

## ३.३ सारांश :

मीड हे एक सामाजिक मानसशास्त्रज्ञ होते. 'Mind, Self and Society' हा त्यांचा एक प्रसिध्द ग्रंथ होता. त्यांचे विचार प्रामुख्याने सांकेतिक आंतरक्रियावादी विचारसरणीमधले होते. समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये समाजरचनेच्या अभ्यासाइतकेच महत्त्व आपण मानवी वर्तनाच्या अभ्यासाला देतो असा महत्त्वपूर्ण विचार त्यांनी मांडला.

मीड यांनी त्यांच्या सामाजिक वर्तनवादी दृष्टीकोणाच्या अभ्यासामध्ये व्यक्तीव्यक्तींच्या मध्ये घडून येणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांच्या अभ्यासाला प्राधान्य दिले आहे. एक सामाजिक मानसशास्त्राचे अभ्यासक म्हणून त्यांनी व्यक्तींच्या कृती अभ्यासण्यावर विशेष लक्ष दिले आहे. त्यांच्या मते, व्यक्तींच्या आंतरक्रिया घडून येत असताना, आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या **व्यक्तींच्या कृतींचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास** करणे हा त्यांच्या अभ्यासाचा प्रमुख केंद्रबिंदु होता. त्यांनी व्यक्तींच्या सामाजिक कृतींचा अभ्यास करताना व्यक्तींच्या कृती, हावभाव आणि इतर महत्त्वपूर्ण हालचाली कशा प्रकारे होत असतात या संबंधीचे विश्लेषण केले आहे. त्यांनी मानवी कृतींचा अभ्यास करत असताना, मानवी कृतीचे विश्लेषण चार प्रमूख अवस्थांच्या मधून केले आहे. त्या म्हणजे १) व्यक्तीच्या अंगी असणारी प्रबळ इच्छा किंवा प्रेरणा २) व्यक्तीची विशिष्ट गोष्ट हाताळण्याची प्रवृत्ती, ३) आकलन प्रवृत्ती, आणि ४) अंतिमत: स्वीकार करण्याच्या प्रवृत्ती इ. व्यक्तींचे हावभाव ही संकल्पना स्पष्ट करताना त्यांनी आंतरक्रिये दरम्यान व्यक्तीकडून स्वाभाविकरित्या घडून येणाऱ्या हालचाली कशा स्वरूपाच्या असतात या विषयी विश्लेषण केले आहे. त्याच प्रमाणे विशिष्ट आंतरक्रियेच्या दरम्यान व्यक्तीकडून ज्या कांही इतर महत्त्वपूर्ण हालचाली किंवा संकेत केले जातात त्यांचा देखील त्यांनी अभ्यास केला आहे.

सर्वात शेवटी, त्यांनी Mind, self and society या विषयी सविस्तर विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, **मन ही एक सामाजिक प्रक्रिया** आहे. त्यामुळे व्यक्तीच्या मानसिकतेशी त्याचा संबंध नसतो. तसेच त्यांनी व्यक्तीजवळ असणाऱ्या 'स्व:त्वा'चा देखील अभ्यास केला आहे. त्यांनी मानवी स्वत्वाच्या 'मी' आणि 'आपण' अशा दोन अवस्थामधून विश्लेषण केले आहे. त्याच प्रमाणे 'समाज'या संकल्पनेचे महत्त्व विशद करताना, 'मन' आणि 'स्व:त्व' यांच्या आगोदर 'समाज' या संकल्पनेचे स्थान प्रथम क्रमांकावर असते असे मत मांडले आहे, कारण समाजातूनच व्यक्तींचे 'मन' आणि 'स्व:त्व' विकसित होत असते.

अशा प्रकारे मीड यांचे विचार आंतरविद्याशाखीय स्वरूपाचे आहेत. त्यामुळे समाजशास्त्र आणि मानसशास्त्राच्या विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होतो. मीड यांच्या मते, समाजरचना आणि त्यामधील परिवर्तनाला समाजातील व्यक्तीं-व्यक्तीच्या मधील आंतरक्रिया कारणीभूत असतात. त्यामुळे मीड यांचा हा सूक्ष्मस्वरूपाचा सिध्दांत व्यक्तींच्या आंतरक्रियांना विशेष महत्व देतो.

## ३.४ पारिभाषिक संज्ञा :

- **वर्तनवाद** - मानवी वर्तनाच्या अभ्यासाचा दृष्टिकोन.
- **हावभाव** - व्यक्ती-व्यक्तींच्या आंतरक्रियेतील दरम्यान चेहऱ्यावरील हावभाव, हालचाली इ.
- **प्रबळ इच्छा किंवा प्रेरणा** - बाह्य स्वरूपातील एखाद्या घटनेबाबत व्यक्तीच्या मनात निर्माण होणाऱ्या कृती.
- **व्यक्तीचा दृष्टिकोन** - विचार करण्याची विशिष्ट पध्दती.
- **हाताळणी** - विशिष्ट गोष्टीबद्दल केलेली चाचणी किंवा परिक्षण.
- **स्व:त्व** - व्यक्तीच्या मनाशी संबंधित एक मानसिक प्रक्रिया.
- **उत्तेजन** - व्यक्तीच्या जैविक इच्छा व त्यामुळे व्यक्तीकडून होणारी कृती.
- **सांकेतिक आंतरक्रियावाद** - मानवी वर्तनाचा अभ्यास करण्यासंबंधीचा अभ्यासदृष्टिकोन.
- **'मी'** - मानसशास्त्रीय संकल्पना.
- **'आपण'** - मानसशास्त्रीय संकल्पना

## ३.५ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**३.२.१.१** १) Mind, self & society    २) विल्यम जेम्स

३) चार्लस कूले    ४) भाषा    ५) वर्तन

**३.२.२.१ जोड्या जुळवा**

| **अ.क्र** | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| १) | सामाजिक मानसशास्त्रज्ञ | १) मीड |
| २) | मानवी आंतरक्रिया | २) सामाजिक कृती |
| ३) | प्राण्यांच्या आंतरक्रियेत वापर नसतो | ३) भाषा |
| ४) | मानवी आंतरक्रियेत वापरला जातो | ४) व्यक्ती जाणीवा |
| ५) | वर्तनवाद | ५) अभ्यासदृष्टिकोन |

**३.२.३.१ मोकळ्या जागा भरा -**

१. तात्काळ इच्छांचा

२. आकलन

३. परिक्षण

४. हावभाव

५. मानवप्राण्यामध्ये

**३.२.४.१ जोड्या जुळवा –**

| | **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|---|
| १) | मन, स्वत्व आणि समाजाचा सिध्दांत | १) जॉर्ज हर्बर्ट मीड |
| २) | प्राणी समाज | २) स्वत्वाचा अभाव असतो |
| ३) | मन आणि स्व:त्वाला मदत | ३) समाज |
| ४) | मन | ४) सामाजिक प्रक्रिया |
| ५) | स्वत्वाच्या अवस्था | ५) 'मी' आणि 'आपण' |

**३.२.५.१ जोड्या जुळवा –**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| १) | वस्तुविनिमय पध्दत | सुरुवातीचा अभ्यास |
| २) | पैशाचे विपरीत परिणाम | गुलामगिरी |
| ३) | भांडवलशाहीच्या समस्या | कार्ल मार्क्स |
| ४) | मानवी संस्कृतीच्या समस्या | जॉर्ज सिमेल |
| ५) | वैश्वीक शोकांतिका | पैसा |

## ३.६ सराव :

जॉर्ज हर्बर्ट मीड यांनी ज्या-ज्या संकल्पनांची मांडणी केली आहे, त्या संकल्पना जाणून घेण्यासाठी मानसशास्त्राच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून समजून घ्या. त्यांच्याशी चर्चा करत असताना, मन, स्वत्व आणि वर्तन इ. सारख्या संकल्पनावर चर्चा करा. जॉर्ज रिटझरच्या 'Modern Sociological Theory' या पुस्तकांचा संदर्भ घ्या. तसेच जे.एच.टर्नर या लेखकाच्या 'The Structure of Sociological Theory' या पुस्तकांचा संदर्भ घ्या. मीडच्या सिध्दांताचा उपयोग आपले स्वत:चे वर्तन अभ्यासण्यासाठी देखील करून घेता येतो. मनाची रचना आणि तिची प्रक्रिया घडून येत असताना एकूण वाटचालीमध्ये आपल्या मधील स्वत्वाचा विकास कशाप्रकारे घडून येत असतो तसेच आपल्या सभोवताली घडून येणाऱ्या मानवी-आंतरक्रियाचे स्वरूप जाणून घेत असताना, त्या व्यक्ती कशाप्रकारचे हावभाव करतात याचे निरीक्षण करा. तुमच्या निरीक्षणामध्ये आढळून येणाऱ्या हावभावा संबधीच्या नोंदी करा आणि त्याची इतर मानवी आंतरक्रियेच्या अभ्यासाशी तुलना करा.

## ३.७ संदर्भ सूची

* Ritzer George, 'Classical Sociological Theory' 2nd edition McGrqw-Hill International editions, New York, 1996
* Tim Delaney, 'Contemporary Social Theory, Investigation and Applications.'
* Haralambos & Holborn 'Sociology themes & Perspectives' 7th edition, Harper Collins Publishers Ltd, London 2008.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :

1. Abraham Francis M- 'Modern Sociological Theory' An Introduction, Oxford University, Press, New Delhi- 1982.
2. George Ritzer, 'Classical Sociological Theory' IInd Edition McGraw. Hill International Editions, New Delhi- 1996
3. George Ritzer, 'Modern Sociological Theory' IVth Edition McGraw. Hill International Editions, New Delhi- 1996.
4. Turner J.H., 'The Structure of Sociological Theory' Rawat Publication, Jaipur- 1995.
5. Mohite, Salunkhe, Samaj Shastriya Vicharvant, Phadake Prakashan, Kolhapur- 2009.

❑ ❑ ❑

## सत्र–२ : घटक–४
## अभिजात परंपरा : संक्षिप्त आढावा

**घटक संरचना :**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

अ) सामाजिक तथ्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास (एमिल डुरखाईम)

४.२.१.१ सामाजिक तथ्याचा अर्थ किंवा व्याख्या

४.२.१.२ सामाजिक तथ्यांची वैशिष्ट्ये

४.२.१.३ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

ब) समाजाच्या संदर्भात द्वंद्वात्मक भौतिकवाद (कार्ल मार्क्स)

४.२.२ द्वंद्वात्मक भौतिकवादाचे स्पष्टीकरण

४.२.२.१ कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद

४.२.२.२ द्वंद्वात्मक भौतिकवादाचे घटक

४.२.२.३ द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताची वैशिष्ट्ये

४.२.२.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

क) सामाजिक क्रियेबद्दलचे विश्लेषणात्मक आकलन (मॅक्स वेबर)

४.२.३.१ सामाजिक क्रियेचा अर्थ किंवा व्याख्या

४.२.३.२ सामाजिक क्रियेचे प्रकार

४.२.३.३ सामाजिक क्रियेची वैशिष्ट्ये

४.२.३.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

ड) समाजाबद्दलचे सामाजिक – मानसशास्त्रीय दृष्टीकोन (डुरखाईम, स्पेन्सर, कुले)

४.२.४.१ समाजाची व्याख्या अथवा अर्थ

४.२.४.२ समाजाची वैशिष्ट्ये

४.२.४.३ समाजाचे सामाजिक मानसशास्त्रीय दृष्टीकोन

४.२.४.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न.

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक संज्ञा

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सराव

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके.

## ४.० उद्दिष्टे :

'अभिजात समाजशास्त्रीय परंपरा' हा एम. ए. भाग १ सत्र क्र. १ व २ समाजशास्त्र विषयाचा सक्तीचा पेपर असून यामधील सत्र क्र. २ साठी घटक क्र. ४ मध्ये आपणास अभिजात परंपरा संक्षिप्त आढावा घेण्यासाठी एमिल डुरखाईमचा सामाजीक तथ्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास समजावून घ्यावयाचा आहे. तसेच कार्ल मार्क्सचा समाजातील द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांत याचे स्पष्टीकरण समजावून घ्यावयाचे आहे. त्याच प्रमाणे मॅक्स वेबरचे सामाजिक क्रियेबद्दलचे विशलेषणात्मक आकलन करून घ्यावयाचे आहे आणि शेवटी एमिल डुरखाईम, हर्बर्ट स्पेन्सर व चार्लस कूले यांचे समाजाविषयीचे सामाजिक मानसशास्त्रीय दृष्टीकोन माहित करून घ्यावयाचे आहेत.

## ४.१ प्रास्तावना :

एम.ए. भाग १ समाजशास्त्र विषयाच्या सत्र क्र. १ साठी सक्तीचा पेपर म्हणून जेव्हा तुम्ही ''समाजशास्त्रीय अभिजात परंपरा'' याचा अभ्यास केला. त्याचप्रमाणे सत्र क्र. २ साठी वरील सक्तीचा (Compulsory) पेपर अभ्यासताना यामध्ये देखील एकुण चार घटक अभ्यासावे लागणार आहेत. उदा. घटक क्र. १, विएफ्रेडो पॅरेटो, घटक क्र. २, चार्लस् कुले, घटक क्र. ३ मध्ये जॉर्ज हर्बर्ट मीड, आणि घटक क्र. ४ मध्ये अभिजात परंपरा संक्षिप्त आढावा इत्यादी. घटक क्र. ४ मध्ये अनुक्रमे अ) एमिल डुरखाईमचा सामाजिक तथ्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास, ब) कार्ल मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताचे सामाजिक स्पष्टीकरण, क) मॅक्स वेबरचे सामाजिक क्रिये संबंधीचे विशलेषणात्मक आकलन आणि ड) एमिल डुरखाईम, हर्बर्ट स्पेन्सर व चार्लस कूलेचे समाजाविषयीचे सामाजिक-मानसशास्त्रीय विचार (दृष्टीकोन) समजावून घ्यावयाचे आहेत. हे सर्व विचार अभ्यासल्यानंतर निश्चितच समाजशास्त्र विषयाच्या एम. ए. भाग १ मधील विद्यार्थ्यांना अभिजात समाजशास्त्रीय परंपरा या संबंधीचा अनेक पाश्चात्य विचारवंतांनी जो संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे, त्याद्वारे या पेपरची संयुक्तीक माहिती मिळण्याच्या दृष्टीने खूप मदत होणार आहे.

## ४.२ विषय विवेचन :

'अभिजात परंपरा : संक्षिप्त आढावा' या युनिट क्र. ४ मध्ये आपण सामाजिक तथ्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास, समाजातील द्वंद्वात्मक भौतिक वादाचे स्पष्टीकरण, सामाजिक क्रियेबद्दलचे विश्लेषणात्मक आकलन आणि समाजाविषयीचे सामाजिक - मानसशास्त्रीय दृष्टीकोन इत्यादी बाबतची माहिती घेणार आहोत. अशा

माहितीवरून आपणास निश्‍चितच अभिजात परंपरांचा संक्षिप्त आढावा, घेण्याच्या दृष्टीने खूपच मदत होणार आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**अ) सामाजिक तथ्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास (एमिल डुरखाईम) :**

एमिल डुरखाईम हा फ्रेंच विचारवंत असून त्याने समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा पुरस्कार केला. त्याच्या मते, कोणत्याही सामाजिक घटनेचा अभ्यास काल्पनिक गोष्टींच्या आधारे न करता वैज्ञानिक पद्धतीने माहिती मिळविणे गरजेचे असते. याच पार्श्वभुमीवर डुरखाईमने सामाजिक तथ्य अथवा सत्य संकल्पना मांडून या संकल्पनेचा त्याने वस्तुनिष्ठ अभ्यास केला. समाजशास्त्राला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देण्यामध्ये एमिल डुरखाईमचा सिंहाचा वाटा होता. म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

डुरखाईमने "De La Division De Travail Social", "Lee Suicide", "The Elementary Forms of Religious Life" या सारखे अनेक महत्वपुर्ण ग्रंथ लिहून त्याच्या आधारे आपले समाजशास्त्रीय विचार स्पष्ट केले. त्यापैकी त्याने सामाजिक तथ्य अथवा सत्य संकल्पना हा विचार वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून कसा मांडला याचा आढावा घ्यावा लागेल.

### ४.२.१ **सामाजिक तथ्याचा अथवा सत्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास (सामाजिक सत्य संकल्पना)** (The Study of Social Facts) :

डुरखाईम हा प्रत्यक्षवादाचा पाठीराखा असल्याने त्याने आपले पद्धतीशास्त्र विशद करताना त्यामध्ये सामाजिक सत्य शोधणे ही मध्यवर्ती कल्पना मांडण्याचा प्रयत्न केला. त्याच्यामते, जोपर्यंत सामाजिक तथ्याविषयीची कल्पना स्पष्ट होत नाही, तोपर्यंत समाजविषयक विचार समजणे शक्य नसते. जर आपणास सामाजिक परिस्थितीचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करावयाचा असेल तर सामाजिक तथ्यांचा अथवा सामाजिक सत्याचा (Social Facts) अभ्यास अतिशय आवश्यक असतो. डुरखाईमने या संकल्पनेद्वारे सामाजिक ऐक्य, श्रमविभागणी इ. विषयांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते, समाजशास्त्र हे एक स्वतंत्र विज्ञान असल्याने त्याचा अभ्यास स्पष्ट होणे गरेजेचे आहे. त्याने सामाजिक सत्य किंवा तथ्य (Social Facts) हा समाजशास्त्राचा प्रमुख अभ्यास विषय आहे, असे प्रतिपादन केले. त्यामुळे याठिकाणी त्याच्या सामाजिक विचारातील एक मध्यवर्ती कल्पना म्हणून सामाजिक सत्याचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

#### ४.२.१.१ सामाजिक तथ्य अथवा सामाजिक सत्य म्हणजे काय? (सामाजिक तथ्याचा अर्थ किंवा व्याख्या)

सामाजिक तथ्य अथवा सत्य या दोन शब्दांमध्ये 'सामाजिक' हा शब्द महत्वपुर्ण मानला पाहिजे व त्यानंतर सत्त्याचा विचार केला पाहिजे. जर हा शब्द काळजीपूर्वक वापरला गेला नाही तर त्याची निश्‍चित व्याप्ती स्पष्ट होवू शकत नाही. समाजात घडणाऱ्या सर्व गोष्टी सामाजिक असत नाहीत. स्वतःचे खाणे-पिणे, विश्रांती यासारखे वर्तन प्रकार सामाजिक असतीलच असे नाही, परंतु जेंव्हा व्यक्तींकडून शिस्तबद्धरित्या आणि केवळ समाजहित डोळ्यांपुढे ठेवून हालचाली केल्या जातात तेंव्हा आपणास सत्य आढळून येते. उदा. व्यक्तिकडून भाऊ, पती, नागरिक, शिक्षक यासारख्या भूमिका नियमानुसार पार पाडल्या तर ते एक सत्य मानावे लागेल. डुरखाईमने याठिकाणी सामाजिक सत्य अथवा तथ्याला वस्तू मानले पाहिजे असा विचार व्यक्त करून 'वस्तू' या शब्दाचा अर्थ खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

१) सामाजिक तथ्य ही अशी एक वस्तू आहे की, जीला केवळ अनुभवाद्वारे जाणता येते. तसेच तिचे अस्तित्व मनुष्यावर आधारीत असत नाही.

२) सामाजिक तथ्यांना केवळ बाह्य स्वरूपातच पाहिले जावू शकते अथवा जाणून घेतले जावू शकते.

अशा प्रकारे सामाजिक तथ्य (सत्य) वस्तु म्हणून विचारात घेतले जात असलेमुळे त्याचा वारंवार अर्थ देखील बदलतो. त्यामुळे सामाजिक सत्य ही स्थिर संकल्पना नसून **गतीशिल संकल्पना** आहे असे स्पष्ट होते. जेंव्हा सामाजिक परिस्थितीत परिवर्तन घडून येते तेंव्हा सामाजिक सत्यामध्ये देखील परिवर्तन अभिप्रेत असते. या पार्श्वभूमीवर डुरखाईमने सामाजिक सत्य ही **सामाजिक वास्तवता** आहे असे मानून व्यक्तींच्या वर्तनावर विशिष्ट प्रकारे जे बंधन घातले जाते अशा वर्तनाला त्याने सामाजिक सत्य मानले.

**÷ सामाजिक तथ्याची अथवा सत्याची व्याख्या :**

डुरखाईमच्या पद्धतीशास्त्रातील एक महत्वपुर्ण संकल्पना म्हणून सामाजिक सत्य अथवा सामाजिक तथ्य याचा सखोल आढावा घेत असताना डुरखाईमने सामाजिक सत्याची पद्धतीशास्त्राशी संबंधीत जी व्याख्या सांगितली आहे, तिचा परामर्श घेणे जरूरीचे आहे.

१) ''सामाजिक सत्यामध्ये क्रिया, विचार आणि अनुभव यांच्या प्रकारांचा समावेश झालेला असतो की, जे प्रकार व्यक्तिला बाह्यस्वरूपी असतात आणि आपल्या दडपणशक्तीच्या जोरावर व्यक्तिवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.'' (Social facts consist of ways of Acting, Thinking & Filling external to individual and endowed with a power coercion by reason of which they control him - Durkheim)

२) ''सामाजिक सत्य हा वर्तणुकीचा असा एक दृढ झालेला अथवा न झालेला प्रकार असतो की, जो व्यक्तींवर बाह्यशक्तींद्वारे वर्तनविषयक दडपण आणू शकतो.''

(A social fact is every way of acting fixed or not capable of exercising on the individual an external constraint)

सामाजिक सत्याच्या वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, प्रत्येक समाजात स्वतंत्र अशी वेगळी सामाजिक तथ्ये असून त्यांचे वेगळे असे वैशिष्ट्य असते. समाजाशिवाय सामाजिक सत्याला आधारच असू शकत नाही. सामाजिक सत्य हे व्यक्तीसाठी बंधनाची निर्मिती करते. तसेच ते व्यक्तिगत चेतनेच्या पलिकडील असते. याचा अर्थ सामाजिक तथ्य हे वास्तव स्वरूपाचे असून ते जरी व्यक्तींनी निर्माण केलेल्या वातारवणातून निर्माण होत असले तरी कोणतीही एक व्यक्ती त्याची निर्मिती करीत नाही. थोडक्यात सामाजिक सत्याची (तथ्येची) निर्मिती समाजामध्येच होत असल्याने आणि समाजच त्याला मान्यता देत असल्याने ते पूर्णपणे सामाजिक असते.

स्वतः मांडलेल्या सामाजिक सत्याच्या कल्पनेचे समर्थन डुरखाईमने पुढीलप्रमाणे केलेले आहे.

१) सामाजिक सत्य हे व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. राष्ट्रीय संकटप्रसंगी याचा अनुभव येतो. उदा. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये भगतसिंग, बाबू गेणू यासारख्या अनेक स्वातंत्र्यवीरांनी देशासाठी आनंदाने बलिदान केले.

२) व्यक्तीचे वैयक्तिक व सामाजिक आचरण यामध्ये भिन्नता असते. याचा अर्थ व्यक्ती एकटी असताना तिचे वर्तन आणि समुहात असताना तिचे वर्तन यामध्ये तफावत आढळते. थोडक्यात समाजांतर्गत व्यक्ती वर्तनाचे नवीन विश्व म्हणजे सामाजिक सत्य होय. या सामाजिक सत्याच्या अस्तित्वाचा परिणाम व्यक्तिच्या वर्तनावर होवून त्यामध्ये बदल होवू शकतो.

३) डुरखाईमच्या मते, सामाजिक सत्याच्या संदर्भात तिसरे प्रमाण म्हणजे, सामाजिक सत्याचे संख्यात्मक स्वरूपातील अस्तित्व हे होय. उदा. समाजातील गुन्हेगारी, घटस्फोट, आत्महत्या, वाढते जनन प्रमाण हे संख्यात्मक स्वरूपात विशद केले जाते. या वस्तुंची स्थिरता व्यक्तींच्या इच्छेवर अवलंबून असते त्यामुळे त्यांच्या स्थिरतेचे विश्लेषण भौतिकशास्त्रीय स्वरूपाचे असू शकत नाही तर ते पूर्णपणे समाजशास्त्रीय पाहिजे.

४) कोणत्याही सामाजिक सत्याची निर्मिती ही कोणतीही एक व्यक्ती करीत नसल्याने ते तीला व्यक्तीबाह्य वाटते. तसेच ते बंधनकारक भासते.

५) सामाजिक सत्य ही समाजातील अशी एक सामाजिक घटना आहे की, ज्या घटनांची निर्मिती अनेक व्यक्तींकडून केली जाते. जसे ते कालबाह्य असते तसेच ते व्यक्ती नियंत्रक असते.

अशा प्रकारे डुरखाईमने सामाजिक सत्य एक वस्तू मानून त्याचा विचार व्हावा तसेच ते सामाजिक साहचर्यामधून निर्माण होत असल्याने शुद्ध सामाजिक संदर्भातच विचारार्थ घेतले जावे असे प्रतिपादन केले. थोडक्यात जे वास्तव आहे, अथवा ज्याचे वस्तुनिष्ठ निरिक्षण करता येते त्यालाच डुरखाईमने सामाजिक सत्य असे संबोधले. उदा. इश्वराशी संबंधीत पुजा–अर्चा, प्रार्थना या गोष्टी मात्र सामाजिक सत्यामध्ये मोडतात. तसेच एखाद्या विचारवंताने मांडलेला सिद्धांत, धार्मिक क्रिया, लोककथा, व्यावसायिक नियम इ.ना सामाजिक सत्य असे म्हटले जाते. कारण आपण त्याचे स्वरूप समजू शकतो. शिवाय मानवी व्यवहारांवर त्यांचे बंधनही येत असते. डुरखाईमच्या सामाजिक सत्य कल्पनेवरून शेवटी असे स्पष्ट होते की, सामाजिक सत्य हे मनुष्याच्या सामुहिक जाणिवेशी संबंधित असून त्याची निर्मिती व्यक्ती ऐवजी सामाजिक संबंधातून म्हणजेच समाजातून होत असते. त्यामुळे सामाजिक सत्याकडे संघटीत सामाजिक जीवनाचे प्रतिक म्हणून पाहिले जाते.

### ४.२.१.२ **सामाजिक तथ्याची लक्षणे अथवा वैशिष्ट्ये** (Characteristics of Social Facts) **:**

सामाजिक सत्यांना वस्तू मानल्यानंतर भौतिक वस्तूंप्रमाणे सामाजिक सत्याची ठराविक लक्षणे आहेत काय? या सदंर्भात डुरखाईमने सामाजिक सत्याची दोन ठळक लक्षणे (वैशिष्ट्ये) आहेत असा विचार मांडला. उदा. १) बाह्यरूपता अथवा व्यक्तिबाह्यता आणि २) निर्बंध अथवा निग्रह या ठळक लक्षणांचे सखोल विवेचन खालीलप्रमाणे केले आहे.

**१) बाह्यरूपता अथवा व्यक्तिबाह्यता** (Exteriority) :

डुरखाईमच्या मते, सामाजिक सत्याचे बाह्यरूपता अथवा व्यक्तिबाह्यता हे ठळक लक्षण असून त्याची उत्पत्ती व्यक्तिगत जाणिवेतून अथवा इच्छेमधून न होता समाजातून होत असते. त्यामुळे व्यक्तीवर अशा सामाजिक सत्याचा नेहमीच प्रभाव असल्याचे दिसून येते. उदा. ज्याप्रमाणे अग्नी, पाऊस, ऊन इ. गोष्टी मनुष्यबाह्य असतात, त्याचप्रमाणे सामाजिक सत्यदेखील बाह्यस्वरूपी असते. त्याच्या मते, सामाजिक सत्य हे कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता नसते. एकदा एखादी गोष्ट प्रचारात आली की, समाजामध्ये दिर्घकाळपर्यंत तिचे प्रतिबिंब आढळून येते. उदा. फॅशन्स, विज्ञानाची निर्मिती अनेकांच्या बुद्धिकौशल्यामधून होत असली

तरी विज्ञान हे शेवटी व्यक्तिगत क्षमतेपेक्षा श्रेष्ठ असते. या तत्वाप्रमाणेच सामाजिक सत्याची निर्मिती ही भिन्न व्यक्तींच्या विचारातून तसेच सहकार्यातून होत असली तरी व्यक्तीपेक्षा सामाजिक सत्य कितीतरी पटीने श्रेष्ठ असते. त्यामुळे सर्व समाज अशा सत्याचा स्विकार करीत असतो. या अर्थाने सामाजिक सत्य बाह्यस्वरूपी असून समाजातील सर्व व्यक्तींसाठी ते बंधनकारक असते.

२) **बंधन अथवा निग्रह** (Constraint) :

डुरखाईमने सामाजिक सत्याचे निर्बंध अथवा निग्रह हे दुसरे ठळक लक्षण सांगितले. त्याने हा शब्द या ठिकाणी स्थूल अर्थाने वापरलेला आहे. त्याच्या मते, सामाजिक सत्याचा व्यक्तीवर निर्बंधात्मक स्वरूपाचा प्रभाव असतो, कारण अशी तथ्ये कोणत्याही व्यक्तींकडून निर्माण केलेली नसतात, तर ती सामाजिक परिस्थितीचाच एक भाग असल्याने ती व्यक्तींवर बंधनकारक असतात. त्यामुळे त्यांचे व्यक्तिवर दडपण येते. उदा. नैतिक नियम व धार्मिक श्रद्धा इ. द्वारे मानवी वर्तन प्रकारांवर निर्बंध येत असल्याने ते सामुहिक पातळीवर आचरणात आणले जातात. समाजात अशा सत्याचा प्रभाव सर्वच व्यक्तिवर पडलेला आढळतो. थोडक्यात व्यक्तींना आपले सर्व व्यवहार सामाजिक अपेक्षांच्या चौकटीत राहूनच करावे लागतात. व्यक्ती समाजात राग, दुःख, आनंद व्यक्त करते, परंतु या गोष्टी कशा व्यक्त करावयाच्या हे सामाजिक नियमांनी अथवा निर्बंधांनी ठरलेले असते.

डुरखाईमने सामाजिक सत्य संकल्पनेची वरील दोन ठळक लक्षणे स्पष्ट करून सामाजिक सत्य हे बाह्यरूपी असते तसेच ते व्यक्तीसाठी बंधनकारक असते, असा महत्वपुर्ण विचार मांडला.

❖ **सामाजिक तथ्य संकल्पनेचे मूल्यमापन** (Evaluation of Social Facts) :

डुरखाईमच्या पद्धतीशास्त्र विचारांमधील सामाजिक सत्य ही अत्यंत महत्वाची व मुलभुत संकल्पना असून स्थिर स्वरूपाच्या समाजामध्येच तिचे अस्तित्व आढळून येते. व्यक्तीच्या सभोवतालच्या वातावरणातून सामाजिक सत्य निर्माण होते. अशा सत्याचा व्यक्तींच्या जीवनावर खूपच परिणाम होतो. त्यामुळे व्यक्तींपेक्षा सामाजिक सत्य श्रेष्ठ असते. डुरखाईमच्या मते, बदलत्या परिस्थितीनुसार सामाजिक सत्य बदलत असले तरी डुरखाईमच्या या संकल्पनेवर अनेकांनी पुढीलप्रमाणे जी टीका केली आहे त्याचा परामर्श घेणे जरूरीचे आहे. झेटलीन यांच्या मते, सामाजिक सत्याबाबत डुरखाईमने स्विकालेला दृष्टीकोन मार्क्सवादी विचारसरणी विरूद्ध आहे. मार्क्सच्या मते, व्यक्ती इतिहास घडवितात पण याचा अर्थ असा नव्हे की, कोणतीही एक व्यक्ती स्वतःच्या इच्छेप्रमाणे सामाजिक सत्याची निर्मिती करू शकत नाही. त्यामुळे त्याचा हा विचार संघवादी आहे. अशी टिका केली जाते. सामाजिक सत्याच्या बाह्यरूपता आणि निर्बंध या ठळक लक्षणांवर सोरोकीन याने अशी टिका केली आहे की, सर्व प्रकारच्या सामाजिक सत्याच्या अभ्यासासाठी त्याची ही संकल्पना उपयुक्त ठरत नाही. बारनेस या विचारवंताने सामाजिक सत्यातील निर्बंधाविषयी असे म्हटले आहे की, व्यक्ती आपले बहुतांशी कार्य कोणत्याही दबावाला बळी न पडता आपल्या इच्छेप्रमाणे करीत असते. रेमंड ॲरॉन या समाजशास्त्रज्ञाच्या मते, डुरखाईमने सामाजिक सत्याच्या विवेचनात निर्बंध अथवा निग्रह (Constraint) या शब्दाचा वापर दोषपूर्ण पद्धतीने केला आहे. त्यामुळे निर्बंध हेच सामाजीक घटनांचे सार आहे काय? असा संभ्रम निर्माण होतो.

डुरखाईमच्या सामाजिक सत्य संकल्पनेवर अनेक विचारवंतानी वरीलप्रमाणे टीका केली असली तरी, त्याची ही संकल्पना अगदीच निरर्थक नाही. उलट समाजशास्त्रावरील मध्यवर्ती संकल्पना म्हणून ती आजही विचारात घेतली जाते. वस्तुनिष्ठ निरीक्षणासाठी सामाजिक सत्य संकल्पना अतिशय महत्वपूर्ण असल्याचे

निदर्शनास येते. कारण शेवटी तो एक सामाजिक वास्तवतेचाच प्रकार आहे. डुरखाईमने त्या आधारेच आपले सामाजिक एकता, श्रमविभाजन, आत्महत्या, धर्म यासंबंधीचे महत्वपूर्ण सिद्धांत विशद केले आहेत. यावरून आपणास डुरखाईमच्या पद्धतीशास्त्रामधील सामाजिक सत्य या संकल्पनेचे महत्व पटू शकेल.

✣ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १ :**

१) सामाजिक सत्याचे अस्तीत्व वैयक्तिक ज्ञानाच्या पलीकडे का असते?

२) डुरखाईमने सामाजिक सत्याची कोणती वैशिष्ट्ये सांगितली?

३) व्यक्तीला सामाजिक सत्यामध्ये सहभागी का व्हावे लागते?

४) सामाजिक सत्याचे डुरखाईमने कोणते नियम सांगितले?

५) सामाजिक सत्यास वस्तू म्हणून संबोधण्याची गरज का आहे?

**ब) समाजाच्या संदर्भात द्वंद्वात्मक भौतिकवाद याचे स्पष्टीकरण (कार्ल मार्क्स)** (Dialectical & Meterialistic enterpretation of society) **:**

औद्योगिक क्रांतीने समाजात भांडवलशाहीचा पाया घातला. अशा या भांडवलशाही मध्ये धनीक व श्रमीक म्हणजेच श्रीमंत व गरीब असे दोन वर्ग उदयास आले. धनीकांच्याकडून श्रमीकांचे विविध प्रकारे शोषण केले जावू लागले. या भांडवलशाहीने समाजात द्वंद्व, संघर्ष अथवा झगडा याची निर्मिती झाली. अशा या भांडवलशाही विरूद्ध ज्या अनेक विचारवंतांनी संघटित आवाज उठविला त्यामध्ये जर्मन विचारवंत कार्ल मार्क्सचा वरचा क्रमांक लागतो. अन्याया विरूद्ध झगडणारा, गरीबी – श्रीमंती यांच्या संघर्षाला परिवर्तनाकडे नेणारा, मजूर वर्गाचा कैवारी आणि आधुनिक साम्यवादी विचारांचा जनक म्हणून कार्ल मार्क्सचा उल्लेख केला जातो.

कार्ल मार्क्सने समाजातील शोषित वर्गाची (उदा. गुलाम, भूमीहिन शेतमजूर व कामगार) दुःखे अत्यंत साध्या, सोप्या व परिणामकारक शब्दामध्ये जगापुढे मांडली. मार्क्सच्या क्रांतीकारी विचारसरणीमुळेच त्याच्याकडे आधुनिक जगातील युगप्रवर्तक विचारवंत म्हणून पाहिले जाते. कार्ल मार्क्सने "The Poverty of philosophy.", "A critique of political economy", "Das Capital" यासारखे अनेक ग्रंथ लिहिले तसेच "Communist Manifesto" हा जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्याचे सर्व विचार वास्तवतेशी निगडीत असल्यामुळे भांडवलशाही समजाव्यवस्थेत भांडवदारांनी मजूर अथवा श्रमीक वर्गाला आपल्या आर्थिक स्थितीतून कसे वर काढता येईल याकडे आपले लक्ष केंद्रीत केले.

याठिकाणी आपणास समाजाच्या संदर्भात कार्ल मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवाद अथवा विरोध विकासवाद हा विचार कसा मांडला याचे स्पष्टीकरण करावयाचे आहे.

**४.२.२ कार्ल मार्क्सची समाजाच्या संदर्भात द्वंद्वात्मक भौतिकवादी विचारसरणी :**

मार्क्सची द्वंद्वात्मक भौतिकवादी विचारसरणी आत्म्याच्या कल्पनेवर आधारीत नसून ती वास्तविक जगातील मानवीक्रिया प्रक्रियांच्या अवलोकनावर आधारित आहे. मार्क्सने हेगेलच्या द्वंद्ववादास सरळ पायावर उभे केले. त्याच्या द्वंद्वात्मक भौतिकवादी विचारप्रणालीने वैज्ञानिक संशोधन करणे शक्य झाले. मार्क्सने आपल्या या सिद्धांतामध्ये हेगलने सांगितलेल्या 'आत्मा' 'स्व' यासारख्या गोष्टी स्पष्टपणे नाकारल्या 'भौतिक' या शब्दाचा साधा अर्थ डोळ्याना दिसणारे अथवा प्रत्यक्ष अनुभवास येणारे विश्व होय.

त्याच्यामते, आधी भौतिक सृष्टीत बदल होतात व त्यानंतर कल्पनासृष्टीत बदल होतात. मार्क्सने कल्पनाशक्तीपेक्षा भौतिक घटकास जबाबदार धरले. विश्वातील सर्व वस्तुंचे एकमेकांवर आघात - प्रघात होवून त्यातून संघर्षाचा उदय होतो, प्रत्येक बदलाचे कारण द्वंद्व असल्याने मानवाने नेहमी वास्तवतेचा विचार केला पाहिजे. समाजाच्या बाबतीत हा सिद्धांत मांडताना मार्क्सने **''समाज विकास म्हणजे एक भौतिक व आर्थिक संघर्षाचे फळ आहे.''** असा महत्वपुर्ण विचार स्पष्ट केला. समाजाच्या संदर्भातील द्वंद्वात्मक भौतिकवाद विचाराचा मूलाधार वैज्ञानिक असल्याने हेगेल पेक्षा कार्ल मार्क्सचा हा सिद्धांत खुप प्रचलित झाला.

### ४.२.२.१ कार्ल मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद अथवा विरोध विकासवाद सिद्धांत :

कार्ल मार्क्सने आपला समाजाच्या संदर्भातील द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांत १८४६ मध्ये मांडला. मार्क्सच्या समाजशास्त्रीय विचारातील **सर्वात महत्वपूर्ण सिद्धांत** म्हणून द्वंद्वात्मक भौतिकवादाकडे पाहिले जाते. त्याने हा सिद्धांत विरोधी दृष्टीकोणातून मांडला. या सिद्धांताद्वारे कार्ल मार्क्सने संघर्षवादी विचारप्रणाली विशद केली.

Dialectical हा इंग्रजी शब्द Dialego या मुळ ग्रीक शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ, तर्क-वितर्क करणे असा होतो. पूर्वी सत्याप्रत जाण्यासाठी तर्क वितर्क करणे आवश्यक मानले जात होते. त्यानंतर नैसर्गिक घटना जाणून घेण्यासाठी द्वंद्वात्मक विचार प्रणालीचा म्हणजेच विरोधातून विकास या संकल्पनेचा उपयोग होऊ लागला. मार्क्सच्या या सिद्धांताची उभारणी हेगेलच्या तत्वज्ञानावर आधारित आहे. हेगेलच्या मते, द्वंद्व हा एक तर्काचा प्रकार असून विचारांचा विकास हा विरोधातून होत असतो. म्हणजेच विरोधी विचार प्रक्रियेतून एक नवा विचार विकसीत होतो. यासंदर्भात हेगेलने Thesis (कल्पना), Anti Thesis (नवीन कल्पना) आणि Synthesis (सुसंवाद कल्पना) असा विचार मांडला. याचा अर्थ प्रथम मनात एक कल्पना सुचते. पुढे हा विचार विकसीत होतो आणि नंतर एखादी नवीन कल्पना सुचते. या दोन्ही विचारामध्ये संघर्ष निर्माण होवून तिसरी कल्पना सुचते. यालाच हेगेलची ''वाद प्रतिवाद व सुसंवाद कल्पनावादी तत्वप्रणाली'' असे म्हटले जाते.

कार्ल मार्क्सने मात्र समाजाच्या संदर्भात द्वंद्वात्मक भौतिकवाद अथवा विरोधातून विकास हा विचार मांडताना कल्पनाशक्तीपेक्षा भौतिक घटकास जबाबदार धरले. मार्क्सच्या मते, जगातील प्रत्येक बदलाचे कारण द्वंद्व असल्याने मानवाने नेहमी वास्तवतेचा विचार केला पाहिजे. त्याच्या द्वंद्वात्मक भौतिकवादी विचारांचा मूलाधार वैज्ञानिक असल्याने हेगेल पेक्षा कार्ल मार्क्सचा सिद्धांत अनेक विचारवंताना योग्य वाटतो.

### ४.२.२.२ द्वंद्वात्मक भौतिकवादाचे आधारभूत घटक :

(Factors of assumptions of Dialectical materialism) **:**

मार्क्सने आपला वरील सिद्धांत स्पष्ट करताना या सिद्धांताचे खालील प्रमाणे अनेक आधारभूत घटक सांगितले.

**१) गतिशीलता :**

भौतिक जग हे गतिशील आहे. पृथ्वी ही देखील गतिशील आहे. त्याच्या मते, जग किंवा कोणतीही गोष्ट स्थिर अथवा अपरिवर्तनशील राहू शकत नाही. ज्या गोष्टी आपणास स्थिर दिसतात, त्या प्रत्यक्षात स्थिर नसतात. प्रत्येक वस्तू एक तर विकासाकडे किंवा विनाशाकडे परिवर्तीत होत असते. या परिवर्तनाची

गती कधी तीव्र तर कधी मंद असते. एखाद्या अखंड प्रवाहासारखी सृष्टीची गती चालूच असते. मार्क्स म्हणतो की, निसर्गाचे मनावर चांगले वाईट परिणाम होत असतात. मानव हा सुद्धा विश्वाचा भाग असल्याने विश्वात बदल झाला तर मानवावर सुद्धा त्याचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाही.

**२) घटना अंर्तसंबंधित आणि अंर्तनिर्भर असतात :**

भौतिक जगातील सगळ्याच बाबी परस्परावर अवलंबून असतात. प्रत्येक वस्तू ही दुसऱ्या वस्तुशी संबंधीत असते. उदा. पाणी, पाण्यावर सर्व प्राणीमात्राचे जीवन अवलंबुन असते. परंतु पाणी सुद्धा हैड्रोजन आणि ऑक्सिजन यांच्या संयोगापासून बनलेले असते, हे सत्य कोणालाही नाकारता येत नाही. मार्क्स म्हणतो, पाण्याप्रमाणेच भौतिक जगातील आर्थिक व्यवस्थेचेही तसेच असते. आर्थिक व्यवस्था सुद्धा उत्पादक घटक, उत्पादनाची साधने व उत्पादन पद्धतींवर अवलंबून असते. ही आर्थिक व्यवस्थाच भौतिक जगातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आध्यात्मिक जीवन निश्चित करीत असते. याचाच अर्थ असा की, समाजातील अनेकविध व्यवस्था अंर्तसंबंधीत व अंर्तनिर्भर असतात.

**३) परिवर्तनशीलता :**

सृष्टी ही गतिशील असल्यामुळे ती परिवर्तनशील आहे. वेगवेगळ्या वस्तूंचा कधी ऱ्हास तर कधी विकास होत असतो. ऱ्हास किंवा विकासाचे स्वरूप म्हणजे परिवर्तन होय. एखाद्या वस्तूत घडून आलेले परिवर्तन हे नेहमीच साधे आणि सरळ स्वरूपाचे आहे असे नव्हे, तर ते वस्तूच्या भग्न पावण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. समाजाच्या बाबतीत असेच आहे. समाजात सुद्धा कधी प्रगती होत असते तर कधी उधोगती होत असते. समाजात निर्माण होणारी भग्नावस्था ही सामाजिक परिवर्तनाची क्रांतीकारी अवस्था असते.

**४) आंतरिक विरोधाभास :**

समाज हा नेहमी विस्तारीत असतो. समाजाची विस्तारण्याची ही प्रक्रिया जशी सार्वत्रिक स्वरूपाची असते तशीच ती अखंड चालणारी प्रक्रिया असते. समाज विस्तारित होत असताना त्यात काही अडथळे निर्माण होत असतात. ते विकासाला काही काळ रोखून ठेवतात. विस्तारवादी आणि विस्तारविरोधी शक्तीमध्ये संघर्ष जेंव्हा टोकाला जातो तेंव्हा परिवर्तन घडून येते असे मार्क्स म्हणतो. या दोन शक्तीनाच मार्क्स दोन वर्ग मानतो. त्याच्या मते, उत्पादन पद्धतीत बदल घडून आला की, नवीन वर्गाची शक्ती उदयाला येते आणि संघर्षाची मुहुर्तमेढ रोवली जाते. जमीनदार-भूदास/गुलाम, वर्तमानकाळातील भांडवलादार/कामगार इ. ज्याप्रमाणे जमीनदार नष्ट झाले त्याचप्रमाणे भांडवलदारही नष्ट होतील असे मार्क्सला वाटते.

वरील घटकांच्या अभ्यासावरून द्वंद्वात्मक भौतिकवाद स्पष्ट होतो. द्वंद्वात्मक भौतिकवादी सिद्धांतानुसार पदार्थ हेच विश्वाचे मूलाधार आहेत. सर्वप्रथम वस्तूचा विकास झाला व नंतर त्या वस्तुच्या अस्तित्वाविषयीची जाणीव निर्माण झाली. त्यामुळे पदार्थ मुख्य आहे, तर त्यासंबंधीची जाणीव ही दुय्यम आहे. कारण वस्तुच नसती तर जाणीवच निर्माण झाली नसती असे मार्क्स म्हणतो.

**४.२.२.३ द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताची वैशिष्ट्ये :**

मार्क्सचा द्वंद्वात्मकतेचा सिद्धांत (विरोध विकासवाद संकल्पना) हा भौतिकवादावर आधारित असल्याने या सिद्धांताची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आढळून येतात.

### १) वस्तूंचे अस्थायी स्वरूप :

मार्क्सच्या द्वंद्ववादी दृष्टिकोणानुसार विश्वातील कोणतीही वस्तू खऱ्या अर्थाने स्थिर नाही. प्रत्येक वस्तूचा विकास होतो आणि विनाश ही घडून येतो. याचा अर्थ उत्पत्ती, विकास आणि लय हे निसर्ग नियम प्रत्येक वस्तूला लागू पडतात. असे परिवर्तन विरोध विकासवादाच्या तत्वावर होत असते. म्हणजेच ते कधी सरळ होत नाही. उदा. पाणी गरम केल्यानंतर ते बराच वेळ गरम राहते. त्याची लगेच वाफ होत नाही. मात्र एका निश्चित अवस्थेनंतर परिवर्तनाचा हा क्रम संपुष्टात येतो. मानव समाजात देखील निश्चित अवस्थेनंतर जुनी समाजव्यवस्था सुंपष्टात येऊन त्या ठिकाणी नवीन समाजव्यवस्था प्रस्थापित होते. उदा. सरंजामशाहीतून भांडवलशाही, भांडवलशाहीतून साम्यवाद. या तत्वानुसार मानव हा ज्या विश्वाचा एक भाग आहे त्या विश्वाच्या स्वरूपात बदल झाला की, मानवालादेखील बदलावेच लागते.

### २) वस्तूतील अंतर्विरोध अथवा परस्परसंघर्ष :

मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताचे हे दुसरे ठळक वैशिष्ट्य आढळते. त्याच्या मते, सर्व वस्तू किंवा घटना यामध्ये नेहमी अंतर्विरोध अथवा परस्पर संघर्ष आढळतो. अशा अंतर्विरोधामुळेच द्वंद्वात्मक संघर्ष होऊन त्यातून विकास घडून येतो अथवा सामाजिक परिवर्तन होत असते. उदा. भांडवलशाही समाजनिर्मितीमुळे संरजामशाही समाजाचे अस्तित्व संपुष्टात आले. तसेच मजूर वर्ग संघटित झाल्याने भांडवलशाहीच्या पतनाला सुरूवात होते. मार्क्सच्या मते, वर्ग संघर्षाची प्रक्रिया वाढत जाऊन तिचा विस्फोट झाला अथवा क्रांती झाली की, संपूर्ण समाजव्यवस्था बदलते.

### ३) वस्तूतील परस्परावलंबित्व :

मार्क्सचा ''वस्तूच्या वास्तवतेवर विश्वास असल्यामुळे त्याचा दृष्टिकोण भौतिकवादी आहे. तसेच या दृष्टिकोणाची पद्धत द्वंद्वात्मक आहे, त्यानुसार विश्वातील कोणतीही वस्तू पूर्णपणे स्वतंत्र नाही. प्रत्येक वस्तू एकमेकांवर आधारित आहे. उदा. पाणी एका विशिष्ट बिंदूपर्यंत तापवले की त्याची वाफ होते. परंतु पाण्याचे तापमान किती झाल्यावर त्याची वाफ बनते हे मात्र हवेच्या दाबावर आधारित असते. याप्रमाणे विश्वातील कोणतीही वस्तू पूर्णपणे स्वतंत्र नाही. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीवर अथवा एक समाज दुसऱ्या समाजावर आधारित आहे.

### ४) भौतिक पदार्थ हा मूलाधार आहे :

मार्क्सच्या विरोध विकासवाद सिद्धांतानुसार भौतिक पदार्थच विश्वाचा मूलाधार आहे. सर्व प्रथम पदार्थाचा (वस्तूचा) विकास झाला व त्यानंतर जाणिवेचा विचार विकसित झाला. थोडक्यात, मार्क्सच्या वरील सिद्धांतानुसार पदार्थ प्रमुख असून विचार गौण आहे. बाह्य जग हे वास्तव असल्याने आपल्या मनाप्रमाणे त्याचा विकास होत नाही.

मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद सिद्धांताच्या वरील वैशिष्ट्यावरून असे स्पष्ट होते की, भौतिक परिस्थितीत बदल झाला की, व्यक्तीचे विचारदेखील बदलतात. भौतिक जगात विकास आणि विनाशाचे चक्र अव्याहतपणे सुरू असल्याने सदैव परिवर्तन होत असते. या अवस्थेला विरोध करणारे घटक अथवा तत्त्वे समाजात निर्माण होतात. परिवर्तन विरोधी आणि परिवर्तनवादी यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. या संघर्षातून समाजक्रांती घडून येते. मार्क्सच्या मते, जगातील सारे संघर्ष हे मुख्यत्वे आर्थिक संघर्ष असतात. या संघर्षाचे मूळ अर्थप्रधान असते. उदा. समाजात मालक-गुलाम, सरंजामदार-शेतमजूर, भांडवलदार-कामगार असे दोन परस्परविरोधी वर्ग असतात. त्यातील पहिला वर्ग सामाजिक दृष्टिने शोषणकर्ता असतो तर

दुसरा वर्ग शोषित असतो. त्यातून संघर्षाचा जन्म होऊन समाजक्रांती घडून येते. मार्क्स म्हणतो, मानवी इतिहासच संघर्षरूपी आहे. त्यामुळे विरोध विकासवाद प्रक्रिया समाजामध्ये सदैव आढळून येते.

**४.२.२.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न २ :**

१) 'दास कॅपीटल' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ कोणी लिहिला?

२) औद्योगिक क्रांतीने समाजात कोणत्या पद्धतीचा पाया घातला?

३) 'आधुनिक साम्यवादी विचारांचा जनक' म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?

४) कार्ल मार्क्सने कोणत्या वर्तमानपत्राचे संपादकत्व स्विकारले?

५) जगभरातील कामगार विश्वाचे क्रांतीकारी दर्शन घडविणारा कोणता ग्रंथ कार्ल मार्क्सने प्रकाशित केला?

६) 'कामगारांचा देवदूत' म्हणून कोणाचा उल्लेख करण्यात आला?

७) फ्रेडरिक एंजेलस याने कार्ल मार्क्सच्या मृत्यू संदर्भात दफन भूमीमध्ये कोणते मत मांडले?

८) कार्ल मार्क्सच्या मते, जगातील प्रत्येक बदलाचे कारण कोणते असते?

९) मार्क्सच्या मते, समाज विकास म्हणजे काय?

१०) ''भांडवलशाही समाजाचा नाश अपरिहार्य असून, त्यासाठी समाजवादी क्रांतीची गरज आहे.'' असा महत्त्वपूर्ण विचार कोणत्या जर्मन विचारवंताने मांडला?

**क) सामाजिक क्रियेबद्दलचे विश्लेषणात्मक आकलन (मॅक्स वेबर) :**

अभिजात परंपरा संक्षिप्त आढावा या घटकामध्ये कार्ल मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद या विचाराप्रमाणे मॅक्स वेबरच्या सामाजिक क्रियेचे विश्लेगषणात्मक आकलन यावर देखील भाष्य करणे गरजेचे आहे. मॅक्स वेबर हा जर्मन समाजशास्त्रज्ञ असून त्याने समाजशास्त्राचा वैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास केला. मॅक्स वेबरने अनेक महत्वपुर्ण ग्रंथाचे लिखान केले. उदा. 'प्रॉटेस्टंट नीतीशास्त्र', 'दि रिलीजन ऑफ चायना', इकॉनॉमी ॲण्ड सोसायटी इत्यादी. या सर्व ग्रंथाद्वारे मॅक्स वेबरने समाजशास्त्रीय विचारांमध्ये फार मोलाची भर घातली. त्यातूनच विज्ञानवादाच्या पायावर उभे असलेले आणि पद्धतीशास्त्राचा आसरा घेणारे समाजशास्त्र निर्माण झाले. सामाजिक क्रियेबद्दलचे विश्लेषण मॅक्स वेबरपूर्वी अनेकांनी कायीक दृष्टिकोणातून केले होते. उदा. स्पेन्सरने समाजाच्या उत्क्रांतीवर भर दिला, कार्ल मार्क्सने सामाजिक रचना आणि उत्पादन पद्धत यात बदल झाल्याने वर्ग संघर्षाचे स्वरूप कसे बदलत गेले याचे स्पष्टीकरण केले तर मॅक्स वेबरने भिन्न परिस्थितीत व्यक्ती ज्या क्रिया करतात त्याचा अर्थ जाणून घेणे हाच समाजशास्त्राचा प्रमुख अभ्यास विषय आहे असे मत मांडले. मॅक्सवेबर हा विचारवंत सामाजिक क्रियेचा अभ्यास वैज्ञानिक दृष्टीने करणारा प्रथम **व्यक्ती प्रधान शास्त्रज्ञ** होता असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

### ४.२.३.१ सामाजिक क्रिया व तिची व्याख्या :

✣ **सामाजिक क्रिया** (Social Action) **:**

सामाजिक क्रियेची संकल्पना ही मॅक्स वेबरच्या चिंतनातील अत्यंत महत्वपुर्ण संकल्पना असून यामध्ये वेबरने प्रथम 'क्रिया' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला. त्यानंतर क्रियेच्या मागे असणारा हेतू शोधण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते, व्यक्तीकडून होणारी कोणतीही क्रिया अथवा वर्तन हे जेव्हा क्रिया (Action) म्हणून ओळखले जाते, तेव्हा त्याच्या पाठीमागे अर्थपूर्णता असते. याचाच अर्थ, त्यामागे कर्त्याचा विशिष्ट असा हेतू निगडित असतो. या दृष्टीने सामाजिक क्रियेला अनन्यसाधारण महत्व आहे, असे सांगून वेबरने तिच्यामधील कार्यकारणसंबंध समजून घेण्याचा प्रयत्न केला.

✣ **वेबरने केलेली सामाजिक क्रियेची व्याख्या/अर्थ** (Definition of Social Action by Weber)**:**

''व्यक्ती किंवा व्यक्तिसमूहाकडून केली जाणारी क्रिया अशा वेळीच सामाजिक समजली जावी की, जेव्हा तिच्याशी प्रतीकात्मक अथवा अर्थपूर्ण संबंध आलेला असतो आणि तिच्यावर इतरांचा परिणाम होऊन त्यानुसार तिचे स्वरूप बदलत जाते.'' ("Action is social in so far as, by virtue of the subjective meaning attached to it, by the acting individual or it takes into account or the behaviour of others is there by oriented to its course.")

सामाजिक क्रियेच्या वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, वेबरने मानवी व्यवहारातील सर्व क्रिया सामाजिक मानलेल्या नाहीत. कोणतीही क्रिया सामाजिक ठरण्यासाठी तिच्यामध्ये पुढील चार गोष्टी असाव्यात असे सुचित केले त्याच्या मते -

१) सामाजिक क्रिया ही दुसऱ्या व्यक्तींच्या प्रभावातून निर्माण झालेली असली पाहिजे. म्हणजेच समाजात जीवन जगताना आपला अनेक व्यक्तींशी जो प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध येतो, त्यातुनच आपण कळत-नकळत इतर व्यक्तींच्या क्रियेशी संबंधित अशी जी क्रिया करतो, तिला 'सामाजिक क्रिया' म्हणता येईल. उदा. पूर्वी झालेल्या युद्धात पराभव पत्करावा लागल्यामुळे या होणाऱ्या युद्धात त्याचा बदला घेण्यासाठी केलेले युद्ध. थोडक्यात, दुसऱ्या व्यक्ती आपल्या ओळखीच्या असतील अथवा नसतील. परंतु त्यांच्या क्रियेतून आपल्या क्रियेचा निश्चितपणे उदय होतो.

२) इतरांच्या वर्तनाने प्रभावित होऊन आणि प्रतीकात्मक अर्थपूर्ण रीतीने केलेली क्रियाच केवळ सामाजिक क्रिया होऊ शकते. याचा अर्थ, अनुकरणातून निर्माण झालेल्या क्रियेमध्ये जोपर्यंत अर्थपूर्णता नसते, तोपर्यंत अशी क्रिया सामाजिक ठरत नाही. उदा. एकांतात देवाच्या मूर्तीपुढे बसून प्रार्थना करणे अशा तऱ्हेचे धार्मिक वर्तन अनुकरणातून होत असल्याने तिला सामाजिक क्रिया म्हणता येणार नाही. परंतु मंत्रपुष्प म्हटल्यावर देवाला फुले वाहणे, धार्मिक मिरवणुकीत सहभागी होणे ही मात्र सामाजिक क्रिया असते.

३) सामाजिक क्रियेच्या संदर्भात वेबर पुढे असे म्हणतो की, मानवप्राण्याच्या सर्वच हालचालींचे स्वरूप सामाजिक नसते, तर इतरांच्या प्रभावातून जे अर्थपूर्ण वर्तन घडत असते, ती सामाजिक क्रिया मानली जाते. याचाच अर्थ, परस्परसंबंधातून अर्थपूर्ण घडणारे मानवी वर्तन सामाजिक क्रियेमध्ये मोडते. उदा. दोन वाहनांची रस्त्यात एकमेकाला धडक बसणे ही सामाजिक क्रिया नसते, परंतु त्यानंतर जर त्या वाहनचालकांमध्ये शिवीगाळ झाली, तर ती मात्र सामाजिक क्रिया ठरते. कारण अशी क्रिया परस्परांशी संबंधित असते.

४) वेबरच्या मते, दुसऱ्या व्यक्तीच्या प्रभावातून निर्माण होणारी जशीच्या तशी क्रिया ही सामाजिक क्रिया म्हणता येणार नाही. परंतु अनुकरणात जर अर्थपूर्ण संबंध असेल, तरच ती क्रिया सामाजिक ठरते. उदा. पाऊस सरू झाल्यानंतर सर्व व्यक्ती आपापल्या छत्र्या उघडतात अथवा प्रवासासाठी बसची वाट पाहणाऱ्या व्यक्ती बस आल्यानंतर बसमध्ये चढतात किंवा थंडीच्या दिवसांत उबदार कपडे वापरतात, अशा क्रिया सामाजिक ठरत नाहीत. कारण यामध्ये क्रिया जरी सारखी असली तरी ती परस्परसंबंधातून उदयाला आलेली नसते, अशा क्रियांचा एकमेकांशी कसलाही संबंध नसतो. परंतु जेव्हा आपण परंपरा रूढी म्हणून दुसऱ्या व्यक्तीचे अनुकरण करतो, तेंव्हा त्यात वैयक्तिकतेपेक्षा सामाजिकता महत्त्वाची मानली जाते. अनुकरण करताना व्यक्ती समाजाचाच अधिक विचार करतात. अशा अनुकरणात्मक क्रियेला सामाजिक क्रिया असे म्हटले जाते. वेबरच्या मते, समाजशास्त्र हे अशा प्रकारच्या सामाजिक क्रियांशी संबंधित आहे.

वेबरने सामाजिक क्रियेच्या संदर्भात केलेले वरील महत्वपूर्ण विवेचन विचारात घेता त्यावरून असे निदर्शनास येते की, वेबरने मानव समाजातील सर्वच क्रिया सामाजिक मानलेल्या नाहीत. त्याच्या मते, सामाजिक क्रिया ही विशिष्ट उद्देशाने प्रेरित होऊन केलेली अथवा अर्थपुर्ण रितीने केलेली असली पाहिजे. तसेच ती समाजनिर्मित असली पाहिजे. सामाजिक क्रियेच्या मुळाशी क्रिया-प्रक्रियात्मक स्वरूप असले पाहिजे. समाजशास्त्र हे केवळ सामाजिक क्रियांचा अभ्यास करण्यापुरतेच मर्यादित शास्त्र नाही, तर शास्त्र हा दर्जा प्राप्त करण्यासाठी समाजशास्त्राच्या अभ्यासविषयात सामाजिक क्रियेच्या अभ्यासाला मध्यवर्ती स्थान निश्चितच निर्माण होऊ शकेल. त्यामुळे वेबरने **समाजशास्त्राला सामाजिक क्रियांचा अभ्यास करणारे शास्त्र** असे संबोधले.

### ४.२.३.२ सामाजिक क्रियेचे प्रकार (Types of Social Action) :

मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेचे पुढील चार प्रकार स्पष्ट केले आहेत ते म्हणजे - १) पंरपरागत सामाजिक क्रिया २) भावनात्मक सामाजिक क्रिया ३) मूल्याभिमुख सामाजिक क्रिया ४) तार्किक सामाजिक क्रिया.

### १) परंपरागत (परंपराधिष्ठित) सामाजिक क्रिया (Traditional Social Action) :

प्रत्येक समाजात काही प्रथा, परंपरा, चालीरीती किंवा रूढी पिढ्यानपिढ्या चालत असलेल्या दिसतात. त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केल्या जातात. समाजातील सर्व व्यक्तींकडून प्रथा, परंपरा अथवा क्रियांचे मनापासून पालन केले जाते. यावरून मॅक्स वेबर असे सूचित करतो की, ''सामाजिक प्रथा, पंरपरा, रूढी यांना अनुसरून किंवा त्याच्या प्रभावातून जे कार्य होत असते, ते पारंपारिक सामाजिक क्रिया म्हणून ओळखले जाते.'' उदा. धार्मिक सण, उत्सव, समारंभ साजरे करणे, यात्रा किंवा जत्रा भरविणे.

थोडक्यात, प्राचीन काळापासून व्यक्ती पंरपरांचे पालन करताना आढळतात. आपणही तसे करणे आवश्यक आहे, या भूमिकेतून जी क्रिया घडते तिला परंपरागत सामाजिक क्रिया असे म्हटले जाते. समाजाकडून अशा वर्तनाचीच अपेक्षा केली जाते. रूढी-परंपरांचे प्रत्येकाने पालन करावे, किंबहुना समाजातील प्रत्येक व्यक्तीचे ते कर्तव्यच आहे, अशी याबाबतची भावना असते. त्यामुळेच व्यक्तींकडून पूर्वीपासून परंपरागत सामाजिक क्रिया अथवा वर्तन केले जात असल्याचे दिसून येते.

### २) भावनात्मक सामाजिक क्रिया (Affective or Emotional Action) :

''दुसऱ्या व्यक्तीच्या अथवा समूहाच्या संपर्कात आल्यानंतर एकमेकांच्या भावनिक प्रभावातून जी क्रिया निर्माण होते, तिला भावनात्मक सामाजिक क्रिया म्हणून ओळखले जाते.'' उदा. अपंगाविषयी

सहानुभुती निर्माण होऊन त्यांना केली जाणारी मदत अथवा निराधार मुलांना दिलेला आसरा ही भावनात्मक सामाजिक क्रिया असते.

थोडक्यात, अशा सामाजिक क्रियेच्या मुळाशी भावनात्मक प्रेरणा असते व ती मानवाला कार्य करण्यास प्रवृत्त करते. अशा क्रिया अथवा कृती प्रेम, द्वेष, शत्रुत्व इत्यादींच्या आहारी गेल्यामूळेदेखील केल्या जातात. उदा. आदरयुक्त व्यक्तीच्या पुतळ्याची विटंबना करणे, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणे. अशा कृतींमुळे नंतर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. अशा क्रिया मानवी भावभावना जागृत करणाऱ्या असतात.

### ३) **मूल्याभिमुख सामाजिक क्रिया** (Valuational Social Action) **:**

''ज्या क्रिया काही धार्मिक अथवा नैतिक मूल्यांच्या आधारे केल्या जातात, त्यांना मूल्याभिमुख किंवा मूल्याधिष्ठित सामाजिक क्रिया असे म्हटले जाते.''

उदा. मोक्षप्राप्तीसाठी केलेले कर्म, परमेश्वराची प्रार्थना करणे, मंदिरात जाऊन देवदर्शन घेणे, सण-समारंभाला विशिष्ट देवतांची पूजा करणे, दसऱ्यादिवशी आपट्याची पाने सोने म्हणून देणे, संक्रांतीला तिळगूळ वाटणे यासारखे व्यक्तींचे वर्तन प्रकार अथवा क्रिया मूल्याभिमुख म्हणून ओळखल्या जातात.

थोडक्यात, वेबरच्या मते, वरील प्रकारच्या मूल्याभिमुख सामाजिक क्रियेमध्ये अंतिम मूल्यासंबंधी प्रश्न न विचारता व्यक्तींकडून अशा प्रकारच्या शिष्टाचारयुक्त क्रिया केल्या जातात. यामध्ये समाजाने आपणास नावे ठेवू नयेत म्हणून व्यक्तींकडून वरील सामाजिक क्रिया केल्या जातात. सामान्यतः अशा क्रियांच्या मुळाशी धार्मिक व नैतिक मूल्ये असतात. अर्थात, ही मूल्ये कोणत्याही तर्कावर अधिष्ठित नसतात. तरीदेखील व्यक्तींकडून ती एक समाजघटक म्हणून आचरणात आणली जातात.

### ४) **तार्किक (बुद्धिप्रामाण्यवादी) सामाजिक क्रिया** (Rationalistic Social Action) **:**

''विशिष्ट हेतू किंवा ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आणि परिस्थितीचा सारासार विचार करून जी क्रिया केली जाते, तिला तार्किक अथवा बुद्धिप्रामाण्यवादी सामाजिक क्रिया असे म्हटले जाते.''

उदा. एखादा पूल बांधण्यासाठी इंजिनिअरने तयार केलेला नकाशा, परीक्षांचे वेळापत्रक, नवीन उद्योगधंदा सुरू करताना केलेला आराखडा इत्यादींचा तार्किक अथवा बुद्धिप्रामाण्यवादी सामाजिक क्रियेत समावेश होतो.

वेबरच्या मते, तार्किक सामाजिक क्रियांना बुद्धिप्रामाण्याचा किंवा तर्काचा आधार असतो. यापासून लाभ व तोटा कोणता याचा विचार केला जातो. सामान्यतः भौतिक लाभाच्या दृष्टीनेच तार्किक सामाजिक क्रिया केल्या जातात. यामध्ये सर्वांगपूर्ण विचार करूनच त्या दृष्टिने वाटचाल केली जाते. थोडक्यात, उद्देशपुर्तता करण्याच्या हेतूने अशी क्रिया केली जाते. सामाजिक क्रियेचा हा प्रकार सर्वात महत्त्वपूर्ण समजला जातो.

मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेचे वरील चार प्रकार विशद करून सामाजिक क्रिया हा समाजशास्त्रातील अध्ययनाचा केंद्रबिंदू कसा आहे हे स्पष्ट केले. सामाजिक क्रियेच्या वर्गीकरणामुळे वेबरला पाश्चात्य समाजाचा विकास कसा झाला, असावा याचे स्पष्टीकरण देणे शक्य झाले. त्याच्या मते, आधुनिक पाश्चात्य समाजात अर्थकारण, राजकारण व कायदा यांसारख्या क्षेत्रात तार्किक अथवा बुद्धिप्रामाण्यवादी क्रियांचे प्रमाण वाढले आहे. याउलट, प्राचीन काळच्या समाजात मूल्याभिमुख, भावनात्मक आणि परंपरागत क्रियांचे (कृतीचे) प्रमाण जास्त होते. आजच्या समाजात सर्व क्रिया विशिष्ट ध्येयाने अथवा उद्दिष्टाने प्रेरित असतात.

तसेच त्या विचारपुर्वक केल्या जातात. अशा क्रिया अथवा कृतीचे प्रमाण कोणत्या कारणामुळे वाढले आहे हे जाणून घेणे हा समाजशास्त्राचा प्रमुख अभ्यासविषय आहे, असे वेबरचे मत होते.

सामाजिक क्रियांचे स्वरूप आणि प्रकार वेगवेगळे असले तरी मानवी सामाजिक जीवनाचा तो एक अविभाज्य घटक आहे हे गृहित धरून मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेच्या अभ्यासाकडे आपले लक्ष अधिक केंद्रीत केले. त्याचे संपूर्ण समाजशास्त्रच सामाजिक क्रियेच्या संकल्पनेवर आधारीत असल्याचे दिसून येते.

### ४.२.३.३ सामाजिक क्रियेची वैशिष्ट्ये :

मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेची खालील अनेक ढळक वैशिष्ट्ये सांगितली.

**१) सामाजिक क्रिया अन्य व्यक्तींच्या भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळातील क्रियांशी संबंधीत असतात :**

सामाजिक क्रिया की, ज्यात कर्त्याच्या क्रियेतील अपयश आणि निष्क्रियता समाविष्ट होते. तसेच इतरांच्या भूत, वर्तमान अगर भविष्यकालीन वर्तनातून त्या आकारास येतात. अशाप्रकारे हे स्पष्ट होते की, क्रियेला सामाजिक क्रिया असे जोपर्यंत म्हणता येत नाही, की तोपर्यंत तिचा दुसऱ्याच्या वर्तमान, भूतकाळ अगर भविष्यातील अपेक्षित वर्तनाशी संबंध असत नाही. उदा. पुर्वी केलेल्या एखाद्या क्रियेचा बदला घेण्यासाठी एखाद्याने दुसऱ्यावर केलेला हल्ला हा भूतकालीन घटनेचाच परिपाक असतो. तसेच एखाद्या पदवीच्या वर्गात प्राध्यापक काही प्रश्नांची उत्तरे लिहून देत असतील व विद्यार्थी लिहून घेत असतील तर ती क्रिया वर्तमानाशी संबंधित असते. त्याचप्रमाणे भविष्यात आपल्या कोर्सची परिक्षा देण्यासाठी तुम्ही तयारी करण्याची जी क्रिया करणार आहात ती भविष्यकालीन सुरक्षिततेसाठीची क्रिया ठरते. वेबर हे ही स्पष्ट करतो की, या सर्व क्रिया घडत असताना संपर्कात येणारी दुसरी व्यक्ती कायम आपल्या ओळखीची असेलच असे नाही. पण दुसऱ्या कर्त्याच्या क्रियातच आपल्या क्रियांचा उदय होत असतो. थोडक्यात सामाजिक जीवन जगत असताना आपला अनेक लोकांशी संबंध येतो व त्यातूनच नकळत आपण इतरांच्या क्रियाशी मिळत्याजुळत्या क्रिया करतो. या सर्व क्रिया सामाजिक क्रिया या संज्ञेस पात्र ठरतात.

**२) सामाजिक क्रिया या अन्य व्यक्तींच्या क्रियांशी संबंधीत असतात :**

वेबरच्या मते, कोणतीही क्रिया सामाजिक क्रिया ठरत नाही, जोपर्यंत ती अन्य व्यक्तींच्या क्रियांशी संबंधीत असत नाही. व्यक्तीची प्रत्येक क्रिया मग ती अगदी उघड स्वरूपाची असली तरी सामाजिक क्रिया असतेच असे नाही. या संदर्भात स्पष्टीकरण देताना वेबर म्हणतो की, कर्त्याची क्रिया ही जर निर्जीव किंवा अमानवीय वस्तूंच्या संदर्भात असेल तर ती क्रिया असामाजिक क्रिया असते. उदा. मनुष्याचे धार्मिक वर्तन किंवा धार्मिक क्रिया या केवळ चिंतनाच्या अगर वैयक्तिक असतील तर त्यांना सामाजिक क्रिया म्हणता येत नाही, कारण अशा क्रियांत इतर व्यक्तींचा संबंध येत नाही. याप्रमाणेच निर्जीव घटकाच्या संदर्भात होणाऱ्या क्रियातूनदेखील सामाजिक क्रिया उदयाला येत नाहीत, कारण येथेही दुसऱ्या घटकाकडून प्रतिसाद मिळत नसतो.

**३) सामाजिक क्रियांमध्ये मानवी संपर्काबरोबरच विचारांची व शब्दांची देवाण घेवाण होणे आवश्यक आहे**

सामाजिक क्रियेबाबत ही तिसरी महत्वाची कसोटी आहे. मानवामानवातील प्रत्येक क्रिया ही सामाजिक स्वरूपाची असत नाही. एखाद्या दुर्घटनेतून परस्परांना वाचवण्याच्या हेतूने केलेली क्रियादेखील सामाजिक क्रिया असत नाही. उदा. दोन सायकलस्वारांची टक्कर होताना परस्परांची ओळख नसताना देखील परस्परांना

वाचवण्याचा प्रयत्न करताना केलेली क्रिया सामाजिक क्रिया ठरत नाही. कारण अशा क्रियेत सामाजिकता नसते तर स्वतःला होणाऱ्या दुखापतीपासून संरक्षण मिळवणे हाच हेतू असतो. पण अशा टक्करीनंतर जर त्यांच्यात वादावादी व भांडण झाले तर ती मात्र सामाजिक क्रिया बनते. किंवा एखाद्या स्मगलरने जाणीवपूर्वक पोलीस जीपला टक्कर दिली व त्यात काही जणांचा मृत्यू झाला अगर काही जखमी झाले तर मात्र ती सामाजिक क्रिया बनते.

**४) अनेक व्यक्तीकडून केली जाणारी एकसारखी क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे :**

सामाजिक क्रिया या अनेक व्यक्तींनी केलेल्या एकसारख्या क्रियाशी किंवा इतरांनी प्रभावित केल्यामुळे घडलेल्या क्रियेशी कोणतेही साधर्म्य दर्शवीत नाहीत. याचे स्पष्टीकरण देताना वेबरने पुढील उदारहण दिले आहे. उदा. शहरातील गजबजलेल्या रस्त्याने लोकांची ये-जा चालेली असते. एवढ्यात पाऊस येतो. बहुसंख्य लोक आपल्याजवळील छत्र्या उघडतात. वेबर पुढे स्पष्ट करतो की, पाऊस आल्यावर लोकांची छत्र्या उघडण्याची क्रिया ही समान असली तरी ती सामाजिक क्रिया नाही कारण ती परस्परसंबंधातून उदयाला आलेली नाही. याबरोबरच वर्तमानपत्रातील एखाद्या नेत्याचे भाषण वाचल्यानंतर जर आपणास राग आला आणि तुमचा राग इतरांच्या दृष्टीने अर्थशून्य असेल तर ती क्रिया स्वाभाविक मानावी लागेल ती सामाजिक क्रिया नव्हे. याबरोबरच इतर व्यक्तींच्या क्रियेचे कोणताही हेतू न बाळगता केवळ अनुकरण म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे. समजा तुम्ही एखाद्या मुलाला आपल्या महाविद्यालयात जवळच्या रस्त्याने जाताना पाहिले व तुम्ही आणि इतरही त्याचे अनुकरण करण्यासाठी जवळच्या मार्गाने महाविद्यालयात जाऊ लागला तर या क्रियेत सामाजिकता नाही तर केवळ मुलांची सोय आहे, कारण येथे परस्पर प्रभावाचा अभाव आढळतो. पण जेंव्हा परंपरा किंवा रूढी या संदर्भात आपण इतरांचे अनुकरण करतो तेंव्हा त्यात सामाजिकता महत्वाची मानली जाते. परंपरा, रूढींचे पालन करत असताना व्यक्ती स्वतःपेक्षा समाजाचाच अधिक विचार करत असते. थोडक्यात, 'व्यक्तींच्या ज्या क्रिया अन्य व्यक्तींना तशाच क्रिया करण्यास प्रभावित करतात तेंव्हा त्यांना सामाजिक क्रिया म्हणतात.' आणि समाजशास्त्र केवळ अशाच सामाजिक क्रियांच्या अध्ययनाशी संबंधीत आहे.

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, मॅक्स वेबरच्या मतानुसार, सामाजिक क्रिया म्हणजे केवळ अशाच क्रिया की, ज्या अन्य व्यक्तीच्या भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळातील क्रियांशी तसेच अन्य व्यक्तींच्या क्रियांशी संबंधीत असतात. ज्या क्रियांत मानवी संपर्काबरोबरच विचारांची व शब्दांची देवाण घेवाण होणे आवश्यक असते आणि अनेक व्यक्तीकडून केली जाणारी एकसारखी क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे.

**४.२.३.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :**

१) मॅक्स वेबरने सांगितलेली सामाजिक क्रियेची व्याख्या द्या.

२) मॅक्स वेबरने विशद केलेली सामाजिक क्रियेची वैशिष्ट्ये लिहा.

३) बुद्धिप्रामाण्यवादी सामाजिक क्रिया म्हणजे काय?

४) मुल्याभिमूख सामाजिक क्रियेची व्याख्या लिहा.

५) परंपरावादी सामाजिक क्रिया म्हणजे काय?

६) मॅक्स वेबरच्या मते, तार्किक सामाजिक क्रियांना कशाचा आधार असतो?

७) वेबरच्या मते, आधुनिक समाजात कोणत्या क्रियांचे प्रमाण वाढले आहे ?

**ड) समाजाबद्दलचे सामाजिक – मानसशास्त्रीय दृष्टीकोन (डुरखाईम, स्पेन्सर व कुले) :**

अभिजात परंपरांचा संक्षिप्त आढावा घेताना वरील महत्त्वपूर्ण समाजशास्त्रीय विचारांप्रमाणेच समाजाबद्दलचे सामाजिक मानसशास्त्रीय दृष्टीकोन देखील अभ्यासणे आवश्यक आहे. अनेक समाजशास्त्रज्ञानी समाजाबद्दलचे सामाजिक मानसशास्त्रीय दृष्टिकोन मांडले असून त्याद्वारे समाजाची व्याख्या, समाजाची वैशिष्ट्ये तसेच समाजाबद्दलचे सामाजिक आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोण विचारात घेऊन वास्तव असे विवेचन केले आहे. या ठिकाणी आपणास एमिल डुरखाईम, हर्बर्ट स्पेन्सर आणि चार्लस् कुले यांच्या विचारांचा मागोवा घेणे उचित ठरणार आहे.

**४.२.४.१ समाजाची व्याख्या अथवा अर्थ :**

'समाज' या संकल्पनेचा नेमका समाजशास्त्रीय अर्थ कोणता हे समजावून घेण्यासाठी आपणास समाजाच्या खालील विविध व्याख्या अभ्यासाव्या लागतील.

✣ **उदा.**

**१) मॅकआयव्हर व पेज :** ''समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय.''

**२) ड्रेसलर व विलीस :** ''समान संस्कृती असणाऱ्या आणि आपण सर्वजण एक आहोत, असे मानणाऱ्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज होय.''

**३) राईट :** ''केवळ लोकांचा समूह म्हणजे समाज नव्हे, तर समूहातील व्यक्तींच्यामध्ये असणारी संबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय.''

समाजाच्या वरील ठळक व्याख्या विचारात घेता असे स्पष्ट होते की, समाज ही एक सामाजिक व्यवस्था असून समाजाला निश्चित असा भूप्रदेश असतो. समाजातील व्यक्तींच्यामध्ये एकतेची भावना असते. तसेच समाजाच्या विविध गरजा भागविण्याच्या यंत्रणा समाजानेच निर्माण केलेल्या असल्याने समाज सापेक्षतः स्वयंपूर्ण असतो, समाज म्हणजे परस्पराशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूहांची मिळून बनलेली एक व्यापक अशा आंतरक्रियांची व्यवस्था असते.

**४.२.४.२. समाजाची वैशिष्ट्ये :**

समाज संकल्पनेच्या वरील व्याख्या अभ्यासल्यानंतर आपणास समाजाची खालील ठळक वैशिष्ट्ये निदर्शनास येतात, या वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यानंतर निश्चितच समाजाबद्दलचे सामाजिक-मानसशास्त्रीय दृष्टीकोन समजू शकतील. समाजाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) व्यापक संस्कृती :**

प्रत्येक समाजाची स्वतःची अशी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. संस्कृती म्हणजे समग्र समाजाची एक जीवनपद्धतीच असते. संस्कृतीमध्ये घरे, भांडी, दागदागिने, यंत्रे इत्यादी मानव निर्मीत भौतिक गोष्टींचा समावेश होतो. त्याचप्रमाणे ज्ञान, कौशल्ये, मुल्ये, रितीरिवाज इ. अभौतिक गोष्टींचा देखील समावेश होतो.

**२) निश्चित भू–प्रदेश :**

प्रत्येक समाजाला जशी स्वतःची संस्कृती असते त्याचप्रमाणे निश्चित असा भू–प्रदेश असतो. अशा भू–प्रदेशावरच समाजातील सर्व व्यक्ती आपले संपूर्ण जीवन जगतात. अर्थात प्रत्येक समाजाच्या

भू-प्रदेशाच्या सीमारेषा ठरलेल्या असतात. भू-प्रदेशाचा त्या समाजाच्या संस्कृतीवर निश्चित असा ठसा उमटलेला असतो.

**३) स्वयंसातत्यशील व्यवस्था :**

समाजाचे हे तिसरे ठळक वैशिष्ट्य आढळून येते. ज्याप्रमाणे प्रत्येक समाजाला स्वतःचा निश्चित असा भू-प्रदेश असतो, त्याच प्रमाणे समाजाला स्वयंसातत्यशील अशी व्यवस्था असते. समाजातील व्यक्ती जन्माला येतात आणि मरण पावतात. परंतु समाजव्यवस्था मात्र अखंडपणे टिकून राहते. या अर्थाने समाज स्वयंसातत्यशील व स्थिर असतो.

**४) समाज एक अमूर्त वास्तवता :**

समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता समाजाचे हे देखील ठळक वैशिष्ट्य आढळून येते. समाज एक अमूर्त वास्तवता याचा अर्थ समाजातील व्यक्ती आणि व्यक्तींचे वर्तन याचे आपण प्रत्यक्ष निरिक्षण करू शकतो. कारण या गोष्टी मूर्त आहेत. व्यक्ती दिसतात, त्याप्रमाणे समाज मात्र प्रत्यक्ष डोळ्यानी दिसत नाही. अर्थात समाज ही अस्तित्वात असलेली एक वास्तवता आहे.

**५) समाज म्हणजे सामाजिक संबंधाची व्यवस्था होय :**

एक सामाजिक व्यवस्था या अर्थाने समाज ही संकल्पना समाजशास्त्रात वापरली जाते. समाज म्हणजे परस्परांशी आतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूहांची मिळून बनलेली एक व्यापक आंतरक्रियांची व्यवस्था होय. अशा सामाजिक आंतरक्रियांमुळेच व्यक्ती आणि समूहात निश्चित स्वरूपाचे सामाजिक संबंध निर्माण झालेले असतात. या अर्थाने समाजाकडे सामाजिक संबंधाची व्यवस्था म्हणून पाहिले जाते.

**४.२.४.३. समाजाचे सामाजिक मानसशास्त्रीय दृष्टीकोन (एमिल डुरखाईम, हर्बर्ट स्पेन्सर व चार्लस कूले) :**

समाजाचे सामाजिक-मानसशास्त्रीय दृष्टीकोन यासंदर्भात आपणास प्रामुख्याने डुरखाईम, स्पेन्सर आणि कुले या विचारवंताच्या विचारांचा मागोवा घ्यावा लागेल.

**१) एमिल डुरखाईम :**

एमिल डुरखाईम हा फ्रेंच समाजशास्त्रज्ञ असून त्याने आपले समाजशास्त्रीय सिद्धांत अनुभवनिष्ठ संशोधनावर मांडले. समाजशास्त्रीय संशोधन कसे करावे याविषयीचे नियम सांगितले त्याचप्रमाणे समाजशास्त्राकडून सामाजिक तथ्यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जातो हे दाखवून दिले.

समाजाच्या संदर्भात सामाजिक-मानसशास्त्रीय दृष्टीकोन मांडताना डुरखाईमने पुढील महत्वपूर्ण विचार स्पष्ट केले. डुरखाईमच्या मते, समाजाला स्वतंत्र असे अस्तित्व आहे. व्यक्ती ही तिच्या सामाजिक परिस्थितीचीच निर्मिती असते. समाज व्यक्तीची जडण-घडण करतो. हा विचार डुरखाईमच्या समाजशास्त्रीय लिखाणातील प्रमुख विचार म्हणून सांगता येईल. एलिम डुरखाईमने समाजात सामाजिक आणि मानसशास्त्रीय दृष्ट्या एकात्मता टिकवून ठेवणाऱ्या शक्ती कोणत्या? सामाजिक संरचनाची समाजाच्या दृष्टीने आवश्यक कार्ये कोणती याविषयाकडे आपले लक्ष केंद्रीत केले. त्यामुळेच त्याचे वरील विचार महत्वपुर्ण म्हणून मानण्यात आले.

### २) हर्बर्ट स्पेन्सर :

हर्बर्ट स्पेन्सर हा ब्रिटीश विचारवंत असून ऑगस्त कॉम्त प्रमाणेच स्पेन्सरने आपले सामाजिक विचार अतिशय प्रभावीपणे मांडले, कॉम्तने बीज स्वरूपात विचार निर्माण केले तर हर्बर्ट स्पेन्सरने या विचाराचा वृक्ष बनविण्याचे कार्य केले. स्पेन्सरने उत्क्रांतवाद सिद्धांताच्या आधारे समाजाचे सामाजिक-मानसशास्त्रीय दृष्टीकोन खालील प्रमाणे स्पष्ट केले.

स्पेन्सरच्या मते, संपूर्ण विश्वाची उत्पत्ती ही एकाच मूळ तत्वापासून झाली असून विश्व उत्पत्ती शक्ती ही चिरंतन प्रेरणा आहे. मानव समाजात देखील उत्क्रांती ही उदय, वाढ आणि विकास या प्रक्रियेने झाली आहे असे मत मांडले. त्याने जीवसृष्टीच्या संदर्भात ''जीवो जीवस्य जीवनम्'' हे तत्व गृहित धरले त्याचप्रमाणे समाजाच्या संदर्भात उत्क्रांतवाद सिद्धांत खालीलप्रमाणे मांडला. उदा. ''जगामध्ये अनेक मानव समाज निर्माण झाले व नष्ट ही झाले. त्यामध्ये जे समाज अवती-भोवतीच्या वातारणाशी समायोजन साधण्यामध्ये यशस्वी झाले, तेच अस्तित्वाच्या झगड्यामध्ये विजयी झाले आणि ज्यांना अशा पर्यावरणाशी समायोजन साधता आले नाही ते अस्तित्वाच्या झगड्यामध्ये पराभूत अथवा नष्ट झाले.''

थोडक्यात समाजाच्या संदर्भात विकास हा साध्या अवस्थेपासून गुंतागुंतीच्या अवस्थेकडे होत जातो, असेच उत्क्रांतीचे तत्व मांडले. उदा. समाजाची प्रारंभीची अवस्था म्हणजे अविकसीत अवस्था (आदिवासी समाज) तर दुसरी अवस्था म्हणजे विकसीत अवस्था (प्रगत समाज) प्रथम अवस्थेत व्यक्तीचे जीवन संघटित नव्हते तर दुसऱ्या अवस्थेत प्रत्येक व्यक्ती निश्चित पद्धतीने आणि विशिष्ट ध्येयाने नेमून दिलेल्या कार्यामध्ये मग्न झाली. या अर्थाने समाज विकसीत झाला. थोडक्यात समाजाची आजची स्थिती म्हणजे प्रगत अवस्था ही प्रगत अवस्था एकदम प्राप्त झाली नसून अनेक वर्षापासून त्यामध्ये अपेक्षित बदल होत गेले, मानवाच्या जीवनाला स्थिरता आली, संस्कृतीचा विकास झाला, तसेच अनुभवामुळे मानवाला सामाजिक जीवनाची कल्पना सुचली. एका अर्थी समाज संघटीत झाला. यालाच हर्बर्ट स्पेन्सरने मानवी उत्क्रांती हे नाव दिले.

### ३) चार्लस हॉर्टन कुले :

समाजाच्या संदर्भात चार्लस कुलेचे सामाजिक मानसशास्त्रीय दृष्टीकोन अथवा विचार खालीलप्रमाणे निदर्शनास येतात. कुले याचे समाजशास्त्रातील आणि सामाजिक मानसशास्त्रातील योगदान अत्यंत महत्वाचे आहे. कुलेने ''प्राथमिक समुह'' आणि ''प्रतिबिंबित स्व'' (Primary Group आणि Looking class self) या दोन महत्वपूर्ण समाजशास्त्रीय संकल्पना विशद केल्या. त्याद्वारे व्यक्ती आणि समाज व त्या दोहोतील संबंध सामाजिक प्रक्रिया आणि सामुदायिक वर्तन या संदर्भातील दृष्टीकोन अथवा विचार मांडले.

कुलेने प्राथमिक गट अथवा समूहाबद्दल पुढील विचार मांडले. त्याच्या मते, प्राथमिक गटातील व्यक्तींचे संबंध घनिष्ठ, एकतेचे आणि समोरासमोरचे असतात. तसेच ते दिर्घकाल टिकाणारे असतात. प्रामुख्याने व्यक्तीचे आदर्श आणि व्यक्तीचा सामाजिक स्वभाव घडविण्याच्या दृष्टीने अशा समूहाना खूप महत्व असते. उदा. कुटुंब, शेजारी आणि खेळातील सवंगडी इ. जीवन ही तडजोड असल्यामुळे इतरांच्या सुखासाठी झटणे आवश्यक असते, याची शिकवण व्यक्तीला प्राथमिक गटाकडूनच मिळते. थोडक्यात असे गट व्यक्तीला ''सामाजिक व्यक्ती'' बनविण्यामध्ये मोठा हातभार लावतात. त्यामुळे चार्लस कुलेने प्राथमिक गटाना **'मानवी जीवनाचे निर्झर'** (Springs of Human Life) असे संबोधिले. अशा गटाकडून व्यक्तीमत्व

विकास, कार्यक्षमतेत वाढ, मानसिक सुरक्षितता, सामाजिक नियंत्रण आणि सामाजिक भूमिकांचे ज्ञान यासारखी सामाजिक व मानसिक दृष्ट्या अनेक महत्वपूर्ण कार्ये पार पाडली जातात.

चार्लस कूलेने समाजाच्या संदर्भात प्राथमिक गटाप्रमाणे 'प्रतिबिंबित स्व' या दुसऱ्या महत्वपूर्ण विचाराचा खालील प्रमाणे मागोवा घेताला. त्याच्या मते, ''स्व आणि समाज'' यांचा परस्परांशी अतिशय जवळचा संबंध असून त्यांच्या मध्ये जुळ्या भावंडाप्रमाणे अतूट असे जैविक संबंध आहेत. व्यक्ती आणि समाज या गोष्टी एकमेकांपासून कधीच अलग करता येत नाहीत. समाजाशिवाय व्यक्ती आणि व्यक्तीशिवाय समाज असूच शकत नाही. व्यक्ती आणि समाज ही एकाच गोष्टीची सामूहिक रूपे आहेत. व्यक्तीच्या 'स्व' ची जडण-घडण ही तिचा समाजातील इतरांच्याबरोबर जो संबंध येतो त्याच्यावर अवलंबून असते. 'स्व' ची कल्पना, इतरांच्या व्यक्तीविषयी असलेल्या कल्पनेतून निर्माण होत असते. इतरांच्या अस्तित्वाशिवाय 'स्व' असूच शकत नाही. 'स्व' हा व्यक्तीच्या सर्व अनुभवांच्या केंद्रस्थानी असून तो व्यक्तीमत्वाचा कणा समजला जातो.

थोडक्यात आरशामध्ये ज्याप्रमाणे त्यापुढे येणाऱ्या गोष्टींचे प्रतिबिंब पडते त्याचप्रमाणे इतरांच्या व्यक्तीविषयी कल्पनांचे प्रतिबिंबित रूप म्हणजेच व्यक्तीचे 'स्व' होय. आपल्याविषयी इतरांच्या कल्पना सुसंगत असल्यास आपले 'स्वत्व' विकसीत होत जाते. व्यक्तीच्या 'स्व'ची वाढ ही एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी जो मनोव्यापारी संबंध येतो त्यावर अवलंबून असते. याचाच अर्थ व्यक्ती-व्यक्तीमध्ये समाज व्यवस्थेत जे दळणवळण सुरू होते. त्यावरच त्या व्यक्तीचा 'स्व' विकास अवलंबून असतो. कुलेचे हे विचार सामाजिक मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अतिशय वास्तव आणि महत्त्वपूर्ण असल्याचे निदर्शनास येते.

### ४.२.४.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न :

१) समाज म्हणजे ................ होय.

२) समान संस्कृती असणाऱ्या आणि आपण सर्वजण समान आहोत असे मानणाऱ्या व्यक्तींच्या समूहास काय म्हणतात?

३) व्यापक संस्कृती आणि निश्चित भू-प्रदेश ही कशाची ठळक वैशिष्ट्ये आहेत?

४) एमिल डुरखाईमने समाजाच्या संदर्भात कोणते विचार मांडले?

५) हर्बर्ट स्पेन्सरने कोणत्या सिद्धांताच्या आधारे समाजाचे सामाजिक मानसशास्त्रीय विश्लेषण केले?

६) विश्व उत्पत्ती शक्ती ही चिरंतन प्रेरणा असून मानव समाजात उत्क्रांती उदय, वाढ आणि विकास या प्रक्रियेने झाली असा विचार कोणी मांडला?

७) स्पेन्सरने समाजाच्या संदर्भात उत्क्रांतवाद सिद्धांत कसा मांडला?

८) 'प्राथमिक समूह' आणि 'प्रतिबिंबित स्व' या संकल्पना कोणी मांडल्या?

९) 'इतरांच्या सुखासाठी झटणे' अशी शिकवण कोणत्या गटाकडून मिळते?

१०) व्यक्ती आणि समाज ही एकाच गोष्टीची सामूहिक रूपे आहेत. व्यक्तीच्या 'स्व' ची जडणघडण ही समाजातील इतरांशी येणाऱ्या संबंधावर अवलंबून असते असा महत्वपूर्ण विचार कोणी मांडला?

## ४.३ सारांश :

घटक क्र. ४ अभिजात परंपरांचा संक्षिप्त आढावा यासंदर्भात वरील सर्व समाजशास्त्रीय विचार विचारात घेता असा निष्कर्ष काढता येईल की, **एमिल डुरखाईमने** सामाजिक तथ्यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करताना समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा पुरस्कार केला, त्याच्या मते, कोणत्याही सामाजिक घटनेचा अभ्यास काल्पनिक गोष्टींच्या आधारे न करता वैज्ञानिक पद्धतीने करून तशी माहिती मिळविणे हे अधिक संयुक्तीक असते. त्याने सामाजिक तथ्य अथवा सत्य संकल्पना हा विचार वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून मांडला.

समाजाच्या संदर्भात **कार्ल मार्क्सने** द्वंद्वात्मक भौतिकवाद अथवा विरोध विकासवाद सिद्धांताचे स्पष्टीकरण करताना भांडवलशाहीनेच समाजात द्वंद्व अथवा संघर्ष किंवा झगडा याची निर्मिती झाली. भांडवलदार वर्गाकडून कामगार किंवा श्रमिकांचे सर्व प्रकारे शोषण करण्यात आले. या विचाराकडे आपले लक्ष केंद्रित केले. त्यामुळेच कार्ल मार्क्सकडे संघर्षाला परिवर्तनाकडे नेणारा, मजूर वर्गाचा कैवारी, युग प्रवर्तक विचारवंत आणि आधुनिक साम्यवादी विचारांचा जनक म्हणून पाहिले जाते, मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिक सिद्धांतामध्ये कल्पना शक्तीपेक्षा भौतिक घटकास जबाबदार धरले. समाज विकास म्हणजे एक भौतिक व आर्थिक संघर्षाचे फळ आहे असा महत्वपूर्ण विचार आपल्या वरील सिद्धांतामध्ये मांडला.

**मॅक्स वेबरचे** सामाजिक क्रियेबद्दलचे विश्लेषणात्मक आकलन यासंदर्भात आपणास असे निदर्शनास येते की,  वेबरने पद्धती शास्त्राचा आसरा घेणारे समाजशास्त्र निर्माण केले. तसेच भिन्न परिस्थितीत व्यक्ती ज्या क्रिया करतात त्याचा अर्थ जाणून घेणे हाच समाजशास्त्राचा प्रमुख अभ्यास विषय आहे, असे मत मांडले. त्याच्या मते, मानवी व्यवहारातील सर्व क्रिया सामाजिक असत नाहीत. कोणतीही क्रिया सामाजिक ठरण्यासाठी तिच्यामध्ये पुढील गोष्टी असाव्या लागतात. उदा. सामाजिक क्रिया ही दुसऱ्या व्यक्तीच्या प्रभावातून निर्माण झालेली असली पाहिजे. तसेच ती प्रतिकात्मक अर्थपूर्ण रितीने केलेली असली पाहिजे. धार्मिक मिरवणूकीत सहभागी होणे अथवा रूढी परंपराचे अनुकरण करणे असेच वर्तन सामाजिक क्रिया ठरते.

समाजाबद्दलचे सामाजिक-मानसशास्त्रीय दृष्टीकोन अथवा वैचारिक स्पष्टीकरण यासंदर्भात असे निदर्शनास येते की, समाज ही एक सामाजिक व्यवस्था असून समाजाच्या विविध गरजा भागविण्याच्या यंत्रणा समाजानेच निर्माण केल्या. समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे असून परस्परांशी घडून येणाऱ्या आंतरक्रियांची व्यवस्था असते.

**एमिल डुरखाईमने** समाजासंबंधीचे सामाजिक मानसशास्त्रीय विश्लेषण करताना कोणत्याही मानव समाजाला स्वतंत्र असे अस्तीत्व आहे. सामाज व्यक्तीची जडणघडण करतो, तसेच समाजाकडूनच समाजिक आणि मानसशास्त्रीय एकात्मता टिकवून ठेवली जाते, असा महत्वपूर्ण विचार मांडला. **हर्बर्ट स्पेन्सरने** उत्क्रांतवाद सिद्धांताच्या आधारे समाजाचे सामाजिक मानसशास्त्रीय विश्लेषण केले. स्पेन्सरच्या मते, जे समाज अवती भोवतीच्या वातावरणाशी समायोजन साधण्यामध्ये यशस्वी झाले तेच अस्तित्वाच्या झगड्यामध्ये टिकून राहिले. समाजाचा विकास हा साध्या अवस्थेतून गुंतागुंतीच्या अवस्थेकडे होत जातो. असा महत्त्वपूर्ण विचार मांडला. चार्लस कूलेने ''प्राथमिक समूह आणि प्रतिबिंबित स्व'' या दोन महत्वपूर्ण संकल्पनांच्या आधारे समाजाबद्दलचे सामाजिक मानसशास्त्रीय विचार मांडले. कूलेच्या मते, कुटुंबासारख्या प्राथमिक गटामध्ये इतरांच्या सुखाचा विचार केला जातो. व्यक्तीचा 'स्व' आणि समाज याचा परस्परांशी जवळचा संबंध असून त्यांच्यामध्ये जुळ्या भांवडाप्रमाणे अतुट असे जैविक संबंध आहेत.

## ४.४ पारिभाषिक संज्ञा :

Introspection - आत्मपरिक्षण करणे.

Solidarity - एकता.

Objectivity - प्रत्यक्षवाद अथवा वस्तुनिष्ठता.

Social Facts - सामाजिक तथ्य अथवा सत्य.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**४.२.१.३ (एमिल डुरखाईम)**

१) सामाजिक सत्य ही स्थिर संकल्पना नसून ती गतिशील संकल्पना आहे.

२) डुरखाईमने सामाजिक तथ्यांची पुढील वैशिष्ट्ये सांगितली.

उदा. १) सामाजिक तथ्ये समाजात बाह्यरूप असतात.

२) व्यक्तीवर निर्बंध म्हणून असतात.

३) ती समाजात विखुरलेली असतात.

४) ती निसर्गाशी संबंधित असतात.

३) कारण त्यामुळे वस्तुनिष्ठता समजते तसेच त्याचा अर्थ समजून घेता येतो.

४) डुरखाईमने सामाजिक तथ्यांचे खालील नियम सांगितले.

उदा. १) सामाजिक तथ्य हे वस्तू म्हणून विचारात घेतले पाहिजे.

२) सामाजिक तथ्याचे निरिक्षण व्यक्तीगत प्रकटीकरणाच्या पलीकडील असते.

३) पूर्व संकल्पनांचे निर्मूलन करणे.

४) घटनांशी संबंधित तथ्यांचे बाह्य वैशिष्ट्यानुसार पूर्ण स्पष्टीकरण करणे.

५) कारण त्यामुळे निश्चित व स्पष्ट स्वरूपात सत्य प्रकट करणे शक्य होईल.

**✣ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २ :**

**४.२.२.४ (कार्ल मार्क्स)**

१) कार्ल मार्क्स, २) भांडवलशाही ३) कार्ल मार्क्स

४) ऱ्हायनिश झिंटूग ५) Holy Family ६) कार्ल मार्क्स

७) मजूरांचे श्रद्धास्थान हरपले ८) द्वंद्व

९) भौतिक व आर्थिक संघर्षाचे फळ १०) कार्ल मार्क्स.

✣ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३ :**

४.२.३.४ **(मॅक्स वेबर)**

१) व्यक्तीकडून केली जाणारी अशी क्रिया की, जिच्यामध्ये अर्थपूर्ण संबंध आलेला असतो आणि तिच्यावर इतरांचा परिणाम होवून त्यानुसार तिचे स्वरूप बदलत जाते.

२) १) सामाजिक क्रिया अन्य व्यक्तींच्या क्रियांशी संबंधित असतात.

२) सामाजिक क्रियांमध्ये मानवी संपर्काबरोबरच विचारांची देवाण घेवाण होणे आवश्यक आहे.

३) अनेक व्यक्तींच्याकडून केली जाणारी एकसारखी क्रिया म्हणजे सामाजिक क्रिया नव्हे.

३) बुद्धीप्रामाण्यावादी सामाजिक क्रिया म्हणजे जेंव्हा व्यक्ती जाणीवपूर्वक आपली उपलब्ध साधने व साध्ये यांच्यात योजनापूर्वक समायोजन प्रस्थापित करून क्रिया करते.

४) ज्या क्रियेमध्ये व्यक्तीवर मूल्यांचे नियंत्रण असते आणि जे वर्तन समाजाने कोणत्याही संयुक्तीक कारणानी स्वीकारलेले असते.

५) परंपरावादी सामाजिक क्रिया म्हणजे अशा क्रिया की, ज्या सामाजिक प्रथांच्या साहाय्याने अनेक व्यक्तींद्वारे केल्या जातात.

६) बुद्धीप्रामाण्याचा किंवा तर्काचा आधार असतो.

७) आधुनिक समाजात तार्किक अथवा बुद्धीप्रामाण्यवादी क्रियांचे प्रमाण वाढले आहे.

✣ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ४ :**

४.२.४.४ **(डुरखाईम, स्पेन्सर, कुले)**

१) सामाजिक संबंधाचे जाळे २) समाज ३) समाजाची ४) समाज व्यक्तीची जडण घडण करतो समाजाला स्वतंत्र अस्तित्व असते. ५) उत्क्रांतवाद ६) हर्बर्ट स्पेन्सर ७) जगामध्ये आवती भोवतीच्या वातावरणांशी समायोजन साधणारे यशस्वी झाले तर इतर नष्ट झाले. ८) चार्लस कुले ९) प्राथमिक १०) चार्लस कुले.

## ४.६ सराव :

### अ) एमिल डुरखाईम–सामाजिक तथ्य अथवा सत्य संकल्पना वस्तुनिष्ठ अभ्यास :

१) सामाजिक तथ्य अथवा सत्य याची व्याख्या व वैशिष्ट्ये याचे सविस्तर विवेचन करा.

### ब) कार्ल मार्क्स – समाजाच्या संदर्भात द्वंद्वात्क भौतिकवाद :

१) द्वंद्वात्मक भौतिकवाद समाजामध्ये कोणत्या परिस्थितीत अस्तित्वात येतो याची चर्चा करा.

२) द्वंद्वात्मक भौतिकवादाचे घटक स्पष्ट करा.

३) मार्क्सने विरोध विकासवाद सिद्धांताची कोणती वैशिष्ट्ये सांगितली यावर भाष्य करा.

**क) मॅक्स वेबर – सामाजिक क्रियेबद्दलचे विश्लेषणात्मक आकलन :**

१) मॅक्स वेबरने सांगितलेली सामाजिक क्रियेची व्याख्या आणि सामाजिक क्रियेचे प्रकार विशद करा.

२) 'सामाजिक क्रियेची वैशिष्ट्ये' यावर थोडक्यात उत्तर लिहा.

**ड) डुरखाईम, स्पेन्सर व कुले – समाजबद्दलचे सामाजिक मानसशास्त्रीय विचार :**

१) समाजाची व्याख्या द्या आणि समाजाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) डुरखाईमचा समाजाबद्दलचा विचार लिहा.

३) स्पेन्सरचा समाजाच्या संदर्भातील 'उत्क्रांतवाद' सिद्धांत स्पष्ट करा.

४) चार्लस् कूलेचे 'प्राथमिक गट' आणि 'प्रतिबिंबित स्व' या संदर्भातील विचार थोडक्यात लिहा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


1) Aron, Raymond - Main Currents in Socialogical Thought (Vol. I & II )

2) Fransis Abraham - Sociological Thought Mac Millan Publication 2002.

3) Coser, Lewis A - Masters of Sociological Thought. Rawat Publications, Jaypur 1996

4) Singh K. History of Social Thought.

5) Mohite S.L. & Salunkhe P.S. Samajshatriya Vicharvant. Phadke Prakashan, Kolhapur.


+++